

# माझ्या शेतकरी भावांनो मायबहिणींनो...

शरद जोशी

# माझ्या शेतकरी भावांनो मायबहिणींनो

शरद जोशी

जनशक्ती वाचक चळवळ

TM
जनशक्ती
वाचक
चळवळ

माझ्या शेतकरी भावांनो माय बहिणींनो । शरद जोशी

प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ
पिनाक, २४४-समर्थनगर,
औरंगाबाद-४३१००१-३१
दूरभाष : (०२४०) २३४१००४.
Email : janshakti.wachak@gmail.com

© शरद जोशी
अंगारमळा, आंबेठाण - ४१०५०१
ता. खेड, जि. पुणे.

मुद्रक
रुद्रायणी, औरंगाबाद.

मुखपृष्ठ मांडणी/ अक्षरजुळणी
जनशक्ती वाचक चळवळ

मुखपृष्ठावरील छायाचित्र
चांदवड, जि. नाशिक
महिला मेळावा १० नोव्हे. १९८६

मुखपृष्ठावरील अक्षरलेखन
दासू वैद्य

प्रथमावृत्ती
६ जून २०१०
मा. शरद जोशी अमृतमहोत्सवी
साहित्य मेळावा औरंगाबाद.

**मूल्य रु. २५०/-**

# प्रकाशकाचे मनोगत

शरद जोशी यांच्या २९ भाषणांचा हा संग्रह. पिंपळगांव बसवंत येथील १९८१च्या भाषणापासून ते परभणी येथे जानेवारी २००९ मध्ये केलेल्या कार्यकारीणीतील भाषणापर्यंत २८ वर्षांतील वैचारीक मांडणी यात समाविष्ट आहे. शरद जोशींचे सर्व लिखाण ग्रंथरूपात उपलब्ध करून देण्याच्या योजनेत आत्तापर्यंत नऊ पुस्तके आम्ही प्रकाशित केली. हे दहावे पुस्तक शरद जोशी यांच्या अमृतमहोत्सवी वर्षात वाचकार्पण करताना समाधानाची भावना आहे.

टीकाकारांकडून आमची एवढीच अपेक्षा आहे, की त्यांनी किमान हे लिखाण वाचून मग टीका करावी. शरद जोशींनी भूमिका बदलली, नव्वद नंतरचे शरद जोशी आम्हाला मंजूर नाहीत, अशी अतिशय अप्रस्तूत टीका त्यांच्या टीकाकारांनी केली आणि आजही करतात. त्यांच्यासमोर हे सर्व लिखाण आम्ही ठेवीत आहोत. निदान आतातरी लिखाण उपलब्ध नसल्याच्या तक्रारीला संधी नाही. शेतकरी संघटनेचा विचार हा स्वतंत्रतावादी विचार आहे इतकी साधी भूमिका समजून घेतली तरी नव्वदच्या आधीचे शरद जोशी व नंतरचे शरद जोशी अशी विसंगती टीकाकारांच्या लिखाणात व बोलण्यात येणार नाही.

शेतकरी संघटनेच्या विचारांवर आक्षेप नोंदवणाऱ्यांना या निमित्ताने आम्ही नम्र विनंती करू इच्छितो, की त्यांनी त्यांची मांडणी लेखी स्वरूपात आमच्याकडे द्यावी. हे सर्व लिखाण अभ्यासकांना उपलब्ध करून देण्यासाठी ग्रंथरूपात प्रसिद्ध करण्यास आम्ही तयार आहोत. सामान्य शेतकऱ्यांनी विचारांचे खुले व्यासपीठ म्हणून शेतकरी संघटनेचा उपयोग केला. पुरोगामी महाराष्ट्रातील विद्वानांनीही या व्यासपीठावर आपले विचार मांडावेत. वैचारिक खुलेपणाची परंपरा हे शेतकरी संघटनेचे वैशिष्ट्य आहे.

शरद जोशींच्या सर्व पुस्तकांना सामान्य वाचकांनी उदंड प्रतिसाद दिला. शरद जोशींनी आमच्या प्रकाशनावर टाकलेल्या विश्वासाची ही पावतीच आहे. 'समग्र शरद जोशी' मालिकेतील उर्वरीत चारही पुस्तके शेगांव येथील मेळाव्यापर्यंत (१० नोव्हेंबर २०१०) आम्ही प्रकाशित करीत आहोत.

६ जून २०१० **श्रीकांत अनंत उमरीकर**

# लेखानुक्रम


१ भक्ती, युक्ती, शक्ती आणि तीन वर्षांत मुक्ती ........................ ०७
२ सौराज्य मिळवायचं औंदा ........................................ २५
३ बळिराजाचा पुनरुत्थानाचा कार्यक्रम .............................. ३१
४ अंगाराने कार्य केले आता ज्योत हवी .............................. ३८
५ आता हवी नवी हत्यारे आणि नवी व्यूहरचना........................ ४५
६ नव्या लढाईची घोषणा............................................. ६४
७ दुसऱ्या गणराज्याचा अर्थात, बळिराज्याचा ओनामा ................ ६९
८ शेतकरी संघटनेच्या विचाराची वाटचाल
कांद्याच्या भावापासून बळिराज्यापर्यंत ............................. ८५
९ बळिराज्यातील कृतिकार्यक्रम ..................................... ९१
१० आमचे आम्ही मालक ............................................. ९८
११ युग आहे उद्योजकवादी संस्कृतीचे................................. १०६
१२ चला, दंडबेड्या तोडून टाकू ....................................... १२५
१३ नुसता नवा जोम नव्हे, नवी रणनीती हवी .......................... १३३
१४ राज्य आले ठग पिंढाऱ्यांचे ....................................... १४२
१५ वाघाचा जन्म वाघासारखं जगा ..................................... १५०
१६ सांगली-मिरज अधिवेशनाची विषयपत्रिका ........................... १५७
१७ गुलामगिरीकडे आता पुन्हा जाणे नाही ............................. १६५
१८ सरकारला वगळून शेती हाच पर्याय.................................. १८१
१९ नांगर मोडून तलवार घ्या हाती .................................... १९१
२० चला, हत्यारे परजून घेऊ या ...................................... २०२
२१ रुप्याचा दिवस म्या आनंदे पाहिला.................................. २१०

२२ शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा –
नेहरू आणि त्यांच्या वंशावळीचे पाप ............................... २२५
२३ रणनीती एकारलेली नव्हे, चौफेर हवी ............................... २३९
२४ स्वातंत्र्यासाठी 'पोशिंद्यां'चा संग्राम .................................. २४८
२५ शेतकरी संघटना लोकांची गर्दी नव्हे, विचार आहे .................. २५८
२६ शेतकरी आंदोलनाची आगामी दिशा ................................. २६७
२७ निमंत्रण औरंगाबाद अधिवेशनाचे .................................... २८४
२८ औरंगाबाद ज्ञानयज्ञायी फलनिष्पत्ती ................................. २९८
२९ रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना .................................... ३१०

■■■

# भक्ती, युक्ती, शक्ती आणि तीन वर्षांत मुक्ती

कांदा आणि उसाचे आंदोलन होऊन पुष्कळ दिवस होऊन गेले, तुम्हा सर्वांची आणि माझी भेट अशी नाही. शेवटची जी भेट झाली ती 'शेतकरी आंदोलनाचा विजय झाला आहे' अशा वातावरणात झाली. उसाला टनाला ८०० रुपये भाव हातात पडला आहे, कांद्याची खरेदी ६० ते ७५ रुपये प्रतिक्विंटलच्या भावाने सुरू झाली आहे, अशा परिस्थितीत आपण शेवटचे भेटलो होतो आणि पहिल्यांदाच शेतकरी आंदोलन उभे राहिले ते विजय घेऊनच या आनंदाच्या भरात आपण शेतकरी परत औत धरायला गेलो.

पण, शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळविण्याचा हा लढा इतका सोपा नाही. एका वर्षात ४० ते ५० हजार किंवा दोनदोन लाख माणसे रस्त्यावर बसून हा प्रश्न सुटला असता तर तो इतकी शेकडो वर्षे रेंगाळत राहिला नसता. हा प्रश्न त्याहून कठीण आहे याची जाणीव मला होती, तुम्हाला होती. पिंपळगावच्या शेवटच्या मेळाव्यात मी आपल्याला एक धोक्याचा इशारा दिला होता, माधवराव खंडेरावांनीही तुम्हाला सांगितले होते की, 'एक वेळेस आपण या शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नाला हातच घातला नसता तरी चालले असते. आपले आजोबा अशाच दारिद्र्यात मेले, वडीलही तसेच खपले, आपणही तसेच खपून गेलो असतो. पण –

पण आता आपण या सापाला हात लावलाय. सापाला हात लावून आणि तसाच सोडून दिला तर तो येऊन आपला सूड उगवल्याशिवाय राहणार नाही.'

आणि जी परिस्थिती तुमच्यापुढे सांगायला मी उभा राहिलो आहे ती नेमकी हीच आहे की हा दुखवून पळालेला साप परत आला आहे. त्यावर काय करायचे आहे ते आपण इथे सगळयांनी एकत्र बसून ठरवायचे आहे. माझे काम एवढेच आहे, की शेतीमालाच्या भावाच्या बाबतीत जी परिस्थिती पुन्हा निर्माण झाली आहे ती तुम्हाला समजावून सांगणे; एवढेच नव्हे तर, या परिस्थितीवर

आणि तीमुळे येणाऱ्या नव्या संकटावर काय उपाययोजना करायला पाहिजे त्याबद्दल तुम्हाला काही सल्ला देणे. हा साप पुन्हा आपला फणा काढू पाहत असेल तर त्याला कसा ठेचायचा हे आपल्याला एकमताने ठरवायचे आहे. तुम्हाला सल्ला देण्याचा अधिकार मला आहे असे मी समजतो कारण गेल्या वर्षी नाशिक जिल्ह्यात, विदर्भात, मराठवाड्यात महाराष्ट्रभर आम्ही सगळे फिरलो. माधवराव खंडेरावांनी सगळ्यांना सांगितले, ''गेली तीस वर्षे तुमच्याकडे सगळे पुढारी येऊन गेले. त्यांनी तुम्हाला काय काय सांगितलं आणि तुम्ही वेड्यासारखं ऐकलं. शेतकरी संघटनेचा जो कार्यक्रम आहे – शेतीमालाला रास्त भाव – फक्त एककलमी कार्यक्रम–त्याला फक्त एक वर्ष तुम्ही वापरून बघा. जर का हा कार्यक्रम तुम्हाला पटला तर कार्यक्रमात राहा नाही तर तुम्ही आपले नेहमीप्रमाणे आपापल्या पुढाऱ्यांच्या मागे जा.''

हा कार्यक्रम आपण गेल्या वर्षी राबवला; लाठ्या झेलून राबवला, गोळ्या खाऊन राबवला. आजच्या या सभेत समोर बसलेल्यांपैकी जवळ जवळ पंचवीसतीस हजार शेतकरी तुरुंगात जाऊन आले. हा कार्यक्रम राबविल्यामुळे लाठीमार, गोळीबार, तुरुंगवास यांना सामोरे जावे लागूनसुद्धा आज ज्या प्रचंड संख्येने आपण इथे पिंपळगावात जमा झाला आहात ती तुम्ही शेतकरी संघटनेला दिलेली पावती मानतो की, ''तुमचा हा एककलमी कार्यक्रम आम्हाला पटला, शेतकरी संघटनेच्या मागे यायला आम्ही तयार आहोत.''

गेल्या वर्षीची आंदोलने – चाकणमधील कांद्याचे, नाशिक–धुळयामधील कांदा आणि उसाचे त्याच्याबरोबर विदर्भातील कपाशीचे आणि निपाणीतील तंबाखूचे – यांनी सबंध देश इतका हलून गेला की, कोणी उठून ८०–९० कोटी रुपये खर्च करून दिल्लीला शेतकऱ्यांचा मेळावा भरविला. जायला गाडी फुकट, बस फुकट, ट्रक फुकट; तेथे राहण्याची सोय फुकट, वरून काही पैसेही फुकट! या देशात शेतकऱ्यांचा भाव इतका कधीच वाढला नव्हता. मला कोणीतरी विचारले, 'मेळावा कसा झाला? तुमचे काय मत आहे?' मी त्यांना सांगितले, 'हा मेळावा झाला, कोट्यवधी रुपये खर्चून झाला; हा मेळावा म्हणजे जी मंडळी आपल्या शेतीमालाच्या रास्त भावासाठी मुंबई–आग्रा हमरस्त्यावर बसून राहिली, रेल्वेच्या रूळांवर बसून राहिली त्यांना सरकारने ठोकलेला सलाम आहे.'

सलाम बरा होता, थोडं गोड वाटलं; पण सरकार काही गप्प बसून राहिलेले नव्हते. शेतकऱ्यांनी आपल्याला नमवले असे त्याच्या मनाला टोचून राहिले होते.

शेतकऱ्यांनी उसाला टनाला ३०० रुपये भाव मागितला तेव्हा या लोकांनी

हसून दाखवलं, ३०० रुपये भाव मागतात काय? वेडे काय? कोणी लेख लिहायला लागला, '१७५ म्हणजे फार झाले. ३०० रुपये म्हणजे काय वाट्टेल ते मागतात!'

आपण ३०० रुपये भाव मिळवून दाखविला. निफाड सहकारी साखर कारखाना आपल्या जवळचा आहे. ३० जून १९८१ ला साखरेची जी परिस्थिती होती ती पाहता १२ टक्के साखर उताऱ्याकरिता इथल्या शेतकऱ्याला उसाला प्रतिटन ३६७ रुपये भाव मिळाला असता. हे लोक गेल्या वर्षी सांगत होते की ३०० रुपये भाव शक्यच नाही, आपण ३६७ रुपये मिळवून दाखवला.

कांद्याची खरेदी ६० ते ७५ रुपये क्विंटलच्या भावाने झाली. गेल्या सात वर्षांत कपाशीला भाव वाढवून मिळाला नव्हता तो आंदोलनामुळे यंदा क्विंटलमागे १३० रुपये वाढवून मिळाला आणि क्विंटलमागे ५० रुपये बोनसही मिळणार आहे.

**तंबाखूची परिस्थितीही अशीच**

गेल्या वर्षी निपाणीच्या शेतकऱ्यांनी रस्त्यावर येऊन आंदोलन केले होते. आपल्याला वाटते की शेतकऱ्यांचे आंदोलन नाशिक आणि पुण्यातच होते. १९७८ साली निपाणीच्या शेतकऱ्यांनी पुणे-बंगलोर रस्ता अडवून धरला होता. त्यात भाग घेतलेले कार्यकर्ते येथे हजर आहेत. तंबाखूचा भाव बाजारात किलोला ५-६ रुपये होता, शेतकऱ्यांनी मागितला होता किलोला १० ते १२ रुपये. सरकारने सत्याग्रहाच्या पुढाऱ्यांना दिल्लीला बोलावून घेतले. बाजारात भाव ५ ते ६ रुपये, शेतकरी मागतात १० ते १२ रुपये आणि सरकारने दिल्लीहून भाव किती जाहीर केला? कोणाचा कानावर विश्वासही बसणार नाही, सरकारने जाहीर केला १ रु. ते १ रुपये ४० पैसे! आज याच तंबाखूला शेतकरी, अगदी भिजका तंबाखू असला तरी, दर किलोला ३ रुपये उचल घेऊन राहिला आहे. चांगल्या तंबाखूला १२ रुपयांपर्यंत उचल घेऊन विक्रीनंतर येईल तो बोनस मिळणार. आता तंबाखूचे वजन करताना त्यातून काडीसूट, मातीसूट, हवासूट अशी कोणतीही वजावट केली जात नाही. आजपर्यंत तंबाखूउत्पादक शेतकऱ्याची परिस्थिती अशी होती की तंबाखूखरेदीनंतर व्यापारी सगळे पैसे सहसा देत नसत. वर व्यापाऱ्याने शेतकऱ्याचे पैसे सगळे दिले नसले आणि जर हजार दोन हजार रुपये शेतकऱ्याचे व्यापाऱ्याकडे राहिले असतील 'तुझे पैसे सांभाळायला खर्च येतो' म्हणून तो खर्च व्यापारी शेतकऱ्याच्या माथी मारत असे; पण व्यापाऱ्याकडून जर शेतकऱ्याने काही अधिकचे पैसे घेतले तर मात्र त्याचे व्याज द्यावे लागे. अशा तऱ्हेने, छापा पडो की काटा, दोन्ही बाजूने शेतकरी मेलाच!

शेतकरी संघटनेच्या निपाणी आंदोलनानंतर आता तिथे शेतकरी आपल्या तंबाखूचे पैसे वाजवून घेतो आहे. निपाणी परिसरातील शेतकऱ्यांची मला पत्रे आली आहेत, की शेतकरी संघटनेच्या या आंदोलनामुळे पंधरा-पंधरा वर्षांची दहा-दहा, बारा-बारा हजारांची कर्जे आता आम्ही पार फेडून टाकली आहेत. एका शेतकऱ्याने तर मला लिहिले आहे की, 'माझ्या मुलीचे लग्न तीन वर्षांपासून होत नव्हते, आज मी तिचे थाटाने लग्न केले; केवळ शेतकरी आंदोलनामुळे हे शक्य झाले.'

एवढे लांब कशाला जायला पाहिजे? माझ्याआधी बोलताना माधवराव म्हणाले की, 'आमचा हा निफाड तालुका, केवढी सुपीक जमीन, धरणांचे पाणी पाच कालव्यांनी सगळ्यांना मिळते; पण इथला एकतरी शेतकरी असा दाखवा की ज्याने सर्व कर्ज आणि सोसायटी फेडली आणि मग मेला. आजपर्यंत असा एकही शेतकरी झाला नाही; पण उसाला भाव मिळाल्यामुळे यंदा सगळ्यांनी सोसायट्या फेडल्या, बऱ्याच जणांच्या निल झाल्या.'

अशा सर्व आनंदाच्या वातावरणात आपण गेल्या वेळी भेटलो. पावसाळा आला, कुठे कमी पाऊस झाला, कुठे जास्त पाऊस झाला. आपली ही नेहमीचीच रडकथा आहे. पण पावसानं इतकं मारलं नाही हो! सरकारने जितके आज आम्हाला मारायला काढले आहे तितका पाऊस कधीच मारणार नाही. गेल्या वर्षीच्या आंदोलनांचा अभ्यास सरकारने फार काळजीपूर्वक केला. सगळे शेतकरी उठतात आणि भाव मागून घेतात हे त्यांनी पाहिले. तुम्ही शेतकऱ्यांनीच माझी भाषणे ऐकली असे नाही, तुम्हीच माधवरावांची, प्रल्हादरावांची भाषणे ऐकली असे नाही; आज जसे दोनचार ठिकाणी टेपरेकॉर्डर लावून बसले आहेत तसेच सरकारी लोक गेल्या वर्षीही बसले होतेच. सरकारने ती सगळी भाषणे मोठ्या काळजीपूर्वक ऐकली आहेत.

गेल्या वर्षी आंदोलनाच्या आधी सरकारने सांगितले होते की २३ ऑक्टोबरपर्यंत साखर कारखाने चालू करावेत, शेतकऱ्यांनी त्यांना ऊस घालावा. तेव्हा आम्ही म्हणत होतो की उसाला भाव पाहिजे ना मग फक्त १५ नोव्हेंबरपर्यंत ऊस घालायचे थांबा. फक्त तीन आठवडे. तीन आठवड्यांत कोणाचाही ऊस जळून जाणार नाही आणि तीन आठवडे जर कारखाने चालू झाले नाहीत तर साखरेचा इतका तुटवडा येणार आहे की बाजारातील साखरेची किंमत किलोला ५० रुपये होईल आणि सरकारला तुमची मागणी मान्य करावी लागेल.

दिल्लीतील लोकांनी हे बरोबर ऐकले आणि यंदा त्यांनी किती चोख व्यवस्था केली आहे पाहा. त्यांनी या गाळप हंगामाआधी जवळजवळ २१ लाख टन

साखर परदेशातून आयात करून ठेवली आहे. आता त्यांना कारखाने चालू करायची घाई नाही. लक्षात घ्या, गेल्या वर्षी जे लोक साखर कारखान्यांच्या मागे लागले होते की २३ ऑक्टोबरला गाळप चालू करा त्या मंडळींना यंदा घाई नाही कारण, आपल्या देशातील शेतकऱ्याच्या उसाला भाव मिळू नये म्हणून आपल्याच सरकारने परदेशातून साखर आयात केली आहे.

गव्हाच्या बाबतीतही हीच स्थिती आहे. इथे बरेच शेतकरी ऊस आणि कांदा पिकविणारे आहेत; पण ऊस, कांद्याखेरीज दुसऱ्याही पिकांचे प्रश्न आहेत. तेव्हा ऊसकांद्याच्या प्रश्नांकडे शेवटी वळू.

गेल्या वर्षी आम्ही महाराष्ट्रभर सांगत हिंडलो की, 'शेतकऱ्यांचा प्रश्न अगदी सोपा आहे. आम्हाला सरकारचे फुकटाचे दवाखाने नकोत; फुकटाच्या शाळा नकोत; घरावर सोन्याची कौले घालून देतो म्हणाल तरी नकोत, फक्त आमच्या शेतीमालाला रास्त भाव द्या.'

यंदा सरकारने सध्याच्या परिस्थितीची नेमकी कोंडी कशी केली आहे पाहा. मी तुम्हाला हे अशाकरिता सांगतो आहे की, मी गेल्या वर्षी जे भाकीत केले होते त्याचा हा पुरावा आहे. शेतकऱ्याच्या मालाला कोणत्याही परिस्थितीत भाव मिळू नये म्हणून सरकार काय काय करते आहे!

पहिला शेतीमाल मी उदाहरणाकरिता घेणार आहे तो कपाशी. कपाशीचे उत्पादन करणारे विदर्भातील शेतकरी प्रतिनिधी येथे हजर आहेत.

आपल्या देशात शेतकऱ्यांनी पिकवलेला आठ लाख गाठी लांब धाग्याचा कापूस पडून आहे. कारण, आपल्याकडील कापडगिरण्यांना लांब धाग्याचा कापूस वापरता येत नाही. आम्ही अशी विनंती केली की, हा आठ लाख गाठी कापूस निर्यात करा म्हणजे शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळेल. दिल्लीतील अधिकारी आम्हाला म्हणाले, "नाही नाही, तुम्हाला काही माहीत नाही. कापूस निर्यात करायची गोष्टच काढू नका. देशात कापसाचा फार तोटा आहे. कापसाचा तोटा असल्यामुळे निर्यात करता येणार नाही." त्यावर मी म्हणालो, "ठीक आहे. कापसाची निर्यात करता येत नसेल, कापसाचा तुटवडा असेल तर आमच्या कपाशीला भाव मिळाला पाहिजे."

दिल्लीहून आम्ही मुंबईला आलो आणि मुंबईच्या अधिकाऱ्यांना सांगितले की, "कापसाचा फार तुटवडा आहे असे दिल्लीचे अधिकारी म्हणतात. तुम्ही कापूस एकाधिकाराने खरेदी केलेला २० लाख गाठी कापूस तुमच्याकडे आहे. तो तुम्ही दाबून ठेवा आणि शेतकऱ्याला ७०० रुपये क्विंटलला भाव मिळेपर्यंत विकूच नका." तेव्हा मुंबईचे हे अधिकारी तिडकेसाहेबांच्या देखत म्हणाले, "नाही,

नाही, नाही! असे म्हणू नका. देशात फार कापूस आहे. आम्ही जर असा कापूस दाबून ठेवायचे म्हटले जर आमच्या २० लाख गाठी आमच्या अंगावर पडतील.''

हे सरकारी अधिकारी, पगार घेणारे. असा पगार घेऊन घेऊन किती घेतात हो! कापूस मंडळातील या सगळया अधिकाऱ्यांच्या बोटांवर हिऱ्याच्या अंगठ्या होत्या; हिऱ्याच्या अंगठ्या! गिरणीमालकांशी सूत असल्याशिवाय या पगारदारांकडे हिऱ्याच्या अंगठ्या येतात काय? कापूस काय भावाने विकायचा हे आमच्या आधी ते गिरणीमालकांना कळवतात. प्रल्हादराव पाटील त्यांना म्हणाले, ''तिडकेसाहेब! आम्ही इथून बाहेर पडल्यावर येथून ताबडतोब गिरणीमालकाच्या घरी फोन होणार आहेत हे आम्हाला माहीत आहे.''

आमच्या कापसाच्या आठ लाख गाठी पडून राहिल्या आहेत. त्यातील किती गाठींच्या निर्यातीला परवानगी मिळावी? एकदा सात हजार गाठी, एकदा आठ हजार गाठी, एकदा दहा हजार गाठी; अशा सगळया मिळून २५ हजार गाठी आणि आजही कापसाच्या साडेसात लाख गाठींच्या वर गाठी पडून आहेत आणि तिकडे एके दिवशी गिरणीमालकांनी तक्रार केली की, आम्हाला कापूस कमी पडून राहिला आहे. त्यांना आखूड धाग्याचा कापूस लागतो. ताबडतोब १५ दिवसांत ४ लाख गाठी कापूस पाकिस्तानातून आयात करायचा हुकूम झाला. इकडे आपल्या कपाशीला भाव नाही, आठ लाख गाठी पडून आहेत आणि परदेशातून ४ लाख गाठी कापसाची आयात केली जाते आणि त्याच्या समर्थनासाठी आमचे अर्थमंत्री व्यंकटरामन म्हणतात की, ''कपाशीचा भाव वाढू देणार नाही.''

अरे, सध्या युरियाचा भाव चारशेचा दोन हजार आणि दोन हजारावरून चोवीस हजार झाला टनाला आणि तुम्ही म्हणता भाव वाढून देणार नाही? हे दिल्लीत बसून सांगता? तर मग इथे सगळे शेतकरी झोपून राहणार आहे काय? आणि पाहा ना, कापूस कोठून आणला! पाकिस्तानातून! भारताच्या शेतकऱ्यांना भाव मिळू नये म्हणून इंडिया मदत कोणाची घेते? पाकिस्तानची. इंडिया आणि भारताची लढाई आणि इंडिया मदत घेते आहे पाकिस्तानची अशी परिस्थिती झाली.

आता गव्हाचे उदाहरण पाहू. हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांच्या गव्हाला सरकार किलोला १ रुपया ३० पैसे देते. मग, शेतकऱ्यांनी सरकारला गहू घातला नाही. तर, सरकारने काय केले? सरकारने आपल्याच देशातील शेतकऱ्यांना वठणीवर आणण्यासाठी अमेरिकेतून जवळजवळ १५ लाख टन गहू विकत आणला. भाव किती दिला? आपले अन्नमंत्री म्हणतात की क्विंटलला १९० रुपये देऊन म्हणजे किलोला १ रुपया ९० पैसे दराने गहू आणला. पण विरोधी पक्षांच्या

खासदारांनी दिलेल्या आकडेवारीप्रमाणे सरकारला हा गहू दर क्विंटलला २०० रुपयांप्रमाणे पडला. म्हणजे पाहा, आपले सरकार आपल्या शेतकऱ्यांना १३० रुपयांच्या वर द्यायला तयार नाही पण, अमेरिकेतील शेतकऱ्याला मात्र १९० च नव्हे २०० सुद्धा द्यायला तयार आहे. ही चालू परिस्थितीची उदाहरणे आहेत. अर्थ स्पष्ट आहे की आपल्या शेतीमालाला भाव मिळत नाही हे आपल्या दुर्दैवाने किंवा अपघाताने घडत नाही तर शेतीमालाला मुद्दामहून भाव मिळू दिला जात नाही. हे आपल्या लक्षात यायला हवे म्हणून मी ही उदाहरणे देत आहे.

भुईमुगाचीही अशीच परिस्थिती आहे. भुईमुगाचा उत्पादनखर्च किलोला ४ रुपये ३० पैसे आहे. तरीसुद्धा, वाटाघाटींच्या वेळी आम्ही अंतुलेसाहेबांना विनंती केली की, 'किलोला ४ रुपये ३० पैसे हा हिशोब मागे सोडून द्या, फक्त ४ रुपये द्या; म्हणजे, वाळलेल्या शेंगेला क्विंटलला ४०० रुपये द्या. शेतकऱ्याला भुईमुगाच्या क्विंटलला ४०० रुपये मिळण्याची हमी मिळाली तर आम्ही महाराष्ट्रात भुईमुगाचे डोंगर उभे करून दाखवतो. शेतकऱ्याला भुईमुगाला किलोला ४ रुपये मिळाले तर गोडेतेलाचा उत्पादनखर्च किलोला १० रुपये ५० पैसे येतो असा आमचा हिशोब आहे. सध्या ग्राहकाला तेल सोळासतरा रुपये किलोने विकत घ्यावे लागते.' आमचे हे बोलणे चालू असताना तेथे महाराष्ट्राचे कृषिमंत्री भगवंतराव गायकवाड होते ते मध्येच म्हणाले, 'नाही, नाही! तुमचा हिशोब चूक आहे. गोडेतेलाचा उत्पादनखर्च साडेदहा नव्हे, दहाच रुपये किलो पडेल.' मी म्हणालो, 'फारच आनंद आहे. शेतकऱ्याला ४ रुपये भुईमुगाला आणि ग्राहकाला १० रुपये किलोने गोडेतेल. ग्राहकही खुष आणि शेतकरीही खुष. चला, झटकन करून टाका.' ही बोलणी १० जून १९८० रोजी झाली. त्यानंतर अनेक चर्चा, बैठका झाल्या; पण अजूनही सरकारने शेतकऱ्यांसाठी भुईमुगाचा भाव जाहीर केलेला नाही; पण याच सरकारने मुंबईतील व्यापाऱ्यांना मात्र विनंती केली की कृपा करून गोडेतेलाचा भाव १५ रुपयांच्या वर जाऊ देऊ नका. आम्हाला ४ रुपये द्या, आम्ही साडेदहाने गोडेतेल देतो असे आम्ही म्हणतो ते सरकार ऐकत नाही, पण व्यापाऱ्यांकडे मात्र भीक मागते की तुम्ही भाव १५ च्या वर जाऊ देऊ नका. आज भुईमुगाचा भाव बरा आहे, पण दहाएक दिवसांनी भुईमूग उपटणी चालू झाली की भाव अडीच रुपये, दोन रुपये असा घसरणार आहे. सरकार शेतकऱ्यांना ४ रुपये भावाची हमी द्यायला तयार नाही पण व्यापाऱ्यांशी मात्र १५ रुपयांचा करार करते कारण शेतकऱ्याच्या शेतीमालाला भाव मिळू नये हे सरकारचे अधिकृत धोरण आहे.

भाताचीही हीच स्थिती. आज भाताच्या शेतकऱ्याइतकी वाईट स्थिती दुसऱ्या

कोणत्याही शेतकऱ्याची नाही. इथे जमलेल्या शेतकरी मंडळींत पेठ, इगतपुरी इत्यादी ठिकाणची मंडळी आहेतच, पण रायगड जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यातील भाताच्या भागातील अभ्यास केलेली मंडळीही हजर आहेत. भाताचा उत्पादन खर्च प्रतिकिलो २ रुपये ५० पैशांच्या खाली नाही आणि सरकारने भाव जाहीर केला आहे प्रतिकिलो १ रुपया १५ पैसे. भात विकत घेऊन खाणे परवडते असा तेथील शेतकऱ्यांचा अनुभव आहे; पण करणार काय? शेत आहे म्हणून भात पिकवायचा, एवढेच. आम्हाला, वाटाघाटींच्या वेळी तिडके साहेबांनी सांगितले की, 'महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारकडे भाताला १७६ रुपये क्विंटल भाव मिळावा अशी शिफारस केली आहे.' लगेचच दुसरे दिवशी दिल्लीला केंद्रीय कृषीमंत्री राव वीरेंद्र म्हणाले की, 'महाराष्ट्र सरकारकडून भाताच्या भावाबद्दल आम्हाला काहीही शिफारस आलेली नाही.' त्यांनी ११५ चाच भाव जाहीर केला. आता महाराष्ट्र सरकार काय भाव देणार आहे, कोणास ठाऊक.

दुधाची परिस्थितीही अशीच. दूधभाताचा लढा आम्ही गेल्या वर्षी स्थगित केला. आपल्याला गेल्या वर्षी दोन वेळा भाववाढ मिळाली. जवळजवळ ६० ते ८० पैशांचा दर लिटरमागे फरक झाला. यंदा दुधाच्या बाबतीत पावसाने थोडा दगा दिला. दूधभाताच्या शेतकऱ्यांनी आम्हाला विनंती केली की, 'सध्या जरी थोडा कमी भाव मिळाला तरी चालेल. आज दोन पैसे मिळाले तर ते आम्हाला हवे आहेत.' म्हणून आम्ही भावाची ती तडजोड मान्य केली; पण २९ जुलैला अंतुले सरकारने आम्हाला आश्वासन दिले होते की, 'दुधाचा भाव ठरवण्याकरिता एक समिती नेमणार आहोत आणि त्या समितीचा अहवाल सहा महिन्यांच्या आत दिला जाईल.' आज दोन महिने उलटून गेले तरी अजून त्यांनी ती समिती नेमली नाही. आता आमच्या असे लक्षात आले आहे की आपण इथे शासनाला गेल्या डिसेंबरमध्ये जी चपराक दिली तिचा परिणाम कमी झाला आहे; ते विसरलेत.

आज एकाने शिवनेरी नावाच्या दैनिकातील लेख दाखवला. लिहिणाऱ्याने त्यामध्ये असे लिहिले आहे की, 'अंतुलेंनी आपल्या कार्यक्षमतेने शेतकरी संघटना भुईसपाट करून टाकली.' शेतकरी संघटना किती भुईसपाट झाली त्याचा पुरावा इथे तुमच्या विराट उपस्थितीने दिला आहे आणि येत्या दोन महिन्यांत ते जगालाही दिसणार आहे. सपाट कोण झाले ते त्या दैनिकाच्या संपादकांनी निदान आज सकाळची वर्तमानपत्रे उघडून तरी पाहायला हवे.

आता मी कांदा आणि ऊस या विषयाकडे येतो. कांदा आणि ऊस ही आपल्या महाराष्ट्रातील महत्त्वाची पिके आहेत. आता मी जे बोलणार आहे ते अत्यंत जबाबदारीने बोलणार आहे. माझी ही माहिती खोटी आहे असे ज्यांना

वाटेल त्यांनी अवश्य माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा.

आज सगळीकडे कांद्याचा भाव ११७ ते १३० रुपये क्विंटल आहे. महाराष्ट्र फेडरेशन मात्र ६० रुपयांनी घेतलेला कांदा सरसकट ६० ते ६५ रुपयांच्या भावाने विकते आहे. कोणी म्हणेल की त्यांचा कांदा खराब असेल म्हणून ते कमी भावाने विकत असतील; पण वस्तुस्थिती तशी नाही. व्यापाऱ्यांना कांदा निवडून घ्यायची मुभा आहे. असा निवडून घेतलेला कांदा ६० ते ६५ च्या भावाने विकला जात आहे. कांदा खराब झाला म्हणून हे भाव उतरलेले नाहीत. कांदा विकत घेणारे व्यापारी फेडरेशनच्या अधिकाऱ्यांना प्रत्येक ट्रकमागे किमान १००० रुपये लाच देत आहेत आणि अधिकारी म्हणत आहेत की फेडरेशनला कांदा खरेदीविक्रीच्या व्यवहारात १६ कोटी रुपयांचा तोटा झाला. आज फेडरेशनच्या अधिकाऱ्यांचा पगार ८०० ते १००० रुपयांच्या वर नाही आणि या मंडळींनी एकएक लाख रुपयांची घरे विकत घेतली. कोठून आले हे पैसे? फेडरेशनला नुकसान नाही होणार तर काय होईल?

तिडके साहेब आम्हाला म्हणाले की, 'शेतकरी कांद्याचे उत्पादन फार करून राहिले आहेत. इतका कांदा पिकला तर आम्ही खरेदीची योजना चालवू शकणार नाही.' मी तिडके साहेबांना तुम्हा सगळयांच्या वतीने सांगितले की, 'कांद्याची खरेदीची किंमत देता येणार नाही ही भाषाच काढू नका. कांदा ही गोष्ट आम्हाला इतकी महत्त्वाची आहे की कांदा ही शेतकरी संघटनेची खूण म्हणून घ्यावी या विचारात आम्ही आहोत. कांद्याची खरेदी करायची नाही असे जर सरकारने ठरवले तर सरकारच टिकणार नाही; पण तुमचे विनाकारण नुकसान व्हावे अशी आमची इच्छा नाही. शेतकऱ्यांनी कांदा कमी पिकवावा असे जर सरकारला वाटत असेल तर तसा प्रयत्न करायला आम्ही तयार आहोत. कांद्याची खरेदी कशा रीतीने चांगली करावी याकरिता सूचना करायला तयार आहोत. भ्रष्टाचार कमी कसा करावा हे आम्ही तुम्हाला सांगावे अशी तुमची इच्छा आहे काय? कांदा खरेदीतील भ्रष्टाचार थांबवायचा असेल तर खरेदीसाठी तुम्ही जी आमदारांची समिती नेमली आहे ती पहिल्यांदा बंद करून टाका.' जोपर्यंत आमदारांची ही कांदा खरेदी समिती आहे तोपर्यंत भ्रष्टाचार थांबू शकत नाही. कांदा खरेदीविक्रीमध्ये खरेदीविक्री संघाच्या मध्यस्थाची काही गरज नाही. चाकणच्या बाजारात अशी परिस्थिती आहे की, या खरेदीविक्री संघाने ४०-५० हजार रुपयांचे बारदान हरवल्याची जबाबदारी सगळया आडत्यांवर टाकून दिली आहे. त्या निमित्ताने 'पैसे टाका तरच शेवटचे पेमेंट करतो' असा दबावही संघ या आडत्यांवर टाकतो. हाही भ्रष्टाचाराचाच एक मार्ग आहे.

कांद्याचे उत्पादन कमी करण्याच्या दृष्टीने आम्ही सरकारला एक योजनाही लेखी द्यायला तयार आहोत. कांद्याचे आंदोलन करता येते कारण ते करणे सोयीचे आहे. ते सोयीचे आहे म्हणून आम्ही ते केले आणि सरकार असे वेडे की त्यांनी फक्त कांद्याचेच भाव वाढवून दिले. म्हणजे, आम्ही कुत्र्याला दगड मारला आणि कुत्रे गेले दगडाच्या मागे अशी गत झाली. कांद्याचे उत्पादन कमी व्हावे अशी सरकारची खरोखरीच इच्छा असेल तर कांद्याबरोबर सरकारने भुईमूग, हरभरा, मिरची इत्यादी इतर कोरडवाहू पिकांच्या किंमतीही बांधून दिल्या पाहिजेत. आज जर सरकारने भुईमुगाला ४५० रुपये, हरभऱ्याला ४०० रुपये आणि वाळलेल्या मिरचीला १००० रुपये भाव दर क्विंटलला बांधून दिला तर शेतकरी कांदा आपोआपच कमी घेतील. या फेडरेशनकडे कांदा घेऊन जायचा म्हणजे शेतकऱ्याला मोठी डोकेदुखी आहे; पण इतर पिकांनाही भाव नाही त्यामुळे काही करता येत नाही म्हणून शेतकरी कांदा करतो. सरकारला कांद्याचे उत्पादन खरोखरी कमी करायचे असेल तर किमान या तीन पिकांना भाव बांधून मिळाले पाहिजेत.

पण, परिस्थिती अशी आहे की आम्ही भाताला (२५० रुपये), गाईच्या दुधाला (४ रुपये), म्हशीच्या दुधाला (५ रुपये), भुईमुगाला, हरभऱ्याला, मिरचीला भाव बांधून द्या म्हटले त्याला सरकारकडून काही प्रतिसाद नाही. मग, कांदा कमी करा असे नुसते ओरडून काय उपयोग? कांदा कमी कसा होणार? यांना शेतकऱ्याचे काम करायला वेळ नाही आणि दिल्लीच्या वाऱ्या करायला मात्र वेळ आहे. गावोगाव जाऊन 'आमचं सरकार गरिबांचं आहे', 'आम्ही गरिबांचं कल्याण करतो आहोत', 'आम्ही गरिबांसाठी पैसे गोळा करतो आहोत', इतरही काही अनेक गोष्टी करतो आहोत अशा टिमक्या वाजवून काय होणार?

उसाचा प्रश्न तर सर्वात भीषण आहे. ३० जून १९८१ रोजी निफाड सहकारी साखर कारखाना उसाला ३६० रुपयांचा अंतिम भाव जाहीर करील असे वाटले होते. प्रल्हाद पाटलांनी सकाळी सांगितले की तिकडे कोल्हापूर जिल्ह्यात गडहिंग्लज कारखान्यात ४२२ रुपयांपर्यंत भाव मिळण्यासारखी परिस्थिती आहे. पण शेतकऱ्यांना भाव मिळू नये म्हणून सरकारने मोठा डाव टाकला. पहिली गोष्ट सरकारने केली ती म्हणजे सगळया साखर कारखान्याच्या अध्यक्षांच्या शेपट्या पिरगाळल्या. या अध्यक्षांची आणि संचालकांची, काही तुरळक अपवाद वगळता, इतकी लफडी असतात की त्यांच्या शेपट्या पिरगाळणे सोपे असते. आपणसुद्धा आपला उसाचा बांधावरचा लढा उभारताना याच अध्यक्षांच्या शेपट्या पिरगाळल्या होत्या. तर, अंतुल्यांनी काय केले? त्यांनी फर्मान सोडले की, काढा इतके इतके रुपये

मुख्यमंत्री निधीसाठी. मला मोठा प्रश्न पडतो की आमचे अध्यक्ष शेतकऱ्यांच्या ऊसबिलातून परस्पर कपात करून धावतपळत हा चेक घेऊन का गेले? मागच्या वर्षी माधवराव (तात्या) बोरस्ते साखर संघाचे अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली ठराव झाला की उसाच्या भावासाठी झालेल्या लढ्यात जे शेतकरी हुतात्मा झाले, ज्यांनी आपले प्राण वेचले त्यांच्या कुटुंबीयांच्या मदतीसाठी उसाच्या टनामागे ५ पैसे द्यावे. किती कारखान्यांचे अध्यक्ष पैसे पाठवायला तयार झाले? जेमतेम आठ? अरे, शेतकऱ्यांच्या पोरांनी जीव टाकले, त्यांच्यासाठी ५ पैसे मागितले तर जी मंडळी धावत आली नाही ती, अंतुल्यांनी युऽ युऽ म्हणताच चेक घेऊन धावत सुटली! काय म्हणावे? कोणी २५ लाख दिले, कोणी ३० लाख. रेडिओवर बातम्या, टीव्हीवर फोटोंसहित बातम्या.

काही लोकांच्या मनात गैरसमजूत असेल की हे अध्यक्ष त्यांच्या मनात नसताना, कळत न कळत गेले असतील. पण त्यांनी मोठी युक्ती केली. अंतुल्यांनी पैसे मागताच साखर संघाने शेतकऱ्यांच्या ऊसबिलातून प्रति टन २ रुपये ५० पैसे कपातीचा ठराव केला आणि तो राज्याच्या साखर संचालकांकडे पाठवून दिला. साखरसंचालकांनी सगळया कारखान्यांना पत्र लिहिले की, 'टनामागे २ रुपये ५० पैसे द्यायचे ठरले आहे त्याला माझी परवानगी आहे' आणि मग सगळया अध्यक्षांनी 'साखरसंचालकच सांगत आहे पैसे कापा' असे म्हणत शेतकऱ्यांच्या ऊसबिलातून पैसे कापले आणि अंतुल्यांकडे पोहोचते केले. या अध्यक्षांनी शेतकरी संघटनेविरुद्ध गुन्हा केला आहे. काहीजणांच्या हातून कळत झाला असेल काहींच्या हातून न कळत झाला असेल इतकेच. गुन्हा कसा झाला?

गेल्या वर्षी पिंपळगाव बसवंतला ऊसभावासाठी सभा झाली तेव्हा आणि मुंबईला महाराष्ट्र सरकारबरोबर आमच्या वाटाघाटी झाल्या तेव्हा शेतकरी संघटनेने जाहीर केले होते की, 'यंदा आम्हाला उसाला ३०० रुपये प्रतिटन भाव मिळेल असे दिसते आहे म्हणून आम्ही आंदोलन मागे घेत आहोत. तसा अजून आमचा खरा विजय झालेला नाही. उसाचा भाव ठरवताना वाहतुकीचा, साठवणुकीचा खर्च सरकार अजून विचारात घेत नाही. हा खर्च सरकार जोपर्यंत लक्षात घ्यायला तयार नाही तोपर्यंत ऊसबिलातून अशा कपाती करायला शेतकरी संघटना कबूल नाही.' त्यावेळी आम्ही असं जाहीर केले होते; पण नंतर सरकारला असे वाटायला लागले असेल की आता शेतकरी संघटना दमली; आता अध्यक्षांच्या शेपट्या पिरगाळल्याबरोबर टनामागे अडीच रुपये मिळतील.

काही का असेना, वाटाघाटीसाठी तयार असतात म्हणून आम्ही आजपर्यंत

अंतुल्यांच्या बाजूनेही बोललो नाही आणि विरोधातही बोललो नाही; पण ऊसभावासंबंधी आमच्या वाटाघाटी झाल्या त्या वाटाघाटीत आम्ही स्पष्टपणे सांगितले होते, की आमच्या उसाच्या भावासंबंधी मागण्या केंद्रे सरकारकडून मान्य करून आणल्याखेरीज आम्ही ऊसबिलातून कोणतीही कपात मान्य करणार नाही. तेव्हा, अंतुल्यांनी आणि साखर कारखान्यांच्या अध्यक्षांनी केलेली कपात आम्हाला मान्य नाही, आमचे पैसे आम्हाला परत करा. आज उसाच्या एकेका टनामागे ५ रुपये हिशोबात धरलेलेच नाहीत. कोणी म्हणे, उसाच्या वाहतुकीचा खर्च लक्षात घ्यायचे आम्ही विसरूनच गेलो आणि हे चेअरमन म्हणे! आमच्या वाटाघाटींच्या शेवटी अंतुले मला म्हणाले की, 'शेतीमालाच्या भावावर तुमचं माझं एकमत आहे. मी दिल्लीला जातो, वेळ पडली तर पंतप्रधानांशी बोलतो आणि सगळं काही मंजूर करून आणतो.' म्हणजे अंतुल्यांना शेतकऱ्यांचा कळवळा आहे, त्यांनी शेकऱ्यांचे म्हणणे मानले; पण दिल्लीला त्यांच्या हाती काही लागले नाही. याचा अर्थ काय? अर्थ सरळ आहे की अंतुले शेतकऱ्यांबद्दल कळवळा बाळगतात पण इंदिराबाई बाळगत नाहीत. हे खरे असेल तर अंतुल्यांनी जाहीर कबुली द्यावी की मी शेतकऱ्यांच्या बाजूचा आहे; पण बाई नाहीत. असे ते म्हणाले तर एक दिवससुद्धा खुर्चीवर राहणार नाहीत. दिल्लीहून काही आणले नाही आणि ऊसबिलांतून कपात करायला मात्र सुरुवात! हे आम्ही कदापि मानणार नाही.

आपल्या गेल्या वर्षीच्या आंदोलनाचा धसका घेऊन सरकारने आणखी एक युक्ती केली. सरकारने साखर आयात केली. आयात साखर बाजारात आल्यामुळे साखरेचे भाव खाली आले. जी साखर ७ रुपये किलोने जात होती ती आता साडेचार साडेपाच रुपये किलोने विकली जाऊ लागली. साखरेचा भाव एक रुपयाने खाली गेला म्हणजे शेतकऱ्याचे टनाला २५ ते ३० रुपयांनी नुकसान होऊ लागले आहे. अशीच परिस्थिती जर राहिली तर तुम्ही ३०० रुपयांचा भाव विसरा, १० टक्के उताऱ्याला २५० रुपयेसुद्धा मिळायचे नाहीत. उसाची एवढी भयानक परिस्थिती आहे.

एवढेच नव्हे तर, दिल्लीच्या अन्न मंत्रालयाचे अधिकारी साखर संघाकडे गेले आणि त्यांना म्हणाले की, 'रेशनवर वाटायला आमच्याकडे पुरेशी साखर नाही. तुमच्याकडे फ्री सेलची साखर जास्त आहे ती आम्हाला उसनी द्या.' साखर संघाचे लोक त्यांना म्हणाले की, 'अहो तुम्ही गेल्या वर्षीही अशीच साखर घेतली होती; ९५ हजार टन. तुम्ही उसनी घेता भाव जास्त असेल तेव्हा आणि परत करता भाव कमी असेल तेव्हा. असं आम्हाला नुकसानीत टाकू नका. असं

केलं तर आम्हाला बँकांकडून कर्ज घ्यावी लागतील.' अन्नखात्याचे ते अधिकारी म्हणाले, 'सरकारपुढे फक्त दोन पर्याय आहेत. एक तर तुम्ही आम्हाला उसनी साखर द्यायची. न द्याल तर सरकार लेव्ही साखर ६५ टक्क्यांच्या जागी ७५ टक्के वसूल करणार.' म्हणजे तुम्ही स्वखुशीने द्या, नाही तर आम्ही सक्तीने घेऊ. हा चक्क दरोडेखोरी बाणा झाला.

केंद्र सरकार आपल्याकडून ६५ टक्के साखर २ रुपये ७२ पैसे किलोने घेऊन जाते. आयात साखरेमुळे बाजारातील भाव ६ रुपयांवरून साडेचार रुपयांवर घसरला. त्या साडेचार रुपयांतले फक्त २ रुपये ७२ पैसे शेतकऱ्याला मिळाले. मग आमचे वसंतदादा पाटील साखरसंघातर्फे दिल्लीला भेटायला गेले. वसंतदादा पाटलांना आपण तळ्यात आहोत का मळ्यात हेच समजेनासे झाले आहे. शेतकऱ्यांनी इथे जेव्हा उसाच्या भावाचे आंदोलन चालू केले तेव्हा ते म्हणाले की, 'शेतकऱ्यांचा माझ्या या मागणीला पाठिंबा आहे; पण आंदोलनाचा मार्ग ज्या तऱ्हेने चालला आहे ते मला मान्य नाही.' मग तुमच्या तऱ्हेने आंदोलन करा ना? तिकडे कसली आंदोलने करता दिल्लीत बसून! शेतकऱ्याला ३०० रुपये भाव मिळाला पाहिजे आणि तो मिळाला नाही तर शेतकरी मरणार आहे हे जर तुम्हाला पटत असेल तर दिल्लीमध्ये राहण्याचा तुम्हाला काही अधिकार नाही; काय करायचे असेल ते इथे येऊन करा; पण ज्या ऊसउत्पादक शेतकऱ्यांकरिता वसंतदादांनी आपले एवढे आयुष्य वेचले त्यांच्याकरिता काहीही न करता वसंतदादांनी त्यांचा गळा कापला आहे. एक महिन्यापूर्वी दिल्लीला वसंतदादा म्हणाले की, 'फ्री सेल साखरेचा भाव ६ रुपयांच्या खाली येता कामा नये.' म्हणजे वसंतदादांनी दिल्लीत बसून नुसते बोलायचे आणि बाकीच्या शेतकऱ्यांनी लाठ्या खायच्या आणि वर दिल्लीत बसून त्यांनी असेही म्हणायचे की हे आंदोलन मला पसंत नाही. असले ढोंगी पुढारी आम्हाला नकोत. ६ रुपये भाव मिळावा असे वाटत असेल तर ६ रुपये भावाकरिता प्रसंगी लाठ्या झेलायला तयार असतील तेच आमचे पुढारी, बाकीचे लोक आमचे पुढारी नाहीत.

तेव्हा, आपल्याला आपला लढा आपल्याच ताकदीवर चालू ठेवायला पाहिजे.

कोणतेही लष्कर काय करते? युद्धाची तयारी करतात म्हणजे काय करतात? तर मागल्या वेळी युद्धात शत्रुपक्षाने काय डावपेच टाकले होते ते बघतात आणि त्याप्रमाणे पुढच्या युद्धासाठी तयारी करतात. त्याचप्रमाणे, १९८० साली शेतकऱ्यांनी आंदोलन करून आपल्याला नमवले; तेव्हा त्यांनी काय रणनीती वापरली तिला तोंड देण्यासाठी तयारी करू या असे ठरवून सरकारने तयारी चालवली आहे. साखरेचा तुटवडा झाला तर हे लोक आंदोलन करून कारखाने बंद पाडू शकतात

आणि सरकारला अडचणीत आणू शकतात. हे मागल्या आंदोलनात त्यांनी अनुभवले. पुन्हा आंदोलन झाले तर ते दाबता यावे म्हणून सरकारने साखरेची आयात करून साखरेचा मोठा साठा जमा केला आहे.

म्हणजे, सरकारने गेल्या वर्षीसारखे आंदोलन मोडून काढण्याची जय्यत तयारी केली आहे; पण यंदा आपल्या आंदोलनाचा मार्ग वेगळा राहणार आहे. या आंदोलनाच्या पायऱ्या मी आपल्याला समजावून देणार आहे.

त्या आधी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्या. मागच्या वर्षी पिंपळगाव बसवंतला झालेल्या विजय मेळाव्यात माधव खंडेरावांनी सांगितले होते की, 'शेतकरी आंदोलनाचा विजय झाला आहे. शेतकरी आता निव्वळ लंगोट्या लावणारा किंवा धोतऱ्या राहिला नाही.' याचा अर्थ, शेतकरी आता वरच्या पातळीवर गेला आहे. आता दुसऱ्या कोणत्याही पक्षाचा मेळावा असेल तर तेथे जाताना विचारायचे – खुर्ची आहे का? मांडव घातलेला आहे का? तिथे काही चहापाण्याची व्यवस्था आहे का? शेतकरी संघटनेच्या मेळाव्याला मात्र आपल्या घरच्यासारखे येऊन मांडी घालून बसायचे.

आता शेतकरी एका वेगळ्या इभ्रतीला आला आहे आणि या इभ्रतीला आल्यानंतर आता लाठ्या खाण्याची किंवा तुरुंगात जाण्याचीसुद्धा गरज नाही. काही न करता, केवळ डरकाळी फोडून आपण आपला भाग मिळवू शकतो. तुम्ही एक वर्षाचा अनुभव घेतला आणि शेतकरी संघटनेवर विश्वास व्यक्त केला. या विश्वासाच्या बळावर आम्ही आज इथे घोषणा करतो की शेतकरी संघटना तुम्हाला तीन वर्षांचा कार्यक्रम देत आहे. या तीन वर्षांत शेतकरी मुक्त झाल्याखेरीज राहणार नाही.

महात्मा गांधींनी एक वर्षात स्वराज्याची हमी दिली होती. गेल्या आंदोलनात आणि वर्षानंतर आज तुम्ही जी ताकद दाखवली आहे ती लक्षात घेता तीन वर्षांत शेतकरी मुक्त झाल्याखेरीज राहत नाही. त्यासाठी अर्थात् तुमच्याकडून मला तीन गोष्टी पाहिजेत.

पहिली गोष्ट म्हणजे तुमची शेतकरी संघटनेवर निष्ठा पाहिजे, शेतकरी संघटनेवर भक्ती पाहिजे. या तीन वर्षांपुरते तरी इतर ठिकाणच्या भक्तीभावना सोडून द्या. निवडणुका यायला अजून तीन वर्षे आहेत. त्या आल्यानंतर तुमच्यातुमच्या पुढाऱ्यांचे काय बघायचे असेल ते बघा; पण येत्या तीन वर्षांत त्यांच्याकडे काही बघू नका. शेतकरी संघटनेवरील इतकी भक्ती तुमच्याकडून हवी आहे. तुमची शेतकरी संघटनेवरील भक्ती, मी तुम्हाला सांगेन ती युक्ती आणि मागच्या आंदोलनात प्रत्ययाला आलेली शेतकऱ्यांची शक्ती यांचा समन्वय येत्या तीन वर्षांत होऊ द्या

आणि चमत्कार पाहा. 'भक्ती, युक्ती, शक्ती आणि तीन वर्षांत मुक्ती'.

या लढाईच्या वेगवेगळया आघाड्या असतील.

पहिली आघाडी आहे कायद्याच्या लढ्याची. ती कोर्टदरबारी लढायची आहे. त्याकरिता नाशिकमधील वकील मंडळींची एक समिती नेमण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या वतीने दिल्लीच्या सर्वोच्च न्यायालयात आम्ही खटले लढवणार आहोत. या खटल्यात हिंदुस्थानातील चांगले चांगले नावाजलेले वकील शेतकऱ्यांची बाजू मांडतील अशी व्यवस्था आपण करणार आहोत – अगदी त्यांची फी देऊन.

सगळे अधिकारी, मंत्री जरी 'इंडिया'चे असले तरी दिल्लीच्या न्यायालयाला 'भारता'विषयी काही भावना आहे असे वाटते. कोर्टदरबारात जाण्याची ताकद शेतकऱ्यांमध्ये आहे.

पहिला खटला आपण लावणार आहोत तो फ्री सेल साखरेसंबंधात. साडेचार लाख टन साखर 'फ्री सेल' मधून लेव्हीमध्ये जावी असा जो सरकारी आदेश देण्यात आलेला आहे तो आदेशच बेकायदेशीर आहे. शेतकऱ्यांच्या मूलभूत हक्कांचा भंग करणारा आहे. तेव्हा तो रद्द करण्याची मागणी न्यायालयाकडे करण्यात येईल. त्याचबरोबर कांदा, कपाशी व इतर काही शेतीमाल यांच्या निर्यातीवरील बंधनेही बेकायदेशीर व शेतकऱ्यांच्या मूलभूत हक्कांचा भंग करणारी आहेत. ही बंधनेही रद्द करण्याची मागणी कोर्टापुढे करण्यात येईल.

दुसरा खटला लावायचा आहे लेव्ही साखरेबद्दल. आपल्याकडून ६५% साखर लेव्ही म्हणून कमी दराने नेली जाते. ही पद्धतच बेकायदेशीर आहे. औषध मिळाले नाही म्हणून ज्या देशात लहानलहान पोरे पटापट मरतात त्या औषधांवर लेव्ही नाही, पण तो देश साखरेवर मात्र लेव्ही लावतो हे अन्यायकारक आहे. तेव्हा लेव्ही पद्धत बंद करावी यासाठीही खटला लावला जाणार आहे.

गहू, कपाशी, साखर यांची परदेशातून आयात केली तीसुद्धा अन्यायकारक आहे. सरकारला देशातल्या शेतकऱ्याला गव्हाकरता १३० रुपयेच भाव द्यायचा असेल तर त्याला अमेरिकेतील शेतकऱ्याला १९४ रुपये देता यायचे नाहीत. देशातील उसाला टनाला ३०० रुपये भाव मिळत नसेल तर परदेशातील उसाला ३०० पेक्षा जास्त भाव देता येणार नाही. आमच्या कपाशीला ७०० रुपये देणार नसाल तर पाकिस्तानातल्या शेतकऱ्याला ९०० रुपये देण्याचा अधिकार सरकारला नाही. तेव्हा अशाप्रकारे केलेली आयात ही अन्यायकारक असून ती करण्यास सरकारला बंदी करावी अशी मागणी करणारा खटलाही लावण्यात येईल.

आपण हे खटले देशातील नामांकित कायदेतज्ज्ञ वकील नेमून लढवणार आहोत. तेव्हा लढाईची ही पहिली आघाडी ती वकील मंडळी सांभाळणार

आहेत. त्यावेळी आपण त्यांच्याकडे डोळे लावून नुसते बसायचे नाही. आपणही आपल्या पातळीवरील आघाडी लढवायची आहे. त्यासाठी शेतकरी संघटना आदेश देते की :

१. जिल्ह्याजिल्ह्यात सहकाराचे जी लवाद कोर्टे आहेत त्यामध्ये आपल्या जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांविरुद्ध, त्यांनी ऊसबिलातून प्रतिटन अडीच रुपयांची परस्पर कपात केल्याबद्दल फिर्याद दाखल करावी.

महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या राज्यपातळीवरील लवादाने यापूर्वी निर्णय दिला आहे की साखर कारखान्याला अशी कोणतीही कपात करता येणार नाही. कारखान्याचे काही नियमपोटनियम असतात. त्यानुसार, कारखान्याच्या परिसरामध्ये आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, विकास करण्याकरिता, रस्ते बांधण्याकरिता, शाळा बांधण्याकरता काही पैसे कापून घेण्याचा अधिकार कारखान्यांना आहे, पण तोसुद्धा त्यांच्या सर्वसाधारण सभेने संमती दिली तरच.

तेव्हा आपण ठरवून टाकू या की यापुढे कोणत्याही अध्यक्षाला ऑफिसमध्ये बसल्याबसल्या आज २ रुपये कापा, उद्या ५ रुपये कापा; इतकेच नव्हे तर पैसासुद्धा कापायला परवानगी नाही आणि कोणी अध्यक्ष जर पैसे कापू म्हणेल तर त्या क्षेत्रातील किमान एकतरी शेतकऱ्याने सहकार लवादाकडे फिर्याद करण्याची तयारी ठेवावी. ही फिर्याद कशी करावी त्याचे मार्गदर्शन करण्यासाठी व नमुना अर्ज तयार करण्यासाठी आपली कायदा समिती तयार आहे. हा झाला ऊसकरी शेतकऱ्यांचा लढाईच्या कायदेशीर आघाडीवरील सहभाग.

हे हत्यार किरकोळ समजू नका. हे फार भयानक मोठे हत्यार आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर सबंध देशात हे राजकारणी पुढारी ज्यांच्याकडे आधी काहीच नव्हते – एकेका निवडणुकीत कित्येक लाख रुपये खर्च करतात ते येतात कोठून? हे तुमच्या उसातून कपातीतील, तुमचेच चोरलेले पैसे असतात. यापुढे तुमच्या उसातील एक तांबडा पैसासुद्धा देऊ नका की यांचे सगळे राजकारण कोसळते, बघा. तुम्ही इतके करू शकलात तर या देशातल्या सरकारला एवढा धक्का द्याल की हे पुढारी पुन्हा राजकारणात राहणार नाहीत.

२. सगळ्या ऊसउत्पादक शेतकऱ्यांनी ताबडतोब आपापल्या सहकारी कारखान्यांची विशेष सर्वसाधारण सभा बोलवावी. एक पंचमांश सभासदांनी सह्या करून अशी विशेष सर्वसाधारण सभा बोलावण्याची तरतूद सहकारी कायद्यामध्ये आहे. या सभेत पहिला ठराव संचालक मंडळाला आदेश देणारा की तुम्ही आमचे कापलेले प्रति टन अडीच रुपये परत करा. दुसऱ्या ठरावाने आदेश द्यायचा की सरकारने फ्री सेल मधील साडेचार लाख टन साखर लेव्हीत

टाकण्याचा जो आदेश दिला आहे तो आदेश संचालक मंडळाने मानू नये.

हेही मोठे परिणामकारक हत्यार आहे. कारण कोणत्याही सहकारी कारखान्यात कोणी अध्यक्ष मोठा असत नाही, तर सर्वसाधारण सभा हीच सार्वभौम असते. त्या सभेचे आदेश मानणे अध्यक्षांना व संचालक मंडळाला भाग आहे. त्याउपर, जर सर्वसाधारण सभेचे आदेश डावलून त्यांनी पोलिसांच्या मदतीने फ्री सेलची साखर लेव्हीत घातलीच तर ती कशी अडवायची ते आपण ठरवू.

आणि या विशेष सर्वसाधारण सभेत तिसरा ठराव करून संचालक मंडळाला आदेश द्यायचा की शेतकरी संघटनेने उसाच्या भावाच्या बाबतीत केलेल्या मागण्या जर का केंद्र सरकारने या वर्षी मान्य केल्या नाहीत तर येत्या हंगामामध्ये संचालक मंडळाने सरकाला लेव्हीची साखर देऊ नये. त्यासाठी त्यांना जर काही शिक्षा होणार असेल तर ती भोगण्याची त्यांनी तयारी ठेवावी आणि त्यांना हे झेपत नसेल तर त्यांनी संचालकपदांचे राजीनामे देऊन निघून जावे, आम्ही दुसरे संचालक मंडळ नेमू.

शेतकऱ्यांच्या या आंदोलनामुळे कोणी कारखान्यावर प्रशासक नेमू पाहील किंवा कारखानाच बंद करू पाहील तर कारखान्याचे कामगार आपल्या बाजूने उभे राहतील.

पुढच्या लढाईतल्या दोन आघाड्या - एक कोर्टाची आघाडी वकिलांनी सांभाळायची आणि दुसरी, लवादापुढे जाऊन आणि विशेष सर्वसाधारण सभा बोलावून शेतकऱ्यांनी लढवायची - आपण पाहिल्या.

तिसऱ्या आघाडीवर संपूर्ण राज्यभर जिल्ह्याजिल्ह्यात, तालुक्यातालुक्यात शेतकरी संघटना विचाराच्या प्रसारासाठी आणि प्रचारासाठी कार्यकर्त्यांच्या बैठका, मेळावे तसेच शेतकऱ्यांच्या सभा घेतल्या जातील. या कार्यक्रमादरम्यान त्या त्या भागातील शेतीच्या समस्यांचा अभ्यास केला जाईल.

लढाईची चौथी आघाडी १० नोव्हेंबर १९८१ रोजीची. हा दिवस म्हणजे आपल्या गेल्या वर्षीच्या विजयी आंदोलनाचा वाढदिवस. १० नोव्हेंबर १९८१ रोजी सगळ्या महाराष्ट्रभरच्या शेतकऱ्यांनी सगळे रस्ते, रेल्वे, पूर्ण दिवस बंद ठेवायचे आणि आपली ताकद दाखवायची. ज्यांना वाटते आहे की शेतकरी संघटना सपाट झाली त्यांच्या डोळयांत झणझणीत अंजन पडू द्या; जी मंडळी कोर्टात आपल्यासाठी लढत आहेत त्यांनासुद्धा शेतकरी संघटना म्हणजे काय ताकद आहे हे कळून अभिमान वाटला पाहिजे. शासनाला असे वाटले की शेतकरी संघटनेची ताकद संपली आहे, त्या शासनाला कळायला पाहिजे की, '१० नोव्हेंबर १९८१ रोजी महाराष्ट्रातला एकही रस्ता चालू राहणार नाही.'

आजच्या मेळाव्याला नाशिक, अहमदनगर, धुळे या ऊसउत्पादक जिल्ह्यांच्या बरोबर विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण अशा महाराष्ट्राच्या सर्व भागांतून शेतकरी प्रतिनिधी हजर आहेत. ते या मेळाव्यातील निर्णय आपापल्या भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणार आहेत. शिवाय, उद्यापासून प्रचार दौराही सुरू होणार आहे. तेव्हा १० नोव्हेंबर १९८१ चा निरोप राज्याच्या कोनाकोपऱ्यापर्यंत पोहोचून त्यादिवशी राज्यातील एकूणएक रस्ते बंद राहतील याबद्दल माझी खात्री आहे.

आणि आमच्या ताकदीचा एकदा पुरावा घेऊनसुद्धा आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत आणि शेतकऱ्याच्या विरुद्ध धोरण चालूच राहिले तर डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर महाराष्ट्राबरोबरच तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात या राज्यांतील शेतकरी एकाच वेळी आंदोलनात उतरतील.

शेतकरी संघटनेची घटना काय असावी, बांधणी कशी असावी, कार्यप्रणाली कशी असावी इत्यादीसंबंधी एक एक लेखी धोरण बनविण्याच्या दृष्टीने चर्चा व विचारविनिमय करण्यासाठी २१ व २२ ऑक्टोबर १९८१ रोजी सर्व जिल्ह्यांतील, तालुक्यांतील कार्यकर्त्यांचे अधिवेशन मांगीतुंगी येथे भरविण्यात येईल. या अधिवेशनास वेगवेगळ्या राज्यांतील प्रतिनिधीही हजर राहणार आहेत. या अधिवेशनाचे यजमानपद बागलाण तालुक्याकडे असणार आहे. आपापल्या भागातील जास्तीत जास्त शेतकरी कार्यकर्त्यांना या अधिवेशनास येण्यास उद्युक्त करा.

*२० सप्टेंबर १९८१ रोजी पिंपळगांव बसवंत (जि. नाशिक) येथे जमलेल्या लाखभर शेतकऱ्यांसमोर केलेल्या भाषणाचे शब्दांकन.*

(शेतकरी संघटक *२१ मार्च २००५*)

■■

# सौराज्य मिळवायचं औंदा

गेली दोन वर्षे शेतकरी संघटना संघटनेच्या विचार प्रसावरच भर देऊन कार्य करीत आहे. दोन वर्षांत शेतकऱ्यांवर बरेच अन्याय झाले आहेत. कांद्याची खरेदी बंद करण्यात आली, उसाच्या किमती पडल्या, तंबाखू तर साफ ठार झाली आणि तरीसुद्धा शेतकरी संघटनेने मोठ्या आंदोलनाचे नाव काढले नाही. याचा अर्थ असा नव्हे, की शेतकऱ्यांवर अन्याय होतो याची संघटनेला कल्पना नव्हती. शेतकरी संघटनेच्या रणनीतीचे एक महत्त्वाचे तंत्र आहे. ज्यावेळी अन्याय होतो म्हणून चीड येते, संताप होतो त्यावेळी वरचा ओठ दातांनी दाबून धरायचा आणि सगळा संताप गिळून पोटात घालायचा असतो. आंदोलन अशाच वेळी करायचे जेव्हा आपली आंदोलन करण्याची ताकद असते. आपल्या ताकदीचा अंदाज घेऊनच आंदोलनाची वेळ ठरविली पाहिजे.

अफझूलखान विजापुराहून निघाल्यापासून त्याच्या फौजेने गावोगाव जाळपोळ, लुटालूट, अत्याचारांचा कळस केला. या सगळयांची वर्दी छत्रपतींच्या कानी जात होती. त्यांनाही याची चीड आली नसेल, त्यांचा संताप झाला नसेल असे नाही. आपलं सैन्य किती का थोडं असेना, अफझूलखानाची फौज किती का प्रचंड असेना आपण त्यांच्यावर तुटून पडावं असं त्यांनाही वाटलं असणार. पण त्यांनी तसं केलं नाही. अगदी कुलस्वामिनी भवानीचे तुळजापूरचे देऊळ अफझूलखानाच्या सैन्याने लुटलं तरी महाराज स्वस्थ बसले. त्याला आपल्या राज्यात अगदी प्रतापगडाच्या पायथ्याशी येऊ दिलं. तोपर्यंत सैन्याची जमवाजमव केली आणि मग हल्ला केला. पुढे घडलेला इतिहास सर्वांनाच ठाऊक आहे.

आपला शत्रू अफझूलखान प्रतापगडाच्या पायथ्याशी येऊन बसला आहे. "सौराज्य मिळवायचं औंदा." तेव्हा आता लढाईला तयार व्हा. आजपर्यंत सगळा संताप जो पोटात साठवला होता त्यानं नुसतं भडकून उठून उपयोगाचं नाही. हृदयात आग असली तरी डोकं शांत ठेवून आपल्याला ही लढाई लढायची आहे. डोकं भडकलं म्हणून रजपुतांसारखा 'केसरिया' करण्यात अर्थ नाही.

आपल्या ताकदीचा अंदाज न घेता 'केसरिया' करणाऱ्या रजपुतांच्या रमणींना अखेरी 'जोहार' करावा लागतो.

लढाईमध्ये जर विजय मिळवायचा असेल तर आपल्याला गनिमी काव्याचीच लढाई करावी लागेल. आपली ताकद कुठे आहे, शत्रू कमजोर कोठे आहे, त्याला कोणत्या खिंडीत गाठता येईल याचा विचार करूनच आपण आपली लढाई लढायची आहे.

परभणी अधिवेशनाच्या तीन दिवसांत चर्चा करून आता आपल्या लढाईची वेळ आलेली आहे हे आपण समजून घेतले आहे. आपल्या अनेक पिढ्यांच्या अपमानाचा बदला घेण्याची वेळ आता आली आहे.

१९४७ मध्ये गोरा इंग्रज हे राज्य सोडून गेला. आपल्याला स्वातंत्र्य मिळालं असं वाटलं होतं; पण त्याच्या जागी काळा इंग्रज बसला. गोऱ्यांचं जे धोरण, शोषण संपलं असं वाटत होतं ते प्रत्यक्षात संपलं नाही आणि म्हणून १९८४ मध्येसुद्धा महात्मा गांधींचाच हा लढा पुन्हा एकदा देण्याची वेळ आपल्यावर आली आहे.

१९८० मध्ये कांदा, ऊस या पिकांसाठी आपण आंदोलनं केली. शेतकरी आंदोलन हे मूलतः आर्थिक स्वरूपाचं आहे. ते केवळ झेंडे घेऊन आणि मिरवणुका काढून भागायचे नाही. उसाच्या वेळी आपण बाजारपेठेचा अभ्यास करून ऊस थांबवला पण काही कारणांनी आपली थांबविण्याची ताकद कमी पडते असे दिसताच आपण रास्ता रोको, रेल्वे रोको असे सविनय कायदेभंगाचे मार्ग वापरले. ८१ मध्ये निपाणीला तंबाखूउत्पादक शेतकऱ्यांचे प्रदीर्घ रास्ता रोको आंदोलन झाले. सविनय कायदेभंग करणाऱ्या शेतकऱ्यांना अटक करण्याचे सोडून शासनाने त्यांच्यावर अमानुष गोळीबार करून शेतकऱ्यांचे बळी घेतले. या दोन्ही वर्षी आंदोलनांमध्ये शेतकऱ्यांना यश मिळाले तरी ते शासनाने टिकू दिले नाही. दूध आंदोलनाच्या वेळी तर शासनाने परदेशातून भुकटी आयात करून शेतकऱ्यांचा पराभव केला.

१९४७ नंतर पुन्हा एकदा क्रांतीची वेळ आलेली आहे. आतापर्यंत आपण वापरलेले सविनय कायदेभंगाचे मार्ग शासनाने नाकारून क्रूर दडपशाहीने आपले आंदोलन दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. आता आपल्याला कायदेभंगाचा नवीन मार्ग अवलंबिला पाहिजे.

भारतातले ७५ ते ८०% लोक शेती व्यवसाय करून तऱ्हेतऱ्हेचे उत्पादन करतात. पण आपल्या मालाची किंमत ठरवू शकत नाहीत. पाचपन्नास व्यापारी त्या मालाची किंमत ठरवितात. ही स्थिती उलटली पाहिजे. ते करणंही सोपं

आहे. आपल्या मालाला उत्पादनखर्चावर आधारित भाव मिळेपर्यंत आपण आपला माल विकायचा नाही असे सर्व शेतकऱ्यांनी मिळून ठरविले पाहिजे. हे या आधीही जमले असते. पण प्रत्येक शेतकऱ्याच्या मनात भीती की आपण नाही विकलं तर दुसरा विकील; आपला माल तसाच पडून राहील; आपलं नुकसान होईल. कुणी एकानं सांगावं आणि सर्व ५२ कोटी शेतकऱ्यांनी ऐकावं अशा विश्वासाचं कुणी नव्हतंच. गेल्या चार वर्षांत आपण सर्वांनी सर्व देशभर हिंडून शेतकरी संघटना, भारतीय किसान युनियन अशी वेगवेगळया भाषांतील नावं धारण करून अशी एक संघटना तयार केली आहे जिच्यावर शेतकऱ्यांचा विश्वास राहील.

१९८४ मध्ये आपल्याला हे हत्यार वापरावयाचे आहे. यावर्षी आपण बाजारात धान्य अजिबात आणावयाचे नाही. या कार्यक्रमाचा पहिला टप्पा म्हणजे यंदा रबी हंगामाचे जे पीक हाती आले आहे ते अजिबात बाजारात आणायचे नाही. आता आपल्याला आपली ताकद दाखविणे आवश्यक आहे. आपल्याला त्यांना ठणकावून सांगायला हवे, 'हमसे जो टकरायेगा, भूकसे मर जायेगा।' कारण आपली स्थिती शेषनागासारखी आहे. त्याच्या डोक्यावर सगळया पृथ्वीचा भार आहे. पण या शेषनागाने आज ठरविले आहे की अशा तऱ्हेने आम्हाला ठेचू पाहत असाल तर आता आम्ही हा भार वाहायला तयार नाहीत. ही पृथ्वी आता हलायला लागणार आहे.

धान्य बाजारात न आणण्याच्या आपल्या या आंदोलनाची प्रत्यक्षात सुरुवात १५ एप्रिलपासून पंजाब व हरियानात होणार आहे. भारतीय बाजारपेठेत येणाऱ्या गव्हातील ७०% गहू या राज्यात बनतो. तेथील शेतकऱ्यांनी निर्धार केला आहे की एक कणसुद्धा गहू बाजारात येणार नाही. शासनाला किती गहू अमेरिकेतून आणायचा असेल तितका आणा म्हणावे! शासन याबाबतीत कोंडीत सापडणार आहे. कारण यावर्षी शासनाला जागतिक बँकेचे कर्ज फेडायचे आहे.

अन्नधान्य बाजारात पाठविणे बंद करणे ही तशी कठीण गोष्ट आहे हे मला माहित आहे; पण आपण स्वराज्य मिळवायला निघालो आहोत ना? आपल्याला काय कुणी खाटेवर झोपल्या झोपल्या स्वराज्य देणार आहे? त्यासाठी थोडाफार त्रास सहन करावाच लागेल. रब्बी हंगामात तयार झालेले धान्य बाजारात आणायचं नाही ही आपल्या या वर्षीच्या कार्यक्रमाची छोटीशी सुरुवात आहे. मुख्य लढाई पुढेच आणि लांब आहे. ८४ साल आता कुठे सुरू झाले आहे. खरा कार्यक्रम खरिपाच्या हंगामात आपल्याला राबवायचा आहे–आखीवपणे, शिस्तबद्धरीतीने आणि प्रामाणिकपणे.

खरिपाच्या हंगामात काय करायचे? खरिपाच्या हंगामात आपण आपल्या पिकांचं नियोजन करायचं आहे. उगीच वेड्यासारखं महामूर धान्य पिकवायचं नाही. अन्नधान्य पिकवायचं आहे, पण किती? आपल्याला, आपल्या शेतावर काम करणाऱ्यांना, आपल्या भावाला पुरेल इतकेच धान्य यंदा आपण पिकवायचं आहे. शेजारच्या गावात कमी पडत असेल तर त्यांना पुरवायचे पण कोणत्याही परिस्थितीत धान्य बाजारात आणायचे नाही. अधिक धान्य पिकवलं तर आपण अधिक कर्जात बुडतो, खड्ड्यात जातो याचा अनुभव आपल्याला वर्षानुवर्षे आला आहे. त्यामागील आर्थिक कारणही आता आपल्या लक्षात आले आहे. तेव्हा किमान एक वर्ष हा कार्यक्रम आपल्याला राबवायचा आहे.

एखाद्या कारखान्यात प्रचंड यंत्रसामग्री असेल आणि त्यात एका दिवशी दहा हजार वस्तू तयार होत असतील तर मागणी कमी म्हणून जर त्याला किफायतशीर भाव मिळाला नाही तर त्याचं दिवाळं वाजेल. त्यापेक्षा कारखानदार म्हणेल हजारचीच मागणी आहे ना, मग मी हजारच वस्तू तयार करीन आणि किफायतशीर दरात विकीन, राहिनात का काही यंत्र बंद. यालाच शहाणा कारखानदार म्हणतात. शेती व्यवसाय हाही एक कारखानाच आहे. आपले यंत्र फार मोठे आहे. तरीसुद्धा बाजारात किफायतशीर दरात मागणी नसेल तर आम्ही अधिक धान्य पिकवून अधिक नुकसानीत जायला आता तयार नाही.

काही लोक तुम्हाला सांगायला येतील की असे करणे चुकीचे आहे. यात देशाचे नुकसान आहे; देशाला अधिक धान्य पिकविण्याची गरज आहे. त्यांना आपण सांगायला पाहिजे, 'अधिक धान्य पिकवायला आम्ही तयार आहोत. आम्ही अधिक धान्य पिकवावे अशी जर तुमची इच्छा असेल तर अन्नधान्याला उत्पादनखर्चावर आधारित रास्त भाव मिळण्याची व्यवस्था करा. आम्ही तर आजपर्यंत धान्याचे डोंगर घालून दिलेत पण तुमचं धोरण आणि किमती पाहता आम्ही अधिक धान्य पिकवू नये अशीच तुमची इच्छा आहे असे दिसते.'

रब्बीचा हंगाम तर संपत आला आहे. या हंगामात तयार झालेले अन्नधान्य आपण बाजारात बिलकुल आणायचे नाही. खरीप हंगामात मात्र योजनाबद्ध आखणी केली पाहिजे. आपल्या या कारखान्याचं यंत्र कसं वापरायचं? आपल्या शेतीचा विचार करा. आपल्या सर्व जमिनीत ज्वारी, बाजरी वगैरे धान्य काढण्याचे थांबवा. आपल्या गावापुरते धान्य तयार होईल इतक्याच जमिनीत धान्य-पिकांची लागवड करा. उरलेल्या जमिनीत आपापल्या भागातील हवामान, पाऊसमान यांचा विचार करून फळबागा तयार करा. कडधान्य तयार करा, गळिताचे धान्य घ्या. काही जमीन वनशेतीसाठी ठेवून झाडांची लागवड करा.

स्थानिक परिस्थितीनुसार जे काही करता येइल ते करा पण कोणत्याही स्थितीत अन्नधान्याचे पीक आपल्य गावापुरतेच घ्या. अन्नधान्य वाटेल तितके पिकवत सुटलात तर हा लढा चालवताच येणार नाही. उरलेल्या जमिनीत दुसरे काहीच करता येत नसेल तर एक वर्षे ती पड ठेवा. इतर कारखान्यातील यंत्र बंद ठेवली तर गंजून जातात पण आपलं हे यंत्र एखाद वर्ष बंद ठेवलं तर अधिक उत्पादनक्षम होतं. जमिनीला थोडा दम खाऊ द्या. हे साधन म्हणणे आपल्या हातातील केवढी मोठी ताकद आहे!

सरकारने सांगितले अधिक धान्य पिकवा. ते ऐकून आम्ही वर्षानुवर्षे आमच्या काळ्या आईचे शोषण केले, झाडे तोडली, गवताची कुरणेसुद्धा शेतीखाली आणली. दरवर्षी अधिकाधिक पिकं घेऊन ती सुद्धा दमली. तिला जास्त खत लागायला लागलं, औषधं जास्त लागू लागली त्यामुळे शेतीमालाचा उत्पादनखर्च वाढत राहिला आणि किमती मात्र पडतच राहिल्या, यामुळे या शर्यतीत आपण जिंकणे शक्य नाही. तेव्हा जमिनीतून दुसरं काही काढणं शक्य नसेल तर ती वर्षभर पड ठेवा पण गावाच्या जरुरीपेक्षा जास्त धान्य पिकवू नका.

हा या वर्षाचा कार्यक्रम आहे. सुरुवातीला रब्बीचे हाती आलेले धान्य बाजारात विक्रीसाठी बिलकूल आणावयाचे नाही आणि खरिपाच्या हंगामात फक्त गावापुरते अन्नधान्य पिकवायचे.

'स्वातंत्र्या'सारखी मौल्यवान गोष्ट मिळविण्यासाठी आपण हे आंदोलन पुकारले आहे. त्यात विनासायास यश मिळेल असे मानणे चूकच आहे. अनेक अडचणी आपल्यापुढे उभ्या राहतील; पण आता आपण 'आपण' आहोत. आपल्यातील कुणीही आता 'एकटा' नाही. आपण सर्व मिळून संघटनेच्या अडचणींना सामोरे यायला हवे.

पहिली अडचण बऱ्याच लोकांच्या बाबतीत निर्माण होईल ती म्हणजे कर्जफेडीची. आपल्याला इंडियाची कर्ज फेडायची नाहीत असे नाही. आम्हाला कर्जमाफीची भीक नको. पण जोपर्यंत शेतकरी स्वतंत्र होत नाही, त्याला आपल्या शेतीमालाचा भाव उत्पादन-खर्चावर अधारित ठेवण्याचा अधिकार मिळत नाही, तोपर्यंत शेतकरी कर्ज फेडणार नाहीत. 'पुढाऱ्यांप्रमाणेच कर्जवसुली अधिकाऱ्यांना परवानगीशिवाय गावात प्रवेश करण्यास बंदी आहे.' असा फलक प्रत्येक गावाने आपल्या वेशीवर लावावा. तरीही वसुली अधिकारी गावात आल्यास सर्व गावकऱ्यांनी सत्याग्रहाचा मार्ग वापरून त्यांना वसुली किंवा जप्ती करण्यास बंदी करावी.

दुसरी अडचण म्हणजे गावामध्ये ज्याची स्वत:ची पुरेशी ज्वारी नाही, धान्य

नाही अशांच्या पोटाचा प्रश्न येणार. खरे तर आपण आमची संघटना आहे असे जेव्हा म्हणतो तेव्हा असा प्रश्नच उपस्थित होता कामा नये. शेवटी संघटना म्हणजे तरी काय? गावातला कुणीही शेतकरी असो, शेतमजुरी करून पोट भरणारा शेतमजूर असो की अल्पभूधारक असो सर्वजण एकमेकांचे भाऊ आहेत. सबंध आंदोलनाच्या काळात कोणी उपाशी राहणार नाही अशी सर्व गावकऱ्यांनी मिळून काळजी घेतली पाहिजे. शेजारच्या गावाकडेही लक्ष ठेवायला पाहिजे. गावात शिल्लक राहिलेली चतकोर भाकरीसुद्धा सर्वजण वाटून खाऊ अशी स्थिती असेल तरच संघटना झाली असे म्हणता येईल.

एकदा गावामध्ये संघटनेचे सामर्थ्य निर्माण झाले म्हणजे कोणत्याही स्वरूपाची अडचण ही अनिवार्य राहणार नाही.

आपल्या या आंदोलनाला पूरक म्हणून आणखीही काही कार्यक्रम आपल्याला हाती घ्यावे लागतील.

१. पुढाऱ्यांना परवानगीशिवाय गावात प्रवेश करण्यास बंदी करा. शेतीमालाच्या भावाबद्दल नुसती वरवर, फसवी भाषणे करून चालणार नाहीत तर आमच्या प्रश्नांची उत्तरे द्यायची तयारी असेल तरच तुम्हाला गावात प्रवेश मिळेल असे त्यांना ठणकावून सांगा.

२. गावातील प्रत्येक भिंतीवर शेतकरी संघटनेच्या घोषणा रंगवून काढा. येत्या निवडणुकीसाठी उमेदवारांना प्रचारासाठी एकही भिंत मोकळी ठेवू नका.

३. टेरिलीन, टेरिकॉटसारखे कृत्रिम धाग्याचे कापड विकत घेण्याचे बंद करून फक्त सुती कापडच वापरायला सुरुवात करा.

४. आपल्याला जीवनावश्यक नाहीत अशा 'इंडियन' वस्तूंची खरेदी एक वर्षापुरती बंद ठेवा.

आपण निर्धाराने आणि निष्ठेने एक वर्षभर हा कार्यक्रम अमलात आणला तर परभणी अधिवेशनाची घोषणा 'सौराज्य मिळवायचं औंदा' फलद्रूप होऊन भारताचा शतकानुशतकांचा वनवास संपेल इतकेच नव्हे तर जगामधल्या ज्या ज्या देशांमध्ये शेकऱ्यांची लूट करून औद्योगिकीकरणाची प्रक्रिया झाली आहे तिथे हा स्वातंत्र्याचा संदेश पोहोचणार आहे आणि त्या देशातील शेतकरी भावांचीही स्वातंत्र्यवर्षे प्रकाशमान होणार आहेत.

*(१७-१९ फेब्रुवारी १९८४ शेतकरी संघटना दुसरे अधिवेशन, परभणी.)*

*(शेतकरी संघटक २० एप्रिल १९८४)*

■■

# बळिराजाचा पुनरुत्थानाचा कार्यक्रम

**माझ्या शेतकरी भावांनो माय बहिणींनो,**

आता तुम्हाला, येथून गेल्यानंतर आजपासून निदान तीन महिन्यांचा कार्यक्रम मी समजावून सांगणार आहे. कारण मला एक धोका दिसतो. त्याची कारणं मी खुल्या अधिवेशनात देत नाही. प्रतिनिधी संमेलनात मी दिली आहेत. निवडणुका झाल्या तर मे महिन्यामध्ये होतील, नाही झाल्या तर डिसेंबरमध्ये होतील. आपण पहिल्यांदा तयारी मे महिन्याची करू. या निवडणुकीची तयारी कशाकरता करायची?

कर्जमुक्तीच्या आंदोलनामध्ये आपण ठरवलं. कोर्टामध्ये अर्ज टाकायचे. वसुली स्थगित करायची आणि वसुली स्थगित केल्यानंतर कर्जदार शेतकऱ्यांच्या संख्येच्या ताकदीवरती अशी परिस्थिती तयार करायची की, नवा पंतप्रधान कर्जमुक्ती मानणारा आणि शेतीमालाला रास्त भाव देणाराच असला पाहिजे. हे आपलं धोरण आहे. ही आपली रणनीती आहे. नांदेडला येताना आपण हसत आलो. का तर सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला होता की, यापुढे शेतकरी संघटनेचा एस्.एस्. हा शिक्का असलेला फॉर्म ज्या ज्या शेतकऱ्यांनी भरला असेल आणि कोर्टात दिला असेल, त्याच्यावर नंबर जरी पडला नसला तरी चालेल, त्या शेतकऱ्याकडनं कोणत्याही प्रकारची वसुली करण्याचा अधिकार कोणत्याही बँकेला नाही. हा सुप्रीम कोर्टाचा निर्णय आम्ही घेऊन आलो. केवढा मोठा भाग्याचा दिवस.

आमचे पणजोबा कर्जात मेले किंबहुना खापरपणजोबासुद्धा कर्जात जन्मले आणि कर्जात मेले. बळिराजा जमिनीत गाडला गेल्यापासून शेतकऱ्याच्या हातात एवढं मोठं हत्यार कधी आलं नव्हतं. वामनाने तीन टांगा टाकून बळीला गाडलं म्हणतात. शेतकऱ्यांचं हे एकच पाऊल इतकं मोठं झालं की काळ्या इंग्रजाला जमिनीत गाडण्याकरता ते पुरेसं आहे. कोणत्याही बंदुकीची गरज नाही, हत्याराची गरज नाही. सगळ्या कर्जाच्या बाजातून एक कागद कोर्टाकडे टाकला की

शेतकरी मोकळा होतो. शेतकऱ्यांच्या हाती ॲटमबॉम्ब आला आहे.

तर मग ९० सालच्या आधी तयारी काय कराची ते महत्त्वाचं आहे. यंदा मी तुम्हाला दिवाळीनंतर गावं रंगवायला सांगितली नव्हती. पण आपली जुनी पद्धत आहे. गावामधल्या सगळया भिंती शेतकरी संघटनेच्या घोषणांनी रंगवून टाका. हे फार महत्त्वाचं आहे. दिवाळीच्या आधी आपण रंगसफेदी करतो कारण शुभदिवस यायचा आहे. तर बळिराजाच्या आगमनाकरिता सगळं गाव शेतकरी संघटनेच्या आणि बळिराजाच्या विजयाच्या घोषणांनी रंगवून टाका.

दुसरी गोष्ट, गावाबाहेर शेतकरी संघटनेचा मोठा बिल्ला लावा. प्रत्येक गावामध्ये एक लहानशी का होईना पण पाटी लावून टाका. आपण पूर्वी पाटी काय लावायचो? कर्जवसुली अधिकाऱ्यांना आणि पुढाऱ्यांना गावात यायची परवानगी नाही. आता पुढाऱ्यांची चिंता करू नका व कर्जवुसली अधिकाऱ्यांना सुप्रीम कोर्टानेच टांगून ठेवलं आहे. आता नवी पाटी लावा.. 'जातीयवाद्यांना या गावात प्रवेश नाही.' जातीच्या आधाराने धर्माच्या आधाराने माणसामाणसामध्ये झगडे लावणाऱ्यांना या गावात प्रवेश नाही.

दुसरं काय काम करायचं आहे आपल्याला पाडव्याच्या मुहूर्तावर? ६ एप्रिल हा दिवस असा की, त्या दिवशी निपाणीला २३ दिवस सत्याग्रह झाल्यानंतर पोलिसांनी गोळीबार करून तेरा शेतकऱ्यांना ठार केलं. महत्त्वाचा पवित्र दिवस आहे. त्या दिवसांपासून नवीन काम सुरू करायचं. नोकरशाहीवर वचक आणण्याकरिता, भ्रष्टाचार संपविण्याकरिता. नांदेड जवळच्या अहमदपूर तालुक्यातल्या शेतकऱ्यांनी हा कार्यक्रम केला. पंजाबातील बहाद्दर शेतकऱ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला. काय कार्यक्रम यशस्वी केला?

आपल्याला जागोजाग लाच द्यावी लागते. ७/१२ चा उतारा तुम्हाला पैसे दिल्याखेरीज कधी मिळालाय का? नाही. फॉरेस्ट खात्यात जाऊन एखादा कागद मिळवायचा आहे. पैसे दिल्याखेरीज मिळालाय का? कधीही नाही. विजेचे कनेक्शन मिळवायचं, नवीन स्टार्टर बसवायचं आहे; शेतकऱ्याचं कोणतही काम कुठंतरी वजन ठेवल्याखेरीज, कुणाचे तरी हात ओले केल्याखेरीज होतच नाही, ही फार जुनी पद्धत आहे. शेतकऱ्याने शहरात कुणाला भेटायला यायचं झालं तर त्या शहरातल्या माणसांकरिता काहीतरी बांधून आणायचं. निदान दोन किलो ज्वारी तरी बांधून आणायची आणि शहरातला मनुष्य खेड्यात आलातर मग शहरातला मनुष्य काही शहरातनं एखादी गोष्ट बांधून नाही आणत. तो खेड्यात आल्यानंतर शेतकऱ्यालाच विचारतो, 'काही हुरडा-बिरडा आहे की नाही शेतावरती?' म्हणजे शेतकरी भेटायला गेला तरी त्यानेच घेऊन जायचं

आणि कोणी त्याला भेटायला आलं तरी त्यानेच त्याची उठबस करायची. ही फार जुनी पद्धत आहे.

जोतिबा फुल्यांनी याचं मोठं वर्णन केलं आहे. आता बळिराजा उठला आहे. हा भ्रष्टाचार आता संपणार आहे. फार जुन्या केसेस सोडून देऊ या; पण गेल्या सहा महिन्यांमध्ये ज्या ज्या शेतकऱ्याला एखादं काम करून घेण्याकरिता लाच द्यायला लागली असेल, त्यांनी शेतकरी संघटनेच्या ऑफिसमध्ये यायचं, कार्यकर्त्याला सांगायचं, पाच रुपयाच्या स्टँप पेपरवर लिहून द्यायचं की, "अमक्या अमक्या अधिकाऱ्याने माझ्याकडून काम केलं वा केलं नाही, तरी माझ्याकडनं इतके पैसे घेतले." मात्र प्रामाणिकपणानं लिहून द्या आणि खोटे कागद करू नका, त्याच्यात धोका आहे. कुणावरती सूड उगवायचा म्हणून खोटा कागद कराल तर बळिराजाच्या गळ्याला फास बसेल! सर्व कार्य करायचं इमानानं आणि शेतकरी संघटेनच्या कार्यकर्त्याकडे जायचं. मग कार्यकर्ते काय करतात? त्या अधिकाऱ्याकडे जाऊन ऑफिसात भेटतात आणि त्याला म्हणतात, "हे बघ तू लाच घेतली हे आम्हाला माहीत आहे, तू काही 'नाही' म्हणायचा प्रयत्न करू नको. चुकी झाली, तुझं नाव बाहेर फोडणार नाही. तुझी नोकरी जावी अशी आमची इच्छा नाही. पण हे पैसे तुला परत द्यायला लागतील. पैसे परत दिले, सध्या भांडण मिटलं" आणि अशा पाच-दहा केसेस झाल्या की, मग एक मोठी शेतकऱ्यांची सभा बोलवायची आणि त्या शेतकऱ्यांना बोलवायचं आणि जाहीर करायचं, 'अमुक तमुक गावचे अमुक अमुक शेतकरी यांनी म.रा.वि. मंडळाच्या अधिकाऱ्याला (नाव नाही सांगायचं) अडीच हजार रुपय उसने दिले होते त्या त्या अधिकाऱ्यांनी परत केले. ते आम्ही परत करतोत.'

भ्रष्टाचाराच्या विरुद्धचे आंदोलन म्हणजे राजीव गांधीच्या बोफोर्सविरुद्ध नाही. उलट राजीव गांधींनी साठ कोटी रुपये खाल्ले असं म्हटलं तर, शहरातील पुष्कळ माणसं काय म्हणतात माहिताय, "खायचाच की हो, अहो, सबइन्स्पेक्टर जर महिन्याला दोन लाख खातो, तर प्रायमिनिस्टरने साठ कोटी नको खायला?"उलट लोकांना त्याविषयी सहानुभूती वाटते. हे आपल्याला भ्रष्टाचाराचे भूत खालपासून गाडून टाकायचं आहे आणि यामुळे नोकरशाहीला धक्का लागणार आहे.

तुम्ही समजून घ्या, जातीयवादाचं भूत पसरविणाऱ्या लोकांना भ्रष्टाचार निपटून काढाल तर जगता येणार नाही. जे राजकारणी आपल्यावर अत्याचार करतात, भ्रष्टाचार त्यांचं खाद्य आहे. तुम्ही महाराष्ट्रामध्ये असं वातावरण तयार करून दाखवा की एकाही सरकारी नोकराला शेतकऱ्याकडनं लाच मागायची

भीती वाटते. सगळया शेतकऱ्याकडून असं वातावरण तर होऊ द्या, काय फरक पडेल हो? आज जिथं जिथं जावं, ज्या ज्या कार्यालयात जावं तिथं शेतकरी वाकून वाकून आत जातो. हे आंदालन सहा एप्रिलला चालू झालं की, या गुढीपाडव्यापासून कोणत्याही कचेरीत जाताना प्रत्येक शेतकरी छातीवर बिल्लाआणि मान ताठ असा चालायला लागेल. बळिराजा निम्मा वर आलाच म्हणून समजा.

त्याच्यानंतर दुसरा एक कार्यक्रम घ्यायचा महत्त्वाचा. याचा सगळा अर्थ तुम्ही समजून घ्या.

जातीयवाद्यांविरुद्ध लढा द्यायचा आहे. पण हे जातीयवादी कुठं असतात हो? साप जसं स्वत:ची बिळं करीत नाही, उंदराच्या बिळात घुसतो तसंच जातीयवाद्यांचं आहे. मंदिरात ते तसे क्वचितच सापडतात. जातीयवादी जास्त वेळा दारूच्या अड्ड्यावर आणि मटक्याच्या रक्षणार्थ सापडतात.

अनेक शेतकरी महिलांनी मला सांगितलं की, "दारूने अनेक शेतकरी परिवार उजाड केले, काही करा; पण गावातील दारू बंद झाली पाहिजे."

गावागावामध्ये दारूचे अड्डे, महिलांनी निरोधने करून बंद पाडावीत. हे लक्षात घ्या, दारू पिणे न पिणे याकरिता हा कार्यक्रम नाही. कुणाची कदाचित चुकीची समजूत होईल. मग कशाकरिता करायचे? हे दारूचे अड्डे, दारूचे अड्डे नाहीत. ते पुढाऱ्यांचे आणि गुंडांचे, जातीयवाद्यांचे अड्डे आहेत. म्हणून त्यांना पहिल्यांदा बंद पाडायचं. आज बहुतेक आमदार विधानसभेमध्ये कशाकरिता भांडतात? तर बॅरिस्टर अंतुल्यांपासून सगळया मुख्यमंत्र्यांनी एक एक आमदाराच्या मागे दोन दोन, चार-चार गुत्ते काढून दिले. त्या गुत्त्याच्या पैशावर आमदार मिजास मारून राहिले. त्यांच्या गळयाला हात घालायचा असेल तर तो गुत्ता उठता बसता बंद करा.

दहा एप्रिलपासून मी स्वत: महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात जाणार आहे. आणि प्रत्येक जिल्ह्यामध्ये महिलांची आधिवेशने घेणार आहे. विद्यार्थ्यांची अधिवेशन घेणार आहे आणि शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांची बैठक घेणार आहे. कशाकरिता? मे महिन्याची तयारी, आपली तयारी जय्यत पाहिजे. फौजेची तयारी जय्यत पाहिजे.

तुम्हाला काय काय कामं सांगितली? घरी जायचं. गावं रंगवून घ्यायची. गावाच्या बाहेर बिल्ला लावायचा. पाटी लावून टाकायची 'जातीयवाद्यांना गावात प्रवेश नाही'. सहा एप्रिलपासून, पाडव्याच्या दिवसापासून भ्रष्टाचारविरोधी मोहीम चालू करा. एक मे पासून गावामध्ये, बाजारपेठेतल्या या गुत्त्यांना इतक्यात हात लावू नका, आपण थोडं नंतर बघू ते; पण बाजारपेठ नसलेली गावे आहेत.

त्यांच्यातले गुत्ते आपल्याला पहिल्यांदा काढून टाकायचे आहेत आणि इथनं गेल्यानंतर एक गोष्ट महत्त्वाची करायची आहे, कर्जमुक्तीचे अर्ज भरा म्हणून मी सांगितलं 'तुम्ही भरले' पण पाच लाख भरले, मी दहा लाखाचा आकडा सांगितला होता. हे फार महत्त्वाचं आहे.

महाराष्ट्र हे शेतकरी आंदोलनांचे अग्रेसर राज्य आहे. तसं कुठलं एखादं छोटं राज्य, बिहार ओरिसासारखं आकड्यामध्ये कमी पडलं तर चालेल, पण महाराष्ट्रातच आकड्यात कमी पडलं तर कसं काय भागल हो? मीठाचा मिठपणा कमी झाला तर त्याला कशानं खारट करायचं? महाराष्ट्राचा दहा लाख आकडा दिला तर त्याच्यावरून एकसुद्धा कमी होता कामा नये. झालेच तर पंधरा लाख झाले तरी चालतील. काम काही कठीण नाही. पाच लाख लोकांनी अर्ज भरले. दहा लाख अर्ज भरल्याखेरीज तुम्हाला यश मिळवून देण्याची गॅरंटी मी दिलेली नाही. हे लक्षात ठेवा!

आपल्या घरी काही वेळा कार्ड येतात की नाही? वर लिहिलेलं असतं. जय संतोषी माँ प्रसन्न! वगैरे. आणि खाली लिहिलेलं असतं. हे कार्ड पोचताच आणखी सात लोकांना किंवा दहा लोकांना अशीच कार्ड लिहून पाठवा. नाहीतर तुमच्या पोराला काही आजार होईल. असं असतं की नाही कार्ड? तसंच आज तुमच्या घरी कार्ड आलं आहे असं समजा. की निदान दोन माणसांचे कर्जमुक्ती अर्ज त्याला पटवून भरून घेतले नाही तर तुमची कर्जातून मुक्तता होण्याची शक्यता नाही. ताबडतोब कामाला लागा, एक मेच्या आधी महाराष्ट्रातील कर्जमुक्तीच्या अर्जांची संख्या दहा लाख झाली पाहिजे.

आणि मग एवढी तयारी झाल्यानंतर आपण बळिराजाच्या पुनरुत्थानाच्या अखेरच्या लढाई करिता तयार होऊ. निवडणुकीत एक गोष्ट महत्त्वाची आहे. खरं म्हणजे मला खूपच आनंद झाला. अधिवेशनामध्ये एकामागोमाग एका कार्यकर्त्यानं काय सांगितले? या राजकारणाच्या चिखलामध्ये आम्हाला फार लडबडायला लावू नका. राज्यकर्ते! कशाला त्यांच्या स्तुत्या करायच्या? गेली बेचाळीस वर्षे यांनी शेतकऱ्यांना लुटलं आणि विरोधी पक्ष? असे कोणते शहाणे लागून गेले? असा कोणता विरोधी पक्ष आहे की ज्याने शेतकरी संघटनेला दुगाण्या झाडल्या नाहीत. असा कोणातच नाही. भारतीय जनता पार्टी शेतकरी संघटनेची कॉपी करून शेतकरी आंदोलनात फूट पाडायला पाहते. राजाराम बापूपासून ते पी.के.अण्णा पाटलापर्यंत आणि मृणाल गोऱ्यांपर्यंत सगळयांनी शेतकरी आंदोलनाला कधीना कधी विरोध केलेला आहे. शेतकरी कामगार पक्ष तर जाणून बुजून शेतकरी संघटनेला शत्रू नंबर एक म्हणतो. अधिवेशनातील

कार्यकर्त्यांनी म्हटलं, ''शरदराव, कृपा करा आणि आम्हाला विरोधी पक्षांचा प्रचार करण्याकरिता थकवू नका, दुसरं काही सांगा.'' ठीक आहे म्हटलं. शक्यतो तुम्हाला थकवणार नाही, कारण मला असं दिसतंय १९८९-९० ची लढाई कोणी जिंको कोणी हरो शेतकरी संघटनेने ही लढाई आधीच जिंकलेली आहे.

सगळी वर्तमानपत्रं म्हणतात की, बहुतेक लोकसभेच्या जागा २८०-२६० अशा वाटल्या जातील. २८०-२६० म्हणजे काय हो? मग आता आपण सुरक्षित झालो. एकाच्या हाती चारशे जागा गेल्या, तर मग आपण धोक्यात आहोत. २८०-२६० वाटपात सामान्य, सज्जन, चांगला प्रामाणिक मनुष्य जगू शकतो. तेव्हा आपण जिंकलेलोच आहोत. पण लढायचं झालं तर काय करायचं? मलाही असं वाटतं, या विरोधी पक्ष आणि त्यांची ती रोजची भांडणं! आणि दिल्लीवरनं कोण काय बोलतो? आणि मद्रासमधनं कोण काय बोलतो? यांच्याकरिता धावायला खरंच माझंसुद्धा-मी लाऊडस्पिकर समोर उभा राहिलो तरीसुद्धा माझ्यातोंडातनं त्यांच्याकरिता भाषण करायला शब्द फुटायचा नाही.

त्यांच्यापेक्षा कार्यकर्त्यांनी सुचवलं ते असं. आपण जिल्हा परिषदेला ठरवलंच होतं की नाही, की महिला आघाडींनी आपलं शंभर टक्के महिलांचे पॅनेल उभं करावं आणि ते काम किती कठीण होतं? जवळपास दोन हजार उमेदवार शोधून काढायचे होते. हे काम तर फार सोपं. या अधिवेशनानं महिला आघाडीला विनंती केली की, तुम्ही काहीतरी करा. या विरोधकांकरिता धावण्यापेक्षा आमच्या आया-बहिणींनी जर ठरवलं तर, निरक्षर असू द्या, अंगठे बहाद्दर असू द्या पण निदान डांबरट तर नाही ना त्या? तुम्ही ज्या कोणत्या माय-बहिणीला उभं कराल त्यांच्याकरिता धावायचं म्हटलं तर आम्हाला निदान वाईट तर वाटणार नाही. समग्र महिला आघाडीला शेतकरी संघटनेने, विनंती केली, की तुम्ही ग्रामीण भागातल्या तेहतीस जागा लढवता का पाहा? त्यांनी जर का हो म्हटलं तर, मी आजच तुमच्या सगळयांच्या वतीने समग्र महिला आघाडीला शब्द देतो, की त्यांनी जर असा निर्णय घेतला तर, शेतकरी संघटनेचा प्रत्येक कार्यकर्ता महिला आघाडीच्या उमेदवारांना पाठिंबा देण्याकरिता जिवाचे रान करेल!

बस. अधिवेशनाचे हे निर्णय आहेत. ही लढाई आहे. या लढाईतली एक एक चाल तुम्हाला मी सांगितली. गावावर बिल्ला आणि जातीयवाद्याला दूर ठेवणं आणि पाटी लावणं, ही महत्त्वाची गोष्ट आहे. भ्रष्टाचारविरोधी आंदोलन पाडव्याला चालू करणं महत्त्वाची गोष्ट आहे. पुढाऱ्याला आणि जातीयवाद्याला चिमटा लावणारे हातभट्टी किंवा दारूचा गुत्ता आणि मटक्याचा अड्डा बंद करणे

हे महत्त्वाचे काम आहे आणि त्याच्यानंतर निवडणूक धोरणाबाबत शेतकरी संघटनेचा जो काही आदेश येईल त्याचे पालन करणे. तो आदेश मी काही देणार नाही. तो आदेश देण्याकरिता रामचंद्र बापू पाटील, भास्करराव बोरावके आणि विजय जावंधिया यांची समिती नेमली आहे. यांना आम्ही सांगितले की पुन्हा आम्हाला घाणीमध्ये पाठवू नका. काहीतरी जे काम करताना आनंद वाटेल असं करा. हे या अधिवेशनाचे निर्णय आहेत.

*शेतकरी संघटना तिसरे अधिवेशन नांदेड १२ मार्च १९८९.*

*(शेतकरी संघटक २१ मार्च १९८९)*

■■

# अंगाराने कार्य केले आता ज्योत हवी

तेरा चौदा वर्षांपूर्वी आंबेठाणच्या  या अंगारमळ्यामध्ये मी शेतीचा हा प्रयोग चालू केला. या प्रयोगातून अशी काही संघटना तयार होईल, असं काही आंदोलन उभं राहिल अशी अपेक्षाही नव्हती. जगातील सगळ्या देशांमध्ये जे जे शेतीवर जगत राहतात ते ते गरीब होत जातात आणि शेती सोडून जे जे बाहेर निघतात त्यांची परिस्थिती सुधारत जाते हे काय गौडबंगाल आहे, हे काय गूढ आहे हे समजण्याकरिता आंबेठाणचा प्रयोग चालू झाला. त्यानंतरचा तेरा चौदा वर्षांचा इतिहास सगळ्यांना माहीतच आहे.

पण मागं वळून पाहता मला असं वाटतं, की गेल्या तेरा चौदा वर्षांमध्ये मी फार भाग्यशाली राहिलो आहे. व्यक्तिगत पातळीवर खासगी आयुष्यात तसेच संघटनेच्या आंदोलनामध्ये अनेक दुःखदायक गोष्टी घडल्या आहेत, कित्येक सहकारी रागावले, कित्येक नाराज झाले आणि त्याच्या उलट गोळीबारामध्ये ज्यांच्या घरची कर्ती माणसंसुद्धा निघून गेली. त्या घरच्या माणसांनीसुद्धा एका शब्दानं कुठं राग, दुःख व्यक्त न करता प्रेम आणि सहानुभूती व्यक्त केली. असे चित्रविचित्र अनुभव गेल्या या तेरा चौदा वर्षांत मला आलेले आहेत; पण माझा जो काही 'खर्च' झाला तो केव्हाच, पहिल्या दोन वर्षांतच 'भरून' निघाला.

आंदोलन सुरू झाल्यानंतर दोन वर्षांनी मला कुणीतरी विचारलं होतं की आता या पुढचा तुमचा कार्यक्रम काय? त्यावेळी मी म्हटलं होतं की, ''हे आंदोलन किंवा ही संघटना चालू होताना मला असं करण्याकरता दहाएक वर्ष लागतील; पण दोनएक वर्षांमध्येच महाराष्ट्रामध्ये संघटना तयार झाली. गावोगाव संघटना गेली नसेल, सगळ्या तालुक्यांत गेली नसेल; पण संघटनेचा विचार महाराष्ट्रभर गेला; मला या प्रयोगातून आयुष्यात जे काही मिळवायचं होते ते मिळून गेलं. आता याच्यापुढे जे काही मिळवायचं आहे ते केवळ 'बोनस' म्हणून मिळणार आहे. माझा जो काही 'खर्च' झाला होता तो केव्हाच, दोन वर्षातच 'भरून'

निघाला."

त्याही पलीकडे जाऊन मला एका गोष्टीची फार धन्यता वाटते. १९८० मध्ये शेतकरी आंदोलनाचं वातावरण तयार झालं होतं. ही गोष्ट खरी. उत्पादन वाढवल्यानंसुद्धा तोटाच होतो. अशी परिस्थिती त्यावेळी निर्माण झाली. शेतकरी उठावाची अशी आर्थिक व राजकीय परिस्थिती देशात तयार झाली होती. या परिस्थितीत शेतकऱ्यांचं नेतृत्व कुणाकडं जाईल, संभाव्य शेतकरी आंदोलनाचं नेतृत्व कुणाकडे जाईल, असा जर प्रश्न विचारला गेला असता तर अशा व्यक्तीच्या अंगी असाव्या लागणाऱ्या गुणांची यादी कशी झाली असती? शेतकरी पाहिजे, शेतकऱ्याचा मुलगा पाहिजे, शेतीचा अनुभव पाहिजे, चांगलं मराठी बोलणारा पाहिजे, अमक्या जातीचा पाहिजे..., अशी जी यादी झाली असती त्या यादीत जे जे काही गुण घातले गेले असते त्यातला एकही गुण नसलेला मी. त्या माझ्या डोक्यावर ही जबाबदारी आली आणि ती निभावत असता शेतकऱ्यांनी मला अफाट प्रेम दिलं याबद्दल मला धन्यता वाटते.

त्याहूनही जास्त धन्य धन्य जर मला कधी वाटत असेल तर हा विचार करताना की शेतकऱ्यांचं तर आंदोलन उभं राहिलं, संघटना राहिली; पण त्याचबरोबर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातल्या स्त्रियांमध्ये जी काही जागृती शेतकरी संघटनेच्या निमित्ताने आज घडून आली त्याला माझाही थोडाफार हातभार लागला.

यातून हाती काय आलं? शेतीमालाला भाव आला? नाही. शेतीमालाचा भाव म्हणजे काही घरी यायचा मिठाईचा डबा नाही ! उद्या समजा शेतीमालाचा भाव घरी आला तरी तो विनासायास कायमचाच आपल्याला मिळत राहील अशी परिस्थिती कधीही येणार नाही. डोळ्यात तेल घालून सतत जागरुक राहाणं ही स्वातंत्र्याची किमत आहे. ETERNAL VIGILENCE IS THE PRICE OF FREEDOM. जर तुम्ही असं म्हणालात की आता मी स्वतंत्र झालो, आता थोडा आराम करतो तर दुसऱ्या क्षणाला तुमच्या हातातलं स्वातंत्र्य निघून जाईल. शेतीमालाचा भाव ही काही फक्त एकदाच साध्य करायची गोष्ट नाही. शेतीमालाचा भाव हा शेतकरी स्वतंत्र असल्याचा फक्त झेंडा आहे. तो झेंडा तुम्हाला सांभाळायचा असेल तर आज शेतीमालाचा भाव मिळाला म्हणून जर तुम्ही झोपी गेलात तर तो दुसऱ्या क्षणाला तुमच्या हातून गेल्याशिवाय राहणार नाही. म्हणून सतत जागरुकता ठेवणं हे आवश्यक आहे.

शेतीमालाला रास्त भाव मिळाला तरी शेतकरी आंदोलनामुळे शेतकऱ्यांच्या खिशात किती रुपये जास्त आले याचा हिशोब होईल तेव्हा होवो; पण केवळ कर्जमुक्तीच्या निमित्तानेसुद्धा, आपण कितीही म्हटलं की ही कर्जमुक्ती अपुरी

आहे, ज्यांना फायदा मिळाला पाहिजे होता त्यांना मिळाला नाही तरी सगळ्या देशातील शेतकऱ्यांकरिता जवळजवळ ४,००० कोटी रुपयांची कर्जमुक्ती जाहीर करण्यात आली, ही सत्यस्थिती आहे आणि एवढी मोठी मागणी मान्य झाल्याचं, जगातील हे पहिलं उदाहरण असावं; पण किती हजार कोटी रुपये मिळाले याचा हिशोब करून या चळवळीचं मोजमाप होणार नाही. शेतकऱ्यांची एक संघटना तयार झाली आणि त्या संघटनेमुळे शेतकऱ्यांना आपल्या विशिष्ट दुखण्याची जाणीव झाली. आपलं दु:खं कशातून उद्‌भवतात यासंबंधी काही अंदाज आला एवढंच नव्हे तर जाती, धर्म अशा सर्व हीन कल्पना, क्षुद्र कल्पना बाजूला टाकून शेतकऱ्यांची मुलं एकत्र येऊ लागली ही माझ्या दृष्टीनं हजारो कोटी रुपयांहून फार मोठी गोष्ट आहे; उदाहरणार्थ, या प्रशिक्षण शिबिरातसुद्धा तुम्ही काय शिकलात, तुम्हाला काय समजलं, काय नाही यापेक्षाही वेगवेगळ्या तालुक्या-जिल्ह्यातली माणसं केवळ शेतकऱ्यांच्या कामाकरता एकत्र येतात, एकत्र बसतात ही गोष्टच मुळामध्ये फार मोठी गोष्ट आहे; पूर्वी कधी घडली नाही अशी आहे. केवळ शेतकरी संघटनेने घडवून आणलेली ही गोष्ट आहे.

एकदा प्रश्न समजला की त्याचं उत्तर मिळवणं फारसं कठीण नसतं. प्रश्नच समजला नाही तर काय उत्तर द्यायचं. या गोंधळात काहीतरी गिचमिड लिहिलं जातं. ''हिंदुस्थानला स्वातंत्र्य पाहिजे.'' ही कल्पना केव्हा मान्य झाली? १९३० सालापर्यंत ब्रिटिश साम्राज्यातच राहून बादशहाच्या अंमलाखालीच 'स्वसत्ताक स्थान'(DOMINIAN STATUS) मिळवावं अशी कल्पना होती. संपूर्ण स्वातंत्र्याची कल्पना १९३० मध्ये मान्य झाली आणि त्यानंतर अवघ्या १७ वर्षांत स्वातंत्र्य मिळालं. त्याचप्रमाणं १० वर्षांपूर्वी शेतकऱ्यांचा एक विषय आपण मांडला, ज्यावेळे आधी त्या विषयाला मान्यता नव्हती त्यावेळी मांडला आणि आज दहा वर्षांनंतर त्या विषयाला आणि त्या अनुषंगाने मांडलेल्या विचारसरणीला देशभर मान्यता मिळाली ही काही लहानसहान गोष्ट नाही; पण म्हणून, दहा वर्षांमध्ये यशस्वी झालेल्या या कार्यक्रमाबद्दल निर्माण झालेल्या श्रद्धेमुळे यापुढेसुद्धा तोच कार्यक्रम एखाद्या रूढीप्रमाणे आपण पाळत जायचं आहे असं म्हटलं तर 'शेतकरी संघटने'ला मोठा धोका निर्माण होतो. महात्मा गांधीइतका कार्यक्रमात क्रांतिकारी असलेला दुसरा कुणी मनुष्य नाही; पण स्वातंत्र्य आल्यानंतर गांधीवादाचा नवा अर्थ काय हे समजण्याची कुवत नसलेले शिष्य मिळाल्यामुळे त्यांचे ते शिष्य पंचा नेसण्यामध्ये आणि चरखा फिरवण्यामध्येच धन्यता मानू लागले आणि तिथंच महात्माजींचा पराभव झाला.

आपण प्रत्येकवेळी स्वच्छ, नवा, ताजा टवटवीत विचार केला हे शेतकरी

संघटनेचे आजपर्यंतचे वैशिष्ट्य आहे, वैभव आहे. परवा असं असं केलं होतं. म्हणून आजही आपण तसंच केलं पहिजे. असं आपण कधी मानलं नाही. प्रशिक्षण असो, शेतकरी संघटक असो, कार्यक्रम असोत ही सगळी साधनं आहेत; मुळातली उद्दिष्टं वेगळी आहेत. आता काय करावं समजत नाही म्हणून जर का आपण कालपरवाप्रमाणेच "चरखे फिरवत सूत कातत" राहिलो तर त्यामुळे संघटनेच्या दहा वर्षांच्या कीर्तीलासुद्धा धक्का लागण्याची शक्यता आहे.

सतत जागृती, सतत सतर्कता हा शेतकरी संघटनेच्या कार्यपद्धतीमधील आत्मा आहे. संघटनेच्या सटाणा अधिवेशनात आंदोलन पुढं कसं जातं हे स्पष्ट करण्यासाठी मी एक उदाहरण दिलं होतं. डोंगराचा एखादा कडा किंवा कपार चढताना दोन हात आणि दोन पाय या चार अवयवांपैकी तीन पक्के रोवून ठेवायचे आणि चौथ्या अवयवाने, मग तो हात असो, पाय असो, थोडं अजून पुढं जाता येईल अशी एखादी जागा पकडायला मिळते आहे का हे शोधत राहावे लागते. अशी जागा सापडली म्हणजे तेवढंच वर चढून जायचं. पुन्हा दोन हात, दोन पाय यापैकी तीन गोष्टी पक्क्या रोवून चौथ्या अवयवाने आणखी वर जाता येईल अशा जागेचा शोध घेत राहायचे. आंदोलनाची पद्धतीही तशीच असायला हवी अशी मांडणी मी त्यावेळी केली आणि अशी कपार चढत चढत गेल्या दहा वर्षांत आपण बरंच वर चढून आलो आहोत.

मला वाटतं शेतकऱ्यांच्या समस्येबाबत ज्याला चमत्कार म्हणावं असं काम करण्यात आपण यशस्वी झालो आहोत; पण चमत्कार करून दाखवला आहे असे म्हणून जर का आपण पुढच्या प्रश्नांकडे स्वच्छ, ताजा टवटवीत विचार न करता, गेली दहा वर्षे चांगलं चाललं म्हणून पुढेही दहा वर्षे तोच कार्यक्रम आखून घेतला तर या कड्यावरून कोसळण्याचा फार मोठा धोका आहे. हल्ली शिबिरांमध्ये मी फार कमी वेळ बोलतो, बोललो, तरी फक्त प्रश्नच उभे करतो.

तेरा वर्षांपूर्वी याच जागी, याच अंगारमळयामध्ये अशाच तऱ्हेच्या परिस्थितीमध्ये एक पहाड चढून आल्यानंतर दुसरा पहाड चढण्यापूर्वी नकाशा करण्याच्या कामाची मी सुरुवात केली होती. त्यावेळी जमेची एक चांगली गोष्ट होती, की स्वित्झर्लंडमधलं माझं जे काही काम होतं त्याचे सगळे पूल तोडून, त्याच्याशी काहीही संबंध न ठेवता अगदी मोकळेपणाने, स्वतंत्रपणाने इथल्या प्रयोगाला मी सुरुवात केली. त्यावेळी चिंता एकच होती. ती म्हणजे ग्रामीण भागचे प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न आपल्याला समजले आहेत असं म्हणणारी जी काही हजार दोन हजार माणसं या देशात फिरत होती त्यांच्यापासून स्वतःचं संरक्षण करणे

आणि आंबेठाणच्या अंगारमळयात जो काही प्रथमपुरुषी अनुभव येईल त्याच अनुभवापासून शिकणे. दुसऱ्यांच्या अनुभवांच्या आणि विचारांच्या काजळीने आपला विचार मलिन होऊ नये याची काळजी मला घ्यायची होती. ग्रामीण भागाचा प्रश्न आपल्याला संपूर्ण समजला अशी खात्री असलेली बरीच माणसं इतर शहराप्रमाणे पुण्यातही बरीच होती. त्यांच्यापासून दूर राहाणे एवढीच मुख्य काळजी त्यावेळी मला घ्यावी लागत होती.

यावेळी परिस्थिती बरीच वेगळी आहे. यावेळी शेतकरी संघटना आणि तिचं गेल्या दहा वर्षांचं आंदोलन, तिचं दहा वर्षांचं यश यांचं गाठोडं घेऊन पुढची कपार, पुढचा पहाड मी चढायला निघालो आहे. शेतकरी संघटना पूर्णपणे बाजूला ठेवणे तर शक्य नाही. एकीकडे संघटनेची फौज वेगवेगळया संकटामधून, जातीवाद्यांच्या हल्ल्यामधून शक्य तितकी सांभाळून ठेवायची आहे. आज आपण जातीयवाद्यांचा हल्ला परतवून लावू शकलो म्हणून जर त्याच जागी बसून राहिलो तर उद्या, परवा, त्यानंतरच्या एका दिवशी कोणत्या ना कोणत्या हल्ल्यात संघटना नामशेष होईल यात काही शंका नाही. कारण संघटना काय किंवा माणूस काय 'चालता फक्त भला.' जोपर्यंत तुम्ही पुढे जाता तोपर्यंत तुम्ही टिकून राहू शकता. एका जागीच उभं राहून जे काही पूर्वी करत होतो तेच करत राहिलो तर संपून जाऊ. थांबला तो संपला.

शेतकरी आंदोलनाची पुढील वाटचाल सुरू करायची तर नवीन मार्ग कोणता असावा हा प्रश्न सोडवायला घेताना मला असं वाटतं की तेरा चौदा वर्षांनंतर पुन्हा एकदा मी 'अंगारमळया'च्या अवस्थेत आलो आहे. गेल्या तेरा चौदा वर्षांत सर्वांना सांगितलेली, व्याख्यानांत मांडलेली, पुस्तकांत लिहिलेली अशी कोणतीच उत्तरं मी मानत नाही. त्या सगळया पुस्तकांवर, विचारांवर काट मारून दहा वर्षांनंतर बदललेल्या परिस्थितीत त्यांची आणखी व्यापक उत्तरं शोधण्याच्या प्रयत्नात मी आहे. अंगारमळयाचा प्रयोग सुरू करताना त्याकाळी जसं मी ग्रामीण भागाच्या तज्ज्ञांना भेटलो नाही तसंच नवीन विचारांचा मार्ग तयार करताना जुन्या विचारांच्या पठडीशी एका ठराविक मर्यादेपलीकडे संबंध ठेवणे शक्य नाही. एक मोठं शिल्प तयार करायचं आहे, पुनः पुन्हा जर का छोट्या छोट्या शाडूच्या मूर्तींना हात लावू लागलो तर त्या महाशिल्पामध्येसुद्धा या छोट्या छोट्या मूर्तींच्या ठराविकच रेखा यायला लागतील. हा धोका टाळण्याची आवश्यकता आहे.

नवीन प्रश्न काय आहे? आजपर्यंत आपण स्वतःला अर्थवादी आंदोलन म्हटलं; पण अर्थवादी आंदोलनाचं ध्येय आणि अर्थवादी आंदोलनाची साधनं

यांच्यामध्ये एक संघर्ष होता. आपण म्हटलं अर्थवादी आंदोलनन पण आमच्या कार्यकर्त्यांनी मात्र केवळ नि:स्वार्थ भावनेने घरादारावर निखारे ठेवून बाहेर पडावं आणि केवळ त्यागातून शेतकरी संघटना तयार करावी असा अर्थवादाशी विसंगत असलेला कार्यक्रम आपण घेतला. जे अर्थवादी नव्हते ते काम उभं राहण्याकरता कार्यकर्त्याला मूठभर धान्याची गरज असते हे मानत होते आणि त्या कार्यकर्त्यांची सोय करत होते. आम्ही अन्नमूलाधाराचं तत्त्वज्ञान मांडत होतो; पण कार्यकर्त्यांनी मात्र अन्नमूलाधारसुद्धा न ठेवता संघटनेच्या कामाला लागावं अशी काहीतरी एक अपेक्षा ठेवली होती. हा संघर्ष कशा तऱ्हेने सोडवता येईल हे मला आज स्पष्ट दिसत आहे. सोडवणं आवश्यक आहे. आजचा नवीन प्रश्न हा आहे.

गेली दहा वर्षे हा संघर्ष आवश्यक होता हेही मी मानतो. पहिली ठिणगी पाडायची असेल तर गारगोटीच्या घासण्याची आवश्यकता असतेच. एक नवीन विचार मांडायचा होता तेव्हा गारगोटीच्या घासण्याची अशी आवश्यकता होतीच; पण गारगोटीच्या घासण्यातूनच कायमची अशी एक ज्योत तयार होईल अशी अपेक्षा ठेवणंसुद्धा चुकीचं आहे. ठिणगी पाडायचं काम झालं आता वातीचं आणि तेलाचं काम आवश्यक झालेलं आहे. यावेळी पुन्हा गारगोट्या घासून भागायचं नाही. त्याकरिता आता नवीन दिवा तयार करण्याची आवश्यकता आहे आणि तो कसा बनवायचा हा आपल्यापुढचा महत्त्वाचा प्रश्न आहे.

निराशा माझीही झाली आहे. चारपाच वर्षे क्षुद्रवाद विरुद्ध अर्थवाद ही भूमिका मांडत असताना आपण जातीयवादाचा प्रतिकार, त्याला विरोध प्रखरपणे करू शकलो असतो असं वाटत होतं; पण ते शक्य झालं नाही; पण गेल्या ५५ वर्षांच्या आयुष्यात मी आणखी एक गोष्ट शिकलो की जेव्हा आपली निराशा होते, जेव्हा जेव्हा आपण हरतो आणि आपल्याला अपयश येतं तेव्हा तेव्हा तेच अपयश, ती निराशा त्याच्या पुढच्या फार मोठ्या यशाची पायरी ठरते. हे काही केवळ भाषालंकार म्हणून वापरायचं विधान नाही. ज्याला, अपयश का मिळालं याची परीक्षा करून बघण्याची ताकद आहे त्या माणसाच्या बाबतीत अपयश हे त्याला मिळालेलं वरदान आहे.

आणि तसं मांडलं तर शेवटच्या क्रांत्या, शेवटचा बदल, शेतीमालाला भाव मिळवून घेणे, शेतकरी मनुष्य म्हणून जगू शकणं, त्याला स्वातंत्र्य मिळणं इतका मोठा बदल ज्या उत्पातांतून घडून आला ते उत्पात कोणीही ठरविलेल्या आराखड्यांप्रमाणे कधीही झाले नाहीत. भांडवलशाहीवरचा हल्ला हा ज्या देशांत भांडवलशाही प्रगत झाली होती. त्या देशात म्हणजे जर्मनी किंवा इंग्लंडमध्ये

होईल अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात मार्क्सवादी म्हणवली गेलेली क्रांती झाली रशियामध्ये आणि तीही काही, कामगारांनी उठून केली असं नाही. पहिल्या महायुद्धात रशियाला माघार घ्यावी लागली, पगारसुद्धा दिले न गेल्याने रशियन सैन्याची परिस्थिती अतिशय वाईट झाली असे पगारसुद्धा न मिळालेले सैनिक जेव्हा मॉस्कोमध्ये आले तेव्हा त्यांनी केलेल्या उठावातून तथाकथित मार्क्सवादी क्रांतीचा उगम झाला. सन् यत् सेन नंतर चीनमध्ये कम्युनिस्ट पक्षाने अनेक वर्षे क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला; पण जेव्हा जपानने चीनवर हल्ला केला त्यावेळी सगळी कम्युनिस्ट चळवळ थांबवून माओत्सेतुंगने राष्ट्रीय मध्यप्रवाहाबरोबर राहून जपान्यांविरुद्ध लढण्याची भूमिका घेतली. जपान्यांनी केलेल्या या हल्ल्यातून चिनी क्रांतीचा पाया घातला गेला.

क्रांती ही काही सरळ येत नाही. ती आकाशातून पडणाऱ्या विजेसारखी लवलवत वेड्यावाकड्या मार्गाने येत असते. आज देशामध्ये काश्मीरमध्ये काय घडते आहे, पंजाबमध्ये काय होते आहे याची आपल्याला विवंचना लागलेली आहे; देशातल्या देशात जातीजातींमध्ये जी काही भांडणं लागली आहेत त्यामुळे देश फुटतो का तुटतो अशी चिंता लागून राहिली आहे. अशा या अत्यंत निराशेच्या क्षणी एक शक्यता आहे, की शेतकरीक्रांतीची सगळ्यात मोठी संधी आपल्यापुढे येईल. ही संधी कोणत्या मार्गाने येईल, आजच्या या उत्पातांतून येईल की आणखी काही दुसरे उत्पात आपल्याला सहन करावे लागतील. कितीवेळा निराशा सहन करावी लागेल आणि किती वेळा अडचणींतून मार्ग काढून पुढे जावे लागेल हे काही सांगता येणार नाही.

पण जेव्हा उत्पादकांकडून त्यांनी तयार केलेल्या बचती हिरावून घेतल्या जाणार नाहीत आणि निसर्गामधला विकासाचा जो काही क्रम आहे तो उलटवला न जाता त्या निसर्गक्रमाप्रमाणे माणसाला माणूस म्हणून जगता येईल तेव्हाच इतिहासामध्ये जीवनशास्त्रीय उत्क्रांतीचा आणि सामाजिक उत्क्रांतीचा थोपवला गेलेला प्रवाह पुन्हा मोकळेपणाने चालू होईल. या कामात आपला सगळ्यांचा हातभार लागलेला असेल आणि हा प्रवाह मोकळा होईल तेव्हा आपण सगळे कार्यकर्ते हजर असू अशी आशा करूया.

*(कृषी अर्थप्रबोधिनी प्रशिक्षण शिबीर ३ सप्टेबर १९९०)*

*(शेतकरी संघटक २१ सप्टेंबर १९९०)*

■■

# आता हवी नवी हत्यारे आणि नवी व्यूहरचना

शेतकरी संघटनेच्या दशकाहून अधिक कालावधीच्या वाटचालीनंतर आता, देशात घडून आलेले परिस्थितीतील बदल लक्षात घेता संघटनेच्या पुढील कार्यक्रमांची आखणी करण्याच्या व आंदोलनाची दिशा ठरविण्याच्या या घटकेला उच्चाधिकार समितीने श्री. किशोर माथनकर यांची शेतकरी संघटनेचे अध्यक्ष तर सौ. सुमनताई अग्रवाल यांची शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आणि आळंदी येथे झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत सर्वानुमते त्या नियुक्तीवर शिक्कामोर्तब झाले. बदललेल्या परिस्थितीत या दोन्ही अध्यक्षांवर काय जबाबदाऱ्या आहेत?

पहिली गोष्ट म्हणजे यापुढे शेतकरी संघटनेचा अध्यक्ष मी किंवा उच्चाधिकार समिती ठरविणार नाही. किशोर हा उच्चाधिकार समितीने नियुक्त केलेला आणि नंतर सर्वानुमते मान्य झालेला असा शेवटचा अध्यक्ष हा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी निवडून दिलेला असावा. त्या निवडणुका कशा व्हाव्यात, गावपातळीवर त्यांची पद्धती काय असावी, तालुका पातळीवर याकरिता काहीएक योजना ठरवायची आहे, गावोगाव संघटना तयार करायची आहे, या निवडणुका घडवून आणायच्या आहेत आणि अशा तऱ्हेने निवडून आलेला अध्यक्ष अध्यक्षपदी बसल्यानंतरच किशोरची या कामातून सुटका होणार आहे. एवढी बांधणी करणे हे किशोर आणि सुमनताईंचे किमान काम आहे.

**शेतकरी आंदोलनापुढील आव्हाने**

यापलीकडे काय परिस्थिती त्यांच्यासमोर उभी राहणार आहे? सांगणं कठीण आहे. तीन महिन्यांपूर्वी विदर्भामध्ये जागोजाग असे महापूर येऊन गेले की एकेका गावातली किती माणसं वाहून गेली त्याचा हिशोब अजून लागलेला नाही आणि त्या महापुराच्या चिखलाचा वास अजून नाकात आहे. तेवढ्यातच दुष्काळाची सावली या विदर्भावर पुन्हा पडायला लागली आहे. नेमकं काय होणार आहे?

कपाशीचं काय होणार? ज्वारीचं काय होणार आहे? सोयाबीनचं काय झालं? सूर्यफुलाचं काय होत आहे? आज तरी चित्र काही स्पष्ट नाही. सगळीकडेच थोडा अंधार आहे. आपल्या डोळ्यासमोर असलेल्या अशा या तातडीच्या गोष्टी. त्याच्या पलीकडे, अख्ख्या महाराष्ट्रात काय घडत आहे, दिल्लीला काय घडत आहे, कसलं सरकार आलं आहे, त्याची नीती काय असणार आहे, हे अंदाजपत्रक काय झालं आहे, औद्योगिक धोरण काय झाले, काय चाललं आहे काय? सध्याची वर्तमानपत्रातली सगळी भाषाच मुळी गेल्या दोन वर्षांपूर्वीच्या भाषेपेक्षा अगदी वेगळी आहे. परिस्थिती काय आहे हे समजल्याखेरीज पुढचं पाऊलसुद्धा टाकणं मोठं कठीण झालं आहे. चांगल्या म्हणवणाऱ्या कार्यकर्त्यांच्यासुद्धा मनामध्ये काही शंका निर्माण व्हाव्या अशी परिस्थिती आहे. जनता दलाचा एक कार्यक्रम ठरलेला आहे की, २७ सप्टेंबरला ते दिल्लीच्या बोटक्लबवर शेतकऱ्यांचा एक मोठा मेळावा भरवणार आहेत आणि त्या मेळाव्यामध्ये खतांच्या वाढलेल्या किमतींचा निषेध करून त्याबद्दल काही आंदोलनाचा कार्यक्रम कदाचित जाहीर होण्याची शक्यता आहे. महेंद्रसिंह टिकैत यांच्या नेतृत्वाखाली जी भारतीय किसान युनियन तयार झाली आहे तिची बैठक १५ सप्टेंबर रोजी दिल्लीला झाली. कर्नाटकाचे नेते नंजुंडस्वामी यांच्या प्रस्तावाप्रमाणे असं ठरलं की भारतात शेतकरी संघटना कोणती असेल ती ती एकच आणि ती म्हणजे भारतीय किसान युनियन; त्यांचा झेंडा एकच, तो म्हणजे भाकियूचा आहे तो आणि सगळ्या शेतकऱ्यांचा नेता कुणी असेल तर ते महेंद्रसिंह टिकैत. भाकियूचा पहिला कार्यक्रम आहे २ ऑक्टोबर रोजी दिल्लीच्या बोटक्लबवर पुन्हा एकदा मेळावा भरविणे आणि पुन्हा एकदा वरखताच्या वाढलेल्या किमतींच्याविरुद्ध आंदोलन चालू करणे. म्हणजे ज्या प्रकारची आंदोलनं आपण गेले दशकभर केली त्याचप्रकारची आंदोलनं ही आता कोण करत आहे? इतके दिवस या प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये ज्यांनी कधी उत्साहाने भाग घेतला नाही, किंबहुना दृष्ट लागावी इतका सुंदर आणि भव्य किसान मेळावा दिल्लीला भरत असताना त्याला नतद्रष्टपणे अपशकून करण्याचं काम ज्यांनी केलं त्यांना आता बोटक्लबवर पुन्हा मेळावा भरवावेसे वाटू लागले आहे.

काय करायला पाहिजे, काय व्हायला पाहिजे? मला असं वाटतं की, काहीतरी आंदोलन केलं पाहिजे अशी मनाला आणि शरीराला सवय लागली म्हणून किंवा दुसरे काही सुचत नाही म्हणून तेच तेच करत उगाचच पुढे जायचं असं केल्यानं काही साध्य होत नाही. आपण महाराष्ट्रातले आहोत. आपली प्रसिद्धी गनीमी काव्याकरिता आहे. रणझुंझार योद्धे राजपूत यांना जे जमलं नाही ते महाराष्ट्रातल्या

डोंगरखोऱ्यातल्या मावळ्यांनी करून दाखवलं हा प्रत्यक्ष इतिहास आहे. कारण त्यांनी लढाईमध्ये नुसती तलवार वापरली नाही, तर तलवारीबरोबर आपली बुद्धी वापरली. आपण काय करायला निघालो होतो, कुठे आलो आहोत आणि यापुढे कोणत्या दिशेने जायचं आहे याचा थोडा स्पष्ट विचार करणं आवश्यक आहे आणि याकरिता मी दोन बैठकी बोलावल्या. एक १४/१५ ऑगस्ट १९९१ रोजी आंबेठाणला बोलावली. ती बैठक बोलावताना मी मुद्दाम म्हटलं, काही विषय-पत्रिका नाही; ही कार्यकारिणीची बैठकच नाही, तुम्ही नुसतं गप्पा मारायला या. कशाकरिता? नवीन विचार करताना मनावर कोणतीच चौकट नको. स्पष्टपणे, मोकळेपणे सगळ्यांना बोलता यावं म्हणून गप्पांची बैठक घेतली. त्याच्यानंतर, आळंदीला एक बैठक झाली आणि आजही काही चित्र फार स्पष्ट दिसत आहे असं नाही; पण जे काही थोडं दिसतं ते तुमच्यापुढे मांडणार आहे. एवढ्याकरिता की आजपर्यंतचा माझा अनुभव असा की जेव्हा जेव्हा शंका वाटली, जेव्हा जेव्हा अंधार दिसला, पुढे कसं जावं हे कळेनासं वाटलं त्या त्या वेळी शेतकरी आणि शेतकरी कार्यकर्ते यांच्यासमोर मी आलो आणि मला त्या प्रश्नांची उत्तरं आंबेठाणला खोलीत बसून किंवा पुस्तकात किंवा वर्तमानपत्रात मिळाली नाहीत, ती तुमच्या चेहऱ्यांवर आजपर्यंत प्रत्येकवेळी दिसली. तसंच उत्तर तुमच्या चेहऱ्यावर शोधण्यासाठी मी पुन्हा एकदा आलो आहे.

आळंदीला मी एक कार्यक्रम मांडला आणि तो कार्यक्रम मांडल्यानंतर सगळ्याच, माझ्या अगदी जवळच्या सहकाऱ्यांच्या चेहेऱ्यावरसुद्धा गोंधळ दिसला. त्यांच्या चेहऱ्यावर मला असं काही दिसलं की शरद जोशी पूर्वी काहीतरी वेगळं सांगत होते आणि आता काहीतरी वेगळं सांगायला लागलेले आहेत आणि मी जितका कसोशीने प्रयत्न केला होता तो पाहता, मला तर असं वाटत होतं, की गेल्या दहा वर्षांमध्ये मी एक कोणती फार मोठी चूक केली असेल तर ती ही की दहा वर्षांमध्ये एका शब्दानेही तर्कशास्त्र न सोडता, सुसंगतपणे मी कार्यक्रम मांडत आलो. हीच कदाचित चूक केली. या सगळ्या सार्वजनिक आयुष्यामध्ये इतकी सुसंगती ही समजायला कठीण जाते. राजीव गांधींनी एक दिवस म्हटलं की मला राजकारणात काहीही स्वारस्य नाही आणि त्याच्यानंतर दोन महिन्यांत ते राजकारणात आले, चार महिन्यांत पंतप्रधान झाले; कुणाला काही त्याच्यामध्ये काही चूक झाली असं वाटलं नाही. शरद पवारांनी मी कधी काँग्रेसमध्ये गेलो तर... काय वाटेल ते म्हटलं आणि एक दिवस ते काँग्रेसमध्ये गेले, फार काही बिघडलं, चुकलं असं काही कुणाला वाटलं नाही. उघड उघड शब्दांचा खेळ करून उलट वागणारी, स्वार्थाचंच तर्कशास्त्र करणारी मंडळी चालून गेली. त्याच्याबद्दल कुणी

काही चर्चा नाही केली; पण माझं दुर्भाग्य असं काही आहे की ८० मध्ये जे म्हटलं त्याच सुसंगतीनं मी आज ९१ सालचा कार्यक्रम मांडला तर लोकांच्या मनात किंवा माझ्याजवळच्या सहकाऱ्यांच्या मनामध्येसुद्धा अशी शंका निर्माण होते की मी आता काहीतरी बदललो, आता काहीतरी वेगळं सांगायला लागलो.

**शेतकरी आंदोलनाचा आढावा**

१९८० मध्ये किंवा खरं सांगायचं तर १९७८ मध्ये कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली गेली आणि कांद्याचा भाव चाकणच्या बाजारपेठेमध्ये एकदम ३४/३५ पैशांवरून १४/१५ पैशांवर येऊन पडला. निर्यातबंदी झाली. का? तर दिल्लीला कांद्याचा भाव १ रु. किलो झाला, म्हणजे कांदा फार महाग झाला. इतका महाग कांदा असताना कांद्याची निर्यात होता कामा नये म्हणून निर्यातबंदी झाली आणि शेतकरी आंदोलनाची ठिणगी पडली. त्यानंतर, कांद्याच्या आंदोलनानंतर, उसाचं आंदोलन झालं, निपाणीचं तंबाखूचं आंदोलन झालं, दुधाचं झालं, भाताचं झालं, कपाशीचं झालं, कर्जमुक्तीचं झालं. कितीक आंदोलनं झाली. कशाकरिता ही आंदोलनं केली? आपल्याला काय फक्त कांद्यांचा भाव मिळवायचा होता, का उसाचा भाव मिळवायचा होता, का कपाशीचा भाव मिळवायचा होता का कर्जमुक्ती मिळवायची होती?

त्यावेळी आपण मांडलेला विचार असा होता की 'सरकारचं धोरण असं आहे, की शेतीमालाला भाव मिळता कामा नये.' कारण, शेतकऱ्यांचं रक्त पिऊनच ही व्यवस्था वाढू शकते आणि मग एवढी कडेकोट व्यवस्था झालेली; ती व्यवस्था तोडायची कशी? शेतीमालाला भाव मिळणं याबाबतीत मी सुरुवातीला विदर्भात आलो होतो तेव्हा काय म्हटलं होतं? कापसाला भाव का मिळत नाही? कापसाचा उत्पादनखर्च कसा काढायचा हे दिल्लीत बसलेल्या माणसाला कळत नाही असं नाही. किंवा तुम्ही चांगला हिशोब काढून दिला म्हणून तो भाव आपोआप देईल असं नाही. कापसाचा खरा उत्पादनखर्च काय हे त्याला बरोबर समजतं. फक्त कापसाला उत्पादनखर्चाइतकासुद्धा भाव मिळता कामा नये, हे त्याचं धोरण आहे. कारण ही व्यवस्था त्यावर अवलंबून आहे.

आणि मग शेतीमालाला भाव मिळू नये याकरता सरकार काय काय करतं? माझ्या सगळ्या पुस्तकांमध्ये त्याची वेगळी वेगळी उदाहरणं मी दिली. सरकार बाहेरून महागात कापूस आयात करतं आणि देशात स्वस्तात विकून कापसाचा भाव पाडतं. कापसाची निर्यात होऊ देत नाही. साखरेवर लेव्ही लावतं, उसावर झोनबंदी लावतं, रुपयाची किंमत जास्त ठेवतं. ही सगळी जी जी काही साधनं आहेत ती ती मी माझ्या पुस्तकांत मांडली आहेत आणि ही सगळी हत्यारं घेऊन

शेतकऱ्यावर सरकार तुटून पडतं. हे धोरण कोणा एका पक्षाचं किंवा एका सरकारचं नव्हे, हे धोरण व्यवस्थेचं आहे. एका पक्षाचं सरकार काढून टाकून दुसऱ्या पक्षाचं सरकार आणल्याने काही होणार नाही. मग काय केलं पाहिजे? या कडेकोट बंदोबस्ताला फोडायचं असेल तर उपाय एकच आहे असं मी त्यावेळी सांगितलं, आजही ते तुम्ही 'शेतकरी संघटना विचार आणि कार्यपद्धती' या पुस्तकात वाचू शकता. काय करावं? काहीही करा, पण एक आठदहा शेतीमालाला दोन किंवा तीन वर्षे उत्पादनखर्चावर आधारित अगदी रास्त भाव न मिळाला तरी पण बऱ्यापैकी जरी भाव मिळाला तरी शेतकऱ्याची थांबण्याची ताकद वाढेल. इतकी वाढेल, की त्यामुळे तयार झालेला माल धावत घेऊन बाजारात जाण्याची त्याला आवश्यकता पडणार नाही आणि या किल्ल्याचा दरवाजा उघडला जाईल. एक एक लढा. आज कांद्यात काही मिळालं, उद्या उसात मिळालं, परवा कपाशीत मिळालं, काही भाव नाही मिळाला तरी निदान शेतकऱ्यांमध्ये जागृती झाली आणि एक दिवस असा उगवेल मी ज्यावेळी आपल्याला, शेतकऱ्यांना शेतामध्ये तयार झालेला माल धावत घेऊन बाजारात जाण्याची गरज पडणार नाही.

हे साध्य करण्याकरिता आपण कितीक हत्यारं वापरली. सत्याग्रहाचं हत्यार वापरलं, चाकणला आम्ही रास्ता रोको केलं, उपोषण केलं, नाशिकला रास्ता रोको केलं, रेल रोको केलं. अगदी नाशिकच्या ऊस आंदोलनातसुद्धा रस्त्यावर उतरण्याच्या आधी बांधावरचं आंदोलन झालं. शेतकऱ्यांनी कारखान्यात ऊस फक्त जाऊ द्यायचा नाही असं या आंदोलनाचं आर्थिक स्वरूप होतं; पण पावसाने डोळे वटारले, वीज मंडळाची अवकृपा झाली, ऊस वाळू लागला आणि शेतकऱ्यांची आर्थिक ताकद कमी पडली आणि मग रस्त्यावर जावं लागलं. दूध आंदोलनामध्येही असंच झालं. म्हटलं, इथं रस्ता अडवायचा नाही, रेल्वे अडवायची नाही– फक्त आर्थिक हत्यार वापरायचं. म्हणजे दूध पाठवायचं बंद करायचं. गांधींचं हत्यार सत्याग्रहाचं. त्यांच्याबरोबर शेतकऱ्यांचं हत्यार अन्न अडवायचं. आर्थिक आणि सत्याग्रहाचं अशी दोन हत्यारं आपण वापरत होतो. फक्त दुधाच्या आंदोलनामध्ये आपण पहिल्यांदा एक प्रयोग केला की फक्त आर्थिक हत्यार वापरायचं, सत्याग्रह वापरायचं नाही आणि परिणामी काय झालं? दूध आंदोलनात आपला पाडाव झाला. ते मी कबूल केलं आणि असं म्हटलं की शेतकऱ्यांची ताकद अजून केवळ आर्थिक हत्यारानं लढण्याइतकी झालेली नाही. आपण जर किमान ४० टक्के दूध थांबवू शकलो असतो तर जिंकलो असतो. आपण ३० टक्केच दूध थांबवू शकलो आणि हरलो. १९८४ मध्ये परभणीच्या अधिवेशनामध्ये पुन्हा एकदा आपण काही आर्थिक हत्यारं दिली. तुम्हाला आठवत असेल. काय काय

सांगितलं? धान्य फक्त स्वत:पुरतं किंवा स्वत:च्या गावापुरतं पिकवा. बाहेरून ट्रॅक्टर विकत घेऊ नका. खतसुद्धा विकत घ्यायचं कमी करा, जर तुम्हाला पिकवायचं असेल तर वाटेल तितकं पिकवा पण धान्य पिकवू नका. त्याच्याऐवजी डाळी पिकवायच्या असतील तर पिकवा, तेलबिया पिकवा, फळं पिकवा, दुधाचा धंदा करायचा असेल तर करा; पण धान्य करू नका आणि परिणाम काय झाला? पुन्हा एकदा आम्ही थोडं कमी पडलो.

त्यावेळी मी आणखी एक कल्पना मांडली होती. शेतकरी संघटना ही एक लढाऊ संघटना आहे. ती आंदोलन करते.  माझ्यासारखा कधी कचेरी आणि कार्यालयाच्या बाहेर न गेलेला मनुष्य वीसपंचवीस वेळा तुरुंगात जातो आणि माझ्यावर पाचपाचशे खटले लागतात. हा उद्योग मी का केला? मला काही तुरुंगात जायची हौस होती म्हणून नाही. माझा जन्म काही रस्ते अडवण्यात गेला म्हणून काही मी रस्त्यावर आलो नाही, तर शेतकरी संघटनेला सनदशीर आर्थिक हत्यारे हाताळण्यासारखी स्थिती नाही. आंदोलन करण्यापलीकडे गत्यंतर नाही. कारण, शेतकऱ्यांचा खरा शत्रू राजकीय धोरण आहे. त्यावेळी, मी असंही म्हटलं होतं की जर का सरकारचं धोरण शेतकरी विरोधी नसतं, शेतीमालाचा भाव पाडायचा असं जर सरकारचं धोरण नसतं तर काय झालं असतं? मला आठवतं, वर्ध्याच्या पहिल्या बैठकीमध्ये ज्या लोकांशी ओळख झाली त्याच्यामध्ये एक कार्यकर्ते होते. सगळी चर्चा झाल्यानंतर त्यांना असं वाटलं, की शरद जोशी जे म्हणताहेत ते काही खरं नाही. सरकार शेतीमालाचा भाव पाडतं हे काही खरं नाही. आपलंच सरकार आपल्या विरोधी कसं काय असेल? मग त्यांनी एक छोटासा कार्यक्रम हाती घेतला आणि त्यांनी काय केलं की, शेतकऱ्यांना जरा बऱ्यापैकी भाव देऊन ज्वारी व इतर धान्ये खरेदी केली आणि त्यांना असं वाटलं की ते धान्य विकल्यानंतर त्यांना फायदा होईल आणि ते शेतकऱ्याला बऱ्यापैकी भाव देऊ शकतील. काय झालं? सरकारनं त्यानंतर केली सुरुवात धान्याची आयात करायला. मग बजारपेठेतले ज्वारीचे भाव इतके पडले की या कार्यकर्त्यांनी जेवढे पैसे गुंतवले होते तेवढेसुद्धा त्यांना परत मिळाले नाहीत. याचा अर्थ काय? की केवळ आर्थिक व्यवहारांनी किंवा तथाकथित विधायक कार्यक्रमांनी शेतीमालाला भाव मिळू शकत नाही.

शेतीमालाला भाव मिळवायचा असेल तर वेगवेगळ्या प्रकारची पिकं काढली पाहिजेत हे आम्हालाही समजतं हो! जर शेतीमालाला भाव मिळवायचा असेल तर तो साठविण्याची व्यवस्था पाहिजे इतकं समजण्याइतकी बुद्धी आम्हालाही आहे. जर शेतीमालाला भाव पाहिजे असेल तर त्या मालावर प्रक्रिया केली

पाहिजे. त्याचा व्यापार चांगला केला पाहिजे, आवश्यक तर निर्यात केली पाहिजे हे आम्हालाही समजतं. त्याकरिता सहकारी संस्था काढल्या पाहिजेत, वेगवेगळ्या प्रकारच्या बँका काढल्या पाहिजेत हेही आमहाला समजतं. फक्त, आमचा अनुभव कसा आहे की सगळं केलं, वेगवेगळ्या प्रकारचा माल पिकवला, अगदी टाकटुकीने, काटकसरीने पिकवला, साठवणुकीची व्यवस्था केली, प्रक्रियेची व्यवस्था केली, सहकारी संस्था काढल्या, बँका काढल्या आणि तरीसुद्धा सरकारने ठरवलं, की तुम्हाला भाव मिळू द्यायचा नाही तर तुमच्या या सगळ्या प्रयत्नांवर पाणी पडतं.

आणि म्हणून शेतकरी संघटना ही आंदोलक संघटना बनली. तिने वेगवेगळी आंदोलनं केली आणि दहा वर्षांमध्ये एक बदल घडवून आणला. निदान, कोणत्याही राजकीय पक्षाला निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये शेतीमालाला भाव मिळाला पाहिजे हे कलम घालणं आवश्यक वाटू लागलं. इतका तरी बदल आपण घडवून आणला. १९८९ च्या निवडणुका, जनता दलाचं निवडून येणं, राष्ट्रीय कृषिनीती तयार करण्याची घोषणा, वेडीवाकडी का होईना पण कर्जमुक्ती हा सगळा इतिहास तुमच्यासमोर घडून गेला आहे. त्याविषयी तुमच्यासमोर मी अनेकदा बोललेलो आहे. या दोन वर्षांमध्ये जे काही घडलं त्यावर बोलण्यात मी आता जास्त वेळ घालवू इच्छित नाही.

**राजकीय परिस्थिती**

आज जी काही परिस्थिती दिसते ती परिस्थिती मी आपल्यापुढे मांडणार आहे. आपण आंदोलनाच्या काळात नेहमी असं म्हटलं, निवडणुकीसंबंधी भूमिका घेताना म्हटलं की आपल्याला काँग्रेसबद्दलही प्रेम असण्याचं कारण नाही. काँग्रेस हा अजून आपला नंबर एक शत्रू आहेच; पण त्याच्याबरोबर विरोधी पक्ष राज्यावर आले म्हणजे ते काही शेतकऱ्यांचं भलं करतील हेसुद्धा काही खरं नाही. आपला मित्र असा राजकीय पक्ष कोणताच नाही. आपल्याला काय पाहिजे? छोटा चोर आणि मोठा चोर यांच्यामध्ये समतोल असावा. मी काय वाक्य वापरलं होतं? की मोठा चोर आपल्या छातीवर बसालाय, त्याला लहानग्या चोराच्या मदतीनं जर उठवता आलं तर तो धाकटा चोर आपल्या छातीवर बसायच्या आधी पटकन उडी मारून उठता आलं तर आपल्याला संधी मिळेल; तेव्हा दोन चोरांमध्ये लढाई लावून देणं हे खरं आपलं धोरण आहे. आंदोलनाच्या दृष्टीने राजकीय संतुलन पाहिजे हे आपलं पाहिलं उद्दिष्ट आणि आज ते राजकीय संतुलन तुमच्यापुढे फार चांगल्या अवस्थेत मिळालेलं दिसत आहे. काँग्रेसचं सरकार केव्हाही पडू शकतं. राजकीय संतुलन आहे याचा एक चांगला पुरावा असा की एवढ्या निश्चयाने डॉ. मनमोहन सिंगांनी खताच्या किमती वाढवल्यानंतर लोकसभेमध्ये

जो काही गदारोळ झाला त्यामुळे, दोन पावलं का होईना, त्यांना मागे यायला लागलं. कोणताही प्रश्न घेतला तर त्याबद्दल सरकारवर आज स्वतंत्र निर्णय करता येत नाही. प्रत्येक वेळी पंतप्रधानांना म्हणावं लागतं, मी विरोधी पक्षांना एकत्र बोलावणार आहे, त्यांच्याशी चर्चा करणार आहे आणि मग मी निर्णय घेणार आहे.

राजकीय संतुलन उपस्थित आहे; पण राजकीय परिस्थिती यापेक्षा नाजूक आहे. नुसतं संतुलन आहे एवढंच नाही तर जनता दल किंवा डावे पक्ष असे आर्थिक कार्यक्रम असलेले विरोधी पक्ष हे फार झपाट्याने संपत चालले आहेत. रशिया पडला, रशियाची वाताहत झाली. कम्युनिस्टांनी आता कितीही आव आणला तरी गावोगाव जाऊन ते आता कम्युनिझम चांगला आहे हे कोणत्या आधाराने सांगणार? जेव्हा त्यांच्या मक्का आणि काशीचं दिवाळं वाजलं तिथं बंगालमधले कम्युनिस्ट आता आम्ही काही वेगळी, चांगली व्यवस्था करून दाखवणार आहोत असं सांगायला लागले तरी त्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. आता जनला दलाने समजून उमजून आत्महत्या करायचे ठरवले आहे. आज राजकीय परिस्थिती अशी विचित्र तयार होताना दिसते की एका बाजूला अयोध्यावादी, धर्माचं नाव घेऊन पुढे येणारे आणि दुसऱ्या बाजूला सोनियावादी यांच्यातच काय ते राजकारण चालणार आहे, बाकीच्या अर्थकारणाला काही स्थानच राहिलं नाही.

या राजकारणाचा एक तिसरा, मध्ये घडून गेलेला महत्त्वाचा भाग आपल्याला लक्षात ठेवायला पाहिजे. १९८९ मध्ये आपण असं म्हटलं की शेतकऱ्यांचं एक महत्त्वाचं स्थान आपण निवडणुकीमध्ये तयार केलं. शेतकऱ्यांचे कार्यक्रम घेऊन वेगवेगळे पक्ष पुढे आले; पण तिथेसुद्धा आपली थोडी फसगत झाली. खरं शेतकरी आंदोलन बाजूला राहिलं. विश्वनाथ प्रताप सिंगांनासुद्धा शेतकरी संघटनेने केलेली कर्जमुक्तीची मागणी बाजूला ठेवायला लागली आणि कर्जमुक्तीची कोणती कल्पना त्यांनी घेतली तर शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी ज्यांना कणमात्र समज नाही त्या देवीलालांची; सगळ्या शेतकऱ्यांचं दहा हजार रुपयांचं कर्ज माफ करायची. देवीलालांचा दुसरा कार्यक्रम काय? तर दिल्लीच्या पंचतारांकित हॉटेलांमध्ये, जिथं एक जेवण शेतकरी माणसाला १०० रुपयात मिळालं पाहिजे. ही त्यांची सगळ्यात मोठी मागणी. या मंडळींनी सबंध शेतकरी आंदोलन बदनाम करून टाकलं. सगळ्या शहरातली इंग्रजी वर्तमानपत्र जर आपण वाचाल तर देवीलालच बदनाम झाले असं नाही, महेंद्रसिंग टिकैतच बदनाम झाले असं नाही तर जाणीवपूर्वक ही सगळी वर्तमानपत्र देवीलाल, महेंद्रसिंग टिकैत आणि शरद जोशी किंवा

उलट्या क्रमाने अशी तीनही नावे एकत्रितपणे अशाकरिता घेतात की शेतकरी आंदोलनाला काहीही आर्थिक कार्यक्रम नाही, हे फक्त शेतकऱ्यांचा स्वार्थ साधणारे आणि नुसते शेतकरी नव्हे मोठ्या शेतकऱ्यांचा स्वार्थ साधणारा हा एक कट आहे असं भासवण्यामध्ये शहरातील ही वर्तमानपत्रं यशस्वी झालेली आहेत. याही गोष्टीची जाणीव आपल्याला ठेवली पाहिजे.

म्हणजे, राजकारणात तीन गोष्टी महत्त्वाच्या घडल्या. संतुलित सरकार आलं; पण आता राजकारणातला सगळ्यात मोठा संघर्ष अयोध्यावादीविरुद्ध सोनियावादी यांच्यामध्ये होणार आहे आणि शेतकरी आंदोलन वाटत होतं, ते उलट संकुचित, एका समाजाचे, फक्त श्रीमंत शेतकऱ्यांचं आंदोलन आहे असं चित्र उभं केलं गेलं आहे.

**आर्थिक परिस्थिती**

आर्थिक परिस्थितीमध्ये काय बदल घडला? आर्थिक परिस्थितीमध्ये मोठा बदल घडला. शेतकऱ्यांना शेतीमालाला भाव मिळायला लागलेला नाही, हे उघड आहे. भारत आणि इंडियातली दरी वाढते आहे हेही खरं आहे; पण तरीदेखील एक फार महत्त्वाचा बदल घडला. शेतकरी आंदोलनाची दिशा ठरविण्याकरिता तो अत्यंत महत्त्वाचा आहे. १९७८ मध्ये दिल्लीमध्ये कांद्याचा भाव फक्त एक रुपया किलो झाला म्हटल्याबरोबर कांद्यावर सरकारने निर्यातबंदी लादली. आज परिस्थिती अशी की मधल्या काही काळामध्ये कांद्याचा भाव दिल्लीला सोळा रुपये किलो झाला तरी निर्यातबंदी घालण्याची सरकारची हिम्मत होऊ शकली नाही. का? कारण, नेहरूवादाचा बोजवारा वाजला आहे. नेहरू-अर्थव्यवस्थेचं दिवाळं निघालेलं आहे आणि त्याचा परिणाम असा झाला की देशावर जवळजवळ एक लाख कोटी रुपयांचं किंवा त्यापेक्षाही जास्त कर्ज असल्यामुळे देशाकडे आता परकीय चलन राहिलेलं नाही. जागतिक बँकेचं किंवा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचं कर्ज घ्यावं, तेव्हा घरामध्ये भाकरी तयार होते अशी परिस्थिती सगळ्या देशावर आलेली आहे. मग त्याच्यामध्ये मनमोहन सिंगांनी अंदाजपत्रक काढलं, उद्योगधंद्यांना उत्तेजना द्या, ज्याला उद्योगधंदे काढायचे असतील त्याला परवानगी द्या, परकीय भांडवलाला चुचकारा, मक्तेदारांना मोकळीक द्या. इ. इ. पण हे संकट असं सुटणारं नाही. वर्तमानपत्रांनी कितीही म्हटलं आणि मनमोहन सिंग आणि पी. व्ही. नरसिंह रावांनी कितीही फुशारक्या मारल्या तरी नवीन औद्योगिक धोरणामुळे हिंदुस्थानवर आलेलं आर्थिक अरिष्ट सुटण्याची सुतराम शक्यता नाही. नाणेनिधीचं एक कर्ज मिळालं, दर महिन्याला एकेक कर्ज मिळालं, त्या कर्जावर व्याज नसलं आणि कर्जाच्या परतफेडीची अट जरी नसली तरीसुद्धा आपलं संकट सुटू

शकत नाही.

देशावरचं संकट केव्हा सुटेल? ज्या दिवशी आपण आपल्या आयातीपेक्षा निर्यात जास्त करायला लागू, आपण जितका माल बाहेरून मागवतो त्याच्यापेक्षा जास्त माल बाहेर पाठवायला लागू त्यादिवशी आपलं संकट सुटायला सुरुवात होईल आणि सध्याच्या शासनाच्या धोरणातून हे होण्याची काहीही शक्यता नाही. अगदी साधी गोष्ट घ्या. कारखाने काय करतात? समजा, आपल्या हिंदुस्थानातला एक कारखाना कॉम्प्युटर तयार करतो. म्हणजे, त्याच्यातल्या निम्म्या गोष्टी आधी बाहेरूनच आणतो. त्या बाहेरून आणलेल्या वस्तू इथं एकत्र जुळवल्या जातात. अशी जुळवलेली वस्तू, म्हणजे अमेरिकेतल्या किंवा यूरोपातल्या माणसाच्या दृष्टीने आडगिऱ्हाइकी मालच झाला. गचाळ माल झाला. तो विकत घ्यायचं त्याचं काय अडलंय? यूरोपातला देश जो माल तयार करतो त्याची नक्कल तुम्ही इथं तयार करणार, थातुरमातुर नक्कल करणार आणि यूरोपातल्या माणसाने, ज्याने तो माल शोधून काढला त्यांनीच तो विकत घ्यावा अशी अपेक्षा ठेवणार! हे घडणे कधीही शक्य नाही. तेव्हा नेहरूवादाचा पराभव हा जोपर्यंत अशा कारखानदारीचं कौतुक चालू आहे तोपर्यंत चालूच राहणार आहे, त्यातून सुटका नाही.

**हतबल सरकार**

पण याच्यात आपला फायदा काय झाला? शेतकऱ्यांना याच्यात एक मोठी संधी मिळाली हे लक्षात ठेवायला हवे. कपाशीचा भाव पाडण्याकरिता परदेशातून कापूस आणून हिंदुस्थानामधला भाव पाडणे हे अजूनही एखादेवेळी सरकार करू शकेल, एखादेवेळी लाख दोन लाख गाठी कदाचित आणेलही; पण फार मोठ्या प्रमाणावर पूर्वीसारखं असं करणं सरकारला अशक्य आहे. कारण, मग देशाचं पुरतंच दिवाळं वाजल्याशिवाय राहणार नाही. कपाशीच्या निर्यातीवर बंदी घालण्याची भाषा आजसुद्धा चालू आहे; पण विजय जावंधियांनी तुम्हाला सांगितलं की ती बंदी त्यांना उठवायलाच लागणार आहे आणि ती उठवली नाही तर आपण आहोत ना तिथं? पण त्यांना आज तशी बंदी घालणं शक्य नाही. रुपयाची किंमत सातत्याने अवास्तव जादा ठेवलेली. त्यामुळे शेतकऱ्याला निर्यात करायला त्रास होत होता. आज त्यांना झक्कत रुपयाचं मूल्य २१ टक्क्यांनी कमी करायला लागलं. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता माल जर परदेशात पाठवला तर त्यांना बाजापेठ मिळण्याची आणि चांगली किंमत मिळण्याची शक्यता वाढली. म्हणजे, सरकार शेतकऱ्यांविरुद्ध जी जी हत्यारं वापरत होतं ती ती हत्यारं आता निकामी झाली आहेत. शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळू नये म्हणून सरकार जे जे करत

होतं ते आता सरकार करू शकत नाही. त्यांचे हात बांधल्यासारखे झाले आहेत. म्हणजे सरकारचं धोरण बदललं असं नाही. सरकारच्या मनामध्ये शेतकऱ्यांविषयी काही प्रेम निर्माण झालं असं नाही. शेतकऱ्याविषयीचा द्वेष, शेतकऱ्याविषयीचं शत्रुत्व तितकंच कायम आहे. फक्त मनामध्ये खूप राग असूनसुद्धा काही करता येत नाही, अशी परिस्थिती सध्या सरकारची झालेली आहे.

**सत्याग्रहाचे साधन निष्प्रभ**

राजकीय आणि आर्थिक बदलाबरोबर एक तिसरी महत्त्वाची गोष्ट घडलेली मला दिसते. आपण आर्थिक हत्यारं वापरली त्याच्याबरोबर सत्याग्रहाची हत्यारंही वापरली. आपण रस्त्यावर गेलो. हजारोंच्या संख्येने तुरुंगात गेलो. त्यातून शेतकऱ्यांची जागृती तयार झाली. सत्याग्रहाचं हत्यार आपण फार प्रभावीपणे वापरलं. आज देशामधील परिस्थिती अशी आहे की, मंडल आयोग हा किती छोटा विषय. सगळे मिळून काही एक साताठ हजार नोकऱ्यांचा विषय – पण त्याकरिता दिल्लीच्या आसपास दीडशे तरुणांनी स्वतःला जाळून घेतलं, अयोध्येला रामाचं मंदिर. त्याच्यावाचून काय कुणाची भाकरी अडली आहे? पण त्या विषयावर आज शेकडो माणसं मरायला तयार आहेत. पंतप्रधानांकडे दररोज जी बातमीपत्र येतात त्या बातमीपत्रांमध्ये – पंजाबमध्ये ४० मेले, आसाममध्ये १२ मेले आणि बाकीच्या ठिकाणी तामिळनाडू वगैरे... अशा ज्या सगळीकडच्या बातम्या येतात त्या सगळया रक्तपाताच्याच येतात. देशामध्ये अशी परिस्थिती असताना आपण जरी रस्त्यावर जायचं ठरवलं, जरी जेल भरायचं ठरवलं तरीसुद्धा ८० मध्ये, ८६ मध्ये जो परिणाम घडून आला तो आपल्या आंदोलनाने आज ९१ मध्ये घडून येण्याची शक्यता नाही.

म्हणजे नवीन परिस्थितीत बदल घडले ते कोणते? शासन हे संतुलित आलं आहे. कोणताही राजकीय पक्ष मोठा राहिलेला नाही; पण राजकारणामध्ये खरा संघर्ष आता अयोध्यावादीविरुद्ध सोनियावादी असा आला आहे. शेतकऱ्याला बदनाम करणाऱ्या माणसांनी त्यांचं काम बजावलंय. शेतकरी आंदोलन काही प्रमाणात बदनाम झालं आहे आणि त्याची पारंपरिक सत्याग्रहाची साधनं निष्प्रभ झाली आहेत. शेतकऱ्यांना बुडविण्याची सरकारची इच्छा काही कमी झालेली नाही; पण शेतकऱ्यांना बुडविण्याची ताकद आता सरकारमध्ये राहिलेली नाही. लोकात कमालीची निराशी तयार झाली आहे. मोठ्या आशेने ते देशाला संकटातून तारून नेणाऱ्या नव्या युगपुरुषाची वाट पाहत आहेत. अशा परिस्थितीमध्ये शेतकरी आंदोलन पुढे कसं न्यायचं?

१९८० मध्ये वर्ध्याला जेव्हा पहिलं शिबिर झालं, त्या शिबिरावर एक लहानशी

पुस्तिका आपण काढली आहे. 'भारतीय शेतीची पराधीनता' - ती पुन्हा एकदा वाचून पाहावी. त्यावेळी मी असं म्हटलं होतं की, समजा, सरकारचं धोरण शेतकरीविरोधी नसतं तर आपण काय केलं असतं? मघाशी मी यादी सांगितली ती - विविध तऱ्हेचं उत्पादन काढलं असतं, त्याच्या साठवणुकीची व्यवस्था केली असती, प्रक्रियेची व्यवस्था केली असती, निर्यातीची व्यवस्था केली असती. शेतकरी संघटना म्हणजे चेंबर ऑफ कॉमर्सप्रमाणे शेतकऱ्यांची एक संस्था झाली असती. आंदोलक संस्था होण्याची गरज नव्हती. आज सरकारचं शेतकऱ्याविरुद्धचं धोरण बदललं आहे असं नाही; पण ते धोरण सरकार अमलात आणू शकत नाही. निदान काही काळ तरी सरकारचे हातपाय बांधलेले आहेत. आपल्या छातीवरचा मोठा चोर उठला आहे, धाकटा चोर अजून छातीवर येऊन बसायचा आहे. तुम्ही पटकन कोलांटी उडी मारून जर उभं राहण्याचं कौशल्य, तत्परता दाखविली तर तुम्ही या अडचणींच्या परिस्थितीतून सुटू शकता. अशी एकूण आजची परिस्थिती आहे आणि म्हणून प्रश्न पडतो तो असा की आपण जाणार आहोत कोणत्या दिशेने?

**राष्ट्रीय कृषिनीती**

राष्ट्रीय कृषिनीतीचा उल्लेख झाला. मी स्थायी कृषि सल्लागार समितीचं अध्यक्षपद स्वीकारलं. त्याहीवेळी मी तुमच्याशी बोललो होतो. कोणाच्याही मनामध्ये अशी कल्पना नव्हती की मी दिल्लीला जाऊन बसलो आणि तिथं राष्ट्रीय कृषिनीती असं काही एक पुस्तक तयार केलं म्हणजे हिंदुस्थानातल्या शेतकऱ्यांचे सगळे प्रश्न सुटतील. एवढं सोपं असतं तर आम्ही आंदोलनं कशाला केली असती? जर का शेतकऱ्याविषयी सरकारची धोरणं बदलणं इतकं सोपं असतं तर आम्हाला इतक्या लोकांना आयुष्याचा उन्हाळा करून घ्यायची आवश्यकता नव्हती; पण आपण ज्याला मदत केली असा एक, निदान त्यावेळी थोडाफार सचोटीचा वाटणारा, पंतप्रधान आला आहे. मंत्रालयातली सगळी कागदपत्रं ही शेतकऱ्याविरुद्धच्या विषारी प्रचाराने भरलेली आहेत. या पंतप्रधानांनी जर काही करायचं ठरवलं तर त्याला टेकू देणारी काही कागदपत्रं तरी तयार असावीत, ती तयार करण्याचं काम आपण घेतलं. राष्ट्रीय कृषिनीतीला मान्यता मिळाली नाही. विश्वनाथ प्रतापसिंगांचीही याच्यात चूक आहे. चंद्रशेखर सरकारला आणि देवीलालना तर ही राष्ट्रीय कृषिनीती परवडण्यासारखीच नव्हती आणि काँग्रेस सरकारला, राष्ट्रीय कृषिनीती म्हणजे विश्वनाथ प्रतापसिंगांची कल्पना, ती राबविण्याचे काहीच कारण नाही. तेव्हा ही राष्ट्रीय कृषिनीती म्हणून जे काही आम्ही लिहिलं त्याचं भाषांतर तुम्ही शेतकरी संघटकमध्ये वाचलं, ती राष्ट्रीय कृषिनीती आता

शासनाच्या दृष्टीने मेली आहे, असं धरा. कोणतंही सरकार ती अमलात आणण्याची काहीही शक्यता नाही. सरकारी धोरणाचा ती पाया होण्याची काहीच शक्यता नाही. का? कारण, आज कोणतंही सरकार राष्ट्रीय कृषितीनी अधिकृतरीत्या मान्य करण्याच्या कुवतीचं राहिलेलंच नाही. राष्ट्रीय कृषिनीती अमलात आणण्याच्या ताकदीचं सरकार आज नाही. पुढे येण्याची फारशी शक्यता नाही. मग या राष्ट्रीय कृषिनीतीचं करायचं काय?

राष्ट्रीय कृषिनीती म्हणजे काही सरकारनं शेतकऱ्यांना मदत करावी अशी भीक मागणारी राष्ट्रीय कृषिनीती नाही. तुमच्यापैकी ज्यांनी राष्ट्रीय कृषिनीती वाचली नसेल त्यांनी संघटकचे अंक मिळवून त्याचे पाचही भाग पुन्हा एकदा वाचावे. या कृषिनीतीमध्ये काय म्हटलं आहे? कृषिनीतीमध्ये काय म्हटले आहे हे थोडक्यात सांगायचं झालं तर –

शेती ही काही जीवनशैली नाही, शेती हा एक व्यवसाय आहे आणि हा व्यवसाय कार्यक्षमतेने पार पाडायचा असेल तर त्याचे शोषण थांबले पाहिजे. शतकांच्या शोषणाने शेतीच्या जीवनाधारांची झालेली हानी भरून काढावी लागेल. भविष्यात शेती–बाजारपेठ खुली राहिली म्हणजे झाले. शासनाने शेतीमालाला भाव मिळणार नाहीत याकरिता जे जे काही उद्योग आणि कारस्थानं केली ती कारस्थानं बंद पडली पाहिजेत. म्हणजे काही सरकारने बाजारात यावं आणि दरवेळी शेतीमालाला भाव मिळेल इतक्या प्रचंड प्रमाणात खरेदी करावी अशीही आमची अपेक्षा नाही. तर, सरकारने खुल्या बाजारपेठेमध्ये जर का बोटं घातली नाहीत, निर्यातीवर बंदी आणली नाही, आचरट आयाती केल्या नाहीत तर शेतकऱ्याला आपोआपच उत्पानखर्चावर आधारित भाव मिळतो. शेतीचाच नव्हे तर सर्व अर्थव्यवस्थेचा विकास होतो. या कृषिनीतीचा सारांश असा आहे.

**कृषिनीतीचं काय करायचं?**

सरकारने ही राष्ट्रीय कृषिनीती आता बाजूला ठेवली आहे. मग या कृषिनीतीचं काय करायचं? आळंदीच्या कार्यकारिणीमधला निर्णय एका वाक्यात सांगायचा झाला तर असा – सरकारने राष्ट्रीय कृषिनीती भले स्वीकारली नसो, ती आपण स्वीकारायची आहे एवढंच नव्हे तर ती राष्ट्रीय कृषिनीती आपणच अमलात आणायला लागायचं आहे. कारण, देशामध्ये सरकार अशी गोष्ट शिल्लक राहिलेली नाही. आपले शतकानुशतके बांधलेले हात थोडे मोकळे झाले आहेत. दहा वस्तूंना निदान तीन वर्षे भाव मिळाला तर शेतकऱ्यामध्ये जी ताकद येईल असं आपण म्हटलं होतं ती ताकद आपल्यात आली आहे. शेतकरीविरोधी धोरण राबविण्याची सरकारची ताकद राहिलेली नाही. त्यामुळे एक नवीन संधी आपल्याला

मिळाली आहे. मग काय करायला पाहिजे?

**आळंदीचे निर्णय**

मी काही सूचना आळंदीच्या बैठकीसमोर ठेवल्या. त्या सूचना थोडक्यात अशा –

पहिली गोष्ट म्हणजे आपण शेगावच्या शेतकरी मेळाव्यात असं जाहीर करावं की शेतकरी देशाला संकटातून सोडविण्याकरिता तयार झाला आहे आणि जी काही परकीय चलनाची अडचण तयार झाली आहे ते मिळविण्याची जबाबदारी आम्ही स्वीकारतो, बाजूला हटा तुम्ही कारखानदारांनो, तुम्हाला जमण्यासारखं हे काम नाही. हे काम फक्त शेतकरी करू शकतो. हे काम कारखानदारांना जमणार नाही, आम्ही घडवून आणणार आहोत. पण शेतकऱ्यांची निर्यात होऊ नये म्हणून जे काही तुम्ही उद्योग करता ते तुम्हाला बंद करावे लागतील. तुम्ही शेतकऱ्यांना आवाहन केलं ना की आता निर्यात झाली पाहिजे. मग आता निर्यातीच्या मार्गामध्ये तुम्ही काही अडथळे आणले तर तुम्ही देशद्रोही आहात असं आम्ही म्हणू. यंदा कापसाचं पीक कमी आलं, निर्यात बंदी. चालायचं नाही. निर्यात बंदी म्हणजे काय असं पाण्याच्या नळाची चावी नाही. ती उघडली की पाणी वाहायला लागलं आणि बंद केली की पाणी थांबलं. जर तुम्हाला निर्यात व्हायला पाहिजे असेल तर देशामधल्या बाजारपेठेची स्थिती काही असो, पुरवठा पुरेसा असो वा नसो आम्हाला निर्यात करण्याची शक्यता असली पाहिजे. निर्यात बाजारपेठा तुमचं मन लागेल तेव्हा बुडवल्या गेल्या तर ते आम्ही सहन करणार नाही. याबद्दल मी पंतप्रधानांना लिहिलेलं पत्र काळजीपूर्वक वाचा. (शेतकरी संघटक : २१ सप्टेंबर १९९१.)

यंदासुद्धा – आणि मला वाटतं हा फार चांगला विषय आहे – निर्यातीचा सर्वात मोठा विषय कोणता असेल तर तो कापूस आहे. मी असं म्हटलं की आंदोलनं करायला आता वाव नाही, आता आर्थिक मार्गाकडे जायला पाहिजे. पण सरकारने जर का कपाशीच्या निर्यातीवर बंदी घातली तर यापूर्वी कधीही झालं नाही इतकं मोठं आंदोलन कपाशीच्या निर्यातीच्या प्रश्नावर आपण करू; पण ते शेतकऱ्यांची मागणी म्हणून नव्हे तर आम्ही शेतकरी देश वाचवायला निघालो असताना, हे कर्मदरिद्री सरकार आम्हाला देश वाचवू देत नाही, म्हणून.

**शेतीच्या नवीन पद्धतींची गरज**

आता मात्र शेती करायची ती कमीत कमी खर्चात करायची आहे. कारण आपल्याला इतर देशांशी स्पर्धा करायची आहे. इतके दिवस खर्च कसा होतो, किती होतो याचा हिशोब आपण करत नव्हतो. आपण काय म्हणायचो? खतांच्या किमती तुम्ही काही ठरवा, मजुरी काही ठरवा; ते सर्व हिशोबात धरून

तितकी किंमत आम्हाला द्या. आम्ही खुश राहू असं आजपर्यंत आम्ही म्हणत होतो. आता परिस्थिती वेगळी आहे. सरकार दिवाळखोर झाले आहे. त्याने किंमत द्यायचे ठरवले तरी त्याची अंमलबजावणी होण्यासारखी नाही. आता भाव आपला आपल्याला मिळवून घ्यायचा आहे. या सरकारची काही गरज नाही. शेतीमालाचा खर्च कमी करण्याकरिता आणि देशाचं परकीय चलन वाचविण्याकरिता शेती करण्याच्या काही नवीन पद्धती काढायला लागतील.

त्याच्यातला पहिला भाग, हा परकीय चलन कमी खर्च करण्याकरिता की आपल्या शेतीमध्ये वरखतं आणि विशेषतः परदेशातून आयात होणारी औषधं यांचा कमीत कमी वापर झाला पाहिजे. त्यांच्यामुळे देशातलं उत्पादन कमी झालं आणि परभणीचा कार्यक्रम अप्रत्यक्षपणे राबवला गेला तरी त्याला इलाज नाही. पण आम्ही परकीय चलनामध्ये खर्च करून शेती चालविणार नाही. स्वतःच्या पायावर उभं राहणार, दोन तीन वर्षे त्रास झाला तरी चालेल. उत्पादन कमी झालं तरी चालेल. पण आम्ही (या मार्गाने) पुढे जाणार आहोत.

**प्रक्रिया उद्योग**

दुसरा मुद्दा महत्त्वाचा. औद्योगिक धोरणामध्ये कारखानदारांना सरकारने आता खुले आम परवानगी दिली. तुम्ही कोणताही कारखाना काढा, कोणत्याही लायसेन्सची गरज नाही, कोणत्याही परवान्याची गरज नाही. फक्त शेतकऱ्याला मात्र हा नियम लागू नाही. कापूस शेतकऱ्यांनी कापूसच पिकवला पाहिजे. त्याची रूईसुद्धा करायची म्हटलं तर परवानगी नाही. परवा आम्ही मुख्यमंत्र्यांशी या विषयावर चर्चा केली. त्यांना म्हटलं, आम्ही कपाशीच का विकायची, कापसाची रूई आम्ही घरातल्या घरात बसून करू शकतो. साठसत्तर रुपये काय देता रूई बनविण्याकरिता ते आम्हाला द्या. आम्हाला मिळतील, घरामध्ये. ते म्हणाले, नाही, कायदा असा आहे की शेतकऱ्याला रूई करता येत नाही. म्हटलं, हा कायदा केला कुणी? तुम्हीच केला ना? ६० कोटी किंवा १०० कोटी रुपयांचा कारखाना काढायचा झाला तर दिल्ली सरकार म्हणतं कुणाच्याही परवान्याची गरज नाही आणि पाच हॉर्सपॉवरचं एक इंजिन घेऊन त्याच्यावर एक रेचा बसवायचा झाला आणि रूई काढायची झाली तर तुम्ही नाही म्हणता? तुम्ही जर का शेतकऱ्याच्या उद्योगधंद्यांवर अशी बंदी घातली, कारखानदारांवर जी बंदी नाही ती तुम्ही शेतकऱ्यांवर घातली तर आम्ही पुन्हा तुमच्याविरुद्ध आंदोलनाला उभं राहू. का? शेतकऱ्यांच्या स्वार्थाकरिता नव्हे तर शेतकरी देश वाचवायला निघाला आहे आणि तुम्ही कर्मदरिद्री – देश बुडवायला निघाला आहात. म्हणून आम्ही आंदोलनाकरता तयार आहोत.

हे सगळं कसं काय बसवायचं? मी आळंदीच्या बैठकीत एक वाक्य वापरलं ते मी तुमच्यासमोर वापरतो. परिस्थिती खूप बदलली आहे. १९७६ मध्ये मी हिंदुस्थानात आलो आणि शेती करायला लागलो आणि १९८० सालच्या परिस्थितीमध्ये शेतकरी संघटना निघाली, ८० मध्ये मी एकूण ११ वेळा तुरुंगात गेलो. आज ९१ मध्ये जर का मी हिंदुस्थानात परत आलो असतो, आजपर्यंत स्वित्झर्लंडमध्येच राहिलो असतो आणि जर का ९१ मध्ये परत आलो असतो तर शेतकऱ्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी मी काय केलं असतं? मी असं म्हटलं की यावेळी शेतकरी संघटना काढली नसती, कदाचित, एखादी कॉर्पोरेशन (महामंडळ) काढली असती – शेतकऱ्यांच्या मालाची निर्यात आणि शेतकऱ्यांच्या मालाची प्रक्रिया व्यापकपणे करण्यासाठी; घरोघर करण्यासाठी. कापूस उत्पादक शेतकरी कापूस विकणार नाहीत. तो निदान रूई करून विकेल, जमलं तर सूत करून विकेल, जमलं तर आणखी कपडे विणून विकेल आणि जमलं तर तयार झालेले कपडे परदेशात जाऊन विकेल; पण कच्चा माल म्हणून बाजारपेठेत नेणार नाही.

फळं पिकविणारे, डाळिंब पिकविणारे शेतकरी हे फळाची रास नेऊन बाजारात ओतून त्याचा चिखल  झालेला यापुढे पाहणार नाहीत. त्याचे आवश्यक तर रस काढतील, त्याची वाईनसुद्धा करतील. वाईन करायला परवानगी नाही, कायद्याप्रमाणे. पण आम्ही त्यांना सांगितलं की हा शेतकऱ्यांचा हक्क आहे; त्याच्या शेतामध्ये तयार होणाऱ्या फळांची वाईनसुद्धा करण्याचा. तुम्ही पाहिजे तर साखर कारखान्यामधले अल्कोहोलचे कारखाने बंद करा. कारण ते अल्कोहोल पिऊन लोक गटारात पडलेले दिसतात, या वाईनने निदान तो तरी प्रकार होण्याची शक्यता नाही. सुधाकरराव नाईकांना मी सांगितलं की वसंतराव नाईकांना ती दारू चालू करून जे काही नुकसान केले ते दूर करायचं काम तुमचं आहे. शेतकऱ्याच्या मालावर, शेतकऱ्याच्या शेतामध्ये तयार होणाऱ्या वस्तूवर, सर्व प्रक्रिया करण्याचा अधिकार शेतकऱ्याला असला पाहिजे.

हा कार्यक्रम इतका सोपा नाही. तुम्हाला वाटतं त्याच्यापेक्षा फार कठीण आहे. रस्त्यावर जाणं सोपं आहे. रेल्वेसुद्धा अडवणं सोपं आहे; पण एक चोर आपल्या छातीवरनं उठला आहे आणि धाकटा चोर आपल्या छातीवर अजून बसायचा आहे. एवढ्या अवकाशामध्ये कोलांटी उडी मारून शेतकऱ्यांच्या संघटनेला एकदम वेगळी हत्यारं देऊन वेगळ्या लढाईमध्ये वेगळ्या रणगाड्यात उतरवणं हे काम काही इतकं सोपं नाही.

**शेतकरी संघटना – शेतकऱ्यांची वाचा**

शेतकरी संघटना ही राहणारच आहे. शेतकरी संघटना नसेल तर सरकारला

कोण सांगेल की निर्यातीच्या मार्गात जर तुम्ही अडथळे आणलेत तर तुम्ही देशद्रोही आहात? मी कॉर्पोरेशन जर काढली तर ती कॉर्पोरेशन पी. व्ही. नरसिंहरावांना तुम्ही देशद्रोही आहात असं म्हणू शकणार नाही. ते काम शेतकरी संघटनेलाच करावं लागेल. शेतकऱ्यांनी जर काही प्रक्रिया करायच्या ठरवल्या आणि त्याच्यावर जर काही बंदी आली तर हे राष्ट्रद्रोही कृत्य आहे हे म्हणायचं काम शेतकरी संघटनाच करू शकते.

लक्ष्मीमुक्ती झाली पाहिजे, त्या लक्ष्मीमुक्तीबरोबर स्त्रियांनी आता त्यांच्या लहानशा दोनचारपाच गुंठ्यांत का होईना 'सीताशेती' करावी अशी कल्पना मी आळंदीला मांडली आणि त्याला जर सरकारने विरोध केला तर, वेळ पडली तर, सरकारला राजकीय विरोध करण्याचं काम शेतकरी संघटनेलाच करावं लागणार आहे.

सर्व शेतकऱ्यांची बोली, सर्व शेतकऱ्यांची जीभ, सर्व शेतकऱ्यांची वाचा, सर्व शेतकऱ्यांची शक्ती शेतकरी संघटनाच राहणार आहे; पण शेतकरी संघटनेच्या बरोबरीने, बाजूने काही कामं करण्याची आवश्यकता आहे, जी कामं शेतकरी संघटना करू शकत नाही. जसं, परभणीला आपण शेतकरी संघटनेच्या बरोबरीने कृषि योगक्षेम संशोधन न्यास या वेगळया न्यासाकडे जबाबदारी सोपविली. कशाकरिता? की शेतकरी संघटना रजिस्टर्ड नाही. मग निधी कुणाच्या नावाने गोळा करायचा, एक लहानशी संस्था तयार केली. तसं, शेतकऱ्यांच्या घरोघर कपाशीचे रेचे चालावेत, फलोद्योग शेतकऱ्यांच्या घरी फळप्रक्रियेचे कारखाने तयार व्हावेत, दूध शेतकऱ्यांनीसुद्धा दूध विकायला नेऊ नये, त्याच्या वस्तू तयार करूनच न्याव्यात, या सगळयाकरिता एक मोठी बांधणी, एक यंत्रणा तयार करणं आवश्यक आहे.

**नव्या रणनीतीची चाचणी**

मी माझं भाषण इथं संपवणार आहे. पण संपवताना आणखी एक गोष्ट सांगून संपवणार आहे. ती ही की आळंदीची बैठक झाल्यानंतर मी धावत धावत वर्ध्याला आलो ते काही उगाच नाही. आपण ज्या रस्त्याने आता शेतकरी आंदोलन, शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित रास्त भाव मिळावा याकरिता जी काही कारस्थानं होतात ती हाणून पाडण्याचं आंदोलन, ज्या नव्या रणनीतीनं चालवणार आहोत, त्या रणनीतीमध्ये वर्धा जिल्ह्याने एक महत्त्वाचं काम करावं अशी माझी इच्छा आहे. मी तुमच्यावर ही जबाबदारी का टाकू इच्छितो? पहिली गोष्ट म्हणजे या इथे हा कार्यकर्त्यांचा संच आहे. मधमाशांचं मोहोळ आहे. सगळया महाराष्ट्रामध्ये एखादी योजना लागू करण्याच्या आधी कुठं तरी एका प्रयोगशाळेमध्ये त्याचा प्रयोग होण्याची आवश्यकता आहे. वर्धा जिल्ह्याला गांधी जिल्हा म्हणून. स्वावलंबी

बनवण्याच्या वल्गना आजपर्यंत अनेक वेळा झाल्या; पण मला असं वाटतं, की हा आपला आंदोलनाचा कार्यक्रम, मी काही गांधीवादी नाही, तरीसुद्धा असं म्हणतो की गांधीविचाराच्या खऱ्या प्रेरणेला ज्यामुळे आनंद वाटेल अशा तऱ्हेचा हा कार्यक्रम; वर्धा जिल्ह्यामध्ये आपण त्याचा प्रथम प्रयोग करून पाहावा. इथं आपण काही शिकावं आणि जर त्यामध्ये काही चूका दिसल्या तर त्या दुरुस्त कराव्या आणि मग त्या इतर महाराष्ट्रामध्ये किंवा देशाच्या इतर भागांमध्येसुद्धा राबवाव्या अशी माझी इच्छा आहे. गुजरातची मंडळी मी इथं बोलावून घेतली. एका अर्थाने, या मागेसुद्धा योजना आहे. शेतकऱ्यांच्या संघटना पुष्कळ राज्यांत आहेत. चौदा-पंधरा राज्यांत आहेत म्हणतात; पण जर का हा कार्यक्रम यशस्वी करायचा असेल तर आपल्याला गुजरातमधील शेतकऱ्यांकडून पुष्कळ शिकायचं आहे. त्यांनी शेती आणि व्यापार हा एकत्र केला आहे, व्यापारी आर्थिक संस्था यांचा अनुभव गुजरातमधल्या शेतकऱ्यांचा जास्त आहे. ही बांधणी करायची झाली तर महाराष्ट्रातल्या, गुजरातमधल्या आणि काही प्रमाणामध्ये पंजाबमधल्या या तीनच राज्यातल्या शेतकऱ्यांनी पहिल्यांदा यावं एवढं पुष्कळ झालं. जर का ही बांधणी यशस्वी झाली तर आपण मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन शेतीमालाला भाव मिळविण्याच्या लढ्याचा खऱ्या अर्थाने यशस्वी शेवट करू शकू असा मला विश्वास वाटतो.

आपण पुष्कळ वेळा डोळ्यातून पाणी काढलं. ३१ ऑक्टोबर १९८४ ला टेहऱ्याला मंचाकडे जाता जाता इंदिरा गांधींच्या मृत्यूची बातमी आली आणि आपले सगळे आडाखे कोसळले याचं आपल्याला दुःख झालं. ९१ मध्ये पंचायतीच्या दिवशी चंद्रशेखर सरकार कोसळलं. शेतकरी खरंच दुर्दैवी आहे की काय असं मला काही काही वेळा वाटायाला लागतं आणि नंतर माझ्या असं लक्षात येतं की ज्या बाजूने सूर्योदय होतो आहे असं वाटून आपण तिकडे पाहत बसलो होतो. तिथं सूर्य दिसला नाही, तिथं ढग आले; पण प्रत्यक्षात सूर्य दुसरीकडे थोडासा बाजूला उगवू लागला आहे. त्याच्याकडे आपलं लक्ष गेलं नव्हतं एवढंच. सरकार हे निर्बल झालं आहे, शेतकऱ्यांवर अन्याय करण्याची आर्थिक ताकद त्याच्यामध्ये राहिलेली नाही. ही केवढी मोठी संधी आपल्यापुढे वाढून आली आहे. १९८० मध्ये ज्या तऱ्हेच्या शेतकरी आंदोलनाचे आपण नियोजन केलं ते आंदोलन प्रत्यक्षात उभं करण्याची संधी आपल्यापुढे आलेली आहे.

मग आता या सगळ्या गोष्टी तुम्ही हो म्हटलं तर पुढे मांडणार आहे. १९८० सालच्या आंदोलनात मी काय म्हणत असे? मी आंदोलनामध्ये काही निर्णय घेतले, मला निर्णय घेणं भाग आहे. तुम्हाला ते निर्णय पटले नाहीत तर तुम्ही

मला प्रश्न विचारा की असं का? पण त्या प्रश्नाचं मी उत्तर दिलं नाही तर राग मानू नका. कारण काय? मी असा निर्णय का घेतला हे मी तुम्हाला सांगितलं तर ते उत्तर तुमच्या कानात जायच्या आधीसुद्धा सरकारच्या कानात जाईल आणि सगळ्याच आंदोलनाला धोका होईल. यापुढचं नवं आंदोलन तर यापेक्षासुद्धा जास्त नाजूक आहे. समजा, त्यावेळी आंदोलनाची माझी जी काही रणनीती होती ती मुख्यमंत्र्यांच्या कानावर गेली किंवा दिल्लीला पंतप्रधानांच्या कानावर गेली असती तर काय झालं असतं? जास्तीत जास्त चारपाच हजार शेतकऱ्यांना त्यांनी आदल्या दिवशीच पकडून ठेवलं असते. काय फार मोठं नुकसान नसतं झालं; पण तुम्हाला सगळ्यांना माहिती आहे; व्यापारी जगामध्ये किंवा आर्थिक जगामध्ये जर काही एवढीशी बातमी फुटली तर सगळा डाव कोसळून पडतो. जे काही आपल्याला करायचे आहे ते व्यापारी पद्धतीने डावपेच लढवायचे आहेत. तुमची तयारी असली तर आपण त्याच्यामागे जाऊ. जर तुमची तयारी नसली तर केलंच पाहिजे असा माझा मुळीच आग्रह नाही, तुम्ही ते केलं नाही तरीसुद्धा दुसरे लोक ते करणार आहेत. ही संधीच अशी निर्माण झाली आहे की दुसरे लोक ते करणार आहेत. हे तुम्ही करणार आहात किंवा नाही हे फक्त तुम्ही ठरवायचं आहे. तुम्ही नाही केलं आणि आपली शेतकरी संघटना झेंड्यांची, लढाऊ तेवढीच राहू दे असं ठरवलं तरीसुद्धा काही बिघडणार नाही. तुम्ही करू शकता; पण त्यापलीकडे ज्या बीजाची लागवड तुम्ही केली त्याला फळ येत असताना घालायचं खतपाणीसुद्धा आपल्या हाताने जावं असं तुम्हाला वाटत असेल तर एक प्रयोग वर्धा जिल्ह्यामध्ये अमलात आणावा अशी विनंती करण्याकरिता मी वर्ध्याला आलो आहे. तुम्ही कार्यकर्त्यांनी जर ठरवलं की आपण हा कार्यक्रम अमलात आणू तर मग...

एक मोठी प्रचंड संधी चालून आलेली दिसते आहे. शक्यता चालून आलेली दिसते आहे. ही लढाई आहे जुनीच. फक्त नव्याने लढण्याकरिता नव्या हत्यारांची आणि व्यूहरचनेची गरज आहे.

*(२२ सप्टेंबर १९९१ वर्धा बैठक.)*

*(शेतकरी संघटक ६ ऑक्टोबर १९९१)*

■■

# नव्या लढाईची घोषणा

**माझ्या शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो,**

शेगाव या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी एवढ्या प्रचंड संख्येने एकत्र जमून आपण जे निर्णय घेत आहोत त्यात दोन चमत्कार घडताना दिसत आहेत. एक म्हणजे संपूर्ण पुराणात शेतकऱ्यांचा राजा म्हणता येईल असा जो एकमेव राजा होऊन गेला, ज्याला विष्णूने वामनअवतार घेऊन जमिनीत गाडला, इडा पिडा टळून ज्याचे राज्य यावे म्हणून वर्षानुवर्षे आयाबहिणी, सारे जग दिवाळीचा उत्सव साजरा करीत असताना प्रार्थना करीत आल्या आहेत त्या बळिराजाचे पुनरुत्थान.

आणि दुसरा चमत्कार म्हणजे आयुष्यभर जिच्या वाट्याला वनवासच वनवास आला त्या सीतामाईची वनवासातून मुक्तता. सीतेने चौदा वर्षे रामाबरोबर वनवासात राहून हालअपेष्टा सोसल्या. रामाचा वनवास संपल्यानंतर त्याला राज्याभिषेक झाला, पण कुणीतरी काही आक्षेप घेतल्याने रामाने सीतेचा त्याग केला; पण त्यावेळी रामाने एवढंसुद्धा म्हटलं नाही की, "बाई, तू चौदा वर्षे माझ्याबरोबर वनवासात राहिलीस, आता एकत्र राहता येत नसलं तरी तुझ्यासाठी अयोध्येमध्ये एक महाल बांधून देतो." सीतेचा त्याग करताना इतकं तर सोडाच पण "तू गरोदर आहेस, तुझं बाळंतपण होईपर्यंत राहण्यासाठी तुला एक झोपडी बांधून देतो." एवढंसुद्धा रामाच्या तोंडून निघालं नाही. तेव्हापासून सीता अजूनही वणवण हिंडते आहे. शेतकरी महिला आघाडी आज सीतेचे मंदिर उभारून खऱ्या अर्थाने तिची वनवासातून मुक्तता करीत आहे.

**राष्ट्रीय कृषिनीतीचा स्वीकार**

या मेळाव्यामध्ये आपण पहिला निर्णय घेतो आहोत तो देशाच्या शेतीविषयक धोरणाचा. देशाचं शेतीविषयक धोरण कुणी ठरवायचं? लोकसभेमध्ये बसणाऱ्या पुढाऱ्यांनी, पंतप्रधानांनी का मंत्र्यांनी? शेतीविषयक धोरण खरं तर सरकार आणि शेतकरी दोघांनी मिळून ठरवायला हवे. यासाठी गेली दोनतीन वर्षे आम्ही खूप

प्रयत्न केला; पण दरम्यान सरकारच गडबडून गेलं आणि आज परिस्थिती अशी आहे की देशामध्ये सरकार खऱ्या अर्थाने अस्तित्वातच नाही. दहा वर्षांपूर्वी आपण जेव्हा आंदोलन सुरू केलं. तेव्हा शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव मिळणार नाही अशी व्यवस्था करणार दुष्ट सरकार समोर होतं. आज स्थिती अशी आहे की तसा दुष्टपणा करण्यापुरतंही सरकार अस्तित्वात नाही. आज जे सरकार म्हणून आहे ते म्हणजे दिल्लीच्या खुर्चीवर बसविलेला गुळाचा गणपती आहे. त्यांनी शेतीमालाला भाव द्यावा म्हटले तरी तो देण्याची त्यांची ताकद नाही. आश्वासने खूप देतील पण त्यांचा खजिना रिकामा आहे. त्यांच्या खिशात रुपया नाही आणि खजिन्यात 'डॉलर'ही नाही. म्हणजे, सरकार नावाची गोष्टच आज देशात शिल्लक नाही.

मग शेतीचं धोरण स्वीकारायचं कोणी? स्वीकारणाऱ्या दोघांपैकी राहाता राहिलो फक्त आपण, शेतकरी, म्हणून या प्रचंड मेळाव्यात आपण देशातल्या सर्व शेतकऱ्यांच्या वतीने सांगतो आहोत की देशाचं शेतीविषयक धोरण कसं असावं ते आम्ही सांगतो आहोत. आपण जी 'राष्ट्रीय कृषिनीती' सर्व शेतकऱ्यांच्या वतीने स्वीकारतो आहोत त्याला जे महत्त्व आहे, जी प्रतिष्ठा आहे ती दिल्लीतील गुळाच्या गणपती सरकारच्या लोकसभेने कितीही जाहीरनामे प्रसिद्ध केले तरी त्यांना मिळणार नाही.

**भारत दशक**

१९९० मध्ये त्यावेळचे पंतप्रधान श्री. विश्वनाथ प्रताप सिंगांनी लाल किल्ल्यावरून 'किसान दशका'ची घोषणा केली. आम्ही विचारतो, "किसान दशक जाहीर करणारे तुम्ही कोण?" उलट, आम्ही इथं जमलेले लाख लाख शेतकरी येती दहा वर्षे 'भारत दशक' म्हणून जाहीर करीत आहोत. पंतप्रधान दररोज रेडिओ व टेलिव्हिजनवर येऊन सांगतात की, "देश संकटात आहे, आर्थिक अडचणीत आहे, शेतकऱ्यांनी पुढे यावे आणि देशाला परकीय चलनाच्या संकटातून सोडवावे." आम्ही आज देशातील सर्व शेतकऱ्यांच्या वतीने त्यांना प्रतिसाद देतो आहोत. कारखानदारांचं कोडकौतुक संपलं असेल तर या देशातला शेतकरी देशाला परकीय चलनाच्या संकटातून सोडविण्यासाठी आपला निर्धार जाहीर करीत आहे. आम्ही देशाला वाचविण्यासाठी येती दहा वर्षे ही 'भारत दशक' म्हणून घोषित करीत आहोत.

**चौफेर शेती**

या 'भारत दशका'चा कार्यक्रम काय असेल? आपण शेतकऱ्यांनी काहीही करायचं ठरवलं की पूर्वी मध्ये मध्ये येऊन अडथळे आणणारं सरकार होतं तसं

आता शिल्लकच उरलं नाही असं समजून आता आपल्याला शेती करावयाची आहे. ही शेती चार प्रकारची असेल. सीता शेती, माजघरातील शेती, व्यापारी शेती आणि निर्यात शेती.

**सीता शेती**

सीताशेती म्हणजे सीतेच्या काळात जशी शेती करीत त्याधर्तीवर शेती करणे. आजपर्यंत परकीय चलन खर्च करून जी वरखतं - युरिया, सल्फेटसारखी आणि औषधं वापरली जात होती ती वापरणे बंद करा. ती वापरून आजपर्यंत आपण खूप पिकवलं. जिथं पाच क्विंटल निघत होतं, तिथं २५ क्विंटल काढलं; पण सोन्याची कौलं काही आपल्या घरांवर चढली नाहीत, 'दिल्ली'ला मात्र ४० मजली इमारती उभ्या राहिल्या. रासायनिक खतांचा बिल्कुल वापर न करता शेतातल्या शेतात तयार होणाऱ्या जैविक पदार्थाचाच वापर करून शेती करणे म्हणजे सीता शेती. माझ्या मायबहिणी सीताशेतीचा आदर्श घालून देण्यात मागे राहणार नाहीत. आपल्या शेतकरी महिला आघाडीच्या लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमामुळे महाराष्ट्रामध्ये आजपर्यंत जवळजवळ एक लाख महिलांच्या नावाने शेतजमीन झाली आहे. सीतेला जे भाग्य लाभले नाही ते त्यांना लाभत आहे आणि येत्या काही वर्षांत महाराष्ट्रातल्या प्रत्येक महिलेच्या नावाने जमिनीचा लहानसा तुकडा का होईना, झालेला असेल अशी काळजी शेतकरी संघटना घेईल. आपल्या नावे जी जमीन झाली आहे त्या जमिनीवर रासायनिक खतांच्या वापराशिवाय शेती करायची सुरुवात मायबहिणी करतील.

**माजघरातील शेती**

दुसरा कार्यक्रम, माजघरातील शेती. यातसुद्धा मायबहिणीचा वाटा अधिक असेल. आपल्या शेतात तयार झालेला जो काही माल असेल, मग ती ज्वारी, बाजरी का असेना, तो पोत्यातून बाजारात गेला की त्या पोत्याबरोबर घरातील लक्ष्मीही बाहेर जाते. बाजारात जाण्याआधी, आपल्या शेतात तयार झालेल्या मालाला घरच्या लक्ष्मीचा हात लागला पाहिजे. सगळ्यांनाच त्यापासून पक्का माल तयार करता येईल असे नाही पण माला पोत्यातून पाठविण्याऐवजी तो घरच्याघरी निवडून स्वच्छ करून २ किलोच्या, ५ किलोच्या पिशव्यांत भरून बाराजात पाठविण्याची व्यवस्था केली तरीसुद्धा लक्ष्मी तुमच्या घरी राहणार आहे.

पण त्याहीपलीकडे आपल्या शेतीतील मालावर काही प्रक्रिया करूनच तो माल यापुढे बाराजात पाठविण्याची व्यवस्था करावी लागेल. प्रक्रिया करायची म्हणजे काही साखर कारखाने, सूतगिरण्या यांसारखे अवाढव्य कारखाने काढायचे

नाही. आजपर्यंत असे कारखाने जेथे जेथे निघाले आहेत तेथे तेथे फक्त चेअरमन गब्बर झाले, डायरेक्टर गब्बर झाले, शेतकऱ्याच्या मालावर प्रक्रिया करायची, ती माझ्या मायबहिणीची माजघरातील 'प्रक्रिया शेती' असेल, चेअरमन बनवायची प्रक्रिया नव्हे.

**व्यापारी शेती**

पुढचा कार्यक्रम व्यापारी शेतीचा. इथं मात्र आपल्याला सगळ्यांना भाग घ्यावा लागेल. शेतकऱ्याच्या घरात प्रक्रिया करून जो जो माल तयार होईल तो खपविण्याची जबाबदारी आपल्यावर येणार आहे. अगदी नजीकच्या काळामध्ये, शेतकऱ्यांनी तयार केलेला ताजा व उत्तम प्रतीचा माल ग्राहकांना इतर कुठल्याही ठिकाणांपेक्षा रास्त व कमी किमतीत मिळू शकेल अशा ५००० दुकानांची साखळी आपण महाराष्ट्रभर उभी करणार आहोत.

**निर्यात शेती**

चौथा कार्यक्रम निर्यात शेती. आपण देशाला परकीय चलनाच्या संकटातून मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी निर्यात ओघानेच आली. मग आधीचे तीन कार्यक्रम कशासाठी? आपला मूळ पाया पक्का असल्याखेरीज आपण निर्यात करायला गेलो तर टिकाव धरू शकणार नाही. आपण आता छोटे शेतकरी राहणार नाही, तर आपण आता आंतरराष्ट्रीय शेतकरी बनत आहोत. काही योजना तयार आहेत. माझा असा विश्वास आहे की येत्या दहा वर्षात आपण आपल्या एकूण उत्पादित मालापैकी १० टक्के मालाची निर्यात करू शकू आणि देशाला परकीय चलनाच्या संकटातून सोडवू शकू.

**शासनाला इशारा**

शेतकरी आता जागा झाला आहे. त्याने स्वीकारलेल्या – 'राष्ट्रीय कृषिनीती'ला अनुसरून सीता शेती, माजघरातील शेती, व्यापारी शेती आणि निर्यात शेती या चार प्रकारांनी आपला व्यवसाय चालविणार आहे. दिल्लीच्या खुर्चीवर बसलेले सरकार गुळाचा गणपती असला तरी शेतकऱ्यांच्या या प्रयत्नात अडथळे आणण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता आहे. कापूस, ऊस, दूध यांच्याबाबत हे सरकार जे निर्णय घेते आहे त्यावरून ही शक्यता अगदीच नाकारण्यासारखी नाही. त्यामुळे त्याबाबतीतही आपण सावध असले पाहिजे. आता आम्ही सरकारवर अवलंबून न राहता स्वतंत्र शेती, चौफेर शेती करायला लागलो आहोत. त्यातही जर सरकारने अडथळे आणण्याची वळवळ केली तर आपली आंदोलनाची ताकद त्यांना दाखवून देऊ. किसान समन्वय समितीच्या बैठकीतसुद्धा असा निर्णय झाला आहे, की सरकारने जर का शेतकऱ्यांच्या या प्रयत्नांत अडथळे आणले तर

देशव्यापी आंदोलन उभे केले जाईल.

आज आपण आपल्या पायावर उभे राहून आपले आणि आपल्या देशाचे भवितव्य घडविण्याचा निर्णय घेत आहोत. सरकारचं अस्तित्व संपलं आहे. त्यांच्या हातातली शस्त्रं निकामी झाली आहे. आर्थिक संकट आलं आहे ते संपूर्ण देशावर नाही तर इंडियावर. इंडियावर आलेलं हे आर्थिक संकट म्हणजे वर्षानुवर्षे गुलामगिरीत खितपत पडलेल्या भारताच्या दृष्टीने सुवर्णसंधी आहे आणि म्हणून ही नवीन प्रकारची लढाई सुरू होत आहे.

*(१० नोव्हेंबर १९९१ शेगाव मेळावा)*

*(शेतकरी संघटक २१ नोव्हेंबर १९९१)*

■■

# दुसऱ्या गणराज्याचा अर्थात, बळिराज्याचा ओनामा

**माझ्या शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो,**

भाषणाची सुरुवात मी 'माझ्या शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो' ने करतो आहे आणि माझं भाषण संपायच्या आधी मी तुम्हाला 'भारताच्या दुसऱ्या गणराज्याच्या पहिल्या नागरिकांनो' म्हणून हाक घालणार आहे.

या मेळाव्याच्या समोरापाचे भाषण करायला मी उभा राहिलो आहे. तरी वर्ध्याकडून येणाऱ्या रस्त्याने अजूनही मायबहिणी डोक्यावर गाठोडी आणि शेतकरी भाऊ हातात पिशव्या घेऊन मोठ्या संख्येने येतच आहेत. सगळं मैदान भरून गेलं आहे. या सर्व भावाबहिणींना किती लांबून यावं लागलं असेल, गाडीत काय काय अडचणींना तोंड द्यावं लागलं असेल, वर्ध्यात उतरलं म्हणजे जवळच सभा असेल अशी कल्पना करत आलेल्या या भावाबहिणींना वर्ध्यापासून इथं आठ किलोमीटरवर चालत यायला किती कष्ट पडले असतील आणि तरीही निदान शेवटचं भाषणतरी ऐकायला मिळावं म्हणून ही माणसं ओझी सांभाळत लगाबगा येत आहेत हे सगळे विचार मनात येऊन मन भरून येत आहे. आज हा समोरचा समुदाय बघून मला धन्य वाटत आहे.

**दोनदा अपशकून?**

सहा डिसेंबरला अयोध्येत आक्रित घडलं. सात डिसेंबरपासून आजपर्यंत मी अगदी बेचैन होतो. शेतकऱ्यांचं एक संघटन तयार व्हावे, त्यांच्या घामाला दाम मिळावा म्हणून मी आणि माझे सहकारी गेली दहाबारा वर्षे वणवण फिरलो. नाही नाही ती वाईटसाईट माणसं यशस्वी होताना दिसतात आणि आम्ही मुंबईला जमायचं ठरवलं, त्यावेळी अयोध्येमध्ये ते प्रकरण घडलं आणि मुंबईमध्ये आम्हाला जमता येईनासं झालं. काय घडलं आमच्या हातून की आम्हाला अशी शिक्षा व्हावी? पुन्हा हिम्मत बांधली, नऊ डिसेंबरच्या ऐवजी सव्वीस जानेवारीला कार्यक्रम ठरवला. जेव्हा हा कार्यक्रम ठरला तेव्हा माझ्या कार्यकर्त्या भावांनी

मला प्रश्न विचारला, ‘‘साहेब, पुन्हा काही गडबड व्हायची नाही ना?’’ मी म्हटलं, ‘‘आता कशी गडबड होईल? झालं ते अयोध्याबियोध्या; संपलं.’’

पण पुन्हा फसलो मी आणि सहा जानेवारीला पुन्हा मुंबईमध्ये दंगल घडली. ती दंगल काही हिंदूची नाही की मुसलमानांची नाही. मुंबईमध्ये दंगल कुणी घडवून आणली? सगळ्या वर्तमानपत्रांनी आता स्पष्टच लिहिले आहे, ‘‘तिथले गुंड, तिथेल पुढारी आणि जागेचे दलाल यांनी ही दंगल घडवून आणली.’’ पण, परिणाम आमच्यावर झाला. दंगलीने कुणाला काय मिळालं असेल ते असो, पण, त्या प्रकरणाची धग आम्हाला लागली आणि शेतकरी संघटनेने आखलेला कार्यक्रम दुसऱ्यांदा पुढे ढकलावा लागला.

**शेतकरी संघटना जिवंत प्रवाह**

मला अशी भीती वाटली होती की तिसऱ्यावेळी लोकांना जमा म्हणून सांगितलं तर लोक ‘लांडगा आला रे आला’ गोष्टीतल्याप्रमाणे कदाचित जमायचे नाहीत. कोणी सांगावं, याही वेळा कार्यक्रम पुढे ढकलला गेला तर? पण आज ज्या गतीनं हे विस्तीर्ण मैदान तुम्ही भरून टाकलं त्यामुळे गेल्या दोन महिन्यांतल्या माझ्या सगळ्या चिंता निघून गेल्या. ही शेतकरी संघटनेची गाडी म्हणजे काही इंडियातील कारखान्यात तयार झालेली गाडी नाही. किल्ली कितीही फिरवली तरी चालू होत नाही. आमची गाडी सेल्फ स्टार्टरची आहे. किल्ली फिरवली की लगेच चालू होते. नको असेल तेव्हा बंद करून ठेवता येते, पुन्हा हवी तेव्हा चालू करण्यात काहीच अडचण नाही.

नऊ डिसेंबरचा मुंबईचा कार्यक्रम रद्द झाला, सव्वीस जानेवारीचाही मुंबईचा कार्यक्रम रद्द झाला. मला असं वाटत होतं, की हे आमचा कार्यक्रम रद्द झाला ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे.

आज इथं सेवाग्रामला आल्यावर माझ्या असं लक्षात आलं की, ‘‘अरे नाही, घडली ती आपल्या भाग्याची गोष्ट घडली आहे.’’

**मुंबईचा अपशकून भाग्याचा**

आपण मुंबईला कशा करता जाणार होतो? मुंबईला जाणार होतो आम्ही चांगल्याच कामाकरिता. गव्हाची आयात थांबवावी म्हणून जाणार होतो. ‘बंदर न्हेरू, गद्दार गेहूँ, रोकेंगे।’ म्हणून जाणार होतो. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना काय दुसऱ्या काही चिंता नाहीत? खूप आहेत. महाराष्ट्रातला शेतकरी यंदा सगळ्या पिकांच्या बाबतीत पार नागवला गेला आहे. कापूस शेतकरी नागवला गेला आहे, ज्वारीच्या शेतकऱ्याची ज्वारी काळी पडली, ज्वारी विकत घ्यायला कुणी तयार नाही. आमची दुःखं आम्हाला खूप आहेत आणि तरीसुद्धा मुंबईला आम्ही जमा

होणार होतो, पंजाबमधल्या शेतकऱ्याच्या गव्हाचं दुःख, हरयाणामधल्या शेतकऱ्याच्या गव्हाचं दुःख पुढे मांडण्यासाठी. कारण, आम्ही म्हणतो 'सगळे शेतकरी भाऊ भाऊ' आमचं स्वप्न आहे की पंजाबहरयाणातल्या गव्हाच्या शेतकऱ्यावर संकट आलं तर ते निवारण्याकरिता महाराष्ट्रातला शेतकरी पुढे व्हावा आणि ज्वारीकापसावर संकट आलं तर ते निवारण्यासाठी तितक्याच हक्काने पंजाब आणि हरियाणाच्या शेतकऱ्यांनीसुद्धा उठून दिल्लीला उतरावं. मुंबईला आपण याकरिता जाणार होतो.

त्याचबरोबर, आपण असं म्हटलं की गव्हाची आयात हा काही साधा प्रश्न नाही. सबंध नेहरू-व्यवस्था ही याला जबाबदार आहे. हे धोरण नेहरूंनी चालवलं. शेगाव मेळाव्याच्या वेळी आपल्याला असं वाटलं होतं की, आता हे नेहरूंचं धोरण संपत आलं; पण नाही. ते नेहरूनीतीचं भूत पुन्हा एकदा आपल्या मानगुटीवर बसत आहे. हे भूत मानगुटीला बसायला नको असेल तर काय करायला पाहिजे? सगळ्या महाराष्ट्रात नेहरूनीतीच्या पुतळ्यांचं दहन करण्याचा कार्यक्रम आपण हाती घेतला आणि महराष्ट्रात जवळजवळ अडीच हजार पुतळे जाळले गेले. काही लोकांनी माझ्यावर टीका केली. ते विचारायला लागले की, "तुम्ही नेहरूंचे पुतळे का जाळता?" मी म्हटले, "माझा नेहरूंवर व्यक्तिशः राग नाही आणि मला जाहीररीत्या कबूल करायलाही काही हरकत वाटत नाही की मी एका काळी आकाशात परमेश्वर, हिंदुस्थानात पंडित जवाहरलाल नेहरू आणि महाराष्ट्रात एसेम जोशी ही तीन दैवतं मानत होतो; पण, ज्याला एका काळी मानलं, त्याच्या धोरणांचा काही भयानक परिणाम झाला, तो डोळ्यासमोर आला, तरीसुद्धा मी माझं मत बदललं नाही तर मी मोठी चूक केली असं होईल." रशियामध्ये मार्क्सचे एंगल्सचे, स्टॅलिनचे, लेनिनचे पुतळे होते; पण मार्क्स, एंगल्स, स्टॅलिन, लेनिन यांचं म्हणणं ऐकलं आणि आपल्या पोरांच्या हाती भिक्षापात्र आलं असं जेव्हा त्यांच्या लक्षात आलं तेव्हा रशियामधल्या लोकांनी एका रात्रीच्या आत मार्क्स, एंगल्स, स्टॅलिन, लेनिन यांचे पुतळे खाली खेचून काढले आणि नवीन प्रगती करायला ते मोकळे झाले.

**मुडदा जाळायलाच हवा**

जुने मुडदे किती दिवस सांभाळणार? नेहरूनीतीच्या दहनाचं कारण काय? एकदा घरातला माणूस मेला की, तो कितीही आवडता असो, मेला म्हणजे त्याचा दहनविधी करणं आवश्यक आहे. घरात मेलेल्या माणसाचा मुडदा ठेवून काही मिळत नाही आणि नेहरूनीती मेलेली आहे हे सांगायला माझ्याकडे दोन डॉक्टरांची सर्टिफिकेट्स आहेत. एका डॉक्टरचं नाव आहे पी.व्ही. नरसिंह

राव आणि दुसऱ्याचं डॉ. मनमोहन सिंग. यांनी जागतिक बँकेमध्ये जाऊन सांगितलं आहे की, ''आता ही जुनी नेहरूनीती संपली, आता पुन्हा आम्ही चूक करणार नाही.'' आता आम्ही बळिराज्याकडे जाणार आहोत. या दोन डॉक्टरांनी सांगितलं तेव्हा मी म्हटलं, ''हा मुडदा आता जाळून टाका.''

**घराण्याचीच पूजा**

तिकडे मार्क्स एंगल्स्‌चे पुतळे खाली ओढले. आमच्याकडे काय दिसतं? मुंबईच्या त्या बंदराला नेहरूंचं नाव दिलं आहे. नेहरूंचा बंदराशी काय संबंध आहे? सबंध देशामध्ये परिस्थिती अशीच. बंदरावर उतरलं तर बंदराचं नाव जवाहरलाल नेहरू, विमानतळावर उतरलं तर विमानतळाचं नाव इंदिरा गांधी, तिथून कोणत्या रस्त्यानं निघालो तर त्याचं नाव राजीव गांधी पथ, तिथून खेळ बघायला जावं तर त्या खेळाच्या स्टेडियमचं नाव संजय गांधी आणि तिथं ज्या काही खेळाचा सामना चालला असेल, मग तो फुटबॉलचा असो क्रिकेटचा असो, त्याच्या चषकाचं नावसुद्धा पुन्हा इंदिरा गांधी सुवर्णचषक! या देशात दुसरी नावं काही नाहीत? या देशामध्ये चांगलं काम करणारे दुसरे कुणी झालेच नाहीत?

**सरखेल कान्होजी आंग्रे बंदर**

मुंबईच्या या न्हावा-शेवा बंदराजवळ पंडित नेहरूंनी काय मोठी कामगिरी गाजवली? त्या जागी कामगिरी केली कुणी? छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिले आरमाराचे प्रमुख सरखेल कान्होजी आंग्रे यांनी तिथे ऐतिहासिक कामगिरी बजावली. त्या बंदराला कुणाचं नाव शोभेल तर ते सरखेल कान्होजी आंग्रे यांचं. आपण मुंबईत जाणार होतो ते या बंदराचं नेहरू नाव बदलून ते 'सरखेल कान्होजी आंग्रे' द्यायला जाणार होतो. आपण मुंबईला गेलो असतो तर नाव बदलण्याचा हा कार्यक्रम प्रत्यक्षात पार पडला असता; पण आज आपल्याला इथं सेवाग्रामला हा मेळावा भरवायला लागला आहे. आज आपण मुंबईला जरी नसलो तरी आज मी जाहीर करतो की न्हावा-शेवाच्या या बंदराचं नाव यापुढे 'सरखेल कान्होजी आंग्रे बंदर' करण्यात आले आहे. यापुढे 'नेहरू बंदर' हे नाव कुणीही वापरू नये. इतकंच नव्हे तर त्या भागातील शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना मी आदेश देतो की ज्यांना ज्यांना शक्य होईल त्यांनी त्या बंदराजवळील 'जवाहरलाल नेहरू' हे नाव खोडून त्याऐवजी 'सरखेल कान्होजी आंग्रे बंदर' असे नाव लिहा. पोलिस जो काही खटला भरतील त्याची जबाबदारी मी घेतो.

बस. मुंबईला गेलो असतो तर एवढंच काम झालं असतं. आपण गव्हाच्या आयातीचा निषेध केला असता, दोन तीन दिवस गहू थांबवला असता. त्या

बंदराचं नाव बदललं असतं आणि परत आलो असतो.

पण, हा कार्यक्रम स्थगित करावा लागला, २६ जानेवारीला दुसऱ्यांदा स्थगित करावा लागला; एकदा अयोध्येच्या दंगलीमुळे, दुसऱ्यांदा मुंबईच्या दंगलीमुळे. आता मला प्रामाणिकपणे असं वाटतं की, आपल्याला काही वेगळ्या हेतूने हा कार्यक्रम स्थगित करणं भाग पडलं. कार्यक्रम बदलून इथं सेवाग्रामला आपण जमलो यामागे काही हेतू आहे असं मला वाटतं. तुम्हा सगळ्यांना सेवाग्रामचा इतिहास माहीत आहे.

**महात्माजींचे अपूर्ण स्वप्न**

गांधीजी आफ्रिकेतून आले, तेव्हा त्यांनी अहमदाबादजवळ साबरमतीला आश्रम काढला. तिथून त्यांचं कार्य चालू होतं. म. गांधी साबरमतीच्या आश्रमातून दांडीला मिठाचा सत्याग्रह करायला निघाले. आश्रमातून पाऊल बाहेर टाकताना त्यांनी म्हटलं, ''आता या आश्रमात हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतरच परत येईन. परतंत्र हिंदुस्थान असेतो येणार नाही.'' त्यावेळी त्यांनी एक घोषणा दिली होती, ''माझ्या सगळ्या भारतवासीयांनो, इंग्रज सरकारला काढून टाकायचे आहे तर यात कठीण काय आहे? पहिल्यांदा, तुमच्या मनातली भीती काढून टाका. इंग्रज राज्य आम्ही मानत नाही असं एकदा तुम्ही स्वतःला सांगा, इंग्रजांशी कोणतंही सहकार्य करणार नाही असं ठरवा. विद्यार्थ्यांनो, शाळा सोडून द्या. नोकरदारांनो, नोकऱ्या सोडून द्या. इंग्रज सरकार जणू इथं नाहीच असं वागा.'' महात्मा गांधींनी सांगितलं, ''तुम्ही एवढं करा, मी तुम्हाला एका वर्षात स्वराज्य मिळवून देतो.'' जमलं नाही. कारण, लोकांनी विश्वास ठेवला नाही. लोकांनी जो काही आंदोलनामध्ये भाग घ्यायला पाहिजे होता तो घेतला नाही. एक वर्ष होऊन गेलं, स्वातंत्र्य मिळालं नाही. साबरमतीला परत जायचं नाही. अशा निराश अवस्थेमध्ये त्या महात्म्यानं शेवटी इथं सेवाग्रामला येऊन मुक्काम केला. तुम्ही आता येताना बापूंची कुटी पाहिली. प्रत्येकवेळी ती कुटी पाहताना १९३० सालापासून १९४७ सालापर्यंत या कुटीमध्ये बसल्या बसल्या बापूजींच्या मनामध्ये काय काय विचार आले असतील याची कल्पना करून माझ्या पोटामध्ये गोळा उठतो.

या सेवाग्रामचं आणखी एक महत्त्व आहे. महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू हे एकमेकांना अत्यंत प्यारे होते; पण त्यांच्यामध्ये एक मोठा मतभेद होता. गांधींचं म्हणणं असं की सगळ्या देशाचा विकास व्हायचा असेल, गरिबी हटायची असेल तर ती खेड्याच्या विकासातून हटेल. खेडं मोठं करा, खेडं श्रीमंत करा म्हणजे देश आपोआप श्रीमंत होतो, असं गांधीजींचं म्हणणं होतं.

पंडित नेहरूंचं म्हणणं उलटं होतं. त्यांचं म्हणणं होतं, की गावं नाही, शहरं मोठी करा; कारखाने बांधा. शहरं मोठी झाली, कारखाने आले म्हणजे देशाचा विकास होतो.

दोघांनी एकमेकांशी चर्चा केली. दोघांनी एकमेकांना पत्रं लिहिली आणि महात्मा गांधींनी एका पत्रामध्ये पंडित जवाहरलाल नेहरूंना म्हटलं, "कारखानदारी म्हणजे देशाचा विकास असं जर तुझं मत ठाम असेल तर तुझ्या मताविरुद्ध लढा करायला स्वतंत्र हिंदुस्थानातसुद्धा मी पुन्हा उभा राहीन."

हा लढा झाला नाही. पंडित नेहरू पंतप्रधान झाले आणि त्यानंतर नवीन नेहरूसरकार ज्या तऱ्हेची धोरणं आखायला लागले ते पाहून गांधीजींच्या सगळ्या जवळच्या माणसांना चिंता वाटायला लागली. ज्या स्वातंत्र्याची आपण इतके दिवस वाट पाहिली ते स्वातंत्र्य आलं, लाल किल्ल्यावर झेंडा फडकला पण ही जी काही नवीन धोरणं आहेत ती काही गांधीजीची धोरणं नाहीत; वेगळीच, विचित्र धोरणं आहेत.

या सेवाग्रामला बैठक ठरलेली होती. मला आठवते त्याप्रमाणे ४ फेब्रुवारी १९४८ रोजी ही बैठक व्हायची होती. दिल्लीला आणखी एक दोन दिवस राहून गांधीजी इकडे सेवाग्रामला यायला निघणार होते आणि नेहरूपद्धतीचा तोंडवळा असलेली देशाची अर्थव्यवस्था न ठेवता गावावर आधारलेली, गांधींच्या पद्धतीची अर्थव्यवस्था कशी व्हावी याची चर्चा इथं व्हायची होती. हे सगळं फसलं. किती दिवसांनी फसलं? फक्त चारपाच दिवसांनी. ४ फेब्रुवारीला महात्माजी इथं यायचे होते आणि ३० जानेवारीला त्यांची हत्या झाली. एक कालखंड संपला.

**नेहरू-अमलाचा अंत**

६ डिसेंबरला जेव्हा बाबरी मशीद पाडली तेव्हा संध्याकाळी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव रेडिओवर बोलले. ते काय म्हणाले? ते म्हणाले, "आज बाबरी मशीद पाडली. ही महात्मा गांधीच्या हत्येनंतर घडलेली सर्वांत मोठी दारूण घटना आहे." पी. व्ही. नरसिंहराव त्यावेळी फार मोठं बोलून गेले. त्यांना कल्पना नसेल इतकं मोठं सत्य बोलून गेले.

ज्या दिवशी बापूजींना गोळी लागली आणि ते गेले त्या दिवशी गांधीयुगाचा अंत झाला. गांधीयुग संपलं आणि त्या दिवशी चालू झाला पंडित नेहरूंचा अंमल; युग नव्हे, अंमल. गेली ४५ वर्षे तो चालू आहे; पण जेव्हा बाबरी मशीद पडली त्या दिवशी नेहरू - अमलाचा अंत झाला. नेहरूंनी जी काही व्यवस्था तयार केली ती संपलेली आहे आणि हिंदुस्थानामध्ये १९५० मध्ये जी घटना लिहिली गेली ती घटना, त्या सालापासून जे गणराज्य तयार झालं ते गणराज्यसुद्धा

संपलं आहे. त्याचा मुडदा झाला आहे. तो जाळायचा केव्हा त्याची तारीखच फक्त ठरायची आहे. दुसरं गणराज्य येणार आहे, नाही तर हा देश फुटणार आहे.

**यादवीची लक्षणे**

मी हे का म्हणतो, लक्षात घ्या. अयोध्येच्या प्रश्नावर दंगा झाला. ६ डिसेंबरला मशीद पडली आणि दंगा झाला, समजण्यासारखं आहे. कुणा हिंदुची डोकी फिरली, कुणा मुसलमानांची डोकी फिरली. भावाभावामध्येसुद्धा असं भांडण होतं; पण जानेवारी महिन्यात जी दंगल झाली ती अशी साधी नाही. त्यात हिंदू आणि मुसलमान असा काही संबंध नाही. हिंदू म्हणजे फक्त मुंबईतला हिंदू आणि मुसलमान म्हणजे फक्त मुंबईचा मुसलमान असं नाही ना? आपल्या गावांतही हिंदू आहेत, मुसलमान आहेत; मग दंगा झाला तो फक्त मुंबईत झाला. कोणत्याही गावात झाला नाही याचं कारण काय? याचं कारण दंगा हा हिंदू म्हणून झाला नाही, मुसलमान म्हणून झाला नाही; दंगा ज्यांना करायचा होता त्यांनी दंगा मुद्दाम करवून आणला, घडवून आणला. का घडवून आणला, समजून घ्या.

**दंग्याचे रसायन**

रामाचे नाव भक्तीनं घेणारी माणसं फार थोडी. रामायण आयुष्यात एकदा तरी वाचलं असेल अशी माणसंही थोडी. दंगा का झाला ते समजावून घ्या, कारण आपल्या गणराज्याचं, दुसऱ्या गणराज्याचं सगळं यश त्यावर अवलंबून आहे.

गेल्या महिन्यात राष्ट्रीय एकात्मता परिषदेची बैठक भरली होती. त्या बैठकिमध्ये अयोध्येतील या मंदिराविषयी चर्चा झाली. सगळे लोक भारतीय जनता पार्टीला खूप नावं ठेवत होते. मी काही भारतीय जनता पार्टीविषयी चांगलं बोलणारा माणूस नाही. मीटिंगनंतर चहाच्यावेळी गृहमंत्री शंकरराव चव्हाणांना मी म्हटलं की, "शंकरराव, सगळ्यांनी भाजपावर टीका केली हे ठीक आहे, पण काँग्रेसवाल्यांना भाजपावर टीका करण्याचा अधिकार नाही. तुमचं म्हणणं की सत्ता मिळविण्याकरिता त्यांनी रामाच्या मंदिराचं भांडवल केलं, एवढंच ना? मग तुम्ही काय केलं इतके दिवस? तुम्ही इतके दिवस नेहरू-गांधी घराण्याचं नाव घेतलं आणि सत्ता हाती ठेवली. परिस्थिती अशी तयार केली की प्रियांका गांधीचं नाव आसाममध्ये माहीत आहे; पण अटल बिहारी वाजयपेयींचं नाव तेथे कोणाच्या कानी पडलेलं नाही. नेहरू घराण्यातल्या पाळण्यातल्या बाळाचं नाव हिंदुस्थानातल्या सगळया कोपऱ्यात माहीत होतं; पण आयुष्य कुर्बान केलेल्या नेत्याचं आणि देशभक्ताचं नाव माहीत होत नाही. मग, त्यांनी काय केलं; भाजपाची त्यात चूक काय?

तुम्ही एक घराणं - नेहरू घराणं वापरलं, त्यांनी त्याच्यापेक्षा जुनं घराणं; सत्ता मिळण्याकरिता. तेही चोर, तुम्हीही चोर."

**सत्ता - जादूई चिराग**

असं का झालं? सत्तेकरिता लोक इतके पागल का होतात? त्याचं कारण मी संघटनेच्या मेळाव्यांमध्ये अनेकदा सांगितलं आहे. शेती करा, नांगर चालवा, कष्ट करा, आयुष्याच्या शेवटापर्यंत मळकं धोतर बदलायची काही शक्यता नाही. उलट, बापानं तुमच्याकरिता जी काही जमीन ठेवलेली असेल त्यातली दोनचार एकर विकूनच तुम्ही तुमच्या पोराच्या हाती देता. शेती जमत नाही म्हणून दोन गाई ठेवल्या, चार म्हशी ठेवल्या, दूध काढलं तरी दूध विकून कुणी माडी बांधली असं उदाहरण मला अख्ख्या महाराष्ट्रात सापडलं नाही; पण दूध विकायच्या ऐवजी जर का गावच्या सोसायटीचा चेअरमन झाला तर मात्र एका वर्षामध्ये तो माडी बांधतो. यातलं रहस्य लक्षात ठेवा. तुम्ही कितीही कष्ट केले तरी तुम्हाला काही मिळायची शक्यता नाही, पण निवडणूक लढवली आणि निवडणूक जिंकलो म्हणजे मग सगळं काही भरपेट मिळतं हे दूध सोसायटीच्या बाबतीतही खरं.

अरबी सुरस कथांमध्ये एक गोष्ट असते ती तुम्ही सर्वांनी ऐकली असेल. एखादं पोरगं उनाड असतं. त्याचे आईबाप त्याच्यावर रागावतात आणि त्याला घरातून काढून लावतात. मग ते पोरगं बाहेर पडतं. सदा सर्वकाळ उनाडक्याचं केल्यामुळे आता काय करावं ते त्याला समजत नाही. मग त्याच्या नशिबानं त्याला एक जादूची अंगठी किंवा जादूचा दिवा सापडतो. एकदा का ती अंगठी किंवा दिवा हातामध्ये आला की एक राक्षस समोर उभा राहतो. मग तो राक्षस विचारतो, "मालक, काय करू मी तुमची सेवा?" मग त्यानं नुसतं सांगायचं, "आता मला भूक लागली आहे, ताटभर जेवायला दे." पोट भरलं की पुन्हा दिवा घासायचा, की राक्षस हजर. विचारतो, "काय देऊ." मग, "मला एक मोठा महाल बांधून दे." म्हणायचं. ताटभर जेवण असो की मोठा महाल असो की सगळ्या जगातली सुंदर राजकन्या असो दिवा घासला की काय वाटेल ते मिळतं. तशी ही सत्तेची खुर्ची म्हणजे 'जादूचा दिवा' झाला आहे. कोणाही नालायक माणसाच्या हाती हा दिवा गेला अन् त्यानं दिवा घासला की त्याला सगळं काही मिळतं. कॉलेजमध्ये कॉपी करताना सापडली म्हणून नापास झालेली पोरं, नंतर शिक्षणमंत्री बनतात आणि दिल्लीलासुद्धा जाऊन आणखी काही बनतात आणि एकदा का मंत्री झाला की हा पोरगा किती उनाड होता, किती गुंड होता, टवाळ्या करत कसा फिरत होता याच्याकडे न पाहता मोठे मोठे विद्वान,

विश्वविद्यालयांचे कुलगुरूसुद्धा त्याला वाकून सलाम घालतात.

**नेहरू - जादूच्या दिव्याचे जनक**

हा 'जादूचा दिवा' कुणी तयार केला. हा जादूचा दिवा नेहरूंनी तयार केला. दिल्लीमधील खुर्चीत इतकी काही ताकद ठेवली की ती खुर्ची ज्याला त्याला हवीहवीशी वाटते, हा 'जादूचा दिवा' आपल्या हाती लागावा असं वाटतं आणि मग तो हस्तगत करण्यासाठी लोक काय वाटेल ते करायला तयार होतात. आपल्या गावाचं उदाहरण घेतलं तरी समजू शकेल. दूध सोसायटीचा चेअरमन, चेअरमन झाल्यानंतर चार पैसे चांगले कमावतो म्हणून सोसायटीच्या निवडणुकीकरता लोक काय वाटेल ते करतात; याला पळव, त्याला पळव, सगळं काही करतात; पण त्याच्याऐवजी, दूधसोसायटीचा चेअरमन झाला म्हणजे दोन पैसेसुद्धा मिळत नाहीत, उलट प्रसंगी खिशातले चार पैसे काढून सोसायटीचं काम करायला लागतं अशी परिस्थिती असती तर निवडणुकीमध्ये कुणी आलंच नसतं, निवडणूक लढवायला. ज्यानं त्यानं दुसऱ्यालाच पुढे केलं असतं. लोक आज निवडणूक लढवायला का धावतात? तिथं गेल्यावर सगळं काही विनासायास मिळतं म्हणून धावतात. गावच्या दूधसोसायटीचं जे खरं तेच दिल्लिच्या खुर्चीचं खरं. या नेहरूव्यवस्थेने त्या 'जादूच्या दिव्या'ला इतकं काही आकर्षण तयार केलं आहे की तो मिळविण्याकरिता कोणी कोणी काय काय पापं केली याची यादी करायला बसलं तर दिवस दिवस लागतील.

**सत्तेसाठी कसलेच सोयरसूतक नाही**

१९५२ मध्ये इंदिरा गांधींनी निवडणुकीनं निवडून आलेलं केरळातलं कम्युनिस्टांचे सरकार पाडलं, पहिलं पाप. काश्मीरमधलं शेख अब्दुल्लांचं सरकार पाडलं, पंजाबमध्ये काँग्रेसचं राज्य टिकावं म्हणून भिन्द्रानवाल्यांना उभं केलं, ते इंदिरा गांधींनी केलं. निवडणुकीने आपल्या हाती सत्ता राहावी म्हणून राजीव गांधींनी शहाबानो प्रकरणामध्ये फेरफार केली, बोफोर्स प्रकरणात कमिशन खाल्लं. जनता दलाने हातामध्ये सत्ता यावी म्हणून 'मंडला'चा राक्षस उभा केला आणि उद्या अजून द्वारका, मथुरा, काशी मशीद असे किती राक्षस उभे राहणार आहेत कुणास ठाऊक?

याचा अर्थ काय? याचा अर्थ राम महत्त्वाचा नाही; 'गर्व से कहो, हिंदू है।' म्हणणारांच्या मनामध्ये हिंदू धर्माचा गर्व अजिबात नाही. यांच्या मनात आहे खुर्चीवर जाऊन बसणे. कारण, त्या खुर्चीवर बसलं म्हणजे जादूचा दिवा हाती येतो आणि मग सगळी सुखं आपल्या हाती येतात. असा हा स्वार्थांधांचा खेळ नेहरूव्यवस्थेने शक्य झाला.

**समस्या आणि सत्ता अद्वैत**

अयोध्या प्रश्न सोडवून समस्या संपतील? नाही संपणार. अयोध्येच्या ऐवजी नवीन वाद तयार करतील. कारण वाद तयार केला म्हणजे खुर्ची मिळते. खुर्ची मिळाली म्हणजे लायसेन्स द्यायला मिळतं, परमिट द्यायला मिळतं, परवानगी द्यायला मिळते, गॅसचं कनेक्शन पाहिजे असलं तरी देता येतं, टेलिफोन देता येतो, सोसायटी काढायची तरी देता येते, साखर कारखानाही देता येतो. म्हणून या सगळ्या ताकदीकरिता लोक रामाचं नाव घेतात, रहिमाचं नाव घेतात; उद्या आणखी कुणाचं घेतील.

हा प्रश्न सोडवायचा मार्ग एकच आहे. अयोध्येचा प्रश्न सोडवून हा वाद संपणार नाही. काय करायला पाहिजे? लक्षात ठेवा, सत्तेचा हा जादूचा दिवा म्हणजे पाप आहे. जोपर्यंत हे पाप आहे तोपर्यंत सत्तेकरिता लालचावलेली सगळी माणसं काय वाटेल ते करायला तयार आहेत. त्या खुर्चीतली सत्ता काढून टाका. चेअरमनला चार हरामाचे पैसे कमावता येणार नाहीत अशी चोख व्यवस्था ठेवा, म्हणजे चेअरमन व्हायचा कोणी प्रयत्न करणार नाही. पंतप्रधान बनलं म्हणजे सगळी काही मौजच मौज आहे असं वाटायच्या ऐवजी पंतपधान म्हणजे मोठी जबाबदारी आहे; कोण करणार त्या फुकटच्या लष्करच्या भाकऱ्या भाजायचं काम? अशी जर का परिस्थिती झाली तर हिंदुस्थान वाचेल, तर अयोध्येसारखे नवे प्रश्न निर्माण होणार नाहीत, तर नवी अर्थव्यवस्था येण्यात अडथळे येणार नाहीत, तर शेतकऱ्याच्या घामाला दाम मिळणारी व्यवस्था येईल.

थोडक्यात काय? या नेहरूव्यवस्थेने शेतकऱ्यांचं वाटोळ केलं. शेतकऱ्यांना लुटलं, कर्जात बुडवलं, देशालासुद्धा कर्जात बुडवलं, सोनंसुद्धा बाहेर देशात गहाण ठेवायला लावलं अशी परिस्थिती या नेहरूव्यस्थेने एका बाजूला आणली आणि म्हणून त्याचा निषेध करण्याकरिता आपण मुंबईला जाणार होतो.

**सरकार किमान असावे**

या सेवाग्रामच्या गांधीबाबाने आपल्याला सूचना दिली की अरे हा आजार इतका लहान नाही. तुम्हाला वाटतं त्यापेक्षा मोठा आजार आहे. हा नुसता नेहरू – अर्थव्यस्थेच्या निषेधाने बरा होणारा नाही. देश वाचवायचा असेल तर सगळं सरकार बदललं पाहिजे. सगळी घटना बदलली तर हे जमेल आणि घटना बदलायची म्हणजे काय करायचं? सरकारकडे फायद्याचं कलम ठेवायचं नाही. शेती कशी चालायची, अर्थव्यवस्था कशी चालायची, कारखाने कसे चालवायचे हे ठरवायचं काम सरकारचं नाही. सरकारचं काम म्हणजे कोणी चोरी केली त्याला पकडून आणा, कुणी खून केला त्याला पकडून आणा, परदेशातील कुणी

हल्ला केला तर तो परतवून लावा. आजच्या सरकारचे पोलिस एवढंच काम करीत नाहीत. चोरांना आणि दरोडेखोरांना सोडून बाकी सगळ्यांना पकडण्याचं काम पोलिस करतात.

**पायताण पायातच हवे**

सरकारचं काम कायदा व सुव्यवस्था ठेवणं एवढंच फक्त असायला हवं. म्हणजे, सरकार असणं आवश्यक आहे, सरकार काही बंद करून चालत नाही. घरामध्ये आपल्याला संडास लागतो ना? दिवसातलं जे थोडं अस्वच्छ काम करायला लागतं त्याला संडास लागतो. तसं समाजामध्ये काही चोर असतात. काही दरोडेखोर असतात; त्याच्याकरिता सरकार लागतं; पण सरकारची जागा म्हणजे घरातल्या शौचकूपासारखी आहे. त्या सरकारला दिवाणखान्यात जागा देऊ नका.

सरकारकडे एवढंच काम द्या. आर्थिक बाबतीत हात घालू नका, शेतकऱ्याचा भाव पाडायचा प्रयत्न करू नका आणि ज्याला त्याला मानानं आणि सन्मानानं जगता येईल अशी परिस्थिती तयार होऊ द्या अशी सरकारला ताकीद द्या. आज न्यायालयाचे न्यायाधीश फालतू उपमंत्र्याला घाबरतात. परवा एका सभेत मी म्हटलं की, ''उपमंत्री आले तर आमच्या विश्वविद्यालयाचे कुलगुरूसुद्धा वाकून वाकून नमस्कार करतात.'' त्या सभेत एक प्राध्यापक होते; तर ते म्हणाले, ''शरदराव, तुम्ही आमचा फारच सन्मान केला. प्राध्यापक किंवा कुलगुरू हे उपमंत्र्याला घाबरतात असं तुम्ही म्हणालात म्हणजे आमचा फार मोठा सन्मान झाला. आम्ही तर उपमंत्र्याचा चपराशी आला तरीसुद्धा त्याच्यापुढे घाबरून वाकून वाकून उभे राहतो.''

ही नेहरूराज्याची परिणती. हे नेहरूराज्य संपून न्यायाधीश न्यायाधीशाप्रमाणे वागतील, प्राध्यापक विद्वान प्राध्यापक विद्वानांप्रमाणे वागतील; जे कुणी राजकीय नेते आहेत त्यांचे सगळे गुलाम अशी व्यवस्था राहणार नाही असं दुसरं गणराज्य आलं पाहिजे.

**महात्माजींचा संदेश दुसऱ्या गणराज्याचा**

आपलं भाग्य असं की आपला कार्यक्रम ९ डिसेंबरला मुंबईला झाला नाही, २६ जानेवारीला मुंबईला झाला नाही, या गांधीबाबांनी आपल्याला हाक मारली की, ''अरे किती वर्षे झाली मी इथं वाट पाहतो आहे.'' गांधीवाद संपून नेहरूंचा अंमल चालू झाला तो नेहरूंचा अंमल संपलेला मला पाहू दे अशी या बाबाने आपल्याला हाक घातली म्हणून आपल्याला इथं जमायचा योग आला.

मग हे दुसरं गणराज्य आणायचं कसं? सरकारने कोणत्याही आर्थिक बाबतीत

हात घालू नये असं करायचं कसं? तो संदेशसुद्धा या गांधीबाबाने आपल्याला देऊन ठेवला आहे. तुम्ही मनातून हे सरकार काढून टाका. हे सरकार नाहीच, असं समजून तुम्हाला जे जे काही करायचं असेल ते करायला लागा. 'एका वर्षाच्या आत स्वराज्य' ही महात्मा गांधींची घोषणा. आज त्यांच्या साक्षीने आपण इथं प्रतिज्ञा घेऊ या की आम्हीसुद्धा एका वर्षाच्या आत बळिराज्य आणून देतो; पुढच्या ३० जानेवारीच्या आत इथं बळिराज्य तयार झालेलं दिसेल.

**बळिराज्यचा कार्यक्रम**

बळिराज्य तयार व्हायचं, तर काय करायला पाहिजे? सरकार जिथं जिथं अर्थकारणात हात घालत तिथं तिथं आम्ही सरकारला मानायला तयार नाही. सरकारने कायदा तयार केला आहे, कोणाला पाहिजे तो कारखाना काढता येतो; लायसेन्सची गरज नाही, परमिटची गरज नाही; पण शेतकऱ्याला मात्र हे स्वातंत्र्य नाही. शेतकऱ्याला तर लायसेन्स पाहिजे. दुधावर प्रक्रिया करण्याचा कारखाना काढायचा झाला तर लायसेन्स पाहिजे, फळांपासून काही करायचं झालं, अगदी मुरंबा करायचा झाला तरी लायसेन्स पाहिजे, विदर्भातल्या कापूस शेतकऱ्याने ठरवलं की आपल्या कापसाची रूई करण्याकरिता एखादा रेचा टाक तर त्याला परवानगी नाही आणि भंडाऱ्याच्या, कोकणच्या शेतकऱ्यांनी ठरवलं की माझं भात सडण्याकरिता मी स्वतः भातगिरणी घालतो तर त्याला परवानगी नाही. हे सरकारचं 'परवानगी नाही', 'निर्बंध आहे', 'हे करू नको', 'ते करू नको', जे आहे यापैकी आम्ही आता काहीसुद्धा मानायला तयार नाही. आज शेतकरी संघटना तुम्हाला परवानगी देत आहे. आता ते नियम संपले. ज्याला ज्याला भात सडायची गिरणी घालायची आहे त्यांनी त्यांनी ती घालावी, ज्याला ज्याला कपाशीचे रेचे घालायचे आहेत त्यांनी त्यांनी ते घालावेत. कोणाच्या परवानगीची गरज नाही. कोण पोलिस येतात आणि आपल्याला अटक करतात पाहूया. अटक झाली तर त्या माणसाबरोबर लाख लाख शेतकरी तुरुंगात जायला तयार आहेत.

आपल्या महाराष्ट्रात कापसाची एकाधिकार खरेदी आहे. हे एकाधिकार वगैरे आम्ही काही मानत नाही. व्यापाऱ्यांना विदर्भात, नांदेड-परभणीत, महाराष्ट्रात कुठेही कापूस खरेदी करण्याची मुभा पाहिजे. सरकारला खरेदी करायची असेल तर सरकारनेही करावी, हवं असेल तर खुशाल एकाधिकाराचे नाव लावून खरेदी करावी. तुम्ही खरेदी करू नका असं आम्ही म्हणत नाही; पण त्याबरोबर दुसऱ्या कोणाला खरेदी करू न देणं, खुला व्यापार थांबवणं हे मुक्त अर्थव्यवस्थेत बसत नाही. आमच्या दुसऱ्या गणराज्यात हे बसत नाही. बळिराज्यात अशी बंदी असू शकत नाही. विदर्भातल्या शेतकऱ्यांना मी आज आश्वासन देतो की

पुढच्या वर्षी जर का कापूस एकाधिकार खरेदीच्या बरोबर मुक्त व्यापार इथे चालू दिला नाही तर शेतकरी संघटना स्वतः कापूस खरेदी करण्याचं काम करेल आणि हिंदुस्थानात, परदेशांत आवश्यक तिथे नेऊन विकेल.

आमच्या हातातल्या या, नेहरूंनी घातलेल्या बेड्या त्यांच्या पहिल्या गणराज्याच्या पतनाबरोबर आणि अयोध्येच्या मशिदीबरोबर पडून गेल्या आहेत. बियाणं आयात करायचं आहे, तर आम्ही करणार आहोत. तुम्ही थांबवणारे कोण? कापसाची निर्यात आम्ही करणार आहोत. तुम्ही थांबवणारे कोण? कांदा आम्ही पाठवायचा नाही, तो नाफेडमार्फतच गेला पाहिजे असं म्हणणारे तुम्ही कोण? जे जे म्हणून करण्याची आमच्यामध्ये ताकद आहे, जे जे आम्ही करू शकतो, ते आम्ही करणार आहोत. तुमची काय पोलिसांची ताकद आहे? फार फार तर आम्हाला पकडाल, इतकंच ना?

आणखी एक मुद्दा. महाराष्ट्र सरकार कायद्याच्या ४८ (अ) कलमाने शेतकऱ्याचा शेतीमाल विकल्यानंतर शेतकऱ्याने सोसायटीतून काढलेल्या कर्जाची रक्कम वळती करून घेण्याची व्यवस्था आहे. ही व्यवस्था बळिराज्यात, दुसऱ्या गणराज्यात बसत नाही. नेहरू - राज्यातील ही व्यवस्था आजपासून संपली असं आम्ही जाहीर करतो.

आपला माल आपण शहरात घेऊन आलो तर ते म्हणतात कृषि उत्पन्न बाजार समितीतच गेलं पाहिजे. माझ्या घरची भाजी, मी टोपली घेऊन रस्त्यावर बसायला या नेहरूवादाच्या राक्षसाने आम्हाला बंदी केली होती. आजपासून ती बंदी संपली. तुमचा माल जिथं घेऊन जाता येईल, जिथं बसून विकता येईल, देशात परदेशात, तुम्ही विका. काय कोण शिक्षा करील ती आपण सगळे मिळून भोगू.

सहकारी संस्था, आम्हाला काढायची आहे. आम्ही दहा अकरा जणांनी बसून सोसायटी काढली आणि अर्ज केला तर वरचा साहेब म्हणतो, "नाही, तुम्हाला सोसायटी काढता येणार नाही. कारण अशी सोसायटी काँग्रेसच्या एका पुढाऱ्याने आधीच काढलेली आहे." साखर कारखाना काढला तुम्हाला परवानगी नाही कारण आमच्या पुढाऱ्याने आधीच काढलेला आहे. सहकारामध्ये अकरा शेतकरी एकत्र आले की त्यांना सहकारी संस्था काढायचं स्वातंत्र्य हे बळिराज्य- दुसरे गणराज्य देत आहे. सरकारची वाट न पाहता तुम्ही संस्था चालू करा. पाहू काय होते ते?

### बळिराज्याच्या वाटचालीचा मार्ग

हे सगळं करायचं तर तुम्ही सर्वांनी मनातली भीती काढून टाका. हे माझं वाक्य नाही, या गांधीबाबांचं वाक्य आहे. त्याचा रस्ता आपले नवे अध्यक्ष पाशा

पटेल यांनी नोकरदारासंबंधीच्या ठरावाने आखून दिला आहे. लक्षात ठेवा, आता तुम्हाला या नोकरदारांना घाबरून चालायचं नाही. इतके दिवस तुम्ही एखादा नोकरदार अधिकारी आला की म्हणत होता, ''तसं बरं चाललंय, पण आमच्यावर जरा कृपादृष्टी असू द्या'' आणि त्याच्यापुढे वाकत होता. आपल्या अध्यक्षांनी मांडलेल्या ठरावाने उद्यापासून काय होणार आहे, माहीत नाही? आता तुम्ही त्याला बाबा म्हणा, वाघ म्हणा, का वाघ्या म्हणा, का वाघोबा म्हणा, तो तुम्हाला खायलाच येणार आहे. उद्याची वर्तमानपत्रं हे सगळे अधिकारी वाचणार आहेत. पाशा पटेलांचं भाषण वाचणार आहेत आणि तुम्ही त्याच्यासमोर गेलात म्हणजे तुम्हाला ते विचारणार आहेत, ''काहो, तुम्ही शेतकरी ना? तुम्हाला आमचा पगार वाढायला नको काय? आणि तुम्हाला आमची बढती व्हायला नको काय? आम्ही भ्रष्टाचार करू नये असं तुम्हाला वाटतं काय?'' असं म्हणून तो आता तुमच्या नरड्याला धरणारच आहे. सिंहगडावर तानाजी पडला आणि मावळे घाबरून पळायला लागले. तेव्हा शेलारमामा काय म्हणाला, ''अरे आता पळता कुठे? मागचे दोर मी केव्हाच कापून टाकले आहेत. तसं, पाशा पटेलांनी तुमचे मागचे सगळे दोर कापून टाकले आहेत.'' तुम्हाला पुढंच जाऊन लढाई देणं भाग आहे.

तेव्हा आता उद्यापासून घाबरायचं सोडून द्या. छाती पुढं काढून या अधिकाऱ्याला सांगा, ''अरे ए, तू माझा नोकर आहेस, माहीत आहे का तुला? तू नोकर सरकारचा नाही, तू नोकर माझा आहेस.'' ही हिम्मत जर तुम्ही ठेवली तर दुसऱ्या गणराज्याचे तुम्ही नागरिक झाला, तर बळिराज्याचे सैनिक झालात असं समजा.

या सगळ्या लढाईमध्ये किती वेळा चिंता केली, किती वेळा योजना केल्या आणि असं वाटलं की लढता लढता एक दिवस आपल्याला मार्ग सापडेल; पण काय दैव म्हणावं, मुंबईला जाऊन जे जमलं नसतं, जी दृष्टी मिळाली नसती ती मुंबईचा कार्यक्रम रद्द झाल्याने मिळाली. मोठी भाग्याची गोष्ट आहे की मुंबईचा कार्यक्रम रद्द झाला. या गांधीबाबांनी सांगितलं की, ''अरे त्या मुंबईला गेटवे ऑफ इंडियापाशी हिंदुस्थानातल्या सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांची उत्तरं तुम्हाला काय सापडणार आहेत? तिथं तुम्ही नेहरूबाबाची पाटी पुसली काय अन् न पुसली काय, काही फरक पडणार नाही. हिंदुस्थानच्या प्रश्नाची उत्तरं तुम्हाला शोधाची असतील, सगळा देश गरीब का राहिला हे शोधायचं असेल, सगळीकडे दंगे का चालले आहेत, माझं रक्त सांडलं तरी हिंदू-मुसलमान एकमेकांत का लढताहेत हे समजायचं असेल तर ते गेटवे ऑफ इंडियाला ज्ञान मिळणार नाही,

ते ज्ञान मिळाविण्याचं विद्यापीठ इथं सेवाग्रामला आहे. आपला इथं सेवाग्रामला येण्याचा योग होता म्हणून हे सगळं घडलं.''

**बळिराज्य, नाहीतर विनाश**

दुसऱ्या गणराज्याची आज आपण घोषणा करतो आहोत. मी जेव्हा दहा वर्षांपूर्वी शेतीमालाच्या भावाविषयी बोलायला लागलो तेव्हा सगळेच म्हणत, ''हे असं कुठं असतं काय?'' आजही आपण दुसऱ्या गणराज्याची घोषणा केली त्याची उद्या बातमी आल्यानंतर लोक म्हणणार आहेत की, ''हे शरद जोशी काहीच्या काही बोलत असतात.'' पण, विश्वास ठेवा, माझी खात्री आहे की हिंदुस्थानची घटना २००३ सालाच्या आत बदलून ती बळिराज्याची घटना झालेली असेल. ही घटना जर बदलली नाही, सरकारच्या हातातील आर्थिक सत्ता काढून घेतली गेली नाही, बळिराज्य आलं नाही तर हा देश टिकूच शकत नाही. म्हणजे गेली दहा वर्षे जे बळिराज्य यावं म्हणून आपण जी लढाई केली त्या लढाईचं यश सर्व तऱ्हेने साकार होताना पुढे दिसत आहे आणि मी माझं हे भाग्य समजतो की बळिराज्याची ही घोषणा करायला, त्याची शपथ घ्यायला कुठंतरी गेटवे ऑफ इंडियाच्या सिमेटाच्या चौकात न बसता सेवाग्रामला बापूकुटीच्या शेजारी आपण बसलो आहोत. कदाचित, यातूनच देशाचा इतिहास घडायचा आहे.

**दुसऱ्या भारतीय गणराज्याच्या पहिल्या नागरिकांनो**

आपण इथून निघताना थोडं गंभीर होऊन, अंतर्मुख होऊन निघायला पाहिजे. आपण काय ठरवलंय. याचा मी थोडक्यात आढावा घेतो. नुसत्याच घोषणा देत जाऊ नका.

**निर्णय कृषिनीती**

शेतीसंबंधीची कृषिनीती आम्ही शेगावला ठरविलेली आहे. आमचा शेगावचा जाहीरनामा तीच कृषिनीती आहे. लोकसभेमध्ये सरकारने कृषिनीती म्हणून जो काही फाटका कागद ठेवला आहे, अक्षरशः हास्यास्पद कागद आहे, त्याला कृषिनीती म्हणणं म्हणजे शेतीचा अपमान आहे, शेतकऱ्याचा अपमान आहे, देशाचा अपमान आहे. सरकारचा हा कृषिनीतीचा कागद आम्ही लाथाडून, झिडकारून लावतो. हा पहिला निर्णय आहे.

**भीतीमुक्ती**

दुसरा निर्णय, पाशा पटेलांनी मांडलेला ठराव. त्यांनी म्हटल्याप्रमाणे उद्यापासून नोकरांना घाबरायचं नाही, त्यांनी नखं काढून दाखविली तरी. त्यांना सरळ विचारायचं, ''तू दिवसभर करतो काय आणि कमवतो काय याचा हिशोब देतो

का बोल." उद्यापासून सगळेच नोकरदार तुमचा रागराग करणार आहेत; पण आपण ते जाणूनबुजून ओढवून घेतलं आहे. हे निभवायची हिम्मत बाळगली तर तुम्ही खरे शेतकरी.

**३१ मार्च, चलो दिल्ली**

तिसरा निर्णय, ३१ मार्चला आपल्याला दिल्लीला जायचं आहे. आज आपण पाहिलं गणराज्य, नेहरू अंमल संपला असं सांगितलं. शेतकरी यापुढे त्याला जे जे पाहिजे ते करणार असं सांगितलं. ते होऊ दिलं नाही तर काय करायचं, पुढचं पाऊल काय टाकायचं यासंबंधी लढाईचा कार्यक्रम जाहीर करायचा आहे. ३१ मार्च १९९३ ला नवी दिल्लीला.

**लक्ष्मीमुक्ती**

त्याआधी करायचं एक अत्यंत महत्त्वाचं काम. घरची लक्ष्मी दुःखी राहिली तर तुमच्या कामाला यश येऊ शकत नाही. घरच्या लक्ष्मीच्या घामाला दाम नाही, तुमच्या घामाला दाम मिळू शकत नाही. घरच्या लक्ष्मीचा तळतळाट असला तर तुम्हाला यश येणं शक्य नाही. घरची लक्ष्मी प्रसन्न असल्याखेरीज बाहेरची लक्ष्मी प्रसन्न होऊन घरात येत नाही. तेव्हा जास्तीत जास्त संख्येने लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाची अंमलबजावणी करा.

**शेतकरी : दुसऱ्या गणराज्याचा आत्मा**

हा कार्यक्रम दुसऱ्या गणराज्याचा आहे. आज आपण इथून जातो आहोत ते ३० जानेवारी १९४८ ला सुरू झालेला नेहरू-अमलाचा काळाकुट्ट कालखंड संपवून जात आहोत. आज इथं सुरुवात होते आहे ती दुसऱ्या गणराज्याची होते आहे. या गणराज्याची घटना सावकाश लिहिली जाईल. त्याच्यातली कलमं सावकाश लिहिली जातील; पण त्या गणज्याचा आत्मा हा इथं बसलेले शेतकरी आहेत. येताना त्यांच्या डोळ्यामध्ये भीती होती, कोकरासारखे बघत आले; देशभर दंगे चालले आहेत, सुरे घेऊन फिरणारे लोक मोठी मौज करत आहे हा काय प्रकार आहे या संभ्रमात आले; शेतकऱ्यांचं काय व्हायचं या चिंतेने व्याकूळ झालेल्या डोळ्यांनी आले; इथून जाताना त्यांचे डोळे निर्भय झालेले आहेत, आता आम्ही जिंकणार आहोत, कारण बापूंच्या या कुटीपासून पुन्हा एकदा एका नवीन लढ्याची स्फूर्ती घेऊन आम्ही जातो आहोत, आमचे डोळे आता कोकराचे नाहीत, आमचे डोळे आता वाघाचे बनले आहेत असं समजून जात आहेत.

(३० जानेवारी १९९३- सेवाग्राम, जि. वर्धा मेळावा)

*(शेतकरी संघटक ६ फेब्रुवारी १९९३)*

■■

# शेतकरी संघटनेच्या विचाराची वाटचाल
# कांद्याच्या भावापासून बळिराज्यापर्यंत

शेतकरी संघटनेच्या आंदोलनाच्या अगदी सुरुवातीच्या कालखंडात सगळ्या शेतीमालांच्या भावाचा विषय उठविण्याऐवजी जिथे जिथे एखाद्या मालाला भाव मिळत नाही अशी अडचण येईल तिथे तिथे ताकदीनुसार आंदोलन उभं करायचं असं धोरण होतं; मर्यादित धोरण होतं. त्याच्यानंतर पंढरपूरच्या साकडे मेळाव्यामध्ये पहिल्यांदा कांदा, ऊस, तंबाखू, दूध, भात अशा एकेका मालाच्या किमतीचा प्रश्न उठविण्याऐवजी सबंध कृषिमूल्य आयोगाच्या पद्धतीविषयी अविश्वास व्यक्त करणारा ठराव करण्यात आला. म्हणजे एकेका उत्पादनाचा भाव ही पहिली पायरी. सम्यक शेतीमालाचा भाव ही दुसरी पायरी पंढरपूरला घेतली आणि त्यानंतर तिसरी महत्त्वाची पायरी ही नांदेडला १९८९ सालच्या अधिवेशनात बळिराज्य ही संकल्पना मांडून संघटनेने घेतली. बळिराज्य म्हणजे काय? नांदेड अधिवेशनात आपण असं म्हटलं होतं की, बळी म्हणजे कोण होता आणि त्याला वामनाने पाताळात गाडलं हे खरं का खोटं, या पौराणिक कथेला काही आधार आहे किंवा नाही या विचक्षणेमध्ये आपण पडत नाही. बळिराज्य हे नाव आम्ही घेतो याचा आधार पौराणिक नाही, याचा आधार कोणत्या हिंदू ग्रंथातील नाही. आजही शेतकऱ्यांच्या घरच्या मायबहिणी कोणत्याही महत्त्वाच्या प्रसंगी ओवाळायचं झालं तर 'इडा पिडा टळो आणि बळीचं राज्य येवो' अशी प्रार्थना करतात, तेवढा आधार आम्हाला पुरे आहे. जोतिबा फुल्यांनी बळिराज्याच्या इतिहासाविषयी कथा सांगितली; पण त्याला काही निश्चित आधार आहे असं नाही आणि जोतिबा फुल्यांनीच म्हटलं आहे की सगळ्याच पुराणातल्या कथांचं खरंखोटेपण कसं तपासणार, कारण हे सगळे धर्मग्रंथ 'खल्लड' आहेत.

महत्त्वाचा मुद्दा हा की हे जे बळिराज्य आहे त्या बळिराज्याचा आधार पुराणातला नाही, तर आमच्याच घरच्या मायबहिणींच्या जिभेवर असलेला जिवंत इतिहासातील शब्द आहे.

बळिराज्य म्हणजे काय असावं? ही संकल्पना आपण पायरीपायरीने मांडत आलो आहोत. कांद्याला भाव हवा. पण मजुरांनी मजुरी मागावी अशा तऱ्हेने आम्ही कांद्याचा भाव मागत नाही. शेतीमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे ही मागणी कारखान्यातले मजूर ज्याप्रमाणे पगावाढीची मागणी करतात, त्या प्रकारची मागणी नाही. शेतीमालाला भाव मिळत नाही याचं कारणच मुळी सरकारचं धोरण आहे. 'शेतकऱ्यांचं मरण हे सरकारचं धोरण आहे' अशी घोषणा त्यावेळी दिली आणि शेतमालाचा भाव पाडण्याचं कारस्थान सरकार रचतं तेवढं त्यांनी रचू नये एवढीच आमची अपेक्षा आहे. देशातील गरिबी हटवायची असेल तर काहीच करू नका, फक्त गरिबी टिकावी आणि वाढावी म्हणून जे प्रयत्न करता आहात तेवढे थांबवा एवढेच आमचे म्हणणे होते. थोडक्यात, बळिराज्य म्हणजे ज्या राज्यामध्ये जाणीवपूर्वक, ठरवून, धोरण म्हणून कोणाच्याही शोषणाची व्यवस्था असणार नाही ते राज्य. बळिराज्य हा शब्द वापरताना, ज्या व्यवस्थेमध्ये सरकारचा हात कमीत कमी आहे अशी व्यवस्था शेतकऱ्यांना  हवी आहे एवढेच अभिप्रेत आहे.

शेगावचा मेळावा ही त्याची पुढची पायरी. त्यावेळी पंतप्रधानांनी घोषणा केली की जुनी नियोजनाची व्यवस्था सोडून नवीन खुल्या अर्थव्यवस्थेकडे आम्ही जातो आहोत. अर्थशास्त्राच्या भाषेत सोप्या शब्दात सांगायचे झाले तर खुल्या बाजारपेठेची व्यवस्था म्हणजे बळिराज्य असे म्हणता येईल. 'खुल्या बाजारपेठेची व्यवस्था' हा मुळात अर्थशास्त्रीय इंग्रजी शब्दाचा मराठी तर्जुमा. मग ज्यांचा अर्थशास्त्राचा अभ्यास नाही त्या 'ग्यानबां'ना हा अर्थ कसा समजवायचा? खुली म्हणजे काय, बाजारपेठ म्हणजे काय, ती खुली नसली म्हणजे कशी असते या सगळयाचं पुस्तकी विवेचन करण्याऐवजी, शेतकरी संघटनेने अर्थशास्त्र 'ग्यानबा'पर्यंत पोहोचविण्याच्या तिच्या खास कौशल्याने 'बळिराज्य' हा शब्द वापरला. आपण नांदेडच्या अधिवेशनात असं म्हटलं की 'इडा पिडा टळणार आहे, बळीचं राज्य येणार आहे' आणि शेगावला 'बळिराज्य येतसे आता...' ते उंबरठ्यापर्यंत आलं आहे असं म्हटलं.

त्यानंतरच्या वर्षामध्ये वेगवेगळया घटना घडल्या. बळिराज्य यावं अशी इच्छा बाळगणारे, शेतकरी समाजातील ज्यांना प्रश्न समजला आहे तेवढे लोक (सगळे नाही, सरकारने मायबाप व्हावे आणि शेतकऱ्यांनी जे काही वाढायचं असेल ते वाढावं, मायबाप सरकानं जगवलं तर जगू अशीच बुद्धी असले शेतकरी फार मोठ्या प्रमाणावर आहेत.) यांना असं वाटलं आणि पटलं की आम्ही सकाळपासून संध्याकाळपर्यंत कष्ट करतो, आमच्या जमिनीमध्ये एका दाण्याचे शंभर दाणे होतात त्या आम्हा शेतकऱ्यांना दुसऱ्यांकडून भीक मागायला लागावी ही अनैसर्गिक गोष्ट आहे. असं जर होत असलं तर त्यामागची कारणं तपासून पाहायला हवीत. हे ज्यांना

पटलं आहे तेवढे शेतकरी एका बाजूला केले तर जवळजवळ सगळीच माणसं बळिराज्याला म्हणजे खुल्या अर्थव्यवस्थेला  विरोध करायला समोर येत आहेत. याबद्दल आपण सेवाग्रामच्या मेळाव्यात ऊहापोह केला. सगळे संघटित कामगार, सगळे सरकारी नोकरदार, सार्वजनिक क्षेत्रातील नोकरदार, दलाली करून लोकांची कामं करून, त्यावर पोट भरणारे राजकीय पुढारी आणि ज्यांनी लायसेन्स-परमिट मिळवून स्वत:ची कारखानदारीची मक्तेदारी व्यवस्था बनवली असे कारखानदार हे सगळेच लोक खुली अर्थव्यवस्था येत आहे म्हटल्यावर बेचैन झाले आहेत. कारण, कामगार, नोकरदार, राजकीय पुढारी आणि मक्तेदार कारखानदार या तीन गटांच्या लोकांनी नवीन व्यवस्थेला विरोध करायला सुरुवात केली. या तिघांचा विरोध इतका प्रबळ आणि केंद्रातील शासनव्यवस्था थोडी डळमळीत त्यामुळे ज्या तऱ्हेने आणि ज्या गतीने खुली अर्थव्यवस्था देशात येईल असं वाटलं होतं किंवा पंतप्रधानांनी आणि वित्तमंत्र्यांनी जागतिक बँकेला व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला  ज्या गतीने ही व्यवस्था आणू म्हणून सांगितलं होते त्या गतीने काही ही व्यवस्था देशामध्ये येताना दिसत नाही आणि गव्हाची आयात व शेतकऱ्यांच्याबद्दल जी काही निर्बंधात्मक धोरणं आखली जात आहेत ती पाहता खुली अर्थव्यवस्था आली तरी ती शेतकऱ्यांपर्यंत यायची नाही; फार फार तर ती कारखानदारापर्यंत पोहोचेल अशी धास्ती तेव्हापासून आपल्याला वाटते आहे.

ज्या ज्या कारखानदारीकरिता परवाना घ्यायची गरज नाही असे सकरकारने जाहीर केले आहे त्या कारखानदारीमध्ये शेतीसंबंधी कारखानदारी कोणती नाही. अगदी अलीकडे या प्रश्नांवर पुन्हा एकदा फेरविचार झाला तरीसुद्धा परवानामुक्त वाढीव यादीत साखर, अल्कोहोल, साखरेचे पदार्थ, दुधावरील प्रक्रियेसंबंधीचे पदार्थ यांच्या उद्योगांचा समावेश नाही.

याच सुमारास आणखी एक महत्त्वाची गोष्ट घडली. अयोध्या प्रकरण. अयोध्या प्रकरणाचे विश्लेषण करण्याची ही जागा नाही; पण अयोध्या प्रकरणाचे आर्थिक परिणाम काय झाले याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

अयोध्या प्रकरणामुळे सगळया देशभर दंगे उसळले. तत्काळ प्रतिक्रिया म्हणून दंगे झाले तर एकवेळ समजण्यासारखं आहे; पण महिनाभराने पुन्हा एकदा मुंबईमध्ये हजारबाराशे माणसं मरण्याइतके आणि चार हजार कोटी रुपयांचं नुकसान होण्याइतके उग्र दंगे होत असले तर त्याचा अर्थ काय? जर का देशातलं शासन हे अशा तऱ्हेने दंगे परिणामकारकरीत्या थांबवू शकत नसतील तर त्याचा अर्थ काय? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत.

अयोध्याप्रकरणाचा परिणाम म्हणून काही गोष्टी ताबडतोब घडू लागल्या. अनिवासी

भारतीयांनी हिंदुस्थानात पैसे आणायला जी सुरुवात केली होती, ते पैसे त्यांनी परत काढून न्यायला सुरुवात केली. दुसरा एक परिणाम झाला. नवीन खुली अर्थव्यवस्था म्हणजे परदेशातून मालही यावा आणि भांडवलही यावे अशी अपेक्षा; पण आज हिंदुस्थानात निर्बंध आहेत. बाहेरून भांडवल आणता येत नाही, तंत्रज्ञान काही लोकांसाठीच येतं अशी जी नेहरूप्रणीत नियोजनाची व्यवस्था आहे ती बंद करून देशादेशांमधल्या भिंती तोडून टाकणं आणि खुली ये-जा ठेवणं याचाच अर्थ खुली अर्थव्यवस्था; याचाच अर्थ बळिराज्य. तुम्ही दरवाजे उघडले आणि बाहेरचं भांडवल येऊ द्या म्हटलं पण, बाहेरची माणसं म्हणू लागली की तुम्ही दरवाजे उघडले खरे पण तुमच्या दरवाजाच्या आत जे काही चाललं आहे त्यामुळे आमची काही आत येण्याची फारशी इच्छा होत नाही. अनेक परदेशी कारखानदारांनी हिंदुस्थानात भांडवल गुंतवण्याची तयारी दाखवली होती. नंतर, विशेषतः ६ डिसेंबरच्या दंग्यानंतर या देशात दंगे अशा तऱ्हेने होऊ शकतात, एवढंच नव्हे तर सरकार त्यांवर परिणामकारकरीत्या ताबा मिळवू शकत नाही हे पाहिल्यानंतर त्यातील काही निर्णय रद्द करण्यात आले, काही स्थगित करण्यात आले, काहींवर फेरविचार चालू आहे म्हणून सांगण्यात आलं.

पुढील घटना याबाबतीत पुरेशी बोलकी आहे. इंग्लंडमधील एका मोठ्या कंपनीने मुंबईमध्ये एक मोठा कारखाना काढण्याचं ठरवलं होतं. बोलणी करण्यासाठी एक शिष्टमंडळ मुंबईला यायचं होतं. त्याचवेळी अयोध्येत मशीद पडली. मुंबईत दंगे वगैरे चालू झाले आणि लंडनमधल्या लोकांनी मुंबईतल्या संबंधितांना फोन करून सांगितलं की, "दंगे चालू आहेत तर आम्ही कसे काय येणार?" मुंबईतल्या लोकांनी म्हटलं की, "इतकं काही नाही. वर्तमानपत्रात फारच येतं. आम्ही नाही का इथंच राहात?" लंडनमधल्या लोकांनी त्यांना सांगितलं की, "असं असेल तर तुम्हीच लंडनला निघून या." हे बरं म्हणाले आणि घरातून निघाले तर विमानतळावर पोहोचायलाच त्यांना तीन दिवस लागले-दंगे, संचारबंदी वगैरे कारणांमुळे. मग इंग्लंडच्या लोकांनी साहजिकच म्हटलं की, "तुम्हाला मुंबईतल्या मुंबईत विमानतळावर यायला तीन दिवस लागतात तर आम्ही मुंबईत कशी काय गुंतवणूक करायची?" हा प्रकल्प नंतर हिंदुस्थानऐवजी चीनमध्ये सुरू करण्याचं त्यांनी ठरवलं.

कोणी विचारेल, हिंदुस्थानात दंगे झाले पण चीनमध्ये काय शांतता आहे काय? पेकिंगमधल्या तिएनमान चौकात तीन हजार विद्यार्थ्यांवर रणगाडे घातले; पण त्या चीनमध्ये इंग्लिश भांडवल, अमेरिकन भांडवल तयार आहे आणि हिंदुस्थानात मात्र कुठे मशीद पडली, कुठे थोडे दंगे झाले, तीनचार हजार माणसं मेली म्हणजे फार मोठं झालं असं नाही. मग हिंदुस्थानात भांडवल यायला का घाबरतं आणि दंगे तिथेही

होत असताना चीनमध्ये जायला ते काय तयार होतं? याची तीन महत्त्वाची कारणं आहेत. पहिली गोष्ट म्हणजे चीनने पेकिंगमधल्या सगळ्या इमारतींवरचा त्यांना हातोडा, कोयता आणि तारे असलेला लाल झेंडा उतरविलेला नाही. अधिकृतरीत्या त्यांच्या देशाच्या नावामध्ये सोशॅलिस्ट (Socialist) हा शब्द आहे. अजूनही जाहीर घोषणांमध्ये सगळीकडे मार्क्स, एंगल्स, माओ या सगळ्यांची नावं ते घेतात; पण चीनने राजकीय परिवर्तन न करता देशामधल्या निम्म्या भागामध्ये, विशेषतः दक्षिण भागामध्ये खुली व्यवस्था आणण्याचं काम अत्यंत झपाट्यानं केलं आहे. परदेशातील लोकांना इतकी खात्री आहे की चीनने नियोजनात्मक अर्थव्यवस्थेचे काय घातक परिणाम असतात ते चांगलं समजून घेतले आहेत, आता पुन्हा ते काही नियोजनाकडे जाण्याची शक्यता दिसत नाही. त्यांना खरोखरच खुल्या अर्थव्यवस्थेकडे जायचं आहे याची खात्री जगाला पटली. हिंदुस्थानच्या बाबतीत अशी खात्री पटलेली नाही. हे लोक खुल्या अर्थव्यवस्थेची भाषा करताहेत पण त्यांनी खरा घडा काही अजून शिकलेला नाही. राजकीय दबाव आला तर अजूनही ही माणसं आपल्या बोलण्यापासून चळतील अशी त्यांना धास्ती आहे. दंगे चीनमध्येही झाले, दंगे हिंदुस्थानातही झाले. दोघांमध्ये मोठा फरक आहे. तिएनमान चौकात जे काही दंगे झाले ते विद्यार्थ्यांनी आर्थिक स्वातंत्र्याकरिता आणि राजकीय स्वातंत्र्याकरिता केलेले दंगे आहेत. म्हणजे ती मागणी निदान विसाव्या शतकातली आहे. विसाव्या शतकाला प्रस्तुत असलेल्या मागणीकरता विद्यार्थी उतरले आणि त्यांवर सरकारने रणगाडे घातले, गोळ्या झाडल्या. दोनतीन हजार माणसं मेली. हिंदुस्थानात ज्या प्रश्नावर दंगा झाला तो प्रश्नच मुळी विसाव्या शतकातला नाही, तो त्रेतायुगातला प्रश्न आहे आणि त्याच्याकरिता भांडणारी ही माणसं, यांच्या हाती भांडवल सोपवणं कितपत योग्य आहे याबद्दल मनात शंका निर्माण होणं साहजिक आहे. ज्याच्या हाती पैसा आहे तो राम, रहीम, बाबर काही जाणत नाही; माझं भांडवल तिथं सुरक्षित राहू शकेल किंवा नाही याचा फक्त विचार करतो. हे भांडवलाच्या घाबरण्याचं दुसरं कारण आणि असे दंगेसुद्धा सरकारला थांबवता आले नाहीत. मशीद पडू देणार नाही असं म्हटलं तरी ती पाडायची सरकारला थांबवता आली नाही आणि मुंबईमध्ये दंगे सुरू झाल्यानंतर थांबवता तर आले नाहीतच पण हे दंगे सुरू करण्यामध्ये सत्ताधारी पक्षाच्याच लोकांचाच हात होता की काय इथपर्यंत चर्चा जेव्हा होते तेव्हा साहजिकच, पैसेवाले पैसे गुंतवायला घाबरतात.

अशा परिस्थितीमध्ये कालच्या अंदाजपत्रकाचा थोडा मसुदा डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. मी मागेही अनेकवेळा असं म्हटलं आहे की, अंदाजपत्रकावर काही चर्चा होते ती चर्चा निरर्थक असते. कारण, अंदाजपत्रक ही एक महत्त्वाची गोष्ट होती, पण

ती फार वर्षापूर्वी आता अंदाजपत्रक ही काही अशी महत्त्वाची गोष्ट राहिलेली नाही. दरवर्षी नित्यनियमाने पार पाडायचा हा एक कार्यक्रम आहे. सगळं काही महत्त्वाचं अंदाजपत्रकातच मांडलं पाहिजे असंही सरकारला वाटत नाही आणि अंदाजपत्रकात जे काही मांडलं असेल त्याप्रमाणे वर्षभर वागलं पाहिजे असंही सरकारला वाटत नाही. म्हणजे कुठंतरी फेब्रुवारीच्या शेवटी आपल्या मनाला जे काही येईल ते सांगून टाकायचं आणि मग नंतर आपण वाटेल ते करायला मोकळे आहोत. अशी साधारणपणे अंदाजपत्रकाची स्थिती झाली आहे. गेल्या चार-पाच वर्षांमध्ये पेट्रोललियम. कोळसा, वाहतूक, रेल्वे अशा वेगवेगळ्या वस्तूंच्या आणि सेवांच्या किमती वाढवून टाकायच्या आणि मग अंदाजपत्रक मात्र दिसायला गोंडस - म्हणजे ज्यामध्ये फारशी करवाढ नाही, जास्तीत जास्त सूटच आहे, कस्टममध्ये सूट, कराच्या दरात सूट - असं बनवायचं. पण अंदाजपत्रकाच्या आधी आणि नंतर मात्र जे काही वाटेल ते सरकारनं करायचं अशी साधारणपणे अंदाजपत्रकाची अवस्था.

अयोध्याप्रश्न सगळ्या लोकांच्या जिभेवर असताना, मनात असताना सरकारनं काय करायला हवं होतं? सरकारनं यावेळी अयोध्या प्रश्नावर ज्यांना कोणाला चर्चा करायची असेल त्यांना करू द्यायला हवी होती, सरकारने या विषयावर काहीही बोलू नये, हा विषय संपला आहे असं धरून चालावं आणि खुल्या अर्थव्यवस्थेकडे जितक्या प्रचंड वेगाने जाता येईल तितकं जायला सुरुवात करावी आणि या अंदाजपत्रकाच्या वेळी रुपया पूर्ण परिवर्तनीय करावा, निदान इतकं केलं तरी हिंदुस्थानातल्या लोकांच्या मनातला चर्चेचा विषय आहे तो तरी बदलेल अशी माझी सूचना होती.

रुपयाची बंधनातून मुक्तता झाली. मुक्त अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हे आवश्यकच होते. शेतीमालाच्या निर्यातीवर आता बंधने राहिली नाहीत तर भारतीय शेतीमालाला परदेशात मोठी बाजारपेठ मिळेल.

या वर्षीच्या अंदाजपत्रकात रुपया परिवर्तनीय झाला हीच एक समाधानाची गोष्ट आहे.

(२८ फेब्रुवारी १९९३ कार्यकारिणी बैठक अंबेठाण)

*(शेतकरी संघटक ६ मार्च १९९३)*

■■

# बळिराज्यातील कृती कार्यक्रम

**माझ्या शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो**

२९, ३०, ३१ ऑक्टोबर १९९३ हे तीन दिवस प्रतिनिधींची चर्चा झाली. या सगळ्या प्रदेशामध्ये (मराठवाड्यामध्ये) भूकंपाची धास्ती सगळीकडे अशी आहे की अजूनही लोक घरांमध्ये भिंतीच्या आत झोपू शकत नाहीत. घराच्या बाहेर खाटा टाकून झोपतात, जमिनीवर झोपतात आणि अशाही परिस्थितीमध्ये तीन दिवस घरापासून दूर आपण इथं राहिलो, तीनही दिवस चर्चा केली आणि आता मावळत्या सूर्याला साक्षी ठेवून पुढे राबविण्याचा कार्यक्रम जो ठरला आहे तो तुमच्यापुढे ठेवणे एवढंच माझं काम शिल्लक राहिलेलं आहे.

बारा वर्षांपूर्वी शेतकरी आंदोलन चालू करताना, हे आंदोलन शेतकऱ्यांना एकदोन फायदे मिळावे म्हणून चालू केलेलं नाही, आंदोलन कांद्याच्या भावाचं वाटलं तरी उद्दिष्ट त्याच्यापेक्षा फार मोठं आहे, उसाला भाव मिळावा म्हणून आम्ही रस्ता अडवला, पण आम्हाला मिळवायचं आहे ते त्यापेक्षा मोठं आहे हे मी स्पष्ट केलं होतं.

ही लढाई कोणती आहे? मी असं म्हटलं की ही स्वातंत्र्याची दुसरी लढाई आहे. पहिल्या लढाईत गोरा इंग्रज गेला आणि त्याऐवजी काळा इंग्रज आला. आता काळ्या इंग्रजालासुद्धा काढून लावण्याची ही दुसऱ्या स्वातंत्र्याची लढाई आहे.

आज मला आठवण होते की १९४२ मध्ये गोवालिया टँकवर काँग्रेसची सभा भरली होती आणि त्यावेळी परिस्थिती अशी होती, की दुसऱ्या महायुद्धामुळे इंग्रज सरकारचा चारही बाजूंना पराभव होत होता. कोणत्याही क्षणाला हिंदुस्थान सोडून, हिंदुस्थान शत्रूकरता मोकळं करून निघून जाण्याची इंग्रजांची तयारी झालेली होती. जपान पुढे सरकत होता. सरकार नावाची गोष्ट शिल्लक नव्हती; सरकार शिल्लक होतं ते फक्त देशातील लोकांवर अत्याचार करण्याकरिता. आज

परिस्थिती मला अशीच दिसते. सरकार नावाची गोष्ट कुठं राहिलेली नाही. नेहरू व्यवस्थेमध्ये जे नियोजन झालं ते सगळं असफल झालं. आता नवीन व्यवस्थेकडे, खुल्या व्यवस्थेकडे गेलं पाहिजे असं सरकार स्वत: जाहीर करत आहे.

परंतु शेतकऱ्यांवरचे अन्याय मात्र चालू आहेत. खुलेपणात जे काही स्वातंत्र्य मिळायचं त्यात शेतकऱ्याला काही नाही. महाराष्ट्रात परिस्थिती अशी की शेजारच्या राज्यातल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना सोळाशे ते अठराशे रुपये क्विंटल भाव मिळत असला तर आमच्या शेतकऱ्यांना अकराशे पन्नास रुपयांवरच समाधान मानायला पाहिजे आणि त्यातूनसुद्धा तीन टक्क्यांची कपात होणार. उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब या राज्यांत नऊ-दहा टक्के शर्करांशाच्या उसाला किमान भाव सहाशे वीस रुपये प्रत्येक टनाला मिळतो आणि महाराष्ट्रातल्या बारा साडेबारा टक्के शर्करांशाच्या उसाला जास्तीत जास्त भाव पाचशे पंचवीस रुपये आहे. हे सरकार उरलं आहे ते शेतकऱ्यांवर फक्त अन्याय करण्यापुरतंच उरलं आहे, बाकी सरकार नावाची गोष्टच शिल्लक नाही. बाहेरच्या देशातून स्फोटकं येतात, किनाऱ्यावर उतरतात, सरकार थांबवू शकत तर नाहीच पण सरकारचे अधिकारी मोटारसायकलवर बसून त्या स्फोटकांना सहारा देत पुढे जातात. दाऊद इब्राहीमचे लोक फिरतात त्यांना सरकार काही करू शकत नाही, जाती आणि धर्मांमध्ये दंगे लावून देणारे खुले आम फिरताहेत त्यांना पकडण्याची सरकारची हिम्मत नाही. सरकारची हिम्मत आणि ताकद आहे फक्त शेतकऱ्यांवर वरवंटा फिरवण्याची. सरकार राहिलेलं नाही, जे काही शिल्लक आहे ते फक्त शेतकऱ्यांवर अन्याय करणारं राहिलं आहे.

आणि म्हणून बळिराज्याचं स्वागत करताना शेतकऱ्यांनी काय करायला पाहिजे हे ठरविण्याकरिता आपण अधिवेशन घेतलं. पुढील काळात आंदोलन कसं चालवायचं याचा आराखडा मी तुम्हाला सांगतो आणि शेतकरी संघटनेचा निश्चित आदेश देतो.

बळिराज्य येत आहे, हे जे सरकार आहे ते खुर्चीवर आहे असे मानण्याची, माझ्या शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो, तुम्हाला गरज नाही. या क्षणापासून तुम्ही स्वतंत्र झालेले आहात.

सरकार बंधनं घालणारं कोण? ज्याला दाऊद इब्राहीमपासून देश वाचवता येत नाही. त्या सरकारला शेतकऱ्यांवर अन्याय करण्याचा काय अधिकार आहे? हे स्वातंत्र्य मिळवायचं कसं आणि जपायचं कसं हे आता तुमचं तुम्ही ठरवायचं आहे. गांधीजींनी ज्या शब्दांत सांगितलं तेच शब्द पुन्हा वापरायची वेळ आली आहे. माझ्या शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो, "करा किंवा मरा. याच्यापुढे

गुलाम म्हणून जगणार नाही अशी प्रतिज्ञा घ्या.''

सरकार जर म्हणायला लागलं की कापूसखरेदीचा एकाधिकार आहे. दुसऱ्या राज्यात कापूस नेण्याचा तुम्हाला अधिकार नाही. तर शेतकरी संघटना तुम्हाला परवानगी देते की तुम्ही स्वतंत्र आहात. सर्व सरहद्दी तोडून आपला कापूस तुम्ही खुशाल दुसऱ्या राज्यांत घेऊन जा. त्याला कोणीही थांबवू शकत नाही.

भातावर सरकार लेव्ही लावत असेल तर तुमचा हा हक्क आहे आणि कर्तव्यही आहे की भाताची लेव्ही सरकार अमलात आणू शकणार नाही हे तुम्ही पाहिलं पाहिजे. त्यासाठी जे जे काही करावं लागेल ते करा.

दूध ओतून देऊ नका. सरकारने परवानगी दिली नाही तरी दुधाच्या प्रक्रियेचे उद्योग, कारखाने खुशाल काढा.

सरकारने कपाशीचे रेचे घालण्याची परवानगी नाकारली आहे. शेतकरी संघटना तुम्हाला परवानगी देत आहे, जेव्हा लागेल तेव्हा रेचे काढा, काही चिंता न करता काढा.

तुमचा माल पिकवणे, तुमचा माल विकणं, तुमच्या मालावर प्रक्रिया करणं हा अधिकार तुमचा आहे तो बजावा.

तुमची जमीन कोणी काढून घ्यायला आलं, तुमची जमीन सार्वजनिक हिताकरिता संपादन केली आहे असं कुणी सांगायला आलं तर त्याला सांगा, ''आम्ही सरकारचा हा हक्क मानीत नाही, आमच्या जमिनीतील एक इंचसुद्धा जमीन आम्ही सरकारला द्यायला तयार नाही. भूखंडखोरांच्या मौजा आता बंद.''

कृषि उत्पन्न बाजार समिती तुम्हाला जर सांगत असेल की, ''आधी आमचे तीन टक्के पैसे कापा आणि मग तुमचा माल विका'' तर त्यांना सांगा, ''तुमची मक्तेदारी आम्हाला मान्य नाही. कारण खुली व्यवस्था आलेली आहे. कारण आम्ही खुल्या व्यवस्थेतले स्वतंत्र शेतकरी आहोत. आम्ही तुमचं म्हणणं मानत नाही.''

उसाचा भाव पडत असताना साखर कारखान्याला ऊस घाला म्हणून कोणी सांगू लागलं तर, ऊसउत्पादक शेतकऱ्यांनो, तुम्हाला जेव्हा जेव्हा वाटेल तेव्हा गुऱ्हाळं घाला, गूळ तयार करा आणि साखर कारखाना अजिबात उरला नाही तरी चालेल.

या पुढाऱ्यांची, राजकारण्यांची मक्तेदारी मोडून काढायची असली तर साखर कारखान्यांच्या नव्हे तर बाकी सगळ्या सहकारी संस्थाच्या सदस्यांना मी शेतकरी संघटनेचा आदेश देतो की तुम्ही आपल्या जनरल बॉडीची बैठक बोलवा आणि त्या जनरल बॉडीमध्ये ठराव मांडा–

१) भूकंपाच्या नावाखाली आम्हाला लुटण्याचं बंद करा. गावामध्ये लक्षावधी रुपयांनी ज्यांची मिळकत आहे त्यांनी शंभरदोनशे रुपये दिले म्हणजे संपलं; पण ऊस शेतकऱ्यांकडून किती वसुली केली जाते आहे? एकदा तलाठ्याकडून, मग कलेक्टरकडून, मग शाळेच्या पोरांकडून, मग साखरेच्या कारखान्याकडून, मग आणखी कोण्या सहकारी संस्थेकडून. या ऊसउत्पादक शेतकऱ्यांकडून आज तुम्ही भूकंपग्रस्तांसाठी निधी घेऊन गेलात तर उद्या त्यांच्या भागात जर का भूकंप झाला तर त्यांच्या घरांच्या ढिगाऱ्यांखाली त्यांची तीच अवस्था होणार आहे. त्यांना पहिल्यांदा आपापली घरं बांधू द्या. असं सांगून ठराव करा की अशा कपाती आमच्या संमतीविना केलेल्या आम्हाला चालणार नाहीत.

२) आणि दुसरा ठराव असा करा की, आमच्या सहकारी संस्था जॉईंट स्टॉक कंपनीमध्ये बदला; सहकारी व्यवस्थेवर आता आमचा विश्वास नाही.

जे जे बंधन आहे ते ते नाकारण्याचा, स्वतंत्र शेतकरी म्हणून तुम्हाला मी अधिकार देतो आहे. नोकरदार तुमच्या आड येणार आहे. त्याचा बीमोड कसा करायचा ते तुम्ही ठरवा.

महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाचा सगळा अजागळ कारभार. पण त्या अजागळपणाची किंमत तुम्हाला चुकवावी लागणार आहे. तुमचं विजेचं बिल वाढणार आहे. महाराष्ट्र शासनानं महसूल वाढवायचा ठरवलं आहे. काही जिल्ह्यात दुप्पट, काही जिल्ह्यात तिप्पट तर काहीत साडेतीनपट. आपण सरकारला सांगितलं पाहिजे की हे सरकार आम्ही आर्थिक बाबतीत मानत नाही. तुमच्या घरी शिस्त लावा. नोकरदारांवर जी उधळपट्टी चालली आहे ती थांबवा. वीजबोर्डाची परिस्थिती अशी की जितके नोकरदार लागतात त्याच्या दुप्पट नोकरदार, कामाच्या मानाने जितका पगार मिळाला पाहिजे त्याच्या दुप्पट पगार आणि जितका पगार मिळतो त्याच्या दसपट वरकमाई. अशा वीजबोर्डाचं आम्ही काहीसुद्धा देणं लागत नाही.

उद्यापासून सर्व शेतकऱ्यांनो विजेची बिलं भरणं बंद करा. सरकारचे कर भरणे बंद करा. बळिराज्याला विरोध करण्याकरिता नोकरदार संपावर जाणार आहेत. दोन नोव्हेंबरपासून बँकवाल्यांचा संप होणार होता; पण त्या आधीच सरकारनं त्यांच्या मागण्या मान्य केल्या. जर पुन्हा कधी बँकांचा संप चालू झाला तर, शेतकरी संघटना इथून इशारा देते की,

"एक दिवस जरी बँक, संपाच्या कारणाने बदं राहिली तरी त्या बँकेतील कर्ज-खाती शेतकरी पुरी करणार नाहीत. आपली सर्व खाती बंद करतील." राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये किंवा सहकारी सेवांमध्ये संप झाला तर सगळ्या शेतकऱ्यांनी तिथली खाती उचला, हवे तर पैसे घरी ठेवा पण या बँकांमध्ये, संस्थामध्ये खाती

ठेवू नका.

शिक्षकांचा संप झाला तर, मी माझ्या सगळ्या पाईकांना विनंती करतो की अशावेळी त्यांनी गावोगाव, आवश्यक वाटल्यास झाडाखाली शाळा भरवावी पण वीस वीस, चाळीस चाळीस हजारांची लाच देऊन नोकरी मिळविणाऱ्या शिक्षकांचा संप यशस्वी होऊ देऊ नका.

महाराष्ट्रातील सरकारी नोकर संप करायला निघाले आहेत. शासनाशी आमचे काय रागलोभ असतील ते सोडून द्या. मी शासनाला शब्द देतो की, ''जे काही लोक संपावर जातील त्यांच्या बदली प्रामाणिकपणे, काहीही पगार न घेता, स्वच्छ काम करण्याकरिता वाटेल तितकी आणि हव्या त्या स्तरावरची – तलाठ्यापासून ते मुख्य सचिवांपर्यंत – प्रत्येक जागेकरिता पात्र माणसं आमच्याकडे उपलब्ध आहेत.''

या झाल्या कार्यक्रमाच्या घोषणा. स्वातंत्र्य जाहीर केलं. काळ्या इंग्रजालासुद्धा आपण देशातून निघून जा सांगितलं, करा किंवा मरा म्हटलं, पण याची अंमलबजावणी कशी होणार आहे?

अंमलबजाणीचे वेळापत्रक मी तुम्हाला सांगतो. आज ३१ ऑक्टोबर म्हणजे महिना संपला. आज कोजागरी पौर्णिमा म्हणजे उद्यापासून नवा पक्ष चालू होतो आहे. घरी गेल्यानंतर काय करायचं आहे ते लक्षात घ्या.

तुमचं गाव जर या आपल्या नव्या बळिराज्यातलं गाव, स्वतंत्र होणारं गाव असलं तर त्या गावच्या वेशीवर पहिल्या प्रथम बळिराज्य गाव अशी शेतकरी संघटनेची पाटी लावा. येणाऱ्या जाणाऱ्याच्या लक्षात आलं पाहिजे की हे स्वतंत्र झालेलं गाव आहे.

**ही बळिराज्याची पाटी लावण्याकरिता काय केलं पाहिजे?**

आपण चाललो स्वतंत्र व्हायला, पण तुमच्याकडून मीसुद्धा एक भीक मागणार आहे. तुम्हाला स्वतंत्र व्हायचं असेल तर माझ्या मायबहिणींना, तुमच्या लक्ष्मीला गुलामीत ठेवून चालणार नाही. बळिराज्यात येण्यास लायक गाव कोणतं? ज्या गावात लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम होईल, म्हणजे निदान शंभर लोक आपल्या लक्ष्मीच्या नावाने जमीन करून देतील असं लक्ष्मीमुक्तीचं गाव आणि त्याबरोबर त्या गावातील दारूचं दुकान बंद झालं तरच मी त्याला बळिराज्याचं गाव म्हणेन; तरच माझ्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेत त्या गावाची गणना होईल; एरवी नाही.

या स्वतंत्र गावाने आपल्या स्वातंत्र्याचे हक्क बजावत असताना त्याला संरक्षण कोण देणार? या स्वतंत्र गावाने कर द्यायचा नाही म्हटलं तर सरकारी नोकरदारांपासून त्यांना संरक्षण कोण देणार? या गावाने विजेचं बिल द्यायचं नाही

म्हटलं आणि वीज तोडायला लोक आले तर, आवश्यक तर नवीन वीज जोडून देण्याचं काम कोण करणार? आणि त्या सर्व वीज अधिकाऱ्यांचा बंदोबस्त करायला कोण येणार? या प्रश्नाचं उत्तर मी देण्याचं कारण नाही. यासंबंधी आदेश १९४२ मध्ये तुम्हाला इतिहासाने दिलेला आहे. १९४२ मध्ये स्वतंत्र राज्य जिथं जिथं तयार झाली तिथं तिथं आपल्याला स्फूर्ती देणारी एक घटना घडली. त्यातून निर्माण झालेली संस्था म्हणजे 'नाना पाटील ब्रिगेड' गावोगाव 'नाना पाटील ब्रिगेड' तयार करा आणि जे जे कोणी अन्याय करायला येतील त्यांचा बंदोबस्त कसा करायचा हे तुमचं तुम्ही ठरवा.

शांतता संपली आहे. कारण या देशामध्ये आता फक्त बंदूकधारी, पिस्तूलधारी, मशीनगनधारीच फिरताहेत. बाँबची भाषा चालते आहे आणि सरकार त्याच्यापुढे काही करू शकत नाही; पण भाकरीचं स्वातंत्र्य मागणाऱ्या लोकांनी मात्र निमूटपणे काहीही न करता हात जोडून 'शरद पवारां'चे अन्याय सहन करायचे हे आम्ही मानणार नाही. तुम्ही उद्यापासून स्वतंत्र आहात. करा किंवा मरा. तुमच्यातला प्रत्येक तरुण हा आजपासून 'नाना पाटील ब्रिगेड'चा सैनिक झाला असं मी जाहीर करतो.

'नाना पाटील ब्रिगेड'चं काम काय? दहा नोव्हेंबरपर्यंत तुम्ही आपलं गाव स्वतंत्र असल्याचं जाहीर करायचं आहे. दहा नोव्हेंबर हा आपला 'शेतकरी हुतात्मा दिन' आहे. तुम्हाला दहा दिवसांत लक्ष्मीमुक्तीचा आणि दारूदुकानबंदीचा कार्यक्रम आटपायचा आहे. दारूदुकानबंदीवाल्यांना गावात राहायलाच भीती वाटावी असं वातावरण तयार करा.

दहा नोव्हेंबरनंतर कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी खुलेआम गाड्या काढून दुसऱ्या राज्यात कापूस न्यायला सुरुवात करा. मध्ये कोणी पोलिस आले तर त्यांना सामना देण्याची जबाबदारी मी 'नाना पाटील ब्रिगेड'वर सोपवतो आहे.

कर भरला नाही, वीजबिल भरलं नाही म्हणून कोणी आलं तर त्यांचा सामना 'नाना पाटील ब्रिगेड'नं करायचा आहे. आपलं आंदोलन शेतीसंबंधी आहे. घरगुती वापराच्या विजेचं बिल सर्वांनी भरायचं आहे. शेतीसाठी वापरलेल्या विजेचं बिल भरायचं नाही. हे बिल भरलं नाही म्हणून जर गावाची वीज तोडली तर ती पुन्हा जोडण्यासाठी 'नाना पाटील ब्रिगेड'ने पुढे यावं.

जो जो म्हणून अन्याय होईल त्याला विरोध करण्याकरिता 'नाना पाटील ब्रिगेड'ने पुढे यावं.

कापसाचे रेचे टाकले आणि सरकारनं म्हटलं आम्ही ते जप्त करतो तर 'नाना पाटील ब्रिगेड'ने त्यांचा सामना करावा.

१९४२ सालानंतर एकावन्न वर्षांनी सूर्य मावळताना पुन्हा एकदा आपण तीच शपथ घेत आहोत.

सरकार बुडत चाललं आहे. समाजवादाच्या नावाखाली, नेहरूशाहीच्या नावाखाली दिल्लीमध्ये बसून डुढ्ढाचार्यांनी लक्षावधी लोकांना लुटण्याचं षडयंत्र आजपर्यंत रचलं त्याचा अंत होतो आहे. मॉस्कोत त्याचा अंत झाला, दिल्लीमध्ये अंत झाला आणि डंकेल प्रस्तावाच्या निमित्ताने पाश्चिमात्य राष्ट्रांमध्येही त्याचा अंत झाला.

आपल्या देशात ओरड चालू आहे की बाहेरच्या कंपन्या 'डंकेल'च्या मदतीने आल्या तर त्या 'ईस्ट इंडिया कंपनी' होणार नाहीत काय? सुभाषचंद्र बोसांनाही असंच विचारण्यात आलं होतं, हे जापानी म्हणजे नाझी आहेत. जर्मन म्हणजे हुकूमशहा आहेत, त्यांची मदत कशासाठी घ्यायची. नेताजींनी त्यांना उत्तर दिलं होतं की, ''गुलामांना कोणी मित्र नसतात, गुलामांना तत्त्वांशी काही देणेघेणे नसते. गुलामांना फक्त स्वतंत्र व्हायचं असतं.''

आज आमच्या उरावर बसलेल्या इंडियाला दूर करण्याकरता मला 'ईस्ट इंडिया कंपनी'ची मदत घ्यायला लागली तर ती सुद्धा घेऊन पुढे जायला तयार आहोत. पुढे त्यांच्याशी लढाई कशी करायची हे आम्ही ठरवू, पण आम्हाला लुटणाऱ्या इंडियावाद्यांनी 'ईस्ट इंडिया कंपनी'चा धाक आम्हाला दाखवायचा प्रयत्न करू नये.

सूर्य मावळण्याच्या आधी, जाणीवपूर्वक, सविस्तर भाषण न करता पुढील कार्यक्रमाचा आराखडा सांगितला. आज इथून निघताना तुमचा निरोप घेऊन निघतो आहे. अशा तऱ्हेचे आंदोलन केल्याचे काय परिणाम आहेत, काय जबाबदारी येते याची मला जाणीव आहे.

तुम्ही आजपासून स्वतंत्र आहात. तुम्ही आजपासून 'नाना पाटील ब्रिगेड'चे सैनिक आहात. शेतकऱ्यांवर अन्याय करणारा जो जो म्हणून हुकूम असेल तो तो तोडण्याचं तुमचं कर्तव्य आहे. मी तुरुंगात असो, माझे सहकारी तुरुंगात असोत किंवा नसोत, हे आंदोलन शेवटपर्यंत लढवत ठेवण्याची जबाबदारी मी तुमच्यावर सोपवतो आणि इथंच तुमची रजा घेतो.

(३१ ऑक्टोबर १९९३ – खुले सत्र, शेतकरी संघटना पाचवे अधिवेशन औरंगाबाद,)

*(शेतकरी संघटक ६ नोव्हेंबर १९९३)*

■■

# आमचे आम्ही मालक

**माझ्या शेतकरी भावांनो, मायबहिणींनो आणि पोलिस भावांनो,**

शेतकरी भावांना, मायबहिणींना हाक घातल्यानंतर पोलिसांनाही मी आवाहन करतो आहे, अशाकरिता की, आजचा हा कार्यक्रम काही सभेचा नाही, आजचा हा कार्यक्रम आंदोलनाचा आहे. मी, शरद जोशी, राहणार आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे. कायद्याच्या दृष्टीने गुन्हा करून इथे उभा आहे. इथे येण्यापूर्वी या गावातल्या भाताच्या 'हलर'चं उद्‌घाटन मी माझ्या हातानं केलेलं आहे. माझ्याबरोबर मंचावर बसलेले, शेतकरी संघटनेचे दोन माजी अध्यक्ष, एक सध्याचे अध्यक्ष, तीन आमदार, शेतकरी महिला आघाडीच्या नाशिक जिल्ह्याच्या प्रमुख, लातूर जिल्ह्याच्या प्रमुख असे कित्येक कार्यकर्तेही माझ्याबरोबर होते. माझ्यासमोर बसलेल सर्व हजारो मायबहिणी हेदेखील या बेकायदेशीर कृत्यामध्ये सामील झालेले आहेत आणि आम्ही, तुमच्या दृष्टीने जो गुन्हा आहे असे कृत्य केल्याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. त्याची जी काही शिक्षा द्यायची ती शिक्षा घ्यायला आही तयार आहोत. तुम्ही अटक करणार असलात तर त्याकरिता आम्ही तयार आहोत.

परवाच्या दिवशी मी दिल्लीला होतो. अंदाजपत्रकाची चर्चा झाली आणि अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग मला म्हणाले की, ''अंदाजपत्रकासंबंधी थोडी अधिक चर्चा करायची आहे, तुम्ही थांबू शकता का?'' मी म्हटलं, ''आज थांबायला काही वेळ नाही, कारण मला नागपूरला लगेच जायचं आहे.'' ''काय काम आहे?'' म्हणाले तेव्हा मी त्यांना म्हटलं की, ''नागपूरला जाऊन एक बिगरपरवाना भाताचा हलर चालू करायचा आहे.'' ते म्हणाले, ''त्यात अडचण काय आहे?'' मी म्हटलं, ''हिंदुस्थान देशामध्ये, तुमच्या राज्यामध्ये परिस्थिती अशी आहे की मोटारींचा कारखाना काढायचा म्हटला तर लायसेन्सची गरज नाही, विमानाचा कारखाना काढायचा म्हटला तरी लायसेन्सची गरज नाही; पण भाताची गिरणी टाकायची झाली तर त्याला लायसेन्स लागतं, कापसाचा रेचा टाकायचा झाला तर

त्याला लायसेन्स लागतं, माझ्या शेतात पिकवलेला ऊस हा जवळच्या कारखान्यातच घातला पाहिजे, लांब कुठं नेता कामा नये असा कायदा आहे." अर्थमंत्री मला म्हणाले, "ही गोष्ट खरी आहे?" मी म्हटलं, "खरी आहे, तुम्हाला माहीत नाही?" ते म्हणाले, "हा कोणाचा कायदा आहे. राज्य सरकाचा का केंद्र सरकारचा?" मी म्हटलं, "मला वाटतं हा केंद्र शासनाचा कायदा असावा. कारण भाताची गिरणी उघडायला परवाना कशाकरिता लागतो? भातावरची लेव्ही वसूल करता यावी म्हणून. कोणाकोणाकडून लेव्ही वसूल करायची आहे हे परवान्यामुळे माहीत होतं." मला अर्थमंत्री म्हणाले, "असा जर कायदा असेल तर तो कायदा महामूर्ख (Stupid) आहे."

ज्यांना माझ्यावर आणि या सगळ्या लोकांवर खटला भरायचा आहे त्यांना माझं हे भाषण कोर्टात सादर करावं लागेल. त्यांनी दिल्लीचे वित्तमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांचं हे वाक्य पुराव्यामध्ये सादर केलं पाहिजे. त्यांच्या मते हा कायदा महामूर्ख आहे.

त्यावेळी मी त्यांना म्हटलं की, "हा महामूर्ख कायदा तोडण्याचं काम कोणाला तरी केलं पाहिजे. ते काम करायला मी चाललो आहे."

येथे जमलेल्या सगळ्यांचं मी अभिनंदन करतो. वाकर्ला गावामध्ये मी दुसऱ्यांदा येतो आहे. चिमूरमध्ये १९४२ मध्ये जे कांड घडलं त्यात वाकर्ला गावाचा मोठा भाग आहे. गेल्या वेळी लक्ष्मीमुक्तीच्या कार्यक्रमाकरिता कार्यकर्त्यांनी किती प्रेमाने मला ओढून आणलं ते मला आठवतं आहे. त्यानंतर औरंगाबादच्या अधिवेशनाच्या तयारीकरता येथून जवळच शंकरपूरला आलो होतो. तेव्हाही इथली बरीच मंडळी हजर होती हे मला आठवत आहे. औरंगाबादच्या अधिवेशनाच्या आलेले ओळखीचे चेहरे मला इथं दिसत आहेत आणि याच गावामध्ये आणखी एकदा इतिहास घडावा ही मोठी महत्त्वाची गोष्ट आहे. १९४२ च्या आंदोलनामध्ये चिमूर प्रकरण झालं आणि त्या चिमूरच्या सगळया सत्याग्रहींना, ज्यांच्या गळयाभोवती फासाचा दोर आलेला, तितक्यात केवळ स्वातंत्र्य आलं म्हणून जीवदान मिळून त्यांचा फासाचा दोर वाचला. त्या सगळ्या क्रांतिवीरांचं कौतुक करण्याकरिता खुद्द पंतप्रधान, ५१ वर्षांनी का होईना इथे आले आणि पंतप्रधानांच्या अर्थमंत्र्यांना हे माहीत नाही की गोऱ्या इंग्रजाची गुलामगिरी संपली; पण त्यांच्या पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली काळ्या इंग्रजाची गुलामगिरी अजूनसुद्धा चालू आहे.

नवीन क्रांतीचा इतिहास इथून वाकर्ल्यातून घडायला सुरुवात होत आहे.

४२ मध्ये चिमूरला क्रांती झाली, आज इथे१९९३ मध्ये म्हणजे बरोबर ५१ वर्षांनी वाकर्ल्यामध्ये क्रांती घडते आहे. औरंगाबादच्या अधिवेशनात मी असं

म्हटलं की ४२ मध्ये जशी परिस्थिती होती तशीच परिस्थिती आज तयार झाली आहे. सरकार नावाची गोष्ट काही शिल्लक राहिलेली नाही. मुंबईमध्ये दिवसाढवळ्या गुंड लोक राजरासपणे दारूगोळ्याची वाहतूक करीत आहेत, त्यांना पकडायला कोणी तयार नाहीत. आजच्या नागपूर टाइम्समध्ये पहिल्या पानावर, मुंबईमधल्या एका मोठ्या माणसाची मुलाखत आहे. त्यात तो म्हणतो, "दाऊद इब्राहीम हा माझा मानलेला मुलगा आहे हे मी कबूल करतो." कित्येकजण म्हणतात की आम्ही दाऊद इब्राहीमच्या फार जवळीची माणसं आहोत. त्यांना पकडायला कोणी एक पोलिस गेलेला नाही. दाऊद इब्राहिमला जे स्वतः इस्त्रायलला जाऊन भेटले त्या शरद पवारांचा वाढदिवस काल नागपूरच्या स्टेडियमवर मोठ्या उत्साहाने साजरा झाला, दाऊद इब्राहीमचे साथीदार म्हणून त्यांना पकडायला कोणी स्टेडियमवर गेलं नाही.

पोलिस आता इथं हजर आहेत. आपल्या सगळयांवर कदाचित खटला भरणार आहेत, माझ्यावर भरणार आहेत. औरंगाबादचं भाषण झाल्याबरोबर औरंगाबादच्या पोलिसांनी पहिल्यांदा काय पराक्रम केला, तर माझ्यावर खटला भरला. आज कशाबद्दल खटला भरला जाईल? इथं गावामध्ये भात पिकतो. तो भात पिकल्यानंतर बाजारात जाऊन विकावा लागतो आणि घरी खायच्यापुरता भात सडायचा झाला तर एकतर मायबहिणींना घरी भात सडावा लागतो किंवा शेजारच्या गावी लांब चालत, डोक्यावर भाताचं बोचकं घेऊन जाऊन सडून आणावं लागते, तेव्हा तो आमच्या पोटात जातो. भात गावातल्या गावात सडण्याची सगळयांची सोय पाहिजे असेल तर गावामध्ये एक हलर असायला काही हरकत आहे का? पण कायदा म्हणतो की त्याला परवानगी मिळणार नाही. आपल्या शेतात तयार झालेला भात गावातल्या गावात सडून मिळण्याची सोय करायला कायद्याची परवानगी नाही. का म्हणून परवानगी मिळणार नाही? इथे आपले सगळे जे पोलिसभाऊ आहेत त्यांनासुद्धा मी हा प्रश्न विचारतो. त्यांना माहीत आहे, भाताच्या गिरणीला का परवाना मिळत नाही, जर का तिथं जाऊन योग्य त्या अधिकाऱ्याला पाचदहा हजार रुपये लाच दिली तर महिन्या दोन महिन्यांत हलरचं लायसेन्स मिळतं आणि हे लायसेन्स प्रामुख्याने कोणाला दिलं जातं? राज्यकर्त्या पक्षाच्या लोकांना दिलं जातं, पैसे घेऊन दिलं जातं आणि राज्यकर्त्यांचा व नोकरदारांचा स्वार्थ चालत राहावा म्हणून आमच्या मायबहिणींना डोक्यावर भाताची बाचकी घेऊन लांबलांब जाऊन भात सडून आणावा लागतो.

माझ्या शेतात पिकणारा भात. तो कुठं सडायचा, कुठं विकायचा हे कोणी ठरवायचं? मला वाटलं तर माझ्या घरी उखळामध्ये मी स्वतः सडेन, गावात

सोयीस्कर हलर असला तर मी त्याच्याकडे जाईन आणि तांदूळ घेऊन जवळ शेजारच्या गावात भाव बरा असला तर तिथं जाईन. चंद्रपूरला जावंसं वाटलं तर तिथं जाईन आणि चांगला भाव मिळत असेल तर माझा तांदूळ घेऊन मी लंडनला नाहीतर न्यूयॉर्कलासुद्धा जाईन. तांदूळ विकायला कुठं जायचं ते मी ठरवणार आहे, ते ठरवणारं सरकार नाही.

लायसेन्स काढायला माझी हरकत नाही; पण मी हलर बसवल्यानंतर जो कोणी त्या कामावरचा साहेब असेल त्याने आपला इन्स्पेक्टर पाठवावा आणि सांगावं की गिरणी काढलीत ना मग सरकारी नियमाप्रमाणे रजिस्ट्रेशन फी काय पाचदहा रुपये आहे तेवढी द्या. असा एखादा हलर वगैरे चालू केला आणि तिथं साहेब रजिस्ट्रेशन फी मागायला आला तर अवश्य द्यावी पण साहेबाकडे पनवानगीसाठी अर्ज करायला जाऊ नये.

भातवाल्यांचं आंदोलन होत नाही, होत नाही असं आपण बरीच वर्षे म्हणत आलो आहेत. परवा अंदाजपत्रकासंबंधी दिल्लीला जी चर्चा झाली त्या चर्चेनंतर साधारणपणे शेतकऱ्यांच्या मागण्या काय आहेत यासंबंधी वित्तमंत्रालयाने दिलेल्या बातम्या आज सगळया वर्तमानत्रांमध्ये आहेत आणि त्यात ज्या काही पंधरावीस गोष्टी शेतकऱ्यांना पाहिजे आहेत असे लिहिले आहे त्यात एक नंबरची गोष्ट आहे 'भातावरची लेव्ही रद्द करावी' ही मागणी. भातावरील लेव्ही रद्द होईल अशी माझी जवळजवळ खात्री आहे. आपल्या आंदोलनाची आरोळी ठोकल्याबरोबर काय परिणाम झाला बघा. तेव्हा, आता पाऊल पुढेच टाका.

आणि माझ्या, कापूस उत्पादक भावांनो, शेजारच्या राज्यात चांगला भाव मिळत असेल तर कापूस तिथं न्या आणि भाव मिळवा.

काही ठिकाणी पोलिस थांबवायचा प्रयत्न करतात. का? अकोला जिल्ह्यातील काही ठिकाणी पोलिसांनी दुसऱ्या राज्यात जाणारा कापूस थांबवायचा प्रयत्न केला; पण त्या पोलिसांची इच्छा काय होती? शेजारच्या राज्यात आम्ही कापूस नेऊ नये अशी त्यांची इच्छा नव्हती; ट्रकभर कापूस नेत असलात आम्हाला ५००० रुपये द्या, टेंपो नेत असाल तर जो काही २०००, ३००० भाव आहे तितके पैसे द्या. बैलगाडी असेल तर ५० रु. द्या, ५० नसतील तर खिशात काय ५/१० रुपये असतील ते द्या आणि तेही नसतील तर तुमच्या खिशातली एक बिडीतरी काढून द्या, एवढीच त्यांची इच्छा. म्हणजे, त्यांचा हेतू कापसाची वाहतूक थांबवणे हा नाही, तर रस्त्यावर संध्याकाळी एकटादुकटा प्रवासी पाहून त्याच्यावर हल्ला करणारे दरोडेखोर जसे असतात, तसेच हे गणवेशातले दरोडेखोर आहेत.

मी इथे हजर असलेल्या माझ्या पोलिसभावांना आणि अधिकाऱ्यांना विनंती

करतो की गणवेश ही सन्मानाची गोष्ट आहे, तुम्ही भाग्यवान म्हणून हा गणवेश घालण्याचा मान तुम्हाला मिळाला, गणवेश घालून चोरदरोडेखोरांचं पाप तुम्ही करू नका आणि तुमचे जे भाऊ गणवेश घालून शेतकऱ्यांवर अशा तऱ्हेने दरोडे घालत असतील त्यांनासुद्धा समजावून सांगा की या गणवेशाचा असा अपमान करू नका. गणवेश घालून जर कोणी चोरी करायला गेला तर त्याला पोलिस म्हणत नाहीत. गणवेश घालून चोरी करायला गेलेला माणसाला गणवेशातला चोर म्हणतात. गणवेशातील चोर जर सापडला तर त्यांचा बंदोबस्त, चोराचा जसा बंदोबस्त केला जाईल, तसाच केला जाईल. कायद्याने मला काही हक्क दिले आहेत. कोणी चोराने, दरोडेखोराने जर माझ्यावर हल्ला केला तर मी माझं संरक्षण करण्याकरिता काय केलं पाहिजे हे मला कायद्याने सांगितलं आहे. तो चोर गणवेश घालून आला तर मी माझं स्वत:चं संरक्षण करू नये असं कायद्यानं सांगितलेलं नाही. एखाद्या बाईवर जर का एखादा गणवेशातला पोलिस हात उचलू लागला तर बाईला स्वत:च्या अब्रूचं रक्षण करण्याकरिता काय वाटेल ते करण्याचा हक्क कायद्याने दिलेला आहे. तेव्हा पोलिसांनी एवढं लक्षात ठेवावं की तुम्ही भाऊ आहात आमचे, गणवेशातले भाऊ आहात, आम्हाला तुमच्याविषयी अत्यंत आदर आहे, केवळ सरकार दरोडेखोरांचं झालं आहे. मुख्यमंत्री गुंडांचा झाला आहे म्हणून तुम्ही तुमच्या गणवेशाचा अपमान होऊ देऊ नका. कारण या देशामध्ये शेवटी विजय होणार आहे तो या देशाच्या मालकांचा होणार आहे. गुंडांचा आणि दरोडेखोरांचा नाही.

कापूस आम्ही पिकवलेला, शेजारच्या राज्यामध्ये सोळाशे भाव असला आणि इथं जर सरकार म्हणू लागलं की तुम्हाला फक्त हजार रुपयेच भाव मिळेल तर काय करायला पाहिजे? शेजारच्या राज्यामध्ये पोलिसांना जो पगार मिळतो, निदान तितका आपल्याला मिळाला पाहिजे अशी पोलिसांची जशी इच्छा, तसंच शेजारच्याच राज्यांतला भाव कमीत कमी आपल्याला मिळावा अशी कापूस उत्पादकांची इच्छा आहे. शेजारच्या कारखान्याच्या हद्दीतल्या उसाला जितका भाव मिळतो किमान तितका माझ्या उसालाही मिळावा अशी ऊसउत्पादकांची इच्छा आहे. तेव्हा सरकार शेतकऱ्याला जेव्हा अशा परिस्थितीत अडवत तेव्हा त्यांनी दिलेला हुकूम हा बेकायदेशीर आहे.

तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या अधिकाऱ्याचं किंवा मॅजिस्ट्रेटचं काय घेऊन बसलात, खुद्द केंद्रशासनाच्या अर्थमंत्र्यांनी सांगितलं आहे की भाताचा हलर काढण्यावर निर्बंध घालणारा कायदा मूर्खपणाचा आहे. तेव्हा पोलिसांनी शेतकऱ्यांवरील अशा तऱ्हेच्या निर्बंधाकरिता स्वत:चे हात उचलू नयेत, काठ्या

उचलू नयेत.

या वाकर्ला गावामध्ये हलर काढला. हे भाषण करताना मलाही माहीत नाही की पोलिसांनी काय करायचं ठरवलंय ते? कदाचित निघायच्या आधीसुद्धा अटक होण्याची शक्यता आहे. झालीच तर चांगलंच आहे. आपण सगळेच जण जाऊ तुरुंगात, बरं होईल आपली भाकरीची सोय होईल. अटक झाली नाही तर मी या गावातल्या सगळ्या भावांवर एक जबाबदारी सोपवून जातो आहे. मी इथून गेल्यानंतर, माझ्या हस्ते उद्‌घाटन झालेल्या हलरचा बचाव करण्याची आणि संरक्षण करण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. जर का कोणीही कायद्याने, कायद्याचा गणवेश घालणाऱ्या माणसांनी हा हलर बंद करण्याचा किंवा उचलून नेण्याचा प्रयत्न केला तर पहिली जबाबदारी मी महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांना देतो; आवातल्या प्रत्येक महिलेने या हलरच्या जवळ उभं राहून तुम्हाला अटक झाल्याखेरीज हलरला कोणी हात लावू शकणार नाही याची काळजी घ्या आणि ही जबाबदारी येथे जमलेल्या सर्वांवर आहे. हा हलर शेतकरी संघटेच्या प्रतिष्ठेचा आहे. याला जर कोणी हात लावायला आलं तर इथे जमलेल्या आजूबाजूच्या गावांतल्यासुद्धा शेतकऱ्यांनी येऊन इथं उभं राहून सत्याग्रह केला पाहिजे. वाकर्ल्यांच्या आसपास दहाबारा गावांतील एकूण एक शेतकरी तुरुंगात गेल्याशिवाय पोलिसांना या हलरला हात लावता आला नाही पाहिजे. तोपर्यंत बाकीच्या जिल्ह्यातून, इतर राज्यांतूनही सत्याग्रही या हलरच्या संरक्षणासाठी मोठ्या संख्येने आलेले असतील.

आम्ही एक गोष्ट मागितली. शेतकऱ्याला काय पाहिजे? शेतकऱ्याला स्वातंत्र्य पाहिजे. आम्ही कष्ट करताना गाळलेल्या घामाचं दाम मिळालं पाहिजे ही आमची मागणी आहे. कालच्या कार्यकारिणीच्या सभेत मी सांगितलं, ८० सालापासून आम्ही घसा फोडून सांगतो आहोत की, शेतकऱ्याला लुटायचा हा उद्योग चालू आहे आणि बाकीचे लोक म्हणायचे की, "शेतकऱ्याची फार मजा असते. शेतकऱ्यांना किती सबसिडी मिळते, शेतकऱ्याला वीज स्वस्त मिळते, शेतकऱ्याला पाणी स्वस्त मिळतं आणि वर इन्कमटॅक्स नाही." अरे पण शेतकऱ्याला मुळात लुटत असाल तर टॅक्स असेल कुठून? आम्ही सांगत होतो की शेतकऱ्याला सबसिडी नाही, शेतकऱ्याला खत महाग आहे; खताची सबसिडी महणतात ती शेतकऱ्याला भेटत नाही, ती कारखानदार खाऊन जातात. शेतकऱ्यांना वीज कशी मिळते? दिल्लीमध्ये वित्तमंत्री मला म्हणाले की, "जगाच्या मानाने हिंदुस्थानातली वीज फार स्वस्त आहे. जी वीज तयार करायचा खर्च १ रु. ३० पैसे येतो त्यासाठी आमची अशी इच्छा आहे, की शेतकऱ्यांनी निदान ५० पैसे द्यावेत." मी त्यांना म्हटलं की, "गावातली वीज कशी येते तुम्ही बघितली काय? परदेशामध्ये

विजेचा भाव १ रुपया आहे म्हणता, परदेशातल्यासारखी वीज आम्हाला इथे शेतात मिळाली तर मीसुद्धा १ रुपया द्यायला तयार आहे." मी परदेशात पंधरा वर्षे राहत होतो त्या काळात फक्त दोनदा वीज गेली असं झालं. त्यावेळीसुद्धा आठ दिवस आधी वीजबोर्डाचं कार्ड आलं होतं, की अमुक दिवशी अमुक वेळेला आम्ही वीज घालवणार आहोत तेव्हा काही महत्त्वाची कामे असतील तर आधी आटोपून घ्या आणि विजेवर चालणारी जी काही यंत्रं असतील त्यांचं संरक्षण करण्याची व्यवस्था करा.

आमच्या आंबेठाणला जी वीज येते तिची अवस्था काय आहे? एकही दिवस असा जात नाही की ज्या दिवशी तीनवेळा वीज तुटत नाही. विजेचा दाब कमीजास्त होणे तर सतत चालूच असते. कॉम्प्युटर चालवणे तर कठीणच पण विहिरीवरची मोटारसुद्धा अखंडपणे चालवणे शक्य होत नाही.

मी वित्तमंत्र्यांना म्हटलं की, "परदेशातल्यासारखी वीज द्या, चोवीस तास द्या, ठराविक दाबाची द्या मी परदेशातला भाव तुम्हाला द्यायला तयार आहे;" पण सध्याच्या विजेकरता जर का तुम्ही जास्त भाव द्या म्हणालात तर आम्ही देणार नाही. आतासुद्धा विजेवर शेतकऱ्यांना सबसिडी नाही.

शेतकऱ्याला सबसिडी किती दिली जाते? शेतकऱ्यांना सरकार देत असलेली सबसिडी किती दिली जाते? शेतकऱ्यांना सरकार देत असलेली सबसिडी उणे पन्नास टक्के आहे. म्हणजे शंभर रुपये जर तुम्हाला मिळायला पाहिजे असतील तर तुम्हाला फक्त पन्नासच रुपये मिळावे अशी व्यवस्था या सरकारने केली आहे आणि पन्नास रुपये जर कारखानदारांना मिळायला पाहिजे असतील तर त्यात शंभर रुपये मिळतील अशीही सरकारने व्यवस्था केली आहे. आता नेहरूव्यवस्था संपली, समाजवादी व्यवस्था रशियातही संपली. आता आपली घोषणा पाहिजे, आता यापुढे आम्ही गुलाम नाही, आम्ही आता स्वतंत्र आहोत, आम्हाला दुसरं काही नको.

आज आपण हलरचं उद्घाटन करून सत्याग्रहाचा कार्यक्रम केला याचा अर्थ काय? हा हलर चालू करून कोणी कोट्यधीश होणार आहे काय? दाऊद इब्राहीमसारख्यानं स्मगलिंगचा धंदा चालू केला तर तो कोट्यवधी रुपये कमावतो. हा हलरचा धंदा चालवून सगळा खर्च-वेच वजा जाता पंधरावीस रुपयेसुद्धा दिवसाकाठी जमा होणार नाहीत. तरीसुद्धा हा हलर शेतकऱ्याच्या स्वातंत्र्याचं प्रतिक आहे. महाराष्ट्रामधील शेतकऱ्यांनी सगळे कायदे बाजूला टाकून आपल्या मालाची प्रक्रिया करण्याचं स्वातंत्र्य स्वत:कडे घेतलं त्याचं हे प्रतिक आहे. आज उद्घाटन म्हणून आपण सत्याग्रह केला आहे, त्या हलरचं संरक्षण

करण्याकरिता तयार राहा. भातावरील प्रक्रियेच्या स्वातंत्र्याकरिता, भाताच्या लेव्हीला विरोध करण्याकरिता जो जो काही कार्यक्रम जाहीर केला जाईल त्यामध्ये उत्साहाने भाग घ्या आणि ४२ सालच्या चिमूरच्या क्रांतीची परंपरा राखून वाकर्ल्याने जो झेंडा आता हाती घेतला आहे तो डौलाने फडकवत ठेवा एवढीच विनंती.

(१३ डिसेंबर १९९३- वाकर्ला)

*(शेतकरी संघटक २१ डिसेंबर १९९३)*

■■

# युग आहे उद्योजकवादी संस्कृतीचे

राजकीय धोरण ठरवताना शेतकरी संघटनेने कोण्या पक्षांना मदत करावी, का आपला प्रभाव असेल अशा एखाद्या पक्षाची स्थापना करावी हा चर्चेचा विषय आहे. 'स्वतंत्र भारत'ची स्थापना करताना एक प्रश्न उभा राहिला की तुम्ही पक्ष स्थापन केला तरी त्या पक्षाला निवडणूक लढविण्याचा अधिकार असेल का?

**निवडणुकीचा हक्क सगळ्यांना नाही**

प्रजासत्ताक भारताच्या घटनेमध्ये डॉ. आंबेडकरांनी असं लिहिलं होतं की भारत सार्वभौम लोकतंत्रवादी प्रजासत्ताक राष्ट्र आहे. इंदिरा गांधींनी आणीबाणीच्या काळामध्ये त्यात 'निर्धार्मिक' आणि 'समाजवादी' असे शब्द घुसडले. त्यामुळे आता 'सार्वभौम लोकतांत्रिक निर्धार्मिक समाजवादी प्रजासत्ताक' अशी शब्दांची मोठी रांग त्यामध्ये लागली. त्या पलीकडे जाऊन निवडणुकीच्या लोकप्रतिनिधित्व कायद्यामधील कलम २९ मध्ये अशी तरतूद ठेवली आहे की, जो राजकीय पक्ष निवडणूक लढवू इच्छित असेल त्याने घटनेवर निष्ठा व्यक्त केली पाहिजे. राजकीय पक्षाची जी काही घटना असेल, नियम–पोटनियम असतील त्यांमध्ये घटनेवरील निष्ठेचे कलम तर पाहिजेच; पण त्या पक्षाची अधिकृत नोंदणी करायची असेल, त्याला एक निवडणूक चिन्ह मिळवायचे असेल तर लोकतंत्र, समाजवाद, निर्धार्मिकता यांवर विश्वास असल्याची लेखी शपथ जाहीरपणे घ्यावी लागते. इतकेच नव्हे तर एखाद्या खाजगी उमेदवारास निवडणुकीस उभे राहायचे असेल तर त्यालाही घटनेमधील या मूल्यांवर आपली निष्ठा असल्याचे आपल्या उमेदवारी अर्जामध्ये शपथपूर्वक लिहून द्यावे लागते. तात्पर्य : लोकशाही, समाजवाद, निर्धार्मिकता यांवर विश्वास व्यक्त केल्याशिवाय कोणाही व्यक्तीस किंवा पक्षाच्या उमेदवारास निवडणूक लढविताच येत नाही. या तरतुदीचा परिणाम काय झाला?

**खोट्यांना परवानगी**

शिवसेनेने पक्ष म्हणून मान्यतेसाठी व निवडणूक चिन्हासाठी अर्ज केला. त्यात त्यांनी लिहून दिले की आम्ही निर्धार्मिक आहोत. बाहेर वाघाचा मुखवटा घालून हर क्षणी 'गर्व से कहो, हम हिंदू हैं ।' म्हणून गरजणारे हे लोक निवडणूक चिन्ह मिळावं म्हणून आम्हीसुद्धा निर्धार्मिक आहोत असं लिहून देतात. दुसऱ्याच दिवशी पुन्हा वाघाचं कातडं पांघरून पुन्हा पहिल्यासारखंच गरजायला लागतात आणि बाळासाहेब ठाकरे उघडपणे सांगतात की आम्हाला अशी नाटकं करावीच लागतात; आम्ही खोटं बोललो नसतो तर आम्हाला चिन्ह मिळालं नसतं. म्हणजे, घटनेवर विश्वास ठेवणं बंधनकारक आहे म्हणून आम्ही खोटं बोललो आणि निवडणूक चिन्ह पदरात पाडून घेतलं असं बाळासाहेब ठाकरेंनी कबूल केलं. त्यांनी कबूल केलं पण इतरांनी असं कधी कबूल केलं नाही.

कम्युनिस्टांनी जुन्या काळीसुद्धा आपला लोकशाहीवर विश्वास असल्याची खोटीच शपथ घेऊन चिन्हं मिळविली. भारतीय जनता पार्टीने, बब्बर खालसाने 'आम्ही निर्धार्मिक आहोत' अशी शपथ घेऊन चिन्हं मिळवली आहेत आणि आता खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारी, मनमोहनसिंग आणि नरसिंहराव यांची काँग्रेस आणि त्यांचे उमेदवार 'आम्ही समाजवादी आहोत' अशी शपथ घेऊन निवडणूक लढतात. मुख्य निवडणूक आयुक्त शेषणसाहेब 'सर्व पक्षांचे उमेदवार निवडणुकांचा खोटा खर्च दाखवतात' असा आक्षेप घेतात; पण हे सर्वजण घटनेवरील विश्वासासंबंधी खोटी शपथ घेऊन निवडणुका लढवतात हे मोठं सत्य शेषणसाहेब सांगत नाहीत. आता सरकार एक पाऊल पुढं चाललं आहे. चालू अधिवेशनात निवडणूकप्रणालीसुधारासंबंधी एक बिल सरकारनं लोकसभेसमोर ठेवलं आहे. त्यात एक अशी तरतूद आहे की एखाद्या पक्षाने जर नोंदणी किंवा चिन्ह-मागणीच्या वेळी शपथ घेतली असेल आणि नंतर असं लक्षात आलं की त्या पक्षाची लोकशाहीवर, समाजवादावर किंवा निर्धार्मिकतेवर निष्ठा नाही तर त्या पक्षाची नोंदणी रद्द करून निवडणूक चिन्ह परत घेता येईल. ही दुरुस्ती मान्य झाली तरी घटनेतील एखादे, तत्त्व अमान्य असणाऱ्या व्यक्तीला किंवा पक्षाला निवडणूक लढविण्याचा अधिकार नाही.

**खोटे न बोलणारांना नाही**

शेतकरी संघटनेचा प्रभाव असलेला एखादा पक्ष आहे असे समजा; तो 'स्वतंत्र भारत' असो वा आणखी कोणता; पण निवडणुकीचा अर्ज भरायचा तर ज्या शपथेवर सही करायची त्यातील शब्द आपल्याला मान्य आहेत का? मी

निर्धार्मिक आहे, मान्य आहे. मी लोकशाहीवादी आहे, मान्य; पण मी समाजवादी आहे असं म्हणून सही करायची म्हणजे शेतकरी संघटनेच्या कोणाही कार्यकर्त्याला किंवा संघटनेची वैचारिक बैठक मान्य असलेल्या कोणाही उमेदवाराला प्रश्न पडेल. समाजवाद्यांना निवडणूक लढविण्यास परवानगी आहे पण ज्या लोकांची समाजवादावर श्रद्धा नाही त्यांना या तथाकथित लोकशाहीवादी देशात निवडणूक लढविण्याचा अधिकार नाही. रशियामध्ये स्टॅलिनच्या काळामध्येसुद्धा समाजवादी नसलेल्यांना निवडणूक लढविण्याची परवानगी होती; पण पी. व्ही. नरसिंहराव, राजीव गांधी, इंदिरा गांधी यांच्या लोकशाहीवादी हिंदुस्थानात समाजवादी नसलेल्यांना निवडणूक लढविण्याचा अधिकार नाही. याला काय अर्थ आहे?

**लढाई हक्कासाठी**

मग आपल्यासमोर दोनच पर्याय राहतात. पहिला, राम जेठमलानींनीसुद्धा सुचविलेला, पर्याय म्हणजे सगळे 'नाटक' करतात तसंच आपणही करायचं. ते म्हणतात, 'कशाला वाद घालता, म्हणून टाका समाजवादी आहोत म्हणून, सही करा आणि चिन्ह मिळवा.' दुसरा पर्याय असा की, ठामपणे सांगून टाकायचे की आम्ही खोटं बोलायला तयार नाही, खोटं बोलून आम्हाला निवडणूक लढवायची नाही. आम्ही पहिल्यांदा निवडणूक लढविण्याचा हक्क मिळविणार आहोत; समाजवादी नसलो म्हणून काय झालं? मुस्लिम लीग, जमाते इस्लामपासून विश्वहिंदू परिषदेपर्यंत सर्वजण 'आम्ही निर्धार्मिक आहोत' म्हणून खोटं बोलून सह्या करीत असले आणि निवडणुका लढवीत असले तरी आम्ही खोटं बोलायला तयार नाही. निवडणूक लढविण्यापेक्षा, समाजवादी नसलेल्यांना निवडणूक लढविण्याचा हक्क मिळविण्याचा लढा खुल्या बाजारपेठेचं आंदोलन पुढे नेण्याकरिता जास्त उपयुक्त आहे.

**खुल्या बाजारपेठेसाठी**

शेतकरी संघटनेच्या औरंगाबाद अधिवेशनात परिस्थितीचा आढावा घेतांना आपण पाहिलं की सर्व राजकीय पुढारी खुल्या अर्थव्यवस्थेच्या विरुद्ध आहेत; नोकरदार खुल्या व्यवस्थेच्या विरुद्ध आहेत; सरकारी संरक्षणाशिवाय स्पर्धेमध्ये टिकणं शक्य नाही म्हणून कारखानदारसुद्धा खुल्या व्यवस्थेच्या विरोधात आहेत. खुल्या व्यवस्थेच्या विरोधात सगळे बँकवाले संप करतात, नोकरदार संपावर जातात. या घटकांकडून सरकारवर इतका दबाव आणला जातो की दावोसच्या भाषणात आणि दिल्लीच्या काँग्रेस समितीच्या भाषणात खुद्द पंतप्रधानांनी म्हटलं की, 'खुली व्यवस्था मागणारं या हिंदुस्थानात कुणीच नाही.' म्हणजे जणू, खुली व्यवस्था नको, नियोजन हवं, मदत हवी, संरक्षण हवं अशा प्रकारे 'आम्हाला

द्या' म्हणून हात पसरणारे भिकारीच फक्त या देशात आहेत; आम्ही आमच्या पायावर उभं राहायला तयार आहोत असं म्हणणारे लोक या हिंदुस्थानात नाहीत; पण आपण, शेतकरी संघटनेचा विचार मानणारे तसे आहोत; निदान आपली तशी धारणा आहे की आपण तसे आहोत.

हा मुद्दा मांडायचा असेल आणि लढाई उभी करायची असेल तर वेगवेगळी साधनं आहेत. आपण शेतीमालाच्या भावाची मागणी करतो म्हणजे आपण बाजारपेठेवर चालणाऱ्या खुल्या व्यवस्थेवर विश्वास ठेवतो. पण असे म्हटले की तुमच्यावर लगेच आरोपांच्या फैरी सुरू होतील. चक्रवर्ती राजगोपालाचारींसारख्या माणसांनी स्वतंत्र पक्ष स्थापन केल्यावर नेहरूंसारख्यांच्या माणसांनी 'हे सगळे संस्थानिकांचे प्रतिनिधी आहेत, कारखानदारांचे प्रतिनिधी आहेत' म्हणून त्या पक्षाला बदनाम केलं. आकडेवारी पाहिली तर, १९६७ च्या निवडणुकीत स्वतंत्र पक्षातून निवडून आलेल्या ४५ खासदारांपैकी ३४ शेतकरी होते, ८ राजेरजवाडे आणि दोनतीन दांडेकर-मसानी. नागपूरला (काँग्रेस अधिवेशनात) जेव्हा सामूहिक शेतीची कल्पना मांडली गेली व कमाल जमीनधारणेचा प्रस्ताव मांडला गेला तेव्हा त्याच्या विरोधात स्वतंत्र पक्षाचा जन्म झाला. पण दुर्दैवाने शेतकऱ्यांची बाजू मांडणारा, त्यांच्या वतीने खुली व्यवस्था मागणारा त्यावेळी कुणी नव्हता. उद्योजक शेतकरी तयार झाला नव्हता; सरकारच्या मदतीकडे डोळे लावून बसलेला शेतकरीच सगळीकडे होता. त्यामुळे स्वतंत्र पक्षाला बदनाम करण्यात आलं. आजसुद्धा मी असो किंवा तुम्ही असा, खुल्या व्यवस्थेचा पुरस्कार केला तर 'यांच्यापासून गरिबांना धोका आहे' असं म्हणून गरिबांच्या नांवावर लठ्ठ होणारे लोक टीका करायला सुरुवात करणार आहेत. तेव्हा, खुलेपणाचं तत्त्वज्ञान घेऊन पुढं जाणं तसं कठीण आहे.

### स्वातंत्र्याची हरवलेली संवेदना

दुसरा मुद्दा असा की खुलेपणाचं तत्त्वज्ञान घेऊन कुणाकडं जायचं? जी मंडळी आपल्यात गेली दहाबारा वर्षं काम करताहेत त्यांच्या मनांतसुद्धा प्रश्न निर्माण होतात की, बाजारपेठेत एखाद्या वर्षी भाव मिळाला नाही तर काय करायचं, शेतकरी मल्टीनॅशनल्स्शी कसा काय सामना करणार? शेतकरी संघटनेतील कार्यकर्त्यांची ही स्थिती मग नोकरदार, पुढारी, कारखानदार यांची स्थिती विचारायलाच नको.

खुली व्यवस्था हवीच कुणाला? खुलेपणाचं तत्त्वज्ञान घेऊन कुणाकडे जायचं? केवळ खुल्या व्यवस्थेचं नांव काढलं, स्वातंत्र्य म्हटलं की बहुतेक लोकांचे पाय लटलटा कापायला लागतात. 'स्वातंत्र्य असं नको, माझं बोट धरून चालवा'

अशी बहुतेकांची स्थिती. सततच्या संरक्षणामुळे, आधारामुळे परावलंबी झालेल्या माणसाची स्थिती कशी होते? चांदवडच्या महिला अधिवेशनात एका कार्यकर्त्या बहिणीने सांगितलेली हकीकत उदाहरण म्हणून पुरेशी बोलकी आहे. चांगली पन्नाससाठ वर्षांची बाई, संध्याकाळ झाली की किंवा दिवसांसुद्धा घराबाहेर पडायचं असेल, पाच वर्षाच्या लहान मुलाला बरोबर घेते आणि म्हणते, 'पुरुष माणसाची सोबत असलेली बरी.' तशी, स्वातंत्र्याची जाण विसरलेली माणसं, 'आमच्याकडं सरकार अजिबात बघणार नाही, यंदा महापूर आला तर काय करायचं, काही भयानक झालं तर आमच्या मदतीला कोण येणार?' असं म्हणतात आणि स्वातंत्र्याकडे पाऊल टाकण्याआधीच त्यांचे हातपाय थरथरायला लागतात.

**स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा विकास**

मनुष्य जन्मतःच स्वतंत्र नाही. उत्क्रांतीमध्ये मनुष्यप्राण्याची उत्पत्ती झाली तेव्हा तो टोळीमध्ये होता आणि टोळीमधील व्यक्तिगत स्वातंत्र्य कमी होतं. टोळीच्या मानाने राजेशाहीत माणसाला स्वातंत्र्य अधिक मिळालं. आज आपल्याला राजेशाही गुलामीची वाटते पण राजेशाहीत टोळीपेक्षा जास्त स्वातंत्र्य होतं. राजेशाहीकडून आपण लोकशाहीकडे आणि लोकशाहीकडून भांडवलशाहीकडे गेलो; भांडवलशाही बरोबरीने समाजवादाचा प्रयोग झाला. प्रत्येक वेळी व्यक्तीच्या स्वातंत्र्याचं पाऊल पुढं पडत गेलं. आता आपण त्याच्या पुढच्या स्वातंत्र्याचं पाऊल टाकत आहोत. स्वातंत्र्याचं प्रत्येक पुढचं पाऊल टाकताना प्रत्येक पायरीला माणसं घाबरत राहतात. आपल्या गुलामीच्या दाहकतेची त्याला जाणीव नसते. मोकळं झाल्यानंतर त्यांना कळतं की आपण स्वतंत्र झालो; पण हातात बेड्या असताना बेड्या काही टोचत नाहीत. नोकरी ही गुलामीच आहे. नोकरी करणाऱ्या माणसाला खरं तर शरम वाटायला पाहिजे. तो कोण्या एका मालकाच्या किंवा साहेबाच्या ऑफिसमध्ये जातो, मान खाली घालून ठराविक वेळेपर्यंत काम करीत राहातो, तो बोलेल ते ऐकून घेतो. का? तर, काहीही उपयोगाचं केलं नाही तरी महिन्याच्या एक तारखेला पगार मिळतो आणि पोट भरतं. ही पगारी गुलामगिरी आपण स्वीकारली आहे. त्या बेडीची जाणीव नाही. पण ती तुटणार आहे.

**लढ्याचं पहिलं पाऊल**

मनुष्य टप्प्याटप्प्याने स्वातंत्र्याकडे जातो आहे, परंतु प्रत्येक वेळी पाय आखडत जात आहे. ज्यांना स्वातंत्र्य नको त्यांचे पाय अडखळतात. स्वातंत्र्याची कल्पना मांडली तर तुम्ही भांडवलवादी आहात, तुम्ही अमेरिकेचे पित्ते आहात, तुम्ही मोठ्या शेतकऱ्यांच्या बाजूचे आहात असे आरोप होणार आहेत. मग स्वातंत्र्याचा लढा पुढे नेण्याचं पहिलं पाऊल आज कोणतं आहे? समाजवाद

झुगारून स्वातंत्र्य मागणाऱ्यांनासुद्धा निवडणुका लढविण्याचा अधिकार मिळविणे हे या लढ्यातील पहिलं पाऊल आहे आणि इंदिरा गांधींनी आपल्याला या लढाईसाठी सोय करून ठेवली आहे. शेतकरी संघटनेच्या सुरुवातच्या काळात मी म्हणत असे की राव वीरेंद्र सिंग नसते तर संघटना एवढी काही पसरली नसती. कारण त्यांची वक्तव्येच मुळी शेतीच्या लुटीचा पुरावा देणारी आणि शेतकऱ्यांच्या असंतोषाला ठिणगी लावणारी असत. त्याचप्रमाणे इंदिरा गांधींची ४२ वी घटना दुरुस्ती आपल्याला या लढाईत उपयोगी पडणार आहे. या घटनादुरुस्तीत त्यांनी समाजवादाची शपथ घेण्याचं कलम घातलं.

आपण जेव्हा समाजवाद नाकारून निवडणुकीचा हक्क मिळविण्याच्या लढ्याची भूमिका मांडू तेव्हा लोक विचारणार आहेत, 'समाजवाद शब्दात काय वाईट आहे?' कारण, जो तो म्हणतो की, 'मी समाजवादी आहे.' समाजवाद कशाशी खातात याची ज्यांना अजिबात माहिती नाही अशी माणसेसुद्धा मी माणूस आहे, मी श्वास घेतो या धर्तीवर मी समाजवादी आहे असे सहजतः म्हणतात. विचार करणारा माणूस समाजवादी असायचाच असं गृहीत धरून चालतात. पंचवीस-तीस वर्षे मार्क्स्‌वादी म्हणून समाजात मिरवलेल्या माणसांनासुद्धा समाजवाद म्हणजे काय सांगता येईलच असे नाही. धुळ्याला अशाच एका रॅशनल ह्यूमॅनिस्ट गृहस्थांनी, 'समाजवाद म्हणजे जे काही आहे ते सगळ्यांनी सारखं वाटून घ्यायचं' अशी व्याख्या केली होती. मार्क्स्‌च्या संकल्पनेच्या जवळपाससुद्धा न जाणारा अर्थ जुन्या पिढीतले मार्क्स्‌वादी समाजवादाला देत असतात तेथे इतरांची काय कथा?

स्वतंत्र हिंदुस्थानची घटना बनत असताना कुणीतरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विचारलं की, ''समाजवादाची योजना काय वाईट आहे?'' घटनेमध्ये 'समाजवादी' शब्द का घालत नाही?'' आंबेडकर काही साम्यवादी किंवा समाजवादी नव्हते. ते म्हणाले की, ''घटनेच्या माझ्या मसुद्यामध्ये समान आर्थिक संधी, समान सामाजिक न्याय वगैरे संकल्पना आहेत त्यांच्यापेक्षा समाजवाद काय वेगळा असतो?'' म्हणजे बाबासाहेबांनासुद्धा समाजवाद म्हणजे काय याची स्पष्ट कल्पना नव्हती. तरीसुद्धा आज रावसाहेब कसब्यांसारखे समाजवादी बाबासाहेबांविषयी लिहिताना त्यांचा मार्क्स्‌वादाचा अभ्यास फार चांगला होता असं लिहितात.

**आर्तिनाशनाची रूपे**

समाजवादाच्या या लोकप्रिय प्रेरणेचा उगम कशात आहे? या प्रेरणेचा उगम धर्मव्यवस्थेमध्ये, संतांच्या भक्तिमार्गामध्ये, सूफी पंथामध्ये आहे. स्वतःसाठी जगला तो काही खरा नव्हे, स्वार्थ सगळेच साधतात; पण ज्या काळात घनघोर

दुःख होतं, घनघोर भूक होती, घनघोर दारिद्र्य होते, घनघोर रोगराई होती त्यावेळी स्वतःचं बघण्यापलीकडे लोकांचं काम केलं, त्यांच्या दुःखावर फुंकर घातली तर ते श्रेष्ठ मानण्याची शिकवण होती. संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे,

*न त्वहं कामये राज्यम्*
*न स्वर्गम् न पुनर्भवम्*
*कामये दुःखतप्तानाम्*
*प्राणिनाम् आर्तिनाशनम्*

मनुष्य प्राण्याने कामना कशाची करायची? राज्य नको, स्वर्ग नको, पुनर्जन्महीनको परंतु दुःखामुळे तप्त झालेल्या लोकांचं दुःख कमी करण्याचं भाग्य मला लाभावं अशी कामना धरणे हे पुरुषार्थाचं गमक मानलं जातं होतं. त्या काळात लोककल्याणकारक समाजवादाची प्रेरणा उगम पावली.

**आतिथ्य आणि भिक्षा**

शेतकऱ्यांनी खळ्यामध्ये पीक उभं करावं, जे कोणी गरजू, भुकेले येतील त्यांच्या पोटाला द्यावं, त्यांची भूक शमन करावी हा 'आर्तिनाशना'चा नवा वेगळा अर्थ तयार झाला. ज्यांच्याकडे शेती नाही, उत्पादनाची इतर साधनं नाहीत त्यांना उत्पादक घटकांनी खाऊ घालावं असा आर्तिनाशनाचा नवा अवतार अतिथ्याच्या रूपाने तयार झाला आणि त्याला समाजामध्ये इतकी मान्यता मिळाली की भीक मागणे हा धर्म झाला. भिक्षुकांच्या झुंडीच्या झुंडी जे उत्पादन करणारे लोक आहेत त्यांच्या दाराशी जाऊन भीक वाढा असं म्हणायच्या ऐवजी, मला भूक लागली आहे म्हणून याचना करण्याऐवजी मी धर्माचं, अध्यात्माचं काम करतो, मी मोक्षाचं साधन करतो आहे; तुम्ही सर्वसामान्य संसारी माणसं आहात, या संसाराच्या चिखलामध्ये रुतला आहात; तुमच्या कल्याणाकरिता, पुण्य प्राप्तीकरता माझं पोट भरा असं सांगायला लागल्या. भिक्षा मागण्यामध्ये काही लाज नाही एवढंच नव्हे तर पाच घरी जाऊन भीक मागून मी माझं पोट भरतो आणि बाकीच्या वेळी ध्यान, तपस्या, अध्ययन करतो असा गर्व बाळगत भिक्षूंचे तांडेच्या तांडे फिरायला लागेल. भिक्षेचा धर्म झाला, भिक्षेचे तत्त्वज्ञान झाले. इतके की भिक्षुक 'मला धर्म वाढा, नाही तर तुम्हाला पाप लागले' असं धमकावणाच्या पायरीवर पोहोचले.

**संतांचा समाजवाद**

आतिथ्य आणि भीक हे आर्तिनाशनाचे दोन टप्पे झाले. औद्योगिक क्रांतीने शेतीवरून माणसं बाहेर निघाली, शहरात जाऊन राहू लागली तेव्हा पुन्हा एकदा समाजातील विषमतेची जाणीव झाली. मग शहरांमध्ये जी गरीब माणसं आहेत

त्यांच्याकरिता काहीतरी करायला पाहिजे या करुणेच्या भावनेतून प्राथमिक समाजवादाचा जन्म झाला. सोयीसाठी समाजवादाच्या या पहिल्या पायरीला आपण करुणेवर आधारलेला संतांचा समाजवाद म्हणू.

**ऐतखाऊंचे तत्त्वज्ञान**

समाजाने कष्ट करावे आणि त्याने दिलेल्या अन्नधान्यावर फुकट जगावे अशी ज्यांची इच्छा असते त्यांना आपण करुणेवर जगतो आहोत असं म्हणणं आवडत नाही. मग अशी ऐतखाऊ माणसं काही तत्त्वज्ञान तयार करतात. भिकेसाठी पहिलं तत्त्वज्ञान धार्मिकांनी तयार केलं. आम्ही प्रपंचाच्या चिखलात अडकू इच्छित नाही. तुम्ही कमवा, आम्हाला खाऊ घाला, आम्ही तपस्या करू, पुण्य जोडू, त्यातील काही तुम्हाला पावेल आणि तुम्हाला भवसागर पार करायला ते उपयोगी पडेल.

औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात अर्थशास्त्री मंडळी पेचात पडली. एकाकडे खूप पैसे, दुसऱ्याकडे काही नाही. ही विषमता दूर झाली पाहिजे. मग त्यांनी युक्तिवाद काढायला सुरुवात केली. ज्याच्याकडे आहे त्याने आपल्यातील, दुसऱ्या गरिबाला दिलं पाहिजे. कोणी मागितलं तर देऊ असं म्हणून नाही चालायचं. या अर्थशास्त्री मंडळींनी तत्त्वज्ञान मांडलं की समाजातील सर्व व्यक्तींच्या समाधानाची बेरीज जास्तीत जास्त होईल अशा तऱ्हेने समाजाच्या सर्व संपत्तीचे समान वाटप व्हायला पाहिजे. समाधान कसं मोजायचं?

**कल्याणकारी अर्थशास्त्र**

समजा, तुम्हाला खूप भूक लागली आहे. अशा वेळी एक चतकोर भाकरी मिळाली तर किती आनंद होतो? दुसरा चतकोर खाताना आनंद पहिल्यापेक्षा कमी होतो. तिसऱ्या चतकोराच्या वेळी आणखी कमी होतो. दोनचार भाकऱ्या खाऊन पोट भरलं की आनंद होणे थांबतं आणि पुढच्या प्रत्येक चतकोराबरोबर नकोसेपण वाढत जाते. अशा प्रकारच्या अनुभवांचं मोजमाप करून समाजातील सर्व ग्रहकांच्या 'समाधाना'ची बेरीज जास्तीत जास्त होईल अशा तऱ्हेने वाटप करण्याचं हे तत्त्वज्ञान. आता या समाधानाची मोजणी आणि बेरीज कशी करायची? कारण व्यक्तीव्यक्तीच्या समाधानाचा अनुभव वेगळा, मात्रा वेगळी. त्यांची तुलना आणि बेरीज कशी करणार? भुकेचे ठोस मोजमाप करता येणार असेल तर ती शमविण्याच्या समाधानाचे करता येईल.

बंगालमध्ये पडलेल्या भीषण दुष्काळात माणसं गावं सोडून कलकत्त्यात आली. अगदी धान्याच्या गोदामांजवळ येऊन उपासनं मेली. पण त्यांनी गोदामे फोडण्याचा प्रयत्न केला नाही. या भुकेचं मोजमाप कशानं करायचं? उलट,

सिगरेटची सवय असलेल्या एखाद्या माणसाला एखादे वेळेस सिगरेट मिळाली नाही तर तो रात्रीअपरात्री अंधारातून खड्डेखुड्डे पार करून एका सिगारेटसाठी दोन-चार मैल जातो. भाकरी न मिळालेल्या माणसांनी क्रांती घडवून आणल्याचं उदाहरण नाही पण व्हिस्की न मिळालेल्या माणसांनी क्रांत्या घडवून आणल्याची उदाहरणे आहेत. मग भाकरीची भूक आणि सिगरेट-व्हिस्कीची भूक यांचे मोजमाप व तुलना कशी करायची? आणि भाकरी मिळाल्यावर होणारे समाधान व सिगरेट, व्हिस्की मिळाल्यावर होणारे समाधान यांचे मोजमाप आणि बेरीज कशी करायची? पण अशा या समाधानाच्या मोजमापाच्या कल्पनेवरही एक तत्त्वज्ञान उभे करण्यात आले. त्याला म्हणतात कल्याणकारी अर्थशास्त्र (Welfare Economics) त्याची चेष्टा झाली, कारण यात शास्त्रीयता काही नाही.

**मार्क्स्‌चा समाजवाद**

मग, समाजवादाच्या मार्क्स्‌प्रणीत तत्त्वज्ञानाचा उगम झाला. मार्क्स्‌वाद्यांचा मोठा अहंकार आहे की आम्ही संतवादी नाही, आम्ही व्यत्ययवादी नाही. आम्ही शास्त्रीय समाजवादा (Scientific Socialism) चे पुरस्कर्ते आहोत. त्यांनी समानतेसाठी वेगळा युक्तिवाद मांडला.

अगदी सुरुवातीला मनुष्यप्राणी उत्पादन करू लागला तेव्हा जसं आजही पशुपक्षी करतात तसं उत्पादन करायचं आणि खायचं असं त्याचं स्वरूप होतं. पुढे उत्पादनातील खाऊन बचत तयार झाली तेव्हा आपल्याकडची बचत दुसऱ्याला देऊन त्याबदली त्याच्याकडील आपल्याला हवी ती वस्तू घ्यायची अशा तऱ्हेने विनियम व्यवस्था म्हणजे व्यापार सुरू झाला. सुरुवातीला पैसा नव्हता; पण देवाणघेवाणीच्या सोयीसाठी त्याची निर्मिती झाली. आपल्याकडची बचत बाजारात विकून पैसा घ्यायचा आणि मग त्या पैशातून आपल्याला हवी ती वस्तू घ्यायची. तिचा वापर करून अधिक बचत तयार करायची. म्हणजे पैसा ही मुख्य वस्तू नाही. आपल्याकडे उत्पादनातील बचतीचा माल आहे त्याच्यातून पैसा म्हणजे धन करायचं आणि नंतर त्या धनातून पुन्हा आपल्याला माल तयार करता यावा अशी ही 'मा-ध-मा' म्हणजे मार्क्स्‌च्या भाषेत Commodity-Money-Commodity अशी व्यापार व्यवस्था होती.

पुढे ही व्यवस्था विपरीत झाली आणि व्यापाराचं सूत्र असं झालं की ज्याच्याकडे धन आहे तो आपल्याकडील धन वाढविण्यासाठी आपल्याकडील धना(ध)चा वापर करून माल तयार करून घेतो आणि तो माल विकून आधीच्यापेक्षा जास्त धन (धा) तयार करतो. म्हणजे मा- ध-मा या व्यवस्थेतील 'मा' ने सुरुवात करण्याऐवजी 'ध' ने सुरुवात करून 'मा' चे उत्पादन करायचे व त्यापासून 'ध'

पेक्षा जास्त 'धा' जमा करायचे. अशी

ध–मा–धा व्यवस्था सुरू झाली. या व्यवस्थेचा फायदा मिळवायच्यामागे लोक लागले. प्रत्येकाने असा व्यक्तिगतरीत्या फायदा मिळविण्याचा प्रयत्न सुरू केल्यानंतर परिणाम असा झाला की धनिकांकडे, उद्योजकांकडे, भांडवलदारांकडे पैसा साठून राहायला लागला आणि हे सर्व लोक कामगारांचं शोषण करीत असल्याने कामगार उत्पादन करायचे पण त्यातून तयार होणारं धन मात्र त्यांच्या हाती येत नसे, त्यांना मजुरी मिळत नसे. त्यामुळे परिस्थिती अशी निर्माण झाली की कारखानदारांनी भांडवल गुंतवायचे, मजुरांकडून माल तयार करून घ्यायचा, माल बाजारात आणायचा पण बाजारात आलेला माल विकत घ्यायला कुणाकडे पैसा नसे. कारण जे ग्राहक आहेत त्यांचं शोषण झालेलं, त्यांच्या हाती पैसा नाही. मजुरांच्या रूपाने माल त्यांनीच तयार केला होता, पण जितका माल तयार केला तितका पैसा मजुरीच्या रूपाने कामगारांच्या, पर्यायाने ग्रहकांच्या हाती न गेल्याने बाजारात मंदीची लाट येते. कारखाने बंद पडतात. त्यामुळे हजारो लाखो कामगार भीक मागत फिरतात. हा भांडवलशाही व्यवस्थेतील दोष आहे. अशी मांडणी मार्क्स्वादी करतात.

**नोकरदार बनविणारा विचार**

हा दोष दूर करण्यासाठी ते काय उपाय सुचवतात? खाजगी मालमत्ता संपवा. सगळ्या खाजगी मालमत्तेचे राष्ट्रीयीकरण करा. संपत्तीचे समान वाटप करा असे जे आम्ही म्हणतो आहोत ते काही आमच्यावर – कामगारांवर – उपकार करा असं सांगण्यासाठी नाही. तर, समाजाला लागलेला हा जो मंदीचा रोग आहे तो दूर करावयाचा असेल तर त्याला पर्याय नाही म्हणून संपत्तीचे समान वाटप आवश्यक आहे. जे काही निर्णय घ्यायचे ते काही व्यक्तींच्या किंवा व्यक्तिसमूहांच्या फायद्याकरिता घेऊ नका, सकल समाजाचे हित पाहा. समाजाचे हित कोण पाहणार? भांडवलदार थोडेच पाहणार आहेत? कामगार वर्गच असा आहे की ज्याच्याकडे मालमत्ता नसल्यामुळे तो व्यवस्थितपणे आर्थिक निर्णय घेऊ शकतो. या कामगार वर्गाच्या हाती हुकूमशाही आली पाहिजे. मार्क्स्वाद्यांच्या या मांडणीत मंदीचा धोका टाळण्यावरील औषध म्हणजे समाजातील सगळ्या मालमत्तेचे राष्ट्रीयीकरण करावे, जे कोणी याला विरोध करतील त्यांना संपवून टाकावे, सर्वांनी नोकरदार होऊन राहायचे आणि सरकार मग त्यांना त्यांच्या गरजेप्रमाणे पुरवठा करणार. म्हणजे ज्याने त्याने आपापल्या ताकदीप्रमाणे उत्पादन करावं आणि आम्ही सरकार म्हणून ज्याला त्याला गरजेप्रमाणे पुरवठा करू अशा स्वरूपाच्या समाजाची मांडणी मार्क्स्वाद्यांनी केली.

फायद्यावर दृष्टी ठेवून जेथे इतर निर्णय होतात तेथे बाजारपेठेतील मागणी कमी पडते, मंदी येते, समाजाची उत्पादन करण्याची ताकद असूनही केवळ फायद्याचा विचार करणाऱ्या लोकांच्या बुद्धीमुळे समाज दरिद्री राहतो, समाज नीट चालायचा असेल, वैभवशाली बनवायचा असेल तर फायदा ही गोष्ट राहता कामा नये, फायदा असेलच तर त्याचं राष्ट्रीयीकरण करा, समाजवादी नियोजन करा, सगळे लोक समान आहे, ते सर्व सुखी होऊन जातील असा मार्क्स्‌वाद्यांच्या तथाकथित शास्त्रीय समाजवादाचा सारांश आहे.

**अर्तिनाशन झालं नाहीच**

'आर्तिनाशना'चं भयानक रूप या शास्त्रीय समाजवादाच्या नावाने पुढं आलं आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, या विचारानं शंभर वर्षे मनुष्यजातीचं 'हायजॅकिंग' केलं. जो जो कोणी मनुष्यजातीचा विचार करणारा झाला त्याने त्याने या समाजवादाच्या प्रभावाखालीच विचार मांडला. समाजवाद म्हणजे व्यक्तीप्रेरणांनी चालणारा, अनन्यसाधारण असणाऱ्या व्यक्तिंच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाशी निष्ठा राखण्याच्या सामूहिक प्रयत्नांतून निर्णय घेण्याची व्यवस्था असे न मानता माणूस महत्त्वाचा नाही, समाज महत्त्वाचा, या समाजाच्या हितासाठी जे निर्णय होतात तेच योग्य असे मानणारी व्यवस्था अशी व्याख्या जो तो करीत राहिला. यातूनही समाजाचं हित साधलं असतं तरी हरकत नव्हती. पण आता सिद्ध झालं आहे की या अशा समाजवादानं समाजाचं हित काही झालंच नाही.

**समाजवादाचा आधीच अंत**

खरं तर, आज या विषयावर चर्चा करण्याची गरजही नाही. आपलं शेतकरी आंदोलन सुरू झालं त्यावेळी, १९८० साली अनेक समाजवाद्यांना गोळा करून त्यांच्याशी चर्चा केली आहे. त्यांना त्यावेळी सांगितलं होतं की, 'तुमच्या या समाजवादानं समाजाचं भलं होणं शक्य नाही. तुमची कल्पना चुकीची आहे. कामगारांच्या बचतीतून भांडवल तयार होतं असं मार्क्स्‌नं जे मांडलं आहे ते खरं नाही. भांडवल तयार होतं ते शेतकऱ्यांच्या बचतीतून तयार होतं. नाहीतर, औद्योगिक भांडवल तयार करण्याकरिता स्टॅलीनला शेतकऱ्यांवर रणगाडे फिरविण्याची गरज पडली नसती. ज्या दिवशी स्टॅलीनने शेतकऱ्यांवर रणगाडे पाठविले त्याच दिवशी मालमत्तेच्या समान वाटपावर आधारलेला समाजवाद संपला आहे; आता फक्त त्याचं दफन व्हायचं बाकी आहे.'

आम्ही हे १९८० सालापासून सांगत आहोत, पण कुणी मानायला तयार नव्हते. पण आता हा चर्चेचासुद्धा विषय राहिला नाही. गोर्बाचेव्हपासून सगळ्यांनी मान्य केलं आहे की समाजवादाच्या नियोजनाने होणारे निर्णय बरोबर असू

शकत नाहीत. बाजारपेठेत होणारे निर्णय चांगले असतात. बाजारातील निर्णयही चुकीचे असतील. पण जे काही बाजारात घडेल तोच न्याय. बाजार ही पद्धतही दोषास्पद आहे. पण बाजारापेक्षा चांगली पद्धत अजून माणसाला सापडलेली नाही. ज्याच्या गळ्यात माळ पडते तो सर्वांत लायक आहे असे थोडेच असते? सर्वात जास्त शर्यती जिंकणारा घोडा सर्वोत्तम असतो हेही खरे नाही. बाजार वाईट नाही आणि बाजार ही सर्वोत्तम गोष्ट आहे असेही नाही; पण याच्यापेक्षा चांगली पद्धत अजून माणसाने शोधून काढलेली नाही ही गोष्ट समाजवादी देशांतील लोकनेतेसुद्धा मान्य करू लागले आहेत.

**स्पर्धेचे तत्त्वज्ञान**

मग आपण शेतकरी संघटनेच्या विचारावर येतो की समाजवादी नियोजनपद्धतीत नियोजन करणारांनाच सर्वांत जास्त वाव मिळतो. समाजातील व्यक्तींचा विकास होत नाही आणि दीनदुबळ्यांचाही नाही. तेव्हा नियोजनपद्धतीचा त्याग करून प्रत्येक अनन्यसाधारण व्यक्तीने आपल्या व्यक्तिमत्त्वावर निष्ठा राखून आपापल्या स्वार्थाकरिता आपापल्या फायद्याकरिता प्रयत्न केला पाहिजे. गरीब, दीनदुबळ्यांच्या बाबतीत नंतर विचार करू. ऑलिंपिकसारख्या स्पर्धांचे आयोजन करताना आपण लंगड्या पांगळ्यांचा विचार करीत नाही. धडधाकटांचाच विचार करतो. अपंगांसाठी वेगळ्या स्पर्धा भरवायच्या किंवा काय यावर नंतर विचार करतो. तसं, ज्या व्यक्ती सुदृढ आहेत, सक्षम आहेत, स्वतःचं हित पाहू शकतात अशा व्यक्तींमध्ये आपापला विकास करण्याची स्पर्धा हाच समग्र समाजाच्या कल्याणाचा मार्ग आहे हे शेतकरी संघटनेचे मूलभूत तत्त्व आहे.

**अपंग, दुर्बलांसाठी 'लंगर'**

अनन्यसाधारण असलेल्या सर्व सक्षम व्यक्तींमधील स्वार्थाकरिता, स्वतःच्या फायद्याकरिता निकोप खुली स्पर्धा हाच समाजाच्या विकासाचा मार्ग आहे अशी मांडणी केली की समाजवादी नियोजनाची सवय झालेल्यांकडून काही प्रश्न येतात. पहिला प्रश्न, मग गरिबांचं, अपंगांचं, दीनदुबळ्यांचं काय? माझ्या मनात अपंगांविषयी जी भावना आहे तिला करुणा किंवा सहानुभूती म्हणणं चुकीचं होईल. शाळेतील एखाद्या वर्गामध्ये असणारी मुलं काही निवडून आणलेली नसतात. त्यांतील काही उंच असतात काही बुटकी, काही नकटी. आपण बियाणं तयार केलं तर त्यात लहान, मोठं, चांगलं, पोचट असं निघतंच. तसंच, मनुष्य जातीच्या प्रत्येक पिढीमध्ये जी काही नवीन 'लोकसंख्या' तयार होते त्यामध्ये काही लोक सुदृढ तर काही अपंग, दुर्बल असणे अपरिहार्य आहे. सुदृढ, सक्षम माणसांचं प्रमाण जास्त असतं, अशा सुदृढ सक्षम समाजामध्ये संख्याशास्त्रीय

दृष्ट्या काही अपंग, दुर्बल असणारं हे गृहीत धरले आहे. अशा अपंग आणि दुर्बल लोकांची काही प्रमाणात व्यवस्था करणे ही जबाबदारी समाजाची आहे यात काही शंका नाही. ही जबाबदारी कोणत्या पद्धतीने घेतली जावी, हे काम कुणाचं आहे हे ठरणं महत्त्वाचं आहे. कल्याणकारी राज्य म्हणून गरिबी दूर करतो म्हणणारांनी गरिबी वाढवली, स्वतःचे खिसे भरले. समाजातील गरिब, दुर्बल लोकांची जबाबदारी उचलण्याची आपल्या देशात अस्तित्वात असलेली सर्वांत उत्तम, आदर्श व्यवस्था म्हणजे 'गुरुद्वारांतील लंगर' होय. कुठेही शीख माणूस तुम्हाला भीक मागतांना दिसत नाही. कारण तो त्याला झेपेल तो धंदा सुरू करू शकतो, उद्योजकतेत फसला तर त्याच्यावर उपाशी मरायची वेळ येत नाही, आठ दिवस त्याची गुरुद्वारात सोय होते, तो दुसऱ्या उद्योगाचा विचार करू शकतो. अहिल्याबाई होळकरसुद्धा अपंग, कमकुवत व कमजोर वर्गाच्या कल्याणाचा कार्यक्रम राबविण्यात आदर्श मानता येतील.

**व्यक्ती तितक्या प्रेरणा**

पण, अपंगांना, दुर्बलांनासुद्धा अर्थव्यवस्थेत स्थान मिळालं पाहिजे म्हणून अर्थव्यवस्था बिघडली तर कसं होतं? ऑलिपिंक स्पर्धांमध्ये सुदृढांच्या बरोबरीने अपंगांनाही भाग घेता यावा म्हणून सुदृढांवर बंधनं घालणारं नियोजन झालं तर काय होईल? तेच अर्थव्यवस्थेचं होणार. अपंग आणि कमजोर घटकांची काळजी हा अर्थव्यवस्थेचा विषय नाही. माणसात काही एकच प्रेरणा असत नाही, त्याच्या वेगवेगळ्या प्रेरणा असतात. तसंच, समाजाच्याही वेगवेगळ्या प्रेरणा आहेत. त्यांतील अर्थप्रेरणा ही महत्त्वाची आहे. अर्थप्रेरणेखेरीज राजसत्ता चालवणारांची, दंडा चालविणारांची एक प्रेरणा वेगळी आहे. कोणाला तरी मदत करण्याचीही एक वेगळी प्रेरणा असते. एखादं मूल मरणाच्या पायरीवर पडलं आहे, ओकारीनं, घाणीनं बरबटलेलं आहे, आपल्याला त्याला हात लावणेसुद्धा नको वाटते पण अशा परिस्थितीतसुद्धा त्या मुलाला वात्सल्यानं उचलून त्याला बरं करण्याचा प्रयत्न करणं, किमान त्याच्या यातना कमी करण्याचा प्रयत्न करणं, अशीही माणसांची एक प्रेरणा असते. अगदी, 'असेल हरी तर देईल खाटल्यावरी' म्हणून आळसात पडून राहण्याचीही प्रेरणा असू शकते. कारण माणसा-माणसांच्या प्रेरणाच इतक्या विभिन्न आहेत.

पण, कोणत्याही स्थितीत अपंगांची काळजी हा विषय अर्थप्रेरणेवर चालणाऱ्या व्यवस्थांचा असूच शकत नाही. तो करुणेवर आधारलेल्या संस्थांचा, करुणा शब्द वापरायचा नसेल तर त्यासाठी तयार झालेल्या वेगळ्या संस्थांचा असला पाहिजे. गरिबाचं नाव घेऊन राजकीय सत्ता हातात ठेवणारांनी आर्थिक सत्ताही

लुबाडली आणि लोकांमध्ये लोकप्रिय घोषणा देऊन आपली सत्ता अधिक मजबूत केली आणि सक्षम उद्योजकतेचा घात केला. त्यांनी गरिबांचं भलं काहीही केलं नाही.

**अर्थकारणात डोकी मोजून चालणार नाही**

आपण जेव्हा फायद्याविषयी बोलतो तेव्हा आपण खुल्या अर्थव्यवस्थेविषयी, खुल्या बाजारपेठेविषयी बोलतो. प्रत्येक व्यवस्थेच्या काही फुटपट्ट्या असतात. आपल्या सध्याच्या राजकारणात एक अशीच फुटपट्टी मानतात. ती म्हणजे डोकी मोजणे. आज मते मोजणे म्हणजे डोकी मोजणेच आहे. या फुटपट्टीने आजच्या राजकारणात सर्व माणसे समान आहेत. आळशी माणसाला एक मत, उद्योजकाला एक मत, टाटाला एक मत, किर्लोस्करला एक मत, ग्यानबालाही एक मत. खरं तर डोकी मोजणे म्हणण्यापेक्षा पाय मोजून त्याला दोनने भागणे आणि तितकी मते अशी ही फुटपट्टी म्हणावी लागेल. अर्थकारणामध्ये निर्णय घ्यायचा तर डोकी मोजण्याची फुटपट्टी वापरून चालत नाही. अर्थकारणात ही फुटपट्टी वापरली तर काय परिणाम होतो याचं चांगलं उदाहरण म्हणजे आपल्याकडील सहकारी संस्था होत. ही फुटपट्टी वापरल्यामुळे तिथं व्यवसाय होऊ शकत नाही. अर्थकारणातील व्यवस्थेची फुटपट्टी पैसा असली पाहिजे. शेअर्स मोजा. जितके शेअर्स तितकी मते अशी फुटपट्टी असली तरच व्यवसाय करू शकणारी माणसे तिथे नेमली जातील. विद्येच्या क्षेत्रात काय फुटपट्टी असावी? आज जो तो स्वतःला विद्वान म्हणवतो आणि कुलगुरूच्या यादीत जाऊन बसतो आणि कुलगुरूच्या निवडीच्या परीक्षेत काय करून पास होतो याची कुणाला माहितीही मिळत नाही. न्याय ही आणखी एक प्रेरणा आहे; पण न्यायाधीशही अशाच चुकीच्या फुटपट्टीने निवडले जातात. ही सर्व मंडळी आपापल्या क्षेत्रातल्या प्रेरणांशी निष्ठा राखणाऱ्या फुटपट्ट्या तयार करता न आल्यामुळे सगळ्यात सोप्या, डोकी मोजण्याच्या फुटपट्टीकडे वळतात.

राजेशाहीत वेगवेगळ्या प्रेरणांच्या वेगवेगळ्या फुटपट्ट्या होत्या. वेगवेगळ्या क्षेत्रातल्या फुटपट्ट्या वेगवेगळ्या असतात, असाव्यात याची अनेक उदाहरणे नीतिशतकात आहेत. एक कवी राजाच्या दरबारात राजाला म्हणतो, "अरे, तू भलाही राजा असशील पण मीसुद्धा माझ्या ज्या गुरूची सेवा केली त्याचा मला मोठा अभिमान आहे. तुझं सैन्य असेल, माझाही मोठा शिष्यपरिवार आहे. तू युद्धामध्ये शौर्य गाजवत असशील, तर मी वादविवादामध्ये मोठा प्रख्यात म्हणून गाजलेला आहे आणि तुला जर माझी पर्वा नसेल तर मलाही तुझी पर्वा नाही." अशा तऱ्हेने आपापल्या प्रेरणाक्षेत्रांत स्वतःच्या फुटपट्ट्या तयार करून स्वतःचा

अभिमान बाळगणाऱ्या अनेक लोकांची उदाहरणे नीतिशतकात आहेत. रामशास्त्री प्रभुण्यांचं उदाहरण तर आपल्या इतिहासातलं ताजं उदाहरण आहे. अशा तऱ्हेचे विद्वान आजच्या लोकशाही समाजवादाच्या व्यवस्थेत होत नाहीत. मुख्यमंत्री आले तर विद्यापीठाचे कुलगुरूसुद्धा उठून उभे राहतात. एका कुलगुरूंनी सांगितले की मुख्यमंत्रीच काय, मुख्यमंत्र्यांचा चपराशी जरी आला तरी आम्ही उठून उभे राहतो.

म्हणजे, समाजवादाचा आणखी काय परिणाम होतो? माणसातली विविधता नाकारणे, माणसाला बाहुले बनविणे, इतकेच नव्हे तर त्याचं अनन्यसाधारणत्व नाकारणे इतका बलात्कार समाजवादाने मनुष्यजातीवर केला.

माणसाचं वैशिष्ट्य काय? जनावर नाही तो; त्याची काही प्रेरणा आहे, त्याची उद्योजक ताकद आहे. ती नष्ट करण्याचं कार्य समाजवादानं केलं.

या समाजवादाला आमचा विरोध आहे.

**नेहरूवाद व समाजवाद**

दुसरा मुद्दा उपस्थित होतो की नेहरूवाद आणि समाजवाद यांचा काय संबंध आहे? हिंदुस्थानात समाजवाद कधीच आला नाही. जे काही आलं त्याला आम्ही मिश्र व्यवस्था म्हटलं. मिश्रव्यवस्था म्हणजे सरकारी व्यवस्था करायची आणि खाजगी खुलं क्षेत्रही ठेवायचं आणि समाजवादी क्षेत्रही आहे. या समाजवादाचा उपयोग लायसेन्स-परमिट राज्यात करून सगळ्या उद्योजकांना वाव द्यायच्या ऐवजी फक्त आपल्या जवळच्या निवडक कारखानदारांना वाव द्यायचा. समाजवादाचा असा वापर करणारी व्यवस्था म्हणजे नेहरूव्यवस्था. तिच्यामध्ये समाजवादाचेही गुण नाहीत आणि भांडवलशाहीचेही गुण नाहीत. केवळ निवडक लोकांच्या स्वार्थापोटी व्यक्तीच्या अनन्यासाधारणतेचा गळा घोटणारी ही नेहरूव्यवस्था.

समाजवादाची व्यवस्था कोसळली आणि त्या पाठोपाठ नेहरूव्यवस्थाही कोसळली. समाजवादी व्यवस्था कोसळल्यानंतर खुल्या अर्थव्यवस्थेकडे जाणे म्हणजे पुन्हा भांडवलशाहीकडे जाणे आहे काय? नाही. समाजवादाचा पाडाव झाला, त्याच्याबरोबर भांडवलशाहीचाही पाडाव केव्हाच झाला. भांडवलशाहीच्या काळामध्ये खुली व्यवस्था कधीही नव्हती. भांडवलशाहीमध्ये मक्तेदारी बाजारपेठ होती. समाजवादामध्ये समाजवादी सरकारी बाजारपेठ एवढाच फरक झाला. खुली बाजारव्यवस्था अजून जगात जन्माला यायची आहे.

**संस्कृतीचे टप्पे**

खुली बाजारव्यवस्था हे काही स्टेशन नाही, हा रस्ता आहे. स्वातंत्र्य हे

काही स्टेशन नाही, स्वातंत्र्य हा मार्ग आहे. स्वातंत्र्याचा उपभोग घेता घेता स्वातंत्र्याच्या नवीन दिशा मनुष्य अनुभवून घेत असतो. आपल्याला त्या दिशांचा अनुभव अजून यायचा आहे. उत्पादनांच्या साधनांमध्ये निसर्ग, माणूस, भांडवल, उद्योजक अशी साखळी असते. अर्थशास्त्रात त्याला जमीन (Land), श्रम (Lobour), भांडवल (Capital) आणि उद्योजक (Entrepreneur) असे चार शब्द आहेत.

मनुष्यसमाजाच्या ज्या पहिल्या संस्कृती तयार झाल्या त्या निसर्गाच्या औदार्यावर आधारलेल्या संस्कृती होत्या. नदीच्या काठी, नदीच्या वळणावर-जिथे गाळ मोठ्या प्रमाणावर बाहेर फेकला जातो त्याच्या बाजूला मोठी मोठी नगरे वसली. ही निसर्गाच्या औदार्यावर आधारलेली शहरे.

शेतीबरोबर माणसांच्या हातांवर – श्रमशक्तीवर आधारलेली संस्कृती उभी राहिली. यात माणसाच्या श्रमशक्तीचा उपयोग दुहेरी झाला. उत्पादकतेकरिता शेतकऱ्यांच्या रूपाने, बलुतेदारांच्या रूपाने आणि (दुर्दैवाने) हातात तलवारी घेतलेल्या सैनिकांच्या रूपाने; पण श्रमशक्तीचं महत्त्व असलेल्या संस्कृती दुसऱ्या टप्प्यामध्ये तयार झाल्या.

मग बचत (Surplus) तयार झाली त्या बचतीचा उपयोग धर्माकरिता झाला, मग जमीनदारीकरिता झाला, मग भांडवल निर्मितीसाठी झाला. संस्कृतीची तिसरी पायरी जी आली ती भांडवलशाही. तिच्यामध्ये निसर्गापेक्षा आणि माणसांपेक्षा भांडवलातून निर्माण झालेल्या साधनांना जास्त महत्त्व आले. भांडवलशाहीचे दोन टप्पे. एक खुली भांडवलशाही आणि दुसरा हुकूमशाही भांडवलशाही. भांडवलावर म्हणजे साधनांवर आधारलेल्या संस्कृतीमध्ये समाजवादी व्यवस्था आणि भांडवलवादी व्यवस्था या दोन सख्ख्या बहिणी आहेत.

आता चौथी संस्कृती येते आहे. तिच्यामध्ये निसर्गाला प्राधान्य नाही, परिपाठी श्रमाला प्राधान्य नाही आणि केवळ भांडवलालाही महत्त्व नाही. येते आहे ती उद्योजकांची संस्कृती. भांडवलाची चार साधनं एकत्र करणाऱ्या 'योजकस्तत्र दुर्लभः' मधील योजकांची, काम करणारांची संस्कृती पुढे येते आहे. उद्योजकांची संस्कृती पहिल्यांदा तयार होते आहे. म्हणजे भांडवलशाही व समाजवाद याच्या पुढच्या पायरीकडे आपण जातो आहोत.

**इतिहासाचा खरा अर्थ**

१९८० सालापासून साम्यवादी आणि समाजवादी यांच्याशी चर्चा करताना मी आग्रहाने सांगत आलो आहे की मी मार्क्सवादी आहे एवढंच नव्हे तर मी एकटाच मार्क्सवादी आहे. बाकीचे मार्क्सवादी मार्क्सवादी नाहीतच. असं आहे

तर मग समाजवादाचा विरोध का? मार्क्स्‌वादातही ग्राह्य भाग आहे. तो कोणता हे समजून घेतलं नाही तर मार्क्सवादी समाजवाद फेकून देताना 'घंघाळातल्या पाण्याबरोबर बाळही फेकून दिलं' असं होईल.

मार्क्सवादात ग्राह्य भाग कोणता आहे? मार्क्सचा अर्थवाद टाकाऊ होता, निरर्थक होता. मार्क्सचं सामाजिक विश्लेषण चुकीचं होतं; पण मार्क्सने केलेली एक मांडणी अत्यंत महत्त्वाची आहे. 'सर्व समाजाची प्रेरणा वस्तूंचं वैपुल्य मिळवायची आहे' ही ती मांडणी होय. हे वस्तूंचं वैपुल्य कशासाठी मिळवायचे याबाबत मार्क्सवादी कधी काही बोलत नाहीत. मार्क्स (Nonalienation) असा शब्द वापरतो; अद्वैतभाव, निसर्गाशी एकरूप होणे. मनुष्यप्राणी जन्माला आला पण निसर्गाच्या वैपुल्याच्या समद्धीपुढे त्याला निसर्गाशी एकरूप होणे जमत नाही. त्यामुळे शेती म्हणजे शेतीच करणं, नोकरी म्हणजे नोकरीच करणे असे त्याला करावे लागते. खरे तर सकाळी नदीवर जाऊन मासे मारले, दुपारी शेती केली, संध्याकाळी कविता लिहिल्या, रात्री आणखी काही केलं अशा तऱ्हेचा माणसाचा स्वभाव; पण ते सगळ्यांनाच जमत नाही. तेव्हा, वस्तूंची विपुलता तयार करणे हा संबंध इतिहासाचा खरा अर्थ. म्हणून मार्क्सने जडवादी इतिहासाची मांडणी केली. इतिहास घडतो तो राजांचा इतिहास नसतो, राजघराण्यांचा इतिहास नसतो, राजांच्या शौर्याचा इतिहास नसतो. इतिहास घडविणारे प्रवाह हे जडवादाशी, सामान्य माणसाच्या उपभोगाशी संबंधित असतात. राजढ, राजघराणी, त्यांचे पराक्रम हे या प्रवाहावर क्षणकाल नाचणारे केवळ बुडबुडे किंवा छोट्या होड्या असतात. मार्क्सने केलेली ही इतिहासाची मांडणी हे त्या घंघाळातील बाळ आहे. आम्ही ही मांडणी ग्रह्य धरतो.

**स्वातंत्र्याच्या कक्षा**

आपण याच्यापुढेही जाऊन अद्वैतभाव (non-alenation) च्या ऐवजी 'स्वतंत्र्याच्या कक्षा' (Degree of freedom) असा शब्दप्रयोग वापरतो. गुणवत्तावाचक शब्दाऐवजी संख्यावाचक शब्द वापरण्याचे हे चांगले उदाहरण आहे. माणसाच्या आयुष्याची गुणवत्ता कशी ठरवायची, त्याचं आयुष्य चांगलं चाललं आहे का नाही हे कसं ठरवायचं? सामान्य माणूस उपभोगासाठीच, सतत वाढत्या उपभोगासाठीच जगत असतो. उपभोग, वाढत्या गुणवत्तेचा उपभोग हीच त्याची प्रेरणा असते. त्याचं भलं कुठं ईश्वरात नाही आणि अल्लातही नाही. विनोबाजींना एकदा एकाने प्रश्न विचारला की, 'तुमचा देवावर विश्वास आहे म्हणता तर समोर हा जो दिवा जळतो आहे तो ज्या अर्थाने आहे त्या अर्थाने परमेश्वर आहे असे तुम्ही म्हणता का?'' त्यावर विनोबाजींनी उत्तर दिले की,

"हा दिवा आहे की नाही याबद्दल माझ्या मनात शंका आहे, पण परमेश्वर आहे याबद्दल माझ्या मनात खात्री आहे." माझा पुढे प्रश्न असा आहे की, "ज्या माणसाचा दिव्याच्या अस्तित्वावर विश्वास नाही त्या माणसाला भूदानासारखा कार्यक्रम हाती घेऊन घरोघर तसे दिवे तेवावेत म्हणून प्रचार करण्याचा नैतिक अधिकार काय आहे?"

लोकांचं भलं कशात आहे, लोकांना काय साधायचं आहे ते आम्ही सांगत नाही. हजारो वर्षांच्या इतिहासाचं अवलोकन करता लक्षात येतं की माणसं सुखाचा शोध घेत नाहीत, समाधानाचा शोध घेत नाहीत, आनंदाचा शोध घेत नाहीत. माणसं भरल्या ताटावरूनही उठून जातात, नवीन बाळ आणि त्याची आई घर सोडून जातात. याचं कारण माणसाचा शोध काही वेगळा आहे. तो शोध कशाचा आहे?

माणूस ज्याच्या शोधात सातत्याने आहे त्याला आपण नाव दिलं 'स्वातंत्र्याच्या कक्षा'. माणसाच्या आयुष्याची किंवा समाजाच्या आयुष्याची गुणवत्ता कशी मोजायची?

आयुष्यात तुम्हाला निवड करण्याची संधी किती वेळा मिळते? ही झाली स्वातंत्र्याची कक्षा क्रमांक एक. तुम्ही जर गरीब असाल तर तुम्हाला निवड करण्याची संधी मिळतच नाही. गरिबाच्या पोराला खेळायला लाकडी बैल मिळाला तरी खूपच कौतुक; पण श्रीमंताचं पोर पाचशे प्रकारची खेळणी घेऊन खेळतं, कॉम्प्युटरवर खेळतं. त्यातून ते निवड करू शकतं. शाळा शिकायची असो, पाणी प्यायचं असो किंवा नोकरी मिळवायची असो गरिबाघरच्या पोराला निवड करण्याची संधी कमी, श्रीमंताघरच्या पोराला जास्त.

निवड करण्याची संधी जेव्हा जेव्हा मिळते तेव्हा निवडीसाठी किती पर्याय असतात? ही झाली स्वातंत्र्याची कक्षा क्रमांक दोन. गावातल्या पोराला शाळेत जायची संधी मिळाली तरी त्याला जिल्हा परिषदेच्या शाळेशिवाय पर्याय नसतो. शहरातल्या पोराला शाळानिवडीसाठी अनेक पर्याय असतात.

निवडीसाठी जे पर्याय उपलब्ध होतात ते किती व्यापक असतात? ही स्वातंत्र्याची कक्षा क्रमांक तीन. गावातील शाळेत एकच अभ्यासक्रम तोही मराठीतूनच. शहरातील शाळेत वेगवेगळे अभ्यासक्रम वेगवेगळ्या माध्यमातून निवडीसाठी उपलब्ध असतात.

स्वातंत्र्याच्या तीन कक्षा धरून मार्क्सच्या अद्वैतभावाच्या कल्पनेद्वारे सुधारणा केली आणि त्याच्या गुणवत्तावाचक शब्दाला संख्यावाचक रूप दिले. मार्क्स्चं तत्त्वज्ञान सुसंगत व्हायचं असेल तर मार्क्सने गुणवत्तावाचक शब्दाऐवजी

संख्यावाचक शब्द वापरायला हवा होता. शेतकरी संघटनेने ते काम केलं आहे. मार्क्सचा अर्थवाद आम्ही फेकून दिला आहे पण तत्त्वज्ञानामध्ये त्याने केलेली जडवादी इतिहासाची मांडणी हा शेतकरी संघटनेच्या विचारांचा महत्त्वाचा पाया आहे.

म्हणूनच, मनुष्याच्या जगण्यामागील 'स्वातंत्र्याच्या कक्षा' रुंदावण्याच्या प्रेरणेला वाव देणाऱ्या, प्रत्येक व्यक्तीच्या अनन्यसाधारणपणाची जोपासना करणाऱ्या, योजक उद्योजकांच्या संस्कृतीचे स्वागत करणे हा शेतकरी संघटनेचा यापुढील कार्यक्रम असणार आहे.

आज देशात अस्तित्वात असलेल्या सर्व राजकीय संघटना येऊ घातलेल्या या संस्कृतीचं स्वागत करायचं तर सोडाच तिला दाराबाहेरच रोखून धरण्याच्या प्रयत्नात आहे. बांडगुळ नोकरशाही, कामगारही तिच्या विरोधात आहेत. अशा वेळी प्रत्येक व्यक्तीच्या स्वतंत्रतेची आणि अनन्य-साधारणत्वाची बूज राखणारा राजकीय पर्याय अपरिहार्यतेने आवश्यक आहे.

(सप्टेंबर १९९४ प्रशिक्षण शिबीर मुंबई)

*(शेतकरी संघटक २१ सप्टेंबर १९९४)*

■■

# चला, दंडबेड्या तोडून टाकू

अंबाजोगाईमधील एका वृद्ध शेतकऱ्याने शिवाजी चौकामध्ये माझ्या हातामध्ये एक हातोडा दिला आणि शिवाजी चौकातून महात्मा गांधी चौकापर्यंत तो हातोडा हाती घेऊन मी चालत चालत आलो आणि तो उंचावून मी काय तोडायला आलो आहे?

काही आंदोलनांचा अनुभव असलेला मी माणूस आहे. हा उजव्या हाताचा कारखाना एकेकाळी शेतकऱ्यांच्या इच्छा आणि आशा-आकांक्षांच्या स्वप्नपूर्तीचे साधन होता म्हणून उभा राहिला असेल. आज तो शेतकऱ्यांच्या सर्व आशाआकांक्षांचं थडगं बनलेला आहे. हे आमच्या उरावरचं ओझं झालं आहे; पण मी काही हा एवढा मोठा कारखाना माझ्या हातातल्या लहानशा छिन्नीहातोड्यानं तोडायला निघालो नाही. तोडायचा म्हटला तर याच्यापेक्षाही मोठमोठे इमले जमीनदोस्त करणारी साधनं आहेत, ती घेऊन आलो असतो; पण आज तो कारखाना अशा तऱ्हेने तोडण्याचा माझा मनोदय नाही. त्याची निम्मी यंत्रे गंजून गेली आहेत. आज तो उभा करायचा म्हटला तर त्याचे नट ढिले होत नाहीत आणि काढलेले नट पुन्हा बसवता येत नाहीत अशी परिस्थिती आहे. हा कारखाना असाच राहिला तरी तो सडून जाणार आहे. त्याला साध्या हातोड्याचीसुद्धा गरज नाही. आपल्या समोर जे दिसतं आहे ते जिवंत कारखान्याचं रूप नाही. ते एका काळी जन्माला आलेल्या कारखान्याचं मढं आहे, त्याला आणखी मारण्याची काही गरज नाही.

आपण हातोडा हाती घेतला तो कारखाना तोडण्याकरिता नाही, आपण हातोडा हाती घेतला तो आपल्याच हातापायातल्या बेड्या तोडण्याकरिता घेतला आहे. हा हातोडा घेऊन आपण अंबाजोगाईमध्ये का आलो? महाराष्ट्रात १४० सहकारी साखर कारखाने आहेत. त्यापैकी कदाचित वीसपंचवीस कारखाने असे असतील की त्यांना कारखाने म्हणता येईल. बाकीचे शंभर सवाशे कारखाने हे अंबाजोगाईच्या या कारखान्याप्रमाणेच थडगी झाले आहेत. तुमच्याकडे भाव किती निघेल? आज

कारखान्याची खरी ताकद लक्षात घेतली तर या कारखान्यात उसाचा भाव निघेल फक्त २६० रुपये! सरकारी नियम आहे म्हणून पैसे उसने घेऊन ते उसाला ४६० रुपये भाव देतील; पण पैसे उसने घेतले म्हणजे त्यावर पुन्हा व्याज द्यावं लागतं, ते पुढच्या वर्षी येणार आणि मग पुढच्या वर्षी खर्चात येणार आणि मग पुढच्या वर्षी हिशोबाने भाव निघेल तो २६० सुद्धा निघणार नाही. ५० कोटीऐवजी ६० कोटी कर्ज कारखान्याच्या डोक्यावर चढलं की पुढच्या वर्षी २५० चाच भाव निघणार. शेतकरी संघटनेने आंदोलनं केली, खुली व्यवस्था आली म्हणून निदान, या कारखान्यांच्या हिशोबातून २६० चा आकडा निघतो. आठ वर्षांपूर्वी २१८ रुपये टनाला निघतो. आठ वर्षांपूर्वी मी महाराष्ट्रातल्या साखर कारखान्यांचा अभ्यास केला होता. त्यावेळी औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूरच्या कारखान्याच्या हिशोबात काय समजलं? तो कारखाना त्यावेळच्या हिशोबाप्रमाणे भाव देऊ शकत होता उणे १३२ रुपये! म्हणजे शेतकऱ्याने एक टन ऊस कारखान्याला घालायचा आणि तो कारखाना चालविण्याकरिता शेतकऱ्यानेच वर १३२ रुपये द्यायचे, भाव वगैरे काही नाही.

अशा तऱ्हेने जर हा कारखाना चालू राहिला तर यंदा ५० कोटीचं कर्ज ६० कोटीच होईल, पुढच्या वर्षी ७२ कोटीचं होईल आणि मग या कारखान्यात अशीच एक वेळ येईल की ज्यांना या कारखान्याला ऊस द्यायचा असेल त्यांनी तो कारखान्यात घेऊन जायचा आणि वर एक नोटांचीही बॅग घेऊन जायची आणि म्हणायचं हा कारखाना सहकारी आहे, "सहकार बिना नही उद्धार"

संपूर्ण महाराष्ट्रात असे अनेक कारखाने आहेत. कित्येक याहीपेक्षा कठीण अवस्थेत असणार. मग या हातोडा मोर्चासाठी हा अंबाजोगाईचाच कारखाना का निवडला?

महिषासुराच्या डोक्यावर नाचणाऱ्या महिषासुरमर्दिनी अंबेचे हे स्थान आहे. शेतकऱ्याला हजारो वर्षे पिळणाऱ्या या राक्षसांच्या डोक्यावर नाचण्यासाठी 'अंबा' जर पुन्हा अवतरणार असेल तर ती या जागी अवतरणार आहे या आशेने मी आलो आहे. या कारखान्यामध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांचा हात आहे म्हणून मी इथं आलो नाही. मी आलो याचं कारण की मला आपले जिल्हाप्रमुख नारायण पांडे, अमर हबीब यांनी सांगितलं की या भागातले शेतकरी उठताहेत, अस्वस्थ आहेत, या विषयावर त्यांची लढाई करण्याची तयारी आहे. जिथं शेतकरी उठण्याकरिता आणि लढण्याकरिता तयार आहेत तिथं जाऊन त्यांना साथ देणं हे माझं काम आहे म्हणून मी इथं आलो आहे. आज या एवढ्याशा ट्रॅक्टर ट्रॉलीवर शेतकरी संघटनेचे महाराष्ट्रभरचे प्रमुख कार्यकर्ते

दिसताहेत ते केवळ या परिसरातील शेतकऱ्यांनी लढण्याची तयारी केली आहे आणि त्यांच्या हाकेला ओ देणे हे शेतकरी संघटनेचे काम आहे, म्हणून आणि म्हणून तुम्ही दिलेला हातोडा मी हाती घेतला आहे. आता आपल्याला सगळ्यांना आपल्या हातापायातल्या सगळ्या बेड्या तोडायच्या आहेत.

**साखरेचा प्रश्न काय आहे?**

साखर कारखाना अंबाजोगाईचा आहे, साखर कारखाना सांगलीचा आहे. साखर कारखाने गुजरातमध्ये आहेत, साखर कारखाने पंजाबमध्येही आहेत. तुमचा कारखाना २६० रु. भाव देऊ शकतो. गेल्या वर्षी सांगली जिल्ह्यातील एक कारखाना ११०० रु. भाव देत होता. यंदा भाव थोडे पडले तरीदेखील गुजरातमध्ये ७६० रु. कमीत कमी भाव दिला जात आहे. पंजाबमध्ये सहकारी कारखाने आहेत. तिथं नाव 'सहकारी' असल तरी भाव सरकारच ठरवतं आणि तरीसुद्धा पंजाब आणि हरयानामधील सगळ्या कारखान्यांत ८२० रु. चा भाव दिला जातो आणि जिथं देशातील उसाचं ४० टक्के उत्पादन होतं, साखरेचं मोठं उत्पादन होतं त्या या महाराष्ट्रातले कारखाने मात्र कसाबसा ४६० रुपयांचाच भाव देत आहेत. खर म्हटलं तर २६० रुपयेच देताहेत.

**ही काय भानगड आहे?**

एका कारखान्याचा भाव २६० आणि दुसरा ११०० देतो! याची अनेक कारणं आहेत. हा कारखाना तयार झाला आणि या कारखान्याच्या आसपास खूप ऊस पिकत असला तरी उसाची वाहतूक करायचा खर्च वाढतो. ऊस चांगला तयार व्हावा, त्याच बियाणं चांगलं वापरलं जावं, पीक चांगलं यावं, साखरेचा उतारा चांगला यावा यासाठी प्रयत्न करावे लागतात. ते प्रयत्न या कारखान्यात कमी पडले असतील. मला एकदा एका साखर संचालकांनी सांगितलं की, सहकारी साखर कारखाने तोट्यात जाण्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे कारखान्याचे संचालक आणि त्यांची मित्रमंडळी प्रत्यक्षात ऊस कारखान्यात घालतच नाहीत, नुसतंच कागदोपत्री ऊस गेला असं दाखवतात आणि त्यामुळे लाखे रुपयांचं नुकसान होतं. अशा तऱ्हेने भ्रष्टाचार केला तर कारखाना तोट्यात जाऊन उसाचा भाव कमी होऊ शकतो. कुणी म्हणतात रेस्ट हाऊसवर संचालक मंडळाची खूप मजा चालते, कुणी खरेदी-विक्रीवर कमिशन खात म्हणून तोटा होतो म्हणतात.

भ्रष्टाचाराच्या या आणि अशा सगळ्या कथा खऱ्या असल्या तरी काही कारखान्यांमध्ये आठशे अकराशे भाव मिळतो आणि या कारखान्यांमध्ये दोनशे साठच मिळतो याचा अर्थ हा कारखाना अकार्यक्षमपणे चालला आहे यात काही शंका नाही.

म्हणजे काही सगळीच संचालक माणसं खोटी आहेत, भामटी आहेत असं नाही मला म्हणायचं! पण, जे काही काम चाललं आहे त्या पद्धतीने शेतकऱ्याच्या उसाला भाव मिळणं शक्य नाही. आज २६० च्या जागी ४६० भाव मिळाला तर त्याचा अर्थ पुढच्या वर्षीच्या भावातून २०० रुपयांची उचल केली आहे. त्यामुळे हा कारखाना आणखी बुडणार आहे.

हा कारखाना वाचवायचा असेल तर आता एकच मार्ग आहे. जर का या परिसरातीलच असलेले उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांनी ठरवलं की या साखर कारखान्याला आम्ही दरवर्षी १० कोटी रुपये दान देणार आहोत तरच हा कारखाना वाचू शकतो! अन्यथा नाही.

पण, अशा तऱ्हेचे दान आणि भीक मागण्याकरिता संघटना तयार झालेली नाही आणि दान घेऊन किंवा भीक घेऊनही हा कारखाना चालू राहिला आणि अशाच तऱ्हेने अकार्यक्षमतेने चालत राहिला तर त्या दानाचं ओझं पुन्हा शेतकऱ्यांच्याच डोक्यावर येणार?

**मग, साखरेचा रोग काय आहे?**

पहिला प्रश्न उभा राहतो की हा साखर कारखाना तयार झालाच का? इथं जर जवळपास ऊस नव्हता किंवा वाहतुकीचा खर्च जास्त येत होता तर हा कारखाना झाला का? महाराष्ट्रात उसाला भाव मिळत नाही म्हणून शेतकरी रडतो आणि माजी मुख्यमंत्री शरद पवार दरवर्षी दिल्लीला जाऊन दहा पंधरा कारखान्यांना लायसेन्स घेऊन येतात आणि दरवर्षी पाच दहा कारखाने नवीन निघतात. हा काय प्रकार आहे? कारखाना कुठे निघतो? कसा निघतो? माझ्या भागातलं उदाहरण मी सांगतो, माझा भाग कोरडवाहू आहे, मी ज्वारी आणि कांदा पिकवतो. कालवा नाही की पाण्याची अन्य सोय नाही. चाकण गावात उन्हाळ्यात पिण्याचं पाणी टँकरने पुरवावं लागतं आणि अजून उसाचं कांडसुद्धा जिथं पिकत नाही त्या आमच्या भागात एक साखर कारखाना मंजूर झाला आहे. कशासाठी? आमच्याकडच्या आमदार-खासदारांचं म्हणणं आहे की, सगळ्या आमदार-खासदारांना काही ना काही मिळालं, कुणाला कॉलेज मिळालं, मला काहीच नाही मिळालं, फक्त दारूचे दोन बार सोडले तर काहीच नाही मिळालं. मग वर असं ठरलं की आपला माणूस आहे, सत्तेतला, पक्षातला; त्याची काही सोय लागली पाहिजे म्हणून सूतगिरणी शक्य नाही म्हणून साखर कारखाना मिळाला. हा कारखाना जर का सत्ताधारी पक्षाच्या विरोधी बाजूच्या माणसानं मागितला असता तर त्याला मान्यता मिळाली नसती. वर्ध्याला संघटनेच्या कार्यकर्त्यांनी एकदा प्रयत्न केला होता. सर्व तयारी केली, मान्यतेचीही प्रक्रिया पुरी होत आली पण

ऐनवेळी वरून आदेश आला की यातली संघटनेची माणसं काढून टाका आणि त्यांच्या जागी काँग्रेसची माणसं घ्या मग तुम्हाला मान्यता मिळेल. म्हणजे तुम्ही राज्यकर्त्या पक्षातले असला, राज्यकर्त्या पक्षातल्या योग्य त्या बाजूचे असला, तर आणि तुम्ही साखर कारखान्याकरता थोडंफार भांडवल गोळा केलं तर दिल्लीहून त्याला मान्यता येते, तुमच्याकडे उसाचं कांडच काय गवताचं पातं उगवत नसलं तरी चालतं! उलट, जर कुणी सरकारकडे गेलं आणि म्हणालं आम्हाला राजकारणात पडायचं नाही, आमच्याकडे ऊस भरपूर आहे, आम्हाला कारखाना काढायची परवानगी द्या तर तशी परवानगी मिळणे अशक्य.

महाराष्ट्रात हे जे काही १४० कारखाने काढले ते राजकारण करण्याकरिता काढले गेलेत. त्यांच्यापैकी जास्तीत जास्त पंचवीस ते तीस कारखाने कारखाने म्हणवून घेण्याच्या लायकीचे आहेत. बाकीचे सगळे निव्वळ राजकारणाच्या जागा आहेत.

मान्यता मिळाली की चेअरमन म्हणतो आता मी सगळा परिसर सुधारून टाकतो. प्रत्यक्षात, कारखान्याला परवानगी मिळाली की चेअरमनला काहीसुद्धा काम नसतं. त्यांनी यंत्र कुठून आणायची ते ठरलेलं असतं, कुणाला किती कमिशन द्यायचं, कारखाना कसा बांधायचा ते ठरलेलं असतं. फक्त सरकारकडून आलेले पैसे तिकडच्या तिकडे मार्गी लागले की कारखाना उभा राहतो. कारखान्यात काय काय तयार करायचं, साखरसुद्धा कोणत्या प्रकारची करायची तेही ठरलेलं असतं. कामगार किती लावायचे इथे मात्र चेअमरनच्या बहादुरीला वाव मिळतो. अंबाजोगाईतल्या सर्व कामगार बंधूंना मी सांगू इच्छितो की, "तुम्हाला कुणी येऊन सांगतील, हे शेतकरी आंदोलन तुमच्याविरुद्ध आहे." पण हे खरं नाही. हा कारखाना आजारी झाला आहे आणि याच्या आधारानं तुम्हीही जिवंत राहू शकत नाही. हे बुडणारं जहाज आहे. या बुडणाऱ्या जहाजाला जर का तुम्ही कवटाळून बसलात तर तुमच्यासकट ते जहाज खाली जाईल.

चेअरमनची कर्तबगारी काय? एखाद्या शेतकऱ्याला म्हणतो तुझ्या पोराला नोकरी देतो, कुणाला ट्रक घेऊन देतो तर कुणाला पेट्रोल पंप. मग ज्या शेतकऱ्याच्या पोराला चेअरमनच्या कृपेने यातील काही मिळालं तो म्हणतो, नाही का, उसाला भाव मिळेना, पोराला काम तर लागलं ना! वीस एकर ऊस असण्यापेक्षा कारखान्यामधील फिटरची नोकरी चांगली. म्हणून सगळे नोकऱ्यांच्या मागे लागतात आणि तेही त्यातल्या काहीना नोकऱ्या देतात. परिणाम काय होतो? महाराष्ट्रातल्या प्रत्येक साखर कारखान्यामध्ये, जिथे तीनशेपेक्षा जास्त कामगार असण्याची गरज नाही तिथं, भरमसाट माणसं भरली आहेत. तीनशेपेक्षा जास्त असणारी

सगळी माणसं ही भरताड आहेत आणि उसाचा भाव खाणारी आहेत. जर कारखाना कार्यक्षमतेने चालवायचा असेल तर आवश्यक तितकीच कामगार मंडळी ठेवली पाहिजे. पण कारखाना ही चांगली गोष्ट आहे, इथे भरपूर खायला मिळतं त्यामुळे भरपूर कीड लटकली आहे.

यातूनही कारखान्यांनी साखर तयार केली तर ती विकण्याचं स्वातंत्र्य नाही. सरकारला निम्म्या दरात लेव्ही घालावी लागते, उरलेली ठराविक काळात येईल त्या किमतीत लिलावात विकावी लागते. परदेशात साखर पाठवायला बंदी.

शेतकऱ्यांनी जर म्हटलं की मी जिवापाड मेहनत करून ऊस पिकवला, हा कारखाना बुडतो आहे, या कारखान्याकडून मला २६० रुपयेच भाव मिळणार आहे, शेजारचा कारखाना ६०० रुपये द्यायला तयार आहे. तर शेतकरी शेजारच्या कारखान्यात ऊस घेऊन जाऊ शकत नाही. कारण सरकारनं झोनबंदी केली आहे. शेतकऱ्यांनी, भाव कितीही मिळो, त्यांच्याच झोनमधील कारखान्याला ऊस घातला पाहिजे. कारण काय? कारण यांनी राजकीय सोयीसाठी संस्थानं तयार केलीत ती टिकायला पाहिजे. मग ती कुणाच्या का जिवावर टिकेनात! संचालकांची चैन कुणाच्या जिवावर चालणार आहे, निवडणुकीमध्ये पैसे कुणाच्या जिवावर उधळले जाणार आहेत आणि कामगारांना वाटेल तितकी भरती करून पगार वाटप कुणाच्या जिवावर होणार आहे? शेतकऱ्यांच्याच जिवावर ना?

झोनबंदी किती भयानक प्रकार आहे? साखर कारखाना काढायचा म्हणून शेतकऱ्यांकडून शेअर भांडवल जमा केले. शेतकऱ्यांनी शेअर घेतला म्हणजे तो काही त्याच कारखान्याला ऊस द्यायला बांधलेला नव्हता; पण सरकारने कायद्याने ते बंधन घातले. हे झालं शेअरधारकांचं. ज्यांनी शेअर घेतले नाहीत त्यांच्यावरही हेच बंधन. खरं तर जे भागधारक नाहीत त्यांचा कारखान्याशी काहीच संबंध नाही. कारखाना कसा चालतो हे पाहण्याचा त्यांना कधी प्रसंग येण्याचे काहीच कारण नाही. कारखान्याच्या निर्णय प्रक्रियेत ते मत देऊ शकत नाहीत. मग ते कसे काय याच कारखान्यांना ऊस द्यायला बांधलेले आहेत? तरीही झोनबंदी करून सरकारने ऊसउत्पादकांवर बंधने लादली आहेत. एखाद्या बिगरसभासदाने विचारावे, "मला सदस्य करून घेता का?" तर ते म्हणतात, "नाही, तुम्ही माझ्या गटातले नाहीत. तुम्ही आत येऊन राजकारण कराल."

अंबाजोगाईच्या कारखान्यात १९००० सदस्य होते, त्यात ऊसउत्पादक फक्त ५००० च होते असे एकतो. म्हणजे १४००० सदस्य केवळ आपली मत विकणारे झाले. म्हणजे १४००० खाणारे आणि ५००० पिकविणारे. पिकविणारांचा फडशा पडायला किती वेळ लागणार?

गेली १५ वर्षे आपण सरकारच्या या सगळया नियमांविरुद्ध लढतो आहोत. सरकार शेतकऱ्याला जाणीवपूर्वक लुटतं आणि या सहकारी संस्थाचं कौतुक सांगत. या संस्था म्हणजे मंदिरं नसून ती शेतकऱ्यांची थडगी आहेत असं गेली पंधरा वर्षे आम्ही सांगत आलो आहोत.

तीन वर्षांपूर्वी सरकारचे डोळे थोडे उघडले. रशिया बुडाला, समाजवाद बुडाला, नेहरूंच नियोजन बुडालं तेव्हा सरकारनं कबूल केलं की आम्ही शेतकऱ्याला दरवर्षी लुटतो. १९८६ ते १९८९ सालापर्यंत दरवर्षी शेतकऱ्याला २४००० कोटी रुपयांना लुटल्याची कबुली सरकारने दिली आहे. सगळ्या शेतकऱ्यांचं पिढ्यानपिढ्या साचलेलं कर्ज फक्त १४००० कोटी रुपयांचं. १९९२ आणि १९९३ मध्ये शेतकऱ्यांना दरवर्षी ४२००० कोटी रुपयांना लुटल्याची आता पुढे कबुली दिली आहे.

आम्ही आज हातोडे घेऊन निघालो आहोत ते का? दिल्लीहून सरकारने जाहीर केले की आता नियोजन संपलं, बंधनांचा खोटेपणा संपला, आता याच्यापुढे मुक्त व्यवस्था येणार, याच्यापुढे ज्याला त्याला उद्योजक बनून घामाला दाम मिळवायचा अधिकार असेल. आपलं म्हणणं काय आहे? या नवीन व्यवस्थेमध्ये शेतकऱ्याला काय पाहिजे ते पिकवता आलं पाहिजे आणि जो माल पिकवेल त्याला पाहिजे तसा आणि पाहिजे तिथं विकता आला पाहिजे. ऊस म्हटला की ऊस म्हणून, गूळ केला तर गूळ म्हणून, या कारखान्याला नको वाटलं तर साखर इथं विकीन नाहीतर लंडनला जाऊन विकीन. मला माझा उद्योग करण्याचं स्वातंत्र्य असलं पाहिजे. एवढंच आमचं म्हणणं आहे. आम्ही ऐंशी सालापासून म्हणतो आहोत, "भीक नको, हवे घामाचे दाम." आजपर्यंत आपलंच लुटून आपल्यालाच दान करण्याचा भामटेपणा या लोकांनी केला. म्हणून आपण हा हातोडा घेऊन निघालो आहोत. सगळ्या लोकांना मोकळं करू म्हणतात पण शेतकऱ्यांना मोकळं करायला तयार नाहीत. शेतीमालाच्या निर्यातीला बंदी. कापूस एकाधिकार योजनेलाच विकला पाहिजे. या हातोड्यानं आम्हाला जखडणाऱ्या या बंधनांच्या बेड्या तोडायच्या आहेत. खुली व्यवस्था आणायची आहे.

ही खुली व्यवस्था आणायची कशी? आज आपण हातोडा घेऊन निघालो आहोत मागणी करायला की, ज्याला कुणाला कारखाना काढायचा असेल त्याला कारखाना काढायची परवानगी मिळाली पाहिजे. सरकारला लेव्ही देणं बंद, माल कुठं विकायचा आम्ही ठरवू, इथं भाव मिळत नसला तर निर्यात करू. आमच्या जवळचा कारखाना चांगला भाव देत नसेल तर आम्ही पाहिजे त्या कारखान्याला ऊस घालून भाव मिळवू. असं एकदा झालं म्हणजे एकतर शेतकऱ्यांची थडगी झालेले हे कारखाने बंद पडतील, नाहीतर सुधारायचा प्रयत्न करतील आणि

शेतकऱ्यांनी आपल्याला ऊस घालावा अशी त्यांची इच्छा असली तर गलथानपणे काम करून चालणार नाही, शेतकरी आपला पोशिंदा आहे, तो आपला देव आहे, तो खुश होईल अशा तऱ्हेने कारखाना चालवायला पाहिजे असं संचालकांना वाटायला लागेल.

पण सरकारनं तर झोनबंदीच्या बेड्या आपल्या पायात घातल्या आहेत. पलीकडच्या चांगला भाव देणाऱ्या कारखान्यालाही तुमचा ऊस घ्यायला मनाई केली आहे. त्यामुळे या थडग्यांचीही मक्तेदारी झाली आहे. जोपर्यंत झोनबंदीमुळे आलेली ही मक्तेदारी चालणार आहे तोपर्यंत हा कारखाना सुधारण्याची काहीच शक्यता नाही.

गेल्या ५० वर्षांत, समाजवादाच्या नावाखाली, गरीबाचं कल्याण करतो म्हणून गरिबांना लुटण्याचे कारखाने तयार झाले. आता या भिंती तोडून मोकळी हवा देशामध्ये येऊ लागलेली आहे; पण ती अजून शेतकऱ्यांच्या घरी येत नाही. शेतकऱ्यांच्या हातापायात अजूनही या दंडबेड्या आहेत. या दंडबेड्या तोडण्याकरिता आपण हा हातोडा होती घेतला आहे. ही पहिली पायरी आहे.

दुसरी पायरी २३ नोव्हेंबर १९९५ रोजी पुणे येथे साखर संचालकांच्या कार्यालयासमोर महाराष्ट्रभरचा भव्य मोर्चा जाणार आहे. आता हाती घेतलेला हातोडा आपल्या हातापायातल्या दंडबेड्या तोडल्याशिवाय खाली ठेवायचा नाही अशी प्रतिज्ञा करून कामाला लागू या.

*(१५ नोव्हेंबर १९९५ हातोडा मोर्चा अंबोजोगाई)*

*(शेतकरी संघटक २१ नोव्हेंबर १९९५)*

■■

# नुसता नवा जोम नव्हे, नवी रणनीती हवी

आवाज उठत नाही – कारण गेल्या वर्षभराचा आजार. दुसरं कारण काल दिल्लीहून येताना माझा आवाज अचानक बंद झाला, तुमचं प्रेम पाहून थोडे तरी शब्द बाहेर येताहेत आणि तिसरी गोष्ट, हा जो कार्यक्रम तुम्ही केला त्यानं माझं मन खरोखर इतकं भरून आलं आहे की, तोंडातून निघत नाही.

अण्णासाहेबांच्या स्मृतिनदिनानिमित्त मी श्रीरामपूरला यायचं कबूल केलं – त्यांची आणि आमची मतं सगळीच काही जमतात असं नाही, कुणाचीच जमत नाहीत; पण अण्णासाहेबांची थोरवी आपल्या सगळयांना मान्य आहे. त्यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने शेतकरी जोतिबा फुल्यांच्या काळापासून निघाला कोठे; चालला आहे कुठे आणि आज आहे कुठं याच सिंहावलोकन करण्याची संधी मिळते म्हणून मी इथं आलो आणि ही जिल्ह्याची बैठक घेतलीत, फुलांनी स्वागत केलं.

मी प्रामाणिकपणे सांगतो की ज्याप्रमाणे शिवाजी महाराजांना आग्र्याहून सुटका झाल्यानंतर आपले मावळे सगळे महाराष्ट्रात शिल्लक असतील किंवा नाही अशी चिंता वाटत होती, त्याचप्रमाणे या आजारपणातून उठून आल्यानंतर माझ्याही मनाची काहीशी अशीच अवस्था होती. श्रीरामपूर वगैरे भागामध्ये शेतकरी संघटनेच्या सुरुवातीच्या काळात केवढ्या प्रचंड सभा झाल्या, कशी भाषणे झाली, किती कार्यकर्ते तयार झाले; पण आता ओहोटीची लाट येऊन वाळूचे किल्ले सगळे वाहून जावे अशी परिस्थिती झाली असावी काय अशा काहीशा चिंतेत मी असताना तुम्ही सगळे जुने कार्यकर्ते एवढ्या मोठ्या संख्येने जमा झालात यामुळे माझ्या मनाला फार मोठा आधार वाटला. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही आग्रहाआग्रहाने बोललात. मी किती वेळ बोलू शकेन हे महत्त्वाचे नाही; पण तुम्ही प्रत्येकाने बोलताना आजही, इतक्या कठीण परिस्थितीत शेतकरी संघटनेविषयी ज्या विश्वासाने अपेक्षा व्यक्त केल्या त्यामुळे खरंच माझं मन भरून आलं आहे.

वीस वर्षांपूर्वी शेतकरी संघटनेची सुरुवात झाली. 'देशात गरिबाचे कारण शेतकऱ्यांची गरिबी, शेतकऱ्यांच्या गरिबाचे कारण शेतीमालाला भाव नाही आणि शेतीमालाला भाव नाही याचे कारण गोऱ्या इंग्रजांच्या जागी काळा इंग्रज आला.' एवढे साधे अर्थकारण हा शेतकरी संघटनेचा पाया आहे. कांद्याचा लढा झाला, उसाचा लढा झाला, कापसाचा लढा झाला, कर्जमुक्तीचा लढा झाला. कशाचीही फिकीर न करता आम्ही रानोमाळ फिरलो. दुसऱ्या कोणत्या गोष्टीचे नाही तरी एका गोष्टीचे श्रेय मी अवश्य घेईन. महाराष्ट्रात जोतिबा फुल्यांसारखे महान द्रष्टे नेते झाले; पण महाराष्ट्राच्या बाहेर, काही प्रागतिक चळवळी मंडळी सोडली तर इतरांना 'जोतिबा फुले म्हणजे कोण' हे सांगावे लागते. उत्तरेत सर छोटूराम यांच्यासारखा किसान अग्रणी झाला पण तोसुद्धा पंजाब-हरियाणाच्या बाहेर पडूच शकला नाही. शेतकरी संघटनेने याबाबतीत मोठी कर्तबगारी दाखविली. शेतकरी संघटना जिल्ह्यापुरती किंवा महाराष्ट्रापुरती मर्यादित ठेवली नाही; तर शेतकरी संघटनेचा नेता गुजरातच्या शेतकऱ्यांच्या मदतीकरिता जातो, नर्मदा धरणावरील कारसेवेचे आंदोलन जाहीर करतो, त्या आंदोलनात महाराष्ट्रातून हजारो स्त्रीपुरुष शेतकरी सत्याग्रही जातात, त्यांच्याबरोबर पंजाबातील शीख शेतकरीही हजारांच्या संख्येने येतात, हरियाणातले येतात, इतर राज्यातलेही येतात. हे पूर्वी कधीही न घडलेले नवल शेतकरी संघटनेने घडवून आणले.

शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखालील शेतकरी चळवळ फक्त महाराष्ट्रापुरती मर्यादित न राहता ती देशभरच्या शेतकऱ्यांची झाली. असे असले तरी दम सुटावा, निराशा वाटावी अशा अनेक गोष्टीही आहेत.

आपल्या शेतकरी चळवळीची सुरुवात कांद्याच्या भावाने झाली. आज वीस वर्षांनंतर कांदा उत्पादक शेतकऱ्यांची तीच स्थिती आहे. त्यावेळी आपण कांद्याला क्विंटलला अठरा रुपयेच भाव येतो म्हणून रडत होतो. आज दीडशे ते एकशे ऐंशीच्यावर जात नाही म्हणून रडतो. कारण, आजच्या रुपयाची किंमत जुन्या दहा रुपयांइतकीही राहिली नाही. साखरेच्या आयातीमुळे उद्योगावर संकट आले आहे. ऊसउत्पादक शेतकऱ्यांवर संकट आले आहे. कापसाच्या आयातीमुळे कापसाचा भाव इतका पडू लागला आहे की गुजरात, पंजाब, हरियाण मधील शेतकरी कापसाच्या भावाचे आंदोलन करायला उभे राहिले आहेत.

१९८० मध्ये आपण काय मांडले? समाजवादाच्या नावाखाली शेतकऱ्यांना लुटण्याचे षड्यंत्र रचले जात आहे, कारस्थान रचले जात आहे. हा समाजवाद टिकू शकत नाही, खुली व्यवस्था येणे अपरिहार्य आहे. कारण, कोणाही एका माणसानं दिल्लीत किंवा मॉस्कोत बसून यंत्रणा चालवायची म्हटले तर ती चालू शकत नाही. शेतकऱ्यांनी स्वतःच्या हिताच्या दृष्टीने घेतलेले निर्णय हेच,

अंततोगत्वा, सर्व देशाच्या हिताचे निर्णय असतात. ही समाजवादी व्यवस्था टिकू शकणार नाही हे आपण पहिल्यांदा सांगितले. ज्यावेळी समाजवादी व्यवस्थेचा बोलबाला होता, डॉ. मनमोहनसिंगांसारखे अर्थशास्त्रीसुद्धा ज्यावेळी समाजवादाची भाषा बोलत होते तेव्हा, समाजवादाचे अध:पतन निश्चित आहे हे भाकीत आपण केले आणि त्याप्रमाणे जगभर समाजवादाचा पाडाव झाला. आज कोणताही पक्ष समाजवादाची भाषा बोलत नाही. सत्तेच्या खुर्चीवर बसण्याआधी सगळेच म्हणतात की खुली व्यवस्था वाईट आहे, धोक्याची आहे, तिच्यामुळे काय होईल कोणास ठाऊक? पण खुर्चीवर चढले की एका दिवसातच ते खुल्या व्यवस्थेच्या बाजूने बोलू लागतात. म्हणजे, 'नाही नाही' म्हणत खुल्या व्यवस्थेचा सर्वांनीच स्वीकार केला आहे. पण मग, समाजवाद संपून खुली व्यवस्था आली तरी कांद्याच्या शेतकऱ्यांचे, उसाच्या शेतकऱ्याचे, कापसाच्या शेतकऱ्याचे दैन्य का संपले नाही? कर्ज वाढायचे का थांबले नाही? या महत्त्वाच्या प्रश्नाचे उत्तर आज सगळे शेतकरी शोधताहेत.

याबद्दलची सैद्धांतिक मांडणी आपण आजवर सातत्याने करीत आलो आहोत.

खुली व्यवस्था आली म्हणतात तरी परिस्थितीत काहीच बदल नाही यावर उपाय काढण्यासाठी शेतकरी संघटनेचा पुढचा कार्यक्रम काय?

२१ जानेवारीला शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक आहे. त्यात कार्यक्रमासंबंधी निर्णय घेतला जाईल; पण आपण मोठ्या कठीण अवस्थेत आहोत हे नाकारण्यात काही अर्थ नाही. मला तुमच्या मनामध्ये निराशा आणायची आहे म्हणून मी असे बोलतो असे नाही; पण आपला राजकीय पराभव झाला आहे ही गोष्ट सत्य आहे. शेतकऱ्याला 'शेतकरी' म्हणून स्वाभिमान असावा, सन्मानाने जगण्याची इच्छा असावी हे आम्ही मांडले; पण माधवराव मोऱ्यांच्या भाषेत सांगायचे तर 'मांजराला कितीही मिठाई खाऊ घातली तरी उंदीर पाहिल्याबरोबर ते उंदराच्याच मागे जाते, मिठाई सोडून देते.' तसंच, शेतकरी म्हणून सन्मान मानण्याऐवजी, कुणी रामाचं नाव घेतलं, कुणी शिवाजीचं नाव घेतलं तर आम्ही आमचा सन्मान सोडून त्यांच्या पाठीमागे गेलो. शेतकरी संघटेचा राजकीय पराभव झाला ही गोष्ट खरी आहे.

अर्थकारणामध्ये आपण जे जे मांडले ते ते तसे घडले ही गोष्ट खरी आहे; पण हा विचार शेतकरी संघटनेने मांडला, शरद जोशींनी मांडला असे काही श्रेय कुणी दिले नाही. आपण दस्तऐवज भले केले पण आपली त्यावर सही काही उमटली नाही. परदेशात कोणाला विचाराल की खुली व्यवस्था हिंदुस्थानात कुणी आणली तर डॉ. मनमोहन सिंग, पी.व्ही. नरसिंहराव यांची नावे घेतली जातात. याचे कारण आपण जे काही शिल्प कोरले त्यावर आपण आपले नाव

घातले नाही.

आजच्या परिस्थितीमध्ये काय होते आहे? ५ जानेवारीला दिल्लीला वित्तमंत्र्यासमोर झालेल्या अंदाजपत्रकपूर्व चर्चेमध्ये मी एक मुद्दा मांडला. हिंदुस्थानात १९६५ मध्ये हरित क्रांती झाली. वरखते आणि औषधे वापरली म्हणजे पिके वाढतात हे काही नवीन ज्ञान नव्हते; पण पंडित, नेहरूंपासून देशातील सगळेच नेते म्हणत की, "अशा प्रकारची सुधारित शेती नको. सुधारित शेतीचे काय भयानक परिणाम होतील हे सांगता येत नाही. गावातील श्रीमंत शेतकरी आणि गरीब शेतकरी यांच्यातील दरी वाढेल." अखेरी, एक लालबहादुर शास्त्री निघाले, एक सी. सुब्रह्मण्यम् निघाले आणि एक अण्णासहेब शिंदे निघाले की ज्यांनी हरित क्रांती प्रत्यक्षात इथे जमिनीवर आणून दाखवली.

आणि आजसुद्धा नेमके असे घडते आहे की, शेतीमधील एका नव्या क्रांतीला सुरुवात होते आहे. हरित क्रांतीला इंग्रजीत ग्रीन रिव्होल्यूशन (Green Revolution) म्हणतात. या नव्या क्रांतीला मी जीन रिव्होल्यूशन (Gene Revolution) म्हणेन. आता शेतीतील उत्पादकता वाढणार आहे ती बियाण्यांच्या स्वरूपातच बदल करून, बीजाचं अंतरंगच बदलून; पण ६५ सालच्या हरित क्रांतीच्या आगमनाबाबत आपण जितके बेसावध होतो तितकेच आज या नवीन क्रांतीबाबात बेसावध आहोत. हा बेसावधपणा दूर करून जगाशी टक्कर देण्याच्या तयारीने आपण उभे राहिलो तर भारतीय शेतीला भवितव्य आहे.

पहिल्यांदा असे घडले आहे की, हिंदुस्थानातील कापसाची किंमत जागतिक बाजारपेठेतील किंमतीपेक्षा जास्त आहे. हे पहिले वर्ष असे आहे, की गव्हाची जागतिक बाजारपेठेतील किंमत हिंदुस्थानातील गव्हाच्या किमतीपेक्षा कमी आहे. कांद्याला निर्यातीचा परवाना मिळाला असला तरी हातात बाजारपेठ नाही; कारण कांद्याची बाहेरची किंमत आपल्या कांद्यापेक्षा कमी झाली आहे. बाहेरच्या देशांनी तंत्रज्ञानामध्ये जी प्रगती केली आहे त्या प्रगतीकडे जाण्याची शक्यता हिंदुस्थानातील शेतकऱ्याला मिळणे आवश्यक आहे. हिंदुस्थानातल्या शेतकऱ्याला आपला माल विकण्यासाठी बाजारपेठेत पाहिजे तिथे जाता आले पाहिजे; पाहिजे तिथे खते. औषधे निविष्टांची खरेदी करता आली पाहिजे हे आपण मांडले; पण यापुढे जागतिक तंत्रज्ञान जिथे असेल तिथून आणून त्याचा प्रयोग करण्याचा अधिकार हा भारतातील शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे. बोंडअळीला प्रतिकार करण्याचा अंगभूत गुणधर्म असलेल्या कपाशीच्या बियाण्याचे चाचणीप्रयोगसुद्धा करण्याची परवानगी हिंदुस्थान शासन शेतकऱ्यांना देत नाही. आधुनिक तंत्रज्ञानापासून वंचित राहिल्याने आपण दर एकरी उत्पादनात इतर देशांच्या तुलनेने खूपच मागे पडतो. उदाहरणार्थ, बहुतेक देशांतील कापूसउत्पादक

शेतकरी विदर्भातील कापूस उत्पादकांच्या चाळीसपट जास्त कापूस एकरी घेतात.

हे नवीन तंत्रज्ञान हाती कसे घ्यायचे? त्याकरिता नवे मार्ग काय? यासंबंधी आपल्याला फार तपशीलवार ऊहापोह करावा लागेल.

गेल्या महिन्यात मी लासलगावला गेलो होतो. कांद्यांचे भाव पार पडले होते. लासलगावच्या कृषी उत्पन्न बाजार समितीचे जवळजवळ सर्व पदाधिकारी हे शेतकरी संघटनेचे जुने कार्यकर्ते आहेत. ते मला सांगू लागले. आम्ही पंतप्रधान वाजपेयी यांना भेटायला गेलो तर ते आम्हाला विनम्रपणे नमस्कार करून म्हणाले, "तुम्ही कांदाउत्पादक शेतकरी का? तुम्ही फारच जबरदस्त आहात. तुमच्यामुळं आम्ही दोन राज्यांतील निवडणुका हरलो आणि आता ग्राहकांचा विचार करा; केवळ शेतकऱ्यांचा करू नका," असा त्यांनी आम्हाला सल्ला दिला.

लासलगावच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यकर्त्या संचालकांना मी म्हटलो, "एक काळ असा होता की तुम्ही जर रस्त्यावर बसलात, रेल रोको केलं तर सरकारचं लक्ष जात होतं. आता सरकार मोठं निगरगट्ट बनलं आहे. काश्मिरात जे चाललं आहे, आसामात जे चाललं आहे, अयोध्येला जे चाललं आहे ते पाहता हजार दहा हजार शेतकरी रस्त्यावर बसले आणि अटकेत गेले तर सरकारच्या वागण्यात काही फरक पडणार नाही."

गुजराततध्ये नर्मदा धरण कारसेवेसाठी इतकी मंडळी जमली होती पण गुजरात सरकारने त्या सगळ्यांना गावागावात अडकून ठेवले आणि वर्तमानपत्रांना आंदोलनाचा फज्जा उडाला अशा बातम्या द्यायला लावल्या.

आता यापुढे, सरकारला जी भाषा समजते तीच भाषा वापरावी लागेल. कांद्याचा भाव ६० रुपये किलो झाला तर सरकार घाबरत असेल तर आता रस्त्यावर जाण्यापेक्षा कांदा ६० रुपये किलो कसा करता येईल याची व्यवस्था आपल्याला जाणीवपूर्वक करायला लागेल. म्हणजे मगच राजकारणासाठी लागणारी भाषा आपण बोलू शकू.

अशा तऱ्हेची साधने, अशा तऱ्हेचे मार्ग. सत्याग्रहाच्या पद्धती आपल्याला शोधून काढाव्या लागतील. पण याचा अर्थ कार्यकर्त्यांनी स्थानिक पातळीवर आंदोलने करायचीच नाहीत असा नाही.

वाईट वाटणाऱ्या गोष्टी ऐकल्या, तशा चांगले वाटणाऱ्या गोष्टी मागील वर्षात घडल्या आहेत. लसलगावला कांद्याची कोंडी होताच शेतकऱ्यांनी आपणहून आंदोलन चालू केले. कोल्हापूर, सांगली भागात शामराव देसाईच्या नेतृत्त्वाखाली आजही साखर कारखानदारांच्या मोटारगाड्यांना काळे फासायचे आंदोलन चालू

आहे. तेव्हा कोणीही, शरद जोशीची परवानगी मिळाली नाही म्हणून आम्ही आंदोलन केले नाही असली सबब सांगायचे कारण नाही. ज्याच्यात हिम्मत नाही तोच परवानगीची सबब सांगतो. माधवराव मोरे विचारायचे, ''आपली आई आजारी पडली तर तिच्या उपचारासाठी आपण काही ग्रामपंचायतीचा ठराव घेत नाही! तिच्याकरिता औषध आणायला धावतोच ना?'' तसे, जिथे जिथे अन्याय वाटेल तिथे तिथे तुम्ही आंदोलन करायला उभे राहा, त्यात तुमच्या हातून चुका झाल्यातरी मी तुमच्या पाठीशी उभा राहीन.

मी गांधीवादी आहे का नाही? असाही एक प्रश्न उभा केला जातो. गांधीचा माझ्यावर मोठा प्रभाव आहे, हे खरं आहे. पण गांधीचे अहिंसा तत्त्व आचरायला माहात्म्य लागते. आपण महात्मे नाही, उगीच भलत्या माणसाशी तुलना करू नये; पण ''शरद जोशींची परवानगी नाही म्हणून आम्ही स्वस्थ बसलो, नाहीतर काय उत्पात घडवले असते!'' ही भाषा काही खरी नाही.

समाजवादाचा पाडाव होणार असे आपण वीस वर्षांपूर्वी ठासून सांगितले पण तसा पाडाव झाला तेव्हा माझे किंवा तुमचे नाव कोणी घेतले नाही. त्याला तसेच कारण आहे. नागपूरच्या अधिवेशनात शेतकरी संघटनेने आदेश दिला की नेहरू घराण्याने सबंध देशाचा जो अध:पात केला आहे त्याचा निषेध करण्याकरिता, जसे मॉस्कोमध्ये स्टॅलिनचे आणि लेनिनचे पुतळे तेथील जनतेने पाडले, त्याप्रमाणे या घराण्याचे गावोगाव जे पुतळे आहेत ते पाडून टाका. त्यावेळी आपण जर हे पुतळे पाडले असते तर जगभर बातमी झाली असती की हिंदुस्थानातील खुल्या अर्थव्यवस्थेची जननी शेतकरी संघटना आहे. त्यावेळी आपण हिम्मत केली नाही. हा उल्लेख मी कशासाठी करतो आहे? ''शिवसेनेचे लोक तोडफोड करतात, गुंडगिरी करतात म्हणून त्यांना सरकार मिळाले आणि आपण गुंडगिरी करीत नाही कारण शरद जोशी आपल्याला परवानगी देत नाही.'' असे काही कार्यकर्ते म्हणतात. हे घाबरटांचे तत्त्वज्ञान झाले.

शिवसेनेचे सैनिक दंगा करतात, पण ते दंगा करतात म्हणून त्यांना राज्य मिळाले हे काही खरे नाही. ज्या माणसाला वर्तमानकाळात सांगायला पुरुषार्थ राहत नाही, अभिमान सांगायला राहत नाही तो नेहमी वाडवडिलांच्या कथा सांगतो, आपल्याकडे स्वत:चे काही सांगण्यासारखे नाही तर मी किती मोठ्या कुळातला, माझी जात किती श्रेष्ठ वगैरे गोष्टी तो बोलायला लागतो, तसेच, समाजवादाच्या काळामध्ये हिंदुस्थानचा अध:पात झाला, दक्षिण कोरियासारखे छोटे छोटे देश आपल्यापुढे निघून गेले. स्वाभिमान सांगायला काही उरले नाही. मग, इतिहासातून ज्यांच्याबद्दल अभिमान वाटावा अशा विभूती शोधून काढल्या. महाराष्ट्राच्या दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराज आणि देशभराच्या दृष्टीने प्रभू

रामचंद्र! आणि म्हणून लोक त्यांच्याबाजूने वळले. शिवसैनिक दंगे करतात म्हणून नव्हे. आमच्याजवळ वर्तमानकाळात अभिमान बाळगण्यासारखे काहीच उरले नव्हते – या कारणाने जातीयवाद्यांचे राज्य आले.

मी तुम्हाला गुंडगिरी करायला सांगत नाही; पण माझी परवानगी नसल्यामुळे तुम्ही गुंडगिरी केली नाही हे भेकडाचे तत्त्वज्ञान मला सांगू नका. शेतकऱ्याचा सन्मान राखण्यासाठी जिथे आवश्यक तिथे स्थानिक पातळीवर दहा माणसे जरी जमा झाली तरी चालेल; काय जमेल ते करून दाखवा. जमले तर कोर्टात जाऊन, जमले तर जिल्हा कचेरीत जाऊन, जमले तर मंत्र्याकडे जाऊन आणि जमले तर तुम्हाला जे 'हत्यार' योग्य वाटेल ते वापरून अशी प्रतिमा तयार करा की भारतातला शेतकरी हा नागासारखा आहे; त्याच्या वाटेला कुणी गेले तर फुस्स करून फडा काढतो. एवढी भीती जरी तुम्ही लोकांच्या मनात तयार केली, मग त्यासाठी तुम्ही कोणतीही साधनं वापरा, मी तुमच्यामागे उभा राहीन.

आजारपणात, माझ्या मनात निराशेचा विचार येत असे. आपण लोकांना पुढे केले, आपल्या शब्दासाठी किती लोकांनी काय काय सोसले, आपल्या खिशातले पैसे काढून संघटनेचे कार्यक्रम केले, घरामध्ये अशांती आणली, सतत घराबाहेर राहिल्याने घरची लक्ष्मी नाराज झाली. एवढे करूनही शरद जोशीपुढे जायला मिळाले नाही, आपले नाव त्यांच्या कानी पडले नाही म्हणून निरुत्साही न होता कामे करीत राहिले. माझ्या मनात प्रश्न येत असे आपण यांचे उतराई कसे होणार आहोत? मग मीच माझी मला उत्तरे दिली.

पहिले उत्तर – शेतकरी संघटनेच्या असंख्य कार्यकर्त्यांनी आजवर जो त्याग केला, जी किंमत मोजली त्याची अपेक्षा करण्याचा मला अधिकार होता, कारण इतर कोणाही इतकीच माझा प्रपंच उधळून देण्याची तयारी मीही दाखविली आणि जिथे जिथे आवश्यक होते तिथे तिथे माझा जीव धोक्यात घातला; शेतकऱ्याचा मुलगा नसताना घातला, ब्राह्मण असून घातला.

दुसरे उत्तर – मी तर बाहेरचा, उपरा; मी काही शेतकऱ्याघरचा नाही; पण महात्मा जोतिबा फुले हे तर शेतकऱ्याघरचे? त्यांच्या आयुष्यामध्ये जे जे काही घडले ते पाहिले तर हिंदुस्थानातल्या लोकांनी माझ्यापेक्षा त्यांची फारच वाईट अवस्था केली हे लक्षात येईल. म्युनिसिपालिटीच्या एका निवडणुकीत त्यांच्या वॉर्डात त्यांना फक्त दोन मते मिळाली, दुसऱ्या वॉर्डात एकही नाही. त्यांच्या पत्नीवर चिखलफेक झाली. त्यांची चळवळ तीन जिल्ह्यांच्यावर पसरू शकली नाही. जोतिबांच्या आयुष्यामध्ये त्यांना मान मिळाला नसेल, त्यांची हेटाळणी झाली असेल, इतिहास त्याची भरपाई करतो. व्हॉईसरॉयच्या दरबारामध्ये खांद्यावर घोंगडे टाकून ते गेले होते. आज कोणालाही कोणत्या व्हॉईसरॉयच्या दरबारात

जोतिबा फुले घोंगडे खांद्यावर टाकून गेले त्या व्हॉईसरॉयचे नाव माहिती नाही, जोतिबा फुल्यांचेच नाव माहिती आहे. इतिहास घटनेचे यथार्थ मूल्यांकन करतो हा विश्वास ठेवा.

माझी चळवळ शेतकऱ्याची आहे का? आहे. पण मी काही शेतकरी नाही. शेतकरी नसूनही मी शेतकऱ्याकरिता सगळा संसार का उधळून टाकला? कारण, मी जो लढा देतो आहे तो स्वातंत्र्याचा लढा आहे. प्रत्येक व्यक्तीला आपापल्या बुद्धीप्रमाणे, आपापल्या कुवतीप्रमाणे आपापल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. मी हा लढा सुरू केला तेव्हा, या स्वातंत्र्यामध्ये सगळयात मोठा अडथळा येतो तो शेतकऱ्यांच्याबाबतीत अशी खात्री पटल्यामुळे मी शेतकरी संघटनेला सुरुवात केली.

इतिहास पडताळून पाहिला तर असे दिसते की इतिहास हा जास्तीत जास्त स्वातंत्र्याकडे जातो. इतिहासाच्या सुरुवातीला अनेक भिंती होत्या. भाषेच्या भिंती होत्या. जातीच्या भिंती होत्या, धर्माच्या भिंती होत्या, भूगोलाच्या भिंती होत्या आणि गेल्या हजारो वर्षांच्या इतिहासात काय घडले ते एका वाक्यात सांगायचे तर या सगळया कृत्रिम भिंती, महापुरामध्ये भिंती तडातडा फुटून वाहून जाव्यात, तशा फुटत आल्या आहेत. इतिहासामध्ये विजय प्रत्येकवेळी स्वातंत्र्याचा झाला आणि ज्यांनी ज्यांनी धर्माच्या नावाखाली, अर्थकारणाच्या नावाखाली स्वातंत्र्यावर बंधने घालण्याचा प्रयत्न केला, ''सामान्य माणसाला समजत नाही, मी सांगतो तुमचं कशानं कल्याण होणार आहे ते.'' असं ज्यांनी ज्यांनी म्हटले त्यांना त्यांना इतिहासाने धुळीस लोळवले आहे. स्वातंत्र्य हा इतिहासाचा संदेश आहे आणि अलीकडच्या इतिहासामध्ये शेतकरी संघटना ही हिंदुस्थाना मध्येतरी स्वातंत्र्याचा झेंडा घेऊन पुढे जाणारी सर्वांत मोठी संघटना आहे. इतिहास तुमचा आहे, भविष्य तुमचे आहे.

मग, सध्याची जी परिस्थिती आहे तिची कशाशी तुलना करता येईल. या परिस्थितीची तुलना 'शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका' झाल्यानंतरच्या परिस्थितीशीच करता येईल. मी शिवाजी महाराज नाही होऊ शकणार, पण शेतकरी संघटनेचे काम हे शिवाजी महाराजांच्या कामाच्या तुलनेचे आहे. शहाजी राजांनी, मालोजी राजांनी बादशाहीपासून स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न देशमुखांना एकत्र करून केला; शिवाजी महाराजांनी मावळे एकत्र केले. शेतकरी संघटनेने आपले काम चालू असताना साखर कारखान्याचे संचालक, अध्यक्ष गोळा केले नाहीत तर तळागाळातील, शेतीमध्ये घाम गाळणारा शेतकरी उभा केला. म्हणून मी म्हणतो की शेतकरी संघटना कामाच्या बाबतीत शिवाजी महाराजांच्या तुलनेची आहे. आता आग्र्याहून सुटली आहे आणि राज्यभिषेक

जो व्हायचा आहे तो काही फार दूर नाही; शिवाजी महाराजांच्या आग्र्याहून सुटकेनंतर पाचसहा वर्षांतच राज्यभिषेकाचा शुभदिवस आला. शेतकरी संघटनेचाही तो दिवस येणारा याची खात्री बाळगा.

माझ्या हातून चुका झाल्या असतील. कित्येक कार्यकर्त्यांच्या भावना माझ्याकडून दुखावल्या गेल्या असतील, कारसेवा आंदोलनाच्या काळामध्ये महाराष्ट्रात काही अप्रिय घटना घडल्या असे मी ऐकतो आहे. मला मुलगा नाही पण अनेक कार्यकर्त्यांना मी मुलासारखं मानलं, त्यांनीसुद्धा बाप जरा दुबळा झाल्यासारखा वाटल्यानंतर घरातली मुलं जशी गडबड करतात, तशी गडबड केलेली पाहिली. मनाला क्लेश झाले; पण हे सगळं झालं तरी आपली सगळ्यात मोठी ताकद म्हणजे आपण सत्य मार्गाचे यात्रिक आहोत, महात्मा जोतिबा फुल्यांनी दिलेल्या मार्गाने चालतो आहोत. आपला विजय निश्चित आहे हे लक्षात ठेवून आपण सर्वजण काम करीत राहिलो तर सध्याचा अंधःकार दूर व्हायला पाचसहा वर्षांपेक्षा काही जास्त काळ लागणार नाही असा मला विश्वास आहे.

जागतिक शेतकरी मंचावर माझी नेमणूक झाल्याचे सर्वांनाच ठाऊक आहे. या मंचाची हिंदुस्थानातील पहिली परिषद दिल्ली येथे १०, ११, १२ एप्रिल २००० रोजी होणार आहे. या परिषदेचे उद्घाटन हिंदुस्थानचे राष्ट्रपती करणार असून, त्यात अत्यंत महत्त्वाचे भाषण स्वतः पंतप्रधान करणार आहे. वित्तमंत्री परिषदेला सर्वकाळ हजर राहणार आहेत. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना येण्याचे निमंत्रण आहे. यावेळी आगगाडीने फुकट प्रवास करण्याची गरज नाही; कारण या कार्यक्रमाला येणाऱ्या सर्वांना रेल्वेच्या प्रवासाचे तिकीट दिले जाणार आहे.

खुल्या व्यवस्थेमध्ये सरकार अन्याय करू लागले तर त्याला विरोध करण्याचा मार्ग रास्ता रोको नाही ते समाजवादाच्या काळातले हत्यार होते. आता हत्यारे वेगळी आहेत, व्यापारी हत्यारे आहेत. आवश्यक तर कांद्याचा भाव ६० रुपये किलो करून दाखविण्याची हत्यारे हाती घ्यायची आहेत. त्याकरिता वेगळ्या बांधणीला सुरुवात झालेली आहे. तुम्ही, मनामध्ये जी काही निराशा आली असेल, अंधःकार दाटला असेल तो दूर करून शेतकरी संघटनेवरील श्रद्धा कायम ठेवावी.

*(१२ जानेवारी २०००, जिल्हा कार्यकारणी बैठक श्रीरामपूर.)*

*(शेतकरी संघटक २१ जानेवारी २०००)*

■■

# राज्य आले ठग पिंढाऱ्यांचे

संकटे समोर पुष्कळ आहेत. उसाचे गाऱ्हाणे आहे, कापसाचे गाऱ्हाणे आहे, पाण्याचे गाऱ्हाणे आहे, विजेचे गाऱ्हाणे आहे, कांद्याचे गाऱ्हाणे आहे आणि शेतकरी कर्जामध्ये असा डुबत चालला आहे की १४ जानेवारी रोजी आंध्र प्रदेशातील वारंगल जिल्ह्यामध्ये तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची या वर्षातील पहिली बातमी वर्तमानपत्रात आली; त्यानंतर विदर्भातही आत्महत्या झाल्याची बातमी आली; पंजाबमध्ये आत्महत्या व्हायला सुरुवात झाली. १९ जानेवारीला दिल्लीमध्ये देशभरातील शेतकऱ्यांच्या संघटनांच्या किसान समन्वय समितीची बैठक झाली त्यामध्ये या बातम्यावर विचार करण्यात आला.

केंद्रीय वित्तमंत्री श्री. यशवंत सिन्हा यांच्यासमोर अंदाजपत्रकपूर्व चर्चा सुरू होत्या. मी त्या चर्चेच्या वेळी हजर होतो. देशभर शेतकरी आत्महत्या करण्याच्या अवस्थेत आहेत, वित्तमंत्री म्हणजे साऱ्या देशाच्या तिजोरीच्या किल्ल्या ज्याच्या हाती आहे असे पदाधिकारी; तेव्हा आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभे असलेल्या शेतकऱ्याला दिलासा वाटावा अशी काहीतरी चर्चा तेथे होईल असे मला वाटले होते; पण तेथे मांडणी मात्र वेगळीच झाली, "कित्येक वर्षे झाली, शेतकऱ्यांच्या मिळकतीवर काही कर नाहीत. हिंदुस्थानातले इतर सर्व लोक आपापल्या मिळकतीवर कर भरतात. आता शेतकऱ्यांमध्येही श्रीमंत शेतकरी काही थोडे नाहीत. तेव्हा येत्या अंदाजपत्रकामध्ये शेतकऱ्यांवर आयकर (इन्कमटॅक्स) लावावा." अशी मांडणी करून सरकार शेतकऱ्यावर इन्कमटॅक्स लावण्याची जय्यत तयारी करीत आहे.

आणि इकडे शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यात वाढच होत आहे अशी आणीबाणीची परिस्थिती उभी राहिली आहे.

वित्तमंत्र्यासमोर चाललेल्या चर्चेत मी शेतकऱ्यांच्या वतीने शेतीउत्पन्नावरील इन्कमटॅक्ससंबंधी शेतकरी संघटनेची भूमिका मांडली.

मी वित्तमंत्र्यांना सांगितले की, “या परिस्थितीत शेतकऱ्यांवरच नव्हे तर कोणावरही कर बसवू नये असा माझा सल्ला आहे. कारण जो जो कोणी धन उत्पन्न करतो त्याच्यावर तुम्ही कर बसवता – कारखानदार असो, व्यापारी असो का शेतकरी असो; त्याच्याकडून जमा केलेला कराचा पैसा खर्च कोठे करता? तो पैसा धरणे बांधण्याकरिता, रस्ते बांधण्याकरिता किंवा रेल्वे बांधण्याकरिता तुम्ही खर्च करीत नाही; १०० रुपये जमा झाले तर त्यातले ७३ रुपये तुम्ही अशा लोकांवर खर्च करता की जे देशाला वाढवायचे सोडा, देशाला बुडवायचेच काम करतात–प्रशासनाच्यासाठी तुम्ही १०० मधील ७३ रुपये खर्च करता. अंदाजपत्रकी तूट भरून काढायची तर सरकारी खर्च कमी करणे याखेरीज सोपा उपाय नाही.”

एखाद्या घरच्या गृहिणीच्या लक्षात आले की आपल्या घराला पैसा पुरत नाही, तेव्हा ती काही असे म्हणत नाही की, “आपल्याला पैसे पुरत नाहीत, कोणाच्यातरी घरावर डाका घालून पैसे आणा.” सज्जन, प्रामाणिक माणसे काटकसर करू पाहतात. त्याचप्रमाणे, सरकारनेही काटकसर करावी, डाके घालण्याचे प्रयत्न करू नयेत.

मी वित्तमंत्र्यांना पुढे म्हटले, “शेतकऱ्यांवर इन्कमटॅक्स लावणे आवश्यकच असेल तर शेतकऱ्याला ज्या दिवशी करपात्र मिळकत मिळू लागेल त्या दिवशी कर भरण्याचे काम आम्ही शेतकरी अत्यंत आनंदाने आणि अभिमानाने करू; फक्त कर भरण्याची मिळकत कोठे आहे ते दाखवा. कर लावायचाच असेल तर कर ठरविण्याची पद्धती योग्य असली पाहिजे. कोणोतरी दिल्लीत किंवा मुंबईत बसून हा मराठवाड्यातला शेतकरी आहे, कापूस पिकवतो, अमुक एकरात पिकवतो, इतके क्विंटल पिकवतो इतका इतका!” असा मुंगी व्याली, शेळी झाली, दूध तिचे ते किती! असला हिशोब मांडलेला चालणार नाही. शेतावर या, खर्च काय झाला त्याचा नीट हिशोब करा, उत्पन्न काय निघाले त्याचा हिशोब करा आणि मग तुम्हाला दिसेल, की आम्हाला फायदा झाला आहे, मिळकत झाली आहे तर आम्ही आनंदाने टॅक्स भरू; पण एक अट आहे. गेली पन्नास वर्षे शेतकरी मिळकतीवर नाही; पण त्याच्या सगळ्या विक्रीवर प्रत्येक वेळी टॅक्स देतो आहे. उणे सबसिडी म्हणजे टॅक्सच. सरकारनेच कबूल केले आहे की, शेतकरी त्याच्या एकूण विक्रीवर ८७ टक्के टॅक्स देतो. मग, निदान गेल्या तीन वर्षात सरकारने जी काही रक्कम शेतकऱ्याकडून उणे सबसिडीच्या मार्गाने घेतली ती रक्कम आमच्याकडून आगाऊ करवसुली केली आहे असे धरून आम्ही शेतकरी इन्कमटॅक्स भरायला तयार आहोत.

मी ही मांडणी केली; पण मला एका गोष्टीचे मोठे नवल वाटले. गेल्या वर्षी शेकडो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, यावर्षीही आत्महत्या होऊ लागल्याच्या बातम्या येऊ लागल्या आहेत, पण शेतकऱ्याच्या घरच्या परिस्थितीची जाणीव देशाच्या राजधानीमध्ये, वित्तमंत्र्यांच्या दालनामध्ये, सबंध राष्ट्रपती भवनामध्ये किंवा साऊथ ब्लॉकमध्ये आणि नॉर्थ ब्लॉकमध्ये मला कोठेही दिसली नाही.

याच सुमारास माझी दुसरी मुलाखत झाली ती जागतिक व्यापार संघटनेचे महानिदेशक श्री. माईक मूर यांच्याशी संपूर्ण जगामध्ये खुली व्यवस्था तयार व्हावी याकरिता प्रयत्न करण्यासाठी स्थापन झालेली ही संस्था आहे. ते दिल्लीमध्ये तीन दिवस होते. त्या काळात ते राष्ट्रपतींना भेटले, पंतप्रधानांना भेटले, वित्तमंत्र्यांना भेटले; पण खासगी संस्थापैकी कोणालाही भेटले नाहीत. फक्त, शेतकरी संघटना ही खुल्या व्यवस्थेच्या बाजूने आहे अशी माहिती त्यांना होती, त्यामुळे त्यांनी शेतकरी संघटनेची भेट माझ्या माध्यमातून घेतली. मी त्यांना सांगितले, ‘‘संपूर्ण जगामध्ये शेतकऱ्यांना सबसिडी आहे; जपानमधील शेतकऱ्याला ९० टक्के सबसिडी म्हणजे १०० रुपये माल पिकविला तर त्याला १९० रुपये मिळण्याची व्यवस्था आहे; युरोपमधील शेतकऱ्याला ६५ टक्के, तर अमेरिकेतल्या शेतकऱ्याला ३५ टक्के सबसिडी आहे. हे सर्व जागतिक व्यापार संघटनेच्या अहवालात म्हटलेले आहे.’’ मी त्यांना विचारले, ‘‘आपल्याला हे माहीत आहे का की, हिंदुस्थान हा असा करंटा देश आहे की ज्या देशामध्ये शेतकऱ्याने १८७ रुपयांचा माल पिकवला तर त्याला जास्तीत जास्त १०० रुपये मिळावे अशी व्यवस्था आहे?’’ ते आश्चर्यचकित होऊन माझ्याकडे पाहत बसले आणि म्हणाले, ‘‘माझा यावर विश्वासच बसत नाही.’’ जागतिक व्यापार संघटनेच्या जवळजवळ १४० सदस्य देशांपैकी एखाद्या देशात शेतकऱ्यावर अशी उलटी पट्टी बसत असेल हे त्यांच्या कल्पनेबाहेरचे होते. मी त्यांना त्यांच्या संस्थेचे अहवाला तपासून पाहण्याची विनंती केली आणि त्यांच्यासमोर, हिंदुस्थान सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने जागतिक व्यापार संघटनेला सादर केलेल्या, आपले सरकार शेतकऱ्यांवर उणे सबसिडी लादत असल्याचा कबुलीजवाब देणाऱ्या कागदपत्रांच्या प्रती ठेवल्या.

मग प्रश्न आला की याबाबतीत काय करायचे? शेतकरी संघटनेचे असंख्य कार्यकर्ते आपली घरेदारे सोडून या अन्यायाला विरोध करण्याचे काम गेली वीस वर्षे करीत असल्याचे मी त्यांना सांगितले. डंकेल प्रस्तावाच्या रूपाने आमच्या आंदोलनातील, मांडणीतील यथार्थताच सिद्ध झाली. त्यावेळी मी जाहीरपणे म्हटले होते की डंकेल जर कधी भेटले तर माझ्या छातीवरील शेतकरी संघटनेचा बिल्ला मी त्यांच्या छातीवर सन्मानपूर्वक लावेन. माईक मूरना मी म्हटले की, ‘‘आता

डंकेल यांच्या जागी तुम्ही आहात; तुमच्याही छातीवर हा बिल्ला लावावा अशी माझी इच्छा आहे; पण तो लावून घेण्याची हिम्मत तुमच्यात आहे का हे पाहायचे आहे.''

भारतीय शेतकऱ्यांवर हिंदुस्थान सरकार लादत असलेल्या उणे सबसिडीसंबंधात काय कारवाई करता येईल यावर आमची चर्चा झाली. मी काही उपाय सुचविले. ते मला म्हणाले, ''हिंदुस्थानात येऊन तुम्हाला भेटून मला आनंद वाटला. कारण, मला असे वाटत होते की हिंदुस्थानात सगळे भीकमागेच असावेत; जो तो आम्हाला काहीतरी द्या, हो. म्हणून हात पुढे करतो, पदर पसरतो. जगभर शेतकऱ्यांच्या संघटनासुद्धा शेतकऱ्यांना सबसिडी मिळावी, सवली मिळाव्यात म्हणून आरडाओरडा करीत असतात; पण हिंदुस्थानातील शेतकरी 'सूट सबसिडीचे नाही काम, आम्हाला हवे घामाचे दाम' म्हणत आहे याने मला फार आनंद वाटला.''

पण, ते पुढे म्हणाले की, ''शेतकऱ्यांवर उणे सबसिडी लादत असले तरी हिंदुस्थान सरकारविरुद्ध जागतिक व्यापार संघटना काहीच करू शकत नाही.'' घरात नवरा-बायकोचे भांडण चालू असेल तर बाहेरच्या शहाण्या माणसाने त्या भांडणात पडू नये त्याप्रमाणे, ''जागतिक व्यापार संघटनेचा मी महानिदेशक असलो तरी सरकार आणि शेतकरी यांच्या भांडणात मी हस्तक्षेप केलेला तुमच्या सरकारला चालणार नाही. ते म्हणेल, हा आमचा घरगुती मामला आहे. तुमचा अधिकार अधिक सबसिडी कमी करण्यापुरताच आहे.'' त्यामुळे तुमचा प्रश्न तुम्हालाच सोडवावा लागेल.

१९ जानेवारीला मी किसान समन्वय समितीच्या शिष्टमंडळासह पंतप्रधानांची भेट घेतली. पाकिस्तानातून कापूस येतो आहे त्यावर बंदी घालावी किंवा त्यावरील सीमाशुल्क वाढवावे अशी आमची मागणी होती. कारगिलचे युद्ध चालू असताना पाकिस्तानमधून साखर आयात झाली आणि आता कापूस येत आहे. तशी, पंडित नेहरूंच्या जमान्यापासून शेतीमालाची आयात होतच आहे. त्यावेळी ती समाजवादाच्या नावाखाली होत होती, आता समाजवाद संपला आणि तरीसुद्धा आयात चालू आहे. ही आयात काय कारणाने होते आहे असा प्रश्न पंतप्रधानांना आम्ही विचारला. समाजवादाच्या काळात निदान काही भाकड नियोजनाच्या कल्पना समोर ठेवून, शेतकऱ्याला पिळल्याखेरीज देशाचा औद्योगिक विकास होणार नाही असे मूर्खपणाचे अर्थशास्त्र मांडून शेतकऱ्याला लुटले गेले. आता शेतकऱ्याला जे लुटत आहेत ते निव्वळ चोरटे भुरटे आहेत. स्वतःला मिळणाऱ्या कमिशनच्या फायद्यापोटी देश बुडवू पाहत आहेत. संरक्षणमंत्र्यांनी, १९८५

सालापासून झालेल्या शस्त्रास्त्रांच्या सर्व आयातीची चौकशी करण्याची घोषणा केली आहे. कारण चर्चा एकाच बोफार्सची झाली असती तरी शस्त्रास्त्रांच्या प्रत्येक आयातीत 'बोफोर्स' झाले असावे असा त्यांना संशय आहे. संरक्षणाच्या शस्त्रास्त्रांच्या आयातीत एक बोफोर्स झाले का दहा बोफोर्स झाले असतील; पण अन्नधान्याच्या आयातीमध्ये हिंदुस्थानात जवळजवळ दर महिन्याला एक 'बोफोर्स' होते आहे आणि केवळ आपल्या फायद्यासाठी हिंदुस्थानातल्या शेतकऱ्याला बुडवून परदेशातून साखर, कापूस, तेल इत्यादींची आयात होत आहे.

म्हणजे १९८० मध्ये शेतकऱ्यांचा दुष्मन समाजवादी अर्थशास्त्र आणि नेहरूंचा समाजवाद होता. आता शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत वाईट झाली आहे. वित्तमंत्री म्हणतात की, ''मलाही समजते, पण काय करणार? तिजोरीत खडखडात झाला आहे. देणेकऱ्यांचे पैसे द्यायला आणायचे कुठून. लावू नये असे वाटत असले तरी शेतकऱ्यावर इन्कमटॅक्स लावणे भाग आहे'' आणि राज्य सरकारेही अशाच विचाराची झाली आहेत. त्यांनी जणू सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना सांगून टाकले आहे की तिजोरीत खडखडाट आहे, काही करून पैशाची वसुली करता येईल तितकी करून घ्या, सरकारी नोकरी फार काळ टिकण्याची शक्यता नाही. कारण सरकार आता नादार बनण्याच्या अवस्थेला येऊन पोहोचले आहे आणि मग, अधिकाऱ्यांनी कर्जवसुली, वीजबिल वसुली, पाणीपट्टी वसुली इत्यादी मार्गांनी – त्यांच्या सेवा उपयुक्ततेच्या बाबतीत सर्व दोषांनी परिपूर्ण असूनही – पैसा जमवायला सुरुवात केली आहे.

केंद्र शासनाने आपले सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग विकायला काढले आहेत; एअर इंडिया, इंडियन एअर लाईन्स, वेगवेगळे कारखाने विकायला काढले. हे काही खाजगीकरण नाही. केंद्रातील उद्योगमंत्री आता कोणते कारखाने विक्रीला काढायचे याची यादी तयार करीत आहेत. नुकसान होते आहे असे दिसल्याबरोबर कारखाने लगेच विक्रीला काढायला पाहिजेत असे नाही. शेतीत नुकसान होते आहे म्हणजे शेतकरी आपली जमीन लगेच विकत नाही. पीकपद्धती बदलून आपली परिस्थिती सुधारायचा प्रयत्न करतो; भरघोस पीक येऊनही शेतीमालाला रास्त भाव मिळत नसेल तर आंदोलने करतो; काही तरी करून आपला धंदा चालवायचा प्रयत्न करतो; पण सरकार मात्र कारखाने नीट चालावेत यासाठी प्रयत्नच करीत नाही; शक्य होईल तितक्या लवकर कारखाने विकण्याची धडपड चालली आहे. उद्देश अगदी सरळ दिसतो आहे. एक कारखाना विकून, समजा, १०००० कोटी रुपये मिळाले तर सरकारी नोकरांचा पगार भागविण्याची एक महिल्याची तरी तजबीज झाली यातच समाधान! एखादा आळशी शेतकरी जसा

थोडी थोडी शेती विकत घर चालवतो तसेच हिंदुस्थान सरकार नादार बनल्यासारखे एक एक कारखाना, उद्योग विकून आपले प्रशासन चालू ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे; आपली नोकरशाही बळकट ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे.

महाराष्ट्रात पाणीपट्टी एकरी २२५ रुपयांवरून ९१८ रुपयांपर्यंत वाढवली. परवानगी न घेता पाणी घेतले तर आता दंडाची रक्कम १० रुपये प्रति गुंठाऐवजी ५७ रुपये होणार. एवढेच नव्हे तर प्रत्यक्षात पाणी घेतले नाही तरी नदीच्या किंवा पाटाच्या पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या विहिरींना पाझर फुटतात म्हणून त्यांच्याकडून पाझरकरही वसूल करणार! विजेचा दर प्रतिहॉर्सपॉवर ३०० रुपये होता तो आधी ५०० झाला, ५०० चा ७००, आता ७०० चा ९०० झाला.

हे कशासाठी चालले आहे? याचा अर्थ सरळ आहे. नदीच्या किंवा पाटाच्या पाण्यामुळे विहिरींना पाझर फुटतो म्हणून पाझरकर लावला तर लोक मुकाट्याने मान्य करतील असे समजण्याइतके सरकार काही मूर्ख नाही. पण ही पाझरकराची कल्पना या आधीही स्वतःच्याच पक्षाच्या मुख्यमंत्र्यांना खाली खेचून स्वतः त्या जागी बसण्यासाठी महाराष्ट्रात वापरली गेली आहे.

शेतकरी संघटनेच्या अध्यक्षांनी या मेळाव्याचे निमंत्रण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री दोघांनाही दिले होते. त्यांचा उद्देश स्पष्ट होता की शेतकरी आपल्या समस्यांविषयी काय बोलतो हे त्यांनी स्वतःच्या कानांनी ऐकावे आणि त्यावर आपली भूमिका मांडावी; पत्रापत्रीची भानगड नको. पण त्यांनी काही कारणे सांगून निमंत्रण नाकारले; पण ते आले नाहीत म्हणजे शेतकरी इथे कशासाठी जमले आहेत, आंदोलने कशासाठी करीत आहेत वगैरे त्यांना कळणार नाही असे समजण्याचे कारण नाही. दुसऱ्या पक्षाच्या किंवा गटाच्या एखाद्या माणसाने एखाद्या मंत्र्याची भेट घेतली तर तो त्याला विकत घ्यायला आला होता का, असल्यास त्याच्या सूटकेसमध्ये किती रकमेच्या नोटा होत्या याची बित्तबातमी मिळू शकेल अशी यंत्रणा ज्यांच्याजवळ असू शकते त्यांना शेतकरी आंदोलन कशासाठी करीत आहेत हे कळत नाही असे समजायचे काही कारण नाही.

तेव्हा, पाणीपट्टी वाढली आहे, विजेचे दर वाढले आहे, कापसाच्या खरेदीनंतर दिलेले चेक वटत नाहीत या सगळ्यांमागे एकच कारण आहे, की सरकार नादार बनले आहे. दिवाळखोर बनले आहे; देशामध्ये आर्थिक अराजक माजलेले आहे आणि केंद्रीय तसेच राज्य सरकारातून आदेशांवर आदेश सुटतात की काय वाटेल ते करा पण कर वाढवा, वसुली वाढवा आणि या वसुलीच्या वेगवेगळ्या भागातील बातम्या आपल्यासमोर येत आहेत त्यावरून सिद्ध होते की हे सरकार आता लुटारूंचे, ठगांचे, पिंढाऱ्यांचे आणि खिसेकापूंचे झाले आहे आणि जिथे

मिळेल तिथे ते पैसा गोळा करीत आहे. सरकार आणि उत्पादक व शेतकरी यांच्यात संघर्ष तयार झाला आहे.

माईक मूर म्हटल्याप्रमाणे हे नवरा-बायकोचे भांडण असले तरी हे नवराबायकोचे साधे भांडण नाही; हे दारूडा नवरा आणि त्याची बायको यांच्यातील वादासारखे भांडण आहे. सरकारला आता दारूड्या नवऱ्याचीच उपमा चपखल बसते. घरी असतील ते स्वत: कमवलेले पैसे उचलून घेऊन जायचे आणि दारू प्यायची, बायकोने मोलमजुरी करून कमावलेले पैसेही काढून घ्यायचे आणि दारू प्यायची, पोरांनी खाऊकरिता साठवून ठेवलेले पैसेही ओरबाडून घ्यायचे आणि दारू प्यायची आणि अख्ख्या घराची नासाडी करायची. याप्रकारे वागणाऱ्या नवऱ्यासारखेच सरकारचे काम चालू आहे. एखाद्या बायकोने समजुतीने नवऱ्याला रोज पाचदहा रुपये दारू पिण्यासाठी दिले आणि त्याच्याशी गोड वागून, बोलून किंवा नवससायास करून त्याची दारू सुटावी म्हणून प्रयत्न केले आणि त्याची दारू सुटली असे उदाहरण कधी सापडणार नाही. तसेच, या सरकारकडूनही आता उधळपट्टीचे व्यसन सुटेल अशी अपेक्षा करण्यात अर्थ नाही. तेव्हा तुम्ही आता पाणीपट्टी म्हणा, वीजबिल म्हणा, कर्जफेड म्हणा - ज्या ज्या मार्गाने सरकारला द्याल त्या सर्व पैशांची सरकार उधळपट्टीच करणार आहे; त्या पैशांनी हा दारूडा नवरा फक्त दारूच पिणार आहे. दारूड्या नवऱ्याला एक पैसासुद्धा देणे म्हणजे घराच्या सत्यानाशाला आमंत्रण आहे. म्हणून, आपले आंदोलन यापुढे सोपे आहे. दारूड्या नवऱ्याला पैसा देण्याचे पाप करायचे नाही.

तेव्हा, शेतकरी संघटनेचा आजपासून आंदोलनाचा कार्यक्रम ठरला आहे. यापुढे पाणीपट्टी असो, वीजबिल असो, कर्जफेड असो की आणखी कोणतेही सरकारी देणे असो - ते सरकारला भरणा करण्यास ठाम नकार देणे; त्यासाठी मग तुरुंगात जावे लागले तरी चालेल.

हलाखीचीही आपत्ती राष्ट्रीय आहे, केवळ महाराष्ट्रामध्ये होणार नाही. ते पायरी-पायरीने देशव्यापी होणार आहे. आज ७ फेब्रुवारीपासून आपण महाराष्ट्रात ते सुरू केले आहे. आजपासून ४० दिवस हा लढा आपल्याला एकट्याने आपण महाराष्ट्रात चालवायचा आहे. १७ मार्च २००० रोजी शेतकऱ्यांचे अखिल भारतीय संमेलन किसान समन्वय समितीच्या झेंड्याखाली आंध्र प्रदेशातील तिरूपती येथे होणार आहे. त्या मेळाव्यात 'दारूड्या नवऱ्याला एक पैसाही न देण्याचा' कार्यक्रम अखिल भारतीय पातळीवर जाहीर केला जाईल. १७ मार्चपासून देशभर हे आंदोलन सुरू झाले की त्यानंतर १ महिन्याने म्हणजे १७ एप्रिल २००० रोजी दिल्लीच्या विज्ञानभवनामध्ये जागतिक शेतकरी मंचाच्या भारतीय शाखेच्या परिषदेचे

उद्घाटन भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते होणार असून त्या समारंभातील उद्घाटनाचे भाषण भारताचे पंतप्रधान करणार आहेत. साऱ्या जगाचे कॅमेरे या परिषदेवर रोखलेले असतील. या परिषदेत भारतातील शेतीक्षेत्रापुढील प्रश्नांवर चर्चा होणार आहे. त्या चर्चेची पार्श्वभूमी कशी असेल ते त्या आधीच्या जालना ते तिरूपती ४० दिवस आणि तिरूपती ते दिल्ली ३० दिवस अशा ७० दिवसांच्या काळात भारतातील शेतकरी 'दारूड्या नवऱ्याच्या हाती पैसाही न देण्याचे' आंदोलन किती प्रकर्षाने करतात त्याने ठरणार आहे आणि जगाच्या व्यासपीठावर भारतीय शेतकऱ्यांचे आणि उद्योजकांचे स्वातंत्र्य आंदोलन पोहोचणार आहे.

फेब्रुवारी २०००- जालना मेळावा.

*(शेतकरी संघटक २१ फेब्रुवारी २०००)*

■■

# वाघाचा जन्म वाघासारखं जगा

शेतकरी संघटनेच्या ताकदीच्या दृष्टीने सगळा महाराष्ट्र थोडा मागे पडू लागला आहे की काय असे वाटत असताना सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यांतील म्हणजे दक्षिण महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांनी मोठ्या जोमाने आंदोलने सुरू केली. एवढेच नव्हे तर शेतकरी संघटनेच्या अधिवेशनाची जबाबदारी स्वीकारली ही एक विशेष बाब आहे. या भागातील आंदोलनांचे वृत्तांत आणि अधिवेशनाच्या तयारीचा अहवाल पाहता मला एका योगायोगाचा मोठा आनंद वाटतो आहे. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात ज्या प्रदेशाने प्रतिकार स्थापन करून गोऱ्या इंग्रजांना टक्कर दिली त्याच प्रदेशात, काळ्या इंग्रजांच्या शोषणातून मुक्त होण्यासाठी सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यलढ्यात प्रतिसरकार स्थापन होते आहे. ही शेतकरी आंदोलनातल्या नवीन युगाची सुरुवात आहे.

पुष्कळदा काय होते? समोर येणारे जे प्रश्न असतात, अडचणी असतात त्यांनी कार्यकर्ते थोडे गांगरून जातात. आता शेतकऱ्यांना संघटनेचा विचार सांगून पहिल्यासारखा उत्साह त्यांच्यात निर्माण होत नाही, आता कसं काय पुढं जायचं असा प्रश्न मनात येऊन मग कोणता एखादा पक्ष आपल्याला निदान पायरीपाशीतरी बसवून घेतो का याचा तपास करण्याची बुद्धी तयार होते. अशावेळी कार्यकर्त्यांनी शेतकरी संघटनेच्या इतिहासाची मनोमन उजळणी केली पाहिजे. शेतकरी संघटनेचे इतिहासात स्थान काय आहे याचा अभ्यास आंबेठाणच्या प्रशिक्षण शिबिरात आवर्जून केला जातो. त्याचा सारांश समस्त मानवजातीची प्रगती उत्क्रांतीतून होते; उत्क्रांती साधनांतून होते, साधने शेतीमालाच्या वरकड उत्पादनातून म्हणजे शेतीतील बचतीतून तयार होतात आणि शेतीतील बचत लुटारूंनी लुटून नेली तर मानव जातीची प्रगती थांबते असा आहे. आज आपल्या देशातील प्रगती खुंटली आहे. प्रगतीच्या प्रवाहाला जे बांध पडले आहे ते बांध

तोडून टाळून तुंबलेला हा प्रवाह वाहता करणे हे शेतकरी संघटनेचे काम आहे. शेतकरी संघटनेचे काम करताना जेव्हा जेव्हा मनावर मळभ येईल की आता कसं करावे, आपल्या हाती काहीच साधनं नाही, सामनेवाल्यांकडे पैसा आहे, सत्ता आहे, वर्तमानपत्रांसारखी साधनं आहेत; आपल्याकडे काहीच नाही, आपण लढावं कसं आणि किती? तेव्हा कार्यकर्त्यांनी आपल्या मनाला खात्री द्यावी की आपल्याजवळ काही नसलं तरी आपल्यामागे इतिहास उभा आहे आणि ज्याप्रमाणे महाभारतात श्रीकृष्ण मागे असताना विजय जितका अटळ होता तितकाच आपला विजय अटळ आहे. आपली ही जी ताकद आहे तिची प्रचीती घेण्याकरिता कार्यकर्त्यांनी सांगली, मिरजेच्या येत्या अधिवेशात आपापल्या जिल्ह्याचे दालन उभे करून त्यात शेतकरी आंदोलनातील आपल्या सहभागाचे, कामगिरीचे प्रदर्शन करावे. शेतकरी संघटनेकडे काहीच नाही, जे काय आहे ते इतर पक्षांकडेच आहे. अशी जी काही भावना लोकांच्या मनात तयार होऊ लागली आहे ती या वैभवाच्या दर्शनाने निश्चितपणे दूर होईल. शेवटी, आपली आई फाटकं लुगडं नेसत असली तर 'ही काही आपली आई नाही, जरीचं लुगडं नेसलेली दुसरी कुणीतरी आपली आई आहे' असं कुणी म्हणत नाही, तसंच आपलीही काही वैभवशाली परंपरा आहे हे अशा प्रदर्शनाने स्पष्ट होईल आणि कार्यकर्त्यांच्या मनातील न्यूनतेची भावना नष्ट होईल.

**'भूजल विधेयक' विरोधी आंदोलन**

९ ऑगस्ट २००० रोजी महाराष्ट्रभर महाराष्ट्र सरकारच्या भूजल विधेयकाविरुद्ध आंदोलनाची सुरुवात म्हणून राज्याच्या सत्तारूढ पक्षांच्या आमदारांच्या घरांना घेराव घालण्याचा यशस्वी कार्यक्रम झाला. त्याने शेतकरी संघटनेच्या अस्तित्वाविषयी कोल्हेकुई करणारांची तोंडे बंद झाली. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी या विधेयकाविरुद्ध आपले जाहीर मतप्रदर्शन केल्यानंतर आणि सरकारपक्षाच्या बऱ्याच आमदारांनी आंदोलकांना सामोरे जाऊन शेतकऱ्यांची या विधेयकाबाबतीची भूमिका रास्त असल्याचे मान्य केल्यानंतरसुद्धा महाराष्ट्र सरकार त्यावर फेरविचार करण्याऐवजी हे 'तुघलकी' विधेयक विधानसभेत आणण्याचा हट्ट कायम ठेवून आहे. त्यामुळे हे आंदोलन चालू ठेवणे भाग आहे. त्यासाठी पुन्हा एकदा ९ ऑगस्टचाच कार्यक्रम चालू ठेवण्याने त्यात काही उत्साह राहणार नाही; त्याशिवाय, सगळ्या लोकांनी आमदारांच्या पदाधिकाऱ्यांच्या गावी जाऊन आंदोलन करणे म्हणजे मगरीने पाण्याबाहेर येऊन लढाई करण्यासारखे होईल, त्याऐवजी, आपले जुने शस्त्र बाहेर काढून २ ऑक्टोबर २००० पासून सरकारपक्षाच्या आमदारांना

गावबंदीचा कार्यक्रम सुरू करण्यात येईल. त्यामुळे कार्यकर्त्यांना व शेतकऱ्यांना आपल्याला गावात राहून किंवा सवडीनुसार शेजारच्या गावातील भावाबहिणींच्या मदतीला जाऊन जेव्हा केव्हा सरकारपक्षाच्या आमदारनामदारांचा कार्यक्रम ठरेल तेव्हा महाराष्ट्र सरकारच्या या 'तुघलकी' मनसुब्याला विरोध करता येईल. हा 'गावबंदी'चा कार्यक्रम १० नोव्हेंबर २००० पर्यंत म्हणजे सांगली-मिरजचे अधिवेशन सुरू होईपर्यंत चालू राहील. या अधिवेशनात, आवश्यक वाटल्यास आंदोलनाचे पुढील टप्प्यातील स्वरूप ठरविता येईल.

**आठव्या अधिवेशनाची विषयपत्रिका**

शेतकरी संघटनेचे सांगली-मिरज येथे भरणारे अधिवेशन आठवे अधिवेशन असेल. 'आठवे' या शब्दाशी अनेक कथा जुळलेल्या आहेत. देवकीचा आठवा पुत्र श्रीकृष्ण हा युगंधर ठरला. हे आठवे अधिवेशनही युग बदलणारे ठरणार आहे. विषयपत्रिकेवर चर्चा करण्याआधी या अधिवेशनाची पार्श्वभूमी लक्षात घेऊ.

इंग्रजांनी देश लुटला, इंग्रज देश सोडून निघून गेले, गोऱ्या इंग्रजाची जागा काळ्या इंग्रजाने घेतली पण शेतकऱ्याचं शोषण गेली पन्नास वर्षे चालूच राहिले; शेतकरी कर्जबाजारी झाला, निरक्षर राहिला, त्याच्या आरोग्याची हेळसांड झाली, जमिनीची उत्पादकता गेली, कामाची जनावरे कमी झाली. जी काही यंत्रसामग्री होती तीही संपत गेली, भांडवल संपत आले. अशा तऱ्हेने एखाद्या शत्रूने देश लुटावा तसं 'इंडिया' आणि 'भारत' यांच्या या संघर्षात इंडियावाल्यांनी भारताला लुटून खाल्लं. इतकं की, शेतकऱ्याला जगणं अशक्य झालं. विष पिऊन आत्महत्या करणे बरे पण आपल्या घराण्याची बदनामी झालेली पाहायला लागू नये. अशा तऱ्हेची भावना एका वर्षी दीड हजारांवर शेतकऱ्यांच्या मनात तयार झाली. यापेक्षा त्याला वेगळा पुरावा असण्याची आवश्यकता नाही. दुसऱ्या महायुद्धात पाडाव झालेल्या जर्मनीची जशी परिस्थिती झाली तशी परिस्थिती एका अर्थाने आपल्या 'भारता'ची झाली; या लढाईत 'इंडिया' विरुद्ध आपण टिकू शकलो नाही, अनेक कारणांनी आपण हरलो आणि समस्त 'भारता'ची धूळधाण झाली. हा झाला एक मुद्दा.

'भारता'ची 'इंडिया'बरोबरच्या युद्धात जी धूळधाण झाली ती समाजवादाच्या नावाखाली झाली. या समाजवादाविरुद्ध शेतकरी संघटनेने पहिल्यांदा आवाज उठवला. आज, समाजवाद ही विषाची कुपी आहे हे जगमान्य झाले आहे; समाजवादाची कास धरलेला कोणताही समाज टिकू शकत नाही हे रशियाच्या

उदाहरणावरून सिद्ध झाले आहे आणि हिंदुस्थानही आता समाजवाद सोडून ज्याने त्याने आपल्या ताकदीने उभे राहण्याच्या खुल्या बाजारपेठव्यवस्थेची भाषा करू लागला आहे.

खुल्या व्यवस्थेची नवी पहाट येते आहे आणि शेतकरी संघटनेच्या दृष्टीने ही एक आनंदाची आणि उत्सवाची गोष्ट आहे. कारण, शेतकरी संघटनेची लढाई याच एका उद्दिष्टाने चालू आहे. आता आपल्यातून उठून गेलेल्या कार्यकर्त्यांतील जे 'शेतकऱ्यांना सबसिडी मिळाली पाहिजे' म्हणू लागले आहे त्यांच्यातीलच एकाने शेतकरी संघटनेच्या सुरुवातीच्या काळात घोषणा दिली आहे की, "सूटसबसिडीचे नाही काम, आम्हाला हवे घामाचे दाम" या विचाराला आज जागतिक मान्यता मिळाली आहे आणि शेतकऱ्याला आता चांगले दिवस येण्याची संधी प्रथमच मिळत आहे. कारण, जमिनीत एक दाणा टाकून त्यातून शंभर दाणे काढण्याचा चमत्कार शेतकरी करू शकतो. करीत आला आहे आणि करीत राहणार आहे. हे कोणा 'टाटा'ना जमणार नाही, कोणा 'बिर्ला'ना जमणार नाही. एक किलोच काय एक टन लोखंड टाकलं तर त्यात त्यांना एक ग्रॅमचीही वाढ करण्याची शक्यता नाही. शेतकरी हा एका दाण्याचे शंभर दाणे करणारा भूमिपुत्र आहे. मग, हा चमत्कार हाती असलेला भूमिपुत्र हरतो कोठे? शिवारातून बाजारात जाताना वाटेत जे कोणी अडते, दलाल, व्यापारी, पुढारी, सहकारवाले, सरकारवाले मध्ये येतात ते सरकारी व्यवस्थेच्या आधाराने या भूमिपुत्राच्या हाती काही राहूच देत नाहीत आणि म्हणून परिस्थिती अशी तयार होते की, दुष्काळ पडला म्हणजे दाणे पिकवणारा खडे फोडायला जातो आणि शहरात राहून दाणे खाणारा मात्र आरामात राहतो. जर वाटेवरची ही लूट थांबली तर शेतकऱ्याला कोणाकडेही भीक मागायला जावे लागणार नाही. वाटेवरच्या लुटारूंचा काळ आता संपला आहे, बळिराज्य येत आहे.

पन्नास वर्षांचं काळ्या इंग्रजांनी केलेलं शोषण, त्यामुळे आलेली भणंग अवस्था यानंतर आता नव्या पहाटेची चाहूल लागत आहे. सबंध जगामध्ये खुलेपणाचं वारं वाहात आहे. जागतिक व्यापार परिषदेच्या पुढाकाराने देशादेशांतील भिंती काढून टाकून संपूर्ण जागाचं एकच विश्व व्हावं अशा तऱ्हेचे नवे वारे वाहात आहेत.

आणखी एक महत्त्वाचा फरक घडला आहे. इतके दिवस शेतकऱ्यांच्या शेतीचं जे मुख्य साधन बियाणं हे निसर्गात मिळणाऱ्या बियाण्यांतून घेतलेलं असायचं. जरा मोठा दाणा पाहिजे असेल, विशिष्ट चवीचा हवा असेल तर

आलेल्या उत्पादनातून निवडून वेचून बियाणं शेतकरी ठेवायला लागले आणि याच प्रक्रियेतून नवीन नवीन बियाणं तयार करीत गेले. कोणी हायब्रीड बियाण्यांची निर्मिती केली, कोणी कलमांची पद्धती वापरली. एकूणात, बियाण्यांचा विकास हा निसर्गाने निर्माण केलेल्या मालाच्या निवडीने किंवा मिश्रणानंच होत होता. आता मनुष्य या मर्यादेतून सुटतो आहे आणि विश्वामित्राची प्रतिसृष्टी तयार करण्याची, नवीन जीवाचीच उत्पती करण्याची ताकद त्याच्या हाती आली आहे. समजा, आपल्या ज्वारीमध्ये दुसऱ्या ज्वारीमधील एखादा विशिष्ट गुण आणावयाचा असेल तर त्याचे मिश्रण करण्यासाठी जो खटाटोप आणि वेळ लागतो त्याची आता गरज पडणार नाही. आता ज्वारीच्या 'जीवसूत्रा'मध्ये आवश्यक ते बदल करून हव्या त्या गुणधर्मांच्या ज्वारीचं बियाणं विकसित करण्याची किमया मनुष्यानं हस्तगत केली आहे. यालाच जैविक तंत्रज्ञानाची क्रांती म्हणतात.

तेव्हा, गोऱ्या इंग्रजांनी केलेलं शोषण, त्यानंतर पन्नास वर्षे काळ्या इंग्रजांनी केलेलं शोषण, त्यामुळे आलेली विपन्नावस्था, त्यानंतर खुलीकरण व जागतिकीकरणाच्या वाऱ्यामुळे येऊ घातलेली खुल्या व्यवस्थेची पहाट आणि तिच्या स्वागतास तयार राहाण्याचे बळ देणारी जैविक तंत्रज्ञानातील क्रांती अशा तीन क्रांतीच्या पार्श्वभूमीवर 'देवकीचं हे आठवं बाळ' जन्माला येत आहे. म्हणजे शेतकरी संघटनेचे आठवं अधिवेशन भरते आहे.

या अधिवेशनात चर्चा करताना, पन्नास वर्षांत देशाची जी काही हलाखीची स्थिती झाली तिचा विचार करावा लागेल. त्याबरोबर, 'मरता क्या न करता' या उक्तीप्रमाणे समाजवादाला अखरेची घरघर लागल्यामुळे, या समाजवादी व्यवस्थेवर पुष्ट झालेले ऐतखाऊ घटक – नेता, तस्कर, गुंडा अफसर – व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर ताबा ठेवण्याचे प्रयत्न आता निकराने करू लागले आहेत. गूळ काळा झाला तरी बंदी आणि पिवळा झाला तर त्यात रसायनांची भेसळ केली म्हणून बंदी हे सरकारचं धोरण किंवा भूजल विधेयक, २००० हे त्याच प्रयत्नांचा भाग आहे, कर्नाटकातील आम जनतेच्या गळयातील ताईत असलेल्या राजकुमारला चंदनतस्कर वीरप्पन पळवून नेतो आणि या सरकारच्या पोलिसांना त्याची सुटका करता येत नाही. मात्र तेच पोलिस शेतकऱ्यांकडील वीजबिलांच्या वसुलीसाठी मोठ्या ताकदीने येतात, कर्जवसुलीसाठी घरावरील पत्रे उचकटून नेण्याची मर्दुमकी गाजवतात. याचा अर्थ आपल्याला आपल्या या आठव्या अधिवेशनात शोधावा लागेल. गुलामी आणू पाहाणारे लोक मोठ्या तडफेने काम करतात. दूरसंचार खात्याच्या कर्मचाऱ्यांनी खुलीकरणाच्या विरोधात सरकारला नमवले, बँक कर्मचारी असोत

की सरकारी नोकरदार असोत, त्यांनी संप केला तर सरकारला त्यांच्यासमोर नाक घासत जावे लागते आणि एक संप संपला की ते पुन्हा पुढच्या संपाच्या धमक्या देतच असतात. दुर्दैवाने, गुलामगिरीचे भोक्ते जितकी तडफ दाखवतात तितकी तडफ स्वातंत्र्याचे भोक्ते दाखवीत नाहीत. हे काय गौडबंगाल आहे यावरही या अधिवेशनात विचार करावा लागेल. आज, हातात 'लकडी' घेतल्याशिवाय सरकारची 'मकडी' वळत नाही असे सर्वत्र दिसत असताना आपल्यातला एखाद्या तरुण रक्ताच्या स्वातंत्र्याच्या भोक्त्याने हातात 'लकडी' घेण्याचा प्रस्ताव मांडला तर त्याला दोष देता येणार नाही. आपल्याला आतंकवाद्यांचे मार्ग अनुसरायचे नाहीत, तरीही आपले इप्तित, मग ते भले असो वा बुरे, साध्य करण्यासाठी ते ज्या हौतात्म्याची तयारी ठेवतात तशी तयारी शेतकऱ्यांनी ठेवली नाही तर शेतकऱ्यांच्या अजून कित्येक पिढ्या गुलामगिरीतच राहतील, त्यांना स्वातंत्र्य मिळण्याची काही शक्यता नाही.

या अधिवेशनात या साऱ्या गोष्टीवर चर्चा करताना शेतकरी संघटनेच्या मूळ विचाराला विसरून चालणार नाही. शेतकरी संघटनेने सुरुवातीला जेव्हा शेतीमालाच्या रास्त भावाची संकल्पना मांडली तेव्हा सर्व प्रस्थापित आणि इतर पक्षांच्या नेते मंडळींनी शेतकऱ्यांना फुकट बियाणी, खतांवर सबसिडी, कमी दरात कर्जे, वीज अशी विविध प्रलोभने दाखवून शेतकऱ्यांना शेतकरी संघटनेपासून दूर करण्याचा प्रयत्न केला. अगदी "तुमच्या घरावर सोन्याची कौलं बसवून देऊ फक्त शेतीमालाचा भाव मागू नका." इथपर्यंतही त्यांची मजल गेली असती तरी आश्चर्य वाटले नसते. "घरावर सोन्याची कौलं जरी घालून दिली तरी शेतीमालाला रास्त भाव न देणाऱ्या व्यवस्थेत ती कौलं तीन वर्षांच्या आत सावकाराच्या घरी गहाण पडतील." एवढेच सांगायचे त्यांनी टाळले. उलट, "आम्हाला कोणतीही मेहेरबानी नको, आम्हाला आमच्या घामाचं दाम मिळू द्या." अशी मांडणी करणारी आपली शेतकरी संघटना आहे. "शेतीमालाच्या भावात लूट करून आमची जितकी रक्कम घेऊन जाता तितकी तरी सबसिडी द्या." अशी विनवणी करणारी आपली शेतकरी संघटना नाही. "शेतकरी कर्जात बुडाला तरी चालेल, पण शेतकऱ्याच्या मुलाला दिल्लीच्या पंचतारांकित हॉटेलमध्ये जेवण स्वस्तात मिळू द्या." अशी अचरट मागणी करणारीही आपली शेतकरी संघटना नाही. शेतकरी संघटनेने शेतीत फायदा करून देऊ असं आश्वासनं कधीही दिलेलं नाही. शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन शेतकरी संघटनेच्या शपथेत आहे. "...शेतकऱ्यांना सन्मानाने जिणे जगता यावे याकरिता

शेतीमालाला रास्त भाव हा एककलमी कार्यक्रम...'' शेतीमालाला भाव हा उद्देश नसून 'शेतकऱ्यांना माणूस म्हणून जगता यावे' याचे ते साधन आहे. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव मिळू न देणारा समाजवादाचा पिंजरा मोडून पडला आहे. लुटीला सोकावलेले सर्व प्रस्थापित आणि लालचावलेले असंतुष्ट या पिंजऱ्याचा खिळखिळा झालेला डोलारा मोठ्या ताकदीचा आणि गोरगरिबांच्या कल्याणरक्षणाचा आव आणून सावरण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत. शेतकरी वाघांनी आणि विशेषत: त्यांच्या तरुण रक्ताच्या बछड्यांनी या पिंजऱ्याला निर्णायक धडक मारून त्यातून बाहेर येण्याची आणि स्वातंत्र्याच्या मोकळ्या हवेत श्वास घेण्याची हीच खरी संधी आहे.

*(४ सप्टेंबर २०००- शेतकरी संघटना कार्यकारिणी, सांगली - मिरज.)*

*(शेतकरी संघटक २१ सप्टेंबर २०००)*

■■

# सांगली-मिरज अधिवेशनाची विषयपत्रिका

**अधिवेशन : निर्णयप्रक्रियेची सर्वोच्च संस्था**

शेतकरी संघटनेसमोर एखादा प्रश्न उभा राहिला, शेतकऱ्यांच्या एखाद्या प्रश्नावर निर्णय घ्यायचा झाला म्हणजे आपण उच्चाधिकार समितीची बैठक घेतो. उच्चाधिकार समितीला जर वाटले की आपल्याला अधिकार दिलेले असले तरी निर्णय घेण्याआधी अधिक व्यापक चर्चा व्हायला हवी तर कार्यकारिणीची किंवा विस्तारित कार्यकारिणीची बैठक बोलावली जाते. प्रश्न त्याहीपेक्षा गंभीर असेल आणि कार्यकारिणीला वाटले की शेतकऱ्यांची व्यापक मान्यता मिळेल अशा तऱ्हेने विस्तृत चर्चा होऊनच निर्णय व्हायला पाहिजे इतका गंभीर प्रश्न पुढे आहे तर मग त्या विषयावर अधिवेशन बोलावले जाते. ही शेतकरी संघटनेची वर्षानुवर्षे चालत आलेली रीत आहे. अधिवेशनासाठी महाराष्ट्रभरच्या जिल्ह्या-जिल्ह्यातून शेतकरी संघटनेचे पाईक स्त्री-पुरुष जमतात, इतर राज्यांचे प्रतिनिधीही जमतात. या सर्वांसमोर विषयपत्रिकेतील विषयांवर सविस्तर चर्चा होते. त्यानंतर निर्णय घेतला जातो. निर्णय घेताना आपण मतदान घेत नसलो तरी इतक्या मोठ्या जनसमुदायाच्या साक्षीने झालेल्या चर्चेचे सार काढून, चर्चेच्या वेळी समुदायाने दिलेल्या अनुकूल-प्रतिकूल प्रतिसादाची नोंद घेऊन, निर्णय घेतले जातात आणि ते अधिवेशनाच्या अखेरी होणाऱ्या खुल्या अधिवेशनात जाहीर केले जातात.

शेतकरी संघटनेच्या आजपर्यंतच्या अधिवेशनांकडे मागे वळून पाहिलं तर शेतकरी संघटनेने हा रिवाज किती काटेकोरपणे पाळला आहे आणि त्या त्या वेळी घेतलेले निर्णय आणि आखलेले कार्यक्रम त्या त्या काळच्या परिस्थितीशी किती अनुरूप होते हे ध्यानात येईल.

शेतकरी संघटनेचे पहिले अधिवेशन १९८२ मध्ये सटाणा येथे झाले. त्या आधी दोन वर्षे शेतकरी संघटनेची आंदोलने सुरू होती. चाकणच्या कांदा

आंदोलनाने शेतकरी संघटनेचे महाराष्ट्रात नाव झाले, पाठोपाठ नाशिकचे कांदा-ऊस आंदोलन झाले, त्यातील रास्ता रोको, रेल रोको यामुळे शेतकरी संघटनेचे नाव साऱ्या देशभर पोहोचले. सगळीकडे चर्चा सुरू झाली. कोण करतं हे आंदोलन? शेतकरी संघटनेचे नेमके स्वरूप काय आहे? यात फक्त बागायतदार शेतकरी आहेत का छोटे शेतकरीही आहेत? यांची नेमकी मागणी काय आहे - नुसती रास्त भावांची आहे का आणखी काही उद्देश आहे? काही सामाजिक बांधिलकी आहे का? या संघटनेची राजकीय भूमिका काय असेल? असे एक ना अनेक - नाना प्रश्न चर्चेत येऊ लागले. साहजिकच कार्यकर्त्यांना या प्रश्नांची मुद्देसूद उत्तरे देण्याची तयारी होण्याची आवश्यकता भासू लागली. त्यामुळे, सटाण्याला झालेले पहिले अधिवेशन हे शेतकरी संघटनेचे स्वरूप अधिकृतपणे स्पष्ट करणारे अधिवेशन ठरले. मोठे अद्भुत अधिवेशन झाले. दहा हजार प्रतिनिधींसमोर चर्चा झाली आणि शेवटी प्रचंड खुले अधिवेशन झाले. अधिवेशन इतके परिणामकारक झाले की महाराष्ट्रातले कित्येक कार्यकर्ते अधिवेशनातून परतल्यानंतर स्वत:ला मोठ्या अभिमानाने 'सटाणा पागल' म्हणवून घेऊ लागले; इतके ते सटाणा अधिवेशनातील चर्चा ऐकून प्रभावित झाले होते. इतकी वर्षे शेतात राबून भरभरून पिकं काढली, वाढत्या मानानं काढली, वाणं बदलून काढली तरी वर्षावर्षाला कर्जाचा बोजा वाढतच जातो याची उकल होत नव्हती ती सटाणा अधिवेशनाच्या चर्चांतून अनेकांना झाली.

पुढे मग, कांदा-ऊस आंदोलनानंतर 'दूधभात' आंदोलन झालं आणि शेतकरी संघटनेने मोठी उडी मारली आणि महाराष्ट्राबाहेर जाऊन मध्यप्रदेश, गुजरात, पंजाब, हरयाना, कर्नाटक या राज्यांतसुद्धा तेथील शेतकऱ्यांच्या प्रमुख संघटनांनी शेतकरी संघटनेचा अर्थविचार स्वीकारला. त्यांची एक आंतरराज्य समन्वय समिती तयार झाली. त्यावेळी एक मुद्दा पुढे आला की कांद्याचं आंदोलन झालं, उसाचं आंदोलन झालं, दुधाचं झालं, भाताचं झालं. हे असं किती दिवस चालायचं? कारण, भारतभरचे शेतकरी कितीतरी वेगळीवेगळी पिकं काढतात. त्यावेळी एक गोष्ट प्रकाशात आली की देशातले शेतकरी विविध प्रकारची पिकं घेतात असं दिसतं; कुणी ऊस लावतो, कुणी गहू पेरतो, कुणी भात पेरतो, कुणी कांदा काढतो असं दिसायला वेगवेगळी पिकं दिसतात. वेगवेगळ्या भागातल्या शेतकऱ्यांची पेरणी किंवा लागवड वेगळी वेगळी पण शेवटी सगळ्यांच्या हाती खऱ्या अर्थी जे पीक येतं ते एकच असतं - कर्ज. त्यामुळे मग, परभणी येथील अधिवेशनात (१९८४) एक वर्षभर सर्व सरकारी देणी न देण्याचा ठराव झाला, पुढारी आणि कर्जवसुली अधिकाऱ्यांना गावबंदी करण्याचा कार्यक्रम आखला गेला आणि एक

अर्थाने, कर्जमुक्ती आंदोलनाची सुरुवात झाली.

धुळ्याला तिसरे अधिवेशन (१९८५) झाले. महाराष्ट्रात निवडणुका जाहीर झाल्या होत्या, त्यावेळी शेतकरी संघटनेची राजकीय भूमिका ठरविण्यासाठी ते आंदोलन झालं.

नागपूरचं अधिवेशन (१९९४) खुली अर्थव्यवस्था सुरू झाल्यानंतर आलेल्या निवडणुकांसाठी शेतकरी संघटनेची भूमिका ठरविण्याकरिता झालं. त्याआधी नांदेड येथे झालेले चौथे अधिवेशन (१९८९) आणि औरंगाबाद येथे झालेले पाचवे अधिवेशन (१९९३) ही दोन्ही, नेहरूप्रणीत समाजवादी बंदिस्त अर्थव्यवस्था आणि खुली अर्थव्यवस्था यांच्या उंबरठ्यावर झाली. अधिवेशन हे निर्णय घेणारं सर्वोच्च व्यासपीठ आहे.

अशा तऱ्हेनं, शेतकरी संघटनेचं प्रत्येक अधिवेशन हे विशिष्ट परिस्थिती निर्माण झाल्यानंतर निर्णयप्रक्रियेत व्यापकता यावी यासाठीच भरवले गेले आणि त्यादृष्टीने ते यशस्वीही झाले आहे.

सांगली-मिरजमध्ये शेतकरी संघटनेचे आठवे अधिवेशन ११ व १२ नोव्हेंबर २००० रोजी होत आहे. या अधिवेशनाची विषयपत्रिका काय असावी? आज भारतीय शेतकऱ्यासमोर कोणते गंभीर प्रश्न उभे आहेत?

**शेतकरी संघटनेची राजकीय भूमिका**

आज सगळीकडे चर्चा सुरू आहे की या अधिवेशनाच्या वेळी शेतकरी संघटना कोणत्या ना कोणत्या पक्षात विलीन होऊन जाणार आहे. वर्तमानपत्रातून चर्चा सुरू आहे की १९८० साली मोठ्या जोशात सुरू झालेली शेतकरी संघटना आता ऑफस झाली आहे. ती कोणत्यातरी पक्षात विलीन होणे आता अपरिहार्य आहे. मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की शेतकरी संघटना इतर कोणत्या पक्षामध्ये सामील करण्याविषयी चर्चा करण्याचा मसुदा असण्याची काहीही शक्यता नाही. शेतकरी संघटनेची राजकीय भूमिका सटाण्याच्या पहिल्याच अधिवेशनातील ठरावाने पक्की झाली आहे आणि आजतागायत ती त्या ठरावाशी नेहमीच सुसंगत राहिली आहे. कोणत्याही पक्षाचं सरकार असो, ते शेतकऱ्याच्या बाजूचं कधी असत नाही – काँग्रेसचं असो, भाजपाचं असो, शिवसेनेचं असो की आणखी दुसऱ्या कोणत्या पक्षआघाडीचं असो. आज दिल्लीमध्ये ज्या पंतप्रधानांच्या निमंत्रणाला मान देऊन मी कृषि कार्यदलाचं अध्यक्षपद स्वीकारलं आहे त्यांच्या पक्षाची धोरणंसुद्धा शेतकऱ्यांच्या बाजूची आहेत असं म्हणणं अशक्य आहे. आज पंजाबहरयानामध्ये सरकार भाताची खरेदी करीत नाही, भात गुणवत्तेत कमी आहे असं हे सरकार त्यासाठी कारण पुढे करीत आहे. महाराष्ट्रातही सोयाबीन,

सूर्यफूलबी यांची हीच परिस्थिती आहे. मी त्या सरकारबरोबर कृषिकार्यदलाचं काम करतो म्हणून त्यांच्या धोरणाची वाखाणणी करण्याचं काही कारण नाही. युद्धात काही लोक सैन्यात राहून काम करतात, काहींना तुरुंगात जाऊन काम करावं लागतं तसं मी कृषिकार्यदलाचा अध्यक्ष होऊन शेतकरी संघटनेचा पाईक म्हणूनच काम करीत आहे. तेव्हा आपला जो सटाण्याचा ठराव आहे – ''शेतकरी आंदोलन अधिक प्रभावी होईल अशा प्रकारचं धोरणं त्या त्या वेळची परिस्थिती पाहून ठरवावं.'' त्यानुसार या अधिवेशनात पुढील काळासाठी राजकीय धोरण ठरवावं लागेल. हे ठरवत असताना शेतकरी संघटनेची ताकद काय आहे याचाही आढावा घ्यावा लागेल. आजच्या बैठकीत वेगवेगळ्या भागातील कार्यकर्त्यांनी जो आढावा घेतला त्यावरून, कोणी कितीही म्हणत असले की शेतकरी संघटना संपली तरी विदर्भातील नागपूर, यवतमाळ, अमरावती, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये आणि सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये पूर्वीच्या काळीही जितक्या उत्साहाने माणसे आंदोलनात आली नाहीत तितक्या उत्साहाने आज येत आहेत, नवीन नवीन माणसे येत आहेत, तरुण येत आहेत. म्हणजे शेतकरी संघटनेची आंदोलनाची ताकद दिवसेंदिवस वाढतच आहे. ही ताकद दुसऱ्या कोणाच्या हाती देण्याचा काहीच प्रश्न उद्‌भवत नाही.

**कापूस, कांदा, ऊस – परिस्थिती**

काही पिकांच्याबद्दल या अधिवेशनात आपल्याला विशेष चर्चा करावी लागेल. महाराष्ट्राचा विचार करता कापूस, कांदा आणि ऊस या तीन पिकांबद्दल विशेष चर्चा करून त्यावेळी जी काही परिस्थिती असेल त्यानुसार आंदोलनाचा कार्यक्रम आखावा लागेल.

पन्नास वर्षे झाली देश स्वतंत्र होऊन. या पन्नास वर्षात शेतकऱ्याचं शोषण झालं. जमिनी नापीक झाल्या, जमिनीतील पाणी खोल खोल गेलं, शेतीची जनावरंसुद्धा पूर्वीच्या ताकदीची राहिली नाहीत, कर्जाचा बोजा वाढत गेला आणि शेतकऱ्यांना विष पिऊन मरण्यापलीकडे गत्यंतर राहिलं नाही. एकीकडे शेतकऱ्यांची अशी परिस्थिती झाली असताना ही परिस्थिती ज्या समाजवादी व्यवस्थेने केली ती व्यवस्थाही जगभर कोसळून पडली आहे. सगळं जग नियोजनाच्या ऐवजी 'ज्याचा त्याचा माल ज्याला त्याला पाहिजे तेथे, पाहिजे तसा विकण्याची मुभा असेल' अशा खुल्या बाजारपेठेच्या व्यवस्थेचा स्वीकार करू लागलं आहे. आपल्याकडे या परिस्थिती संदर्भात महत्त्वाचा फरक जाणवतो. आपण १९८० साली लढाई सुरू केली. आम्ही मांडणी केली की, ''आम्हाला देणारा 'वर' आहे, एका दाण्याचे शंभर दाणे 'तो' करतो, आम्हाला कोणाकडूनही सूट–

सब्सिडीची गरज नाही; आम्ही शिवारातून बाजारात जाताना आम्हाला जे वाटेत लुटता ते लुटणं बंद करा, बाजार मोकळे करा, बाजारात जी किंमत मिळेल ती फक्त आम्हाला मान्य असेल, बाजारात किंमत ठरवताना सरकारने हात घातलेला असता कामा नये.'' गेली वीस वर्षे आपण अशी मागणी करीत आहोत.

आपल्या या मागणीचा, समाजवादी नियोजनव्यवस्थेच्या पतनाच्या रूपाने, जगभर विजय झाला; पण आपली भारतीय शेतकऱ्यांची अवस्था अशी झाली आहे की 'दात होते तेव्हा चणे नव्हते आणि आता चणे मिळताहेत पण दात नाहीत!' सगळ्या भारतातील शेतकऱ्यांची परिस्थिती आज अतिशय विचित्र झाली आहे. आतापर्यंत भारतातील शेतकऱ्यांच्या उत्पादनाचे भाव जगातील शेतकऱ्यांच्या उत्पादनांच्या भावांपेक्षा कमी होते; म्हणजे, हिंदुस्थान सरकार शेतकऱ्यांना उणे सबसिडी देत होते. आता, जगात नवीन तंत्रज्ञानाच्या आधाराने शेती होऊ लागल्याने इतिहासात पहिल्यांदा असे घडते आहे की भारतातील शेतीमालाचे भाव जगातील इतर देशातील शेतकऱ्यांच्या शेतीमालांच्या भावांपेक्षा जास्त होऊ लागले आहेत. न्यूझीलंडमधील शेतकऱ्याला त्यांच्याकडील उत्कृष्ट प्रतीची सफरचंदे हिंदुस्थानातील बाजारात आणून विकणे शक्य होत आहे आणि आपल्याकडील सफरचंदे त्यांच्याशी स्पर्धा करू शकत नाहीत. परदेशात कपाशीची उत्पादकता वाढली, प्रत सुधारली, खर्च कमी झाला. हा कापूस जर का हिंदुस्थानात येऊ लागला तर येथील कापूसउत्पादकांची परिस्थिती अधिकच बिकट होईल. म्हणजे, आम्ही जी खुली बाजारपेठ मागत होतो ती येते आहे, पण त्या खुल्या बाजारपेठेच्या स्पर्धेत आम्ही भाग घेऊ शकत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

या स्पर्धेत आम्ही भाग घेऊ शकत नाही याला काही अडचणी कारणीभूत आहे. या अडचणी कायमच्या नाहीत, तात्पुरत्या आहेत, दूर करता येण्याजोग्या आहेत. आपल्या देशात सूर्यप्रकाश नसता तर ती कायमची अडचण झाली असती, आपल्या देशात पाणी कमी असतं तर ती कायमची अडचण झाली असती, आपल्या देशातील शेतकरी बिनडोक असता तर ती कायमची अडचण झाली असती; पण ज्या देशात सूर्यप्रकाश अमाप आहे, ज्या देशातील अनेक नद्या पाण्याने भरभरून वाहत आहेत आणि ज्या देशातील शेतकऱ्यांनी इतकं शोषण सोसूनसुद्धा देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी केलं त्या देशाला कायमची अडचण कोणतीही असू शकत नाही. अखेरचा विजय हा हिंदुस्थानच्या शेतकऱ्याचाच होणार आहे. खुल्या बाजारपेठेचं तत्त्वज्ञान आणि भारतीय शेतकऱ्याचं सामर्थ्य यांचा मिलाफ एक दिवस होणार आहे. तो दिवस येईपर्यंत काही काळ

आपल्याला वनवासात काढावा लागणार आहे.

या वनवासाच्या काळात आपण काय भूमिका ठेवायची हा महत्त्वाचा प्रश्न आहे. या काळात खुल्या व्यवस्थेचे विरोधक ओरड करणार आहेत की खुली बाजारपेठ आली तर परदेशी/बहुराष्ट्रीय कंपन्या येतील आणि शेतकरी बुडून जाईल. याच विरोधकांनी, गेली पन्नास वर्षे हिंदुस्थान सरकार शेतकऱ्यांना लुटत आहे याबद्दल कधी अवाक्षरही काढलं नाही. आमची एका गोष्टीबद्दल खात्री आहे कोणतीही बहुराष्ट्रीय कंपनी बाहेरून महाग किमतीचा गहू घेऊन तो हिंदुस्थानात आणून स्वस्तात विकण्याचा 'अव्यापारेषु व्यापार' करणार नाही; असला मूर्खपणा फक्त हिंदुस्थान सरकारच करू जाणे! तेव्हा, काही झालं तरी, खुलेपणाची व्यवस्था ही सरकारी नियोजनाइतकी वाईट असू शकत नाही. खुल्या बाजारामध्ये कधी पैसे मिळतील, कधी मिळणार नाहीत ही गोष्ट खरी. ज्या वर्षी कमी पैसे मिळतील त्यावर्षी खुली बाजारपेठ वाईट आणि जेव्हा पैसे चांगले मिळतील तेव्हा ती चांगली असे म्हणण्याची बुद्धी खोटी. खुल्या बाजारपेठेत कधी फायदा तर कधी तोटा होणारच आहे; पण समाजवादी नियोजनव्यवस्थेत 'ओली पडो, का सुकी पडो' शेतकऱ्यांचा आणि उद्योजकांचा तोटाच तोटा होतो, तूट असेल तर लेव्हीच्या रूपाने लूट होणार आणि मुबलक पिकलं तर लिलावाच्या बाजारात वाऱ्यावर सोडलं जाणार हा अनुभव आपण गेली पन्नास वर्षे अनुभवतच आहोत. तेव्हा या अधिवेशनात आपल्याला या विषयावर चर्चा करायला हवी की हिंदुस्थानातील शेतकरी सध्याच्या परिस्थितीत, सगळ्या अडचणी लक्षात घेता खुल्या बाजारपेठेच्या तत्त्वज्ञानाला चिकटून राहणार का त्याबद्दल काही फेरविचार करणार आहे? फेरविचार करायला काही हरकत नाही, पण त्यालाही काही मर्यादा हव्यात. आपद्धर्म म्हणून काही तडजोडी कराव्या लागणार असल्या तरी तो काही मनुष्याचा कायमचा धर्म ठरत नाही.

भारतीय शेतकऱ्यापुढे, खुल्या बाजारपेठेतील स्पर्धेत उतरण्याच्या आड ज्या काही अडचणी आहेत त्या ओलांडून जाण्यासाठी काही तरी मार्ग काढला पाहिजे. तिरुपती येथे गेल्या फेब्रुवारीमध्ये झालेल्या मेळाव्यात आपण मांडणी केली की गेल्या पन्नास वर्षांत 'इंडिया'ने भारताची जी काही लूट केली तिची भरपाई करण्याकरिता, शेतकऱ्याला जागतिक खुल्या बाजारपेठेत उतरता यावे या दृष्टीने संरचना उभी करण्यासाठी सरकारने मदत केली पाहिजे. किंबहुना, सरकारने बाजारपेठेतील आपला हस्तक्षेप थांबवला तरी अशा संरचना आपल्या आपण उभ्या करणे शेतकऱ्यांना शक्य होईल; पण काही गोष्टी सरकारच करू शकतं. उदाहरणार्थ, सोयाबीनचं किंवा अन्य चांगल्या प्रतीचं खाद्यतेल किंवा डाळी वगैरे

माल स्वस्तात आयात होत असला आणि ग्रहकाला तो स्वस्तात मिळणार असेल तर शेतकऱ्यांनी त्याला विरोध करणे चूकच होणार आहे. कारण, शेतकऱ्याला ग्रहकांवर अन्याय करण्याचा अधिकार नाही. 'ग्रहक नाडला गेला तरी चालेल पण आमचा फायदा झाला पाहिजे' असं म्हणणाऱ्या कारखानदारांप्रमाणे शेतकरी काही दुष्ट नाही. ग्रहकांना आम्ही विनंती करू की गेली पन्नास वर्षे आम्ही तुमच्यासाठी सहन केलं, आता फक्त पाच वर्षे आम्हाला संधी द्या आणि पाहा आम्ही काय चमत्कार करून दाखवतो ते!

तेव्हा शेतकरी संघटनेचा 'शेतकऱ्यांना सन्मानाने जगता यावे याकरिता शेतीमालाला रास्त भाव हा एककलमी कार्यक्रम' यात काही फरक नाही. कोणासमोर तोंड वेंगाडणार नाही, कोणासमोर भीक मागणार नाही, कोणाकडे सब्सिडी मागणार नाही; पण संधी मिळाली म्हणजे भारतातील शेतकरी इतर राष्ट्रांतील शेतकऱ्यांपेक्षा काही कमी नाही हे सिद्ध करून दाखवील, भले त्याच्याकडे आधुनिक हत्यारे नसतील, आधुनिक तंत्रज्ञान नसेल. आमच्याकडे काही कमी असेल तर तो कमीपणा लपवून ठेवणार नाही; जे काही आमच्याकडे नाही ते आम्ही दुसऱ्यांकडून शिकून घेऊ. इंग्रज जेव्हा आले तेव्हा जोतिबा फुल्यांनी म्हटले होते की त्यांच्या येण्यामुळे या देशातील सर्व जातिजमातींच्या मुलांना शिकण्याची पहिल्यांदा संधी मिळाली. आज भारतीय शेतकऱ्यांची मागणीही तशीच आहे. आपल्या देशातील जे कोणी विद्वान आहेत, शास्त्रज्ञ आहेत ते भाकड झाले आहेत. ते काही स्वतंत्र संशोधन करीत नाहीत. जे काही संशोधन होतं ते तिकडं परदेशात होतं – मग ते संशोधन औषधाचं असो, बियाण्यांचं असो का कॉँप्युटरचं. आमच्या देशातले शास्त्रज्ञ फक्त झारीतील शुक्राचार्याप्रमाणे हे संशोधन आम रयतेपर्यंत पोहोचू नये म्हणून अडवून धरतात आणि अगदीच नाईलाज झाला म्हणजे त्या संशोधनाची 'इंडियन' नक्कल भारतीय रयतेच्या माथी मारतात. आमची मागणी अशी आहे की दरवाजे उघडा आणि मूळ अस्सल संशोधनाशी, तंत्रज्ञानाशी आम्हाला संपर्क साधू द्या.

**नव्या बियाण्यांचे शास्त्र**

बियाण्यांच्या शास्त्रामध्ये एक क्रांती घडत आहे. बियाण्यांच्या या नवीन शास्त्राबद्दल ज्यांचा काहीही अभ्यास नाही अशी माणसं या बियाण्यांबाबतही मोठा ओरडा करीत आहेत. या बियाण्यांचे भाव भयंकर आहेत, या बियाण्यांबरोबर काय रोगराई येईल सांगता येत नाही, मागे जसं कॉँग्रेस गवत आलं तसं याबरोबर काय येईल सांगता येत नाही असं म्हणत या नवीन बियाण्यांबद्दल ही मंडळी मोठा बागुलबुवा उभा करीत आहेत. पण बियाण्यांचं हे नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी

स्वीकारले नाही तर येत्या वीस वर्षांमध्ये मनुष्यजातीला जेवू घालणं अशक्य होईल. २०२० साली जी काही लोकसंख्या होईल तिला पुरेसं अन्नधान्य तयार करायचं असलं तर 'देवा'नं दिलेल्या बियाण्याच्या वाणानं हे काम होणार नाही. तेव्हा हे जे काही नवीन बियाणं तयार होत आहे ते वापरण्याची तयारी करावी लागेल; ते काही आंधळेपणाने घ्यायचं नाही; तपासून, पारखून स्वीकारायचं आहे. असं तपासून पारखून घेण्याचा अधिकारसुद्धा शेतकऱ्याला पाहिजे; कुणीतरी दिल्लीतल्या वातानुकूलित खोलीमध्ये बसून हे ठरवून चालणार नाही. या नवीन तंत्रज्ञानाची तपासणी करून त्याचा लाभ कसा घेता येईल यावरही या अधिवेशनात विचार करावा लागेल.

सारांश, सद्यःस्थितीत शेतकरी संघटनाची राजकीय भूमिका, महाराष्ट्रातील कापूस, कांदा, ऊस या पिकांची परिस्थिती आणि गेल्या पन्नास वर्षांच्या शोषणानंतर समोर आलेल्या जागतिकीकरण आणि नवीन तंत्रज्ञान यांच्या आवाहनाबद्दल शेतकरी चळवळीची भूमिका काय असावी यावर सांगलीच्या या अधिवेशनात विस्ताराने चर्चा व्हायला हवी.

*(१४ ऑक्टोबर २०००- शेतकरी संघटना विस्तारित कार्यकारिणी, सांगली.)*

*(शेतकरी संघटक २१ ऑक्टोबर २०००)*

■■

# गुलामगिरीकडे आता पुन्हा जाणे नाही

माझी खात्री आहे की काही वर्षे जातील आणि स्वातंत्र्याच्या सूर्याला घाबरणाऱ्या घुबडांचे दिवस संपतील आणि त्यावेळी आपलीच नातवंडे आपल्याला विचारायला लागतील की, हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांनी 'हातामध्ये आता पुन्हा बेड्या घालायच्या नाहीत, स्वतंत्र व्हायचे' असे ज्यात ठरवले त्या सांगली-मिरजच्या अधिवेशनाला तुम्ही खरेच हजर होता? अशा जागी तुम्ही सर्व उपस्थित आहात, मलाही हजर राहण्याची संधी लाभली हे केवढे मोठे भाग्य!

**नाना पाटील आणि म. फुले**

अधिवेशनाच्या या नगराचे नाव 'क्रांतिसिंह नाना पाटील नगर' आणि जेथे थोडे दिवस प्रतिनिधी अधिवेशन चालले त्याचे नाव 'महात्मा जोतिबा फुले सभागृह'. या नामकरणात चांगला संयोग साधला आहे. १९४२ साली महात्मा गांधींनी इंग्रजांना 'चले जाव' म्हटले आणि तरुणांना सांगितले की, 'करा किंवा मरा; यापुढे गुलामगिरी स्वीकारू नका.' सगळे नेते तुरुंगात गेले, गांधीजी तुरुंगात गेले. लोकांपुढे कोणी मान्यवर नेता बाहेर राहिला नाही अशा वेळी सातारा जिल्ह्यामध्ये शेती करता करता शड्डू ठोकून पहिलवानी करणारी काही तरुण पोरे एकत्र झाली आणि सातारा जिल्हातरी इंग्रजांपासून स्वतंत्र झाला अशी परिस्थिती करून टाकली, जिल्ह्यातील इंग्रजांचे राज्य संपवून टाकले. त्या तरुणांचे नेतृत्व करणाऱ्या नाना पाटलांचे नाव शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याची घोषणा करणाऱ्या या नगराला देण्यात मोठे औचित्य साधले आहे.

सभागृहाला म. जोतिबा फुल्यांचे नाव देण्यात आले आहे. इंग्रज आल्यानंतर पहिल्यांदा शेतकऱ्यांसाठी तलवार हाती घेऊन येणारा हा तरुण. ते म्हणायचे, 'इंग्रज हिंदुस्थानात आले आहेत हे खरे आहे. त्यांच्या येण्याने आपले स्वातंत्र्य हिरावून घेतले असले तरी त्यांच्या येण्याने एक थोडासा चांगला भागही साधला आहे. इतके दिवस आपल्या संस्कृतीमध्ये – 'भटशाही'मध्ये शूद्रांना शिकायचा

अधिकार नाही, येथील ग्रंथ वाचायची परवानगी नाही, परदेशात काय ज्ञान आहे त्याचा तर संबंधही येऊ देत नाहीत. अशा तऱ्हेने सर्वत्र भिंती बांधलेल्या, हात बांधलेले, पाय बांधलेले अशा गुलामगिरीच्या अवस्थेत आपण होतो. इंग्रज आले, त्यांनी शाळा काढल्या. शूद्रांची, अतिशूद्रांची मुलेसुद्धा शाळेत जाऊ लागली. थोडे थांबा. ती मुले शहाणी होऊ द्या. ती शहाणी झाली की मग सगळा देश एकत्र होईल, 'एकमय' होईल. मग, आपण इंग्रजांच्या विरुद्ध 'एक राष्ट्र' म्हणून लढू शकू.' हा संदेश त्यांनी दिला. जोतिबांचे दुर्दैव असे की त्यांना 'नाना पाटील' भेटला नाही. जोतिबांची परिस्थिती राष्ट्रवाद्यांपुढे अशी झाली की पुण्याच्या म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीत त्यांना अवघी तीन मते मिळाली. जर का एका काळी जोतिबा फुले आणि नाना पाटील म्हणजे जोतिबांचा विचार आणि नाना पाटलांची धडाडी एकत्र झाले असते तर काय झाले असते या प्रश्नाचे उत्तर या पुढचा काळ देणार आहे असे आज या अधिवेशनास हजर असलेल्या शेतकऱ्यांच्या संख्येवरून आणि त्यांच्यातील जोशावरून दिसते.

**शेतीचा इतिहास**

अधिवेशनाचा विषय फार मोठा आहे. हल्ली सगळ्याच पक्षसंघटना 'ऐतिहासिक' हा शब्द इतक्या वेळा नुसताच वापरतात की त्याचा अर्थच हरवून बसला आहे. आपले हे अधिवेशन ऐतिहासिक कसे ठरणार आहे?

फार वर्षांपूर्वीची म्हणजे हजारो वर्षांपूर्वीची गोष्ट. मनुष्य जंगलात फिरत होता. जंगलात फिरता फिरता जी काही शिकार मिळेल ती खावी, जी काही कंदमुळे मिळतील ती खावी, जो काही निवारा मिळेल तेथे रात्र काढावी असे वन्य प्राण्यांसारखे जीवन मनुष्य टोळ्या करून जगत होता. संस्कृतीच्या इतिहासात याला 'अन्नचयन युग' म्हणतात.

मनुष्याला या वणवणीतून मायबहिणींनी सोडविले. पुरुषांनी शिकार करून किंवा गोळा करून आणलेल्या अन्नाचे वाटणीचे काम स्त्रियांकडे होते. याचा पुरावा जुन्या ग्रंथांमधून मिळतो. वाटणीचे काम करण्याची जबाबदारी असलेल्या व्यक्तीची परिस्थिती काय असते हे मायबहिणींना चांगले अनुभवायला मिळते. सगळ्यांना वाढून झाल्यानंतर जेव्हा बाईची जेवायची वेळ येते तेव्हा जे काही उरले सुरले असेल ते खाऊन कदाचित् बाईला अर्धपोटीच झोपायला लागते. अशाच अर्धपोटी झोपावे लागलेल्या आपल्या एखाद्या खापरखापर... आजीपणजीच्या लक्षात आले असावे की आपल्या आजूबाजूला जे काही गवत वाढते त्याला जे दाणे लागतात ते चावून खाल्ले तर पोट भरते. अन्नधान्याचा शोध लागला, ते अन्नधान्य जमिनीत टाकले तर त्यातून रोप उगवते आणि त्याला पुन्हा दाणे

लागतात हे कळले आणि मनुष्याला शेतीचा शोध लागला. हा शोध पुरुषांनी नाही, स्त्रियांनी लावला.

सुरुवातीला जमिनीची मशागत म्हणजे काठीने जमीन उकरणे एवढेच बाया करायच्या. त्यामुळे फारसे पीक येत नसे. मग, पुरुषांनी जमीन उकरण्यासाठी नांगर आणि नांगराला बैलासारखा शक्तिशाली प्राणी जोडण्याची कला शोधून काढली. अशा तऱ्हेने जमीन नांगरली म्हणजे अमाप पीक येते याचा शोध मनुष्याला लागला; म्हणजे मनुष्याने नवीन तंत्रज्ञानाचा शोध लावून त्याचा वापर केला आणि 'अन्नासाठी दाही दिशा' अवस्थेतून स्वतःची सुटका करून घेतली. खळ्यामध्ये धान्याची रास तयार होऊ लागली, उद्याची भ्रांत संपलीच, पण वर्षभर धान्य वापरूनसुद्धा उरू लागले. शेतीत बचत (surplus) तयार झाली.

**बचतीतून भांडवल**

मग, चौघा भावांच्या लक्षात आले की आता चौघांना अन्न तयार करण्यासाठी सगळ्यांना शेतीत कष्ट करण्याची गरज नाही. मग त्यांनी असे ठरवले की एका भावाने जंगलात जाऊन लाकडे तोडावीत आणि सगळ्यांना राहाण्यासाठी, थंडी, वारा, उन, पाऊस यांपासून सर्वांचे संरक्षण करण्यासाठी घर बांधावे. तीन भाऊ शेतीत राहिले, चौथ्याने जंगलात जाऊन लाकडे तोडून आणून घर बांधले, त्याच्या अन्नाची व्यवस्था शेतीतील तीन भावांनी केली. निसर्गातील संकटांपासून संरक्षण मिळाल्यामुळे त्यांना तोंड देण्यात खर्ची पडणाऱ्या शक्तीची बचत झाली आणि पुढच्या काळात शेतीतील पीक आणखी वाढले. मग, आणखी एक भाऊ नव्या बचतीच्या आधारे शेतीतून बाहेर पडला आणि त्याने झाडांच्या साली आणि कापसासारख्या तंतुंपासून शरीराचे एरवीही रक्षण करणारी वस्त्रे शोधून काढली....

अशा तऱ्हेने एकदा पोटाचा प्रश्न सुटला की माणसाची प्रगती व्हायला लागते. घराची व्यवस्था झाली, कपड्यांची व्यवस्था झाली असे करता करता डोक्यावर फिरणारा पंखा, आकाशात उडणारे विमान, सर्व येणारा कॉम्प्युटर या सर्व गोष्टी होण्यामागचे मूळ कारण म्हणजे मनुष्याने अन्नासाठी 'दाही दिशा' फिरण्याचे सोडून शेती करून अन्नधान्याची रास तयार करायला सुरुवात केली हे होय. शेतीचा शोध लागला म्हणून मनुष्याची प्रगती झाली, म्हणून जगाची प्रगती झाली. म्हणजे, शेतीतच मनुष्याच्या प्रगतीचा उगम आहे.

**लुटीची व्यवस्था**

दुर्दैवाने, ही प्रक्रिया काही सातत्याने सुखांतपणे चालत राहिली नाही. शेतकऱ्याला वाटले की आता चिंताच नाही. शेतकऱ्याला वाटले की आता पीक घ्यायचे आणि प्रगती करायची, आणखी पीक घ्यायचे आणि आणखी प्रगती करायची. त्यांच्या

आजूबाजूला दुसरे काही लोक होते ज्यांना अजून शेतीचे ज्ञान अवगत झाले नव्हते, ते यांच्याकडे अचंब्याने पाहत होते. 'हे काय चमत्कार करीत आहेत? आयती शिकार चालून आल्यावर जितकी मौज होत नाही तितकी मौज या शेतकऱ्यांची दिसते आहे.' त्यांनी असा विचार केला की यांच्या खळ्यावर धान्य साठले की आपण दोनचार जणांनी दांडुके घेऊन जायचे आणि धान्य घेऊन यायचे, धान्य घेताना शेतकऱ्यांनी जर विरोध केला तर दांडुक्यांनी त्यांना हाणायचे आणि धान्य काढून घेऊन यायचे. धान्याची रास खळ्यात उभी करण्याचे शेतकऱ्याचे काम चारसहा महिन्यांचे आणि ते हस्तगत करण्याचे या लुटारू दरोडेखोरांचे काम चार तासांचे.

काम इतके सोपे झाले म्हणजे त्या कामाची मागणी खूप वाढते. दुधासाठी गाईम्हशी ठेवल्या तर पोराच्या ओठाला लावण्याइतपतही दूध घरी उरत नाही. त्यामुळे आम्हाला गाईम्हशी द्या असे कोणी म्हणत नाहीत. पण दुधाची सोसायटी काढली म्हणजे एका वर्षात माडी होते त्यामुळे जो तो दूध सोसायटी काढण्याची धडपड करतो. तसेच, त्याकाळीही शेती करण्याचा प्रयत्न करणारांवर, शेतीतील पीक लुटणाऱ्या लुटारूंचे राज्य सुरू झाले.

हा इतिहास आहे. हे लुटारू पहिल्यांदा दोन-चार-पाच होते, पाचाचे पन्नास झाले, असे वाढता वाढता लुटारूंच्या असे लक्षात आले की हे जर का असेच चालत राहिले तर शेती कोणी करणारच नाही. मग त्यांनी नियम तयार केले. कुणब्याच्या पोरांनी शेतीच केली पाहिजे, दुसरे काही करता कामा नये, वगैरे वगैरे नियम तयार झाले. म्हणजे जातीची भिंत घालून टाकली. अशा भिंतीभिंतीत शेतकऱ्यांना कोंडले. शेतकऱ्यांनी कोणते बियाणे वापरायचे ते त्यांनी नाही ठरवायचे, जे पणजोबांनी वापरले तेच वापरायचे, आपली अक्कल वापरायची नाही. अशा तऱ्हेने शेतकरी गुलामीत पडला. कारण, जसे पोपट गोड गोड बोलून करमणूक करतो म्हणून त्याला पिंजऱ्यात कोंडतात, कावळ्याला कोणी पिंजऱ्यात ठेवीत नाही तसेच शेतकरी एका दाण्याचे शंभर दाणे करतो म्हणून त्याला गुलामीत ठेवण्यात आले.

**ही जुनी कहाणी आहे.**

आज या हजारो वर्षांच्या कहाणीचा शेवट येतो आहे. तो शेवट समजावून सांगण्याआधी मी आणखी एक गोष्ट सांगणार आहे. ही गोष्ट किमान ऐंशी वर्षे जुनी आहे.

**व्यापारबंदी - युद्धाचे मूळ**

पहिले महायुद्ध झाले. एका बाजूला जर्मनी आणि दुसऱ्या बाजूला फ्रान्स,

इंग्लंड वगैरे दोस्त राष्ट्रे. त्यामध्ये जर्मनीचा पराभव झाला. पहिल्यांदा युद्धामध्ये रणगाडे वापरले गेले, मशीनगन्स वापरल्या गेल्या. लाखो लोक मेले, शहरे उद्ध्वस्त झाली, बेचिराख झाली. जर्मनी शरण आला, युद्ध संपले आणि तहाच्या वाटाघाटी चालू झाल्या. जेत्यांच्या मनामध्ये प्रचंड राग होता. यांच्यामुळे आपली शहरे उद्ध्वस्त झाली, प्रचंड नुकसान झाले; यांना अशी शिक्षा तहाच्या अटींत दिली पाहिजे की जर्मन लोकांची पुन्हा युद्ध करण्याची हिंमत होता कामा नये. त्यासाठी दोस्त राष्ट्रांनी ठरविले की, जर्मनीवर अशी खंडणी लादायची की पुन्हा सैन्य उभे करण्याची ताकद त्यांच्यात राहू नये. खंडणी लादली एवढेच नव्हे तर त्यापलीकडे जाऊन जर्मनीमधील कोळशाच्या आणि लोखंडाच्या खाणी असलेले प्रांत फ्रान्सने, इंग्लंडने बळकावून घेतले; त्यांच्यातील जे जे काही चांगले होते ते बळकावून घेतले आणि शिवाय वार्षिक खंडणी लादली. म्हणजे, जर्मनीची स्थिती हिंदुस्थानातील शेतकऱ्यांसारखीच झाली. नाइलाजाने का होईना, खंडणी द्यायची म्हटले तरी द्यायची कशी? असा प्रश्न जर्मनीसमोर उभा राहिला. खंडणी द्यायची तर आपल्या चलनात द्यायची नसते, ज्याला खंडणी द्यायची त्याच्या चलनात द्यायची असते. जर्मनीपुढे प्रश्न उभा राहिला की जेत्यांच्या चलनात रक्कम मिळवायची कशी? परकीय चलन मिळविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्या देशांशी निर्यात व्यापार करणे. तहामध्ये दोस्त राष्ट्रांनी जर्मनीकडे जे जे काही चांगले होते ते बळकावून घेतले होते, त्यामुळे जर्मनीकडे विकण्याजोगे असे काही राहिलेच नाही. या कोंडीमुळे जर्मनीमध्ये हिटलरचा उदय झाला. हिटलरचा वित्तमंत्री डॉ. शाख्त याने जर्मनीला या कोंडीतून बाहेर काढण्याची जबाबदारी घेतली. त्याने आधी हुकूम काढला की दुसऱ्या कोणत्याही देशाचा माल आम्ही जर्मनीत येऊ देणार नाही. सर्व आयातींवर बंदी घालण्यामागे डॉ. शाख्त याची कल्पना अशी होती की या आयातबंदीमुळे, आपण निर्यात करून मिळविलेले परकीय चलन आपल्याच हाती राहील. असे झाल्यानंतर बाकीचे देश स्वस्थ थोडेच राहणार आहेत? जर्मनीने आयातबंदी केल्याबरोबर फ्रान्स, इटली, स्पेन इत्यादी सगळ्याच देशांनी आयातबंदी केली. परिणामी, जगातला व्यापार बंद झाला. जोपर्यंत शेजारणीशेजारणी निदान दही, साखर वगैरेची देवघेव करीत असतात तोपर्यंत त्यांच्यात भांडण होत नाही; पण, एकमेकींमध्ये उसनेपासने करण्याचे व्यवहारसुद्धा होत नसले तर अगदी किरकोळ गोष्टींवरूनही शिवीगाळ होते. तशीच, सगळ्याच देशांनी केलेल्या आयातबंदीमुळे जगभरचा व्यापार थांबल्याने जगभर शिवीगाळ सुरू झाली. जर्मनी एका बाजूला, फ्रान्स, इंग्लंड इत्यादी दोस्त राष्ट्रे दुसऱ्या बाजूला यांच्यातील ताणतणाव वाढत गेले आणि

परिणामी, दुसऱ्या महायुद्धाला तोंड फुटले. या दुसऱ्या महायुद्धात जग आणखी बेचिराख झाले.

सारांश, जागतिक व्यापार टाळायचा प्रयत्न केला तर 'हिटलर' चा उदय होतो; व्यापार बंद होतो, युद्ध होते. व्यापाराला पर्याय फक्त युद्ध आहे.

**मागल्यास ठेच, पुढचा शहाणा**

दुसरे महायुद्धसुद्धा संपले, जर्मनी हरला. यावेळी अमेरिका दोस्त राष्ट्रांच्या बरोबर होती. अमेरिकेने ठरवले की गेल्या वेळची चूक आपण करायची नाही. कारण, गेल्यावेळी शरणागत जर्मनीवर खंडणी लादली आणि पुन्हा महायुद्ध झाले. यापुढे खंडणी लादण्याऐवजी 'उलट खंडणी' द्यायची. म्हणजे जेत्या देशाने पराभूत देशाला खंडणी देण्याचा 'मार्शल प्लॅन' अमेरिकेने पराभूत राष्ट्रांसमोर ठेवला. त्या प्लॅनने मार्शलच्या कल्पनेनुसार योग्य तो परिणाम साधला आणि पराभूत देशांच्या अर्थव्यवस्था सावरल्या गेल्या.

**जागतिक व्यापारचर्चा**

दोन महायुद्धांच्या दाहक अनुभवानंतर सगळ्या देशांनी एकत्र येऊन ठरवले की हिटलरच्या कारवायांमुळे जगाचा जो व्यापार संपला तो आंतरराष्ट्रीय व्यापार पुन्हा चालू करणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. या व्यापाराचे नीतिनियम तयार करण्याकरिता एकमेकांत विचारविनिमय व्हावा यासाठी त्यांनी General Agreement on Tariff and Trade (GATT) नावाची संस्था स्थापन केली. १९४२-४३ सालपासून चर्चा सुरू झाली. त्याकाळी सर्व देशातील 'स्वदेशी जागरण मंच' वाल्यांचा जोर होता. त्यात सदस्य राष्ट्रांपैकी एका बाजूला समाजवादी रशिया, सर्व जगाशी जोडणारे सर्व दरवाजे बंद करून आमचे आम्ही राज्य चालवू असे म्हणणारे होते. त्यामुळे वाटाघाटीत यश येत नव्हते. चर्चांचे गुऱ्हाळ बरीच वर्षे चालल्यानंतर अखेरी वाटाघाटीत यशाचे चिन्ह दिसू लागले आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात चांगले वागणे म्हणजे काय यासंबंधी नियम ठरविण्यात आले आणि त्या नियमांचे पालन व्यवस्थित होते आहे ना याकडे लक्ष ठेवण्यासाठी एक संस्था जन्माला आली तिचे नाव जागतिक व्यापार संघटना (World Trade Organisation) म्हणजेच संक्षेपाने WTO.

**WTO आणि हिंदुस्थान**

विश्वनाथ प्रतापसिंग पंतप्रधान असताना या वाटाघाटींतून तयार झालेला व्यापारासंबंधी नेमनियमांचा मसुदा त्यांनी माझ्याकडे पाठवला. तो पाहिल्यानंतर माझ्या लक्षात आले की मोठा चमत्कार झाला आहे. सगळ्या जागतिक व्यापारात अमेरिकेचा हिस्सा ५१% आणि हिंदुस्थानचा हिस्सा ०.१%. खरे तर ५१%

हिस्सा असलेला देश सर्वांवर हुकुमत गाजवून सांगू शकतो की आम्ही सांगू ते सर्वांनी ऐकलेच पाहिजे आणि जागतिक व्यापार संघटना उदयाला येण्याआधी अमेरिका सुपर-३०१ च्या रूपाने तशी वागतही होती. अशी ही प्रबळ अमेरिका मुकाट्याने कबूल करते की जागतिक व्यापार संघटनेमध्ये आम्ही इतर सर्व राष्ट्रांच्या बरोबरीने बसतो, ५१% हिस्सा असलेल्या अमेरिकेला मत एक आणि ०.१% हिस्सा असलेल्या हिंदुस्थानलाही मत एक. हा मोठा चमत्कार जागतिक व्यापार संघटनेच्या निमित्ताने घडला आहे. इस्लामच्या शिकवणुकीमुळे नमाजाला बसताना अमीर आणि गरीब यांनी एकाच सतरंजीवर बसावे तसा हा प्रकार आहे. वाटाघाटीत आणि निर्णय प्रक्रियेत श्रीमंत आणि गरीब असा भेदभाव न करता सर्वच देशांना समान अधिकार ही एकच गोष्ट जागतिक व्यापार संघटनेचा करार स्वीकारायला, विशेषतः जागतिक व्यापारातील हिश्श्याच्या संदर्भात गरीब राष्ट्रांच्या दृष्टीने पुरेशी आहे; पण सुरुवातीला आपल्या देशाने ते कबूल केले नाही. तेथे वाद व्हायला लागले आणि करारावर सह्या व्हायला उशीर व्हायला लागला. तेवढ्यात अमेरिकेसारख्या प्रगत श्रीमंत राष्ट्रांनी कराराच्या मसुद्यात काही नवीन अटी घालायला सुरुवात केली. उदाहरणार्थ, ज्या देशांमध्ये बालमजूर आहेत त्यांच्याशी आम्ही व्यापार करणार नाही, ज्या देशामध्ये मजुरांना योग्य असे कायदे नाहीत त्यांच्याशी आम्ही व्यापार करणार नाही, ज्या देशात पर्यावरणाची काळजी घेतली जात नाही त्यांच्याशी आम्ही व्यापार करणार नाही....म्हणजे, आपल्याकडील 'स्वामी अग्निवेश' जी भाषा बोलत होते ती भाषा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बोलू लागले आणि आपले त्यात मोठे नुकसान झाले. तरीही चांगला व्यापार म्हणजे काय, चांगले व्यापारी म्हणजे काय हे जगाच्या इतिहासात प्रथमच जागतिक पातळीवर ठरले.

**शेतकरी संघटनेचा उदय**

जागतिक व्यापारातील हिंदुस्थानचे स्थान याबद्दलच्या या चर्चेत आणखी एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. इंग्रज इथे असताना शेतकऱ्याचे शोषण होत होते, शेतकरी गरीब होत होता. जोतिबा फुल्यांनी ही वस्तुस्थिती कायम प्रकाशात ठेवली. एक दिवस इंग्रज निघून गेले, सुरुवातीला आपण अन्नधान्यासाठी जगावर अवलंबून होतो, पण दहावीस वर्षांत हे परावलंबन संपले. पंजाब हरियानातील बहाद्दर शेतकरी एकरी वीस वीस क्विंटल गहू पिकवू लागला, आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झालो आणि तरीसुद्धा शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा काही हटला नाही, शेतकऱ्याची गरिबी काही हटली नाही. जास्त पिकवावे तर कर्जाचा बोजा वाढतो, गरिबीही वाढते, उत्पन्न कमी

येते असा अनुभव सतत येऊ लागल्यानंतर शेतकरी संघटनेचा उदय झाला आणि शेतकरी संघटनेने पहिल्या प्रथम विचार मांडला की, 'आम्हाला सरकारकडून सूट नको, सबसिडी नको, काही नको. सरकार आम्हाला कोण देणारे? आमच्या शेतात एका दाण्याचे शंभर दाणे होतात; सरकारच्या कारखान्यात एक किलो लोखंडात कणभरही वाढ होत नाही. मग ते कसे काय शेतकऱ्यांना मदत करणार? सरकारने फक्त शेतकऱ्यांच्या कारभारात हात घालायचे सोडून द्यावे.' शेतकरी संघटनेने घोषणा दिली – 'सूटसबसिडीचे नाही काम, आम्हाला हवे घामाचे दाम.' ही घोषणा जरी शेतकरी संघटनेची असली तरी तिच्या मागची प्रेरणा आहे महात्मा गांधींची. ते म्हणाले होते, ''गरिबांकरिता 'हे करू, ते करू' असे सगळेजण म्हणतात; पण गरिबाच्या पाठीवरून उतरायला कोणी तयार होत नाही. बाकी काही करण्याच्या गप्पा मारण्यापेक्षा गरिबांच्या पाठीवरून उतरा, त्याला मोकळेपणाने काम करू द्या. म्हणजे मग, गरिबी झटकन पळून जाईल.'' 'गरिबी हटाव, गरिबी हटाव' म्हणून निवडणुका जिंकून गरिबी हटत नाही. गरिबी हटवायचा मार्ग सोपा आहे. 'गरिबी टिकावी आणि वाढावी म्हणून सरकार जे प्रयत्न करते ते सोडून दिले तर गरिबी आपोआप नाहीशी होईल.

**सरकार कमी तितके नामी**

शेतकरी संघटनेने गेली वीस बावीस वर्षे स्वातंत्र्याची मागणी सातत्याने केली. इतर सगळ्यांनी शेतकरी संघटनेला विरोध केला. पण मनुष्याच्या विकासाचा इतिहास सगळा आपल्या बाजूने आहे; काठीने जमीन उकरून शेती करणाऱ्या बाईपासून हिटलरच्या शाक्तपर्यंतच्या इतिहासाचा आपण जो आढावा घेतला त्यावरून हे स्पष्ट होते. म्हणून आता तुमचा आणि माझा सोन्याचा दिवस उगवतो आहे. आता संपूर्ण जगात सिद्ध झाले आहे की सरकार जिथे जिथे हात घालते त्या त्या गोष्टीचे वाटोळे झाल्याखेरीज राहत नाही. सरकारने एखादी गोष्ट करतो म्हटले आणि चांगले झाले असे कधीच होत नाही. खरे तर जनतेच्या मनात भावना असते की सरकारकडे काही जबाबदारी सोपवली की काही तरी चांगले होईल. उदाहरणार्थ, समजा शेतामध्ये काम करणाऱ्या शेतमजुराला योग्य मजुरी मिळत नाही, किमान वेतनसुद्धा मिळत नाही. मग काही मंडळी सरकारला सल्ला देतात की या कामावर देखरेख करणारा एक इन्स्पेक्टर नेमा. मग, नेमलेला इन्स्पेक्टर शेतमालकाकडे जातो, तिथे बसून चहापाणी घेतो, मजुरांकडून थोडे पैसे खातो, मालकाकडूनही थोडे पैसे खातो; मजुरी वाढण्याचा काही संबंधच नाही. दोन वर्षांनी त्यांच्या लक्षात येते की इन्स्पेक्टर नेमूनही परिस्थितीत काही फरक पडत नाही. मग, सूचना येते की एक कमिशनर नेमा. त्यानेही भागत नाही

म्हणून मग दिल्लीत एक किमान वेतन मंत्रालय उघडा अशी सूचना केली जाते. काम होत नसेल तर सरकार कमी करण्याऐवजी सरकार वाढविण्याचा खटाटोप जगभर चालत राहिला. आता ते संपले आहे. समाजवाद संपला आणि समाजवादाचे नारे देणाऱ्या रशियाचा बट्ट्याबोळ झाला. आता 'सरकारचा हस्तक्षेप जितका कमी तितके चांगले' असे आपले तत्त्व मान्यता पावले आहे.

**शेळी आणि कसाई**

शेतकरी आणि उद्योजक, इतके दिवस गुलामीत ठेवलेले, आता त्या गुलामीतून सुटू लागल्यावर गुलामीत ठेवणाऱ्यांना गोड नक्कीच वाटणार नाही. शेतकरी आणि सरकार यांच्यामधील नाते स्पष्ट करताना मी नेहमी 'शेतकरी हा शेळी आहे आणि सरकार कसाई आहे' अशी उपमा वापरतो. शेळीला वाटते हा आपल्याला चारा घालतो, पाणी देतो, निवाऱ्याला ठेवतो; गळ्यात दोरी घालून फिरवत असला तरी बरा गोड मालक आहे. हा कसाई प्रेम दाखवीत होता, सूट देत होता, सब्सिडी देत होता ते कशाकरिता हे शेळीला शेवटच्या दिवसापर्यंत कळत नाही. ज्या दिवशी कापायची आहे त्या दिवशी जास्तीत जास्त मांस मिळावे यासाठी हे प्रेम होते हे शेळीला फक्त शेवटच्या दिवशी कळते. शेळी जर कसायला म्हणाली की, 'तुला खायला हवे तर मला का मारतो; तुला काय कोबी मिळत नाही का बटाटे मिळत नाही?' कसाई त्यावर म्हणतो, 'कोबी, बटाटे खूप मिळतील, पण तुला मारल्याखेरीज माझा धंदा होणार नाही.' एखादी संधी साधून शेळी पळून जाऊ लागली तर कसाई तिला तसे पळू देणार नाही, धरून आणून परत बांधून ठेवील. त्याचप्रमाणे जोतिबा फुल्यांच्या काळापासून ज्यांनी शेतकऱ्यांना गुलाम केले त्या मंडळींनी नव्या नव्या युक्त्या लढवून शेतकऱ्यांना बंदिस्त व्यवस्थेत अडकवून ठेवण्याच्या कारवाया केल्या. यावेळी त्यांनी आणखी नव्या युक्त्या काढायला सुरुवात केली आहे.

**कसायांच्या युक्त्या**

त्यांच्या या युक्त्यांकडे बारकाईने लक्ष ठेवायला पाहिजे. कारण स्वातंत्र्याची ही लढाई मोठी अटीतटीची आहे. जोतिबा फुल्यांनी म्हटले, इंग्रज आला हे चांगलेही झाले; काही तरी शिकू या त्यांच्याकडून. राष्ट्रवादी म्हणायला लागले काही शिकायला वगैरे नको. 'मुलीचे लग्न लहान वयात करू नये' असा कायदा करायचे सरकारने ठरवले तेव्हा त्यावेळचे स्वदेशीवाले लोकमान्य टिळक म्हणाले, 'कायदा चांगला आहे, पण सरकारला जर असा कायदा करायला आपण मान्यता दिली तर सरकारला आपल्या सामाजिक जीवनात हस्तक्षेप करण्याची सवय होईल.' 'म्हातारी मेल्याचे दुःख नाही, पण काळ सोकावतो'

अशा मथळ्याखाली त्यांनी त्यावर अग्रलेख लिहिला आहे. तेव्हा, आपली लुटालुटीची व्यवस्था बिघडू नये म्हणून या मंडळींनी 'राष्ट्रवादी' म्हणून छान नाव घेऊन चळवळ उभी केली; इंग्रजांचे जे जे काही असेल ते वाईटच आहे असे जनतेच्या मनात भरायला सुरुवात केली. म्हणजे, 'चांगले असेल तेसुद्धा घ्यायचे नाही' याला 'राष्ट्रवाद' म्हणायचे! जोतिबा फुल्यांनी इशारा दिला होता की माझी मांडणी बाजूला ठेवून जर स्वातंत्र्याची चळवळ चालवली तर स्वातंत्र्य येईल, पण ते खरे स्वातंत्र्य असणार नाही, ती पुन्हा 'पेशवाई'च असेल.

आणि १९४७ साली जे स्वातंत्र्य आले ते पेशवाईचे आले आणि त्यांनी 'समाजवादा'चा नवा टिळा लावला आणि आपणही इंग्रज गेल्याच्या आनंदात त्या समाजवादाला पार भुलून गेलो. एकदा आपण 'राष्ट्रवादा'च्या नावाने फसलो आणि एकदा 'समाजवादा'च्या नावाने फसलो आणि शेतकऱ्याच्या सर्व शत्रूंनी शेतकऱ्याचा जगाशी संपर्क येऊ दिला नाही. शेतकऱ्याला शहाणा होऊ द्यायचे नाही, बाकी त्या काहीही मागावे!

### दुतोंडी स्वदेशी

आता समाजवादाचा जागतिक पाडाव झाल्यानंतर शेतकऱ्यांचे शत्रू नवीन, 'स्वदेशी' नावाची युक्ती घेऊन पुढे आले आहेत. ते म्हणतात, 'तुम्ही आंबे परदेशात पाठवले तर आम्हाला चांगले आंबे खायला मिळणार नाहीत' उलट, चांगली चांगली फळे परदेशातून आणली तर हेच स्वदेशीवाले ओरड करतात की, 'आमच्या शेतकऱ्यांचे काय होणार?' 'ओली पडो का सुकी पडो' आपल्याला फुकटात राबायला मिळालेला शेतकरी स्वतंत्र होता कामा नये, तो गुलामच राहिला पाहिजे असे ज्यांना वाटते ती मंडळी आता स्वदेशीचा झेंडा हातात घेऊन आणि वाटेल त्या भाकड कथा सांगून शेतकऱ्यांना घाबरवायचा प्रयत्न करीत आहेत.

### अधिवेशनाचे निर्णय

या सर्व पार्श्वभूमीवर येथे प्रचंड संख्येने जमलेल्या शेतकरी स्त्रीपुरुषांनी या अधिवेशनात महत्त्वाचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मुळात पश्चिम महाराष्ट्रात इतक्या मोठ्या संख्येने शेतकरी स्वातंत्र्याचा उद्घोष करायला जमतात हीच मोठी ऐतिहासिक घटना आहे. कारण, येथील सहकार सम्राटांनी इतके दहशतीचे वातावरण तयार केले होते की धीर बांधून कोणी शेतकरी संघटनेच्या सभेला हजर राहिले तर त्यांची यादी सभा संपायच्या आत एखाद्या डायरेक्टरच्या हाती पडायची. त्यामुळे वीस वर्षांपूर्वी या भागात शेतकरी संघटनेची एखादी सभा घेणे मोठे मुश्किलीचे काम होते. म्हणूनच ही उपस्थितीही ऐतिहासिक आहे.

**गुलामगिरीचा त्याग**

आमची परिस्थिती अत्यंत वाईट आहे हे आम्हाला माहीत आहे. आम्ही गरीब आहोत, आमच्या जमिनी नापीक झालेल्या आहेत, आमच्या जमिनीच्या पोटातील पाणी संपत आले आहे, आमच्याकडे यंत्रे नाहीत, तंत्रे नाहीत, काही नाही; जे होते ते जुनेपुराणे आणि मोडकळीस आले आहेत, आम्ही कर्जबाजारी झालो आहोत हे खरे आहे. दुसरीकडे, जगातील इतर सरकारांनी त्यांच्या शेतकऱ्यांना पोसून पोसून बलदंड केले आहे हेही खरे आहे; नवीन तंत्रज्ञानाचा त्यांच्याकडे वापर होतो त्यामुळे त्यांची उत्पादकता वाढली हेही खरे आहे. म्हणजे जागतिक बाजारपेठेत स्पर्धेला उभे राहाणे म्हणजे एका बाजूला एक बलदंड पहिलवान आणि दुसऱ्या बाजूला एखादे लहान पोर उभे राहावे अशी लढाई आहे याची आम्हाला जाणीव आहे आणि तरीदेखील येथे जमलेल्या आम्ही शेतकरी भावाबहिणींनी ठरवले आहे की जे काही तोडकेमोडके आमच्या हाती आहे त्यांच्या साहाय्याने आम्ही या स्पर्धेत उतरण्याचा निर्धार केला आहे. औरंगजेब सर्व साहित्यानिशी आला म्हणून इथले मावळे डगमगले नाहीत, हाती तलवार नसली म्हणून काय झाले? मावळ्यांनी शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने नांगराचे फाळ मोडून त्याचा सामना केला हा आमचा गौरवशाली इतिहास आहे. गुलामगिरीत जगण्यापेक्षा स्वातंत्र्यात मेलेले चांगले.

दुसऱ्या लोकांना हा निर्धार समजत नाही. त्याला तसेच कारणही आहे. एखादा वाघ, समजा, पिंजऱ्यात आहे. एक दिवस चुकून पिंजऱ्याचे दार उघडे राहिले तर वाघ असा विचार करीत नाही की आपण बाहेर गेलो तर काय होईल, आपल्याला इथल्यासारखे आयते खायला मिळेल का नाही? असा विचार करीत असेल तो वाघ असणार नाही. दरवाजा उघडा सापडला तर पहिल्यांदा तो छलांग मारून जंगलाकडे जातो, स्वतंत्र होतो. कुत्रा मात्र विचार करतो की इथे भाकरी तर मिळते की नाही? सुटून गेलेला कुत्रा पुन्हा पुन्हा मालकाकडे परत येतो, दोन लाथा बसल्या तरी भाकरी तर मिळते ना यातच त्याला समाधान वाटते. ज्यांना स्वातंत्र्य हवे असते ते वाघ असतात आणि स्वातंत्र्याचे ज्यांना भय वाटते ते कुत्रे असतात. मग, कुत्रे आणि वाघ यांच्यात संवाद होईलच कसा? म्हणून, आपला स्वातंत्र्याचा निर्धार हा दुसऱ्या लोकांच्या आकलनाबाहेरचा आहे.

त्यांचे काही असो, आम्ही येथे जमलेले सर्व शेतकरी हे शिवरायांची परंपरा राखणाऱ्या मावळ्यांचे वंशज आहोत आणि ज्या कसायाने पन्नास वर्षे आपली मान कापली त्यांच्याकडे, स्वातंत्र्याच्या असिधाराव्रताला घाबरून त्या कसायाच्या दावणीला परत जाणार नाही.

**जिंकण्याची खात्री**

या लढाईत उतरणार म्हणजे काही आम्ही राजपुतांसारखे केसरिया-जोहार करून बलिदानाची लढाई करणार नाही. ही लढाई लढून आम्ही जिंकणार आहोत याची आम्हाला खात्री आहे. कारण, शेतीला जे जे काही लागते त्यातील मुबलक सूर्यप्रकाश आमच्या बाजूने आहे, गंगायमुनेपासून कृष्णाकावेरीपर्यंतच्या सगळ्या वाहत्या नद्यांचे पाणी आमच्या बाजूने आहे आणि आमच्याकडील माणूस चाळीसपन्नास रुपये मजुरीवरसुद्धा आनंदाने कामे करतात, शेतकऱ्याच्या घरची माणसेही मजुरीचा विचार न करता कामे करतात म्हणजे आमच्याकडे कार्यक्षम मनुष्यबळ उदंड आहे. नेदर्लंडमध्ये फुलांच्या शेतीत काम करणाऱ्या माणसाला दिवसाला २००० रुपये मजुरी आहे, त्या तुलनेत आमच्याकडील मनुष्यबळ स्वस्तही आहे. या सर्व जमेच्या बाजू लक्षात घेतल्या तर या जगात अशी कोणतीही ताकद नाही जी आमच्याशी टक्कर देऊ शकेल. फक्त, आमचे हे जे फायदे आहेत ते चांगल्या तऱ्हेने वापरण्याचे आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे. तेव्हा, यापुढे गुलामगिरी करणार नाही हा आपला पहिला ठराव झाला.

**लढ्याची रणनीती**

हा ठराव अमलात आणायचा म्हटले तर बंदिस्त व्यवस्थेतील लाभांना सोकावलेले घटक आपल्याला तसे सुखासुखी करू देणार नाहीत. त्यासाठी आधी लढावे लागेल. या लढ्याची रणनीती या ठरावात मांडायची आहे.

१. आम्ही आता स्वतंत्र झालो आहोत. शेती कशी करायची याची आम्हाला अक्कल आहे. आम्हाला दिल्लीच्या कृषिभवनाची गरज नाही आणि मुंबईतील कृषिमंत्र्यांचीही गरज नाही. **शेतीतून सरकारचे उच्चाटन करा.**

२. संपूर्ण जग बाजारपेठ म्हणून एक होते आहे. युरोपमधील सर्व देशांनी, जे दुसऱ्या महायुद्धात एकमेकांविरुद्ध लढले त्यांनी एकत्र येऊन एक सामूहिक बाजारपेठ तयार केली आणि हिंदुस्थानात या राज्यातला माल त्या राज्यात जाऊ देत नाहीत, जाऊ दिला तर त्यात शेकडो अडथळे आणतात. हे आता चालायचे नाही. शेतीमालाच्या व्यापारासाठी **हिंदुस्थान ही एक बाजारपेठ, सामूहिक बाजारपेठ व्हावी.** कोणताही शेतीमाल हिंदुस्थानातील एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत विनाअडथळा नेता आला पाहिजे.

३. शेतीमालाच्या वाहतुकीवर बंधने लादताना '**जीवनावश्यक वस्तू कायद्या**'चे निमित्त पुढे केले जाते. हा कायदा त्वरित रद्द करण्यात यावा.

४. खरे तर, पन्नास वर्षे सातत्याने शेतकऱ्यांची लूट करणाऱ्या इंडिया शासनाने आपल्या चुकीच्या धोरणामुळे देश बुडतो आहे याची दखल घेऊन

शेतकऱ्यांची आणि देशाची आर्थिक स्थिती सावरून त्यांना प्रगतीच्या मार्गावर आणण्यासाठी, अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपमधील राष्ट्रांसाठी जसा 'मार्शल प्लॅन' आखला आणि अमलात आणला तशी एखादी योजना आखावी अशी अपेक्षा करण्यात काही गैर नाही; अशी योजना दोघांच्याही हिताची बाब ठरेल; पण ज्या सरकारचा खजिना इतका रिता झाला आहे की त्यांना त्यांच्या नोकरांचे पगार भागविणेसुद्धा शक्य होत नाही त्याच्याकडून 'मार्शल प्लॅन'ची अपेक्षा काय करणार! त्याऐवजी, आपण एक व्यावहारिक तोडगा काढला आहे. परदेशात शेतीउपयोगी अवजारे आणि साहित्य आपल्याकडील किमतीच्या तुलनेत निम्म्याहून कमी किमतीत मिळतात. हिंदुस्थानात खते जितकी महाग आहेत तितकी महाग दुसऱ्या कोणत्याही देशात नाहीत. याचे कारण यातील प्रत्येक मालावर सरकारचा कर आहे. शेतीवर तुम्ही पन्नास वर्षे सातत्याने अन्याय केला, शेतीला लुटले त्याची भरपाई करण्यासारखी तुमची आर्थिक परिस्थिती नाही, तर मग परदेशातून येणाऱ्या **शेतीउपयोगी औजारे आणि साहित्य** यावर फायदा कमावण्याचे बंद करा, त्यावरील **सर्व आयात कर रद्द करा.** ही मागणी मी वित्त मंत्रालयासमोर शेतकऱ्यांच्या वतीने ठेवणार आहे.

५. आम्ही ही आर्थिक लढाई लढण्यास समर्थ आहोत. बहुराष्ट्रीय कंपन्यांचा बागुलबुवा कोणी कितीही दाखविला तरी मागे पाऊल घेण्याइतके आम्ही कमकुवत नाही. ज्या शेतकऱ्यांनी पंडित नेहरूंच्या शेतकरीविरोधी धोरणाशी लढाई केली, ज्या शेतकऱ्यांनी इंदिरा गांधींच्या शेतकरीविरोधी धोरणाशी लढाई केली, राजीव गांधींसारखा शत्रू पचवला, नरसिंहरावांसारखा शत्रू सांभाळला त्या आम्हा शेतकऱ्यांना दोनपाच कंपन्यांना तोंड देणे काहीच अवघड नाही. आम्ही पण कंपन्या काढू. आतापर्यंत, शेतकऱ्यांनी धंदा करायचा म्हणजे सहकारी संस्थाच काढाव्यात आणि शहरातील लोकांनी धंदा करायचा म्हणजे कंपनी काढायची असा भेद होता. शेतकरी कंपनी काढतो म्हणाले तर त्याला परवानगी नाही. त्यांचा आपला एकच धोशा – 'सहकार जरी अयशस्वी झाला असला तरी सहकार यशस्वी झालाच पाहिजे!' 'बिना सहकार नहीं उद्धार!' सारखे छान 'काव्य' गाऊन सहकार महर्षींनी शेतकऱ्यांना लुटले. आम्ही या सहकाराचा सुरुवातीपासूनच धिक्कार केला आहे. आज आम्ही या सांगली-मिरज अधिवेशनातून या सर्व सहकारवाल्यांना आव्हान देतो की त्यांनी बाजारपेठेत उतरून दाखवावे. शेतकऱ्यांच्या लुटीला ते इतके सोकावले आहेत की बाजारपेठेत ते एक दिवससुद्धा तगू शकणार नाहीत. सरकारच्या छत्राखाली, शेतकऱ्यांवर झोनबंदीसारखे, बिनपरतीच्या ठेवींसारखे निर्बंध लादून काम करणारी ही ऐतखाऊ माणसे जागतिक

बाजारपेठेत चोवीस तासंसुद्धा टिकू शकणार नाहीत. आम्ही या अधिवेशनात असे ठरवीत आहोत की **आम्हाला अशा तऱ्हेची व्यवस्था उभी करायची आहे की जिच्यामध्ये कंपन्यांची कार्यक्षमता असेल आणि सहकारी व्यवस्थेतला सहभाग असेल.** सरकारने आमच्या या प्रयत्नांत मध्येमध्ये आड येता कामा नये.

### सामर्थ्य आहे चळवळीचे

शेतकरी संघटनेच्या तुम्हा सर्व पाईकांचे कौतुक आहे की देशावर जागतिक व्यापार संघटनेच्या संदर्भात संकट चालून येते आहे अशी भीती समोर दिसताच देशाच्या पंतप्रधानांनी, मी सत्तारूढ राष्ट्रीय आघाडीशी कोणत्याही स्वरूपात संबंधित नसताना, किंबहुना त्यांच्याविरोधात लढलो असतानाही, देशापुढील संकटाच्या निवारणासाठी मदतीकरिता मला हाक मारली आहे आणि मी तेथे गेलो आहे तो तुम्हा सर्वांच्या अनुमतीने गेलो आहे आणि मी कायम तुमच्याबरोबरच राहणार आहे. सहाव्या मजल्यावर गेल्यानंतर इंडियात सामील होणाऱ्या शेतकऱ्याच्या पोरांसारखा मी बेइमान होणार नाही. इतके दिवस आम्ही धनुष्यबाणच पाठीवर लावून फिरत होतो, आता पाठीवरील धनुष्यबाणाच्या जोडीला मंत्रालयातील 'वेद'सुद्धा आपल्यासमोर पडले आहेत, आमच्याकडे नवीन हत्यार आले आहे. मला त्यांनी मी बुद्धिमान आहे म्हणून नाही बोलावले, मी हाक मारली की तुम्ही शेतकरी लाखोच्या संख्येने जमता या ताकदीची दखल घेऊन त्यांनी मला बोलावले आहे. शेतकऱ्यांना आंदोलन करावे वाटले तर शेतकऱ्यांचा फक्त शेतकरी संघटनेवर विश्वास आहे हे त्यांना माहीत आहे म्हणून त्यांनी मला तेथे बोलावले. त्यामुळे तुम्ही हेही लक्षात ठेवायला हवे की माहेरचा आधार कमकुवत झाला आहे असे कळले की सासरी पोरीला चांगले वागवीत नाहीत. माझ्या शब्दाखातर लाखो लोक उठतील हे जोपर्यंत त्यांना खात्री आहे तोपर्यंतच मी जे काही म्हणतो ते ते मान्य करणार आहेत. तेव्हा आपली संघटनेची ताकद टिकवून ठेवली पाहिजे, वाढवत राहिली पाहिजे. मी तेथे गेलो आहे आता सर्व काही सुरळीत होईल असे म्हणून गाफील राहून चालणार नाही.

### चोरांच्या बंदोबस्तासाठी

महाराष्ट्रात शेतकऱ्यांसमोर अनेक समस्या उभ्या आहेत. शेतकऱ्यांच्या विहिरींवर निर्बंध घालणारे भूजल विधेयक आणण्याचा सरकारने विडा उचलला आहे, कापूस खरेदीचा एकाधिकार त्याच भ्रष्ट आणि लुटींच्या पद्धतीने चालू आहे, थकीत वीजबिलांपोटी विद्युत महामंडळाचे अधिकारी वीज कनेक्शनच तोडू लागले आहेत, त्यामुळे उभी पिके जळून जाऊ लागली आहेत, गेल्या पन्नास वर्षांत

दरवर्षी शेतकऱ्यांना उणे सबसिडीच्या माध्यमातून हजारो कोटी रुपयांनी लुबाडीत आले आहे याचा कबुलीजबाब सरकारने दिला असूनही बँकांचे अधिकारी शेतकऱ्यांकडील किरकोळ कर्जांच्या वसुलीसाठी शेतकऱ्यांच्या घरी जाऊन जप्ती करीत आहेत त्याची बेइज्जती करीत आहेत. यावर काय उपाय करायचा? तुमच्या घरी येऊन कोणी तुमच्या लक्ष्मीला जर हात लावायला लागला तर तुम्ही काय पंचायतीत जाऊन विचारीत नाही, आता काय करू म्हणून! बँकेचे अधिकारी असोत, वीज मंडळाची माणसे असोत का पोलिसही असोत; सरकारी नोकर जोपर्यंत तो कायदेशीर काम सनदशीर मार्गाने करीत असतो तोपर्यंतच सरकारी नोकर असतो. वर्दी घालून एखादा पोलिस तुमच्या घरी आला आणि चोरी करू लागला तर तो पोलिस नसतो, तो वर्दी घातलेला चोर असतो आणि नागरिकांना स्वसंरक्षणाचा हक्क कायद्याने दिला आहे. तेव्हा, कोणीही सरकारी अधिकारी किंवा पोलिस तुमच्या घरी येऊन बेकायदेशीरपणे काही कारवाई करू लागला तर त्याला सरकारी वर्दीतील चोर-दरोडेखोर समजून कायद्याने दिलेले स्वसंरक्षणाचे हत्यार वापरा आणि या नगराचे 'क्रांतिवीर नाना पाटीलनगर' हे नाव सार्थ करा.

**समारोप**

या अधिवेशनात स्वातंत्र्याचा उद्घोष झाला आहे. शेतीचा शोध लागल्यापासून शेतकऱ्यांच्या माथी बसलेला शोषणाचा बोजा दूर होण्याची वेळ येऊन ठेपली आहे, ही संधी हुकविण्यासाठी स्वातंत्र्यसूर्याला घाबरणारी घुबडे नाना तऱ्हेने घुत्कार करून तुमच्याही मनात भीती भरविण्याचा प्रयत्न करू लागतील. तिकडे लक्ष न देता या अधिवेशनाच्या निमित्ताने एकत्र आलेले जोतिबा फुल्यांचा स्वातंत्र्याचा विचार आणि नाना पाटलांची ताकद यांचा योग्य मेळ घालून यापुढे वागू लागलो तर जगातील कोणतीही राक्षसी ताकद आपल्या स्वातंत्र्याच्या आड येऊ शकणार नाही.

**सारांश**

बऱ्याच दिवसांपासून सरकारे दिवाळखोरीत निघाली आहेत, आपल्या नोकरांचे पगार भागविण्याइतकेही पैसे त्याच्याकडे नाहीत. त्यांच्याकडे शंभर रुपये जमा झाले तर त्यातील सत्तर रुपये नोकरांचे पगार देण्यातच जातात. अशा प्रकारचे सरकार देशाचे काही भले करू शकत नाही. तेव्हा, एखाद्या दारूड्याच्या कारभारणीची जी अवस्था होते तीच अवस्था आज आपली झाली आहे. कारभारणीने आपले दागिने उतरवून दिले तरी त्याची तो दारूच पिणार, त्याचे व्यसन वाढतच राहणार; त्याच्यात काही सुधारणा होणार नाही आणि घरातही काही सुधारणा होणार नाही. त्यामुळे माझ्या मते, प्रत्येक दारूड्याच्या कारभारणीने आपल्या

दारूड्या नवऱ्याच्या हाती एकही पैसा न देणे हे तिचे कर्तव्य बनते. त्याचप्रमाणे, आज आम्ही निर्णय घेतो आहोत की यापुढे सरकारला एक पैसाही देणार नाही; वीज बिले भरणार नाही. आम्ही कर्ज फेडणार नाही कारण आम्ही मुळात देणेच लागत नाही; ९६-९७ या केवळ एका वर्षात ज्या सरकारने शेतकऱ्यांकडून १ लाख १३ हजार कोटी रुपये लुटून नेले आहेत ते अवघ्या १३ हजार रुपयांच्या कर्जासाठी आमच्या घरावरील छप्पर काढू शकत नाहीत. इतके असूनही सरकारी अधिकारी जर वसुलीसाठी जप्ती करू पाहत असतील किंवा अटक करण्याचा विचार करीत असतील तर समजा की हे सरकारी अधिकारी नाहीत, सरकारी वर्दीतील लुटारू आहेत आणि स्वसंरक्षणासाठी नाना पाटलांच्या मार्गाने आम्हाला जे करणे शक्य होईल ते आम्ही करू. आजपर्यंत शेतकरी दीनवाणाच दिसत होता, या लढाईत तो अशी तडफ दाखविणार आहे की त्याच्या दर्शनाने आजपर्यंतचे त्याचे शोषक थरथर कापायला लागतील.

*(१२ नोव्हेंबर २००० शेतकरी संघटना आठवे अधिवेशन सांगली-मिरज.)*

*(शेतकरी संघटक २१ नोव्हेंबर २०००)*

■■

# सरकारला वगळून शेती हाच पर्याय

शेतकरी संघटनेची सुरुवात झाल्याला २५ वर्षे लवकरच पुरी होतील आणि आज या धानउत्पादक शेतकऱ्यांसमोर बोलताना मला वाटायला लागले आहे की संघटनेच्या सुरुवातीच्या दिवसात जे वातावरण तयार झाले होते ते पुन्हा एकदा येथे तयार होते आहे.

या परिषदेच्या निमित्ताने सर्व कार्यकर्ते जिल्ह्याजिल्ह्यांत, गावागावांत फिरत होते. त्यांच्यापैकी अनेकांना एक प्रश्न हटकून विचारण्यात आला की, 'शेतकरी संघटनेला आताच कुठे धान-शेतकऱ्यांची आठवण आली? इतके दिवस शरद जोशी कोठे गेले होते?'

हा प्रश्न महाराष्ट्रातील अत्यंत लोकप्रिय प्रश्न आहे. येवला-लासलगाव येथे कांद्याचे भाव पडले की मान्यवर वृत्तपत्रांचे संपादकसुद्धा संपादकीयात लिहितात, 'कांद्याचे भाव पडले, शेतकऱ्यांच्या डोळ्याला पाणी आले, आता शरद जोशी कोठे आहेत? शेतकरी संघटना काय करते आहे?' म्हणजे जणू काही, कांद्याचे भाव पडले म्हणजे काहीतरी केलेच पाहिजे आणि तेही शरद जोशींनीच केले पाहिजे, दुसऱ्या कोणी केलेले चालणार नाही! शेतकऱ्यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली तर ती प्रेमाची असेल; पण कांद्याचे भाव वाढू लागले आणि पंचतारांकित ग्रहकांच्या डोळ्याला पाणी आले म्हणून शेतकऱ्यांच्या नावाने 'टाटा-बिर्ला' अशी भाषा वापरणारांनी असे प्रश्न विचारले तर त्यात खोडसाळपणाखेरीज आणखी काय असणार?

धानाच्या बाबतीत मी उशीर केला असे ऐकायला आले तरी मला फार वाईट वाटते. मी आंदोलने अनेक केली. उसाचे आंदोलन खूप मोठे झाले, जगभर गाजले पण माझ्या शेतामध्ये उसाचे एक कांडूकही पिकत नाही. कापसाच्या आंदोलनात मी चौदा वेळा तुरुंगात गेलो पण माझ्या वावरात वातीइतकाहीसुद्धा कापूस पिकत नाही. मी आंबेठाणचा शेतकरी, म्हणजे मावळातला. मावळाचा

भाग पहिल्यापासून प्रसिद्ध आहे तो वरी, नागली आणि भात पिकविण्याकरिता. माझ्या शेतामध्ये भाताच्या पाच वावरांपैकी एक वावर असे आहे की त्या वावरातील आंबेमोहोर धानाच्या सुगंधाने या वावरात वाघीण येऊन बसे अशी जुन्या काळची आख्यायिका वृद्ध शेतकरी सांगतात. मावळाच्या भामनहर खोऱ्यातील शेतकरी अजूनही सांगतात की आमच्या भागात जो तांदूळ पिकतो त्यात स्निग्धांश इतका की त्याच्या पेजेमध्ये वात लावली तर ती तेवत राहते. इतक्या महत्त्वाचा भात पिकविणारा मी शेतकरी आहे.

मी कांद्याचे आंदोलन केले, उसाचे केले, कापसाचे केले, तंबाखूचे केले, अगदी पंजाबमध्ये जाऊन गव्हाचे आंदोलन केले आणि धानाकडे लक्ष दिले नाही असे होणे शक्य आहे का? या धान परिषदेच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की शेतकरी संघटनेच्या संभवाच्या काळात मावळातील खोऱ्यांमध्ये फिरताना, गावागावांमध्ये जाऊन पिंपळाच्याखाली पारावर, देवळांच्या ओट्यांवर बसून शेतकऱ्यांची बोलताना प्रामुख्याने जी चर्चा व्हायची ती धान शेतकऱ्यांच्या हलाखीबद्दल. त्यावेळी आतासारखी माणसे जात नसत; कोणी बोलावणेही धाडत नसे. आपणच बळेबळे जायचे; पारावर, ओट्यावर बसायचे, शेतकऱ्यांना हाका मारून बोलवायचे आणि पाचदहा लोक जमा झाले की त्यांना प्रश्न विचारून बोलते करायचे; अशी चर्चा होत असे.

त्या चर्चांमध्ये माझ्या लक्षात आले की सगळ्याच शेतकऱ्यांना दुःख आहे, सुखी शेतकरी अशी गोष्ट हिंदुस्थानात तरी अस्तित्वात नाही; पण त्यातल्या त्यात सर्वांत जास्त दुःख धान उत्पादक शेतकऱ्यांचे आहे. कारण, धानाची शेती मुळात कष्टदायक. घोटाघोटा पाण्यामध्ये उभे राहायचे – रोपे लावण्यापासून ते बेणणीकापणीपर्यंत – आणि त्या चिखलामध्ये असलेला एखादा जुना मुरलेला काटा भिजलेल्या पायात रुतला म्हणजे काय जाणीव होते ती उसाच्या शेतकऱ्यांना कधी कळायची नाही. इतके सोसूनसुद्धा धान शेतकरीच सगळ्यात दरिद्री राहतो. त्यावेळी मी निश्चय केला की एक दिवस धानाचा शेतकरीसुद्धा हिंदुस्थानात सुखाने आणि सन्मानाने जगू लागेल यासाठी आयुष्यभर झटेन. हा निश्चय त्यावेळी केला, तो पुरा करण्याच्या कामाची सुरुवात आज होते आहे – रामटेकला जमलेल्या या धानउत्पादकांच्या मदतीने आणि साक्षीने.

इतके दिवस हे काम का सुरू झाले नाही? आंदोलन करायचे झाले तर काय लागते? पहिली गोष्ट लोकांचा पाठिंबा. आज पहिल्यांदा इतक्या संख्येने धानाचा शेतकरी फक्त धानाच्या प्रश्नासाठी एकत्र झाले आहेत. आपण सर्वांनी ठरवले की आंदोलन करून धानाला भाव मिळवायचाच तर सरकार फार फार तर

तुम्हाला आणि मला उचलून तुरुंगात टाकील. त्यातही अडचण काहीच नाही. तुरुंगात फक्त पहिल्यांदा जाताना भीती वाटेल. एकदा तुरुंगात गेले की आपल्या महिला आघाडीच्या बायासुद्धा म्हणतात, 'तुरुंगात, माहेरीसुद्धा जगायला मिळत नाही इतकं चांगलं जगायला मिळतं. माहेरी गेलं तर भावजयीच्या धाकानं म्हणा ममतेमुळे म्हणा, थोडी भाजीतरी निवडायला लागते, एखाददुसरं काम करायला लागतं. तुरुंगात तसं काही नाही. सकाळी उठल्या उठल्या चहा येतो, पेज येते, दुपारी भाकरी येते. आपल्या घरी आपण थोडंच पंचपक्वान्नं खातो? आपणही भाकरीच खातो. तेव्हा तुरुंगाला काय भ्यायचं.' तेव्हा आतासुद्धा जर का आपण ठरवले की धानाला भाव भेटेपर्यंत आंदोलन करायचे, तोपर्यंत घरी परतायचे नाही तर तुम्हा सर्वांना ठेवण्याइतके तुरुंग शासनाकडे नाहीत. हे मी शेतकरी संघटनेच्या सुरुवातीच्या काळात बोलत होतो आणि आजही बोलत आहे. फरक एवढाच आहे की त्यावेळी मी फक्त शेतकरी होतो, फारतर शेतकरी संघटनेचा नेता होतो; आज पंतप्रधानांच्या निमंत्रणावरून दिल्लीला मंत्रिपदाची जागा घेतलेला मी सांगतो आहे की धानाच्या भावाकरिता, गरज पडली तर तुमच्याबरोबर तुरुंगात यायला तयार आहे.

पण नुसते तुरुंगात जाण्यानेही काही काम होईल असे नाही. कारण पुढारी आणि प्रशासन हल्ली इतके कोडगे झाले आहेत की तुम्ही तुरुंगात जातो म्हणालात तर म्हणतील, 'जा, जाऊन बसा.' त्यांना हलवण्यासाठी असा कुठेतरी चिमटा काढावा लागतो की त्यामुळे त्यांचे आसन हलायला लागेल. तेव्हा धान शेतकऱ्यांचे आंदोलन करायचे म्हटले तर बाजारामध्ये धान जाता कामा नये, लोकांच्या ताटामध्ये भात पडता कामा नये अशी परिस्थिती तयार करता आली तर ते यशस्वी होईल.

शेतकरी संघटनेने पहिले आंदोलन केले ते कांद्याचे. कांदा हाच विषय का घेतला? सगळ्या हिंदुस्थानात जो कांदा पिकतो त्यातील ४०% एकट्या महाराष्ट्रात आणि त्यातील ४०% कांदा पुणे आणि नाशिक या दोन जिल्ह्यांत पिकतो. या दोन जिल्ह्यांनी कांदे बंद केले तर संपूर्ण हिंदुस्थानात कांद्याचे भाव ५ रुपये, १० रुपये ते अगदी ६० रुपये प्रतिकिलोपर्यंत चढतात आणि मग पंतप्रधानांची खुर्चीसुद्धा डळमळायला लागते. मागच्या वर्षी लासलगावच्या कांदा उत्पादकांचे शिष्टमंडळ पंतप्रधानांना भेटायला गेले तर त्यांना त्यांनी अगत्याने आणि अग्रक्रमाने भेट दिली आणि म्हणाले, 'तुम्ही कांदा उत्पादक म्हणजे मोठे जबरदस्त आहात. तुम्हाला आम्ही फार घाबरतो. तुमच्यामुळे आमची पाच राज्यांतील सरकारे पडली.' अशा तऱ्हेने कांदा थांबवता येतो इतकी ताकद शेतकरी संघटनेकडे

होती म्हणून सुरुवातीच्या काळात संघटनेने फक्त कांद्याचाच लढा सुरू केला आणि जिंकला.

मग शेतकरी संघटनेने उसाचा प्रश्न हाती घेतला. कारण साखरेचेही गणित कांद्यासारखेच आहे. महाराष्ट्राचा हिंदुस्थानातील साखरेचा वाटा असाच परिणामकारक मोठा आहे. म्हणून नाशिक, सांगली, कोल्हापूर, सातारा अशा तीनचार जिल्ह्यांत ऊस कारखान्यांकडे जायचा थांबला तर सगळ्या देशाच्या (साखर)नाड्या आखडतात. हे लक्षात घेऊन तीनचार जिल्ह्यांच्या ताकदीवर ऊसआंदोलन यशस्वी होऊ शकले.

ज्वारीचे आंदोलन असे होईल का? ज्वारीचे आंदोलन करायचे असेल तर संघटना किती मोठी पाहिजे? महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश या चारही राज्यांमध्ये पंधरावीस टक्के ज्वारी तयार होते. तेव्हा, आंदोलनासाठी या चारही राज्यांत संघटना मजबूत असल्याशिवाय आंदोलन उभे करून काही उपयोग होणार नाही.

धानाची परिस्थिती तर त्याहून बिकट. हिंदुस्थानात धान न घेणाऱ्या घरी भात खाल्ला जातो त्याचा तांदूळ प्रामुख्याने पंजाबमध्ये पैदा झालेला असतो. पंजाबचे शेतकरी सगळ्यात जास्त धान पिकवतात, पण स्वतः भात खात नाहीत. हरियाणातही धान पिकते आणि तेथूनही तांदुळाचा पुरवठा देशभर होतो. म्हणजे, धानाच्या भावाचे आंदोलन करायचे तर त्यात पंजाबचे किसान हवेत, हरियाणाचेही हवेत, ओरिसा, बंगाल, आसाम, आंध्र प्रदेश, कर्नाटक येथील शेतकरीही त्यात पाहिजेत. महाराष्ट्रातसुद्धा भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यांच्या बरोबरीने कोकणातील शेतकरी आंदोलनात उतरावे लागतील तरच धानाच्या भावाच्या आंदोलनात कांदा-उसाच्या आंदोलनासारखी परिणामकारकता येऊ शकेल. आपली संघटना एवढी मोठी असती तर धानाचे आंदोलन करता आले असते; पण संघटना नाही म्हणून आंदोलन नाही आणि आंदोलन नाही म्हणून संघटना नाही अशा चक्रात धानाचा शेतकरी अडकला होता. आज केवळ महाराष्ट्रच नव्हे तर देशातील किमान दहा राज्यांत शेतकरी संघटनेची ताकद तयार झाली आहे आणि त्या ताकदीच्या भरोशावर शेतकरी संघटना एका अर्थी माहेरी आली आहे, धानाच्या शेतकऱ्यांसाठी केलेला निश्चय पुरा करण्यासाठी धानाचा प्रश्न हाती घेऊन पुढे आली. आता धानाच्या शेतकऱ्यांनी जागे राहून लढायची तयारी ठेवली पाहिजे.

२ ऑक्टोबर, २००० या गांधी जयंतीच्या दिवशी मी हरियाणामध्ये पानिपतला गेलो. तिथे यंदा पहिली धानाची लढाई झाली. त्यांच्याकडील तांदूळ म्हणजे बासमतीसारखा चांगला लांबसडक. शेतकऱ्यांनी धान पिकवला, बाजारात आणला

आणि सरकारी धान्य महामंडळाचे लोक म्हणायला लागले की हे धान काही आम्ही विकत घेणार नाही, घेतले तर कमी भावात घेऊ. कारण, हे धान मोडके आहे, सडके आहे, डागाळलेले आहे. आम्ही त्या सरकारी अधिकाऱ्यांशी बोलणी केली. 'वरच्या तुसाला डाग आहे; पण आतल्या दाण्याला काही डाग नाही. रेशनिंगसाठी धान भरडून तांदूळच देणार आहात तेव्हा डागाचा काही प्रश्न नाही.' असे म्हटल्यावर त्यांनी आणखी सबब सांगितली की दाणा मोडका आहे. मग आम्ही पंजाबमधील कृषी विद्यापीठाच्या तज्ज्ञांना बोलावून त्यांच्याकडून धानाची तपासणी केली. ते म्हणाले, ''हा तांदूळ संपूर्ण चोख नाही, खराब आहे; पण पाचदहा टक्केच खराब आहे. एवढं चालतं.'' मग आम्ही पानिपतला धानाच्या शेतकऱ्यांची परिषद घेतली आणि तेथील मंचावरून मी घोषणा केली, की सरकार जोपर्यंत आमचे हे धान खरेदी करीत नाही तोपर्यंत यापुढे हरियाणा आणि पंजाबमध्ये रस्त्यावर वाहने चालणार नाहीत. दोन्ही राज्यांमध्ये रास्ता रोको असा करू' आणि वेळही न घालवता परिषदेच्या ठिकाणाजवळच दिल्लीकडून अंबाल्याला जाणारा 'ग्रँट ट्रंक रोड' नावाचा इतिहासप्रसिद्ध रस्ता सभा संपल्याबरोबर परिषदेला आलेल्या सर्व किसानांनी अडवला. मॅजिस्ट्रेट आले, पोलिस आले; पण त्यांची थोडी पंचाईत झाली. नुसतेच शेतकरी असते तर त्यांनी पकडापकडी, पांगवापांगवी केली असती; पण मंत्रिपदाच्या पातळीवरील मी दिल्लीहून येऊन आंदोलनात बसलो होतो आणि अशा प्रसंगी अशा व्यक्तीवर काय कारवाई करावी याबद्दल पोलिसांच्या पुस्तकात कुठे काही लिहिलेले नाही. ३ ऑक्टोबरला मी दिल्लीला माझ्या कार्यालयात गेलो आणि भारतीय अन्नमहामंडळाच्या अधिकाऱ्यांना बोलावून घेतले आणि त्यांना विचारले, 'धान खरेदी करण्यात तुमची अडचण काय आहे?' त्यांनी हे धान खरेदी केले तर कसे नुकसान होईल वगैरे सांगितले. मी विचारले, 'किती नुकसान होण्याची शक्यता आहे?' ते म्हणाले, 'तीनशे कोटी रुपये!' मी त्यांना म्हटले, ''सरकारी नोकरांना पाचवा वेतन आयोग लागू करताना तीन हजार कोटी रुपये उधळायला सरकारला काही वाटत नाही आणि धानाच्या शेतकऱ्यांनी घाम गाळून पिकवलेल्या धानावर तीनशे कोटी रुपयांची खोट घ्यायला तुम्हाला जड जाते?'' दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बातम्या आल्या की सरकारने तीनशे कोटी रुपये मंजूर केले आहेत आणि धानाची खरेदी चालू केली आहे.

धानाची लढाई द्यायची असेल तर महाराष्ट्रातील धानउत्पादकांनी महाराष्ट्रात द्यायची आणि हरियाणातील किसानांनी हरियाणात द्यायची असे करून चालणार नाही. धान सगळ्या हिंदुस्थानभर पिकते, तेव्हा धानाची ही लढाई सगळ्या

हिंदुस्थानभरच्या शेतकऱ्यांना एकत्रितपणे द्यावी लागेल.

आपण लढाई सुरू केली तर तुम्ही तुरुंगात जायला तयार आहात, मीही तुरुंगात जायला तयार आहे हे खरे आहे. पण एखादे वर्ष लढाई द्यायला चांगले असते. यंदाचे वर्ष कसे आहे. हरियाणा आणि पंजाबमध्ये गेल्या वर्षीचे खरेदी केलेले धान अजून गोदामात शिल्लक आहे. हिंदुस्थानात अन्नाचा दुष्काळ होता म्हणता म्हणता इतके उदंड धान्य झाले आहे की त्याला बाजारपेठ उपलब्ध नाही. गोदामे भरली आहेत म्हणून सरकारी खरेदी यंत्रणा आता धान घ्यायला कां कू करीत आहे. त्याच गोदामांमध्ये दोन महिन्यांच्या आत गहू भरावा लागणार आहे. तो कोठे ठेवावा असा प्रश्न त्यांच्यापुढे आहे. लढाई लढवायची असेल तर आपली बाजूही भक्कम असली पाहिजे. तुम्ही जर म्हणालात की आम्ही पाहिजे तितके धान आज पिकवू आणि त्या सगळ्या धानाला आम्ही सांगतो तितका भाव मिळायला पाहिजे तर मिळू शकतो, नाही असे नाही. पण काम तितकं कठीण. जन्मभर तुमच्या धानाला भाव मिळावा, तुमच्या मुलांनी पिकवलेल्या धानाला भाव मिळावा, नातवांनीही पिकविलेल्या धानाला भाव मिळावा अशी जर तुमची अपेक्षा असेल तर तुम्हाला यंदा नाही तरी या आयुष्यामध्ये, या पिढीमध्ये एकदोनदा तरी माझे ऐकायला लागेल आणि आंध्रातल्या शेतकऱ्यांनी जसे ठरवले की तंबाखूला जर इतका कमी भाव मिळत असेल तर आम्ही एकदोन वर्ष तंबाखू पिकवतच नाही, तसे तुम्हाला धान्याच्या बाबतीत करावे लागेल. नोकरदारांचे पाहा. ते जे मागतात ते मिळते. कारण, देत नाही म्हटले तर ते लगेच संपावर जातात. एखाददुसऱ्या वर्षी घरात वापरायला लागतात तेवढी धानाची पोती बाजूला ठेवा आणि नवीन धान पिकवायचेच नाही असे ठरवा. घरात धानाची पोती ठेवली आहेत त्यावर वर्षभर गुजराण सहज होऊ शकेल अशी तयारी ठेवली तरच या लढाईत जिंकायची शक्यता आहे.

या कार्यक्रमासाठी कसून तयारी करावी लागेल. धानाचा शेतकरी लहान लहान गावांमध्ये विखुरलेला, गावाला जायला रस्ता नाही, गावात वीज नाही, टेलिफोन नाही, एकमेकांशी संपर्क साधायला इतर काही साधन नाही अशा अवस्थेत सगळ्यांना एकत्र करणे जमायला हवे. एकएक काडी मोडता येते, सात काड्या एकत्र झाल्या तर त्यांना मोडता येत नाही हे लक्षात घेतले आणि सगळ्या राज्यांतील धानाचे शेतकरी एकत्र आले तर आपले आपल्या मुलाबाळांचे, नातवंडांचे भविष्य चांगले असेल.

काळ फार कठीण आहे. आपण मागासलेले आहोत. जगभरची बाजारपेठ खुली होते आहे. जगाच्या बाजारपेठेतसुद्धा भारतातील धान शेतकऱ्यांच्या दृष्टीने

एक गोष्ट महत्त्वाची आहे. बाकीच्या वस्तूंच्या बाबतीत जगात इतरत्र तयार होणाऱ्या वस्तू चांगल्या आणि आपण त्यांची नक्कल करायची अशी स्थिती आहे. धानाच्या बाबतीत नेमकी उलट परिस्थिती आहे. हिंदुस्थानातील तांदूळ जगामध्ये एक क्रमांकावर आहे. हिंदुस्थानच्या बासमतीला तोड नाही म्हणून अमेरिकेत टेक्समती नावाने त्याची नक्कल करायला पाहतात.

**कसळ कसा आला आहे?**

देशभरात खुल्या व्यवस्थेच्या नावाने कितीही आरडाओरड झाली तरी तिला आपण थोपवू शकत नाही. तेव्हा जे अटळ आहे त्याला घाबरून मागे फिरण्याऐवजी त्याचा सामना करणे केव्हाही सन्मानाचे होईल. मागे आहे ज्या सुरक्षित व्यवस्थेच्या नावाखाली शेतकऱ्यांना लुटणारी कसाई धोरणे राबविणारी सरकारशाही. आपला देश कमकुवत राहिला, अनेक बाबतीत मागास राहिला याला कारण सरकार आहे. हे सरकार आमचे कधी काळी काही भले करील यावर आमचा विश्वास नाही. त्यामुळे, जागतिक व्यापार संघटना ही संकट नसून तिच्या रूपातून सरकारशाहीच्या पिंजऱ्यातून सुटायचा मार्ग आम्हाला दिसतो आहे. पिंजऱ्याचा दरवाजा उघडा दिसला की वाघ जसा पुढे काय वाढून ठेवले असेल त्याचा विचार न करता बाहेर झेपावतो आणि स्वतंत्र होतो त्याप्रमाणे गुणाकाराची क्षमता बाळगणाऱ्या शेतकऱ्यांनी, विशेषतः त्यांच्या बछड्यांनी खुल्या व्यवस्थेच्या अवकाशात आपल्या बुद्धी आणि ताकदीनिशी झेप घेतली पाहिजे.

सगळ्या शेतकऱ्यांसाठी माझ्या मनात जो कार्यक्रम तयार होतो आहे तो काही मी तुमच्यासमोर ठेवणार नाही कारण तो कार्यक्रम मला राष्ट्रीय कृषिकार्यदलाचा अध्यक्ष म्हणून पंतप्रधानांसमोर मांडायचा आहे.

आज धानाच्या शेतकऱ्यांची परिस्थिती अशी की डोक्यावर मोठे कर्ज आहे, विजेचे बिल थकले आहे, वीज मंडळाचे लोक वीजजोडणी कापायला आले आहेत. आज रात्री जगायचे कसे इथपासून सुरुवात करायची आहे. काही काळामध्ये, सहा महिन्यांमध्ये, वर्षभरात, पाच वर्षात मनुष्य म्हणून सन्मानाने जगता येईल अशी स्थिती कशी काय आणायची हा आपल्यापुढील प्रश्न आहे.

देशाच्या संपूर्ण कृषिकार्यक्षेत्रालाच हा आजार झाला आहे. त्यावर औषध सुचवायला म्हणून पंतप्रधानांनी दिल्लीला बोलावले आहे. त्याच धर्तीवर तुम्हा धानउत्पादकांना मी औषधयोजना सांगणार आहे.

पहिले औषध : तुमच्याकडे वीज मंडळाचा मनुष्य वीज कापायला आला तर त्याला सांगायचे, 'तुमचे मंडळ सध्या घाट्यात आहे काय? आम्ही केव्हाचेच घाट्यात आहोत, तुझ्या सरकारने उणे सबसिडीने सालोसाल लुटल्यामुळे. एका

घाट्यातल्या माणसाने दुसऱ्या घाट्यातल्या माणसाकडे येऊन काय फायदा? ज्यांच्याकडे पैसा आहे त्यांच्याकडे जा. दोनदोनशे कोटींची बिले थकलीत ती करा की वसूल. तोपर्यंत तुला वीजबिलाचा पैसासुद्धा इथे मिळणार नाही. वीज कापलीच तर काय करायचे ते आम्ही बघून घेऊ. मी तुझे काहीही देणे लागत नाही असे म्हटल्यानंतरही तू वसुलीचा तगादा लावला किंवा वीज कापायला आला तर तुला मी दरोडेखोर समजेन आणि स्वसंरक्षणासाठी मला कायद्याने जे अधिकार दिलेत त्यांचा वापर करीन.' त्याखेरीज, नव्यानेच वीज महामंडळाचे अध्यक्ष बनलेले श्री. बन्सल यांनी धमकी दिली आहे की वीज बिलांच्या वसुलीसाठी आम्ही सशस्त्र पोलिसांची तुकडी पाठवू. तिकडे लाल किल्ल्यात कडेकोट पहारा असतानासुद्धा पाकिस्तानचे अतिरेकी सरळ सरळ घुसून पहारेकऱ्यांना मारून पळून निघून जातात तिथे सशस्त्र पोलिस पाठविण्याऐवजी धानशेतकऱ्यांवर काय पाठवता? आपण एक लक्षात ठेवायचे. पोलिस असो का लष्करी जवान असो तो गणवेषात असला तरी तो जर का बेकायदेशीर कृत्य करीत असेल तर त्याला गणवेषातील दरोडेखोर म्हणायला हवे आणि हिंदुस्थानच्या कायद्यामध्ये दरोडेखोरांपासून स्वसंरक्षण करण्यासाठी तुम्हाला जे काही आवश्यक वाटेल ते करण्याची कायदेशीर परवानगी आहे.

दुसरे : बँकांची कर्जे थकली आहेत हे खरे. बँकेची माणसे वसुलीसाठी आली तर त्यांना सांगा, 'आपण समोरासमोर बसू या आणि हिशोब कागदावर लिहू या.' मग, बँकवाला लिहील, 'इतके इतके मुद्दल त्यावर इतके इतके व्याज म्हणजे एकूण देणे इतके इतके' आपण शेतकरी, अशिक्षित. त्यालाच कागद घेऊन लिहायला सांगा, 'माझ्याकडे पाच एकर जमीन आहे. मी सत्तर क्विंटल धान पिकवतो. धान पिकवायचा खर्च येतो क्विंटलमागे १२०० रुपये आणि मला मिळतात ५०० ते ६०० रुपये. म्हणजे दरवर्षी ६०० रुपये प्रतिक्विंटल सरकारच्या लोकांना मी फुकट खाऊ घालतो. म्हणजे एका वर्षाच्या ७० क्विंटलचे ४२००० रुपये. अशी किती वर्षे मी खाऊ घालतो आहे, माझ्या आधी माझा बाप खाऊ घालत होता, त्याच्याआधी माझा आजोबा खाऊ घालत होता. म्हणजे, मी तुम्हाला काही देणे लागत नाही. उलट तुम्हीच मला लाखो रुपये देणे लागता. ते पहिल्यांदा काढा नाहीतर निघा इथून.' एकदा का आपण कोणाचे देणे लागत नाही ही कल्पना स्पष्ट झाली की वसुलीसाठी जो कोणी येतो तो बँकेचा अधिकारी नसतो, तर दरोडेखोर असतो. त्याच्याशी कसे वागायचे ते कायद्याने सांगितले आहे.

तिसरे : सांगली-मिरजच्या अधिवेशनात शेतकरी संघटनेने सगळ्या लोकांना

सांगितले – फक्त शेतकऱ्यांना नाही – की सरकार नावाच्या गोष्टीला एक पैसासुद्धा देऊ नका. कारण, सरकार हे दारूड्या नवऱ्याप्रमाणे झाले आहे. दारूड्या नवरा कामधाम काहीच करीत नाही. त्याची बायको बिचारी काबाडकष्ट करून मुलाबाळांना जगवण्याची धडपड करते, कसेबसे घर चालवायचा प्रयत्न करते. नवरा मात्र तलफ आली की बाहेर जाऊन कुठून कुठून पैसे जमवतो, त्याची दारू पितो आणि घरी येऊन वर बायकोपोरांना मारतो. या दारूड्या नवऱ्याला जर का बायकोने पैसे दिले तर तो आणखी दारू पिईल, बायकोपोरांना आणखी मारील. तेव्हा शहाणी बायको दारूड्या नवऱ्याच्या हाती एकही पैसा देत नाही. तसेच, आपल्या देशातले सरकार आहे. त्याला एक रुपया दिला तर त्यातले सत्तर पैसे तो सरकारी नोकरांना देतो – जे काहीही काम करीत नाहीत, काम करायचे म्हटले तर लगेच हात पुढे करतात; कामे होण्यापेक्षा कामे खोळंबून कशी राहतील अशीच धडपड करतात. म्हणजे तुम्ही दिलेल्या रुपयातील सत्तर पैसे देश बुडविणाऱ्या लोकांना देणारे सरकार हे दारूड्या नवऱ्यासारखेच आहे. तेव्हा यापुढे या दारूड्या नवऱ्याला एक पैसाही देऊ नका. बँकांची कर्जे देऊ नका, विजेची बिले देऊ नका, कोणतेही कर देऊ नका, सेस भरू नका. हा कार्यक्रम कठोरपणे राबवला तरच देश सुधारायची आशा आहे.

ही तीन औषधे दरवाजावर उभ्या राहिलेल्या आजारांसाठी झाली. पण तेवढ्याने प्रश्न सुटत नाही. आता याच्यापुढे सरकारपुढे जाऊन 'आम्हाला एक क्विंटल धान्य पिकवायला १२०० रुपये खर्च येतो आणि मिळतात फक्त ५४० तर उरलेले ६६० रुपये द्या' म्हणून मागणी केली, तर सरकार म्हणेल वरचे ६६० रुपये कसले मागता, यंदा आम्ही गेल्या वर्षीपेक्षा ६० रुपये कमीच देणार आहोत. ही नुसती कल्पना नाही. गव्हाच्या बाबतीत हे घडते आहे. खरोखरी, पुढच्या वर्षी धानाला ५०० रुपयेसुद्धा भाव मिळणार नाही ही शक्यता लक्षात ठेवूनच पुढची आखणी करायला हवी.

१२०० रुपये खर्चायचे आणि ५०० रुपये मिळवायचे या घाट्याच्या धंद्यातून मार्ग कसा काढायचा? माझा उपाय असा की आम्हाला आता सरकार नकोच. शेतकरी संघटनेच्या आधीच्या घोषणेत 'हवे घामाचे दाम' असे शब्द होते, आता 'घेऊ घामाचे दाम' असे आहेत. तेव्हा शेतीमालाचे भाव 'घेण्या'साठी काय करायचे हे आपणच ठरवायला हवे, ते सरकारचे काम नाही. आपल्याला आता अशी व्यवस्था करायला हवी की आमची जमीन, आमची माणसे, जरूर भासल्यास कर्ज गोळा करून आमचे भांडवल आणि चांगल्यात चांगले बियाणे, चांगल्यात चांगले पीक, चांगल्यात चांगले उत्पादन काढून खर्च करू, तयार झालेला माल

साठवण्याची व्यवस्था करू, त्यावर प्रक्रिया करून कुरमुरे, चुरमुरे, चकल्या जो काही पक्का माल तयार करू, देशभरच्या बाजारपेठेत विकायची व्यवस्था करू आणि परदेशातही पाठवायची व्यवस्था करू. असे जर झाले तर किती भाव मिळेल? भाव किती मिळेल हे आज नाही सांगता येणार. पण आज १२०० खर्च करून ६०० च मिळतात, इतके कमी मिळणार नाहीत याची मला खात्री आहे. अर्थात्, त्यासाठी मोठ्या प्रमाणावर जमिनी एकत्र करून शेतकऱ्यांची कंपनी तयार करायला हवी.

सध्या जमीन पिकवून काय मिळते? एकरी ७००० रुपये तोटा होतो असा धानाच्या शेतकऱ्यांचा अनुभव आहे. हीच जमीन भाडेपट्टीने द्यायची झाली तर नागविदर्भ भागामधील भाव एकरी १००० रुपये आहे.

म्हणजे, या भागातील तरुणांना एकत्र येऊन अशी एखादी कंपनी तयार करता येईल की जी शेतकऱ्यांच्या जमिनी एकत्र करील, ते करताना शेतकऱ्यांना एकरी वार्षिक ११०० रुपये मिळण्याची हमी देईल, या एकत्र शेतीवर जे काही पीक घेतले जाईल त्यात होणाऱ्या कामात जमीनमालक शेतकरी कुटुंबांना प्राधान्य देऊन इतर कंपन्यांच्या धर्तीवर श्रममोबदला दिला जाईल, कंपनीच्या शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जागतिक स्पर्धेत उतरेल आणि टिकेल असे उत्पादन काढील, त्याच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापाराची सोय करील आणि त्यातून जो काही निव्वळ नफा होईल तो डिव्हिडंडच्या रूपाने शेतकऱ्यांना त्यांनी कंपनीत गुंतविलेल्या जमिनींच्या प्रमाणात पोहोच करण्याची व्यवस्था करील. अशा प्रकारची व्यवस्था उभी करण्याचे तरुणांनी ठरवले तर शेतकऱ्यांप्रमाणेच, सरकारशाहीला विटलेले, सरकारशाहीच्या जोखडातून मुक्त होण्यास आतुरलेले अनेक व्यावसायिकही त्यांच्या पाठीशी उभे राहतील.

नागविदर्भ परिसरातील या धानउत्पादक शेतकऱ्यांघरच्या तरुणांनी असे धाडस करून 'नागविदर्भ धान कॉर्पोरेशन' सारखी एखादी कंपनी उभी करण्याचा निर्धार केला तर ते खऱ्या अर्थाने पिंजऱ्याच्या उघड्या दारातून बाहेर झेपावून स्वतंत्र होणाऱ्या वाघाचे कृत्य ठरेल.

*(१७ जानेवारी २००१ – धान परिषद, रामटेक, जि. नागपूर)*

*(शेतकरी संघटक ६ फेब्रुवारी २००१)*

■■

# नांगर मोडून तलवार घ्या हाती

कृष्णा खोरे प्रकल्पाच्या उभारणीसंबंधी चाललेली चालढकल, अनुशेषाच्या नावाखाली पैसे भरून कनेक्शन न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे विजेच्या बाबतीत होणारे हाल आणि शेतकरी संघटनेने प्रदीर्घ लढा देऊन उसावरील जी झोनबंदी उठविण्यात यश मिळविले ती झोनबंदी छुप्या मार्गाने आणण्याचा सरकारचा प्रयत्न या सर्व गोष्टींनी पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी जेरीस आला आहे. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना तळमळ लागली की या परिस्थितीत शेतकऱ्यांची बाजू घेण्यासाठी काही तरी करायला पाहिजे. काय करता येईल ते ठरविण्यासाठी सांगलीतील आजचा हा मेळावा आहे. केवळ दहा दिवसांच्या प्रचाराने एवढ्या मोठ्या संख्येने शेतकरी जमा झाले ही विशेष बाब आहे. जवळ वाहने नाहीत, इतर काही साधने नाहीत अशा परिस्थितीत इतक्या सर्वांना या मेळाव्याचा निरोप येथील कार्यकर्त्यांनी दिला याबद्दल त्यांचं कौतुक करावं तेवढं थोडंच होईल.

सरकारची शेतकरी धोरणं दुष्ट आहेत आणि त्यांचा विरोध करण्यासाठी मी काहीतरी असा जालीम कार्यक्रम द्यावा की सगळे प्रश्न एका झटक्यासरशी सुटून जातील अशी हा मेळावा भरवणारांची आणि मेळाव्याला आलेल्या तुम्हा सर्वांची अपेक्षा दिसते. असा एका फटक्यात रोग घालविण्याचे औषध सांगणारा डॉक्टर मी नाही. असे डॉक्टर येऊन गेले आणि औषधाच्या नावाखाली ते आपल्याला विष पाजून गेले हा आतापर्यंतचा आपला अनुभव आहे.

मी वीस वर्षांपूर्वी सांगलीला सभा घेण्यासाठी आलो होतो तेव्हा या भागातील सगळं वातावरण सहकारमय होतं. ज्यांनी ज्यांनी सहकारी कारखाने काढले ते सर्व शेतकऱ्यांचे देव होते. शेतकऱ्यांचे जे काही कल्याण झालेले आहे ते केवळ साखर कारखान्यांमुळे, त्यांच्याविषयी जरासुद्धा वेडंवाकडं बोलायचं नाही असं वातावरण इथं होतं. अशा त्या काळामध्ये मी गावोगाव सभा घेतल्या. त्यात दोन प्रमुख मुद्दे मी मांडले. पहिला मुद्दा – ज्वारी पिकवा का ऊस पिकवा, शेतकऱ्याच्या

डोक्यावरचं कर्ज हटायची शक्यता नाही; उलट साखर कारखाने जितके वाढतील तितकं शेतकऱ्याच्या डोक्यावरचं कर्ज वाढतं आहे आणि त्याचं कारण, शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळता कामा नये हे सरकारचं अधिकृत धोरण आहे. हे त्यावेळी कोणाला पटत नव्हतं. हे टनाटनाचे पुढारी काय करायचे? सगळ्या शेतकऱ्यांना सहकाराच्या नावाखाली दावणीला बांधायचे आणि मुंबई, दिल्लीच्या दरबारात जाऊन सांगायचे, 'शेतकऱ्याच्या मालाला भाव दिला नाही, त्याच्या बापाला लुटलं, आजोबाला लुटलं तरी हे इतके शेतकरी माझ्या हाती आहेत. मला तुम्ही काय देता, बोला.' पुढाऱ्यांचा हा खेळ पंचवीसतीस वर्षांपूर्वीपासूनच चालू आहे, हा काही आजचा नवा खेळ नाही आणि या भागातले लोक मानायला तयार नव्हते तरी पंचवीस वर्षांपूर्वी पुढाऱ्यांचा हा डाव मी उघड करून सांगितला.

आज सर्वसामान्यांच्यासुद्धा लक्षात येणाऱ्या सरकारच्या दुरवस्थेबद्दल मी दहाबारा वर्षांपूर्वी लेख लिहिले आहेत. मी त्यात म्हटले आहे की शेतकऱ्यांचं शोषण करणारं सरकार कधी जगू शकत नाही. असं सरकार कधी ना कधी कोसळणारच; फक्त नेमकी वेळ कधी येणार त्याची वाट पाहणेच आपल्या हाती राहते. सरकार कोसळायला लागले म्हणजे काय काय होईल याची यादीच मी त्यावेळच्या लिखाणात दिली आहे. गावातल्या वाण्याचं दिवाळं निघालं म्हणजे त्याच्या दुकानाची फळी बंद होते. फळी बंद म्हणजे दुकान बंद. मुंबईचं मंत्रालय असं फळी बंद करून बंद होत नाही. ते महाचिवट, चिकटून राहातं. सरकार कोसळत आहे हे ओळखायची लक्षणं मी माझ्या लिखाणात मांडली आहेत. सबंध देशामध्ये आगगाडीचे अपघात दररोज व्हायला लागतील, रस्त्यावर टेंपो, ट्रक्स, बसेस समोरासमोर धडकायला लागतील, एकेका अपघातामध्ये पाचदहा नाही, शंभरदोनशेने माणसं मरायला लागतील, घरामध्ये वीज असायला पाहिजे हे खरे असले तरी वीज कधीतरी येईल, आगगाड्या वेळेवर यायच्या नाहीत, कधी वेळेवर आल्यासारखी वाटले तर समजावे की ही आज नव्हे, दोन दिवसांपूर्वी येणारी गाडी आहे. सरकार कोसळू लागले की असा सगळा कारभार होऊ लागतो.

आज आपलं काम हे सगळं काय आणि का होतं आहे हे शांत डोक्यानं समजून घ्यायचं आहे. काही दिवसांपूर्वी कोणी उसासंबंधी मुंबईला एक बैठक घेतली, पुण्याला एक बैठक घेतली आणि त्यानंतर उसाच्या परिस्थितीबाबत जी निदानं आणि उपाय सांगितले ते पाहिले की उसातल्या या तथाकथित दादा लोकांना जागतिक व्यापार संस्था म्हणजे काय हे कळलेलंसुद्धा नाही, WTO म्हणजे काय हे वाचण्याचीसुद्धा ज्यांना अक्कल नाही ते WTO संबंधी बोलू

लागले आहेत हे स्पष्ट होते. त्यांच्या मनाला झोंबतं एकच – शेतकऱ्याला स्वातंत्र्य देता कामा नये. हे स्पष्ट म्हणता येत नाही म्हणून ते फक्त म्हणतात, 'जागतिक व्यापार नको, जागतिक व्यापारसंस्था नको.'

आपल्याला हे नेमकं काय होत आहे हे शांत डोक्यानं समजून घ्यायचं आहे. आपण दरदिवसाआड कार्यक्रम आणि विचार बदलणारे लोक नाहीत. नीट आठवण केली तर आपल्या हे लक्षात येईल की पंचवीस वर्षांपूर्वी शेतीच्या प्रश्नावर जे निदान मी कार्यकर्ता म्हणून तुमच्यासमोर मांडलं, जे मांडण्याकरिता म्हणून नंतर विश्वनाथ प्रतापसिंगांनी मला सल्लागार म्हणून बोलावलं आणि सध्याच्या पंतप्रधानांनीही जागतिक व्यापार संस्थेच्या संदर्भात सल्ला देण्यासाठी मला बोलावलं – या सर्व वेळी माझ्या मांडणीमध्ये एका शब्दाचाही फरक पडलेला नाही.

एक दाणा पेरून शंभर दाणे पिकवणारा शेतकरी कर्जबाजारी होतो कारण शेतकऱ्याला लुटणं हा साऱ्या व्यवस्थेचा गुणधर्म आहे. शेतकऱ्यांना जगायचं असेल तर 'आंधळं दळतं आणि कुत्रं पीठ खातं' अशी शेती करून चालणार नाही. जात्यावर दळायला बसलं की जवळ एखादी छडी ठेवायला लागते आणि कुत्रं जर का जात्यातून पडणारं पीठ खायला येऊ लागलं तर त्याला सटका हाणायला लागतो तरच जात्यातलं पीठ तुमच्या पोराबाळांच्या आणि तुमच्या पोटात जाईल.

मी जे पंचवीस वर्षांपूर्वी सांगितलं ते घडतं आहे. शेतकरी आधी कर्जबाजारी झाला, सरकारच्या करणीनं कर्जबाजारी झाला. पण 'केलं तुकां आणि झालं माकां' अशी सरकारची अवस्था झाली आहे. शेतकऱ्याचं दिवाळं काढायला गेलेलं सरकार हळूहळू स्वतःच दिवाळखोर झालं. स्वतःची कर्ज फेडण्याची ऐपत त्याच्याकडे राहिलेली नाही; नोकरदारांचे पगारसुद्धा देण्याइतके पैसे त्याच्या तिजोरीत शिल्लक नाहीत. शेतकऱ्याला बुडवायला गेले आणि स्वतःच पाण्यात बुडले. या परिस्थितीत जे काही बदल होऊ लागले आहेत ते आपल्या समोर येऊ लागले आहेत.

फेब्रुवारी २००२ मध्ये केंद्रीय अर्थमंत्री यशवंत सिन्हांनी सांगितलं की यंदाचं वर्ष हे शेतकऱ्याचं स्वातंत्र्यवर्ष आहे. १९८० साली शेतकऱ्यांना स्वातंत्र्य हवे आहे अशी घोषणा आपण पहिल्यांदा केली. १९८४ साली परभणीला भरलेल्या शेतकरी संघटनेच्या अधिवेशनाची विषयपत्रिकाच 'सौराज्य मिळवायचं औंदा' अशी होती. १५ ऑगस्ट १९४७ आला आणि गेला, शेतकरी गुलामच राहिला, शेतकऱ्याचं स्वातंत्र्य अजून यायचंच आहे हे शेतकरी संघटना गेली २० वर्षे

सातत्यानं सांगत आहे. यंदा २८ फेब्रुवारीला यशवंत सिन्हांनीही सांगितले की शेतकऱ्यांचं स्वातंत्र्य यायचं आहे. २३ मार्चला महाराष्ट्राचे वित्तमंत्री जयंत पाटील यांनी मुंबईत जाहीर केलं की वर्षानुवर्षे शेतकऱ्यांवर अन्याय करणारी कापूस एकाधिकार खरेदी योजना आता आम्ही संपवणार आहोत. सगळे पुढारी या योजनेवर घट्ट मांड ठोकून बसले होते ती बंद करण्याची तयारी त्यांना करावी लागली. २६ मार्चला आणखी एक घटना घडली. जगभरचे कापूस उत्पादक शेतकरी एका नवीन वाणाचं बियाणं वापरतात आणि एकरी ३५ क्विंटलपर्यंत कापूस पिकवतात. पण आपलं सरकार भारतातल्या शेतकऱ्याला मात्र हे बियाणं वापरायला गेली सात वर्षे परवानगी नाकारीत होतं. गेल्या २६ मार्चला सरकारला ही परवानगी द्यायला लागली आणि ३१ मार्चला दिल्लीला केंद्रीय व्यापारमंत्र्यांनी जाहीर केलं की शेतकऱ्याच्या शेतीमालाच्या निर्यातीवर काहीही बंधनं राहणार नाहीत. अपवाद फक्त कांदा, ताग आणि बियाणं.

आता हे स्पष्ट होत आहे की शेतकऱ्याच्या हातापायातल्या दंडबेड्या तुटत चालल्या आहेत. एका काळी 'उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी' अशी स्थिती होती. स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरू, इंदिरा गांधी यांच्या कृपेने परिस्थिती पालटली. 'उत्तम शेती'तला शेतकरी, पाचसहा एकर जमीन विकावी लागली तरी पोराला निदान चपराश्याची तरी नोकरी मिळू द्या म्हणून प्रयत्न करायला लागला. आता पुन्हा एकदा 'नोकरी कनिष्ठ' आणि 'शेती श्रेष्ठ' होण्याचे दिवस आपल्यापुढे येत आहेत.

मात्र सरकार अजूनही माथेफिरूप्रमाणे वागते आहे. विदर्भ, मराठवाड्याचा अनुशेष बाकी आहे, पश्चिम महाराष्ट्र सुधारलेला, पुढारलेला आहे म्हणत सुधारलेल्या भागाचे पाय कापण्याची धोरणं सरकार आखू पाहात आहे. पश्चिम महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांनाही पूर्वी असं वाटायचं की आपण खरंच सुधारलेलो आहोत; पण इथंही कोणाच्या डोक्यावरची कर्ज फिटलेली नाहीत. या भागात अशी काही उदाहरणं घडलेली ऐकिवात नाहीत की कोल्हापूरसारख्या शहरातील एखाद्या कारखानदारानं आपल्या घरातील मुलगी खेड्यातल्या एखाद्या शेतकऱ्याच्या घरी देऊ केली आणि अशी अवस्था असताना विदर्भमराठवाड्याच्या अनुशेषाच्या नावाखाली येथील शेतीच्या विकासासाठी आखलेल्या कृष्णा खोरे प्रकल्पासारखी कामे स्थगित करण्याचा डाव हे सरकार आखीत आहे. त्याही पलीकडे जाऊन, केंद्र सरकार एकीकडे शेतीच्या मालाच्या व्यापारावरील सर्व बंधने काढून टाकावीत असे सांगत असताना इकडे महाराष्ट्रातील सरकार आणि पुढारी अजूनही ऊस शेतकऱ्यांना धमकावतात की आम्ही सांगू त्याच कारखान्याला ऊस द्यावा लागेल.

तो कारखाना १००/२०० रुपये कमी भाव देत असेल तरी त्याच कारखान्याला ऊस दिला पाहिजे. अशी झोनबंदी पुन्हा शेतकऱ्यांच्या माथी मारण्याचा डाव रचला जात आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणाले की उसावर झोनबंदी येणार आहे. झोनबंदी हा माझ्या दृष्टीने अत्यंत मनस्वी विषय आहे. माझी प्रकृती बरी नसताना सतत पाच दिवस उपवास करून, शेतकरी संघटनेच्या लढवय्या पाईकांच्या मदतीने मी ती झोनबंदी उठवली आहे. त्या काळच्या महाराष्ट्र शासनाने झोनबंदी उठवल्यानंतर साखर कारखानदारांनी हायकोर्टात दावा दाखल केला, तेथे हरल्यावर सुप्रीम कोर्टात गेले. 'शेतकऱ्यांना आपला ऊस आपल्या मनाप्रमाणे विकण्याचं स्वातंत्र्य मिळता कामा नये; आम्ही भाव कमी देत असलो तरी आमच्याच कारखान्याला ऊस घातला पाहिजे' ही त्यांची भूमिका आणि शेतकऱ्यांची बाजू मांडायला एकही वकील उभा राहायला तयार नव्हता. अशा परिस्थितीमध्ये सुप्रीम कोर्टाकडून विशेष परवानगी घेऊन साखर कारखानदारांच्या मोठमोठ्या वकिलांच्यासमोर मी स्वत: ऊस शेतकऱ्यांची कैफियत मांडली आणि आनंदाची गोष्ट म्हणजे सुप्रीम कोर्टाने शेतकऱ्यांची कैफियत ऐकली आणि झोनबंदी उठवण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. अशा तऱ्हेने जीव पणाला लावून उठवलेली झोनबंदी सहजपणे परत आणू आणि शेतकऱ्यांच्या पायात पुन्हा दंडबेडी ठोकू असं जर मुख्यमंत्री किंवा कोणी टनाटनाचे पुढारी किंवा त्यांचे पित्ते म्हणू लागले तर ते कसे ऐकून घेणार?

झोनबंदीचा इतिहाससुद्धा लक्षात घेण्यासारखा आहे. १९८० साली उसाला टनाला शंभर सव्वाशेसुद्धा भाव मिळत नव्हता. शेतकरी संघटनेने १९८० साली उसाच्या भावाचे आंदोलन केले, ३०० रुपये भाव मागितला. अडीचशे ते पावणेतीनशेचा भाव मिळायला लागला. मग शेतकऱ्यांचे नेते म्हणवणारी पुढारी मंडळी आणि साखर सम्राट मंडळी घाबरली. कारण, संकेश्वरच्या कारखान्याने आधीच जाहीर केलं की पुढील हंगामात आम्ही उसाला साडेतीनशेचा भाव देणार. पुढाऱ्यांच्या पोटात गोळा उठला की कारखाने जर एकमेकांत अशी स्पर्धा करू लागले तर 'सहकारातला मलिदा' खायचा कसा? आणि मग त्यांनी उसावर झोनबंदी आणली. कारखान्यांत सुरू होणारी स्पर्धाच मोडली आणि शेतकऱ्यांना ज्या दावणीला बांधले त्या दावणीलाच बांधून राहून ऊस देणे भाग पाडले – भाव मिळो, न मिळो. ही त्याकाळी मुख्यमंत्री असलेल्या शरद पवारांची युक्ती; पण आता अशी युक्ती चालायची नाही. मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसून राहायचं असेल तर आता कोणीही झोनबंदीचं नावंसुद्धा काढू नये असा शेतकरी संघटनेचा

इशारा आहे.

हा काय भेद आहे? यामागचं इंगित काय आहे ते समजून घ्यायला पाहिजे. म्हणजे मग आपल्याला त्यावरील औषध शोधून काढता येईल.

११ सप्टेंबर २००१ ला न्यूयॉर्कच्या मॅनहॅटन भागामध्ये, जेथे उंच उंच इमारती आहेत तेथे दोन विमानांनी तेथील जागतिक व्यापार केंद्राच्या सर्वात उंच मनोऱ्यांवर धडक मारली. तेव्हापासून दहशतवाद, आतंकवाद हे शब्द रोज वर्तमानपत्रांतून वाचायला मिळायला लागले, प्रसारमाध्यमांतून ऐकायला मिळायला लागले. त्यानंतर १३ डिसेंबरला दिल्लीला संसदभवनावर आतंकवाद्यांनी हल्ला केला. काश्मीरमध्ये तर आतंकवाद्यांनी हैदोस घातला आहे. ज्यांच्या हाती काही सत्ता नाही अशा माणसांनी सरकारशाहीने जेरीस आल्याने कधी त्राग्याने चुकून माकून बंदुकीची भाषा वापरली तर त्याला काही कोणी लगेच दहशतवादी किंवा आतंकवादी म्हणून शिक्का मारण्याची घाई करणार नाही. आज ज्यांना दहशतवादी म्हटलं जातं त्याच लोकांना उद्या स्वातंत्र्याचे अमर शहीद 'भगतसिंग' आणि स्वातंत्र्यवीर 'सावरकर' म्हणून गौरवलं जातं. पण आज आपल्यासमोर जे प्रश्न उभे आहेत – वीज कनेक्शन न देणे, कृष्णा खोरे प्रकल्प पुरा न करणे, उसावर पुन्हा येऊ घातलेली झोनबंदी – ही सर्व सरकारी दहशतवादाची उदाहरणं आहेत. कायदा काही असो, कायद्याप्रमाणे आम्ही वागणार नाही, आमच्या मनाला जे येईल तसंच वागू असं जर सरकारच म्हणू लागलं तर त्याला आणखी काय म्हणायचं? त्या सरकारला दहशतवादीच म्हणायला हवं. या सरकारला ओसामा बिन लादेन म्हणण्याची माझी इच्छा नाही. कारण, लादेन हा मोठा हिमतीचा आणि बुद्धिवान माणूस आहे. ही निवळ खोकडं आहेत. 'ओसामा बिन लादेन' या शब्दांचा अर्थ लक्षात ठेवायला हवा. 'ओसामा' म्हणजे सिंह आणि 'बिन लादेन' म्हणजे डोक्यावर कर्ज नसलेला. 'ओसामा बिन लादेन' म्हणजे 'डोक्यावर कर्ज नसलेला सिंह'! तुम्हाआम्हाला जर 'ओसामा बिन लादेन' होता आलं असतं तर या खोकडांना वाव मिळाला नसता; पण दहशतवाद वापरून कायदा बाजूला ठेवणारी ही सरकारी व पुढारी मंडळी शेतकऱ्याला नाडण्याचा उद्योग करीत आहेत. शेतकऱ्यानं वीज कनेक्शनसाठी अर्ज केला आहे. कनेक्शन मिळण्याचा प्रस्ताव मंजूर झाला आहे, एस्टिमेट मंजूर झालं आहे, शेतकऱ्याने डिपॉझिट भरले आहे, त्याला दहा वर्षे उलटून गेली आहेत तरी सरकार सांगतं आहे की आम्ही तुम्हाला वीज देणार नाही. याला दहशतवाद नाही म्हणायचं तर काय म्हणायचं? कायदा काही असं सांगत नाही की अनुशेष नसेल तर डिपॉझिट भरले तरी शेतकऱ्याला वीज देऊ नये. तरी हे सरकार सर्व

पूर्तता झाली असतानाही वीज द्यायचे नाकारते याचाच अर्थ हे सरकार आतंकवादी आहे.

हे सरकार काय आहे हे आपण सांगली-मिरजच्या अधिवेशनात आधीच जाहीर केले आहे. हे सरकार दारूड्या नवऱ्यासारखं आहे त्यामुळे या सरकारला काहीही देऊ नये असा ठराव आपण त्या अधिवेशनात केला. दारूड्या नवरा, बायकोने गळ्यातलं मंगळसूत्र काढून दिलं तरी तो त्याची दारूच करून पिईल, पोरांच्या पोटाची चिंता करणार नाही. तसंच, या सरकारचं आहे. तेव्हा, सरकारी नोकरांच्या पगारावर आणि पुढाऱ्यांच्या ऐषारामावर सगळे पैसे खर्चणाऱ्या सरकारला एक पैसा देणे म्हणजेसुद्धा देशद्रोह करणे आहे अशी ठाम भूमिका शेतकरी संघटनेने त्या अधिवेशनात घेतली. आज आपल्याला पुढे जाऊन म्हणावं लागतं की हे सरकार म्हणजे केवळ 'दारूडा नवरा' नाही तर ते देशद्रोही आणि आतंकवादी आहे. केंद्र सरकारने आतंकवादाविरुद्ध केलेल्या 'पोटा' कायद्यात एक तरतूद अशी आहे की आतंकवाद्याला जो कोणी आसरा देईल, खाऊ घालील, कपडे देईल, औषधपाण्याची व्यवस्था करील, त्याला काही आर्थिक मदत करेल तोसुद्धा आतंकवादी ठरतो. तेव्हा या सरकारला शेतकऱ्यांनी कोणत्याही स्वरूपात पैसे देऊन त्याला मदत केली आणि मान वाकवली तर तेसुद्धा 'पोटा' कायद्याखाली आतंकवादी ठरतील.

शेतकऱ्यांसंबंधी कोणतीही योजना आली की पुढाऱ्यांची डोकी चालायला लागतात. कृष्णा खोरे प्रकल्पाविषयीही असेच आहे. या प्रकल्पातून या भागातल्या शेतकऱ्याला पाणी मिळालं पाहिजे अशी कळकळ त्यांच्या मनात नाही. या प्रकल्पासंबंधी दिल्लीत जो निर्णय झाला त्याप्रमाणे २००० सालापर्यंत महाराष्ट्रातला शेतकरी कृष्णेतलं जेवढं पाणी वापरेल तितका प्रकल्पाच्या पाण्याचा हिस्सा महाराष्ट्राचा, उरलेला आंध्र प्रदेशचा. मग पुढाऱ्यांच्या डोक्यातून शक्कल निघाली आणि पाणी वापरो ना वापरो, पण महाराष्ट्राचा, कागदोपत्री का होईना, वापर वाढीव दिसावा म्हणून जागोजाग लिफ्ट योजना उभ्या केल्या – दीडदीडशे कोटी रुपये खर्चून उभ्या केल्या; पण त्यांचे विजेचे बिल भरता येईना म्हणून त्या बंद पडू लागल्या. काहीच उपयोग नसणाऱ्या या योजनांचा खर्च शेतकऱ्यांनी काय म्हणून सहन करायचा. योजना उभ्या करताना जो काय फायदा उपटायचा तो तो पुढाऱ्यांनी कधीच गिळंकृत करून टाकलेला. त्यामुळे आता त्या चालू राहतात का बंद याबद्दल त्यांनाही सोयरसुतक नाही. तेव्हा कायदा बाजूला ठेवून, अनुशेषाच्या नावाखाली हा प्रकल्पच थांबविणारं सरकार हे आतंकवादीच आहे.

कायदा बाजूला ठेवणारं 'दारूडा नवरा' सरकार जर असं थैमान घालू

लागलं तर काय करावं? ठिकठिकाणचे कार्यकर्ते माझ्याकडे सल्ला मागतात की, 'काय करावं?'

कायदा काय आहे? जर का एखादा पोलिस अधिकारी किंवा एखादा इन्स्पेक्टर तुमच्या घरी आला – अगदी गणवेशात आला आणि तुमच्या घरात येऊन चोरी करू लागला, तुमच्या घरातील लक्ष्मीला जर हात लावू लागला तर तो गणवेशात असूनसुद्धा पोलिस नसतो, इन्स्पेक्टर नसतो तर तो त्या गणवेशातला दरोडेखोर असतो आणि असा जर कोणी दरोडेखोर आपल्या घरात शिरला तर त्याचं कसं पारिपत्य करायचं त्याचं स्वातंत्र्य प्रत्येक नागरिकाला कायद्यानं दिलेलं आहे, भारतीय दंडसंहितेनं दिलेलं आहे. कोणी भामटा आपल्या घरी आला आणि काही वेडंवाकडं वागू लागला, वेडंवाकडं बोलू लागला, घरच्या मायबहिणींची अब्रू लुटू लागला तर आपण काय कोणा 'शरद जोशीं'ना परिषद भरवून सल्ला द्यायला सांगतो का?

हे सरकार आता केवळ 'दारूडा नवरा' राहिलेलं नाही ते आता माथेफिरू सरकार झालं आहे.

आजपर्यंत रास्ता रोको, ठिय्या आंदोलन, रेल रोको, गावबंदी अशी अनेक प्रकारची हत्यारं मी शेतकऱ्यांच्या हाती दिली. कामगार संप करतील, न्हावीसुद्धा संप करतील, शेतकरी काय करणार? असं लोक म्हणत होते. त्यावेळी मी नवीनवी हत्यारं शेतकऱ्यांच्या हाती दिली – अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी. आता शेतकऱ्यांनी अधिक प्रखर व्हायला हवे.

वीज कनेक्शनसाठी पैसे भरलेत आणि वीज देत नाहीत? काय वाटेल ते करा आणि वीज जोडून घ्या. ती जोडल्यानंतर जर कोणी तोडायला आलं तर त्याचं काय करायचं? तुमच्या घरी जर का कोणी भामटा शिरला आणि घरच्या लक्ष्मीला जर हात लावू लागला तर तुम्ही तिची अब्रू सांभाळण्यासाठी जे कराल तेच करा. शेतकरी हा ताठ मानेचा आहे, भेकड नाही असा जर का तुमचा लौकिक तयार झाला की मग कोणीही साखर कारखानदार, कोणीही मुख्यमंत्री, कोणीही पंतप्रधान तुम्हाला हात लावायला येणार नाही; पण याबाबतीत जर का आपण माघार घेतली, 'शरद जोशींनी सांगितलं खरं पण कुणी पडावं या फंदात, त्यापेक्षा साखर कारखानदाराच्या घरी जाऊ या, त्याचे बूट थोडे पुसू या म्हणजे मग तो आपल्या पोराला नोकरी लावून देईल, जाऊ द्या न मिळे ना का वीज, आपला वशिला तर लागून जाईल' असा विचार केला तर आपण शिवाजी महाराजांचं नाव घ्यायच्या लायकीचे राहणार नाही. जर का ताठ मानेने जगायचं असेल तर ताठ मानेनं जगायचं ठरवावं लागेल; पण जगायचं मेंढरासारखं

आणि मग सारखी तक्रार करीत राहायचं यात काही पुरुषार्थ नाही. आता रडत बसून उपयोग नाही.

**शेतकरी संघटनेने आतापर्यंत दिलेला धडा काय आहे?**

सरकार आणि सहकार हे शेतकऱ्यांना लुटण्याकरिताच आहेत. पुढाऱ्याला यात काय आनंद आहे? हा प्रश्न शेळीने कसायाला विचारण्यासारखंच आहे की, ''बाबा, तुला खायला वांगी आहेत, बटाटे आहेत,..... मग तू माझी मान का कापतोस?'' उत्तर सरळ आहे, 'तो त्याचा धंदा आहे' तो शेळीला एरवी चांगलंचुंगलं गवत खायला देतो, पण वेळ आली म्हणजे मान कापतोच. तसंच, शेतकऱ्याची मान कापल्याशिवाय पुढाऱ्याला आनंद वाटणारच नाही; त्याचा तो व्यवसाय आहे म्हणून तो तुमची मान कापणार आहे. तो तुम्हाला पाणी आणून देतो, काही वेळा कर्ज मिळवून देतो, कारखानाही काढून देतो; थोडं फार भलं करतो. पण ते सर्व कसायानं शेळीला चारापाणी करण्यासारखं आहे. कसाई शेळीला चारापाणी देतो म्हणजे त्याचं तिच्यावर प्रेम आहे असं नाही; त्यात त्याचा व्यावसायिक हिशोब असतो. कापल्यानंतर भरपूर मटन मिळायला पाहिजे म्हणून तो चारापाणी करतो हे कधी विसरू नका.

पाण्याचा प्रश्न तयार झाला, विजेचा प्रश्न तयार झाला, उसाचा प्रश्न तयार झाला; पण हे सर्व प्रश्न तयार करणाऱ्या सरकारचं डोकं का फिरलं आहे हा खरा प्रश्न आहे. सरकारच्या हाती आता पैसा शिल्लक नाही. लोकांशी संपर्क साधायचं त्यांचं मुख्य साधन म्हणजे पोलिस. पोलिसांमुळे सरकारने लोकांचे प्राण वाचवायचे, त्यांच्या घरादाराचे रक्षण करायचे. आता पोलिस अधिकाऱ्यांच्या भरतीत लाखांनी रुपयांची रूढी पडल्यापासून पोलिस खातं असं झालं आहे की ते काही कोणाचं संरक्षण करीत नाहीत, दिवसाढवळ्या खून पडले तरी तिकडे काही तातडीने बघायला जात नाहीत. ज्या नोकरदार पोलिसांवर भिस्त तेच असे झाल्यावर सरकारचं डोकं फिरणारच.

मागच्या कापूसचुकारा आंदोलनाच्या वेळी मुख्यमंत्री म्हणाले की, 'सरकारकडे शेतकऱ्यांना द्यायला पैसे नाहीत तर काय करावे?' मी म्हटले, 'शेतकऱ्याला १०० टक्के किंमत द्यायला पैसे नाही हे ऐकून फार वाईट वाटले. तुम्ही १०० ऐवजी ८० टक्के देणार म्हणता तर मी मान्य करायला तयार आहे. पण एक अट आहे. पुढच्या महिन्यापासून सगळ्या सरकारी नोकरांचे, आमदारांचे, मंत्र्यांचे पगारसुद्धा फक्त ८० टक्के झाले पाहिजेत.'

शेतकऱ्याला काय ती फक्त कपात लावायची, अनुशेष आहे म्हणून शेतकऱ्याला नवीन वीज कनेक्शन द्यायचे नाही, पण अनुशेष आहे म्हणून कोल्हापुरातल्या

कारखानदारांना वीज मिळणार नाही असं म्हणण्याची हिंमत मुख्यमंत्री करीत नाहीत. कारण, तसं म्हटलं तर त्यांची खुर्ची लगेच डळमळायला लागेल. सरकार फक्त शेतकऱ्यापुढेच शौर्य दाखवतं. सरकार संरक्षण देऊ शकत नाही, पैसे देऊ शकत नाही, नोकरदारांचे पगारही देऊ शकत नाही, तुम्हाला शेताला पाणी द्यायला आणि घरामध्ये दिवा लावायला वीज देऊ शकत नाही, प्यायला पाणी देऊ शकत नाही; हे सरकार आहे काय कामाचं? या सरकारला जर वळणावर आणायचं असेल आणि देश वाचवायचा असेल तर यावेळी आवश्यक तर नांगर मोडून तलवार करणे अपरिहार्य आहे. नांगर तोडून तलवार केली तरच देश वाचतो आणि शेतकरी वाचतो. नाहीतर काही धडगत नाही.

ही घोषणा आपण या सांगलीच्या या मेळाव्यात करीत आहोत हे एका अर्थाने यथार्थच आहे. सांगली साताऱ्याच्या या परिसराला एक मोठा लढाईचा इतिहास आहे. यापुढे आपल्याला आपल्या लढाईत आदर्श ठेवावा लागेल तो क्रांतिसिंह नाना पाटलांचा ठेवावा लागेल. इंग्रज राजवटीच्या विरोधात नाना पाटलांनी प्रतिसरकार स्थापन केले आणि इंग्रज सरकारच्या अधिकाऱ्यांना पकडून त्यांच्या पायांना पत्र्या मारीत असत. पुन्हा एकदा मंत्र्यांच्या, आमदारांच्या आणि नोकरदारांच्या पायाला पत्र्या ठोकायची तयारी कराल तरच तुम्ही जगू शकता आणि देशाला जगवू शकता.

गेल्या पंचवीस वर्षांच्या शेतकरी आंदोलनाच्या शेवटी आपल्या या पायरीला येणे भाग पडते आहे. हा लढाईचा उपाय सांगताना तुम्ही लढा, मी कपडे सांभाळतो अशी भूमिका मी घेणार नाही – आजपर्यंत कधीही घेतली नाही. गेल्या वीस वर्षात चोवीस वेळा शेतकरी आंदोलनात तुरुंगात गेलो, शेकडो खटले माझ्यावर लावले गेले. यापुढच्या कार्यक्रमात तुम्ही काही केले आणि तुमच्यावर खटला लागला तर तुम्ही आरोपी असाल; पण तुमच्याबरोबर आरोपी नंबर एक मी असणार आहे. यापुढे माघार घेणे नाही. कारण माघार घेणे म्हणजे गेल्या पंचवीस वर्षात शेतकरी संघटनेने जे जे कमावलं ते फुकट घालवणं आहे आणि तुरुंगात जाण्यात वाईट काय आहे? ज्या घरात प्यायला पाणी नाही, दिवा लावायला वीज नाही, उकडायला लागलं तर पंखा चालवायला वीज नाही आणि कर्जवसुलीकरिता देणेकरी सारखे येत असतात त्या घरात पोराला काय खाऊ घालावं, त्याची फी कशी द्यावी, पास झाला तर कोणत्या कॉलेजात ॲडमिशन घ्यावी, त्यासाठी डोनेशनची रक्कम कोठून आणावी एवढ्या चिंता बाळगत बसण्यापेक्षा, सर्व चिंतांतून मुक्ती मिळविण्याचा एक मोक्षमार्ग भगवान कृष्णाचा जन्म जेथे झाला त्या तुरुंगातून जातो, तेथे जायची तयारी ठेवायला काय हरकत

असावी. अशी तयारी ठेवली तरच हे प्रश्न सुटतील.

या बाबतीत जर कुणी काही मखलाशी करायला लागलं तर त्याला ठणकावून सांगा की सरकार हे शेतकऱ्याच्या भल्याकरता नसतं, हा अनुभव आम्ही पंचवीस वर्षे घेतला. आता आमच्या स्वतःच्या पायावर उभं राहून आम्ही स्वाभिमानानं जगणार आहोत. आम्हाला मंत्री होण्याची इच्छा नाही, कारखान्याचे चेअरमन व्हायची इच्छा नाही, आम्हाला इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने आणि सुखाने जगता यावे एवढीच इच्छा आहे. याकरिता, शिवाजी महाराजांच्या काळाप्रमाणे, आवश्यक तर नांगर मोडून तलवार हाती घ्यायची तयारी आम्ही केली आहे.

पंचवीस वर्षांपूर्वी मी जेव्हा हा शेतकरी स्वातंत्र्याचा जागर सुरू केला तेव्हा शरीरात जोम होता. आज गेल्या पंचवीस वर्षांतील दगदगीने, दरम्यानच्या काळातील आजाराने, शस्त्रक्रियांनी शरीर विकल झाले आहे; तुमच्यासमोर बोलायचे तरी बसूनच बोलावे लागते. आता, डोळे मिटायच्या आधी, पंचवीस वर्षांपूर्वी मी जो यज्ञ चालू केला त्या यज्ञाचं फळ म्हणून महाराष्ट्रातील शेतकरी ताठ मानेने आणि सन्मानाने जगायला लागला आहे हे दृश्य तुम्हा सर्वांच्या कर्तृत्वाने मला पाहायला मिळालं तर माझं आयुष्य सार्थक झालं असं मी मानेन.

*(२५ मे २००२ - शेतकरी मेळावा, सांगली.)*

*(शेतकरी संघटक ६ जुलै २००२)*

■■

# चला, हत्यारे परजून घेऊ या

गेल्या लोकसभा निवडणुकांच्या प्रचारसभांमध्ये मी आवर्जून सांगत होतो की फारा वर्षांनी भारताला अटलबिहारी वाजपेयींसारखं सर्वांना सामावून घेऊन सर्वांना सांभाळून नेणारं, आपल्या पक्षातल्या अतिरेक्यांनासुद्धा थोडा वेळ थंड बसवणारं आणि स्वदेशी जागरण मंचासारख्यांचा कार्यक्रम बाजूला ठेवूनसुद्धा खुल्या व्यवस्थेला पुढे नेऊन देशाला प्रचंड आर्थिक विकासाची गती देऊन देश जागतिक आर्थिक महासत्ता बनू शकतो असा आत्मविश्वास देणारं नेतृत्व लाभलं आहे.

हे नेतृत्व खरंच असं होतं, पण आपण असे करंटे निघालो की त्या नेतृत्वाला आपण पुन्हा सिंहासनावर बसवू शकलो नाही. मी खासदार झालो म्हणून सत्कार स्वीकारताना माझ्या मनात खंत आहे, की अटलबिहारी वाजपेयींसारखं नररत्न आमच्या हातात होतं पण त्या माणसाला आपण पुन्हा पंतप्रधान करू शकलो नाही.

मी खासदार झालो, राज्यसभेत गेलो तेव्हापासून काय काय होतं आहे त्याचा अभ्यास करीत आहे. बाळासाहेब ठाकरेंचा शेती हा काही विषय नाही, जसा हिंदुत्व हा माझा विषय नाही; पण त्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची आणि मोफत विजेची घोषणा केली. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी शेतकरी संघटनेचं ९ ऑगस्टचं आंदोलन सुरू व्हायच्या आधी मला सांगितलं की लवकरच मोफत विजेची घोषणा करतो आहोत, कृपा करून तुम्ही आंदोलन चालू करू नका. हे फक्त माझं नाही तुम्हा सर्व शेतकरी भावाबहिणींचंही यश आहे. त्याबद्दल मी तुमचं अभिनंदन करतो. फार दिवस व्हावा व्हावा अशी इच्छा होती तो निर्णय झाला. ज्या विजेच्या बिलापोटी शेतकऱ्यांना आंध्र प्रदेशामध्ये, महाराष्ट्रामध्ये आत्महत्या करावी लागली त्या विजेच्या बिलाच्या महाराक्षसाचा अंत झाला आणि आपण विजेच्या दराच्या जाचातून सुटलो.

माझी अपेक्षा अशी आहे की लवकरच कर्जमुक्ती संबंधीची घोषणा होईल. ती तुमच्या पूर्ण समाधानाची नसेल कदाचित. कर्जमुक्तीचा विषय आला की शेतकऱ्याच्या मनात अपेक्षा उगम पावते की आपल्या डोक्यावरचा हजारो वर्षांचा कर्जाचा बोजा

जाईल; 'कर्जात जन्मलो, कर्जात जगलो, कर्जातच मरणार' ही परिस्थिती एकदाची संपून जाईल; पण सरकारकडे हा विषय गेला की कर्जमुक्ती तर करायची म्हणतात पण त्याला 'जर...तर', 'जमले तर' असे फाटे फुटायला लागतात. १९९० साली नागपूरला झालेल्या आपल्या शेतकरी मेळाव्यात त्यावेळचे पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंग यांनी म्हटलं होतं की 'कर्जमुक्ती' करण्याचं मी वचन दिलेलं आहे. रक्कम चौदा हजार कोटीची असो की चोवीस हजार कोटीची असो; पंतप्रधानांच्या शब्दाचीसुद्धा काही किंमत आहे आणि मी कर्जमुक्ती करून दाखवणार आहे.' एका पंतप्रधानाचे शब्द अमलात आले नाहीत. त्यांनी शेतकऱ्यांची कर्जातून सुटका केली, पण दरडोई फक्त दहा हजार रुपयांची.

कोणाही पुढाऱ्याचं कर्जमुक्तीचं वचन 'जेवल्याखेरीज खरं नसणाऱ्या निमंत्रणा'सारखंच असतं. कर्जमुक्तीची आश्वासनं याहीपूर्वी आपण ऐकली आहेत. ती काही पुरी झाली नाहीत. २४ लाख नोकऱ्याही मिळाल्या नाहीत आणि २४ लाख घरंही मिळाली नाहीत. आश्वासनं पुरी न होण्याचं कारण काय? याचं कारण मला बाळासाहेब ठाकरेंनी सांगितलं की तुम्ही माझ्या हातात ताकद द्याल तर मी तुम्हाला मुक्ती देऊ शकतो. यावेळी मी त्यांना आश्वासन दिलं आहे की तुम्ही शेतकऱ्यांचा कार्यक्रम घ्या, सगळया शेतकऱ्यांना एकजूट करणारे कार्यक्रम घ्या; आम्ही तुमच्या हाताला ताकद देऊ आणि कधी नाही जमलं ते, शेतकऱ्यांना एकदा कर्जमुक्त करून दाखवू.

महाराष्ट्र शासनाची याबाबतची घोषणा कदाचित् कर्जमुक्तीची नसेल. तशी नसली तर काहीतरी असेल – कर्जमुक्ती फक्त दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनाच मिळेल, छोट्या शेतकऱ्यांनाच मिळेल, सीमांत शेतकऱ्यांनाच मिळेल; कोणाचं व्याजच माफ होईल, कोणाचं मुद्दलच माफ होईल.

मी तुमच्यासमोर ९ ऑगस्टच्या आंदोलनाचं निमंत्रण देण्यासाठी आलो होतो. पण मुख्यमंत्र्यांच्या विनंतीवरून आपण ते आंदोलन पुढे ढकलले आहे; मागे घेतलेले नाही. जर का महाराष्ट्र शासनाने संपूर्ण कर्जमुक्ती याचा अर्थ सगळया शेतकऱ्यांची सगळया व्याजासकट कर्जमुक्ती जर केली नाही तर ३ सप्टेंबर २००४ पासून सबंध राज्यामध्ये कोठेही रेल्वेगाडी चालणार नाही, कोठेही रस्त्यावरील वाहतूक चालणार नाही असं 'चक्का जाम' आंदोलन सुरू होईल. ३ सप्टेंबर हा दिवस मी अशाकरता निवडला आहे की तो संसदेच्या चालू अंदाजपत्रकी अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. त्या दिवसाचे कामकाज सुरू होण्याच्या आत महाराष्ट्रातील सर्व वाहतूक ठप्प झाल्याच्या बातम्या संसदेच्या दारावर धडकल्या पाहिजेत. हे आंदोलन इतकं प्रभावी व्हायला हवे की भविष्यात ३ सप्टेंबर हा दिवस शेतकऱ्यांचा

मुक्तिदिन म्हणून साजरा करता आला पाहिजे.

मी अगदी सुरुवातीला सांगलीला आलो होतो. तेव्हा आपले आकारामबापू पाटील मला म्हणाले होते की, 'साहेब, आमची अशी इच्छा आहे की तुमची हत्तीवरून मिरवणूक काढावी.' मी म्हटलं, 'हत्तीवरून मिरवणूक काढण्यात काय विशेष आहे? माझी इच्छा अशी आहे की शेतकऱ्यांसमोर मी बोलावं आणि सांगलीपासून सुरू झालेली सहकारी साखर कारखान्यांची चळवळ ही शेतकऱ्यांचा आत्मघात करणारी कशी ठरली ते सगळ्या शेतकऱ्यांना समजावून सांगावं'. ते म्हणाले, 'आमचा पहिलवानांचा भाग आहे. इकडे तुम्ही बोलले काय याच्यापेक्षा तुमची किती मोठी मिरवणूक निघाली यावर तुमचं महत्त्व लोक ठरवतात!'

मी जे काही सांगतो ते तुम्हाला कितपत समजले हे पाहण्यासाठी मी काही तुमची लेखी किंवा तोंडी परीक्षा घेणार नाही. ३ सप्टेंबर २००४ पासून सुरू होणाऱ्या आंदोलनात किती संख्येने सांगलीतील शेतकरी कार्यकर्ते बाहेर पडतात आणि किती ताकदीने 'चक्का जाम' करतात यावरून तुमची परीक्षा होणार आहे.

आजपर्यंत आपण अनेक आंदोलने केली. या आंदोलनामध्ये कर्जमुक्ती हा एक विषय आहे. पण त्याहीपेक्षा एक महत्त्वाचा विषय आहे. तो मी थोडक्यात मांडायचा प्रयत्न करतो.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांना, अटलबिहारी वाजपेयी निवडून आले नाहीत याचं किती दुःख झालं आहे हे मला माहीत नाही. पण सर्वसाधारणपणे असं दिसतं की, ते निवडून आले नाहीत, आता पंतप्रधान नाहीत तेव्हा त्यांना फक्त कचऱ्याची टोपलीच दाखवायची ठेवली आहे; आजकाल त्यांचं नावसुद्धा ऐकू येत नाही. माझ्या मनावर मात्र याचा फार आघात झाला आहे आणि माझी खात्री आहे की कम्युनिस्ट आणि काँग्रेस, आणि त्यांच्याबरोबर 'लालूप्रसाद' हे भयानक मिश्रण दिल्लीमध्ये फार दिवस टिकणार नाही. याच्या पुढची निवडणूक जेव्हा येईल तेव्हा सर्व धार्मिक अतिरेकीपणा बाजूला ठेवून आर्थिक स्वातंत्र्याचा कार्यक्रम सांगणारी एक आघाडी यशस्वी होणार आहे आणि त्या लढ्याची सुरुवात लवकरच होणार आहे. कदाचित अजून सहा महिने, आठ महिने केंद्रातील सरकार दम काढीलही, पण त्याच्याही आधी महाराष्ट्रातील विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्या निवडणुकीमध्ये पहिल्यांदा, लोकसभा निवडणुकीत हरलेल्या फौजेमध्ये पुन्हा एकदा आत्मविश्वास तयार व्हावा अशा तऱ्हेचा कार्यक्रम करणे आवश्यक आहे.

शेतकरी संघटनेच्या सर्व कार्यकर्त्यांचं मी कौतुक करतो. ज्या ठिकाणी पूर्वी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मोठ्या संख्येने जागा मिळत असत – मुंबईसारख्या शहरांमध्ये – तिथे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या हाती लोकसभा निवडणुकीत

फारसं काही आलं नाही. विदर्भ, मराठवाडा हे काँग्रेसचे कायमचे किल्ले. त्या ठिकाणी मात्र राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ११ पैकी १० जागा विदर्भात आणि मराठवाड्यात ८ पैकी ६ जागा मिळाल्या. महाराष्ट्रात मिळालेल्या एकूण २८ जागांपैकी १८ जागा स्वतंत्र भारत पक्षाच्या पाठिंब्यामुळेच मिळाल्या असे शिवसेनेचे आणि भाजपाचे नेतेसुद्धा मान्य करतात. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी त्या निवडणुकीत काम केले एवढेच नव्हे तर कोणतीही अपेक्षा न ठेवता काम केले. लोकसभेमध्ये आम्ही एकही जागा घेतली नाही. कोणताही मोबदला न घेता आमचे कार्यकर्ते धावले. घरची भाकरी खाऊन त्यांनी प्रचार केला. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा एकही उमेदवार असा सापडणार नाही, जो म्हणेल की शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्याने माझ्याकडे येऊन धाब्यावर जेवण्याकरिता ५ रुपये मागितले. कोणी गाडी मागितली नाही आणि पिणेबिणे कार्यक्रम आमच्या छावणीत नाहीच, तो दुसऱ्या छावण्यांचा भाग आहे. अशा प्रकारे शेतकरी संघटनेच्या पाईकांनी काम केलं आणि म्हणून महाराष्ट्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडीला निम्म्यापेक्षा जास्त जागा मिळाल्या.

तेव्हासुद्धा मी खासदार म्हणून जायचं हे ठरलेलं नव्हतं. मी खासदार का झालो?

अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान झाले नाहीत. आपल्या हाती सरकार नाही, सत्ता नाही. उलट्या बाजूला काँग्रेस आणि त्यांच्या बाजूने शेतकरी संघटनेच्या खुल्या अर्थव्यवस्थेच्या विचाराला शंभर टक्के विरोध करणारे समाजवादी आणि कम्युनिस्ट यांचं मत असं की शेतकऱ्यांना स्वातंत्र्य नको, त्यांना बंधनात घाला. शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेऊन त्या जमिनींचं वाटप करा, मजुरांकरिता कायदे करा, शेतकऱ्यांना रास्त भाव देण्याची गरज नाही असं म्हणणाऱ्या कम्युनिस्टांचं केंद्रातल्या सरकारला पाठबळ मिळालं. लोकसभेत कम्युनिस्टांचे ६३ खासदार आहेत आणि कोणी त्यांना नावं ठेवोत, कम्युनिस्ट मंडळी ही मोठी अभ्यासू आणि वादविवादकुशल असतात. प्रश्न असा पडला की यांना तोंड कोण देणार? ज्यांनी माझी राष्ट्रीय कृषि कार्यबलाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली त्या अटलबिहारी वाजपेयींनी सूचना केली की या डाव्या लोकांशी शेतीप्रश्नासंबंधी सामना करायचा असेल तर तिथे शरद जोशी हवेत. तेव्हा, संसदेतील राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संघामध्ये माझी निवड झाली ती याकरिता झाली. महाराष्ट्रभरच्या शेतकऱ्यांनी माझा जो सत्कार चालवला आहे तो काही मी खासदारकीची लढाई मारून आलो म्हणून नाही, तर चक्रव्यूह भेदून जाण्याकरिता अभिमन्यू निघाला तेव्हा सर्व पांडवांनी ओवाळलं तसंच तुम्ही मला ओवाळता आहात असं मी मानतो. कारण संसदेतील ६३ कम्युनिस्ट खासदारांनी रचलेल्या चक्रव्यूहाचा भेद करण्याकरिता मला पाठवण्यात आलं आहे.

त्या चक्रव्यूहाचा भेद मी करू शकेन याबद्दल माझ्या मनात शंका नाही. कारण डंकेल प्रस्तावाच्या चर्चेच्या वेळी मी विरुद्ध सारा हिंदुस्थान अशी चर्चा झाली. त्याही वेळी कम्युनिस्ट, स्वदेशी जागरण मंचाचे लोक, गांधीवादी, सर्वसेवा संघ, डॉ. मनमोहनसिंग, पी. चिदंबरम, मोंटेकसिंग अहलुवालिया अशी सगळी मंडळी माझ्या विरोधात होती; पण भारत शासनाने माझं ऐकलं आणि जागतिक व्यापार संस्थेच्या करारावर त्यांनी सह्या केल्या. त्यामुळे, संसदेतील ६३ कम्युनिस्ट खासदारांशी वादविवाद करताना मी जिंकेन याबद्दल माझ्या मनात बिल्कुल शंका नाही.

पण त्यांच्या हातात एक हत्यार आहे. ते हत्यार माझ्याही हातात आहे. पण माझ्या हातातील हत्यार थोडं परजून ठेवण्याची आवश्यकता आहे.

समाजवादाचा पाडाव झाल्यानंतर जसजसं स्पर्धेचं युग येऊ लागलं तसतसे संघटित कामगार आणि नोकरदार मोठे चवताळले आहेत. कारण, नागपूरच्या अधिवेशनात म्हटल्याप्रमाणे, नेता-तस्कर-गुंडा-अफसर हे समाजवाद पडल्यापासून मोठे बेचैन झाले आहेत. आपलं राज्य पुन्हा यावं याकरता त्यांनी संघटित कामगार आणि नोकरदारांचे संप, हरताळ इत्यादी विकासविरोधी कारस्थाने सुरू केली. आता २४ ऑगस्ट २००४ पासून बँकांचा संप चालू होणार आहे, २ सप्टेंबरपासून मुंबईत कामगारांचा संप सुरू होणार आहे. संपूर्ण हिंदुस्थानमध्ये अशांती माजवायची, संप, हरताळ करायचे, नक्षलवाद्यांकडून हिंसाचार घडवून आणायचे आणि त्याच्या आधाराने लोकसभेत, राज्यसभेत 'गरिबांचा आक्रोश' आहे असा गदारोळ करून 'खुली व्यवस्था काढून टाका', 'जागतिक व्यापार संस्थेतून बाहेर पडा' असा धोशा लावायचा असा त्यांचा रणव्यूह आहे.

'गरिबांची भाषा तुम्ही बोलता कशाला? तुमचे गरीब कोण? पन्नास हजार ते एक लाख रुपये ज्यांचे वार्षिक उत्पन्न असेल त्यांची तुम्ही आयकरातून सुटका केली ते तुमचे गरीब? शेतकऱ्यांतले गरीब कोण? जे ट्रॅक्टर खरीदतात ते? खरे गरीब ते की उद्या जगावं कसं हे कळत नाही म्हणून जे आत्महत्या करायला प्रवृत्त झाले आहेत असे हिंदुस्थानातील शेतकरी. आजपर्यंत आत्महत्या केलेल्यांपैकी एकही नोकरदार नाही, एकही कामगार नाही. सगळे आहेत ते कर्जबाजारी शेतकरी आहेत' अशा प्रकारचे युक्तिवाद करीत मी या, समाजवाद पुन्हा आणू इच्छिणाऱ्या ताकदींना आजपर्यंत थोपवून ठेवलं आहे; पण यापुढे जसजशी त्यांची आंदोलनं होत राहतील तसतसा माझा एकट्याचा आवाज त्या ६३ लोकांच्यापुढे टिकायचा असेल - ज्यांना मनमोहनसिंग, सोनिया गांधी, लालूप्रसाद, मुलायमसिंग अशा सगळ्यांचा पाठिंबा आहे - त्यांना जर टक्कर द्यायची असेल तर मला तुम्हा शेतकऱ्यांकडून एका मदतीची अपेक्षा आहे.

मला आता दिल्लीतच अधिक काळ राहाणं भाग असल्यामुळे जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये वारंवार येऊन प्रचार करणं आता शक्य होणार नाही आणि तरीसुद्धा दिल्लीला बसून मी नुसता शब्दांनी जरी निरोप दिला तरी प्रचंड ज्वालामुखीसारखं शेतकऱ्यांचं आंदोलन इथं उभं राहिलं तर राज्यसभेतल्या माझ्या शब्दाला किंमत असेल, एरवी नाही.

येत्या विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीनेही ३ सप्टेंबरच्या आंदोलनाला महत्त्व आहे. आम्ही युती आहे असं म्हणतो आहोत. या व्यासपीठावरसुद्धा भाजप, शिवसेना, स्वभाप, शेतकरी संघटना – सगळ्यांचे नेते छान सामोपचाराने बसले आहेत; पण चुकून जर का कोणी प्रश्न काढला की सांगलीच्या मतदारसंघाची उमेदवारी कोणाकडे जावी तर इथं लगेच भांडणं सुरू होतील. मुंबईतसुद्धा एकत्र बैठकीत 'तुमची आमची युती – जन्मोजन्मीची' अशी भाषा होते. सोफासेटवर बसायचं, चहा पिता पिता चर्चा करायची. त्यात बंधुभावाच्या गोष्टी होतात आणि तेथून उठल्यानंतर बाहेर पडले की भाषा सुरू होते की, 'त्यांनी आपल्याला पेचात पकडलं आणि ही ही सीट सोडवून घेतली. आपण त्यांचे पाय त्या मतदारसंघात कापले पाहिजेत' अशा तऱ्हेची जर ही युती असेल तर ती याच्यापुढे टिकू शकणार नाही.

**युती कशी असावी?**

समजा, भारतीय जनता पक्ष हा एक लाकडी ठोकळा आहे, शिवसेना हा आणखी एक लाकडी ठोकळा आहे, स्वतंत्र भारत पक्ष हाही एक छोटा लाकडी ठोकळा आहे. या तिघांना एकत्र कसं आणायचं? सध्या आपण या तीनही ठोकळ्यांना एखाद्या सुतळीने बांधून एकत्र आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. सुतळीने ठोकळे एकत्र राहत नाहीत. सुतळी ढिली झाली की ठोकळे हलतात, एकमेकांवर आपटतात आणि ढील फार झाली तर ठोकळे बाजूलाही होतात आणि मग भाजप, शिवसेना आणि स्वभाप – तिघांमध्येही एकमेकांविषयी टीकात्मक उद्‌गार ऐकायला मिळतात. ही युती जर टिकाऊ बनवायची असेल तर काय करायला पाहिजे? तीनही ठोकळ्यांमधील अहंकार संपवून त्यांचा जर भुसा केला आणि सरसाच्या साहाय्याने एखाद्या मुशीत घालून त्यांचा एकच ठोकळा तयार केला तर ती खरी, अभेद्य युती होईल.

**लाकडाचं ठीक आहे, त्याचा भुसा करता येतो. माणसांचं काय करावं?**

माणसांची अभेद्य युती घडवायचं हिंदुस्थानात एक मोठं साधन आहे. श्रीकृष्णाच्या जन्मापासून ते साधन मोठमोठ्या क्रांतिकारी लोकांनी वापरलं आहे. उष्णता देऊन मुशीत घालून एकी करण्याची सगळी कामं हिंदुस्थानात तुरुंगात झालं आहे. श्रीकृष्णाचा जन्म तुरुंगात झाला, महात्मा गांधींची चळवळ तुरुंगात झाली. शेतकरी संघटनेच्या

कार्यकर्त्यांकडे काहीही साधनं नसताना त्यांच्यात एकी झाली याचं कारण आम्ही तुरुंगातल्या भाकऱ्या एकत्र खाल्ल्या. मला भाजपा, शिवसेना आणि स्वतंत्र भारत पक्ष या सगळ्यांच्या कार्यकर्त्यांना एकत्र तुरुंगात न्यायचं आहे. तर खरी आपली युती होईल. स्वभापच्या शिलेदारांना निमंत्रणाची आवश्यकताच नाही पण मी शिवसेनेच्या सैनिकांना, भाजपच्या कार्यकर्त्यांना प्रामाणिकपणे निमंत्रण देतो की, "शेतकरी संघटनेने पुकारलेल्या ३ सप्टेंबरच्या 'कर्जमुक्ती' आंदोलनात तुम्हा सर्वांचं स्वागत आहे." तुमच्याकडे मोठी ताकद आहे आमचीही संख्या कमी नाही; पण आमचे शेतकरी स्वभावाने मऊ आहेत. आंदोलन सत्याग्रहाच्या पद्धतीने करतात; त्यामुळे तुमचा आवाज जितका सरकारला कळतो तितका आमच्या आंदोलनाचा कळत नाही. युती करायची असेल तर या विषयावर आपण एकत्र येऊ या आणि मग पाहू या आपल्याविरुद्ध कोण टिकतं ते. ती खरी युती होईल.'

आणि अशा तऱ्हेने युती झाल्यानंतर महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत आपण राष्ट्रीय लोकशाही आघाडीला यशस्वी करून दाखवलं तर, माझी खात्री आहे की, हिंदुस्थानमध्ये गेल्या निवडणुकीत आपली एक तऱ्हेने जी पीछेहाट झाली; खुलेपणा मागणारे लोक एका अर्थाने मागे पडले; सहिष्णुता, सर्वसमावेशकता पाळणारे लोक मागे पडले आणि अर्थव्यवस्थेमध्ये जातीयवाद मांडणारे लालूप्रसाद, मुलायमसिंग यांच्यासारखी माणसं राष्ट्रीय पक्षांनासुद्धा बाजूला सारून उत्तर हिंदुस्थानात निवडून आली ही परिस्थिती दुरुस्त करण्याची एक संधी आपल्या हाती येणार आहे. तेव्हा आपलं पहिलं ध्येय महाराष्ट्र विधानसभेतून काँग्रेसला पार हटवून लावणे हे असलं पाहिजे.

लोक विचारतात, 'तुमची युती होणार का?' मी म्हणतो, 'युती होणार यात काही शंका नाही. कारण दुसरीकडे कोठे जाणार? शरद जोशी काही कम्युनिस्टांकडे नाही जाऊ शकत.'

ते पुढे विचारतात, 'मग, भाजप आणि शिवसेनेशी तुमचं जमतं का?'

'थोडं जमतं, थोडं नाही. लग्न लागताना कुठे नवराबायकोचं सुद्धा सगळं जमत असतं? हळूहळू जमवून घेतात, हळूहळू शिकतात.'

आमची युती व्हायच्या आधी बाळासाहेब ठाकरे शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती झाली पाहिजे आणि संपूर्ण वीजबिलमुक्ती झाली पाहिजे अशी घोषणा करतील असं कोणाला वाटलं होतं?

आमच्यावर त्यांचे काही संस्कार होणार आहेत आणि त्यांच्यावर आमचेही काही परिणाम होणार आहेत. युती अशीच पक्की होत जाणार.

मग ते कुरापतखोर हलक्या आवाजात प्रश्न विचारतात, 'तुम्ही विधानसभेत किती

जागा मागणार?' बाळासाहेब वगैरे जणू ऐकतील या भीतीने अगदी खालच्या आवाजातच प्रश्न विचारणार. मी हल्ली या प्रश्नाचं एकच उत्तर ठरवून टाकलं आहे.

'किती जागा मागणार?'

'२८८'

'सांगलीत किती मागणार?'

'सगळ्या. २८८ महाराष्ट्रात मागतो त्याअर्थी सांगलीतही सगळ्या मागणार; पण २८८ पैकी किती जागा स्वतंत्र भारत पक्षाला द्यायच्या याचा निर्णय मी बाळासाहेब ठाकरे आणि गोपीनाथ मुंडे यांच्या हाती सोपवला आहे.'

माझी अपेक्षा अशी आहे की ज्या काँग्रेसला आम्ही शत्रू नंबर एक मानलं त्या काँग्रेसचेच लोक फोडून घ्यायचे – कारण त्यांच्याकडे गडगंज पैसा जमला आहे – आणि त्यांना शिवसेनेमध्ये किंवा भाजपमध्ये घेतले म्हणजे ते शुद्ध झाले असं म्हणून ही मंडळी आपल्याच पायावर धोंडा पाडून घेणार नाहीत. ते शुद्ध झाले म्हटल्याने आपल्या मनाचं समाधान होईल कदाचित्; पण नेताजी पालकरला शुद्ध करणं शक्य झालं, या काँग्रेसवाल्यांना तितकंसुद्धा शुद्ध करून घेता येणार नाही. हे लक्षात न घेतल्याने मागच्या लोकसभा निवडणुकीत, अशा तऱ्हेने शुद्ध करून घेतलेल्या उमेदवारांना लोकांनी नाकारलं ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. विमानाने आले आणि एका उमेदवाराची उमेदवारी घोषित करून गेले म्हणजे तो उमेदवार जिंकून येईल असे नाही. अशा तऱ्हेचे संकुचित निर्णय केल्यामुळे आपण राष्ट्रीय निवडणूक हरलो. महाराष्ट्राची निवडणूक हरणं आपल्याला परवडणार नाही. हा जीवनमरणाचा प्रश्न आहे असं समजून सगळ्यांनी एकोप्याच्या, घरगुती भावनेने एकत्र यावं, ३ सप्टेंबरच्या आंदोलनात त्याची प्रचीती द्यावी आणि पुन्हा एकदा नव्या भारताच्या बांधणीला सुरुवात व्हावी एवढीच अपेक्षा व्यक्त करतो.

*(६ ऑगस्ट २००४ – सांगली)*

*(शेतकरी संघटक २१ ऑगस्ट २००४)*

■■

# रुप्याचा दिवस म्या आनंदे पाहिला

शेतकरी संघटनेच्या या रौप्यमहोत्सव मेळाव्याला महाराष्ट्रभरातून जमलेल्या या जनसागरात वीस-पंचवीस वर्षांच्या तरुणांची उपस्थिती मोठी लक्षणीय आहे. याचा अर्थ असा की, शेतकरी संघटना पंचवीस वर्षांनी म्हातारी झाली नसून ती पंचवीस वर्षांची तरुण झाली आहे. 'सोनियाचा दिवस मी पहिला' असे म्हणतात, पण हा सोन्याचा दिवस नसला तरी रौप्यमहोत्सवाचा दिवस असल्याने हा 'रूप्याचा दिवस मी आनंदाने पाहिला' असे म्हणू शकतो. असे भाग्य लाभल्यानंतर परमेश्वराचे आभार मानायचे असतात; पण तुम्ही शेतकरीच माझे परमेश्वर आहात म्हणून मी तुमचेच आभार मानतो.

इथे उभे राहिल्याबरोबर असे वाटले, की आज हा सोहळा पहायला काहीजण असायला हवे होते. सर्वप्रथम आठवण होते ती माझी सहचारिणी, माझ्या दोन मुलींची आई लीला हिची. ती जर आजचे हे चित्र पाहाती तर शेतकऱ्यांच्या कामाकरिता मी संसाराकडे जे दुर्लक्ष केले आणि त्यामुळे तिला जे सोसावे लागले त्याचे सार्थक झाले अशी तिची खात्री पटली असती. आज इथे बाबूलाल परदेशी असायला हवे होते. साप्ताहिक 'वारकरी'चे संपादक. दर शनिवारी अंक काढायचा म्हणजे मी गुरुवार-शुक्रवारी पुण्याहून पहाटे चाकणला येत असे. बाबूलालच्या दारासमोर उभा राहून हाका मारल्या की ते बाहेर येऊन म्हणत, 'अरे, आज अंक काढायचा, ना?' मग आम्ही दोघे एक खिळे जुळविणारा बरोबर घेऊन त्यांच्या छापखान्यात जात असू. एकीकडे मी मजकूर लिहीत बसे आणि आत जुळारी खिळे जुळवत असे. कधीकधी काही अडचण आल्यास सगळा मजकूर घेऊन रात्रीअपरात्री पुण्यास जाऊन कोणत्यातरी गल्लीबोळातल्या छापखान्यात जाऊन रात्रभर बसून अंक तयार करीत असू. आज, आमचे चाकणचे शंकरराव वाघ हवे होते. सातवीसुद्धा पास न झालेला माणूस; पण अफाट बुद्धिमान. जेव्हाजेव्हा मनात खिन्नता घर करे, विशेषतः वर्तमानपत्रातून आंदोलनाबाबत विपर्यस्त मजकूर येत असे किंवा पुढारी आणि प्रस्थापित

अर्थशास्त्री शेतकरी संघटनेच्या अर्थविचाराची हेटाळणी करीत, अशावेळी शंकरराव आपल्या समयसूचक बोलण्याने मोठा धीर देत. महाराष्ट्र टाइम्सने तर शेतकरी संघटनेवर सतत हल्ला करण्याचा विडा उचलला होता; पण शंकरराव नेहमी म्हणत, 'जोपर्यंत महाराष्ट्र टाइम्स आपल्याबद्दल विपरीत लिखाण प्रसिद्ध करीत आहे तोपर्यंत आपण योग्य मार्गानेच चाललो आहोत याची खात्री बाळगावी.' छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्यस्थापनेसाठी जसे मावळे मिळाले तसेच शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यासाठी लढाई सुरू करताना शेतकरी संघटनेला मावळे मिळाले. आणखी एक नाव आवर्जून समोर येते ते 'योद्धा शेतकरी' चे लेखक विजय परूळकर यांचे. आज जर का हा सोहळा पाहायला ते इथे हजर असते तर समोरचा जनसागर पाहून त्यांचे डोळे भावनेने भरभरून आले असते आणि ते पाहून मला जन्माचे सार्थक झाल्याचे वाटले असते. नागपूरच्या अधिवेशनात ते आले होते आणि तेथील कस्तुरचंद पार्कवरील प्रचंड गर्दी पाहून अवाक झाले होते. आजचा हा सोहळा पाहून ते म्हणाले असते, 'योद्धा शेतकरीच्या पाभरीतून जे इवलेसे बीज पेरले गेले त्या योद्धा शेतकरीच्या वाचनातून शेकडो हजारो शेतकरी कार्यकर्ते तयार झाले. त्यावेळी लावलेला वेल मोठा होऊन असा 'गगनावरी' गेला.'

अशी किती किती नावे या क्षणी समोर येतात ती घेत गेलो आणि त्यांच्या आठवणी सांगत बसलो तर आजचा दिवसच काय, सप्ताह केले तरी पुरे पडणार नाहीत.

व्यासपीठावर येण्याआधी गुणवंत पाटलांनी लावलेले 'मजल' चित्रप्रदर्शन पाहायला गेलो होतो. ते पाहाताना गेल्या पंचवीस वर्षांतील अनेक आठवणी माझ्या मनात जाग्या झाल्या. आजच्या गोदातीर समाचारच्या पहिल्या पानावर संपादकांनी 'शेतकरी संघटना कोठून कोठे गेली याचे या रौप्यमहोत्सवप्रसंगी चिंतन करावे' असे लिहिले आहे. इतर लोक काय चिंतन करतात कोण जाणे? आपण मात्र चिंतन करणार आहोत गंभीरपणे. या मेळाव्याच्या निमित्ताने लिहिलेल्या लेखात मी म्हटले आहे की, ''आज शेतकरी संघटनेचा पंचविसावा वाढदिवस साजरा होतो आहे. पण शेतकरी संघटनेचा पन्नासावाच नव्हे तर शंभरीचाही वाढदिवस होणार आहे. त्यावेळी जी स्मरणिका काढली जाईल तिचे शीर्षक असेल 'शेतकरी संघटनेची पहिली शंभर वर्षे' '' (शेतकरी संघटक : २१ नोव्हेंबर २००५). शेतकरी संघटना पंचवीस-तीस नव्हे, शेकडो वर्षे चालत राहणार आहे. शेतकरी संघटनेची सुरुवात शेतीमालाच्या भावाने झाली, शेतकऱ्यांना न्याय मिळण्याकरिता झाली. शेतकऱ्यांना सन्मानाने जगता यावे याकरिता झाली; पण ती सुरुवात होती. शेतकरी संघटनेचे बियाणे जे आहे ते केवळ भाव मिळवणारे किंवा कर्जमुक्ती मिळवणारे नाही, प्रत्येक माणसाला सन्मानाने

जगण्यासाठी जे स्वातंत्र्य आवश्यक आहे त्या स्वातंत्र्याचे हे बियाणे आहे. ते स्वातंत्र्य मिळेपर्यंत शेतकरी संघटना लढत राहील आणि व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी अखंड लढणारी अग्रणी संघटना म्हणून तिचे नाव इतिहासात नोंदले जाईल. आज ज्या माणसांची नावे अग्रभागी दिसतात – मग ती दिल्लीतील सत्तेमुळे असोत की मुंबईतील किंवा आणखी कशामुळे – त्यांचे नावसुद्धा इतिहासात शिल्लक असणार नाही अशावेळीसुद्धा शेतकरी संघटनेचे नाव इतिहास अग्रभागी राहील.

१९८० मध्ये जेव्हा शेतकरी संघटनेची सुरुवात झाली तेव्हा शेतकऱ्यांची संघटना असूच शकत नाही, 'एकवेळ कुत्र्याचे शेपूट सरळ होईल पण शेतकऱ्यांची संघटना जमणार नाही' असे थोर थोर बुद्धिवंत आणि 'लोकनेते' मला ठिकठिकाणी सांगत आणि माझ्यासारख्याला तर ते कधीच जमणार नाही असेही सांगत, कारण माझ्याइतका, शेतकऱ्यांची संघटना बांधायला, अपात्र कोणीच असू शकत नाही! कारण, मी काही शेतकऱ्याच्या घरात जन्माला आलो नाही, आमच्या कित्येक पिढ्यांत कोणाच्या नावावर इंचभरसुद्धा जमीन नाही. दुसरे कारण, मी ब्राह्मण आणि ब्राह्मणांनीच शेतकऱ्यांना आजपर्यंत लुटले हा सरधोपट सिद्धांत. आणखी एक म्हणजे बरीच वर्षे परदेशात राहिलो म्हणून मराठीत बोलणे विसरलेला – इंग्रजी, फ्रेंच आणि जर्मन भाषाच काय त्या येतात. मग, शेतकऱ्यांना कसे समजावणार? थोडक्यात, शेतकऱ्यांची संघटना बांधण्याचे काम अत्यंत कठीण, कुत्र्याचे शेपूट सरळ करण्यापेक्षासुद्धा कठीण आणि हे काम करायला घेतलेला मी सर्व व्यावहारिक दृष्टींनी या कामाला अपात्र. तरीसुद्धा आज समोर दिसणारे हे जे संघटनेचे स्वरूप आहे यातच शेतकरी संघटनेच्या विचाराचे महत्त्व कळून येते.

त्यावेळी, लोकांची कल्पना अशी होत की महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या समस्या वेगळ्या, पंजाब हरयाणातल्या शेतकऱ्यांच्या समस्या वेगळ्या, राज्याराज्यांतल्या शेतकऱ्यांच्या समस्या वेगवेगळ्या; बागायतदार शेतकऱ्यांच्या समस्या वेगळ्या, जिराईत शेतकऱ्यांच्या समस्या वेगळ्या, ऊसवाल्या शेतकऱ्यांच्या समस्या वेगळ्या, कापूसवाल्यांच्या वेगळ्या, धान्यवाल्यांच्याही वेगळ्या. पाणीवाल्यांच्या वेगळ्या, कोरडवाहूंच्या समस्या वेगळ्या, सगळेच कष्टकरी आणि समस्याग्रस्तही; पण या वेगवेगळ्या प्रकारांमुळे सगळे शेतकरी चार वेगवेगळ्या दिशांना तोंडे करून उभे होते. अशी सर्व शेतकरी समाजाची परिस्थिती त्यावेळी होती. डाव्या नेत्यांचे तर म्हणणे असे होते की शेतकरी संघटना ही कल्पनाच चुकीची आहे, कारण शेतकऱ्यांमध्ये मोठे शेतकरी हे शोषक आहेत आणि लहान शेतकरी हे शोषित आहेत, शेतमजूरही शोषित आहेत. त्यामुळे खरा संघर्ष व्हायचा असेल तर गावांमध्ये विटांच्या घरांमध्ये राहणारे शेतकरी आणि झावळ्यांच्या झोपड्यांमध्ये राहणारे शेतकरी व शेतमजूर

यांच्यामध्ये व्हायला पाहिजे असे डाव्यांचे म्हणणे होते. असे म्हणत गावागावात शेतकऱ्याशेतकऱ्यांमध्ये भांडणे लावण्याची करामत विद्वान करीत होते.

शेतकरी संघटनेने पहिल्यांदा दाखवून दिले की, शेतकरी कोणत्याही प्रांताचा असो, कोणत्याही भाषेचा असो, कोणत्याही पिकाचा असो, – शेतकरी कोणतेही बियाणे लावो – सगळ्याच शेतकऱ्यांची शेती तोट्याची आहे आणि म्हणून शेतकरी कर्जात आहे. चारी दिशांना तोंडे करून आलेल्या सर्व शेतकऱ्यांना एकत्र बांधण्याचे सूत्र म्हणजे 'शेती तोट्यात आहे'. मोठे शेतकरी, लहान शेतकरी, शेतमजूर अशी शेतकऱ्यांची भांडणे लावून हा प्रश्न सुटणारा नाही. तसेच, शेतकऱ्यांना केवळ पाणी देऊन, बियाणे देऊन, सबसिडी देऊनही हा प्रश्न सुटणारा नाही. पाणी देतात, बियाणे देतात, खते देतात, कर्ज देतात, हे कशाकरता? शेतकरी संघटनेने स्पष्टपणे सांगितले की शेतकऱ्यांनी जास्त पिकवावे म्हणून ते हे सर्व देतात. त्याचा वापर करून आणि कष्ट करून अमाप पिकवलेला शेतीमाल शेतकरी बाजारात घेऊन गेला की लुटतात. मग ही सर्व मदत म्हणजे एखाद्या बकरीला अधिकाअधिक खाऊ घालण्याचा प्रकार आहे, ती धष्टपुष्ट झाली की अधिक मटन मिळणार एवढचा उद्देश.

सबंध देशभर सरकारी मदतीचे गुणगान सुरू असताना इतका जगावेगळा विचार शेतकरी संघटनेने त्यावेळी मांडला. 'सरकार जाणीवपूर्वक शेतकऱ्यांना लुटतं', 'सरकारचं धोरण, शेतकऱ्याचं मरण' 'तूट असेल तर लूट आणि मुबलकता असेल तर लिलाव' अशी सगळी कोणी कधी न ऐकवलेली सरकारची धोरणे आणि त्याला 'भीक नको, हवे घामाचे दाम' हे उत्तर. हे उत्तर इतके चपखल बसले की त्याने चमत्कार घडला.

शेतकरी संघटना बांधण्यात मला यश मिळाले, ते का मिळाले यावर मी अनेकवेळा विचार करतो. शेतकऱ्यांची सेवा करण्याकरिता माझ्याइतका अपात्र कोणी नाही. मी जन्माने शेतकरी नाही, शेतकऱ्यांचा शत्रू समजल्या जाणाऱ्या जातीमध्ये, अपघाताने का होई ना, माझा जन्म झालेला, परदेशातील प्रदीर्घ वास्तव्यामुळे मराठी धडपणे बोलता येत नव्हते. इतके सारे दोष असूनही शेतकऱ्यांची संघटना बांधण्यात मी यशस्वी झालो याचे कारण मी शेतकऱ्यांची भक्ती केली. साधुसंतांनी सांगून ठेवले आहे की एकनिष्ठपणे भक्ती केली म्हणजे देव हमखास पावतो. मी शेतकऱ्यांची अव्यभिचारी भक्ती केली; शेतकऱ्यांना खुश केले, की मला आमदार-खासदार बनता येईल, मुख्यमंत्री बनता येईल, पंतप्रधान बनता येईल अशी भावना न ठेवता मी शेतकऱ्यांची भक्ती केली. शेतकरी संघटेनेचे काम करीत असताना कधी कधी मी विचार करी खरंच परमेश्वर समोर उभा राहिला आणि काय हवे ते माग म्हणाला तर

मी काय मागेन? त्यावर माझ्या मनात उत्तर येई की मी देवाला म्हणेन की, 'देवा, मला एवढीच भीक घाल की माझ्या आयुष्यात माझ्या हातून शेतकऱ्यांचं दुःख, थोडं का होई ना, कमी होऊ दे.' अशी भक्ती केली म्हणून शेतकऱ्यांनी जात पाहिली नाही, भाषा पाहिली नाही, जे काही मी त्यांना सांगितलं ते त्यांना पटलं आणि ते पटल्यांनतर त्यांनी मला भरभरून प्रतिसाद दिला - त्यांच्या पारंपरिक पुढाऱ्यांना भीक न घालता प्रतिसाद दिला.

चाकणला पहिल्यांदा आम्ही भामनेरचा मोर्चा काढायचे ठरवले. जवळ जवळ चाळीसपन्नास किलोमीटर चालत जायचे होते. तीन-चार दिवस चालायला लागणार होते. चाकणचे पुढारी म्हणत, 'अरे, या ब्राह्मणाच्या मागे कोण येणार?' शंभरसुद्धा माणसे येणार नाहीत असे पैजा लावून ते म्हणत; पण ते चाळीसपन्नास किलोमीटरचे अंतर चालून जेव्हा चाकणला दहा हजार शेतकरी स्त्री-पुरुष आले तेव्हा त्या पुढाऱ्यांची वाचा बंद झाली.

१० नोव्हेंबर १९८० ला नाशिकचे उसाचे आंदोलन बांधावरून रस्त्यावर आणि रेल्वेरूळांवर आणायचे ठरले. आंदोलन बांधावर होते तोपर्यंत पोलिसांना काही काम नव्हते. आंदोलन सुरू होण्याआधी जवळ जवळ पंधरा दिवस संपूर्ण नाशिक जिल्हा आम्ही पिंजून काढला होता. पण तरीही, ९ नोव्हेंबरला 'रेल रोको' ची घोषणा केल्या केल्या मनात धाकधूक सुरू झाली. आपण इतकं सर्वस्व पणाला लावून हा जुगार खेळलो आहे; पण ही माणसं आपलं ऐकतील की नाही कुणास ठाऊक. त्यात सगळ्या सीआयडी/एल्आयबीच्या लोकांनी अहवाल दिला होता की, शरद जोशींच्या बरोबर कोणीही आमदार नााहीत, खासदार नाहीत, त्यांच्या आंदोलनाला काही प्रतिसाद मिळण्याची शक्यता नाही. माझ्या पोटात मोठा गोळा आला की, 'घरातल्या सगळ्या लोकांना - बायकोला, मुलींना - दुखवून मी घराच्या बाहेर पडलो आहे. अशा परिस्थितीत उद्या शेतकऱ्यांनी खरंच साथ दिली नाही तर आयुष्याला काय अर्थ राहणार आहे? रेल्वेच्या गाड्या थांबवण्याकरिता जर शेतकरी आले नाहीत तर त्याच गाडीच्या पुढे पडून मला आयुष्य संपवावे लागेल.' या विचाराने झोप येईना आणि रात्री तीन वाजता एक फोन आला. आमच्या एका मोठ्या सहकाऱ्यांचा फोन होता. ते म्हणाले, 'आम्ही २५ बैलगाड्या घेऊन रेल्वे रूळांच्या बाजूला येऊन थांबलेलो आहोत. सकाळी आठ वाजता रेल्वे अडवायची असा तुमचा आदेश असल्यामुळे आम्ही बाजूला बसलो आहोत; आताच बसायची परवानगी दिलीत तर आम्ही आताही रूळांवर बसायला तयार आहोत.' हा फोन आला आणि मी निश्चिंत झोपी गेलो ते सकाळी आठ वाजताच जाग आली.

**अशा किती घटना सांगाव्या?**

शेतकऱ्यांनी प्रत्येक वेळी मला असा प्रतिसाद दिला. शेतकरी संघटेनेने कार्यक्रम दिला आणि शेतकऱ्यांनी त्याला प्रतिसाद न दिल्यामुळे मैदाने रिकामी राहिली किंवा तुरुंग रिकामे राहिले असे कधीही झाले नाही. उलट, माझ्या मागणीपेक्षाही मला शेतकऱ्यांनी प्रतिसाद दिला. माझी झोळी फाटून जाण्याची वेळ यावी इतकं दान मला शेतकऱ्यांनी उदारपणे दिलं त्याबद्दल सर्व शेतकऱ्यांचा मी ऋणी आहे.

शेतकरी आंदोलनाला सुरुवात झाली तेव्हा शेतकरी हा सर्वांत गरीब, सर्वात शोषित समाज आहे अशी सर्वसामान्य मान्यता होती. ती गरिबी दूर करण्याकरिता, त्या समाजाची परिस्थिती सुधारण्याकरता वेगवेगळे लोक वेगवेगळे उपाय सुचवित होते. कोणी म्हणत होते पाणी द्यावे, कोणी म्हणत होते बियाणे द्यावे, कोणी म्हणत होते खते द्यावी, कोणी म्हणत कर्ज द्यावे. शेतकरी समाज पीडित होता हे सर्वांना मान्य होते पण शेतकऱ्याची सेवा केल्यानंतर मते मिळतील किंवा नाही याबद्दल कोणाला खात्री वाटत नव्हती. त्यामुळे गरिबी हटविण्याची भाषा करत प्रलोभनात्मक उपायच सुचवले जात होते. त्यामुळे, शेतकरी संघटनेने १९८० साली उसाला टनाला तीनशे रुपये भावाचे आंदोलन सुरू केले तेव्हा उसाला तीनशे रुपये भाव दिला तर सगळे साखर कारखाने मोडीत काढायला लागतील' असे शरद पवारांसारखे पुढारी म्हणू लागले; पण १० नोव्हेंबर ८० ला सुरू झालेल्या आंदोलनाला शेतकऱ्यांनी दिलेला प्रतिसाद आणि त्यानंतर शेतकऱ्यांमध्ये झालेली जागृती पाहून दोनच महिन्यामध्ये त्याच शरद पवारांनी शेतकरी संघटेनेवर वरताण म्हणून उसाला तीनशे नाही, साडे तीनशे रुपयांचा भाव मिळाला पाहिजे म्हणत नागपूरची दिंडी काढली. शेतकरी संघटनेने केवळ दोन महिन्यांच्या अवधीत प्रस्थापित पुढाऱ्यांना त्यांचे शब्द गिळायला लावले हा शेतकरी संघटनेचा पहिला विजय म्हणायला हवा.

शेतकरी संघटेनेने नुसती शेतीमालाच्या भावाची मागणी केली नाही; त्यापुढे जाऊन मूलभूत प्रश्न ऐरणीवर आणले. शेतकरी एक दाणा पेरतो आणि त्यातून शंभर दाणे तयार होतात तरी शेतकरी पीडित का? गरीब का? शेतकऱ्यांची जर का शेत ते ग्राहक यांच्यामध्ये लूट होत असेल तर ती कशामुळे होते? याचा अभ्यास शेतकरी संघटनेने केला. त्यातून उत्तर मिळाले ते असे की समाजवादी अर्थव्यवस्थेच्या नावावर ग्राहकांच्या हिताच्या नावाने, कामगारांच्या हिताच्या नावाने शेतकऱ्यांचे शोषण जाणीवपूर्वक, सरकारी धोरण म्हणून होते आहे आणि मग, या देशात नेहरू म्हणजे दैवत होतं, इंदिरा गांधी म्हणजे दैवत होतं अशा वेळी समाजवादाला विरोध करण्याचा झेंडा शेतकरी संघटेनेने पहिल्यांदा फडकावला आणि शेवटी, १९९१ साली आजचे पंतप्रधान आणि त्यावेळेचे वित्तमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या अंदाजपत्रकी भाषणामुळे समाजवादाचे पर्व संपत आले, संपले असे अजूनही म्हणणे कठीण

आहे, पण १९९१ साली त्याला उतरती कळा लागली आणि स्वातंत्र्याच्या सूर्याचा उदय होतो आहे असे वाटायला लागले.

पण, समाजवाद संपायला लागला तेव्हा प्रस्थापित पुढाऱ्यांचा गरिबी हटविण्याचा धंदाच बंद पडला. मग आता करायचे काय असा राजकारणातील हौसे, गवसे, नवसे मंडळींपुढे प्रश्न उभा राहिला. मग, त्यांच्यापैकी कोणाला अयोध्येचं मंदिर सापडलं, कोणाला शिवाजी महाराजांची एकदम आठवण झाली, आणखी काय, काय! १६ जानेवारी १९८८ रोजी शेतकरी संघटनेचा सांगली येथे मेळावा झाला, त्यावेळी मी शेतकऱ्यांना सांगितले की, 'बळिराज्य येते आहे, पण त्याच्याबरोबर जातीयवाद्यांची गिधाडेही उठली आहेत, तीही नुसती नाही – हिरवी, निळी, पिवळी, भगवी – झाडून सगळ्या रंगांची गिधाडे. शेतकऱ्याच्या – बळिराजाच्या हातचा घास ही गिधाडे घेतील, त्यांच्यापासून सावध राहा'. या गिधाडांच्या हल्ल्यामुळे सगळ्या देशापुढचा आर्थिक कार्यक्रम संपला.

आता यापुढे शेतकरी संघटनेची मार्गक्रमणा कशी असावी हे ठरवायचे असेल तर १९८० साली शेतकरी संघटना स्थापन झाली त्या वेळची देशाची परिस्थिती आणि आताची परिस्थिती यातील फरक कसा कसा होत आला हे समजावून घ्यायला हवे.

८० च्या दशकाच्या मध्यात रामाचा घोडा सुटल्याबरोबर काही लोकांनी शुंबकाचा घोडा सोडला आणि राम जर तपस्या करणाऱ्या दलित शंबुकाची मान कापून टाकत असेल, त्याने शबरीची उष्टी बोरे एकदा खाल्ली हा मुद्दा सोडून द्या, तर 'अयोध्येला' आणि 'शिवाजी'ला काटशह देण्याकरिता 'शंबुका'चा झेंडा उभारला पाहिजे, दलितांच्या ऐक्याचा झेंडा उभारला पाहिजे असे काही लोकांना वाटायला लागले. डॉ. आंबेडकरांनी दलितांची एकी व्हावी अशी कल्पना किती भव्य मानवतेच्या भावनेने मांडली; पण त्यांच्या वारसदारांनी मात्र राखीव जागांच्या आधाराने दलितांच्या उद्धाराच्या नावाने एक वेगळेच राजकारण चालू केले. सगळीकडे जातीयवादाचा विचार होऊ लागला. आम्हा दलितांच्या मदतीशिवाय कोणी निवडून येऊ शकत नाही अशी भाषा सुरू झाली. आज तर उत्तरेत, विशेषतः बिहार आणि बंगालमध्ये ही भाषा राजरोस वापरली जाऊ लागली आहे. बिहारमध्ये लालुप्रसादांनी उघड उघड म्हटले की आम्ही मुसलमान आणि यादव अशी एकी करून निवडणूक जिंकणार आहोत. म्हणजे, 'रामा' ला काटशह देण्याकरिता दलित आंदोलन उभं राहिलं, इस्लामचं आंदोलन उभं राहिलं आणि इस्लाम आणि दलित एकत्र होऊन लढू पाहात आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील दिल्लीच्या सरकारच्या आधाराने मोठे विचित्र सिद्धांत ही मंडळी मांडू लागली आहेत. काँग्रेसचा निवडणूक जाहीरनामा हा 'आम आदमी'साठी

आहे असे ते म्हणतात आणि त्यांच्या 'आम आदमी'ची व्याख्या करताना ते म्हणतात, की हिंदुस्थानातले दलित, हिंदुस्थानातले मुसलमान हे मागास आहेत, शोषित आहेत आणि त्यांच्याकरिता सरकारला जास्तीत जास्त न्यायाची आणि उद्धाराची कामगिरी करायची आहे. असा हा २००५ सालचा विचार आहे. १९८० साली शेतकरी शोषित आहेत असं सर्वजण म्हणत होते. आज २००५ साली अधिकृत विचारसरणी अशी बनली आहे की या देशात शोषित कोण असेल तर ते दलित आणि मुसलमान आहेत. त्याला तशी काही हरकत नाही. कारण ज्याची भुकेकंगाल अवस्था अधिक त्याची भूक प्राधान्याने भागवली पाहिजे; पण अशी विचारसरणी असण्यात एक अडचण तयार होते.

१९८० साली शेतकरी समाज शोषित आहे म्हणताना जन्माने शेतकरी असलेला मनुष्य शोषित असे कधी म्हटले नाही. आम्ही मुसलमान शेतकरी शोषित आहे, मराठा शेतकरी शोषित आहे असे म्हटले नाही. ज्याचे ज्याचे पोट शेतीवर अवलंबून आहे तो तो शेतकरी आहे आणि त्या सगळ्या शेतकऱ्यांचे शोषण होते आहे असे आम्ही म्हटले. शेतकरी कोण जन्माच्या आधाराने ठरत नाही हे मी वारंवार सांगितले आहे. शेतकऱ्यांच्या घरी जन्माला आला पण मुख्यमंत्री झाला आणि मुंबईत मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील गालिच्यावर त्याची पावले पडू लागली की, शेतकऱ्याच्या गळ्याला दावे बांधून त्याला कसाईखान्याकडे कसे न्यावे याचा विचार तो करू लागतो, तो शेतकरी राहत नाही. १९८३ साली पंढरपूरला झालेल्या 'साकडे मेळाव्या'त आपण विठोबाला साकडे घातले होते की, 'बा रखुमाईवरा, विठ्ठला, शेतकऱ्यांना एवढेच दान दे की शेतकऱ्यांच्या या पोरांना बुद्धी येवो'. या शेतकऱ्यांच्या पोरांनी शेतकऱ्यांचं जितकं नुकसान केलं, तितकं दुसऱ्या कोणीही केलं नाही. त्यामुळे, शेतकऱ्याचा मुलगा शेतकऱ्याचं कल्याण करतो हे काही खरं नाही. शेतकरी जातीनं ठरत नाही, तर ज्याचं पोट शेतीवर अवलंबून आहे तो शेतकरी अशी व्याख्या शेतकरी संघटनेने केली. शोषित वर्ग कोण आणि शोषक वर्ग कोण हे शेतकरी संघटनेने जन्माच्या आधारावर ठरवलं नाही; पण हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेला हसणारे काँग्रेसचे लोक, सोनिया गांधी आणि संपुआचे सरकार आता शोषितांचे अर्थकारण मांडण्याऐवजी शोषितांचे समाजकारण मांडायला लागले आहेत. अमक्या अमक्या जातींत, धर्मांत जन्मलेले सगळे शोषित आणि वरच्या जातीत जन्मलेला कितीही दरिद्री, गरीब असला, त्याला खायची भ्रांत असली तरी त्याला आम्ही शोषित मानणार नाही अशी या मंडळींची विचारधारणा बनली आहे. थोडक्यात, जन्माच्या आधाराने शोषणाची कल्पना मांडणाऱ्या विचाराचे विषारी बीज येथे रुजविले जात आहे. आम्ही १९८० साली शेतकरी संघटना बांधताना 'शोषित कोण' हे

मांडताना जन्माचा आधार घेतला नाही, त्याच्या व्यवसायाचा, कामाचा आधार घेतला; त्या पलीकडे, समाजवादाला विरोध करतानादेखील सिद्धांतात खोल जाऊन आम्ही एक आर्थिक सिद्धांत मानला की दहा लोक एकत्र बसून त्यांनी जर सामूहिक निर्णय करण्याचा प्रयत्न केला तर तो चुकीचाच असतो. अर्थशास्त्रात याला 'अॅरोचा सिद्धांत' म्हणतात. उदाहरणार्थ, पंचायतीत पाच लोक बसतात, 'पाचामुखी परमेश्वर' या न्यायाने हे पाच लोक गावाचे भले करतील अशी साऱ्यांची कल्पना असते. पण प्रत्यक्षात काय होते? जो तो पंच आपला आणि आपल्या लोकांचा स्वार्थ कसा साधता येईल याचाच विचार करतो आणि त्यातल्या त्यात जो दांडगा असतो तो पंच बाकीच्या लोकांना आपले म्हणणे मान्य करायला भाग पाडतो आणि मग जो काही निर्णय होतो तो संपूर्ण गावाच्या भल्याचा होऊच शकत नाही. थोडक्यात, सामूहिकरीत्या बलदंडांचा निर्णय घेतला म्हटले तरी तो सामूहिक निर्णय नसतो, त्या समूहातील इतर सर्वांवर लादलेला निर्णय असतो असा अॅरोच्या सिद्धांताचा अर्थ.

समाजवादी रशिया पूर्वी प्रबळ महासत्ता होती. कारण, साम्राज्यवादी आपल्या बोल्शेव्हिक राजवटीवर हल्ला करतील अशी सतत भीती वाटत असल्याने रशियन नागरिकांमध्ये राष्ट्रवादाची जबर भावना होती. तेथील कामगारांनी उत्पादनांचे अजब अजब चमत्कार घडवून आणले. याच राष्ट्रवादाच्या भावनेच्या बळावरच समाजवादी रशियाने हिटलरचे आक्रमण मोडून काढून त्याचा पराभव केला; पण हा विजय मिळविल्यानंतर शांततेच्या काळामध्ये, राष्ट्राचा विकास करण्यासाठी तेथेसुद्धा नियोजन मंडळे बसायला लागली. त्यांच्या सामूहिक निर्णयाला 'अॅरोचा सिद्धांत' लागला आणि युद्ध संपल्यानंतर पन्नास ते साठ वर्षांच्या आत रशियातील, एके काळी प्रचंड ताकदवान असलेल्या, समाजवादी राजवटी खालील रशियाच्या सोविएट युनियनचा डोलारा कोसळून पडला.

तेव्हा, सामूहिक निर्णय ही कल्पनाच चुकीची आहे, व्यक्तीचा निर्णय हाच खरा निर्णय. एखाद्या व्यक्तीला लाडू आवडतो याचा अर्थ तो घरातल्या सगळ्यांना आवडतोच असा होत नाही. प्रत्येक माणसाची चव वेगळी असते, प्रत्येक माणसाची प्रकृती वेगळी असते त्यामुळे त्या, त्या प्रकृतीप्रमाणे वेगळा वेगळा निर्णय होणे साहजिक ठरेल.

जितकी माणसे तितक्या प्रकृती. अशी वेगवेगळया प्रकृतीची माणसे एकत्र आली म्हणजे त्यांच्यामध्ये जी काही निवड व्हायची ती जेथे होते त्या जागेला 'बाजारपेठ' म्हणतात आणि अशा तऱ्हेने वेगवेगळया प्रवृत्तींच्या लोकांच्या प्रतिक्रियांनी जे निर्णय होतात तेच सर्वांत कार्यक्षम असतात. हीच भूमिका शेतकरी संघटनेने मांडली.

आजही पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग म्हणा किंवा वित्तमंत्री पी. चिदंबरम् म्हणा

– 'सामूहिक निर्णय तेवढे चुकीचे' हे तत्त्व मान्य करायला अर्थशास्त्रज्ञ असूनही तयार नाहीत.

सामूहिक निर्णय चुकीचे होत असले तरीदेखील सरकार थोडे असले पाहिजे असे म्हणता म्हणता, सरकार इतक्या गतीने वाढते आहे की १९८० मध्ये समाजवादाच्या पतनाला सुरुवात झाली असे मांडणाऱ्या शेतकरी आंदोलनावर प्रतिहल्ला होतो आहे.

कामगारांच्या चळवळी होतात, कामगारांचे संप होतात, हरताळ होतात; लाखोंच्या संख्येने लोक त्यांच्यात जातात. आज कामागारांची बाजू मांडणाऱ्या पक्षांचे ६३ खासदार लोकसभेत आहेत आणि शेतकरी आंदोलनाचा लोकसभेमध्ये एकही माणूस नाही हे लक्षात घ्यायला हवे आणि राज्यसभेत एक माणूस म्हणता येणार नाही, एक द्वितीयांशच माणूस म्हणून मी आहे. कामगारांच्या बाजूचे त्रेसष्ठ खासदार आहेत त्यांच्या मते शेतकऱ्यांना गुलाम बनवले पाहिजे आणि शेतकऱ्यांना स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असं म्हणणाऱ्यांची लोकसभेतील संख्या शून्य आहे. शेतकऱ्यांची मुले तिथे एकूण संख्येच्या निम्मी आहेत, अडीचशे खासदार शेतकऱ्यांच्या पोटी जन्मलेले आहेत; पण शेतकऱ्यांच्या हिताची एखादी गोष्ट कोणी करेल तर हराम. अशा परिस्थितीमध्ये शेतकरी आंदोलनाला पुढची वाटचाल करायची आहे.

गेल्या पंचवीस वर्षांत ज्या गोष्टी घडल्या त्या मी थोडक्यात पुन्हा सांगतो.

पहिली गोष्ट म्हणजे शेतकरी संघटनेने केलेली कमाई म्हणजे 'शेतकऱ्याला जाणीवपूर्वक लुटलं जातं; शेतकऱ्याचं मरण हेच सरकारचं धोरण' हा सिद्धांत आता जगमान्य झाला. हिंदुस्थानातील शेतकऱ्यांना उलटी पट्टी म्हणजे उणे सबसिडी आहे ही गोष्ट जगभर कागदोपत्री सिद्ध झाली; पण त्याच्याबरोबरच शेतकरी शोषित मानला न जाता दलित, मुसलमान असे जातीच्या आधाराने शोषित मानण्याची सुरुवात झाली आहे. हा शेतकरी आंदोलनाचा मोठा पराभव झाला आहे. हा जातीय गिधाडांचा विजय आहे आणि त्यापलीकडे, सामूहिक निर्णय हा चुकीचा असतो असं अजूनही मानलं जात नाही. दुर्दैवाची बाब म्हणजे हिंदुस्थानातील एक नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन यांनी सरकारच्या या मताला दुजोरा दिला म्हणून दिल्लीच्या सरकारमध्ये त्यांचं मोठं कौतुक चाललं आहे.

शेतकऱ्यांची परिस्थिती, म्हटलं तर, सुधारली आहे. पूर्वी घरात मडकी असतील तर आता ॲल्युमीनियमची पातेली आली आहेत; तांब्याची पातेली आलेली आहेत; पण कर्जाचा बोजा वाढला आहे आणि त्यामुळे हजारो शेतकरी आत्महत्या करीत आहेत ही गोष्टही खरी आहे. दिल्लीच्या सरकारने अहवाल काढला की शेतकरी काही आत्महत्या कर्जामुळे करीत नाहीत. त्या छापील अहवालात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची बरीच कारणे दिली आहेत. शेतकऱ्यांना व्यसनं असतात, ते दारू पितात, इतर मादक

द्रव्यांचं सेवन करतात म्हणून काहीजण आत्महत्या करतात. काहीजणांची तब्येत बिघडते, क्षयासारखे असाध्य रोग झालेले असतात त्यामुळे जिवाला कंटाळून ते आत्महत्या करतात. काही घरांमध्ये बायकोशी भांडण झालं आणि ती माहेरी निघून गेली म्हणून लोक जीव देतात. अशा तऱ्हेची आचरट कारणं सांगून, सरकारी धोरणांच्या परिणामांमुळे हतबल झाल्यामुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचा अपमान करणारे अहवाल या सरकारने छापवले आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना आता बुद्धी सुचली की आत्महत्या केलेल्यातील ९२ टक्के शेतकऱ्यांनी कर्जाच्या बोजामुळेच आत्महत्या केली. आतापर्यंत तेही हे मानायलाच तयार नव्हते.

शेतकरी संघटनेने कांद्याची लढाई केली, उसाची केली, दुधाची केली, तंबाखूची केली, कापसाची केली; पण शेवटी सगळ्यात महत्त्वाचं आंदोलन म्हणजे कर्जमुक्ती. कर्जमुक्ती आंदोलन शेतकरी संघटनेने अनेक तऱ्हेने केले, शेतकऱ्यांची कर्जे अनैतिक आहेत, बेकायदेशीर आहेत असे सर्वांना पटवून दिले, नादारीचे अर्ज केले आणि एवढं करूनसुद्धा, अत्यंत दुष्ट सावकारापेक्षाही दुष्ट असलेल्या सरकारने अजूनही, कारखान्यांच्या मालकांची हजारो कोटी रुपयांची कर्जे माफ केली पण शेतकऱ्यांच्या काहीशे कोटी रुपयांची कर्जे माफ करण्याचा विचार केलेला नाही. तपशिलात न जाता आजचा पंचविसाव्या वर्षाचा निर्णय मी जाहीर करतो की आपल्याला कर्जमुक्तीचं आंदोलन आतापर्यंतच्यापेक्षासुद्धा अधिक जोमाने चालवायचे आहे. इतर काही नाही तरी, माझे डोळे मिटण्याच्या आधी हिंदुस्थानातील शेतकरी कर्जमुक्त झालेला मला पाहायचा आहे.

आजच्या या कार्यक्रमामध्ये 'कर, कर्जा नहीं देंगे, बिजली का बिल भी नहीं देंगे!' ही सांगली-मिरजच्या अधिवेशनातील घोषणा कायम आहे; पण त्यापलीकडे आजच्या किसान समन्वय समितीच्या बैठकीत एक वेगळी भूमिका मांडण्यात आली. शेतकऱ्यांच्या कर्जावर व्याजाची जी आकारणी होते ती रिझर्व बँकेच्या आदेशांच्या आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांच्या विरुद्ध आहे. बँकांची कर्जावरील व्याजाची आकारणी जर का त्या नियमांप्रमाणे झाली तरीसुद्धा शेतकऱ्यांचे करोडो अब्जो रुपये वाचतील. हे लक्षात घेतल्यानंतर पहिला टप्पा म्हणून वेगवेगळ्या मार्गांनी सगळ्या बँकांमधील हिशोब तपासून काढून, व्याजाची आकारणी खरी किती व्हायला हवी होती त्याची तपासणी करून आंदोलनाचा एक व्यापक कार्यक्रम तयार करण्याचे किसान समन्वय समितीच्या बैठकीत सगळ्या राज्यांनी ठरवले आहे. जे काही आंदोलन करावयाचे त्याची घोषणा येत्या मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात करण्यात येईल. पुढील आर्थिक वित्तीय वर्ष सुरू व्हायच्या आधी म्हणजे ३१ मार्चच्या आधी हे आंदोलन सुरू करायचे आहे.

शेतकरी संघटनेला २५ वर्षे झाली. या काळात आपण अनेक संकटांतून गेलो; पण काही काही आठवणी झाल्या म्हणजे मोठं आश्चर्य वाटतं की शेतकरी संघटना ही काय गोष्ट आहे!

जेथे मी शेतीच्या आणि शेतीअर्थशास्त्राच्या अभ्यासाचा प्रारंभ केला त्या माझ्या शेताला मी 'अंगारमळा' असे नाव दिले. यातील 'अंगार' हा शब्द कुसुमाग्रजांच्या 'गर्जा जयजयकार' या कवितेतून घेतला;

*पदोपदीं पसरून निखारे आपुल्याच हाती*
*होऊनिया बेहोश धावलो ध्येयपथावरती*
*कधी न थांबलो विश्रांतिस्तव पाहिले न मागे*
*बांधू न शकलो प्रीतीचे वा कीर्तीचे धागे*
*एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार,*
*होता पायतळी अंगार*

'**अंगारमळा**' मधील अंगार शब्द असा आला.

साने गुरुजींच्या,

*रात्रंदिवस तुम्ही करीतसा काम*
*जीवनात तुमच्या उरला नाही राम*
*घाम गळे तुमचा, हरामाला दाम*
*येवो आता तुम्हा थोडा तरी त्वेष*
*येथून तेथून सारा पेटू दे देश ।*

या कवितेतून '**भीक नको, हवे घामाचे दाम**' स्फुरले.

पुढे नारायण सुर्वेंच्या 'डोंगरी शेत माझं ग,' या कवितेतील

*'या संसारा बाई सांजी येई ना*
*रगत गाळून अंगा धडुतं मिळं ना*
*कष्टाचं फळ बाई पदरात पडं ना*
*टिचभर पोटाला ग,*
*हातभर देहाला ग,*
*आम्ही जपावं किती?'*

या ओळींमध्ये चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनाच्या शिदोरीचे सार सापडले.

केशवसुतांच्या 'तुतारी' मधील

*'जुने जाऊं द्या मरण लागुनि,*
*जाळुनि किंवा पुरूनि टाका,*
*सडत न एक्या ठायीं ठाका,*

*सावध ! ऐका पुढल्या हाका !*
*खांद्यास चला खांदा भिडवुनि !*

या कडव्याने शेतकरी संघटनेच्या जुन्या-नव्या पाईकांना जालना अधिवेशनात कुंपणरहित जगातील स्पर्धेचे आव्हान स्वीकारण्याचा मंत्र दिला. इंद्रजित भालेरावांच्या '**कुणब्याचा पोरा आता लढायला शिक**'ने परभणीच्या रौप्य महोत्सव मेळाव्याच्या निमित्ताने शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांच्या तरुण मुलांना पुढे येण्याचे आवाहन केले.

शेतकरी संघटनेने गेल्या पंचवीस वर्षातील आपल्या वाटचालीत मराठी साहित्यातील, विशेषतः कवितांचा ज्या प्रतिभेने आणि समर्पकपणे उपयोग केला त्याचा वेगळा अभ्यास कोणी केला तर तो पीएच्.डी. च्या पात्रतेचा ठरेल.

शेतकरी संघटनेने साहित्यामध्ये - ग्रामीण साहित्यामध्ये जे प्रयोग केले, तसेच शेतकरी संघटनेचा ग्रामीण साहित्यावर झालेला परिणाम हा सुद्धा एक चमत्कार आहे.

शेतकरी संघटनेने अर्थशास्त्रामध्ये तर प्रचंड चमत्कार केला. त्या दृष्टीने शेतकरी संघटना हे एक विद्यापीठ आहे. आठवीदहावी नापास झालेली शेतकऱ्यांची मुले शेतकरी संघटनेची एखाददोन शिबिरे केली किंवा दोनचार सभा ऐकल्या म्हणजे अर्थशास्त्रात असे काही तयार होतात की महाविद्यालयांत किंवा विद्यापीठांत जाऊन जागतिक व्यापर संघटनेपर्यंतच्या अर्थशास्त्रासंबंधी विषयांवर अशी काही मांडणी करतात की तिथले प्राध्यापक अचंबित होऊन त्याचं कौतुक करतात.

एक शिवाजी निर्माण झाल्यामुळे जसा मावळयांच्या कर्तृत्वाला उभारी आली तशीच शेतकरी संघटनेच्या उदयामुळे शेतकरी समाजातील सुप्त प्रतिभेला आविष्काराचे धुमारे फुटण्याचा चमत्कार घडला. याचे एकच उदाहरण ऐकलेत तरी ते लक्षात यावे. आज भाषणाच्या सुरुवातला चाकणच्या शंकरराव वाघांचा मी मोठा आदरपूर्वक उल्लेख केला. सातवी आठवीसुद्धा न शिकलेले शंकरराव. आम्ही विदर्भात कापसाच्या प्रश्नाचा अभ्यास करण्याकरता सुरुवातीला गेलो तेव्हा ते बरोबर होते. तेथे स्वतःला विद्वान समजणारे अर्थशास्त्री जमले होते. शेतीमालाला भाव कसा मिळावा याबद्दल त्यांनी त्यांचा एक सिद्धांत मांडला. त्यांच्या म्हणण्यानुसार कापडाला जो काही भाव मिळतो त्यातून जिनिंग करणाऱ्या, सूत काढणाऱ्या, कापड विणणाऱ्या अशा मजुरांचा खर्च वजा जाता जी रक्कम उरेल ती सगळीच्या सगळी कापूस उत्पादक शेतकऱ्याला मिळायला पाहिजे. या सिद्धांतावर उभ्या केलेल्या कापूस उत्पादक संघटनेचे संस्थापक डॉ. कोरपे यांनी त्यांचा हा विचार, 'कॉस्ट ऑडिट' या नावाने आमच्या समोर मांडला. अल्पशिक्षित शंकरराव वाघ ज्यांनी ट्रकवरील क्लीनर म्हणून आपलं आयुष्य सुरू केलं यांनी डॉ. कोरपेंना म्हटले, 'हा तुमचा सिद्धांत माझ्या नीट लक्षात येत

नाही. मी कांदा पिकवतो. पंचतारांकित हॉटेलात जेवण करणाराने कांदा मागितला तर कांदा चिरून दिला जातो, त्याचे वेगळे पैसे लावत नाहीत. म्हणजे फुकटच दिला जातो. तुमच्या या सिद्धांताप्रमाणे त्या कांद्याला मला काहीच मिळणार नाही. तोच कांदा एखाद्या टपरीवर चिरून त्याची भजी केली तर त्याला खूप किंमत येते, मग तिथे मात्र माझ्या कांद्याला भरपूर पैसे मिळायला पाहिजेत, असंच ना? माझा गूळ जर पन्ह्यात घातला तर पन्हं स्वस्त असल्याने कमी किंमतीत द्यावा लागेल; पण तोच गूळ आंबवून त्यातून हातभट्टीची दारू काढली तर ती चांगल्या भावाने विकली जात असल्याने त्याच गुळाला किती तरी जास्त किंमत मिळेल असाच तुमच्या सिद्धांताचा अर्थ ना?' शंकररावांच्या या प्रश्नावर प्रकांडपंडित अर्थशास्त्री निरुत्तर झाले. असे एकटे शंकरराव वाघच नव्हे, महाराष्ट्रभरच्या अर्धशिक्षित, अशिक्षित, अडाणी म्हणून हिणवल्या गेलेल्या शेतकरी समाजातील प्रतिभा शेतकरी संघटनेच्या उदयामुळे जागृत झाली आणि त्यांनी भल्याभल्या प्रस्थापित विद्वानांची बोलती बंद केली.

शेतकरी संघटनेचा इतिहास बहुपेडी आहे – काव्याचा इतिहास आहे, साहित्याचा इतिहास आहे, अर्थशास्त्रीय अभ्यासाचा इतिहास आहे, आंदोलन तंत्राचा इतिहास आहे. शेतकरी संघटना ही मुळात प्रचलित अर्थाची संघटना नाहीच; शेतकरी संघटना हे कुटुंब आहे. शेतकरी संघटनेच्या एखाद्या पाईकाच्या घरी दुसरा एखादा पाईक गेला तर कोणी नातेवाईकच घरी आल्याचा आनंद होतो. सगळया महाराष्ट्रामध्ये – पार कोल्हापूरपासून ते गडचिरोलीपर्यंत – जी काही स्वच्छ मनाची शेतकरी माणसे आहेत, ज्यांना आपल्याकडे जी काही शेती आहे तिच्यात कष्ट करावे आणि सन्मानाने जगावे असे प्रामाणिकपणे वाटते अशा सर्वांचे हे कुटुंब आहे. एकमेकांना भेटले म्हणजे त्यांना नातेवाईक भेटल्याचा आनंद होतो. मला तर हा अनुभव नेहमी येतो. आज हिंदुस्थानामध्ये कमीत कमी हजार घरं अशी सांगता येतील की मी तेथे गेलो म्हणजे त्या घरातील माणसांना दसरादिवाळी झाली असं वाटतं; मी जर कुठं आजारी पडलो तर माझी सख्खी नातेवाईक मंडळी येण्याआधी त्या घरची मंडळी दवाखान्यात माझ्यापाशी येऊन पोहोचलेली असतात.

पंचवीस वर्षे झाली, त्यावेळी 'शेपटी सरळ होणार नाही' म्हणता म्हणता, आता शेपटी सरळ झाली किंवा नाही माहीत नाही, सरळ होईल अशी बरीच आशा दिसते. शेतकऱ्यांची कोणतीही संघटना याआधी हिंदुस्थानभर कोणी नेली नव्हती. उत्तर हिंदुस्थानातील शेतकरी नेते उत्तर हिंदुस्थानात राहत होते, दक्षिणेतील दक्षिणेत राहत होते. संपूर्ण हिंदुस्थानात विस्तारलेलं शेतकरी संघटना हे पाहिलं आंदोलन झालं. एवढेच नव्हे तर सगळया शेतकऱ्यांना – वेगवेगळया पिकांच्या, वेगवेगळया प्रांतांच्या, वेगवेगळया भाषांच्या – 'शेतीकर्ज' या एका सूत्रामध्ये बांधण्याचे अजब काम या

शेतकरी संघटनेने केले. ते करताना माझ्या हातून काही चुका झाल्या असतील; जो निर्णय घेतो त्याच्याकडून चुका होणे साहजिकच आहे. त्या चुकांमुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षेइतकी शेतकरी संघटनेची प्रगती झाली नसेल कदाचित; माझ्या चुकांमुळे, कदाचित, तुमच्यापैकी काही लोकांना जिल्हा परिषदेमध्ये, विधानसभेमध्ये किंवा लोकसभेमध्ये जाण्याची अपेक्षित संधी मिळाली नसेल. त्याबद्दल खेद व्यक्त करून मी सांगू इच्छितो की, संघटनेच्या आयुष्यात २५ वर्षे म्हणजे काही मोठा काळ नाही. शेतकरी संघटना २५ वर्षांची झाली, २५ वर्षांचा माणूस तरुण असतो; पण संघटना हे बाळ आहे. त्याच्या हातून जर काही चूक झाली असेल तर ती पोटात घाला आणि त्या बाळाला ममतेने आणि प्रेमाने वाढवा. कारण, हे अत्यंत कठीण अवस्थेत जन्मलेले बाळच, तुरुंगात जन्मलेल्या बाळकृष्णाने मोठा झाल्यावर जसे कालियामर्दन केले तसेच, मोठे झाल्यावर सर्व शेतकरी समाजाला छळणाऱ्या सरकारशाहीरूपी कालियाचे मर्दन करून त्याच्या छळातून तुमची सुटका करणार आहे.

*(१० डिसेंबर २००५ - रौप्यमहोत्सव मेळावा परभणी)*

*(शेतकरी संघटक ६ जानेवारी २००६)*

■■

# शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा नेहरू आणि त्यांच्या वंशावळीचे पाप

शेतकरी संघटनेच्या व्यासपीठावरून भाषण करताना मी 'शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो' अशी सुरुवात करतो तेव्हा सर्व शेतकरी पुरुष माझे भाऊ आणि सर्व शेतकरी महिला माझ्या मायबहिणी आहेत याचे सूचक म्हणून केलेली असते; पण साताऱ्याच्या या व्यासपीठावरून जेव्हा मी तशी सुरुवात करतो आहे तेव्हा त्याला एक विशेष अर्थ आहे. माझा जन्म साताऱ्यातला असल्याने, माझे बालपणही साताऱ्यातच गेलेले असल्यामुळे साताऱ्यातील सर्व शेतकरी स्त्रीपुरुष अधिक अर्थाने माझे बहीणभाऊ आहेत. माझ्या सुदैवाने म्हणा की दुर्दैवाने, माझे वडील शेतकरी नव्हते, सरकारी नोकरदार होते. त्यामुळे मला शिकण्याची संधी मिळाली. माझे वडीलही शेतकरीच असते तर मलाही शेतीवरच रहावे लागले असते आणि आज या सभेच्या सुरुवातीला माझ्या ज्या भावाबहिणींनी आपल्या कर्जव्यथांच्या कैफियती सांगितल्या त्यांच्यातलाच एक म्हणून मलाही माझ्या कर्जव्यथांची कैफियत मांडावी लागली असती.

शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्षाच्या या कर्जमुक्ती अभियान यात्रेची सुरुवात ५ एप्रिल २००६ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे जन्मगाव येडे मच्छिंद्र येथून झाली. काही पत्रकारांच्या मनात प्रश्न उभा राहिला की या कर्जमुक्ती यात्रेची सुरुवात नाना पाटलांच्या गावापासून सुरू करण्याचे प्रयोजन काय? तसा काही फार जुना इतिहास नाही. इंग्रज राजवटीच्या काळात क्रांतिसिंह नाना पाटलांनी प्रतिसरकारच्या स्थापनेची घोषणा करून शेतकऱ्यांची कर्जमुक्ती जाहीर केली आणि शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या सावकारांना आणि त्या सावकारांना पाठबळ देणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना पकडून त्यांच्या पायांना पत्र्या मारण्याचे आंदोलन चालवले. बऱ्याच लोकांची कल्पना अशी की पायांना पत्र्या मारीत म्हणजे घोड्याबैलांच्या पायांना जसे पत्र्याचे नाल मारतात तसे नाल मारीत असावेत.

नाना पाटील काही असे हिंसक नव्हते. नानांचे सैनिक जुलमी सावकारांना आणि अधिकाऱ्यांना पकडून खुर्चीवर जखडून बांधीत आणि समोरच्या स्टूलावर त्यांचे पाय ठेवून त्यांच्या पायांच्या उघड्या तळव्यावर वेताच्या छडीने मार देत. या प्रकारालाच पत्र्या मारणे म्हणतात. नाना पाटलांच्या प्रति सरकारला, त्यामुळे काही लोक 'पत्री सरकार' म्हणून ओळखत. शेतकरी संघटनेची ही कर्जमुक्ती प्रचारयात्रा सावकारांना पत्र्या मारणाऱ्या नाना पाटलांच्या गावाहून सुरू होते आहे म्हणजे शेतकरी संघटनेचे कार्यकर्तेही बँकांच्या अधिकाऱ्यापदाधिकाऱ्यांच्या पायांना नाल ठोकणार की काय अशी या काही पत्रकारांना धास्ती होती. नाना पाटलांनी कोणाला नाल ठोकले नाही आणि शेतकरी संघटनेलाही तसे करण्याची जरूरी वाटत नाही आणि ती संघटनेची कार्यपद्धतीही नाही; पण सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे वाढलेल्या कर्जबाजारीपणाच्या बोजामुळे आत्महत्येच्या कड्याकडे ढकलला जाणारा शेतकरी, सरकार आपले चुकीचे धोरण बदलायला अजूनही तयार होत नाही हे लक्षात आल्यानंतर पुढे काय करील हेही सांगता येत नाही.

कालपरवाच नाशिक जिल्ह्यात झालेला प्रकार या दृष्टीने पुरेसा बोलका आहे. नाशिक जिल्ह्याच्या देवळा तालुक्यातील विठेवाडी येथे केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या उपस्थितीत शेतकरी मेळावा भरवला होता. नाशिक जिल्हा म्हणजे कांदा उत्पादक भाग. कांद्याचे भाव पार पडलेले आहेत. शेतकऱ्यांचे जाणते नेते आणि केंद्रीय कृषिमंत्री कांद्याच्या या परिस्थितीवर काही तोडगा काढतील या अपेक्षेने कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने या मेळाव्याला गेले. त्यात शेतकरी संघटनेचे सर्वसाधारण पाईकही होते. सभेतले सत्कार झाले, नेतेमंडळींचे स्वागत झाले, पोवाडे गायले गेले, एकेक मंत्र्यांची भाषणे होऊ लागली पण कांद्याच्या प्रश्नावर कोणीच बोलेनात आणि मग महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांचे जाणते नेते खुद्द कृषिमंत्रीही जेव्हा कांद्याचा प्रश्न डावलूनच बोलू लागले तेव्हा शेतकऱ्यांनी आपल्या या जाणत्या राजाची मोठी फजिती केली आणि त्यांना आपल्या लवाजम्यासहित पळ काढायला लावला. या ठिकाणी शेतकरी संघटनेचा कोणी मोठा नेता हजर नव्हता की आधी कोणी या शेतकऱ्यांना तशी दिशाही दिली नव्हती. या फटक्यामुळे पुढाऱ्यांच्या असे ध्यानात आले आहे की शेतकरी संघटना म्हणजे शरद जोशी किंवा शेतकरी संघटना म्हणजे सरोज काशीकर, वामनराव चटप असे चित्र राहिलेले नाही. गेली पंचवीस वर्षे शरद जोशी, सरोज काशीकर, वामनराव चटप आणि त्यांच्या सर्व ज्येष्ठ-कनिष्ठ सहकाऱ्यांनी महाराष्ट्रभरच्या शेतकऱ्यांच्या मनात ज्या स्वातंत्र्यबीजाची पेरणी केली त्यातून उगवलेल्या रोपट्यांचे आता वृक्ष

बनले आहेत आणि त्याला फळे येऊ लागल्याचे हे उदाहरण आहे. शेतकऱ्यांचा आत्मविश्वास आता दृढ झाला आहे आणि शेतकऱ्यावर जर अन्याय झाला तर, शेपटीवर कोणी पाय दिल्यानंतर नाग जसा फणा काढून उभा राहतो तसा फणा काढून शेतकरी अन्यायकर्त्याला धडा शिकवण्याइतका सज्ज झाला आहे. याची भीती आता राजकारणातल्या सगळ्या लोकांना पडली आहे.

येडे मच्छिंद्र येथे या प्रचारयात्रेचा प्रारंभ करण्यासाठी केलेल्या भाषणात मी नाना पाटलांच्या वेळची शेतकऱ्यांच्या कर्जाची परिस्थिती आणि आजची परिस्थिती यांची तुलना केली. जेव्हा नाना पाटलांनी शेतकऱ्यांना कर्जमुक्त करायचं ठरवले आणि त्यासाठी प्रतिसरकार स्थापन केल्याची घोषणा केली त्यावेळी आपल्या देशात सरकार होते गोऱ्या साहेबाचे म्हणजे परक्यांचे; बाहेरून व्यापाराकरिता आलेल्या आणि आपल्यावर राज्य करणाऱ्या ब्रिटिशांचे सरकार होते. त्यावेळी सावकाराच्या जाचापायी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत नव्हत्या. शेतकऱ्यांनीच सावकारांचे कान नाक कापायला सुरुवात केली, त्यांच्या कर्जाच्या वह्या, कागदपत्रे, गहाणपत्रे जाळायला सुरुवात केली. तेव्हा इंग्रज सरकारने तीन महिन्यांत दक्षिणेतील शेतकऱ्यांसाठी एक आयोग नेमला आणि त्याबरोबरच सावकारी कर्जव्यवहारांतील व्याजखोरीला आणि जुलुमाला आळा घालण्यासाठी १९१८ साली युझुरिअस लोन्स् ॲक्ट (Usurious Loans Act) नावाचा कायदा केला. (युझुरिअस लोन म्हणजे कायद्याने ठरविलेल्या व्याजदरापेक्षा अधिक दराने दिलेले कर्ज). या कायद्यात पहिली तरतूद अशी होती की शेतकऱ्यांना दर साल दर शेकडा साडेपाचपेक्षा जास्त दराने व्याज लावता कामा नये. आज २००६ साली, दिल्लीतील आपल्याच देशातील लोकांनी चालविलेले, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकार शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याजाचा दर कमी करून ७ टक्क्यांवर आणल्याची घोषणा करून आपण शेतकऱ्यांवर मोठी मेहेरबानी केल्याचा डांगोरा पिटीत आहे. सरकारने ७ टक्के व्याजदाराची घोषणा केली असली तरी अजून काही त्याची अंमलबजावणी सुरू झालेली नाही. अजूनही सहकारी बँका १०, ११, १२, १४ टक्क्यांनी व्याज आकारणी करीतच आहेत. आमच्याच लोकांचे सरकार व्याज कमी करून ७ टक्क्यांवर आणण्याची नुसती घोषणाच करते, पण परक्या इंग्रजांच्या सरकारने शेतकऱ्यांना साडेपाच टक्क्यांच्यावर व्याज लावता कामा नये असा कायदा केला.

इंग्रजांच्या त्या १९१८ सालच्या कायद्यात अशीही तरतूद आहे की शेतकऱ्यांच्या कर्जावर चक्रवाढ व्याज आकारता येणार नाही. चक्रवाढ व्याज म्हणजे काय

सर्वांनाच माहीत आहे. आज बँका काय करतात? तुम्ही जर कर्ज घेतले असेल तर त्यावर महिन्याने, दोन महिन्यांनी, तीन महिन्यांनी व्याज आकारणी करतात आणि ही व्याजाची रक्कम पुढील काळासाठी मुद्दलात जमा करतात. म्हणजे पुढच्या मुदतीसाठी मागील मुदतीतील व्याजावरही व्याज आकारले जाते. अशा तऱ्हेने व्याजावर व्याज आकारू नये अशी तरतूद इंग्रजांनी आपल्या १९१८ सालच्या कायद्यात करून ठेवली आहे. त्याखेरीज, सावकाराने वसूल केलेल्या कर्जव्याजाच्या बाबतीतही जर शेतकऱ्याने न्यायालयात अर्ज करून हरकत घेतली आणि आपल्यावरील कर्जाच्या हिशोबात चूक झाल्याची शंका व्यक्त केली तर ते प्रकरण न्यायालयाने पुन्हा उघडून हिशोब करून व्याज आकारणीबाबत फसवणूक झाली असेल तर सावकाराने जादा वसूल केलेली रक्कम शेतकऱ्याला परत मिळवून देण्याची तरतूदही या कायद्यात होती. हा तर केंद्राचा, व्हाइसरायचा कायदा झाला. पण त्यापुढे जाऊन मद्रास आणि म्हैसूर इलाख्यांच्या सरकारांनी त्या कायद्यात आणखी सुधारणा करून आणखी एक तरतूद केली की शेतकऱ्यांच्या कर्जावरची व्याज आकारणी कर्जाची दामदुप्पट होणार नाही येथपर्यंतच करता येईल. म्हणजे व्याजाची रक्कम मुद्दलाइतकी झाली की व्याज आकारणी बंद करायची. हे इंग्रजांच्या राज्यातील धोरण.

आज आपल्याच लोकांनी चालवलेल्या राज्यात काय अनुभव येतात. नांदेडमधील एका शेतकऱ्याने ९६ हजार रुपयांचे कर्ज घेतले आणि ८ वर्षांनी त्याच्यावर त्या कर्जापोटी देणे झाले १८ लाख रुपये. माझ्यासमोर सातऱ्यातल्या एका शेतकऱ्याची चिठ्ठी आहे. नाव : मारोती केसू सावंत. २००० साली ४७ हजार रुपये कर्ज काढले. त्या कर्जापोटी आतापर्यंत २ लाख ९१ हजार रुपये भरले आहेत. तरीही बँक म्हणते आहे की तुम्ही आमचे अजून ५ लाख रुपये देणे लागता. ही काही एक-दोन उदाहरणे नाहीत. महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील प्रत्येक प्रामाणिक शेतकऱ्याच्या कर्जाच्या बाबतीत जवळपास अशीच परिस्थिती सापडेल. त्या दिवशी येडे मच्छिंद्र येथेही पाच-सहा शेतकऱ्यांनी अशाच कैफियती मांडल्या. त्यावेळी भाषण करताना मी म्हटले, 'नानासाहेब, शेतकऱ्यांना जाच करणाऱ्या सावकार, अधिकाऱ्यांना तुमच्या काळी तुम्ही पत्र्या मारल्या, तुमच्यावेळी असे सवाई सावकार सहकार महर्षी असते तर तुम्ही त्यांचे काय केले असते? तुम्ही जे काही केले असते ते करण्याची बुद्धी आणि धैर्य, तुम्ही ज्या मातीत जन्मलात त्याच मातीत जन्मलेल्या लोकांना द्या.'

१९८१ साली निपाणीला आम्ही तंबाखू शेतकऱ्यांबरोबर तंबाखूला फक्त १०

रुपये किलो भाव मिळावा म्हणून २३ दिवस रस्त्यावर बसलो होतो. पण २४व्या दिवशी मध्यरात्री पोलिसांनी तिथे येऊन आम्हा प्रमुख माणसांना अटक केली. अटक करायला हरकत नाही, पण तिथे बसलेल्या चाळीस हजारांवर शेतकरी स्त्री-पुरुषांना शांत ठेवण्याच्या दृष्टीने आम्हाला तिथेच ठेवा, दूर नेऊ नका अशी विनंती केली तरी त्यांनी आम्हाला दूर बल्लारीच्या तुरुंगात नेले. दुसऱ्या फळीच्या कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली रस्ता रोको चालूच होते. दुसऱ्या दिवशी म्हणजे ६ एप्रिल १९८१ रोजी काही बसगाड्या आणून आणखी काही सत्याग्रहींना अटक केली. सर्वांना अटक करून नेणे शक्य नाही हे शेतकऱ्यांना समजत होते आणि पोलिसांनाही. २३ दिवसांच्या सरावाने धीट झालेल्या शेतकऱ्यांनी आपला शांततामय सत्याग्रह सुरूच ठेवला होता. पण मग, भर मध्याह्नी पोलिसांनी शांतपणे बसलेल्या शेतकऱ्यांना पांगवण्यासाठी अश्रुधुराची नळकांडी फेकली, ती शेतकऱ्यांनी पोलिसांकडेच परतवली; मग थोडे लाठीमाराचे नाटक करून पोलिसांनी शांतपणे बसलेल्या, घामाचे दाम मागणाऱ्या त्या शेतकऱ्यांवर अंदाधुंद गोळीबार केला आणि अर्ध्या तासाच्या आत १२ शेतकरी भावांचे बळी घेतले.

५ एप्रिलला क्रांतिसिंह नाना पाटील यांचे जन्मगाव येडे मच्छिंद्र येथून निघालेली ही प्रचारयात्रा ६ एप्रिल रोजी निपाणी येथे तेथील हुतात्मा स्मारकाला वंदन करण्यासाठी गेली. शेतकरी हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करून आम्ही, सिनेमाच्या भाषेत बोलायचे तर, डोक्याला कफन बांधून या प्रचार यात्रेला निघालो आहोत. शेतीमालाला भाव मिळावा म्हणून जर का १२ शेतकऱ्यांनी या भूमीवर रक्त सांडले आहे तर शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याकरिता त्यांच्या पायाची शपथ घेऊन आम्ही पुढे निघालो आहोत.

निपाणीच्या हुतात्म्यांचे स्मरण, गेल्या दोन-तीन दिवसांत ऐकलेल्या काही शेतकऱ्यांच्या कर्जव्यथांच्या कैफियती या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेच्या गेल्या पंचवीस वर्षांच्या विचारप्रवाहाचा आढावा घेणे उचित होईल.

व्यासपीठावरून कैफियत मांडणारे आणि समोर बसून ऐकणारे – दोघांच्याही चेहऱ्यांवर दिसत होते की आपण कर्ज घेतले की चूक केली. काही चमत्कार होऊन – लॉटरी लागून म्हणा किंवा आणखी कोण्या मार्गाने – आपल्या हाती पैसे आले तर आधी हे कर्ज देऊन टाकू असेच जणू ते चेहरे बोलत होते. कोणाचे पैसे बुडवावे ही कोणाही सर्वसामान्य शेतकऱ्याची इच्छा असत नाही. ज्योतिबा फुल्यांनी म्हटले आहे की, 'शेतकरी हा अन्नदाता आहे. सगळ्या जगाची तो सेवा करतो; शेतीव्यतिरिक्त कारागिरी करून समाजाची सेवा करणारे बळिराजाकडे

येऊन सुपासुपांनी धान्य घेऊन जातात अशी आमची वर्षानुवर्षांची परंपरा आहे.'

शेतकरी एक दाणा पेरतो आणि त्यातून हजार दाण्यांची निर्मिती करतो. एखाद्या यंत्रामध्ये एक किलो म्हणजे हजार ग्रॅम लोखंड घातले आणि दुसऱ्या बाजूने दोन हजार सोडा हजार आणि एक ग्रॅम लोखंड बाहेर आले असे कोठे होत नाही. हे फक्त शेतकऱ्याच्या शेतीच्या कारखान्यातच होते. मग, ज्याच्या शेतामध्ये एका दाण्याचे शंभर, हजार दाणे होतात असा शेतकरी गरिबीत, बुडीत, कर्जात आणि ज्याच्या कारखान्यामध्ये हजार ग्रॅमचे हजार आणि एक ग्रॅमसुद्धा होत नाहीत तो मात्र हवेल्या बांधून मोठ्या थाटात राहतो हे काय गौडबंगाल आहे, ते समजून घ्यायला हवे. निसर्गामध्ये उत्पादन करणारा, गुणाकार करणारा फक्त शेतकरी आहे, दुसरा कोणी नाही आणि तरीही तो गरीब राहत असेल तर त्याचा अर्थ असा की, तुमच्या शेतीमध्ये झालेला गुणाकार पळवून नेण्याचा धंदा होतो आहे. थोडक्यात सांगायचे तर, उत्पादन करणारा फक्त शेतकरी आहे, बाकी सगळे लोक त्या उत्पादनाचे रूप बदलतात. शेतकरी एका दाण्याचे शंभर, हजार दाणे बनवतो तो गरीबच राहतो. पण त्याच दाण्याचे पीठ बनवणारा ब्रेड बनवणारा, बिस्किटे बनवणारा अशांना पैसा मिळतो; दाणा पिकवणाराला मिळत नाही. हे काय प्रकरण आहे?

या प्रश्नाचे उत्तर मी १९८० सालापासून अनेकवेळा दिले आहे, त्याची इथे उजळणी करतो.

शेती तोट्यात आहे, शेतकरी गरीब आहे, शेतकरी कर्जबाजारी आहे याचे कारण शेतकरी आळशी आहे असे नाही; शेतकरी निरक्षर आहे, शेती कशी करायची हे त्याला कळत नाही असे नाही; शेतकरी व्यसनी आहे हेही खोटे. शेतकरी लग्नासारख्या प्रसंगी, सणासुदीला जास्त खर्च करतो म्हणून कर्जात बुडतो हेही खोटे. शेतकरी कर्जात जातो, शेतकरी गरीब आहे याचे खरे कारण हे की शेतीमध्ये माल पिकवण्याचा जितका खर्च येतो, एक दाण्याचे हजार दाणे करण्याकरिता जे काही श्रम करावे लागतात, कष्ट करावे लागतात, भांडवल गुंतवावे लागते ते सर्व शेतीमालाला बाजारात मिळणाऱ्या किमतीतून भरून येत नाही. शेतीमालाला अशी किंमत मिळत नाही याचे कारण सरकारने शेतीमालाला रास्त भाव मिळू नये असे धोरण ठरवले आहे. कारखाने जोरात चालावे, कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना भाकरी स्वस्त मिळावी, कारखान्याला लागणारा कच्चा माल स्वस्तात स्वस्त मिळावा म्हणून शेतीमालाचा भाव पाडण्याचे धोरण या देशाच्या सरकारने आखले. गोऱ्या इंग्रजाच्या काळात हेच धोरण होते;

स्वातंत्र्य आले, तिरंगा फडकला आणि गोऱ्या इंग्रजाच्या ऐवजी आमचा साहेब तिथे येऊन बसला पण धोरण तेच राहिले – शेतकऱ्याला लुटणे आणि कारखानदारीची भर करणे. गोऱ्या इंग्रजाच्या ऐवजी काळा इंग्रज आला एवढाच फरक पडला. या पापाचे पहिले धनी आहे पंडित जवाहरलाल नेहरू. पांढरे कपडे घातले, खिशाला गुलाबाचे फूल लावले आणि राजबिंडे दिसले म्हणजे काही तो मनुष्य निरपराध झाला असे नाही - शेतीमालाला भाव मिळता कामा नये कारण समाजवादी कारखानदारी वाढायची असेल तर शेतीमध्ये तयार झालेले वरकड (Surplus) उत्पादन हे कारखानदारीकडे वळवले पाहिजे असे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या प्रास्ताविकात व्ही. टी. कृष्णम्माचारी यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे आणि हे काही पं. नेहरूंपाशी थांबले नाही, हे धोरण कायम चालू राहिले. हे धोरण पहिल्यांदाच हिंदुस्थानात सुरू झाले असे नाही. हे धोरण पहिल्यांदा स्टॅलिनने रशियात राबवले – समाजवादी कारखानदारी उभी करण्यासाठी शेतकरी एक दाणा पेरून जे हजार दाणे निर्माण करतो त्यातले नऊशे नव्याण्णव दाणे त्याच्याकडून काढून घेणे. याचा परिणाम असा झाला की समाजवादी रशियामध्ये लक्षावधी शेतकरीच नव्हे तर इतर नागरिकही भुकेने मेले. नेहरूंनी १९४७ साली केलेल्या पापाचे फळ हे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या रूपाने आज पुढे येत आहे. जर का नागपूरच्या काँग्रेसमध्ये सामूहिक शेती करण्याचा नेहरूंचा प्रस्ताव मंजूर झाला असता तर रशियात ज्या प्रकारची सामूहिक शेती झाली त्याच प्रकारची सामूहिक शेती हिंदुस्थानात झाली असती आणि शेतकरी भुकेने मेले असते आणि लोकही भुकेने मेले असते. सुदैवाने, नेहरुंनी मांडलेल्या त्या ठरावाला स्वतंत्र पक्षाचे निर्माते चक्रवर्ती राजगोपालचारी, चौधरी चरणसिंग आणि पंजाबराब देशमुखांनी विरोध केला म्हणून आज आपण शेतकरी आहोत आणि ही जमीन माझी आहे असे, निदान जमीन संपादन होईपर्यंत तरी म्हणू शकतो. नेहरूंचा तो ठराव मंजूर झाला असता तर सगळया हिंदुस्थानचे केव्हाच वाटोळे झाले असते.

शेतीमालाला भाव न देण्याचे धोरण राबविण्याचे पाप फक्त नेहरूंनीच केले असे नाही; इंदिरा गांधींनी तेच धोरण राबवले, राजीव गांधींनी तेच धोरण चालवले. मी हे जेव्हा १९८० साली सांगायचो तेव्हा काँग्रेसचे सगळे पुढारी म्हणायचे, ''काय शरद जोशी सांगतात? नेहरूंसारखा राजबिंडा मनुष्य शेतकऱ्याला डुबवेल?''

आता याच्याबद्दल काही वाद राहिलेला नाही. १९८६-८९ या वर्षांसाठी जागतिक व्यापार संघटनेने सगळ्या देशांकडून आकडेवारी मागवली की तुमच्या

देशातील शेतकऱ्यांना शेतीमालाला उत्पादन खर्चाच्या तुलनेने काय भाव मिळतात? जपानचे उत्तर होते की १०० रुपये उत्पादनखर्च असेल तर आमच्या शेतकऱ्याला १९० रुपये मिळतात. युरोपमधील देशांनी सांगितले की १०० रुपये उत्पादनखर्च असेल तर आमच्या शेतकऱ्याला १६५ रुपये मिळतात आणि अमेरिकेमध्ये १३५ मिळतात. १९८६ साली त्यावेळचे व्यापारमंत्री प्रणव मुखर्जी यांच्या सहीने हिंदुस्थान सरकारने जागतिक व्यापार संस्थेला उत्तर दिले की आमच्या शेतकऱ्याचा उत्पादनखर्च १७२ रुपये असेल तर त्याला १०० रुपयेच मिळावेत त्यापेक्षा जास्त मिळता कामा नये असे आमचे धोरण आहे. सगळ्या देशांमध्ये, शेतकऱ्यांना फायदा व्हावा असे धोरण आणि आमच्याकडे मात्र त्याचे नुकसान व्हावे असे धोरण. मी त्याला पहिल्यांदा उणे सबसिडी हा शब्द वापरला. मोठमोठे अर्थशास्त्री तेव्हा म्हणत हे 'उणे सबसिडी' म्हणजे काय ते आम्हाला समजत नाही. मी म्हटले, तुम्हाला समजणारच नाही. पुण्याचे अर्थशास्त्रज्ञ वि. म. दांडेकरांनी मला एकदा विचारले होते की, 'हे तुम्ही शेतकऱ्यांना कसे काय समजावून सांगता?' मी त्यांना म्हटले की हे शेतकऱ्यांनाच समजण्यासारखे आहे, बाकीच्यांना समजणे अवघड आहे. मी त्यांना माझा शेतकरी म्हणून अनुभव सांगितला.

मी शेतकरी झाल्यानंतर पहिले पीक खिरा काकडीचे घेतले. पहिल्यांदा मुंबईला काकडी पाठवली – दोन-तीन पोती असतील. काही दिवसांनी माझ्या अडत्याचे पत्र आले की आम्ही तुमची काकडी विकली, खर्चवेच वजा जाता उरलेले १८३ रुपये मनिऑर्डरने पाठवीत आहोत. शेतकरी म्हणून पहिली कमाई झाली म्हणून मोठा आनंद झाला. दुसऱ्या वेळी असेच काही दीडदोनशे रुपये आले आणि तिसऱ्या वेळी अडत्याचे पत्र आले की आम्ही मोठ्या कसोशीने तुमचा माल विकला; पण जी काही रक्कम हाती आली त्यातून वाहतूक आणि हमालीचाही खर्च निघत नसल्यामुळे आपणच आम्हाला १२३ रुपये पाठवून द्यावे. ही उलटी पट्टी. उलटी पट्टी म्हणजे काय हे सगळ्या शेतकऱ्यांना व्यवस्थित समजते. मी दांडेकरांना सांगितले की ज्यांना शेतीमालाची उलटी पट्टी घ्यावी लागते त्यांना 'उणे सबसिडी' म्हणजे काय हे समजण्यात अडचण येत नाही.

'उणे सबसिडी' म्हणजे काय हे समजण्यात अडचण येते ती 'शरद पवारां'ना आणि 'आर.आर. पाटलां'ना. हाँगकाँगला जागतिक व्यापार संस्थेच्या मंत्रिपरिषदेची बैठक होणार होती तेव्हा मी तीनतीनदा विचारले शरद पवारांना की हिंदुस्थानच्या शेतकऱ्याला सध्या उणे सबसिडी किती आहे ते सांगा. त्यांनी तीनही वेळा तो विषय टाळला. शेवटी, व्यापारमंत्री कमलनाथ यांनी हाँगकाँगला जाण्याआधी

मान्य केले की, आजही हिंदुस्थानातील शेतकऱ्यांना उणे सबसिडी आहे.

शरद पवार अजूनही हे म्हणायला तयार नाहीत, म्हणून कांदे खावे लागले.

या ओघातच तुम्हाला सांगतो की ज्यांच्या ज्यांच्या डोक्यावर कर्ज आहे त्यांनी कर्ज असण्याचा अपमान बाळगणे सोडून द्या. ज्याच्या ज्याच्या डोक्यावर कर्ज आहे त्या शेतकऱ्यांना मी सांगतो की तुम्ही यापुढे 'गर्व से कहो की हम कर्जे में हैं।' कारण, जो जो शेतकरी प्रामाणिक आहे तो तो कर्जात आहे. जो जो शेतकरी भामटेपणा करतो, कोठेतरी राजकारणात जातो, लांड्यालबाड्या करून सबसिड्या मिळवतो, कुठेतरी गोंधळ घालतो, काही नाही तरी हातभट्टी लावतो तोच शेतकरी फक्त कर्ज फेडू शकतो; बाकीचे सर्व फक्त शेतीवर जगणारे प्रामाणिक शेतकरी कर्जातच राहतात. तेव्हा 'गर्व से कहो हम कर्जे में हैं।' मी कर्जात आहोत याचा अर्थ मी प्रामाणिक आहे, माझा बाप प्रामाणिक आहे आणि माझे आजोबासुद्धा प्रामाणिक आहेत/होते आणि जे कर्जात नसतील आणि त्यांच्या १८ एकर जमिनीतून १८ लाख रुपये उत्पन्न निघत असेल तर ते भामटे आहेत, त्यांचा बाप भामटा आहे, त्यांचा आजोबासुद्धा भामटा आहे. कर्जात असणे हा आपला दोष नसून तो सरकारी धोरणाचा परिणाम आहे. तेंव्हा, कर्जाबद्दलचा हीनगंड सोडून द्या.

दुसरा मुद्दा, ही सर्व कर्जे बेकायदेशीर आणि अनैतिक आहेत. कर्जाचा व्यवहार म्हणजे एक करार आहे आणि कराराला कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट लागू असतो. कॉन्ट्रॅक्ट ॲक्टनुसार जर 'अ' आणि 'ब' मध्ये एक करार झाला; पण 'अ' ने जर 'ब'ला करार पाळता येणार नाही असे कृत्य केले तर तो करार रद्दबातल धरला पाहिजे अशी या कायद्याची तरतूद आहे. हिंदू कॉन्ट्रॅक्ट ॲक्टनुसार, आपण लग्न हा एक संस्कार धरीत असलो तरीसुद्धा, तो करार मानला जातो. त्यामुळे लग्नाने एकत्र आलेल्या दोघांपैकी एकाने काहीतरी वाह्यात वागून किंवा बाहेरख्यालीपणा करून दुसऱ्याला नांदणे कठीण केले तर तो करारभंग होतो आणि तो करार रद्दबातल करता येतो. शेतकऱ्यांच्या कर्जाच्या बाबतीतही असाच करारभंग होत असतो. सहकारी/सरकारी बँकांनी शेतकऱ्यांना कर्जे दिली आणि त्याचबरोबर शेतीमालाला भाव मिळू नये अशी सरकारने व्यवस्था केली. म्हणजे, शेतकऱ्यांना सरकारकडून घेतलेले कर्ज फेडता येऊ नये अशी व्यवस्था सरकारनेच केली. तेव्हा सरकारच्या आधिपत्याखालील कोणत्याही संस्थेने शेतकऱ्यांना दिलेली कर्जे ही बेकायदेशीर आहेत.

अजून एक महत्त्वाचा मुद्दा आहे. शेतकऱ्यांना नेहमी मनातून खात असते की

आपण कर्ज घेतले आहे तर फेडून टाकावे, नाहीतर आपल्याला पाप लागेल. मानवी स्वभाव आहे, त्याला मरणानंतर आपण स्वर्गात जाऊ की नरकात अशी धास्ती असते. आणीबाणीच्या काळातील एक प्रसंग आठवतो. त्या काळात बँकांचे लोक आदिवासींना कर्ज देण्यासाठी धावत होते. आंबेठाण गावाजवळील एका आदिवासीस असेच दहा का किती हजाराचे कर्ज दिले होते. वर्षभराने बँकेचा अधिकारी परत आला आणि म्हणाला, आम्ही तुम्हाला कर्ज दिले होते ते परत द्या. त्या आदिवासीने आपल्या झोपडीच्या वळचणीला वर्षभरापूर्वी लावलेले त्याच नोटांचे पुडके जसेच्या तसे काढले आणि त्या अधिकाऱ्याच्या हाती दिले. कर्जाचे वाटप हे असे नेमून दिलेले उद्दिष्ट पुरे करणे एवढ्याच बुद्धीने होते. कर्जाची गरज आहे का, कर्जपरतफेडीची शक्यता आहे की नाही याचा तपास न करता हे वाटप केले जाते. तेव्हा ही कर्जे बुडवण्यात कोणतेही पाप नाही कारण ही कर्जे अनैतिक आहेत.

शेतकऱ्यांकडे कर्जाची थकबाकी प्रचंड आहे अशी हाकाटी केली जाते. वस्तुस्थिती काय आहे, पाहू या.

आज संपूर्ण हिंदुस्थानातील सर्व शेतकऱ्यांकडे मुद्दल, व्याज, चक्रवाढ व्याज, दंडव्याज आणि इतर सर्व खर्चासहित थकबाकी साधारणपणे ३३ हजार कोटी रुपयांची आहे. राष्ट्रीय कृषि कार्यबलाचा अध्यक्ष या नात्याने मी जो अहवाल सादर केला आहे त्यात उणे सबसिडीच्या धोरणामुळे देशातील शेतकऱ्यांचे किती नुकसान झाले याचा अभ्यासपूर्वक आकडा दिला आहे. १९९६-९७ या एकच आर्थिक वर्षात सरकारच्या उणे सबसिडीच्या धोरणामुळे देशातील १८ प्रमुख पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांचे १ लाख १३ हजार ७४८ कोटी रुपयांचे नुकसान झाले. हे सरकारने जागतिक व्यापार संस्थेला सादर केलेल्या सरकारी दस्तावेजामध्ये दिले आहे. कृषि कार्यबलाच्या अहवालासाठी आम्ही वीस वर्षांचा हिशोब काढला. तेव्हा, १९८० ते २००० चा दोन दशकांच्या काळात सरकारी धोरणामुळे – नेहरूंमुळे, इंदिरा गांधींमुळे, राजीव गांधींमुळे, यशवंतराव चव्हाणांमुळे, शरद पवारांमुळे आणि हे धोरण राबविणाऱ्या सगळया नेत्यांमुळे– हिंदुस्थानातील शेतकऱ्यांचे ३ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. सरकार शेतकऱ्यांना सबसिडी देते, वीज स्वस्त देते, कर्ज स्वस्त देणे, खतामध्ये काही मदत करते, असे म्हटले जाते. वादासाठी हे खरे आहे असे मानले तरी सरकारी आकडेवारीनुसर या सर्वांची गोळाबेरीज २८ हजार कोटी रुपये इतकीच होते. म्हणजे, ३ लाख कोटी रुपये सरकारने शेतकऱ्यांचे बुडवले आहेत आणि शेतकऱ्यांकडे सरकारचे

देणे आहे फक्त ३३ हजार कोटी रुपयांचे. म्हणजे शेतकरी सरकारला एक पैसाही देणे लागत नाहीत. उलट, सरकारकडूनच शेतकऱ्यांचे २ लाख ६७ हजार कोटी रुपये येणे आहे. ज्यांना कोणाला युक्तिवाद करायचा असेल त्यांनी सगळे कागदपत्र सोबत घेऊन समोरासमोर यावे. नेहरू शेतकऱ्यांचे गुन्हेगार होते, त्यांची सगळी वंशावळ शेतकऱ्यांची गुन्हेगार आहे हे कागदोपत्री सिद्ध होईल.

मग, जो काही देणे लागतच नाही त्याने काही दिले नाही तर पाप कसले लागायचे? एखाद्या सावकाराकडून काहीच घेतले नसेल किंवा काही कर्ज घेतले होते पण त्याच्यापेक्षा जास्त परतफेड केली असेल तरीही तो मागणी करतो आहे म्हणून जर तुम्ही पैसे दिले तर तुम्ही पापी माणसाला उत्तेजन दिल्यासारखे होईल आणि तुम्हीच गुन्हेगार ठराल.

म्हणून, तुम्ही कर्जात आहात याचा अभिमान बाळगायला लागा. कारण, तुम्ही प्रामाणिक आहात म्हणून तुम्ही कर्जात आहात. तुम्ही कर्जात आहात हा तुमच्या प्रामाणिकपणाचा पुरावा आहे.

या देशामध्ये स्वातंत्र्यानंतर एक मोठा बदल झाला. एके काळी उत्कृष्ट शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी अशी स्थिती होती. स्वातंत्र्यानंतर आता नोकरी सर्वश्रेष्ठ झाली असून आता मोठमोठे शेतकरी आपली दोन-तीन, तीन-तीन एकर शेती विकून अगदी चपराश्याच्या नोकरीसाठी धावपळ करतात. स्वातंत्र्यानंतर काळ्या इंग्रजांच्या राजवटीमध्ये शेती अशा तऱ्हेने बुडवण्यात आली की शेतकरी कितीही कष्ट करीत असला तरी तो तोट्यात जातो, काहीही पीक घेतले तरी तो कर्जात जातो; पण त्याच्या घरचा एक भाऊ जर शाळामास्तर असेल तर त्याचे घर नीट चालते. ही उलटी गती स्वातंत्र्यानंतर समाजवादाच्या नावाखाली नेहरू घराण्याने आणली.

शेतकरी संघटनेने अनेक आंदोलने केली. पहिल्यांदा कांद्याचे आंदोलन केले मग उसाचे, नंतर तंबाखूचे, दुधाचे, कापसाचे अशी आंदोलने केली. त्या वेळी एका पत्रकाराने प्रश्न विचारला की, 'हे तुमचे असे किती दिवस चालणार? एका मागोमाग दुसरं पीक?' पहिल्या बाजीरावाचे वाक्य होते की, दिल्लीच्या बादशहावर हल्ला करायचा असेल तर फांद्या तोडत बसू नका मुळावर घाव घाला. तेव्हा आता मुळावर घाव घालायचा काही कार्यक्रम काढा."

मग एका बैठकीत विचारविनिमय चालू असताना लक्षात आले की, सगळेच शेतकरी– कोणी ऊस पिकवतो, कोणी कांदा, कोणी कापूस, कोणी ज्वारी, तर कोणी तंबाखू, कोणी भात, तर कोणी गहू पिकवतो. आणखी काय काय; पण ही

सगळी नावे खोटी आहेत. तुमचा प्रांत कोणताही असो, तुमची भाषा कोणतीही असो, तुमचे बियाणे कोणतेही असो सगळ्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये एकच पीक येते आणि त्या पिकाचे नाव आहे 'कर्ज'. गेल्या पंचवीस वर्षांत मला एकही शेतकरी असा भेटला नाही की त्याने कर्ज काढले, मेहनत करून शेती केली, पिकलेला माल बाजारात विकला आणि मिळालेल्या पैशांतून व्याजासहीत कर्ज फेडले आणि म्हणाला की आता मी सुखाने मरू शकेन.

तेव्हा कोणतेही बियाणे पेरले तरी हिंदुस्थानातील शेतकऱ्यांच्या शेतात पीक येते ते कर्जाचेच. पाऊसपाणी चांगले असेल तर येतेच येते, पण दुष्काळात अधिकच जोमाने येते.

मग शेतकरी संघटनेने कर्जमुक्तीचा कार्यक्रम काढला. कर्ज फेडता येत नाही अशी अवस्था आली की व्यापारी/कारखानदार काय करतात? दिवाळखोरी जाहीर करतात. तसे आम्ही नादारीच्या कायद्याचा सखोल अभ्यास करून सगळ्या शेतकऱ्यांना नादारीचे अर्ज भरायला सांगितले. लोकांना मोठे वाईट वाटले की शेतकऱ्यांना नादार करायला निघालेत; पण खरेच कर्ज फेडता येणार नव्हते आणि 'सरकार नादान म्हणून शेतकरी नादार' हे पटल्यामुळे शेतकऱ्यांनी लाखोंनी नादारीचे अर्ज भरले; कोर्टामध्ये अर्ज ठेवायला जागा नाही अशी परिस्थिती आणि सर्वोच्च न्यायालयाकडून आम्ही निकाल मिळवला की ज्या ज्या शेतकऱ्यांनी नादारीचे अर्ज भरलेले आहेत त्यांच्या नादारीच्या अर्जावर अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत त्यांच्यावर कर्जवसुलीसाठी कोणत्याही प्रकारे जप्तीसारखी कारवाई होऊ नये. हा नादारीचा कायदा मोठा जबरदस्त आहे. आजही, कर्जामुळे ज्यांना आत्महत्येच्या मानसिकतेकडे जाण्याची भीती वाटते त्यांनी कोण्या हेल्पलाईनपेक्षा किंवा मुख्यमंत्र्यांच्या पॅकेजपेक्षा नादारीच्या कायद्याचा आधार घेणे फायद्याचे ठरेल. मुख्यमंत्र्यांनी १० डिसेंबरला विदर्भाच्या ५ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर केले त्यानंतर ढवदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा वेग तिप्पट झाला आहे, तेव्हा ते पॅकेज काय कामाचे? १० डिसेंबरनंतर एकट्या विदर्भामध्ये साडेतीनशे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. कृपा करून आपला मोलाचा जीव धोक्यात घालू नका. तुमची शेती तोट्याची झाली हा तुमचा दोष नाही, सरकारच्या धोरणाचा तो परिणाम आहे. त्यापेक्षा, कोर्टाकडे १५ रुपये स्टँप फी भरून नादारीच्या अर्जामध्ये आपल्या कर्जाची माहिती भरून तो सादर करा; तुमच्याकडे कोणीही जप्तीला येऊ शकणार नाही असा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आहे. तेव्हा, सावकारांच्याही कर्जामुळे ज्यांना आत्महत्या करावीशी वाटत असेल

त्यांनीही तो विचार सोडून नादारीचा अर्ज भरणे हा सोपा उपाय आहे.

शेतकरी संघटनेच्या कर्जमुक्ती आंदोलनातील नादारीचे अर्ज निकालात काढण्यात न्यायालयाची दिरंगाई होऊ लागली, तसे सहकारी बँकांनी शेतकऱ्यांना नवीन कर्जे देण्यात हात आखडता घ्यायला सुरुवात केली; पण सुदैवाने केंद्रशासनात सत्तांतर होऊन, काही काळ का होईना, शेतकऱ्यांच्या समस्यांकडे सहानुभूतीच्या नजरेने पहाणाऱ्या व्ही. पी. सिंगांचे सरकार स्थानापन्न झाले. त्यांनी शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमुक्तीचे आश्वासन दिले होते; पण त्यावेळी राजकीय परिस्थिती थोडी गुंतागुंतीची होती. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना सरसकट १० हजार रुपयांच्या कर्जमाफीवर समाधान मानावे लागले; न्यायालयातील नादारीचे अर्ज मागे घेण्यात आले.

१९९१ नंतर डंकेल प्रस्तावाच्या चर्चेदरम्यान देशाच्या व्यापारमंत्र्यांनी १९८६ ते १९८९ या तीन वर्षांच्या काळात भारतीय शेतकऱ्यांना ७२% उणे सबसिडी दिली जाते अशी लेखी कबुली दिल्यानंतर शेतकरी संघटनेने 'लेखा जोखा' आंदोलन उभे केले आणि सरकारी आकडेवारीच्या आधाराने प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या १९८० ते १९९० या दहा वर्षांच्या शेतीमालाच्या किमतीत सरकारने त्याला किती रुपयांना डुबवले याचे प्रमाणपत्र दिले. या प्रमाणपत्रांचा उपयोग अनेक शेतकऱ्यांनी आपल्या कर्जप्रकरणी न्यायालयाकडून वसुलीला स्थगिती मिळविण्यासाठी केला.

आता, कर्जामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडू लागल्या आहेत आणि वाढू लागल्या आहे. अशा परिस्थितीत कर्जमुक्तीचे आंदोलन कशा मार्गाने चालवावे यावर शेतकरी संघटनेने विचार चालवला आहे. आपले परभणीचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते ॲड. अनंत उमरीकर यांनी शेतकऱ्यांची सहकारी बँकांची कर्जे आणि बँकांनी केलेली व्याजआकारणी यांचा सखोल अभ्यास करून त्यासंबंधी थोडक्यात गोषवारा असा आहे –

कर्नाटक राज्यात शेती कर्जाच्या बाबतीत बँक ऑफ इंडियाने करनाम रंगाराव या शेतकऱ्याविरुद्ध कर्जवसुलीसाठी न्यायालयात दावा दाखल केला. १०,००० रुपये मुद्दलापोटी बँकेने ३०,५६४ रुपयांचा दावा दाखल करताना व्याजाची आकारणी सहा महिन्यांच्या मुदतबंदीने चक्क दर साल १७% दराने केली. शेती कर्जावर चक्रवाढ पद्धतीने व्याज आकारणी करता येणार नाही या मुद्द्यावर कोर्टाने बँकेविरुद्ध निकाल दिला. बँकेने वर अपील केले, प्रत्येक ठिकाणी बँकेची हार होत दावा सर्वोच्च न्यायालयात गेला. तेथेही न्यायालयाने बँकेचे

अपील फेटाळून बँकांनी शेतीकर्जावर चक्रवाढ व्याज आकारू नये असे सर्व बँकांना आदेश द्यावेत असे रिझर्व्ह बँकेला सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात म्हटले आहे की–

१. शेतीसाठी किंवा शेतीसंबंधित कामासाठी घेतलेल्या कर्जावर मासिक, तिमाही किंवा सहामाही असे व्याज आकारू नये. शेतकऱ्याच्या हाती पीक आल्यानंतर म्हणजे वर्षातून एकदाच पैसा येतो. त्यामुळे शेतीकर्जावरील व्याज आकारणी तसेच वसुलीचा हप्ता वार्षिकच असावा.

२. शेती कर्जावर चक्रवाढ पद्धतीने व्याज आकारणी करू नये. शेतीकर्ज थकीत झाले तरच व्याजाची रक्कम पुढील काळासाठी मुद्दलात मिळवली जावी.

रिझर्व्ह बँकेने सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाला अनुषंगून सर्व बँकांना परिपत्रके पाठवली, पण त्यांना केराची टोपली दाखवून, विशेषत:, शेतकऱ्यांच्या भल्यासाठी स्थापन केल्या असल्याचे सांगण्यात येत असलेल्या सहकारी बँकांनी मनमानी करीत शेतकऱ्यांच्या कर्जावर तिमाही, सहामाही मुदतबंदीने चक्रवाढ व्याजाची आकारणी केली आणि शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा भरमसाट वाढवला.

बँकांची बेकायदेशीर कारवाई प्रकाशात आणून त्यांना योग्य ते शासन व्हावे आणि स्वत:ची काहीही चूक नसताना आत्महत्येचा मार्ग जवळ करणाऱ्या शेतकऱ्याला या मार्गातून बाहेर काढणे यासाठी शेतकरी संघटनेचे हे कर्जमुक्ती अभियान सुरू झाले आहे. शेतकऱ्यांनी फक्त आपल्या कर्जदार बँकांकडून आपल्या कर्जखात्याची माहिती मिळावी असे अर्ज त्यांना देऊन ती माहिती शेतकरी संघटनेकडे दाखल करावयाची आहे. त्यापुढील काम शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्ष शेतकऱ्यांच्या वतीने करणार आहे. तेव्हा या अभियानात, १९८८च्या नादारीचे अर्ज दाखल करण्याच्या कर्जमुक्ती आंदोलनापेक्षाही अधिक संख्येने आणि 'मी कर्जबाजारी शेतकरी आहे याचा मला अभिमान आहे' असे ताठ मानाने गरजत सामील व्हा असे आवाहन करतो. बँका माहिती देत नाही म्हणाल्या तर ठणकावून सांगा – 'जवा पिकलं तवा लुटलं तरी कसं नाही फिटलं?'

*(५ एप्रिल २००६ - कर्जमुक्ती अभियान, येडे मच्छिंद्र)*

*(शेतकरी संघटक २१ एप्रिल २००६)*

■■

# रणनीती एकारलेली नव्हे, चौफेर हवी

गेल्या २५ वर्षांची परंपरा आहे की दसरा जवळ येऊ लागला आणि साखर कारखान्यांचा गाळप हंगाम जवळ येऊ लागला म्हणजे सरकार मुंबईला बसून उसाच्या काहीतरी किमती जाहीर करते आणि त्यांनी त्या किमती जाहीर केल्या की शेतकरी संघटनेची सभा किंवा मेळावा किंवा एखादी परिषद जाहीर होते आणि सगळया लोकांचे डोळे लागतात ते शेतकरी संघटना उसाला आता कोणता भाव जाहीर करते याकडे. सरकारने दिलेला भाव नावापुरता असतो, कारखान्यांना नाही नाही म्हणता म्हणता शेवटी भाव द्यावा लागतो तो शेतकरी संघटनेने जाहीर केलेलाच – नाही म्हटल्यानंतर एक-दोन कारखान्यांचे गाळप बंद पडल्यामुळे. गेल्या वर्षापासून या परिषदेला एक भौगोलिक स्थान मिळाले आहे. शेतकऱ्यांच्या ऊसबिलातून दरवर्षी पैसे गोळा करून बांधलेले हे पुण्याचे साखर संकुल; या संकुलाच्या प्रांगणातच शेतकरी संघटनेने आपली उसाच्या भावाची घोषणा करणारी परिषद घ्यावी ही परंपरा गेल्या वर्षी सुरू झाली. गेल्या वर्षी उसाला १५०० रुपये प्रति टन भावाची मागणी करताना मी साखर आयुक्तांना आव्हान दिले होती की तुम्ही कितीही म्हटले की, 'उसाला ८५० पेक्षा जास्त भाव देऊ नका, जे कारखाने जास्त भाव देतील त्यांना पॅकेज मिळणार नाही तरी आम्ही हा भाव घेणार आहोत आणि 'आम्ही तो मिळवला' आहे हे सांगण्यासाठी तुमच्यासमोर जमणार आहोत.' भाव मिळाला म्हणून सांगायला यायला आजवर सवड झाली नाही पण पुन्हा गेल्या वर्षीचाच प्रश्न पुढे आला म्हणून आज जमावे लागले आहे. मी साखर आयुक्तांना येथे जमलेल्या सर्व शेतकऱ्यांच्या साक्षीने सांगतो की, 'आपण सरकारी अधिकारी आहात, जवानाला जसा आपल्या गणवेशाचा अभिमान असतो तसा आपल्यालासुद्धा आपल्या पदाचा अभिमान असला पाहिजे. पैसे खाणारे, शेतकऱ्यांना लुटणारे पुढारी एका निवडणुकीत येतील, दुसऱ्या निवडणुकीत निघून जातील; पण आपण या पदावर फार जबाबदारीने वागले पाहिजे आणि केवळ मंत्री

म्हणतात म्हणून शेतकऱ्यावर अन्याय करणारे धोरण आपण मांडत गेलात तर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसाठी केवळ मंत्री, प्रधानमंत्रीच नव्हे तर अधिकारीसुद्धा गुन्हेगार ठरतील.'

यंदा पुन्हा एकदा दसरा येऊन ठेपला आहे. मराठ्यांची जुनी परंपरा आहे की दसऱ्यापर्यंत खरिपाची पिके एकदा हाताशी आली की त्या पिकांची लुटालूट करण्यासाठी टपलेल्या शत्रूंवर चाल करून जायचे आणि त्यांचा बंदोबस्त करायचा. पुन्हा एकदा दसरा आला आहे आणि पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या फौजा जमा झाल्या आहेत. त्यांना फक्त पुढच्या लढाईचा आराखडा सांगायचा आहे.

तो सांगण्याआधी मी शेतकऱ्यांना एका गोष्टीची आठवण करून देऊ इच्छितो.

ढशवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी अफजलखानाच्या वधाची कथा फार चांगल्या रीतीने मांडली आहे. ती ऐकताना माझ्या असे लक्षात आले की इतिहास वाचणाऱ्या सगळया लोकांची कल्पना अशी की शिवाजी महाराज अफजलखानाच्या भेटीसाठी प्रतापगडाच्या पायथ्याशी गेले तेव्हा महाराजांच्या मनामध्ये अफजलखानाचे पारिपत्य करायचे एवढाच काय तो एकमेव विचार असावा. बाबासाहेब पुरंदऱ्यांनी साक्षीपुराव्यांनी दाखवून दिले आहे की शिवाजी महाराज प्रतापगडाच्या पायथ्याशी जायला निघण्यापूर्वी त्यांनी किमान तीन चढायांची योजना तयार केली होती. त्यात कोकणामधील सिद्दी जोहारावर फौज पाठविण्याची एक योजना आखली होती. शिवनेरीला खानाचा त्रास होत होता तिकडे फौज पाठविण्याची योजना होती आणि दक्षिणेकडेसुद्धा पन्हाळ्यापर्यंत कूच करण्याची तयारी करण्यात आली होती. शिवाजी महाराजांची राज्यकारणपटुता यातून लक्षात येते. समोर अफजलखान चालून येत आहे म्हटल्यामुळे भयभीत होऊन न जाता, अफजलखानाच्या भेटीसाठी भवानीमातेचा आशीर्वाद घेतला असला तरी, आपण या भेटीतून जिवंत परत येवो न येवो, या तीन मोहिमा झाल्या पाहिजेत अशी तयारी महाराजांनी केली होती.

दसऱ्यानंतर आपण अफजलखानाला म्हणजे साखरसम्राटांना भेटायला जाणार आहोत; पण तेवढ्यानेच भागणार नाही. त्याखेरीज काही चढायांची कामे आपल्याला आखणे भाग आहे. यातील प्रत्येक चढाई तितकीच महत्त्वाची आहे. शेतकरी संघटना जर फक्त उसापुरती, फक्त कापसापुरती आणि फक्त महाराष्ट्रापुरतीच लढत आणि जिंकतही राहिली तरी आपल्याला अंतिम विजय मिळणे कठीण राहील. या दुसऱ्या लढायाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत.

विदर्भामध्ये शेतकरी मोठ्या संख्येने आत्महत्या करीत आहेत हे गंभीर आहे; पण त्याबरोबर आंध्रातील, कर्नाटकातील कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्या

करीत आहे त्यांच्याकडेही लक्ष द्यायला पाहिजे. केरळ राज्यातदेखील दोनेक हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. तेतर कापूसही पिकवत नाहीत आणि ऊसही नाही. त्यांची पिके आहेत काळी मिरी, हळद, सुपारी, नारळ, इ. कापसाचा शेतकरी आत्महत्या करतो याचे कारण आपल्याला समजू शकते. पण ज्या पिकांना सरकारी निर्बंधांचा जाच नाही अशी मिरी, हळद, सुपारी पिकवणारे शेतकरी आत्महत्या का करतात हे समजेना म्हणून मी पंधरा दिवसांपूर्वी केरळात गेलो आणि ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यांच्यापैकी काहींच्या घरी जाऊन त्यांच्या नातेवाईकांना भेटून तेथील परिस्थितीचा अभ्यास केला. एका गावी गेलो तर तेथील सुपारीची झाडे सुरुवातीला शेंड्याला पिवळी पडू लागतात आणि मग त्यांच्या आधाराने वाढणाऱ्या मिरीच्या वेलींना घेऊन मुळापासून कोसळतात असे समजले. ज्या सुपाऱ्यांकरिता आणि मसाल्याच्या पदार्थांकरिता सात समुद्र पार करीत वास्को द गामा पहिल्यांदा कालिकतला उतरला ते मसाल्याचे आणि सुपारीचे पीक केरळातून हळूहळू नष्ट होत चालले आहे. सुपारी नाही, मिरी नाही मग शेतकऱ्याच्या हाती पैसा कसा येणार? शेतकऱ्यांना कर्जे फेडता येत नाहीत. मग बँकांनी वेगळाच मार्ग वापरायला सुरुवात केली. जमिनीचा लिलाव वगैरे करायचा नाही; भारत सरकारने दोनतीन वर्षांपूर्वी केलेल्या सिक्युरिटायझेशन ॲक्टचा वापर करून बँकांनी शेतकऱ्यांची जमीन आपल्या नावावर करून टाकली आणि पोलिसांची मदत घेऊन त्या शेतकऱ्यांना त्या जमिनीतून हुसकावून लावणेच नव्हे तर त्यांनी बांधलेल्या घरातूनही काढून लावायला सुरुवात केली. तिथे शंभरेक शेतकरी सत्याग्रह करीत बसले होते. केरळमध्ये शेतकऱ्यांची मजबूत संघटना नाही. मी आलो म्हटल्यानंतर त्यांना मोठा आधार वाटला, त्यांनी त्यांची सगळी कहाणी मला सांगितली. मी त्यांना शब्द दिला की कर्ज फेडता येत नाही म्हणून बँका शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातून आणि जमिनीतून काढून लावत असतील तर त्याविरुद्ध आंदोलन उभे करणे ही माझी जबाबदारी आहे. १९८० साली महाराष्ट्रातील उसाला भाव मिळत नाही म्हणून उसाचे आंदोलन उभे करण्याची माझी जितकी नैतिक जबाबदारी होती तितकीच नैतिक जबाबदारी सुपारीमिरीच्या शेतकऱ्यांकरिता उभे राहण्याची आहे.

त्या उपोषणकर्त्यांच्या वतीने आम्ही तिथे ठराव केला की २९ ऑक्टोबरनंतर, एक दिवस जाहीर करण्यात येईल आणि त्या दिवशी तेथे केरळातील पाच ते दहा हजार शेतकरी जमा होतील. केरळमध्ये शेतकऱ्यांची संघटना नाही. पण त्या उपोषणाच्या जागी हजर असलेल्या शेतकऱ्यांनी 'कर्षक कोट्टायामा' या नावाने त्यांची संघटना झाल्याचे घोषित केले आणि, मी त्यांना आश्वासन दिले

आहे की, ''तुम्ही पहिल्यांदाच आंदोलनाला उतरत आहात, तुमच्या मदतीला येणे हे माझे कर्तव्य आहे. त्यात, आपण शेतकऱ्यांचे कैवारी आहोत असे म्हणणाऱ्या कम्युनिस्टांची सत्ता तुमच्या राज्यात आहे, त्यांचा 'शेतकरी कैवारा'चा बुरखा फाडणे आवश्यक आहे म्हणूनही तुमच्या मदतीला येणे हे माझे कर्तव्य आहे.'' त्याहीपलीकडे, आपण तिरुपतीला जसे मोठ्या संख्येने गेलो होतो त्याच प्रकारे किमान २० हजार शेतकरी स्त्रीपुरुष पाईक शेतकरी संघटनेचा झेंडा घेऊन केरळातील आयाबहिणींच्या या आंदोलनाला येतील असेही आश्वासन मी त्यांना दिले आहे.

अफजलखान समोरासमोर असतानाही, शिवाजी महाराजांची एक फौज कोकणात गेली तसेच उसाच्या अफजलखानाशी सामना असताना आपलीही एक फौज केरळात जाणे आवश्यक आहे. कम्युनिस्टांची, त्यांना शेतीचे अर्थशास्त्र कळते ही वल्गना, वल्गनाच आहे हे सिद्ध करून त्यांचे पितळ उघडे पाडण्याची ही संधी आहे.

दुसरी लढाईची आघाडी आहे, SEZ म्हणजे 'विशेष आर्थिक विभागा'च्या (Special Economic Zones) संबंधात. आठवड्यापूर्वी औरंगाबाद परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करून, त्यांना किरकोळ नुकसानभरपाई (भाव) देऊन ती SEZ उभारण्यासाठी विकासक उद्योगपतींच्या हवाली करण्याचे कारस्थान उभे राहत होते. स्पेशल इकॉनॉमिक झोनच्या नावाने एक नवा राक्षस भारतातल्या शेतकऱ्यांच्या मागे लागला आहे. स्पेशल इकॉनॉमिक झोन म्हणजे कारखानदारांचे कौतुक करणे, त्यांना सर्व काही सोयीसवलती देणे, त्यांना सर्व ते स्वातंत्र्य देणे आणि त्यांना जागतिक बाजारपेठेतील स्पर्धेकरिता तयार करणे. हे तर शेतकरी संघटनेचे तंत्र आहे. स्पेशल इकॉनॉमिक झोनला शेतकरी संघटनेचा पाठिंबा आहे. राज्यसभेमध्ये स्पेशल इकॉनॉमिक झोनबद्दल मी बोललो आहे; पण कारखानदारांना सर्व तऱ्हेच्या सूटसवलती आणि स्वातंत्र्य देत असताना ज्यांच्या जमिनी त्यासाठी घेतल्या जाणार आहेत त्या जमिनीमात्र शेतकऱ्यांच्या बाबतीत जमीन संपादन करण्याच्या कायद्याखाली संपादन करायच्या आणि कारखानदारांकडून त्या जमिनीची जी किंमत घ्यायची त्याच्या १ टक्क्यापेक्षाही कमी रक्कम शेतकऱ्यांच्या तोंडावर फेकायची हा अन्याय चालणार नाही. मी औरंगाबादच्या शेतकऱ्यांना एक आश्वासन आणि एक सूत्र दिले आहे आणि हे सर्व महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनीही लक्षात घेतले पाहिजे. कारण ही स्पेशल इकॉनॉमिक झोनची धाड सगळ्या जिल्ह्यांवर येणार आहे. आपले सूत्र असे :

१) ज्यांना शेती करीत राहण्याची इच्छा आहे त्यांची जमीन कोणालाही

काढून घेता येणार नाही.

२) ज्यांना आता शेती करणे नको असे कोणत्याही कारणाने वाटत असेल – कर्ज वाढते म्हणून वाटत असेल, जागतिक बाजारपेठेच्या स्पर्धेत टिकाव धरता येणार नाही असे वाटून वाटत असेल किंवा जैविक तंत्रज्ञानातील बियाणे घेऊन शेती कशी करावी या चिंतेने वाटत असेल – अगदी टोकाला जाऊन शेती करण्यापेक्षा आत्महत्या हा एकच पर्याय राहिला आहे असे वाटत असेल त्यांना शेती सोडण्याचा हक्क मिळाला पाहिजे आणि हा शेती सोडण्याचा हक्क बजावताना त्यांनी कोणाला जमीन विकायची आणि केवढ्या भावाने विकायची हे सांगण्याचा सरकारला काहीही अधिकार नाही. (पंधरवड्यापूर्वी पुण्याजवळच्या पत्रकारांशी बोलताना शरद पवार म्हणाले की, 'मी सरकारला आता सांगणार आहे की पुण्याच्या जवळच्या जमिनी घेणे आता तुम्ही बंद करा; शेतकऱ्यांना काय भूमिहीन करून टाकायचे का?' आहे की नाही गंमत?)

तेव्हा, ज्याला शेती करीत राहण्याची इच्छा आहे त्याची जमीन कोणालाही घेता येणार नाही आणि ज्याची शेतीतून बाहेर पडण्याची इच्छा आहे तो आपली जमीन ज्याला पाहिजे त्याला आणि पाहिजे त्या किमतीत विकेल. कोणाला जर का स्पेशल इकॉनॉमिक झोनकरिता जमीन हवी असेल तर ती जमीन त्याला शेतकऱ्याला बाजारात जो जास्तीत जास्त भाव मिळत असेल त्यापेक्षा वरची बोली करून घ्यावी लागेल. औरंगाबादला शेतकऱ्यांचा खूप मोठा मोर्चा निघाला, त्याचा घाव त्या व्यवहारातील लोण्याच्या गोळ्यावर टपलेल्या बोक्यांच्या वर्मी बसला, सत्तरऐंशी शेतकऱ्यांना रात्री उशिरापर्यंत तुरुंगात डांबले; पण ४८ तास उलटायच्या आत काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी काँग्रेसशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना आदेश दिले आहेत की 'शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेण्याचे थांबवा.' म्हणजे आपला विजय आधीच झाला आहे. तरीही या विषयातही सतत सजग राहिले पाहिजे.

आता मी उसाच्या प्रश्नाकडे वळतो. उसाच्या फक्त भावासंबंधी बोलून पुरायचे नाही. मी १९८० सालापासून ठिकठिकाणी म्हटले आहे की केवळ सहकारी साखरसम्राटच नव्हे तर सहकारातील सगळेच नेते हे शेतकऱ्याच्या जिवावर उठले आहेत आणि शेतकऱ्यांना खड्ड्यात घातल्याशिवाय त्यांना पुढारीपण मिळत नाही म्हणून त्यांची ही सर्व खटपट चालू असते. माझे हे म्हणणे पटवून देण्यासाठी मी वेगळी वेगळी उदाहरणे दिली. १९८० साली माधवराव बोरस्ते, माधवराव मोरे यांच्यासारख्या मातबर शेतकऱ्यांसमोर मी सहकारातील पुढाऱ्यांच्या शेतकऱ्यांना लुटण्याच्या युक्त्या सांगितल्या. माधवराव बोरस्ते साखर संघाचे

अध्यक्ष होते. त्यांना विचारले की, ''एके वर्षी फ्रीसेल साखरेचा भाव जास्त असेल तर दुसऱ्या वर्षी लेव्ही साखरेचा भाव आपोआप कमी होतो हे तुम्हाला ठाऊक आहे?'' ते म्हणाले, ''नाही बुवा! आमच्या हे कोणी लक्षात आणूनच दिले नाही.'' पण, वेळोवेळी या सहकारमहर्षींनी शेतकऱ्यांना लुटण्यासाठी अशा वेगवेगळ्या युक्त्या वापरल्या; अजूनही त्या वापरणे सुरूच आहे.

यावेळी शेतकऱ्यांची कोंडी करण्यासाठी कोणत्या युक्त्या वापरल्या पाहा. शरद पवारांनी दिल्लीत बसून साखरेची निर्यात बंद करण्याचे धोरण जाहीर केले. साखर निर्यात होणार नाही म्हणजे देशातील साखरेचे भाव कोसळणार आणि त्या कारणाने साखर कारखाने उसाला कमी भाव देणार अशी शेतकऱ्याची कोंडी झाली. तरी बरे, शेतकरी संघटनेच्या पराक्रमामुळे उसावरील झोनबंदी उठली; त्यामुळे अधिक दर देणाऱ्या कारखान्याला ऊस घालण्याची संधीतरी शिल्लक राहिली; पण शेतकरी अडला म्हणजे अधिक भाव देणाऱ्याचाही हात आखडता होतो. शेतीमंत्रालयाचे, शेतकऱ्यांची कोंडी करण्याचे दुसरे धोरण म्हणजे गुऱ्हाळबंदी. कारखाने चांगला भाव देत नाहीत तर मग आपणच गुऱ्हाळ मांडून गूळ बनविण्याचे शेतकऱ्याने ठरवले तर त्यावर बंदी. एकीकडे, शेतीमालावर प्रक्रिया करत नाही तर मग तुम्हाला कसा भाव मिळणार म्हणून सरकार ओरडत असते आणि दुसरीकडे गुऱ्हाळावर बंदी घालते असा हा दुटप्पीपणा आहे.

ही ऊस परिषद निर्णय घेत आहे की ज्या शेतकऱ्यांना साखर कारखान्यांना ऊस न घालता स्वतःचे गुऱ्हाळ लावायचे असेल त्यांनी ते सरकारची गुऱ्हाळबंदी मोडून अवश्य घालावे. सरकारला काय खटला लावायचा असेल तो लावू द्या. माझ्या परवानगीने तुम्ही हे गुऱ्हाळ लावले आहे म्हणून आरोपी क्रमांक एक म्हणून माझे नाव त्यात घाला. तुमचे गुऱ्हाळ बंद करायला कोणी आले तर, अगदी पोलिस बरोबर घेऊन आले तरी त्यांची सर्व माहिती लिहून ठेवा आणि त्यांना परतवून लावा; एवढ्याने ते ऐकत नसतील तर आपल्या घरात शिरलेले, गणवेशातील का असेना, चोरदरोडेखारे आहेत असे म्हणून आपल्या घरात शिरलेल्या दरोडेखोरांचे पारिपत्य करण्याचा जो अधिकार कायद्याने दिला आहे त्याचा वापर करून त्यांचे पारिपत्य करा. त्यामुळे जर तुम्हाला कोणी पकडले तर जबाबात सांगा की आम्ही हे शरद जोशींच्या सांगण्यावरून केले आहे त्यांना आरोपी नंबर एक करा.

निर्यातीवर बंदी, गुऱ्हाळावर बंदी आणि उसाला भाव देणार फक्त ८६० रुपये टनाला; हा काय व्यवहार झाला? गेल्या वर्षी याच जागी उसाच्या भावासाठी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला त्याप्रमाणे कोल्हापूर, सातारा, सांगली जिल्ह्यांतील

पाईकांनी चांगली लढाई केली; निसर्गानेही साथ दिली; पण हे आंदोलन महाराष्ट्रात सर्वदूर झाले नाही, शेतकरी संघटनेने तयार केलेल्या 'शेतकरी तितका एक एक' या जाणिवेत थोडी ढील पडल्यासारखे झाले. मराठवाडा, विदर्भच नव्हे तर नाशिक भागातही या आंदोलनाला म्हणावी तितकी धार आली नाही. कदाचित् या भागांतील उसउत्पादक शेतकऱ्यांना आपण घोषित केलेला १५०० रुपयांचा भाव जवळिकीचा वाटला नसावा. आपण भाव ठरवला १२% साखर उतारा धरून. १०% च्या खाली साखर उतारा असलेल्या भागातील शेतकऱ्यांना तो आपला वाटला नसावा, त्यामुळे लढाईत ढील पडली असावी.

कोणत्याही मालाचे भाव काढण्याचे मार्ग दोन आहेत. शेतकरी संघटनेची मुळातील मागणी, उत्पादनखर्च भरून देणारा भाव मिळाला पाहिजे, ही आहे. सरकारने जर निर्यातबंदी केली नाही, जीवनावश्यक वस्तू कायद्यासारखी बंधने आणली नाहीत तर असा भाव खुल्या बाजारात शेतकऱ्याला मिळतो. सरकार शेतीमालाच्या बाजारपेठेत हस्तक्षेप करते म्हणून शेतीमालाला रास्त भाव मिळत नाही. तेव्हा सरकारी हस्तक्षेपातून मुक्त बाजारपेठेत काय भाव मिळू शकेल याचा हिशोब करणे ही भाव काढण्याची एक पद्धती झाली.

दुसरी पद्धत म्हणजे शेतकऱ्याला शेतामध्ये माल पिकवायला उत्पादनखर्च किती येतो याचा हिशोब काढणे. कोणी काहीही म्हणो, शेतकऱ्याला ऊस पिकवायला जितका खर्च येतो तितका भाव मिळू नये असे सांगण्याचा अधिकार कोणा अफजलखानाला नाही आणि त्याच्या आदिलशहालाही नाही.

आपण या परिषदेच्या निमित्ताने उसाच्या उत्पादनखर्चाचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. 'कृषी उत्पादनखर्च व मूल्य आयोगा'ने उसाचा उत्पादनखर्च काढताना वेगवेगळ्या कामांवरील खर्चांचे जे आकडे घेतले आहेत ते प्रत्यक्षात होणाऱ्या खर्चापेक्षा कितीतरी कमी आणि वास्तविकतेची पातळी सोडणारे असल्याचे आपल्या लक्षात आले आहे. त्यामुळे, या आयोगावर बंधन घातले पाहिजे, त्याच्या अध्यक्षावर आणि सदस्यांवर जबाबदारी टाकली पाहिजे की तुम्ही जी आकडेवारी फेकून उत्पादन खर्च जाहीर करता त्या खर्चात तुम्ही पिकवून दाखविले पाहिजे. तसे करताना नुकसान सोसावे लागले की अशा वेड्यावाकड्या शिफारशी ते करणार नाहीत असे वाटते.

उत्पादनखर्चाचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी ऊस आंदोलनाच्या सेनापतींनी जो हिशोब मांडला आहे तो मी बारकाईने पाहिला. शेतकरी संघटनेचा उत्पादनखर्चाचा व भावाचा आकडा ठरविण्यासाठी त्यांनी खर्चातील आकडे मोठ्या काटकसरीने धरले आहेत आणि २१४९ ची मागणी केली आहे. माझ्या

Synthetic Model (विश्लेषक नमुना) पद्धतीने उसउत्पादनाचा हिशोब केला तर या काटकसरीच्या आकडेवारीत किमान २०% अधिक धरावे लागतील आणि मग सेनापतींनी काढलेल्या २१४९ रुपये उत्पादनखर्चात किमान ४० ते ५० रुपये अधिक धरावे लागतील आपण तो प्रति टनाला २२०० रुपये धरायला हरकत नाही. तेव्हा, शेतकऱ्यांना उसाला अंतिम भाव हा किमान २२०० पेक्षा जास्त असायला पाहिजे. खरे तर, आपण २२०० रुपये खर्च केल्यानंतर साधारण वर्षभराने ते भरून निघत असतात हे पाहिले तर अंतिम भाव २३०० किंवा २४०० मिळायला हवा; पण सध्या आपण २२०० वर थांबून राहू या; पण लढाई ही काही अंतिम भावावर – लबाडांघरच्या आवतनावर – होत नाही. शेवटी काय मिळणार काय भरवसा? त्यादरम्यान निवडणुका झाल्या तर सगळे संचालक मंडळच बदलून जाईल अशी अनिश्चितता. म्हणून, परंपरेने आपली लढाई झाली आहे ती कारखान्याला ऊस घातल्या घातल्या मिळणाऱ्या पहिल्या हप्त्यासाठी. माझ्यासमोर ठेवलेल्या आकडेवारीचा मी बारकाईने अभ्यास केला आहे. ८% साखर उतारा असेल तर त्या उसाला अंतिम किंमत १४५० रुपये मिळायला हवी. १०% उताऱ्याच्या उसाला ती १९५० किंवा २००० असायला हवी आणि १२% उतारा असेल तर २१७० पेक्षा कमी असता कामा नये; पण लढाईचा मुद्दा म्हणून पहिल्या हप्त्याची मागणी करताना गेल्या हंगामात ११०० रुपयेसुद्धा भाव मिळाला नाही अशा नाशिक, नगर आणि विदर्भमराठवाड्यातील ऊस शेतकऱ्यांनासुद्धा कारखाने बंद पाडायचा उत्साह आला पाहिजे, एवढेच नव्हे तर १९८० सालाप्रमाणे आवश्यकता तर सर्व रेल्वेगाड्या आणि रस्तेसुद्धा बंद पाडण्याचा उत्साह आला पाहिजे.

म्हणून सगळ्या भागांतील ऊस उत्पादकांकरिता मी एक सूत्र मांडतो. ते ज्यांनी त्यांनी आपापल्या भागाला लावावे, आपल्या भागातील कारखान्याला लावावे. उसातील शर्करांशाच्या प्रत्येक टक्क्याला किमान १५० रुपये पहिला हप्ता मिळाला पाहिजे अशी आपल्या लढाईची मागणी राहील. म्हणजे जर कारखान्यांतील साखरउतारा १०% आहे तिथे उसाला १५०० रुपये आणि जेथे १२% साखर उतारा आहे तेथे १८०० रुपये प्रतिटन पहिला हप्ता मिळाला पाहिजे. यात अवाजवी काही नाही.

गेल्या वर्षी आपण १५०० रुपयांची मागणी केली, त्यावेळी अवाजवी मागणी म्हणून सर्वांनी त्याची हेटाळणी केली; पण गेल्या वर्षी पेट्रोल–डिझेलच्या किमती वाढल्या, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्या तरी, एका कारखान्याने का होईना, १७०० रुपये उचल दिली. त्यामुळे, या वेळेचा आपला निर्धार असणार

आहे की पहिली उचल १८०० रुपये मिळाल्याशिवाय आम्ही कारखाने चालू होऊ देणार नाही.

यामुळे, विशेषतः कोल्हापूर, सातारा, सांगली जिल्ह्यांतील उसउत्पादकांवर एक जबाबदारी येणार आहे. आपल्या मागणीप्रमाणे १८०० रुपये मिळायला लागले की थांबायचे नाही; १८०० रुपये मिळाले ते फक्त उसाला कोयता लावून देण्यासाठी; शेवटी २२०० रुपये मिळेपर्यंत आंदोलन चालू ठेवायचे आहे.

**परिषदेचे निर्णय –**

१) नोव्हेंबरमध्ये केरळ राज्यांतील शेतकऱ्यांच्या आंदोलनात जाण्याची तयारी ठेवा.

२) स्पेशल इकॉनॉमिक झोनच्या रूपाने एक राक्षस शेतकऱ्याच्या मागे लागला आहे. सतत सजग राहून त्याचा बंदोबस्त करा.

३) एक टक्का शर्करांशासाठी १५० रुपयेप्रमाणे प्रतिटन १८०० रुपये पहिला हप्ता मिळेपर्यंत ऊस तोड करू द्यायची नाही. २२०० रुपये अंतिम भावासाठी लढत राहायचे.

लक्षात ठेवा, आपल्या हाती दिल्लीची सत्ता नसेल, आपल्या हाती महाराष्ट्राची सत्ता नसेल; पण, आपल्या आंदोलनात आजपर्यंत ज्या शेतकऱ्यांनी त्याचे रक्त सांडले आहे, अनेकांनी लाठ्यांचा मार खाल्ला आहे, तुरुंगवास भोगला आहे आणि शेतकऱ्याचे दुःख वेशीवर टांगण्याकरिता दुर्दैवाने ज्या हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या बाजूने आपली भूमिका मांडण्याला मोठे नैतिक बळ मिळालेले आहे. आत्महत्या केलेल्या प्रत्येक शेतकऱ्यालासुद्धा शेतकरी आंदोलनातील हुतात्मा म्हटले पाहिजे.

यापुढे शेतकऱ्यावर कोठेही अन्याय होतो आहे असे दिसले तर तुमच्यात जी काही क्षमता आहे तिचा पुरेपूर वापर करून त्या अन्यायाचे निवारण करण्याचा वसा घ्या.

*(२४ सप्टेंबर २००६ – ऊस परिषद, पुणे)*

*(शेतकरी संघटक ६ ऑक्टोबर २००६)*

■■

# स्वातंत्र्यासाठी 'पोशिंद्यां'चा संग्राम

जकातकराच्या विरुद्ध लढा उभारण्याकरिता एकत्र झालेले शेतकरी, व्यापारी, वाहतूकदार आणि इतर संघटनांचे नेते आणि कार्यकर्ते भावांनो आणि बहिणींनो,

जकातकराविरुद्ध लढा द्यायच्या कार्यक्रमांत मी पहिल्यापासून आहे; मुंबईच्या कार्यक्रमातही मी हजर होतो; पण स्वतंत्र भारत पक्षाने पुढाकार घेऊन जकातकराविरुद्ध जाहीररीत्या आयोजित केलेल्या या कार्यक्रमात मी हजर झालो आहे तो केवळ जकात रद्द करून घ्यावी एवढ्या किरकोळ उद्देशाने हजर राहिलो नाही. सुदैवाने, आज व्यापारी, वाहतूकदार, शेतकरी एकत्र झाले आहेत. शेतकऱ्यांची वेगळीवेगळी आंदोलने चालू असताना – दुधाचे आंदोलन चालू असताना, उसाचे आंदोलन चालू असताना अनेक पत्रकारांनी टीका केली होती की एकाच जिल्ह्यातील दोन संघटना त्याच विषयांवरील आंदोलनांत वेगळ्या वेगळ्या का राहतात, त्या एकत्र का येत नाहीत? उसाकरिता आलो नाही, दुधाकरिता आलो नाही पण जकातविरोधी आंदोलनाकरिता दोन्ही शेतकरी संघटना आज या मंचावर उपस्थित आहेत याचा अर्थ समजावून घ्या. ही काही केवळ लहानशी लढाई नाही. शेतकऱ्यांची लढाई तीस वर्षे चालली, जकातीची लढाईसुद्धा छत्तीस वर्षे चालली आहे; पण समोरचा शत्रू असा आहे की त्याला जर टक्कर द्यायची असेल तर आपली एकेकट्याची ताकद कमी पडते आहे; आपण व्यापारी, वाहतूकदार, शेतकरी सगळे एकत्र आलो आणि आपल्या स्वातंत्र्याच्या लढाईची तुतारी फुंकली तरच पुढची लढाई शक्य आहे हे समजावून देऊन त्या लढाईची आखणी करण्यासाठी मी इथे आलो आहे.

व्यापाऱ्यांचे आणि शेतकऱ्यांचे भांडण कधीच नव्हते. १९८० साली शेतकरी संघटना सुरू झाली तोपर्यंत कम्युनिस्ट नेहमी म्हणत की शेतकऱ्यांना आडते लुटतात, व्यापारी लुटतात. शेतकरी संघटनेने पहिल्यांदा सांगितले की हे खरे नाही. शेतकऱ्याला मिळणारा भाव आणि ग्राहकाला द्यावी लागणारी किंमत या दोघांमध्ये तफावत आहे. ती आडत्यांच्या कमिशनमुळे नाही, ती व्यापाऱ्यांच्या नफ्यामुळे नाही तर, शहरातील

राहणीमान आणि गावातील राहणीमान यांमध्ये जो फरक आहे त्याचा तो परिणाम आहे आणि शेतकऱ्यांना योग्य तो भाव मिळत नाही याचे कारण शेतकऱ्यांना उत्पादनखर्चावर आधारित रास्त भाव मिळता कामा नये असे सरकारचे धोरण आहे हे शेतकरी संघटनेने सप्रमाण सिद्ध करून सांगितले. शेतकरी संघटनेने पहिल्यांदा सांगितले की, शेतकऱ्यांचा आणि ग्राहकांचा खरा शत्रू सरकार आहे. जर शेतकऱ्याला त्याच्या शेतीमालाला रास्त भाव मिळाला तर व्यापाऱ्याचा ग्राहक वाढेल, व्यापार तेजीत येईल; शेतकऱ्याला जर पैसे मिळाले तर व्यापाऱ्यांची देणी दिली जातात हा अनुभव आम्ही १९८० सालापासून घेतला आहे. शेतकरी संघटनेने 'रास्ता रोको' हे हत्यार जेव्हा घेतले तेव्हा व्यापाऱ्यांनी आणि वाहतूकदारांनी आम्हाला साथ द्यावी असा आम्ही फार प्रयत्न केला. त्यांनी त्यावेळी जर आम्हाला साथ दिली असती तर, २७ शेतकरी या आंदोलनात जे बळी पडले त्यातील एकाही शेतकऱ्याचा बळी गेला नसता. ही एकी त्यावेळी जमली नाही, ती आज एका व्यापक आघाडीकरिता जमते आहे हे मोठे भाग्य आहे.

आपल्याला केवळ जकातीची लढाई लढायची नाही, मी तुमच्या बरोबर आलो आहे, शेतकरी येथे तुमच्याबरोबर आले आहेत, राजू शेट्टी आणि त्यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्तेही आपल्याबरोबर आले आहेत ते त्याहून मोठ्या लढाईची आखणी करण्याच्या निर्धाराने. काल काही पत्रकारांनी मला विचारले की, 'स्वाभिमानी' शब्द राहणार की नाही? मी म्हटले, "ते नाव ठेवायचे किंवा नाही तो निर्णय स्वाभिमानी संघटनेने करायचा आहे." आज स्वाभिमानी शेतकरी संघटनेची भिंत ओलांडून राजू आणि त्याचे सहकारी इकडे आले. मला वाईट एवढेच वाटले की गुरुपौर्णिमेच्या मुहूर्ताची वाट न पाहता दुधाचे आंदोलन ज्या दिवशी त्यांनी जाहीर केले त्या दिवशी मला त्यांनी साधा फोन केला असता तर त्यांच्या आंदोलनात सामील होण्याकरिता मीसुद्धा आलो असतो. दर्यापूरच्या निवडणुकीच्या वेळी, मनात कोणताही मानापमान न ठेवता, मदतीला या म्हणून मी त्यांना विनंती केली होती. तसेच स्वाभिमानीच्या एका जरी कार्यकर्त्याने म्हटले असते की, "१९८० साली दुधाचे आंदोलन तुम्हाला तसेच सोडावे लागले, आता हे शिवधनुष्य आम्ही उचलायचे ठरवले आहे, आमच्या मदतीला या," तर मी नेतृत्वाची काही अपेक्षा न बाळगता धावून आलो असतो. आता या भिंती ठेवायच्या किंवा नाही हे त्यांनी ठरवायचे आहे. त्यांच्या मागे 'स्वाभिमानी' हे नाव असले तरी त्यांच्या छातीवरील बिल्ला अजून शेतकरी संघटनेचाच आहे, त्यात काही बदल झालेला नाही.

काल राजूशी बोलताना मी एक गोष्ट सांगितली ती सर्व शेतकरी भावांना सांगतो. १९८० साली, तोवर शेतकऱ्यांना फक्त भीक मागण्याची आंदोलने चालू असताना,

शेतकऱ्याला 'भीक नको', एक दाणा पेरून हजार दाणे पिकवण्यासाठी गाळाव्या लागणाऱ्या 'घामाचे दाम' फक्त पाहिजे ही घोषणा शेतकरी संघटनेने दिली. त्या वेळी जे अर्थशास्त्र सांगितले गेले त्याला नावे ठेवणारे खूप होते. उदाहरणार्थ, शरद पवार. त्यांनी म्हटले होते की, उसाला जर ३०० रुपये टनाचा भाव दिला तर सगळे साखर कारखाने मोडीत काढावे लागतील. तेच शरद पवार आज शरद जोशींचीच भाषणे देत सबंध देशभर फिरताहेत. जी भाषा, जे अर्थशास्त्र, अर्थव्यवस्थेचे व्याकरण त्या वेळी आम्ही मांडले तेच आज सबंध हिंदुस्थानातले पुढारी वापरू लागले आहेत; एवढेच नव्हे तर, जागतिक व्यापार संस्थेचे करारसुद्धा त्या भाषेच्या आधाराने तयार झाले आहेत.

पण, आज जर असे कोणी समजून चालेल की त्याच भाषणांनी, त्याच आंदोलनांनी आणि त्याच हत्यारांनी शेतकरी आंदोलन चालणार आहे तर ते खरे नाही. शेतकऱ्यांपुढे फार वेगळे प्रश्न उभे राहत आहेत. जागतिक व्यापार संस्था हा एक छोटा प्रश्न झाला, नवीन जैवतंत्रज्ञानाने बनणारे बियाणे हा एक वेगळा प्रश्न झाला, पण सगळ्या जगाला सर्वात अधिक भेडसावणारा प्रश्न म्हणजे जगाचे वाढणारे तापमान. जगाच्या वाढणाऱ्या तापमानाचे परिणाम काय होतील? हिंदुस्थानामध्ये अन्नधान्य पिकणे जवळजवळ अशक्य होईल आणि सगळे अन्नधान्य आताच्या थंड प्रदेशांत म्हणजे सैबेरियासारख्या देशांतच पिकेल. लोकांना प्यायला पाणी पुरणार नाही तेथे शेतीला पाणी देणार कोण? इतके विचित्र प्रश्न नजीकच्या भविष्यकाळात शेतीसमोर उभे राहणार आहेत. याच्यासंबंधी चिंतन करण्याची ज्यांची ताकद आहे, ज्यांचा व्यासंग, अभ्यास आणि निष्ठा आहे तीच मंडळी याच्या पुढील शेतकरी आंदोलन चालवू शकतील. जुन्या शब्दप्रयोगांच्या आणि जुन्या व्याकरणाच्या शेतकरी आंदोलनाला याच्यापुढे अर्थ उरणार नाही.

आपला एखादा आवडता, काम करणारा, कर्तबगार मुलगा घरातून दूर झाला आणि त्याने वेगळी चूल मांडली – त्याच्या बायकोच्या हट्टामुळे का असेना – की बापला मोठे दुःख होते आणि राजू दूर गेल्यामुळे मला दुःख झाले हे काही मी कधी लपवून ठेवले नव्हते. आजचा दिवस शुभ दिवस आहे आणि मला आनंद वाटतो की आता या भिंती तुटायला सुरुवात झाली आहे. एवढेच नव्हे तर, काल मी न मागता राजूने मला एक आश्वासन दिले आहे. कोणत्याही प्रकारचा स्वार्थ, राजकारण मी मनात बाळगलेले नाही, शेतकरी संघटना हे कुटुंब आहे आणि शेतकरी संघटनेचे पाईक म्हणजे माझी मुले आहेत असे मी धरून चाललो तरीदेखील, दुर्दैवाने, आज कोणाच्या मनात काही आले तो दूर झाला, उद्या आणखी कोणी, अशा सगळ्यांना एकत्र करून त्यांना पुन्हा शेतकरी संघटनेत आणण्याचा तो स्वतः प्रयत्न करणार

आहे.

**शेतकरी संघटनेच्या अध्यक्षपदी जयपालअण्णा फराटे**

जकातीच्या प्रश्नावर बोलायला सुरुवात करण्यापूर्वी अजून एक संघटनात्मक मुद्दा पुरा करतो. राजू शेट्टी येथे आले पण शेतकरी संघटनेचे अध्यक्ष काही येथे आले नाही अशी कुजबुज मी ऐकली, काही वर्तमानपत्रांत वाचली. रघुनाथदादा पाटील इथे नाहीत ही गोष्ट खरी आहे; पण काल संध्याकाळपासून ते शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राहिलेले नाहीत. काल झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये सांगली भागामध्ये, विशेषत: ऊस आंदोलनाच्या संबंधाने रघुनाथदादांनी जे नेतृत्व दाखवले, काम केले, तुरुंगात गेले, मार खाल्ला त्याची कृतज्ञतापूर्वक नोंद घेऊन त्यांचे आभार मानण्याचा ठराव झाला; पण त्यांची एक वर्षाची कालमर्यादा संपत आल्यामुळे आणि आज जो काही नव्या प्रश्नांचा कालखंड येतो आहे त्या कालखंडामध्ये सर्वांना सामावून घेणाऱ्या, आमच्यापासून दूर गेलेल्यांनासुद्धा एकत्र करणाऱ्या नेतृत्वाची आवश्यकता आहे म्हणून या बैठकीत नव्या अध्यक्षाची नियुक्ती करण्यात आणि नव्या अध्यक्षपदी आपल्या कांद्याच्या आंदोलनापासून माझे सहकारी असलेले आणि ज्यांनी मला पहिल्यांदा सांगलीला आणले त्या जयपाल अण्णा फराटे यांची एकमताने निवड करण्यात आली.

जयपाल अण्णांच्या निवडीचे सर्वांनी जे स्वागत केले त्याचे कारण त्यांचा मनमिळाऊ स्वभाव आणि शेतकरी संघटनेच्या तत्त्वांबद्दलची त्यांची निष्ठा. मी कांद्याचे आंदोलन सुरू केले तेव्हा हिंदुस्थानात येऊन मला पाच वर्षे झाली होती आणि शेतीच्या प्रयोगामुळे घरची परिस्थिती ओढगस्तीची होऊन आज टेबल वीक, उद्या खुर्ची वीक अशा पद्धतीने घर चालवत होतो. कांद्याच्या आंदोलनाची जाहिरात खूप झाली आणि जयपालअण्णा माझ्या घरी मला भेटायला आले आणि परत जाण्याच्या आधी, माझ्यापेक्षा ते पाच वर्षांनी लहान आहेत तरी, त्यांनी माझ्या बायकोला विचारले की शेतकरी आंदोलन, तुरुंगवास वगैरे ठीक आहे, पण घरच्या खर्चाची काही व्यवस्था आहे का? आणि त्या माणसाने काही न बोलता, मला आजही आठवते आहे, माझ्या बायकोच्या हाती १००० रुपये (त्या काळचे) काढून दिले. सांगलीला जेव्हा मला ते घेऊन जात तेव्हा त्यांना मोठी काळजी वाटायची. कारण, त्या काळी माझी भाषणे कडक असायची. सांगलीसारख्या भागात उसाच्या प्रश्नावर बोलायचे म्हणजे तेथील शेतकऱ्यांचे दैवत वसंतदादा आणि शालिनीताई यांच्यावर कडक टीका करणे अनिवार्य होते; पण जयपालअण्णांचा स्वभाव मृदू, ते मला व्यासपीठावर चढायच्या आधी बाजूला घेऊन म्हणायचे, "साहेब, तुम्ही सांगलीत बोलताहात, दादांच्याबद्दल एवढं कडक नका बोलू." त्यांचे मी ऐकले

नाही पण, तरीही जयपालअण्णांनी माझ्यावर जेवढे प्रेम केले तेवढे फार थोड्या लोकांनी केले आहे. त्यांच्या खूप नंतर संघटनेत आलेले पुष्कळ लोक संघटनेच्या अध्यक्षपदी राहून गेले. आज मला मोठा आनंद होतो की सांगलीमध्ये, संघटनेच्या अत्यंत कठीण प्रसंगी, जेव्हा सगळ्या लोकांना एकत्र घेऊन पुढे जायचे आहे आणि महाराष्ट्रभरसुद्धा जे जे थोडेफार इकडेतिकडे पांगले आहेत त्या सगळ्यांना एकत्र करून जागतिक व्यापार संस्था, जैवतंत्रज्ञान, वाढते तापमान आणि पाण्याची कमतरता अशा कालखंडामध्ये शांतपणे विचार करून सगळ्या लोकांना एकत्र घेऊन चालणारा नेता जयपालअण्णांच्या रूपाने आपल्याला मिळाला आहे आणि जयपालअण्णांना मी शब्द देतो की सुरुवातीच्या काळात वसंतदादांच्या बाबतीत त्यांनी सांगितलेले मी ऐकले नसले तरी या काळात तुम्ही अध्यक्ष म्हणून जे काही सांगाल ते मी प्रमाण मानीन.

आजचा हा कार्यक्रम ज्या प्रश्नासाठी – जकातीच्या प्रश्नासाठी – होतो आहे त्या प्रश्नावर बोलण्याआधी इतके सगळे बोललो ते यासाठी की आज हा जो काही संगम होतो आहे तो काही साधा नाही. हा संगम व्यापाऱ्यांनी घडवून आणला आहे; नाही तर हा प्रसंग इथे घडत नव्हता.

ऑक्ट्राय म्हणा, जकात म्हणा, चुंगी म्हणा. हा काय प्रकार आहे. सगळ्या लोकांचे एकमत आहे की एक रुपया कमावण्याकरिता दहा रुपये खर्च करणारे आणि ज्यामध्ये वाहतूक जागोजाग खोळंबली जाते, इंधन मोठ्या प्रमाणावर नाहक जाळले जाते, पर्यावरणात प्रचंड प्रदूषण होते अशा तऱ्हेचे हे कराचे प्रकरण आहे. अर्थव्यवस्थेला हानिकारक असे हे प्रकरण चालू राहिले आहे त्याचे एकमेव कारण आहे. इन्कम टॅक्स, सेल्स् टॅक्स यांसारखे कर हे हिशोबी असतात, ते चेकने भरले जातात किंवा त्या संबंधित खात्याच्या हिशोबात नोंदले जातात. तिथे जाऊन कोणी आमदार–खासदार त्या हिशोबात हात घालू शकत नाही; पण जकात नाक्यावर जर कोणीही आमदारासारखा पुढारी गेला तर तेथील गल्ल्यातील रोकड उचलू शकतो हे एकमेव कारण जकात चालू राहण्यामागे आणि ती चालू ठेवण्याच्या धडपडीमागे आहे.

जकातविरोधी आंदोलन खूप काळापासून सुरू आहे पण अजून काही आशेचा किरण दिसत नाही. मला असे वाटते की, या आंदोलनाची दिशा चुकलेली आहे. या बाबतीत मी या जकातविरोधी आंदोलनाचे सेनापती खासदार एकनाथ ठाकूर, बिंदुमाधव जोशी यांच्याशी बोललो आहे. आपण हे आंदोलन सरकारच्या विरोधात चालवले आहे आणि सरकार काही हलायला तयार नाही. माझा प्रश्न असा आहे की या जकातकराचा आणि सरकारचा संबंध काय? कायद्याने महानगरपालिकांना परवानगी

दिली आहे की तुम्ही तुमच्यातुमच्या हद्दीकरिता ज्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतेची व्यवस्था, दिवाबत्ती, पहारा देणे अशासारख्या व्यवस्था करायच्या आहेत त्याच्याकरिता तुम्हाला अमुक अमुक कर गोळा करायची परवानगी आहे. त्यामध्ये जकात हेसुद्धा एक कलम आहे. मुख्यतः, त्यांच्या क्षेत्रात जी स्थावर मालमत्ता असते त्यावरील मालमत्ता कर म्हणजे सगळ्या महानगरपालिकांच्या उत्पन्नाचे मुख्य साधन. त्यात जकात जमा करायची परवानगी आहे पण जकात जमा केलीच पाहिजे असा काही दंडक नाही. जकातीचा सगळ्यात जास्त त्रास वाहतूकदारांना होतो. जकात कर हा व्यापारीविरोधी आहे, शेतकरीविरोधी आहे, वाहतूकदारविरोधी आहे. एवढेच नव्हे तर, तो राष्ट्रद्रोही आणि राष्ट्रविरोधी आहे – सगळ्या राष्ट्राचे नुकसान करणारा आहे आणि अशा तऱ्हेचा कर, जो महानगरपालिकेला लावण्या–न–लावण्याची मुभा आहे, तो राज्यशासनाने काढून टाकावा म्हणून आपण त्याच्या मागे का लागलो आहोत हे मला समजत नाही. राज्यशासन सांगते की याला काही पर्यायी कराची व्यवस्था द्या, मग जकात काढून कशी टाकता येईल याचा विचार करू. शासनाने या प्रश्नावर नेमलेल्या सुबोधकांत सहाय समितीचा अहवाल मी पाहिला. त्यात सुचवलेले पर्याय वाचून मला हसू आले. नुकतेच केंद्रसरकारने संसदेमध्ये कौटुंबिक स्त्री–अत्याचार विरोधी कायदा मांडून पारितही केला. किरकोळ मारहाण, मन दुखावेल असे बोलणे अशासारख्या गोष्टीही अत्याचाराच्या व्याख्येत बसवल्या आहेत. या कायद्यासंबंधी चर्चा चालू असताना जर कोणी म्हटले असते की, "बायकोचे मन दुखावेल असे बोलू नये असा कायदा करता हे ठीक आहे पण तिला न बोलता ती माझे ऐकेल याकरिता काही पर्यायी व्यवस्था आहे का?" तर सरकारकडे काही उत्तर आहे का? तसेच, जकात ही दुष्ट पद्धत आहे; पण ती काढण्याकरिता त्याला पर्याय द्या या म्हणण्याला काही अर्थ नाही. महानगरपालिकेला मालमत्ताकर लावायचा अधिकार आहे, व्यवसायकर लावायचा अधिकार आहे, कर्ज काढायचा अधिकार आहे. हे अधिकार वापरून उत्पन्नासाठी पर्याय काढावेत. त्यामध्ये राज्यशासनाने पर्यायी व्यवस्था सुचविण्याचे काही कारण नाही आणि तरीही विचार करून सुचवायचेच झाले तर काही कठीण नाही. सुबोधकांत सहाय यांच्या अहवालाप्रमाणे मुंबईत मालमत्ता कर ०.०२२ टक्के म्हणजे रुपयातले ३ पैसे सुद्धा नाही. न्यूयॉर्कमध्ये हा कर दीड ते अडीच टक्के आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवायचे तर हा कर वाढवायला वाव आहे. काय करायचे ते महानगरपालिकेने ठरवावे; पण काय करायचे ते तुम्हाला सांगता येत नाही म्हणून तुम्ही जकात कर लावायचा आणि त्याची वसुली केल्यानंतर त्यातील फक्त निम्मीच रक्कम महानगरपालिकेच्या हिशोबात येते हेही सगळ्यांना मान्य आहे आणि तीही जमा करण्यासाठी तुम्ही गावामध्ये जे

गुंड म्हणू ख्यात आहे त्यांना ठेके देऊन वसुली करता? आणि महाराष्ट्रात हे घडले आहे की एका ठिकाणी ठेकेदाराच्या माणसांबरोबर जकातीबद्दल बाचाबाची झाली तर ठेकेदाराच्या माणसांनी त्याला गोळी घालून मारून टाकले. इन्कम् टॅक्स देत नाही म्हणून गोळी घालून मारल्याचे कोणी ऐकले आहे? मग जकात देत नाही म्हणून मारण्याचा अधिकार या गुंडांना दिला कोणी? तेव्हा जकातवसुली हा केवळ आंतकवादी प्रकार आहे. मी एकनाथ ठाकुरांना सांगितले की, "जकातविरोधी समिती जे काही करते आहे ते योग्य आहे, त्यांना शासनाकडून जे काही काम करायचे आहे ते करा" आणि त्यांना मी ते सुचवले तेच येथील व्यापारी आणि वाहतूकदार भावांना सुचवू इच्छितो.

सत्याग्रहाची आंदोलने चालवण्याचा माझा अनुभव प्रचंड आहे हे कोणीही मान्य करील. सत्याग्रहाचे आंदोलन यशस्वी कसे करावे याचे शास्त्र मी बनवले आहे. उदाहरणदाखल निपाणीच्या आंदोलनातील एक आठवण मी मुद्दामहून सांगतो. निपाणीला आंदोलनात भाग घेतलेल्या शेतकऱ्यांमध्ये कानडीभाषिक आणि मराठीभाषिक दोन्ही प्रकारचे लोक होते. पत्रकारांनी त्यांच्यात फूट पाडण्याकरता मला प्रश्न विचारला की, "बेळगाव कर्नाटकात राहावं का महाराष्ट्रात यावं याबद्दल तुमचं काय मत आहे?" त्यांचा कयास असा की मी जर 'कर्नाटकात जावं,' असे म्हटले तर मराठीभाषिक शेतकरी नाराज होतील आणि 'कर्नाटकात राहावं' म्हटले तर कानडीभाषिक नाराज होतील. मी त्यांना उत्तर दिले की, "कर्नाटकात जर शेतीमालाला रास्त भाव मिळणार असेल तर सगळा महाराष्ट्र कर्नाटकात घालायला मी तयार आहे." माझ्या या उत्तराला सर्व शेतकऱ्यांनी दाद दिली. बेळगावच्या 'तरुण भारत'चे संपादक आणि महाराष्ट्र एकीकरण समितीचे अध्यक्ष किरण ठाकूर तेथे हजर होते. ते मला म्हणाले, "मी तुम्हाला बेळगावला घेऊन जाणार आहे कारण तुम्ही आमच्या समितीला मार्ग दाखवू शकाल अशी मला खात्री वाटते." त्यांचे पुष्कळ नेते झाले. आचार्य अत्र्यांपासून बाळासाहेब ठाकऱ्यांपर्यंत अनेकांनी सीमाप्रश्नाचे धनुष्य उचलायचा प्रयत्न केला आणि सगळयांच्या छातीवर ते धनुष्य पडले. मी एकीकरण समितीच्या बैठकीत गेलो आणि त्यांना मी एकच प्रश्न विचारला की, "तुम्हा बेळगावकरांना खरंच हा प्रश्न सुटावा अशी इच्छा आहे का?" माझा प्रश्न ऐकून सगळयांची तोंडे गोरीमोरी झाली. माझ्या असं लक्षात आले की त्यांना एकीकरणाचा प्रश्न सुटण्यापेक्षा हा प्रश्न धुमसत ठेवून त्यामुळे विधानसभेत ज्या पाच जागा मिळतात किंवा नगरपालिका जी हातात राहते त्याच्यात जास्त स्वारस्य होते; त्यांना प्रश्न सोडवण्यात स्वारस्य नव्हते. नाहीतर मी त्यांना सांगणार होतो की, त्यात काय कठीण आहे? कर्नाटकाची आणि बेळगावची जी हद्द आहे तिथे आम्ही माणसे उभी करतो म्हणजे इकडचे कोणी

तिकडे जाणार नाही आणि तिकडचे कोणी इकडे येणार नाही. संपला प्रश्न.

व्यापारी आणि वाहतूकदार भावांनो, आंदोलनतंत्राचा तज्ज्ञ म्हणून मी तुम्हाला एक सल्ला देतो. जकातविरोधी समितीचे मुंबईचे आंदोलन चालू द्या. तुम्ही आता सगळ्या महानगरपालिकांना एकत्र करू नका. एकेका महानगरपालिकेला एकेकटे पाडा आणि समाचार घ्या. सांगलीचा निर्णय मुंबईला नाही, सांगली महानगरपालिकेने जकातकर घ्यायचा किंवा नाही हा निर्णय सांगलीलाच व्हायचा आहे. त्याचा संबंध सोलापूरशी नाही, कोल्हापूरशी नाही आणि मुंबईशीतर नाहीच नाही. त्यांच्या वेगळ्या वेगळ्या काठ्या एकत्र बांधून त्यांची जुडी करून त्यांची ताकद का वाढवता? तुम्हाला सांगलीला पुढचा जकातविरोधी कार्यक्रम घ्यायचा असेल तेव्हा तो मुंबईच्या शासनाविरुद्ध घेऊ नका, सांगली महानगरपालिकेच्या विरोधात घ्या आणि तुमचे तिथे निवडून गेलेले लोक आहेत त्यांच्या मनात अशी धास्ती तयार करा की जर का जकात बंद झाली नाही तर पुढे त्यांना या महानगरपालिकेमध्ये निवडून येणे शक्य होणार नाही. हे तुम्हाला शक्य आहे, संपूर्ण महाराष्ट्रातील सरकार या विषयावर बदलून आणणे शक्य नाही.

राज्याचे सरकार बदलून आणणे शक्य नाही यामागे इतरही कारणे आहे. मागच्या निवडणुकीत त्यांनी सांगितले आम्ही जकात रद्द करू पण, तशी ती रद्द केली नाही. काय करू शकलो आपण? शेतकऱ्यांना सांगितले वीज फुकट देऊ, कर्ज बेबाक करू; शेतकरी खुश झाले आणि दिली मते भरभरून; पण वीज मोफत झाली नाही आणि कर्जवसुलीही थांबली नाही. शेतकरी आत्महत्येखेरीज काय करू शकले? निवडणुकीच्या आश्वासनांवर विश्वास ठेवणारे तुम्हीही बावळे आणि आम्हीही बावळे! तेव्हा जे सरकार काहीही घोषणा करून सत्तेवर येते आणि अंमलबजावणी करीत नाही त्या सरकारशी लढायला जाऊ नका, महानगरपालिकेशी लढा. महानगरपालिकेशी लढायचे म्हटले तर किती मोर्चे बांधावे लागतील? सांगलीच्या भोवती जितकी काही जकात नाकी असतील त्या सगळ्यांचा बंदोबस्त करण्याइतकी शक्ती जर तुम्ही जमवली तर आठ दिवसांत येथील जकात बंद होईल. तुम्ही मुंबईवर चाल करून लढाई विनाकारण कठीण केली आहे आणि मुंबईच्या लोकांनी 'जकातीला पर्याय आम्ही शोधून काढतो' असे म्हणून तुम्हाला थोपवून धरले. पर्याय कसला देता? बायको माझ्या ताब्यात राहत नाही म्हणून बायकोला थोडेफार बोलायची परवानगी देता का?

स्वतंत्र भारत पक्षाने हे जकातविरोधी आंदोलन नांदेडला घेतले, आज सांगलीला घेतले. जकातविरोधी समितीला आमचा संपूर्ण पाठिंबा आहे. पण त्याच लढाईसाठी आम्ही एक वेगळी आघाडी काढू इच्छितो की जी यापुढे राज्यशासनाशी लढणार

नाही. हा निर्णय हा सांगली महानगरपालिका क्षेत्राचा आहे, सोलापूर महानगरपालिका क्षेत्राचा आहे. ही आघाडी एकेका महानगरपालिका क्षेत्राची लढाई लढवील. ताकद असली तर एका वेळी दोन क्षेत्रांत लढाई लढू. एकाच महानगरपालिकाक्षेत्रामध्ये या आघाडीची सर्व ताकद एकवटून, महानगरपालिकेला त्यांच्या जकात नाक्यांवर वाहने अडवून जकात वसुली करणे अशक्य होईल अशा प्रकारचे आंदोलन आपण घेऊ शकतो.

व्यापारी व वाहतूकदार भावांना शेवटी एक मुद्दा मला सांगायचा आहे. हे आंदोलन स्वतंत्र भारत पक्षाने घेतले आहे. शेतकरी संघटना ही गोष्ट वेगळी. शेतकरी या आंदोलनात आले कारण स्वतंत्र भारत पक्षाला शेतकरी संघटनेचा पाठिंबा आहे आणि शेतकरी संघटनेला स्वतंत्र भारत पक्षाचा पाठिंबा आहे; परंतु स्वतंत्र भारत पक्षाने घेतलेली ही भूमिका केवळ जकातकराबद्दल नाही. देशातील सर्व करव्यवस्थेबद्दल स्वतंत्र भारत पक्षाने एक मांडणी केली आहे. व्यापारी मंडळींनी आता काही मुद्दे ऐकून घ्यावेत व नंतर स्वतंत्र भारत पक्षाचा जाहीरनामा तपशिलाने वाचावा. या विषयातील पहिले कलम असे की कोणतीही कर आकारणी हिशोबाच्या वह्यांच्या आधाराने केली जाणार नाही. हिशोबांच्या वह्यांचा आधार घेतला की त्या खोटेपणाला वाव मिळतो, कोणा इन्स्पेक्टरला किती डिस्क्रीशन आहे हे बघता येते आणि मग तो पैसे खातो. जे काही कर द्यायचे ते त्या माणसाचे घर किती मोठे आहे, त्याचे उत्पादनाचे क्षेत्र किती मोठे आहे, त्याचे उत्पादन किती होते, तो वीज किती वापरतो, पेट्रोल किती वापरतो आणि कचरा किती टाकतो यावर आधारलेले असावेत म्हणजे हिशोबाच्या वह्यांच्या जुळवाजुळवीत जो काही भ्रष्टाचार होऊ शकतो त्यातून सुटका होईल.

स्वतंत्र भारत पक्ष 'आहे रे' आणि 'नाही रे' या वाह्यात कल्पनेवर विश्वास ठेवीत नाही. आमचा कार्यक्रम आहे 'पोशिंद्यां'ची लोकशाही स्थापन करण्याचा. शेतकरी पोशिंदा आहे, व्यापारी पोशिंदा आहे, वाहतूकदार पोशिंदा आहे. त्या पोशिंद्याच्या जे हिताचे असते ते देशाच्या हिताचे असते. इथे महात्मा गांधीच्या एका तत्त्वाला विरोध होतो आहे. ते म्हणायचे, "जो सगळयात दीनदुबळा असेल त्याच्या हिताचे पाहा." या महामंत्राचा प्रयोग गेली पन्नास-साठ वर्षे झाला; पण त्यातून काही निघाले नाही. कारण, जो कमजोर आहे, दुबळा आहे त्याला कितीही दिले तरी त्यातून देशाचे काही भले होत नाही. जो पोशिंदा आहे, जो निदान एका माणसाला तरी रोजगार देतो त्या माणसाच्या दृष्टीने भले काय आहे ते पाहा. म्हणजे खऱ्या अर्थाने उद्योजकांची, ज्यांच्या अंगात धडाडी आहे, हिंमत आहे, जे धोका पत्करायला तयार असतात आणि व्यापारउदीम करू शकतात, जे महिन्याला मिळणाऱ्या पगाराच्या आशेवर

राहत नाहीत अशा लोकांची लोकशाही येथे तयार व्हावी आणि सगळ्या देशाला समृद्ध करून सगळ्या जगाला दीपवून टाकणारी 'पोशिंद्यां'ची वैभवशाली लोकशाही येथे तयार व्हावी याकरिता स्वतंत्र भारत पक्ष काम करतो आहे.

शेतकऱ्यांवरील अन्याय त्यांच्या लक्षात आल्यावर शेतकरी उठले; आता व्यापारी, वाहतूकदार आणि इतर उद्योजकांवर तसाच अन्याय होतो आहे. त्यासाठी स्वतंत्र भारत पक्ष उठतो आहे आणि गेली काही वर्षे विकासाच्या नावाखाली जी भाषा चालली आहे त्या भाषेचा लोकांना कंटाळा आला आहे. 'गरिबी हटावो', 'गरिबांचे भले पाहा', 'आम आदमी' असे जे शब्द वापरून सगळे पुढारी आपापले खिसे भरताहेत त्या शब्दांमागील ढोंगीपणाचा लोकांना कंटाळा आलेला आहे. त्याच्यापेक्षा, उद्योजकांच्या हाती जर देश दिला तर भारतीय उद्योजक आज जगामध्ये काय प्रकारचा पराक्रम गाजवत आहेत हे पाहता, देशाला ऊर्जितावस्था प्राप्त व्हायला वेळ लागणार नाही. पंचवीस वर्षांपूर्वी, नेहरूप्रणीत समाजवादाचा भर असताना, जगातील मोठ्या माणसात हिंदुस्थानातील इतकी माणसे असतील असे स्वप्न कोणाला पडले असते? हिंदुस्थानातील लोकांच्या हातात कर्तबगारी आहे, त्याला फक्त वाव द्या, त्याच्या कर्तबगारीच्या आड येऊ नका एवढे सांगणारा स्वतंत्र भारत पक्ष आहे.

केवळ जकातीच्या आंदोलनापुरते मर्यादित राहू नका. तुमच्या बेड्या तोडण्याकरिता मी तुम्हाला मार्ग दाखवला आहे. एकेका महानगरपालिकेची जकात रद्द करण्याकरिता आम्ही तुमच्या सोबत येणार आहोत. स्वतंत्र भारत पक्षाची ही लढाई संपल्यानंतर व्यापारी भावांनी दुकानांत जाऊन बसायचे नाही. इतर व्यावसायिकांच्या उद्योजकांच्या स्वातंत्र्याच्या लढाईकरिताही तुम्हाला उभे राहावे लागेल. महात्मा गांधींच्या स्वातंत्र्यलढ्यात व्यापारी समाज त्यांच्यामागे उभा राहिला आहे. आज आपण स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढत आहोत. पहिली स्वातंत्र्याची लढाई फसली, आज सांगलीतून दुसऱ्या लढाईची सुरुवात झाली आणि त्यामध्ये व्यापारी, वाहतूकदार, उद्योजक, शेतकरी, मजूर सगळे एकत्र आले आहेत अशी खात्री बाळगतो.

केवळ दोन शेतकरी संघटना नव्हे तर सर्वच पोशिंद्यांचा संगम येथे घडला या बद्दल आनंद व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

*(२८ जुलै २००७ – जकात विरोधी आंदोलन, सांगली)*

*(शेतकरी संघटक ६ ऑगस्ट २००७)*

■■

# शेतकरी संघटना लोकांची गर्दी नव्हे, विचार आहे

शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीच्या बैठकीची एक परंपरा आहे की कार्यकारिणीच्या बैठकीची सुरुवात, देशातील एकूणच राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन केली जाते. बैठकीला मी हजर असेन तर साहजिकच ती जबाबदारी माझ्यावरच टाकली जाते आणि त्या आढाव्याच्या पार्श्वभूमीवर, कार्यकारिणीच्या विषयपत्रिकेवर जे विषय असतील त्यावर, निर्णय घेण्याच्या दृष्टीने, उपस्थित सर्वजण चर्चा करतात.

काल मी जेव्हा आजच्या या बैठकीसाठी मिरजला आलो तेव्हापासून मला असे जाणवले की सगळयांच्या मनात एक विषय घोळतो आहे आणि तो ठसठसता फोड एकदा फुटून जाऊ द्यावा आणि मगच आपण बोलायला उभे राहावे असे ठरवून मी काही कार्यकर्त्यांची भाषणे होऊ दिली. पाच सहा भाषणे झाल्यानंतर आता हे थांबवावे असा विचार करीत असतानाच शामराव देसाईंनी आपल्या भाषणात विषय थोडा बदलला आणि त्यामुळे मी आता सुरुवात करायला हरकत नाही असे वाटले.

मी सरकारी नोकरीत राहिलेला माणूस. सरकारी नोकरीतला एक नियम असा आहे की कोणत्याही माणसाला नोकरीतून काढून टाकायचं झालं तर तो अधिकार ज्याने त्या माणसाला नोकरीवर लावून घेतलं असेल त्यालाच असतो, दुसऱ्या कोणाला असत नाही. शेतकरी संघटनेमध्ये येताना मी कोणाला नेमलं आहे का? कोणाजवळ असं पत्र आहे का की शरद जोशींनी मला शेतकरी संघटनेचा पाईक नेमला? जर कोणाला पाईक म्हणून मी नेमला नसेल तर त्याला त्या जागेवरून काढून टाकण्याचा अधिकार मला नाही असं मी मानत आलो. आजच्या एका वक्त्याने असा एक ठराव मांडला; पण ठराव मांडताना अध्यक्षांची परवानगी घ्यायला पाहिजे हे त्यांच्या लक्षात आले नाही. एकाने ठराव मांडल्यानंतर दुसऱ्याने त्याला अनुमोदन द्यावे लागते आणि मग तो मताला

टाकायचा असतो हा सभाशास्त्राचा नियम झाला; पण भावनेच्या भरामध्ये वकीलसुद्धा वकील राहत नाही आणि असा सभाशास्त्राला विपरीत ठराव मांडून 'अमक्यांचा निषेध करून त्यांना काढून टाकावे' असे मत असणारांनी हात वर करावेत असे आवाहन करताच सारासार विचार न करताच बहुतेकांनी हात वर केले. याच्या उलट प्रस्ताव मांडून आवाहन केले असते तर त्यालाही, कदाचित, सर्वांनी हात वर केले असते! दुसऱ्या वक्त्यांनी तर सगळी सभाच हाती घेतली – अध्यक्षबिध्यक्ष काहीच जुमानले नाही आणि जे असे निषेध विषय असतील त्यांनी बैठकीतून निघून जावे असे चक्क फर्मानच सोडले!

मी शेतकऱ्यांची संघटना तयार केली. शिवाजी महाराजांनी जसे मावळामध्ये जाऊन जे राजकारणात नव्हते, आदिलशहाच्या दरबारात नव्हते, आदिलशहाच्या दरबारी जावे अशी ज्यांची बुद्धी नव्हती अशा मावळ्यांना स्वराज्यासाठी जमा केले तसेच शेतकरी संघटना बांधताना मी एकेक प्रामाणिक माणसाला शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यासाठी जमा केले. या माणसांनी संघटनेसाठी आपल्या घरादारांवर तुळशीपत्र ठेवले, तुरुंगवास स्वीकारला, घरच्या लोकांच्या शिव्या स्वीकारल्या. त्यांच्या अनंत अनंत उपकारांच्या ओझ्याखाली मी आहे. त्यांच्या हातून जर एखादी चूक झाली तरी त्याला काढून टाकण्याचा अधिकार मला आहे असे मी मानीत नाही. जोपर्यंत त्याला शेतकऱ्याच्या भल्याचं काम करायचं आहे तोपर्यंत त्यानं ते करावं. ते कोणाच्या नेतृत्वाखाली करावं हे सांगण्याचा अधिकारही मला आहे असे मी मानीत नाही. तो जाणकार आहे; पण कोणाच्या मागे जावे हे ठरवण्यात चूक झाली तर आंदोलनालाच धोका पोहोचण्याची शक्यता असते. शेतकरी संघटनेच्या १९८० च्या नाशिक जिल्ह्यातील ऊस आंदोलनाच्या काळात घडलेला एक प्रसंग मुद्दामहून सांगतो. त्यावेळी नगर जिल्ह्यात एक समांतर शेतकरी संघटना उभी राहिली. आंदोलन ऐन भरात आल्यावर, गोळीबारात पोलिसांनी दोन-चार माणसे मारल्यावर या समांतर संघटनेच्या स्वयंभू नेत्यांनी जाहीर करून टाकलं की आम्ही हे आंदोलन मागे घेतलं आहे. काही काळ सगळीकडे गोंधळ, संभ्रम तयार झाला की खरंच आंदोलन संपलं की काय? शेतकऱ्यांच्या भल्यासाठी कोणाच्याही नेतृत्वाखाली काम करा; पण, ज्यांच्या मागे तुम्ही जाता त्यांच्या निष्ठा आणि त्यांचा शेतकरी प्रश्नावरील अभ्यास तपासून घ्या. तुम्ही माझ्याच मागे या असं मी तुम्हाला कधी सांगितलं नाही.

१९८० साली आम्हाला सभांमध्ये अनेक लोक प्रश्न विचारायचे की आतापर्यंत अनेक नेते आले आणि आम्हाला फसवून गेले; आमच्या जिवावर आमदार झाले, खासदार झाले, मंत्रीही झाले. तुम्हीही आम्हाला असं फसवणार नाही

याचा काय भरवसा आहे? त्या प्रश्नाचं मी स्पष्ट उत्तर देत असे की, 'मला तुम्हाला फसवण्याचा मोह होणार नाही याची हमी मी देऊ शकत नाही; पण मी जर तुम्हाला फसवायचा प्रयत्न केला असं तुम्हाला वाटलं तर मला पायदळी घालून शेतकरी हिताचं काम तुम्ही शेतकरी संघटनेच्या मार्गाने करत राहावे एवढीच माझी तुमच्याकडून अपेक्षा आहे.'

तेव्हा कोणी काही कोणाला न रुचणारं बोललं असेल तर तो शेतकरी संघटनेच्या लोकशाही तत्त्वाचा भाग आहे. तुम्हीसुद्धा बोलताना शेतकरीहिताच्या आचेपोटी बोललात, शेतकरी संघटनेच्या खरोखरच प्रेमापोटी बोललात, शरद जोशींच्या आदरापोटी बोललात का तुमच्याही मनात आणखी काही व्यक्तिगत पूर्वग्रह होता हेही एकदा तपासून पाहा. मला फक्त सगळ्या महाराष्ट्रातील, शेतकरी म्हणून सन्मानाने जगू इच्छिणारी निखळ प्रामाणिक माणसे हवी आहेत.

कोणी कितीही म्हटले की शेतकरी संघटना संपली आहे, संपणार आहे, संपण्याचा धोका आहे तरी तशी ती संपणे किंवा कोणाला संपवता येणे शक्य नाही. कारण, शेतकरी संघटना म्हणजे केवळ लोकांची गर्दी नाही. शेतकरी संघटना हा एक विचार आहे. हा विचार इतिहासात कधीच नोंदला गेला आहे, तो आता कोणी पुसून टाकू शकत नाही. जेव्हा जेव्हा कधी शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर चर्चा होईल तेव्हा या शेतकरी आंदोलनाचा आणि या आंदोलनाने मांडलेल्या अर्थशास्त्राचा विचार त्यांना करावाच लागेल.

पंचवीस वर्षांपूर्वी 'शेतीमालाला भाव मिळू न देणे हे सरकारचे धोरण आहे', 'शेतकऱ्याचे मरण हेच सरकारचे धोरण' अशा घोषणा शेतकरी संघटनेने दिल्या तेव्हा आम्हाला शिव्या देणाऱ्या सगळ्या लोकांपैकी जवळजवळ ८० टक्के लोक – त्यात अगदी मोठमोठे नेते, आज, आमची त्यावेळची विधाने जशीच्या तशी, अगदी घोकंपट्टी केल्याप्रमाणे, करीत फिरत आहेत. हा आपला विजय आहे. ही विधाने करताना ते, 'कॉपी राईट' मानून 'हे असे शरद जोशी पंचवीस वर्षापूर्वीच म्हणाले होते' असे म्हणत नाही ही गोष्ट खरी; पण आपण काही आपल्या नावाकरिता केले नाही. शरद जोशींना मोठे करायचे हा आपला उद्देश नव्हता. 'शेतकऱ्यांना इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने आणि सुखाने जगता यावे' – शरद जोशींच्या नावाखाली असे त्या प्रतिज्ञेत आपण कधी म्हटले नाही – हा आपला उद्देश होता. यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत, इतरही कोणी करणार असतील तर त्यांनी त्यांच्या मार्गाने जावे. ओढा वहात असताना मधे एखादा मोठा दगड येतो. मग काही पाणी त्या दगडाच्या एका बाजूने जाते, काही दुसऱ्या बाजूने जाते; पण शेवटी सगळं पाणी जेथे वळण आहे आणि उतार आहे तेथेच येणार हे

लक्षात ठेवा. आजवर आपल्याला जे जे लोक सोडून गेले आहेत त्या सगळ्यांचा जीव आता घुसमटून गेला आहे असं मला राजू शेट्टींनी आजही सांगितलं. तेव्हा त्यातील जी निखळ प्रामाणिक आणि निर्मळ मनाची माणसं आहेत ती आपल्या प्रवाहात येऊन मिसळणार आहेत याची मला खात्री आहे.

१९८० साली, 'देशाची गरिबी हटविण्यासाठी शेतकऱ्यांची गरिबी हटवणे आणि शेतकऱ्यांची गरिबी हटविण्यासाठी शेतीमालाला रास्त भाव मिळवून देणे' असं सूत्र आपण मांडलं. त्यासाठी, शेतकरी संघटनेने कांद्याच्या भावाचं आंदोलन केलं, उसाचं केलं, तंबाखूचं केलं, दुधाचं केलं, कपाशीचं केलं, कर्जमुक्तीचं आंदोलन केलं आणि या सर्व आंदोलनांतून 'शेतीमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे' या मूळ संकल्पनेवरील माझी जी काही भाषणे माझ्या जवळच्या कार्यकर्त्यांनी ऐकली, काही अंशी पाठही केली आणि लोकांसमोर करू लागले. लोकांच्या त्यांनाही चांगला प्रतिसाद मिळू लागला आणि संघटनेचा प्रसार वेगाने होऊ लागला; पण त्यांच्यातील काहींना वाटू लागले की, आपणही शरद जोशींसारखी भाषणे करू शकतो, आपण काय कमी आहोत? शरद जोशींच्या झेंड्याखाली जाण्याचे आपल्याला काय कारण आहे? त्यांनी वेगळे झेंडे उभारले. कोणी म्हणाले स्वाभिमानी, कोणी म्हणाले इमानी, कोणी म्हणाले मनमानी - काय असेल ते असो. त्याच्याबद्दल चिंता करण्याचे काय कारण आहे?

१९८० साली शेतकरी संघटना ज्या प्रश्नावर उभी राहिली तो प्रश्न संपलेला नाही. आजही माझ्या मनावर मोठं ओझं आहे की सतत पंचवीस वर्षे कुटुंबाचा विचार न करता, इतर कशाचाही विचार न करता मी शेतकऱ्यांकरिता इतके कष्ट केले, त्यामध्ये माझ्या हजारो प्रामाणिक सहकाऱ्यांनी मला हात दिला त्या शेतकरी समाजामध्ये आजही आर्थिक दुरवस्थेपायी हजारो लोक आत्महत्या करीत आहेत. याची माझ्या मनाला मोठी सल आहे. दिवसरात्र ही खंत माझं मन पोखरीत आहे.

शेतकऱ्यांची संघटना ही गोष्ट सोपी नाही. मार्क्स्‌ने शेतकऱ्यांच्या समाजाला 'बटाट्याचे पोते' अशी उपमा दिली होती. सगळे बटाटे एका पोत्यात घालून ठेवले तरी ते वेगळेवेगळेच राहतात. त्यांची एकी कधी होत नाही; पोत्याला जरा कोठे भोक दिसलं की बटाटे घरंगळून पडायला लागतात आणि वेगवेगळे पडतात. या शेतकऱ्यांमध्ये एकी करण्याचं काम आपण काही प्रमाणात केलं; पण दुर्दैवाने, त्यातूनही काही घरंगळून बाहेर पडतात. वाहत्या ओढ्यातील काही पाणी दगडाच्या वेगळया बाजूने गेले तर मुख्य प्रवाहाने चिंता करण्याचे काहीच कारण नाही; दुसऱ्या बाजूने गेलेले पाणी आड-वळणाने जात असेल तर ते

जमिनीत जिरून जाऊन नामशेष होणार, योग्य वळणाने जात असेल तर अखेरी ते मुख्य प्रवाहालाच येऊन मिळणार आहे.

शेतकरी आंदोलनाच्या मुख्य प्रवाहापासून फुटून जाण्याचा प्रकार फक्त महाराष्ट्रातच होतो आहे असे नाही. अखिल भारतीय पातळीवर तो चालूच आहे. १९८९ साली दिल्लीला भरलेल्या किसान-जवान पंचायतीला एका किसान नेत्याने मोडता घातला. ती पंचायत जर बिघडली नसती तर आज शेतकऱ्याची एकही आत्महत्या घडली नसती अशी माझी खात्री आहे. पंजाबमध्येही भारती किसान युनियनमधूनही काही मंडळी बाहेर पडली आणि त्यांनी वेगळी चूल मांडली. शेतकरी आंदोलनाच्या मुख्य प्रवाहातून फुटून वेगळया वळणाने जाणाऱ्या या मंडळींची भाषणे ऐकली म्हणजे लक्षात येते की ही मंडळी तीच ती १९८० सालची भाषणे करीत असतात. १९८० सालापासून आपण जी शेतीव्यवसायाच्या आतबट्ट्याच्या अर्थशास्त्राची मांडणी केली तेवढ्यापुरताच त्यांचा अभ्यास आहे; पुढे ते काहीच शिकले नाही. एवढ्या भांडवलावरच आपण शेतकऱ्यांचं नेतृत्व धकवू शकतो असा त्यांचा समज आहे. आपण त्यांना शिव्या देण्यामध्ये किंवा त्यांना नावं ठेवण्यामध्ये फारसा वेळ दवडू नये. आंबेठाणच्या शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना मी प्रास्ताविक सत्रातच सांगत असे की, ‘‘तुमच्या बाजूने कोणी नाही, तुम्हाला पैसे देणारे कोणी नाही, तुम्हाला गाड्या देणारे कोणी नाही, निवडणुकीत तिकीट देणारे कोणी नाही; पण, तुमच्याजवळ दोन जमेच्या बाजू आहेत. तुम्ही जे बोलता ते निखळ सत्य आहे, कोणत्याही स्वार्थापोटी तुम्ही ते मांडत नाही आहात आणि दुसरी गोष्ट म्हणजे तुम्ही ज्याच्यासाठी कटिबद्ध आहात ते स्वातंत्र्य म्हणजे इतिहासाच्या प्रवाहाची दिशा आहे आणि शेवटी, स्वातंत्र्याचाच विजय होणार आहे. कितीही हिटलर येवोत, कितीही स्टॅलिन येवोत, कितीही माओ त्से तुंग येवोत, कम्युनिझम येवोत, समाजवाद येवोत, इंदिरा गांधी येवोत - शेवटी विजय स्वातंत्र्याचा आहे. इतिहास तुमच्या बाजूने आहे.’’ या विचारावर ज्यांची निष्ठा नाही आणि आता शेतकऱ्यांचा काळ आला आहे, त्यावर आपले नावच येणार नाही अशी ज्यांना भीती वाटते आहे त्यांची आपलं नाव इतिहासात नोंदवायची घाई चालू आहे. त्यांची मोठी करुणास्पद अवस्था होणार आहे.

१९८० साली शेतकरी आंदोलन का उभे राहिले? १९६५ साली देशामध्ये हरित क्रांती झाली. शेतीमालाचे उत्पादन वाढले. सगळयांना पुरेसे अन्नधान्य तयार झाले. इतरही वस्तूंचे उत्पादन वाढले; पण उत्पादन वाढले तरी शेतकऱ्यांचे पोट भरण्याची काही सोय झाली नाही. कारण, शेतीमालाला भाव द्यायचा नाही

असे सरकारचे धोरण होते. १९८० सालापर्यंत शेतकऱ्याच्या लक्षात आले की आपण अधिक पिकवले तर आणखी कमी पैसे मिळतात आणि हे दु:ख कोणाकडे घेऊन जावे तर एकही राजकीय पक्ष अशा ताकदीचा नाही की जो आपल्या बाजूने उभा राहील आणि म्हणून, लोकांनी पक्ष बघितला नाही, अराजकीय संघटना पत्करली; आपल्या जातीचे पुष्कळ लोक साखरसम्राट, दूधसम्राट होऊन बसलेले होते त्यांच्याकडे ते गेले नाहीत तर त्यांच्या समाजाने ज्या जातीला कायमचे शत्रू मानले अशा ब्राह्मण जातीतल्या माझ्यासारख्या माणसावर विश्वास ठेवून शेतकरी शेतकरी संघटनेकडे आले.

शेतकरी संघटना निर्माण झाली त्यावेळचे शेतकऱ्यांपुढे असलेले प्रश्न सुटलेले आहेत असे नाही, तरी नवीन काळात अनेक नवेनवे प्रश्न उभे राहणार आहेत. त्यामुळे, शेतकरी आंदोलन पुढे चालायचे असेल तर १९८० सालची भाषणे घोकून चालणार नाही. जे नाटक कालबाह्य झाले आहे त्याचेच प्रयोग करीत हिंडलात तर लोक तुमच्याकडे फिरकणार नाही तसेच जुनीच भाषणे करीत हिंडलात तर शेतकरी तुमच्याकडे ढुंकूनही पाहणार नाहीत.

**नवीन भाषा आणि एकोपा हवा**

शेतकरी संघटकमध्ये एखाद्या कार्यक्रमाची जाहिरात झाली नसेल तर तो संघटनेचा अधिकृत कार्यक्रम होतो की नाही याबद्दल थोडा वाद झाला आणि संघटकमधून जाहिरात न होताही तशा कार्यक्रमाला कोणी गेले तर त्यांच्यावर कडक कारवाई करावी असा एक सूर या बैठकीत निघाला. दुर्दैवाने, सगळयांच्या मनामध्ये, सध्या शेतकरी संघटनेमध्ये काही बेशिस्तपणा आला आहे का, संघटनेला उभी चीर पडते का काय अशी भीती असल्याचे जाणवते. या भीतीमुळे या बैठकीचा सुरुवातीचा पुष्कळसा भाग त्या चर्चेमध्ये गेला. त्यामुळे, त्यानंतर आर्थिक प्रश्नासंबंधी काही महत्त्वाच्या सूचना येऊनसुद्धा त्यावर ज्या प्रकारे चर्चा व्हायला हवी होती तशी चर्चाही झाली नाही आणि निष्कर्षही निघाले नाहीत. उदाहरणार्थ, शामराव देसाईंनी नोकरदारांसाठी ६ व्या वेतन आयोगाच्या भयानक परिणामांबद्दल सूचना मांडली. त्यावर चर्चाही झाली नाही आणि निष्कर्षही निघाला नाही. कारण, ६ वा वेतन आयोग हा प्रश्न प्रामुख्याने स्वतंत्र भारत पक्षाच्या विषय पत्रिकेवर येऊ शकेल. सरकार किती खर्च करते आहे, सरकारी नोकरांचे पगार तिप्पट करून देते आहे वगैरे मुद्दे ठीकच आहेत; पण नियोजन मंडळाचाच अहवाल म्हणतो की गरीब माणसापर्यंत १ रुपया पोहोचवायचा असेल तर सरकारला दिल्लीहून ६५ रुपये सोडावे लागतात. राजीव गांधींनी स्वत: सांगितले होते की गरिबांसाठी सरकारने १ रुपया सोडला तर त्यातले २

किंवा ३ पैसेच त्याच्यापर्यंत पोहोचतात. आजची परिस्थिती त्याच्यापेक्षा वाईट आहे. तेव्हा मुळातच सगळी पाईपलाइनच गळकी आहे. नोकरदार म्हणजेच सगळी पाईपलाईन नाही, त्यात आणखीही बरेच घटक आहेत. दुसरा मुद्दा म्हणजे सरकारी नोकऱ्या हव्यात असे ज्यांना वाटते, सरकारचा अर्थकारणात भाग हवा असे ज्यांना वाटते त्यांना एक प्रश्न विचारावा लागेल की, 'सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे ज्या चपराश्याचा पगार २२०० रुपये होता त्याचा पगार आता ८२०० किंवा सेक्रेटरीचा पगार १,३०,००० रुपये होणार आहे. सध्याच्या व्यवस्थेमध्ये आता MBA पास झालेल्या मुलांना खासगी नोकरीमध्ये महिन्याला दोन ते अडीच लाख रुपये पगार मिळतो आहे. जर का बुद्धिमान आणि कर्तबगार माणसे सरकारी नोकरीमध्ये यावीत असे वाटत असेल तर आजच्या पगारावर ती येतील का? बाहेर इतका पगार मिळत असताना तुमच्या कमी पगारावर कोणत्या पातळीची माणसे येतील याचा विचार केला आहे का?

तेव्हा, हा केवळ सहाव्या वेतन आयोगाचा प्रश्न नसून नोकरदारांच्या बाजारपेठेचा प्रश्न आहे.

संपूर्ण देशातील राजकीय परिस्थिती काय आहे? गेल्या काही दिवसांत अणुकराराला विरोध करण्याचं नाटक झालं, त्यामुळे निवडणुका आज होतात की उद्या अशी भीती तयार झाली आणि आता निवडणूक नको म्हणून नाटकावर पडदा पडला.

उत्तर प्रदेश जिंकल्यानंतर बहुजन समाज पार्टी आपल्या विषयपत्रिकेवर राजस्थान, हरियाणा आणि महाराष्ट्र या राज्यांना घेऊन जे काही डाव खेळते आहे त्याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

१९८० सालापासून शेतकरी संघटनेने शेतीमालाला रास्त भाव मिळावा यासाठी शासनाविरुद्ध आंदोलने केली. त्या वेळी शेतकरी संघटनेच्या विरुद्ध असलेली मंडळी आता शेतकरी संघटनेचीच भाषा बोलू लागले आहेत; पण प्रत्यक्षामध्ये कार्यवाही तशी करीत नाहीत. उलट, शेतकऱ्यांच्या आत्महत्या चालू आहेत. त्याचबरोबर, १९८० साली शेतकरी संघटनेने दिलेली विषयपत्रिका संपायच्या आधी एक त्याहूनही मोठी विषय पत्रिकातयार होते आहे.

एका पाहणीनुसार ४० टक्के शेतकरी शेतीतून बाहेर पडू इच्छित आहेत. ज्या शेतकऱ्यांना या शेतीच्या बेडीतून सुटायचे आहे त्यांचा प्रश्न कसा सोडवायचा?

सगळया जगामध्ये हवामानात बदल घडतो आहे आणि त्या बदलामुळे जगातील पिकांचा नकाशा बदलून जाणार आहे. उष्ण कटिबंधात आज जी पिके येतात ती बंद होतील आणि ती शीत कटिबंधात येऊ लागतील. गव्हासारखे पीक

फक्त कॅनडा किंवा सैबेरियासारख्या भागातच येऊ शकेल, हिंदुस्थानामध्ये ते होणार नाही. अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांसमोर उभ्या राहणाऱ्या समस्या कोणत्या? विशेष आर्थिक विभाग (SEZ) संबंधी काय धोरण असावे? जागतिक व्यापार संस्थेची बोलणी आणि वाटाघाटी फिसकटल्यानंतर यापुढे इलेक्ट्रॉनिक मार्केटिंगची व्यवस्था वापरून जागतिक बाजारपेठेत सरकारविरहित खुली व्यवस्था तयार करता येईल का?

**आवाहन**

हे सर्व प्रश्न नव्याने उभे राहत असताना ही कार्यकारिणी गेल्या २०-२५ वर्षांमध्ये शेतकरी संघटनेपासून - काही समजातून, काही गैरसमजातून - दूर झालेल्या सर्वांना आवाहन करते की आता मनामध्ये किरकोळ विवाद ठेवता सर्वांनी शेतकरी आंदोलनाच्या या मध्यप्रवाहात पुन्हा सामील व्हावे.

शेतकऱ्यांपुढे नव्याने उभ्या राहणाऱ्या वरील प्रश्नांचा अभ्यास आणि चिंतन करून ते सोडविण्याचे मार्ग जी शेतकरी संघटना दाखवेल तिच्या मागे शेतकरी येतील; ८० सालची जुनीच भाषणे पुन्हा करून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत.

**ऊस आंदोलन**

"यंदा साखरेचा साठा पुष्कळ आहे, उसाचे उत्पादन पुष्कळ आहे आणि शेतकऱ्याला गेल्या वर्षीचा झटका इतका बसला आहे की आता पुन्हा ऊस तोडू नका म्हणून सांगायला गेलो तर शेतकरी आपल्यालाच दगड मारायची शक्यता आहे." असे एक मत या बैठकीत मांडले गेले. पण दलित, आदिवासी, अल्पसंख्याक (मुसलमान) या समाजांची अशी जरब आहे की त्याच्या वाटेला कोणी जात नाही; शेतकऱ्यांबद्दलमात्र काहीही वक्तव्ये केली तरी चालतात अशी एक धारणा झाली आहे. हे चालणार नाही अशी शेतकऱ्यांची जरब बसवणे आवश्यक आहे. कदाचित, आम्ही आमच्या ताकदीने मारलेला टोला वर्मी बसणार नाही, पण यांनी टोला घालण्याचा प्रयत्नसुद्धा केला नाही असं जर झालं तर शेतकऱ्यांची शान या देशामध्ये काहीही राहणार नाही. तेव्हा 'जीव देण्यापेक्षा जीव घेण्याचा आत्मसंरक्षणात्मक प्रयत्न करणे - तो अयशस्वी का होईना - केव्हाही श्रेयस्कर.' तेव्हा उसाच्या भावाचे आंदोलन अपरिहार्य आहे. ९०० रुपयांपर्यंत भाव मिळत नसेल तर आपले आंदोलन शासनाच्या विरुद्ध आहे, ९०० च्या पुढे भाव मिळविण्याचे आंदोलन प्रत्येक कारखान्याविरुद्ध शेतकरी संघटनेने करायचे आहे. त्या त्या कारखान्यावर जे आंदोलन उभे केले जाईल त्यात महाराष्ट्रभरातून शेतकरी संघटनेचे पाईक भाग घेतील. एखादा कारखाना किमान वैधानिक किमतीइतकाही भाव उसाला देत नसेल तर ती कायदा मोडणारी कृती आहे.

त्यामुळे त्याविरुद्ध जिल्हाधिकाऱ्यांकडे खटला दाखल करून दाद मागावी लागेल.

दूध भावासंबंधी आजूबाजूच्या राज्यांतील परिस्थितीचा अभ्यास करूनच निर्णय घेण्यात येईल.

२४ ऑक्टोबर रोजी दिल्ली येथे होणाऱ्या किसान समन्वय समितीच्या बैठकीत नवीन येऊ घातलेल्या समस्यांवर विचारविनिमय करून देशपातळीवरील आंदोलन जाहीर करण्यात येईल. त्या आंदोलनात महाराष्ट्रातील शेतकरी स्त्रीपुरुष मोठ्या संख्येने भाग घेतील.

*(१९ ऑक्टोबर २००७ - विस्तारित कार्यकारिणी, मिरज.)*

*(शेतकरी संघटक ६ नोव्हेंबर २००७)*

■■

# शेतकरी आंदोलनाची आगामी दिशा

सांगली जिल्ह्यातील या जाहीर सभेला उपस्थित असलेल्या सगळ्या शेतकरी भावांचे आणि मायबहिणींचे मी पहिल्यांदा आभार मानतो. पुण्याहून निघताना काही वर्तमानपत्रांतील बातम्या वाचून माझी अशी समजूत झाली होती की शेतकरी संघटना दक्षिण महाराष्ट्रात जवळजवळ संपत आली आहे आणि तुमच्या या सभेला फारसे कोणी येतील असे वाटत नव्हते. हे सर्व खोटं ठरवत तुम्ही ही भावे सभागृह गच्च भरवत जमला आहात याबद्दल मी तुमचे हे आभार मानीत आहे.

**संन्याशाचे वैभव**

जून महिन्याच्या सुरुवातीला पिंपळगाव (बसवंत) येथे झालेल्या शेतकरी संघटनेच्या सभेमध्ये श्री. तुकाराम निरगुडे यांनी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष व्हावे अशी मी घोषणा केली. तुकाराम निरगुडे हे माझे फार जुने सहकारी. चाकणचे कांद्याचे आंदोलन झाल्यानंतर नाशिक जिल्ह्यात मला घेऊन जाणारे ते तुकाराम निरगुडे. त्यानंतरच नाशिक जिल्ह्यातील ऊस आंदोलनाचे महाभारत घडले. राज्याच्या बाकीच्या जिल्ह्यांमध्ये त्यांच्याबद्दल फारशी माहिती नाही. 'कोण तुकाराम निरगुडे? ते कसे काय एकदम अध्यक्ष झाले?' असादेखील प्रश्न काही लोकांच्या मनात आला. आज सकाळी माझ्या असे लक्षात आले की आंदोलनामध्ये अनेकवेळा अपघात होतात, चमत्कार होतात तसा माझ्या हातून एक चमत्कार होऊन गेला आहे, की शेतकरी संघटनेचे अध्यक्षपद सांभाळण्यासाठी तुकाराम निरगुडे हातात लागले आहेत.

काल संध्याकाळी तुकारामजी माझ्याजवळ बसले आणि म्हणाले की, ''मी नुकताच विदर्भाचा व मराठवाड्याचा दौरा केला आणि आता इथे दक्षिणेतही आलो आहे. माझी स्वत:ची अडचण अशी की माझ्याकडे स्वत:ची गाडी नाही. कोणाचीही गाडी घेतली तरी त्यामध्ये पेट्रोल डिझेल घालायला पाहिजे. एखाद्या

गावी गेलो तर काही नाही तरी राहण्याचा, जेवणखाण्याचा–भाजीभाकरीचा तरी खर्च होतो. ही तक्रार मी अध्यक्ष म्हणून कोणापुढे सांगू? सर्व जिल्ह्यांतील सगळयाच कार्यकर्त्यांची हीच तक्रार आहे की पंचवीस तीस वर्षे संघटनेच्या चळवळीत आम्ही काम केले, घरातले पैसे घेऊन बाहेर आंदोलने केली. घरामध्ये कच्च्याबच्च्यांना खायला आहे किंवा नाही याचीसुद्धा चिंता केली नाही; पण आता आम्ही खरेच थकलो आहोत. यापुढे जर का तुम्ही आंदोलनाचा आदेश दिला तर त्याकरिता लागणारी शिदोरीसुद्धा कोठून जमवावी असा आमच्यापुढे प्रश्न आहे.'' अत्यंत प्रामाणिकपणे तुकारामजींनी हा प्रश्न माझ्यापुढे ठेवला. रात्रभर मला झोप आली नाही. शेतकरी संघटनेचा खर्च चालवावा कसा, आंदोलन चालवावे कसे, जे शेतकरी आंदोलनात येतात, तुरुंगात जातात त्यांच्याकरिता वकिलांची फी कोठून भरावी, त्यांना जामीन देऊन सोडवायचे झाले तर जामीनदार कोठून आणावे, संघटनेचा निदान पत्रव्यवहार चालवण्याकरिता लागणारा खर्च कसा भागवावा ही चिंता मला गेली पंचवीस वर्षे खाते आहे. मी तुकारामजींना त्यावेळी म्हटलं की महाराष्ट्राची ही परंपरा आहे. पुण्यातील पेशवाईचे घोडे अटकेपार गेले. पण पेशव्यांचा पराभव झाला तो पुण्यातील सावकारांनी केला, पेशव्यांना कर्जे फेडता आली नाहीत म्हणून पेशवाई बुडाली. शेतकरी संघटनेचेही असेच होते की काय याची मला चिंता पडली आहे.

आणि आज पहाटे पहाटे माझ्या मनामध्ये साक्षात्कार घडल्यासारखा एक उत्स्फूर्त विचार आला. तुकारामजींनी विदर्भ मराठवाड्याच्या दौऱ्यासाठी नवीन पद्धत काढली. कोणे एकेकाळी शेतकरी संघटनेला एक प्रकारचा आजार झाला. त्याला शेतकरी कार्यकर्ते 'रेस्ट हाऊस' आजार म्हणायचे – नेते कोठेही गेले म्हणजे त्यांनी सर्किट हाऊस किंवा रेस्ट हाऊसमध्येच उतरायचे. मग जेवणाची सोयसुद्धा त्याला साजेशी झाली पाहिजे. त्यामुळे शेतकरी संघटनेमध्ये एका वेगळया संस्कृतीची वाढ होत होती. सुरुवातीला 'माणूस' साप्ताहिकाचे संपादक श्री. ग. माजगावकर यांनी शेतकरी संघटनेच्या वैभवाला 'संन्याशाचे वैभव' म्हटले होते. 'रेस्ट हाऊस' आजारामुळे 'संन्याशाच्या वैभवा'चे बिरुद जाते की काय असे वाटायला लागले होते. तुकारामजींनी यातून सुटण्याचा एक वेगळा मार्ग आपल्याला दाखवला. त्यांनी तो शब्दात सांगितला नाही हा त्यांचा विनय आहे. त्यांनी बसने किंवा आगगाडीने प्रवास करून आपला दौरा चालू ठेवला आहे. आजचा योग तसा चांगला आहे. आज संघटनेच्या सुरुवातीच्या वैभवाची आठवण झाली. कारण मी एकदा निपाणीहून अंबाजोगाईला जात असताना जयसिंगपूर येथे आलो. तिथून अंबाजोगाईच्या प्रवासासाठी माझ्या खर्चाची ज्यांनी

व्यवस्था केली होती, त्यांनी आपले नावही त्यावेळी सांगितले नव्हते, ते आज इथे मंचावर बसलेले आहेत. शेतकरी संघटनेच्या संन्याशाच्या वैभवाची आजही चर्चा होत असताना ते इथे उपस्थित असणे हा योगायोगच आहे.

तुकारामजींनी आपला दौरा करताना एक नवीन पद्धत काढली. बाहेर जेवणे नाही; शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमाला जे कार्यकर्ते येतील त्यांनी आपापल्या घरची शिदोरी बांधून आणायची आणि ती बांधून आणताना अध्यक्ष आणि त्यांच्या सोबतचे एक-दोन कार्यकर्ते यांच्याकरिता अर्धा चतकोर भाकरी जास्त आणली तर त्यात त्यांचंसुद्धा पोट निघतं. मी शेतकरी संघटनेला हा नवा प्रकार दाखविल्याबद्दल तुकारामजींना वंदन करतो आणि जरी आम्ही राज्यपालांच्या मिरजेमधील राजभवनात उतरलो असलो तरी आम्हीही बाहेर जेवायला जाणे बंद केले आहे आणि तानाजीरावांच्या घरून आलेल्या डब्यातीलच जेवण करून आलो आहोत.

आणि शेतकरी संघटनेला जर आंदोलनात पुढे न्यायचे आहे तर घर सावकाराने वेढले आहे अशा अवस्थेतील शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करता करता शेतकरी संघटनाच कर्जात बुडणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

त्यामुळे, आज मी अध्यक्षांच्या प्रेरणेने निर्णय घेतला आहे की यापुढे मी जेव्हा जेव्हा कार्यकर्त्यांकडे सभेकरिता किंवा बैठकीकरिता जाणार आहे तेव्हा मी एक फडके समोर पसरणार आहे. कार्यक्रम संपल्यानंतर कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या सर्वांनी मागे वळून बाहेर न जाता माझ्यासमोर येऊन त्या फडक्यावर यथाशक्ती - अगदी कितीही कमी असली तरी - रक्कम टाकून जावे. औरंगाबाद येथे झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत आपण निर्णय घेतलाच आहे की यापुढे शेतकरी संघटनेच्या कोणत्याही कार्यक्रमांत हारतुरे, शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्याचे कार्यक्रम करायचे नाही. ज्या कोणाला अशा प्रकारे खर्च करण्याची इच्छा असेल त्यांनी ती रक्कम मी जे फडके समोर पसरलेले असेल त्यावर टाकावी. ही सर्व रक्कम लगेच मोजून ती त्या त्या जिल्ह्याच्या अध्यक्षांच्या हाती जिल्ह्याच्या खर्चासाठी सोपवली जाईल. हेच माझं 'संन्याश्याचं वैभव' आहे आणि त्यातूनच शेतकरी संघटना भरभराटीस येणार आहे.

**कर्जमुक्ती विरुद्ध कर्जमाफी**

ज्या कोणाला शेतकरी संघटनेपासून फुटताना त्यांनी शरद जोशींना नावं ठेवावी, शरद जोशींनी आमचे पंख छाटले म्हणावे, शरद जोशींनी आम्हाला मोठं होऊ दिलं नाही म्हणावं असं नेहमीच घडतं. असं कोणी म्हणू लागलं की वेगवेगळया पक्षांचे ठराविक जातीचे लोक पुढे येतात आणि असं म्हणणाऱ्यांच्या

चरितार्थाचीच नव्हे तर राजकीय चरितार्थाचीही थोडीफार व्यवस्था करतात. या मोहावर उत्तर म्हणजे यापुढे शेतकरी संघटना ही 'संन्याशाच्या वैभवा'वरच चालणार आहे. असा संन्यास पत्करल्यानंतर आता मला एका तऱ्हेने खूप मोकळं मोकळं झाल्यासारखं वाटतं आहे. त्यामुळे, गेल्या वर्षभरात नेमकं काय काय घडलं ते मी सविस्तरपणे मांडू इच्छितो. कारण, गेल्या वर्षभरात इतक्या काही विपरीत गोष्टी घडल्या आहेत की ज्यांनी माझ्या विचारांचं अभ्यासपूर्वक श्रवण केलं आणि समजून उमजून पालन केलं आहे त्यांच्याही मनात गोंधळ निर्माण होऊ लागला आहे.

ज्या शरद पवारांनी, उसाला ३०० रुपये भाव मिळाला पाहिजे असे शेतकरी संघटनेने तीस वर्षांपूर्वी म्हटले तेव्हा 'उसाला ३०० रुपयांचा भाव दिला तर सगळे साखर कारखाने मोडीत काढावे लागतील' असे जाहीर केलं होतं तेच शरद पवार आज, 'जर का शेतीमालाला रास्त भाव मिळाला तर शेतकऱ्याच्या डोक्यावर कर्ज साठणारच नाही' असं शरद जोशींचंच वाक्य तीस वर्षांनंतर म्हणू लागले तर साहजिकच शेतकऱ्यांच्या मनात शंका निर्माण होते की कोण काय बोलतंय? रावणाच्या तोंडी रामाची स्तुती ऐकून मनुष्य गोंधळून जावा तशी काहीशी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा गोंधळ निर्माण करणाऱ्या, काही मुद्द्यांची सविस्तर मांडणी मी इथे करणार आहे.

३१ डिसेंबर २००७ रोजी सगळया शेतकऱ्यांना मी रामेश्वरला यायला सांगितलं आणि रामेश्वरच्या समुद्रात शेतकऱ्यांच्या कर्जासंबंधी कागदपत्रे बुडवण्याचा 'समुद्रस्तृप्यन्तु' कार्यक्रम झाला. तेथून निघताना आपण संपूर्ण हिंदुस्थानातील शेतकऱ्यांना आदेश दिला की, ''तुम्ही फक्त तुमच्या जवळचे कागदपत्र समुद्रात बुडवले आहेत, पण तुमच्या गावातील सोसायट्यांमध्ये तुमच्या कर्जासंबंधीचे कागदपत्र शाबूत आहेत तोपर्यंत कर्जातून मुक्ती मिळणे शक्य नाही आणि त्या सावकाराचा तुमच्या मागचा ससेमिरा चुकत नाही. ते कर्ज जर संपवायचे असेल तर येथून घरोघर जा आणि ज्या ज्या ठिकाणी तुमचे कर्जाचे कागद आहेत तेथे धडक मारा. प्रामुख्याने ते गावातल्या सोसायटीतच असतील, काही दीर्घ मुदतीच्या भूविकासाकरिता घेतलेल्या कर्जांचे कागद एखाद्या जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणी असतील, पण तुमच्या कर्जाच्या कागदाचं प्रमुख स्थान ही तुमच्या गावची सोसायटी आहे. त्या सोसायटीच्या रक्षणाकरिता दिवसरात्र पोलिसांचा बंदोबस्त आहे अशीही परिस्थिती नाही. गावातल्या या सोसायटीतील तुमची कागदपत्रे जाळून नष्ट करण्याचा आदेश मी तुम्हाला देतो आहे. याकरिता जी काही शिक्षा व्हायची असेल ती तुमच्याबरोबर भोगायला मी तयार आहे -

आरोपी नंबर एक म्हणून.'' हा आंदोलनाचा कार्यक्रम आपण रामेश्वरच्या कार्यक्रमानंतर परतताना घेतला. आता शेतकऱ्यांत काय क्रांती होते आहे असा प्रश्न उभा राहिला आणि इथेच शेतकऱ्यांमधील फाटाफुटीला आणि थोड्याशा गोंधळाला सुरुवात झाली.

शेतकरी संघटना आता शेवटची लढाई करून कर्जमुक्ती मिळवणार म्हटल्यावर एका पक्षाचे लोक कर्जमाफीची मागणी घेऊन पुढे आले. त्यांनी पूर्वी एका निवडणुकीत 'आम्ही सर्व शेतकऱ्यांचं कर्ज माफ करू' असं सांगितलं होतं, पण निवडून आल्यावर कर्ज माफ करण्याऐवजी फक्त झुणकाभाकर केंद्रे काढली. त्या पक्षाने आता पुन्हा 'आम्ही संपूर्ण कर्जमाफी मिळून देणार' अशी घोषणा करून महाराष्ट्रभर दौरे काढले. त्या पक्षावर टीका करण्याचा माझा उद्देश नाही. आपल्या कर्जमुक्तीच्या लढ्यात आपल्या सैन्याबरोबर त्यांचेही लोक आले आणि त्यांनी आपल्याला हातभार लावला त्यांचे आपण आभार मानू. पण 'शेतकऱ्यांची कर्जमुक्ती' हा विषय काही 'शिवाजी महाराज की जय' किंवा 'भवानी मातेचा जय' अशा गर्जना देण्याइतका सोपा नाही. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हा फार जुना आजार आहे. शेतकरी कर्जात का बुडतो आणि शेतकऱ्याला कर्ज परत करता का येत नाही. यासंबंधी अभ्यास असल्याखेरीज बोलणे चुकीचे आहे. नाहीतर, 'कर्जमुक्ती' म्हणजे काय, 'कर्जमाफी' म्हणजे काय यांच्यातील फरक कार्यकर्त्यांना कळेनासा होतो आणि मग गोंधळ होतो. आम्ही माफी मागायला जात नाही. माफी कोण मागतं? ज्याने काही गुन्हा केला असेल तो माफी मागतो. शेतकरी संघटनेने 'मुक्ती' मागितली.

शेतकऱ्यांची कर्जमुक्ती मागताना शेतकरी संघटनेने काही सिद्धांत मांडले.

पहिला मुद्दा म्हणजे शेतकऱ्यांवरील सर्व **कर्जे बेकायदेशीर** आहेत. कायद्याने शेतकरी कोणाचेही कर्जदार नाहीत. शेतकऱ्यांना सरकारने कर्ज दिले. शेतकऱ्यांनी ते कर्ज घेऊन पीक काढले; पण ते पीक बाजारात नेल्यानंतर त्या पिकाला भाव मिळू नये अशी धोरणे सरकारनेच आखली. म्हणजे ज्या सरकारने शेतकऱ्यांना कर्ज दिले त्याच सरकारने शेतकऱ्यांना त्यांनी त्या कर्जाच्या मदतीने काढलेल्या पिकांच्या किमतीतून ते कर्ज फेडता येऊ नये अशी धोरणे आखली. हिंदुस्थानातील इंडियन कॉन्ट्रक्टस् ॲक्टमध्ये अशी तरतूद आहे, की करारातील एका पक्षाने करारातील दुसऱ्या पक्षाला कराराचे पालन करता येऊ नये अशी धोरणे जर आखली तर तो करार बेकायदेशीर होतो, रद्दबातल होतो. सर्व शेतकऱ्यांची सगळ्या कर्जांची जी काही कागदपत्रे आहेत ती बेकायदेशीर आणि रद्दबातल आहेत.

दुसरा मुद्दा म्हणजे सगळ्या शेतकऱ्यांची सगळी कर्जे अनैतिक आहेत. ज्या कोणा शेतकऱ्यांना वाटत असेल की आपण कर्ज घेतले; पण ते परत फेडले नाही म्हणजे आपण पाप केले आहे, त्यामुळे आपल्याला नरकात पडावे लागेल त्यांना मी पूर्वीच सांगितले आहे की हे पाप नाही. यापुढे जाऊन मी सांगितले आहे की या परिस्थितीतही जे शेतकरी कर्जाची परतफेड करतात तेच पाप करीत आहेत. शेतकऱ्यांनी शेत पिकवलं, सरकारने शेतीमालाला भाव मिळू दिला नाही.

एका बाजूला राधाकृष्णन समितीच्या अहवालाप्रमाणे १ लक्ष १३ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांनी सरकारला द्यायचे आहेत आणि कृषि कार्यबलाच्या अहवालानुसार सरकारच्या धोरणांमुळे १९८१ ते २००० या वीस वर्षांत काळात शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीपोटी सरकारने शेतकऱ्यांना ३ लक्ष कोटी रुपये द्यायचे आहेत. गणित मांडले तर शेतकरी सरकारचे देणे लागतात का सरकारच शेतकऱ्यांचे देणे लागते? तेव्हा शेतकऱ्यांनी आपण कर्ज फेडत नाही म्हणजे पाप करतो असे समजण्याचे काहीच कारण नाही. सरकारच शेतकऱ्याचे देणे लागत असल्याने शेतकऱ्यांच्या डोक्यावर दाखवली जाणारी कर्जे ही अनैतिकच आहेत.

तिसरी गोष्ट १९८८ साली शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची लढाई सुरू करताना मी शेतकऱ्यांना घोषणा दिली की ''**मी कर्जबाजारी शेतकरी आहे, याचा मला अभिमान आहे.**'' 'गर्व से कहो, हम कर्जे में हैं।' कारण ज्या शेतकऱ्यांनी कर्जाची फेड केली त्यांचे हिशोब बारकाईने तपासून पाहिले तर लक्षात येईल की केवळ शेतीवर पोट भरणारा शेतकरी कर्ज फेडू शकत नाही. त्याच्या घरात जर एखादा भाऊ शाळामास्तर असेल, चपराशी असेल, एखाद्या बँकेचा संचालक असेल किंवा साखर कारखान्याचा संचालक असेल तर तो कर्ज फेडू शकतो; केवळ शेतीच्या उत्पादनातून कर्ज फेडणे शक्य नाही.

अलीकडे काही लोकांनी मोठा कांगावा चालवला आहे की आम्ही प्रामाणिकपणे बँकेची, सोसायटीची कर्जे भरली आणि त्यामुळे आम्हाला कर्जमाफीचा काहीच फायदा मिळाला नाही; तेव्हा आमच्याकरिताही सरकारने काहीतरी योजना काढली पाहिजे आणि शरद पवारांनी त्याला लगेच पाठिंबा दिला, लबाडांना त्यांचा पाठिंबा लगेच मिळतो. या लोकांना रोखठोक विचारले पाहिजे की, 'तुम्ही कर्ज फेडले ते शेतीच्या उत्पन्नातून फेडले का?' तुम्ही शेतीकरिता घेतलेले कर्ज शेतीच्या उत्पन्नातून फेडले असले तर कर्ज फेडणे म्हणायचे नाही तर तुमच्या भावाकडून घेतलेले नवे कर्ज आहे असे समजायला हवे. म्हणजे तुम्ही काही 'बेबाक' होत नाही.

आणि या आधारानेच शेतकरी संघटनेने काय मागणी केली ते समजून घेतले

पाहिजे. एका शेतकऱ्याची कर्जमुक्ती करा अशी मागणी आम्ही केली नाही, छोट्या शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करा अशीही मागणी आम्ही केली नाही; आम्ही सर्व शेतकऱ्यांना सर्व कर्जांतून मुक्तीची मागणी केली. कारण, शेती हा तोट्याचा व्यवसाय आहे हे निश्चित झाल्यानंतर तुमची जमीन पन्नास एकर असो की पाच एकर असो तोटा त्या त्या प्रमाणात होणार आणि परिणामी तो शेतकरी कर्जातच राहणार.

**कर्जमाफीचे थोतांड**

सरकारने २९ फेब्रुवारी २००८ रोजी एक 'कर्जमाफी व सूट सवलत' योजना जाहीर केली. त्याची घोषणा करताना त्यांनी अनेक युक्त्या केल्या. आपण आपले 'मायबाप' सरकार म्हणतो त्या सरकारने ज्याप्रमाणे शेतीमालाला भाव मिळू नये म्हणून सरकारने अधिक पैसे मोजून पाकिस्तानाकडून गहू आणला, अमेरिकेकडून गहू आणला त्याचप्रमाणे शेतकऱ्याशेतकऱ्यांत फूट पाडावी म्हणून 'कर्जमाफी व सूट सवलत' योजना जाहीर करताना वेगवेगळ्या युक्त्या लढवल्या.

सगळ्या शेतकऱ्यांची कर्जे माफ नाहीत; ज्यांची जमीन ५ एकरापेक्षा कमी आहे त्यांची कर्जे माफ होणार. सगळे शेतकरी जे शेतावर किंवा गावात राहतात त्या सगळ्यांना माहीत आहे की आजोबांनी त्यांची जमीन त्यांच्या मुलांत सारखी वाटली, नंतर आपल्या वडिलांनी सर्व मुलांत जमीन सारखी वाटली असे होता होता आधीची पन्नासशंभर एकरांवरची जमीनसुद्धा नातवंडां-पतवंडापर्यंत येईतो दोन-पाच एकरांची होऊन जाते. तेव्हा जमिनीचा तुकडा लहान आहे म्हणून तो जास्त गरीब आहे असा होत नाही. एखाद्याची जमीनधारणा लहान आहे याचा अर्थ एवढाच होतो की त्याच्या बापाने, आजोबाने, पणजोबाने जमिनीची वाटणी केली आहे आणि जर का एखाद्याच्या घरी अशी जमिनीची वाटणी झाली नसली तर अजूनही त्याच्या घरी पन्नास शंभर एकर जमीन आहे; सगळी भावंडे एकत्रितपणे गुण्यागोविंदाने नांदत शेती करत आहेत. म्हणजे, जर का भावाभावांत भांडण झाले नसेल आणि म्हणून वाटणी झाली नसेल, तर त्यांना कर्जमाफी नाही आणि भावाभावांमध्ये भांडण होऊन वाटणी झाली असेल तर मात्र त्यांची कर्जे माफ होणार. तेव्हा शेतकऱ्याशेतकऱ्यांतच नव्हे तर शेतकऱ्यांच्या घरात भांडणे लावण्याची ही कर्जमाफी योजनेची युक्ती.

व्यापारी बँकांकडून घेतलेल्या कर्जाची माफी होऊ शकते, सहकारी बँकांकडून घेतलेल्या कर्जाची माफी होऊ शकते, पण खासगी सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची माफी होणार नाही. शेतकरी आधी सोसायटीतून कर्ज घेतो किंवा व्यापारी बँकेकडून कर्ज घेतो आणि ते फेडायची वेळ आली म्हणजे मालाच्या किमतीतून

फेडता येत नाही असे दिसले की तो कोठे जाणार? तो गावातल्या सावकाराकडे जातो, त्याच्याकडून पैसे घेऊन सोसायटीच्या किंवा बँकेच्या कर्जाची परतफेड करतो. बँकेचे कर्ज फिटले पण सावकाराचे माथ्यावर आले. पुढे, सावकाराचे कर्ज फेडायची वेळ आली म्हणजे पुन्हा तो सोसायटीत किंवा बँकेत जाऊन काहीही नड सांगून कर्ज उचलतो आणि सावकाराचे कर्ज फेडतो. सावकाराचे फिटले तर बँकेचे माथ्यावर आले. तेव्हा, २८ फेब्रुवारी २००८ रोजी सरकारने कर्जमाफी योजना काढली तेव्हा ग्यानबाचे कर्ज बँकेचे आहे की सावकाराचे हे केवळ योगायोगावर अवलंबून आहे. त्या आधी त्याने सावकाराकडून कर्ज घेऊन बँकेचे कर्ज फेडलेले असेल तर त्याला माफी मिळणार नाही आणि बँकेकडून कर्ज घेऊन सावकाराचे कर्ज फेडले असेल तर मात्र माफी मिळणार. सगळी शेती तोट्याची आहे, सरकारने सगळी शेती धोरणाने तोट्यात ठेवली; शेतकऱ्याचा माल एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जाऊ दिला नाही, कांद्याची निर्यात होऊ दिली नाही, गव्हाची भरमसाट भावाने आयात केली. अशा कारवाया करून शेतकऱ्याला तोट्यात ठेवले आणि त्याच शेतकऱ्याला कर्ज फेडता येत नाही हे मान्य केल्यानंतर सगळ्या शेतीला न्याय देण्याऐवजी अमक्याना देईन, तमक्याला नाही असे का? परिणामी, शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी आंदोलन करून तुरुंगात गेलेल्या शेतकऱ्यांपेक्षा काँग्रेसच्या पुढाऱ्यांचीच नावे कर्जमाफीच्या यादीत मोठ्या प्रमाणात सापडतील.

मागच्या कर्जमाफीच्या वेळी कर्जमाफी मिळणाऱ्या शेतकऱ्यांची यादी जाहीर केली नव्हती, यावेळी ती यादी जाहीर केल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन केले; पण आताच मी, शेतकऱ्यांच्या हाती जे कर्जमाफीचे प्रमाणपत्र(?) देतात ते पाहिले. शेतकऱ्यांच्या आजच्या दुर्दशेचे प्रमुख गुन्हेगार पंतप्रधान मनमोहनसिंग आहेत कारण १९९१ साली त्यांनी ज्या खुल्या व्यवस्थेची घोषणा केली ती खुली व्यवस्था त्यांनी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू दिली नाही. आजही स्वतः पंतप्रधान झाले असतानासुद्धा शेतकऱ्यांना बाजारपेठेचे स्वातंत्र्य मिळावे अशी व्यवस्था ते होऊ देत नाहीत. या प्रमाणपत्रासोबत त्या पंतप्रधानांच्या सहीचे 'माझ्या शेतकरी मित्रा' अशा मोडक्यातोडक्या मराठीतील एक पत्र आहे. त्यात त्यांनी जे लिहिले आहे ते धादांत खोटे आहे. ते लिहितात, 'सरकारने सतत शेतकऱ्यांचे फायद्याची धोरणे राबवली आहेत आणि आता आम्ही ७१ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांच्या कर्जमाफीकरिता उपलब्ध करून दिले आहेत.' ७१ हजार कोटी हा आकडा खरा असेल पण त्याबरोबरच त्यांनी, कृषिकार्यबलाच्या अहवालाप्रमाणे सरकार शेतकऱ्यांचे तीन लाख कोटी रुपये देणे आहे हेही लिहायला पाहिजे होते.

पंतप्रधानांचे हे पत्र म्हणजे सगळ्या शेतकऱ्यांचा अपमान आहे. मनमोहनसिंग हे माझे फार जुने मित्र आहेत आणि आजही ते माझ्याशी अत्यंत प्रेमाने बोलतात असे असले तरी शेतकरी माझा जवळचा का मनमोहनसिंग जवळचे असा प्रश्न जर माझ्यापुढे पडला तर त्यांनी शेतकऱ्यांच्या केलेल्या या अपमानाचा निषेध म्हणून मनमोहनसिंगांच्या प्रतिमेचे दहन करायला मी मागेपुढे पाहणार नाही. तेव्हा, यापुढे आंदोलनाची आखणी करताना त्यात मनमोहनसिंगांच्या या अपमानकारक पत्राची होळी करण्याचा कार्यक्रम अवश्य असावा.

**श्रेयासाठी धावपळ**

सरकारने कर्जमाफी जाहीर केली असली तरी शेतकरी अजून रडतोच आहे की मी कर्जमुक्त झालो नाही, मी अजून कर्जबाजारीच आहे आणि इकडे कर्जमाफीचे श्रेय लाटण्यासाठी बाजारबुणग्यांची गर्दी दाटली आहे. कोणी 'आमच्या साहेबांनीच शेतकऱ्यांना कर्जमुक्त केलं' असे डांगोरे पिटू लागले. परवा परवापर्यंत हे शेतीमालाला भाव मिळू नये म्हणत होते, गेल्या दोनतीन वर्षांत उसाच्या आंदोलनामध्ये शेतकऱ्यांना उसाला किमान वैधानिक किंमत देणे शक्य नाही असे हेच म्हणत होते, किमान वैधानिक किंमत मागणाऱ्या शेतकऱ्यांवर यांनी सरकारी पोलिसांबरोबर गुंडही सोडले ते आता कर्जमुक्तीचे लेखक आणि जनक झाले काय? ज्या कोणत्या मार्गाने राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवार यांचा निषेध नोंदवता येईल असा कार्यक्रम आपल्या आंदोलनाच्या पुढील कार्यक्रमात अवश्य ठेवावा. हा तोतया, शेतकऱ्यांचे ज्याने जास्तीत जास्त नुकसान केलेला आणि ज्याने शेतकरी संघटनेच्या गेल्या पंचवीस वर्षांच्या कर्जमुक्तीच्या आंदोलनात प्रत्येक वेळी अडथळे आणले तोच जर तुटपुंज्या कर्जमाफीला कर्जमुक्ती म्हणत त्याचे श्रेय लाटू पाहतो तर शेतकऱ्यांनी त्याला घडा शिकवलाच पाहिजे. शेतकऱ्यांना खरेच कर्जमुक्ती हवी असेल तर राष्ट्रवादीच्या नेत्यांना जवळ उभे करून चालणार नाही. जोपर्यंत शेतकऱ्यांचे खरे मित्र कोण आणि ढोंगी मित्र कोण हे त्यांना समजत नाही तोपर्यंत त्यांची कर्जमुक्ती होणार नाही.

**सांगलीची जुनी आठवण**

एके काळी वसंतदादा पाटील यांनी 'मी आता एक शेतकरी संघटना काढणार आहे' असे म्हटले. त्यामुळे सगळ्या शेतकऱ्यांमध्ये मोठी खळबळ माजली. वसंतदादांचा कारखाना केवढा मोठा, त्यांच्याकडे गाड्या किती, पैसे किती! साखर कारखान्याच्या उसाच्या बिलातून शेतकरी संघटनेला प्रतिटन २५ पैसे द्यावेत असा सभासद शेतकऱ्यांनी ठराव केला होता. आपली एक शेतकरी संघटना काढून त्यांनी ते पैसेसुद्धा खऱ्या शेतकरी संघटनेपर्यंत पोहोचू दिले

नाहीत. त्यांच्यासारख्या सर्व साधनसामग्री हाताशी असलेला मनुष्य जर शेतकरी संघटनेचा नेता झाला तर केवढी जबरदस्त संघटना व्हायला हवी होती. त्यावेळी त्या संघटनेबद्दल पत्रकारांनी माझी प्रतिक्रिया विचारली. मी म्हटले, "पावसाळ्यात अनेक पाकोळ्या जन्माला येतात. एका पावसाळ्यात त्यातल्या त्यात जरा मोठ्या आकाराच्या पाकोळ्याला वाटले की आपल्यापेक्षा मोठे काहीच असू शकत नाही. मग, तो गरुडाकडे गेला आणि म्हणाला, 'मी बघ केवढा मोठा आहे. मला तुझ्या मुलीशी लग्न करायचे आहे.' गरुडाने त्याला सांगितले, 'पावसाळा संपेपर्यंत थांब. त्यानंतर मुहूर्त येतील त्यातल्या एका मुहूर्तावर तुझे लग्न लावून देऊ.' पावसाळा संपला आणि पाकोळ्याची जीवनयात्रा संपली. वसंतदादांची संघटना चार महिने चालली तरी खूप होईल."

संघटना चालवणे म्हणजे पक्ष चालवणे नाही की जेथे पैशांच्या थैल्याच्या थैल्या समोर येऊन पडतात. शेतकरी संघटना चालवणे हे भणंग वैराग्याचे व्रत आहे, सर्वस्वाचा त्याग करून चालवण्याचे व्रत आहे; शेतकऱ्याला परमेश्वर मानून त्याच्यासाठी कष्ट करायचे व्रत आहे. चार महिनेसुद्धा हे व्रत चालवणे ऐऱ्यागैऱ्याचे काम नाही हे मी गेली पंचवीस वर्षे शेतकरी संघटनेचे जू खांद्यावर सांभाळण्याच्या अनुभवातून सांगतो आहे. वसंतदादांची शेतकरी संघटना चार महिनेसुद्धा टिकली नाही.

**खरे शत्रू ओळखा**

आजकाल तर फारच लहानशा पाकोळ्या आपण बेडकाच्या आकाराचे असलो तरी बैलापेक्षा मोठे असल्याचा आव आणीत आहेत. या लोकांविषयी फारशी चिंता करू नका. त्यांनी शरद जोशींना शिव्या घातल्या तर त्याने काही डाग पडत नाही, तुम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष करा. जोपर्यंत ते शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमामध्ये अडथळा आणीत नाहीत तोपर्यंत त्यांच्याविषयी चिंता करण्याचे कारण नाही. ते त्यांच्या त्यांच्या बुद्धीप्रमाणे, १९८० सालची माझी भाषणे ऐकून ते जे शिकले त्या शिदोरीवर कोणी दूध आंदोलन करीत असले, कोणी आणखी काही पिकाचे आंदोलन करीत असले तर करू द्या.

आपले शत्रू हे आपल्यातून किरकोळ फुटलेले लोक नाहीत हे लक्षात घ्या. आपले शत्रू सरकार आहे, आपले शत्रू नंबर एक काँग्रेस आहे हे लक्षात ठेवून काँग्रेसचीच काही मंडळी शेतकऱ्यांचे लक्ष इकडे तिकडे जावे याकरिता अशी काही मंडळी फोडून उभी करीत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांच्याकडे दुर्लक्ष करा आणि पक्ष्याचा डोळा वेधायचा म्हटल्यानंतर फक्त पक्ष्याचा डोळाच दिसणाऱ्या अर्जुनाच्या एकतानतेने कर्जमुक्तीवरच लक्ष ठेवा आणि तरच कर्जमुक्ती

होईल.

**खासगी सावकार**

सरकारने कर्जमाफीची घोषणा केली – फाटकी तुटकी, फक्त छोट्या शेतकऱ्यांनाच; त्यातही व्यापारी बँकांच्या कर्जदारांनाच, खासगी सावकरांच्या कर्जदारांना नाही. – काय असेल ते असो. खासगी सावकारांसंबंधी वादाचे जनक हे सांगली जिल्ह्यातीलच. आर. आर. पाटील विदर्भातला खासगी सावकार कोण असतो? जो किराणा मालाचे दुकान चालवतो, जो कापडाचे दुकान चालवतो आणि शेतकऱ्याकडे वर्षातून एकदाच पैसा येतो हे लक्षात घेऊन शेतकऱ्याला किराणा माल आणि कापडचोपड उधारीवर देतो तो व्यापारी म्हणजे सावकार अशी विदर्भात खासगी सावकाराची व्याख्या आहे. आर. आर. पाटील यांनी घोषणा केली की खासगी सावकाराचे पैसे बुडवा. त्याचा परिणाम असा झाला की विदर्भातील साऱ्या व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना माल उधार देणे बंद केले. आर. आर. पाटलांच्या या घोषणेनंतर विदर्भात ज्या काही आत्महत्या झाल्या त्या आत्महत्येचे पाप त्यांच्या माथी बसेल. त्यांना खासगी सावकार कोण आहे, तो शेतकऱ्याला उधार का देतो हेही माहीत नाही. हे सरळ सरळ शेतकऱ्यांचे शत्रू आहेत. वस्तुस्थिती लक्षात न घेता शेतकऱ्यांच्या सेवेसारख्या क्षेत्रात मुद्दाम जुना शेटजी–भटजी वाद आणून जे खासगी सावकारांच्या विरुद्ध विष ओकू पाहतात ते शेतकऱ्यांचा घात करणारे आहेत हेसुद्धा लक्षात घ्यायला हवे.

**आर्थिक आघाडीवरील घटना**

२९ फेब्रुवारी २००८ रोजी वित्तमंत्र्यांचे शेतकऱ्यांना कर्जमाफी व सूट सवलत योजना जाहीर करणारे भाषण झाले आणि त्यानंतर ७ मार्चला म्हणजे फक्त ७ दिवसांनी काय काय घडले?

या सात दिवसांत सगळीकडे आरडाओरड सुरू झाली की सगळीकडे महागाई वाढत आहे. महागाई वाढते आहे म्हणजे लोकांना प्रामुख्याने अन्नधान्य महाग होत आहे, भाजीपाला महाग होत आहे, खाद्यतेल महाग होत आहे असे म्हणायचे असे. मग सरकारने म्हणजे वित्तमंत्री पी.चिदंबरम् आणि व्यापारमंत्री कमलनाथ यांनी महागाईवर उपाय म्हणून परदेशातील खाद्यतेलावरील आयातशुल्क माफ करून त्याच्या आयातीला मुक्तद्वार दिले. आयात करून शहरातील ग्राहकाला खुश केले हे चांगले झाले पण त्याचा देशातील शेतकऱ्यांवर काय परिणाम होईल याची त्यांनी फिकीर बाळगली नाही. देशात स्वस्त खाद्यतेल आले आणि देशांतर्गत खाद्यतेलाच्या किमती पडल्या तर शेतकरी सरळसरळ विचार करील की पुढच्या वर्षी मी भुईमूग किंवा इतर तेलबिया कशाकरिता पेरू? परिणामी,

खाद्यतेलाची आयात केल्यामुळे खाद्यतेलाचा तुटवडा कायम करण्याचीच सरकारची ही करणी झाली.

सरकारने आणखी एक घोषणा केली – बिगरबासमती तांदळाच्या निर्यातीवर बंदी घालण्याची. मग, दुधाच्या भुकटीच्या निर्यातीवर बंदी घातली. काल परवा मक्याच्या निर्यातीवर बंदी घातली. १९८० साली शेतकऱ्याच्या कांद्याची निर्यात होऊ द्यायची नाही या सरकारच्या धोरणाविरुद्ध शेतकरी संघटनेचे पहिले आंदोलन झाले; उसापासून होणाऱ्या साखरेवर लेव्ही लावली जाते म्हणून उसाचे आंदोलन उभे राहिले. शेतकऱ्यावर अन्याय करणारी ही धोरणे सरकार आता पुन्हा एकदा लादते आहे. खाद्यतेलाची आयात आणि तांदूळ, मका यांच्या निर्यातीवरील बंदी ही त्याची उदाहरणे आहेत.

अजून एक शेतकरीविरोधी धोरण सरकार राबवीत आहेत. सरकारने शेतीमालाच्या वायदेबाजारवर बंदी घातली आहे. निदान बारा शेतीमालाच्या वस्तू वायदेबाजारात जाऊ शकत नाही. त्याशिवाय वायदेबाजारातील एक लाख रुपयांच्या उलाढालीवर १७ रुपयांचा कर वित्तमंत्र्यांनी लावला आहे. त्यामुळे, वायदेबाजार सध्या बंदच आहे. सध्या देशातील सगळ्यात तुटवड्याची गोष्ट म्हणजे वीज. या विजेच्या वायदेबाजाराला सरकारने परवानगी दिली आहे. पण, शेतीमालाच्या – गव्हाच्या वायदेबाजाराला मात्र सरकारने बंदी घातली आहे. वायदेबाजार कसा चालतो, त्याचे फायदे कोणते, त्यात धोका कितपत आहे या गोष्टी सविस्तरपणे समजावून द्यायचे तर एक प्रबंधच लिहावा लागेल; पण मुद्द्याचे सांगायचे तर आपण शेतकऱ्याला बाजारपेठेचे स्वातंत्र्य हवे म्हणतो त्यादृष्टीने वायदेबाजाराइतकी स्वतंत्र बाजारपेठ कोणतीही नाही. तेथे कोणीही व्यापारी खरीदण्याकरिता जाऊ शकतो आणि कोणीही शेतकरी आपला माल विकण्याकरिता जाऊ शकतो. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक शेतकऱ्याला माहीत असते की हंगामात शेतीमालाची किंमत उतरते, दोन–तीन महिन्यांनी किमती वाढू लागतात. दोन तीन महिन्यांनी वाढणाऱ्या किमती आपल्याला मिळाल्या तर फार चांगले होईल असे सगळ्याच शेतकऱ्यांना वाटत असते; पण शेतकऱ्याकडे थांबायची ताकद नसते. त्याला हेही माहीत असते की हंगामात आपल्याकडे ज्वारीला, सोयाबीनला भाव कमी असतो; पण मध्यप्रदेशात ते घेऊन गेलो तर चांगला भाव मिळू शकतो; पण येथून माल तिकडे नेऊन विकावा इतकी ताकद शेतकऱ्याकडे नसते. संगणकाच्या आधाराने चालणारा वायदेबाजार शेतकऱ्याला थांबण्याचा खर्च न करता किंवा वाहतुकीचा खर्च न करता नंतरच्या काळी किंवा दूरच्या ठिकाणी मिळणारी जास्तीची किंमत मिळवून देतो. स्थल

आणि काळ यांची बंधने उल्लंघून शेतकऱ्याला चांगला भाव मिळवून देणारी यंत्रणा म्हणजे वायदेबाजार. अनेक डाव्या म्हणजे कम्युनिस्ट लोकांनी वायदेबाजार म्हणजे सट्टा जुगाराचा अड्डा आहे. असा अपप्रचार केला आहे. वायदेबाजारामुळे महागाई वाढते आहे असाही त्यांनी प्रचार केला आहे. याचा अभ्यास करण्यासाठी सरकारने जी समिती नेमली होती त्या समितीचा मीही एक सदस्य होतो. या समितीने स्पष्ट अहवाल दिला आहे की, किंमत वाढ आणि वायदेबाजाराचे कार्य यांचा काहीही संबंध नाही आणि तरीसुद्धा केवळ शेतकऱ्याला बाजारपेठेचे स्वातंत्र्य मिळू नये या हेतूने वायदेबाजारावर बंदी आणण्याचे काम सरकारने केले.

म्हणजे, शेतकऱ्याचे दोन्ही हात बांधून ठेवलेले आहेत. शेतकऱ्यावरील कर्ज अजून फिटलेले नाही. तरी या शेतकऱ्याचे बाजारपेठेचे स्वातंत्र्य काढून घेण्याकरिता सरकारने निर्यातीवर बंदी घातली, शेतीमालाची खुली आयात सुरू केली आणि वायदेबाजारावर बंदी घातली. कधी नव्हे इतके, नेहरूंच्या काळातसुद्धा काँग्रेस सरकार जितके शेतकरीद्वेष्टे नव्हते, तितके शेतकरीद्वेष्टे आजचे सोनिया गांधींचे सरकार बनले आहे.

**पेट्रोल टंचाई**

सगळ्या देशामध्ये महागाई वाढली त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे जगामध्ये पेट्रोल, डिझेल, गॅस, रॉकेल यासारख्या पेट्रोलियम पदार्थांचा तुटवडा आहे. कारण सगळ्या खाणी अरब देशांच्या हाती आहेत. अरब देशांचे संपुआ सरकारने कितीही कौतुक केले तरी ते काही हिंदुस्थानचे मित्र नाहीत हे सगळ्यांना माहीत आहे. सर्व पेट्रोलियम पदार्थ ज्यातून तयार होतात त्या कच्च्या तेलाच्या (Crude oil) किमती वाढता वाढता शेवटी अशा वाढल्या की सरकारला एक दिवस जाहीर करायला लागले की हे ओझे आम्ही घेऊ शकत नाही. ग्राहकांनी या ओझ्यातील काही भाग आता उचलायला पाहिजे. म्हणून पेट्रोलच्या किमती लिटरमागे ५० वरून ५५ रुपये झाल्या. डिझेलची, गॅसची किंमतही वाढवली. यावेळी मला एका पंतप्रधानांची आठवण झाली. देशाच्या सगळ्या पंतप्रधानांपैकी मला ज्या एकमेव पंतप्रधानांबद्दल आदर आहे ते म्हणजे स्वर्गीय लाल बहादूर शास्त्री. त्यांनी पाकिस्तानविरुद्ध लढाई सुरू करण्याआधी 'जय जवान, जय किसान' अशी घोषणा केली, हिंदुस्थानात हरितक्रांतीची मुहूर्तमेढ रोवली आणि देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी केले. एवढेच नव्हे तर, अन्नधान्याचा तुटवडा आहे म्हटल्यावर लाल बहादूर शास्त्रींनी देशातील सगळ्या नागरिकांना आवाहन केले, की आठवड्यातून एक जेवण तुम्ही सोडून द्या; तुमच्या पोटाला

भूक जाणवू द्या म्हणजे अन्नधान्याचा तुटवडा हे राष्ट्रीय संकट आहे हे तुम्हाला कळेल. त्यांनी अन्नधान्याचे उत्पादन वाढेल एवढीच व्यवस्था नाही केली, तर लोकांना उपवास करायला सांगितला. एवढा त्यांचा नैतिक अधिकार होता आणि त्यांच्यात तेवढे धैर्यही होते. सोनियाजींच्या ताटाखालचे मांजर असलेल्या मनमोहन सिंगांकडे तशी नैतिकता नाही आणि धारिष्ट्यही नाही. पेट्रोलियम पदार्थांच्या तुटवड्याच्या या परिस्थितीत मनमोहन सिंगांच्या जागी लाल बहादूर शास्त्री असते तर त्यांनी सांगितले असते की मी उद्यापासून पंतप्रधानाच्या कचेरीत येताना सायकलवर बसून येणार आहे किंवा पायी येणार आहे, लोकांनी यापुढे पेट्रोलच्या गाड्या वापरणे बंद करावे कारण पेट्रोलचा तुटवडा हे राष्ट्रीय संकट आहे.

जर पेट्रोलची किंमत वाढली तर त्यामुळे वाहनचालकांना त्रास होतो ही गोष्ट खरी आहे, पण किंमत वाढण्याचे काही फायदेही असतात आणि शेतकऱ्यांच्या बाबतीत सांगितले की, सूट सबसिडीचे नाही काम, आम्हाला हवे घामाचे दाम कारण सबसिडीमुळे शेतकऱ्यांचे वाटोळे होते. तसेच, पेट्रोलला सबसिडी देऊन त्याची किंमत कमी ठेवली म्हणजे मोटार कारखानदार विचार करतो की अधिक पेट्रोल पिणाऱ्या मोटारगाड्या तयार केल्या तरी, पेट्रोल स्वस्त आहे म्हणून ग्राहक त्या घेतील. जसे शेतकरी वीज फुकट आहे म्हटल्यावर उसाला वारेमाप पाणी देतात तसेच पेट्रोलच्या बाबतीत चालक करतात. पेट्रोल स्वस्त असेल तर गाडी चांगली ठेवायची काळजी घेत नाही, वाहन चालवतानाही त्याने अवाजवी पेट्रोल पिऊ नये याचीही काळजी घेत नाही. पेट्रोल महाग होणे आवश्यक आहे. जगामध्ये पेट्रोल ज्या किमतीला विकले जाते त्याच किमतीला देशातील वाहनचालकांना घ्यावे लागेल, हे जर पंतप्रधानांनी सांगितले असते तर किती चांगले झाले असते. कच्च्या तेलाची किंमत ज्यावेळी १३० डॉलर प्रति बॅरल झाली त्यावेळी पंतप्रधानांनी हा विषय लपवून ठेवला. आज ती किंमत १३५ वरून १४२ डॉलर झाली आहे आणि अजून भीती आहे की ती लवकरच १७० डॉलरच्यावर जाणार आहे.

**शेतीतेल**

लाल बहादूर शास्त्रींच्या वेळी जसे देशावर अन्नधान्याचे संकट आले होते तसेच आज पेट्रोलचे संकट आले आहे. अशा परिस्थितीत लाल बहादूर शास्त्रींनी पुन्हा एकदा 'जय किसान' केले असते. पेट्रोलरूपी इंधनाचा तुटवडा भरून काढायचा असेल तर शेतकऱ्याच्या शेतामध्ये पिकणाऱ्या शेतीतेलाचा आपण जास्तीत जास्त उपयोग केला पाहिजे असे ते म्हणाले असते. हे शेतीतेल काय

आहे? सर्व ऊसउत्पादकांना माहीत आहे की उसापासून अल्कोहोल तयार होते आणि अल्कोहोलचा उपयोग फक्त 'पिण्या'करताच करायचा असतो असे नाही. साखर कारखानदारांनी जर 'सहकारी' कारखानदारी केली नसती तर जी काही अनेक मौल्यवान रसायने तयार झाली असती त्यापैकी 'शेतीतेल' हा एक पदार्थ आहे. अल्कोहोलमध्ये थोड्या प्रमाणात पाण्याचा अंश असतो, तो पूर्णतः काढून टाकला, की जे रसायन तयार होते त्याला इथेनॉल म्हणतात, त्याला मी 'शेतीतेल' असे नाव दिले आहे. शेतकऱ्यासमोर ही नवीन संधी उभी आहे. इतके दिवस इंधन तेलाच्या खाणीचे मालक म्हणजे अरब राष्ट्रातील शेख अशी सगळ्यांची कल्पना. आपल्या शेतातही इंधनतेलाचा झरा आहे आणि आपणसुद्धा अरब शेखांसारखेच पेट्रोलियम खाणींचे मालक आहोत हे समजले तर प्रत्येक शेतकऱ्याला आनंदच होईल. सरकार त्याचा शेतकऱ्यांना फायदा मिळू देत नाही याचे कारण आपण शोधून काढू; पण आपल्या शेतात असलेल्या तेलाचा फायदा कसा मिळवायचा ते समजून घेतले पाहिजे.

**'शेतीतेला'चे अर्थकारण**

'शेतीतेल' हे काही केवळ उसाच्या मळीतूनच निघते असे नाही. उसाच्या रसापासून ७५% इथेनॉल तयार होते. साखर कारखान्यातील मळीपासून ४०% इथेनॉल तयार होते. एवढेच नव्हे तर, कोणत्याही कृषिउत्पन्न बाजार समितीच्या बाहेर टाकून दिलेल्या सडक्या पालेभाज्या, फळभाज्या, जे काही टाकून दिलेले असेल त्या सगळ्यापासून इथेनॉल तयार होऊ शकते. या देशात अशा तऱ्हेने तयार होणाऱ्या इथेनॉलचा थेंब न् थेंब वापरला गेला तर शेतकरी समृद्ध होणार आहे. पण मनमोहन सिंगांच्या सरकारची इच्छा अशी की शेतकऱ्याच्या हातीच इथेनॉल जाता कामा नये, ते अरबांच्या हाती राहो.

हा प्रश्न सोडवायचा असेल तर त्याला साधा उपाय आहे. कोल्हापूरला २,३ जुलै रोजी शेतकरी संघटनेने आयोजित केलेल्या 'इथेनॉल शिबिरात' एक कार्यक्रम ठरला.

साखर कारखाने कोठे काढायचे यासंबंधी कायदे आहेत. त्यानुसार ऊस उपलब्ध आहे का, जवळचा कारखाना किती अंतरावर आहे अशा बाबी तपासल्या जातात. आता नवीन तरतूद करायला हवी की ज्या कारखान्यामध्ये इथेनॉल तयार होईल – किंवा नाही – असा कारखाना सबंध देशामध्ये कोठेही उघडण्यास मुभा राहील. त्याच्यावर कोणतेही बंधन असणार नाही. त्याकरिता ऊस वापरता येईल, शुगरबीट म्हणजे शर्कराकंद वापरता येईल, सगळा ओला कचरा वापरता येईल, काहीही वापरले तरी त्यातून तयार होणारा इथेनॉलचा प्रत्येक थेंब देशासाठी

मौल्यवान आहे.

ब्राझिलसारख्या देशामध्ये मोटारगाडीसाठी वापरायच्या पेट्रोलमध्ये ४०% इथेनॉल वापरले जाते. ते आणखी वाढण्यावर बंधन नाही. आपल्या देशामध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारने फक्त ५% इथेनॉल मिसळण्याची परवानगी दिली होती. पेट्रोलचे भाव वाढले तेव्हा मनमोहन सिंगांनी राष्ट्राला उद्देशून भाषण केले तेव्हा, खरे तर, सांगायला पाहिजे होते की यापुढे पेट्रोलमध्ये इथेनॉल किती मिसळावे यावर काहीही बंधन असणार नाही. प्रत्येक गाडीचालकाने किंवा मालकाने आपल्या गाडीसाठी मिश्रणाचे प्रमाण ठरवावे. आपल्या देशातील ९०% मोटारसायकली केवळ रॉकेलवर चालतात, तिथे मिश्रणाचे प्रमाण सरकारने ठरवण्यात काय प्रयोजन आहे?

इथेनॉलला किंमत काय द्यायची? पेट्रोलची किंमत आज प्रति लिटर ५५ रुपये आहे आणि शेतकऱ्याच्या 'शेतीतेला'ला म्हणजे इथेनॉलला सरकारने बांधून दिलेली प्रति लीटर जास्तीत जास्त किंमत आहे फक्त २१ रुपये ५० पैसे. म्हणजे त्या दाढीवाल्या शेखांकडून इंधन आले म्हणजे त्याला ५५ रुपये आणि शेतकऱ्याच्या शेतातून आले म्हणजे फक्त २१ रुपये ५० पैसे. हे काय गौडबंगाल आहे? आमची मागणी अशी आहे की इथेनॉल तयार करणाऱ्या कोणत्याही कारखान्याने पेट्रोल कंपन्यांकडून टेंडरे मागवून ३० रुपयांच्या वर भाव देणारी टेंडरेच विचारात घेऊन इथेनॉलची विक्री करावी.

हे झाले तर पाच वर्षाच्या आत शेतकऱ्याची परिस्थिती बदलणार आहे; कर्जमुक्तीचे आंदोलन करण्याचीही गरज उरणार नाही.

**ऊसदर आणि इथेनॉल**

साखर कारखान्यांनी इथेनॉल तयार करायला सुरुवात केली तर किती फरक पडतो पाहू या.

उसाला भाव काय द्यावा? ६५० का ६८०? जास्तीत जास्त मागण्या करणाऱ्यांची झेप अकराशे, साडेअकराशे, बाराशेपर्यंत जाते. आम्ही हिशेब तपासून पाहिले. ऊस-इथेनॉल लढ्याचे सेनापती श्री. शामराव देसाई यांनी त्यावर मोठा अभ्यास केला आहे. कारखान्यांना इथेनॉल करण्याची परवानगी मिळाली आणि त्या इथेनॉलला फक्त २१ रुपये ५० पैसे भाव मिळाला तरीसुद्धा उसाला टनामागे १९०० रुपये भाव मिळू शकतो. तेव्हा आता ७००-८०० करताचे भांडण सोडून द्या, वैधानिक किमान किमतीचा वाद सोडून द्या. हे वाद आता कालबाह्य झाले आहेत. शेतकऱ्यांना आता नवीन युगामध्ये घेऊन जायचे असेल तर त्याकरिता वेगळ्या तऱ्हेची आंदोलने, वेगळ्या तऱ्हेची रणनीती वापरून वेगळ्या तऱ्हेच्या

मागण्या कराव्या लागतील.

**शेतकरी आंदोलनाचे उद्दिष्ट**

१९८० साली शेतकरी संघटना सुरू झाली ती काही फक्त शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळावा याकरिता नाही चालू झाली. देशाचे दारिद्र्य म्हणजे शेतकऱ्याचे दारिद्र्य आहे आणि शेतकऱ्याचे दारिद्र्य दूर करण्याकरिता काँग्रेसच्या शासनाकडून शेतकऱ्याच्या स्वातंत्र्याची कोणत्याही तऱ्हेने अपेक्षा करणे चूक आहे. जोपर्यंत गावागावांमध्ये शेतकऱ्याला बुडवणारे आणि वर 'आपणच शेतकऱ्यांचे कैवारी आहोत' असे धादांत खोटे बोलणारी मंडळी किंवा त्यांचे मित्र उजळ माथ्याने फिरतात तोपर्यंत शेतकऱ्यांना कर्जमुक्ती आणि स्वातंत्र्य मिळण्याची काही शक्यता नाही.

पिंपळगाव बसवंतच्या सभेत जाहीर केलेला कार्यक्रम अजून चालूच आहे. तो मी पुन्हा सांगतो. गावागावातल्या सोसायटीच्याभोवती काही सैन्य आणून ठेवलेले नसते. गावातल्या सगळ्या लोकांनी एकत्रितपणे जाऊन त्या सोसायटीतले फक्त कागद सोसायटीच्या इमारतीवर आपला राग नाही, तेथील कर्मचाऱ्यांवर काही राग नाही, राग आहे तो फक्त आपल्या कर्जाच्या कागदांशी. ते कागद सोसायटीबाहेर काढून रस्त्यावर आणून जाळणे. हे महाराष्ट्रातील किमान दोन-तीन हजार गावांमध्ये १५ दिवसांत घडल्याची वार्ता दिल्लीला धडकली तर महिनाभरात देशातील यच्चयावत शेतकरी कर्जमुक्त होऊन जाईल.

*(४ जुलै २००८ - शेतकरी मेळावा, सांगली)*

*(शेतकरी संघटक २१ जुलै २००८)*

■■

# निमंत्रण औरंगाबाद अधिवेशनाचे

मी तुमच्याकडे का आलो आहे हे तुम्हाला माहीत आहे. २८ सप्टेंबरपासून मी मराठवाड्याचा दौरा करतो आहे. जिल्ह्याजिल्ह्यात जाऊन मराठवाड्यातील शेतकऱ्यांना निमंत्रण देतो आहे. ८, ९ आणि १० नोव्हेंबर २००८ ला औरंगाबाद येथे शेतकरी संघटनेचे ११ वे अधिवेशन होत आहे आणि त्याला तुम्ही यावे अशी विनंती करण्याकरिता आणि तसे निमंत्रण देण्याकरिता मी आलो आहे; पण हे अधिवेशन इतके महत्त्वाचे आहे की हे निमंत्रण देताना शेतकरी संघटनेचा, एवढेच नव्हे तर सबंध शेतीचा इतिहास सांगायला सुरुवात मी करणार आहे. परभणी जिल्हा इतका महत्त्वाचा आहे आणि अलीकडे कापसाच्या उत्पादनामुळे, कापसाच्या व्यापारामुळे आणि कारखानदारीमुळे मानवत भागामध्ये जी काही आर्थिक उलाढाल झाली आहे ती पाहता मी जे काही मांडणार आहे ते समजण्याइतपत तुमचा गृहपाठ निश्चितच झालेला आहे.

पहिल्यांदा दोन महिलांनी गाणी म्हटली आणि त्यांच्या गाण्यांतून मांडलेला विषय हाच होता की शेती ही पहिल्यांदा पुरुषांची नव्हतीच, शेती ही पहिल्यांदा महिलांची होती. हे माझ्या पुस्तकातून तुम्ही वाचलेले आहे. ज्या वेळी पुरुष हे जंगलात जाऊन शिकार करायचे किंवा जंगलातून फळेमुळे तोडून आणायचे त्यावेळी बायका शेती करीत होत्या. पुरुषांनी शिकार करून आणली म्हणजे ती बायकांच्या हाती द्यायची आणि ती दिल्यानंतर कुटुंबातल्या, टोळीतल्या सगळ्या लोकांना सारखी वाटून द्यायची हे काम बायांकडे आले आणि साहजिकच, सध्या जसे आपल्याकडे होते तसेच त्याही वेळी व्हायचे की काही वेळा सगळ्यांना वाटून झाल्यावर बायांना तोंडात घालायला काहीच राहात नसे आणि असे आजही बरेचदा होते. सगळ्यांना जेवायला घातल्यानंतर बाईला खायला काहीच नसेल तर ती काय करते? एखादा तुकडा राहिला असला तर तोंडात घालते, नाहीतर तसेच तांब्याभर पाणी पिते आणि झोपी जाते. त्याही वेळी तसेच होत

असणार. एकदा एका कोण्यातरी हुशार बाईच्या लक्षात आले असेल, ‘अरे, असे आपल्याला फाके पडू लागले, भूक लागू लागली तर निव्वळ पाणी पिऊन झोपण्यापेक्षा आपल्या झोपडीच्या किंवा गुहेच्या आजूबाजूला जे गवत उगवते त्या गवतावरचे छोटे छोटे दाणे असतात, ते दाणे म्हणजे धान्य, ते दाणे आपण तोडून पोटात टाकावे. म्हणजे थोडी तरी भूक भागते.’ पहिल्यांदा त्यांनी आपल्या आजूबाजूच्या गवतामधून धान्य गोळा करायला सुरुवात केली असेल आणि त्यांच्या नंतर असे लक्षात आले असेल की हेच दाणे जमिनीत पडले तर त्यांच्यापासून पुन्हा गवत उगवते आणि त्याला पुन्हा दाणे येतात.

सृष्टीचा हा अजब चमत्कार प्रथम पाहिला तो पुरुषांनी नाही, तर बायकांनी पहिल्यांदा पाहिला. पहिली शेती जी चालू झाली ती साधी शेती. त्याला आपण अगदी पहिली शेती म्हणजे ज्यात तंत्रज्ञान नाही म्हणून ‘तंत्रज्ञानविहीन’ शेती म्हणू. म्हणजे, बायकांनी त्यांच्या हाती लहान काठी घेतली, त्या काठीने जमीन फक्त उकरायची आणि त्याच्यामध्ये जे काही दाणे मिळाले असतील ते दाणे टाकायचे; रोपे आली आणि त्यांवर दाणे आले म्हणजे ते दाणे वेचून घ्यायचे; पाहिजे तर थोडे कुटायचे, थोडे भिजवायचे. अशा तऱ्हेने पहिली शेती ही स्त्रियांची चालू झाली.

त्या वेळी कोणतेही तंत्रज्ञान नव्हते. मग, तंत्रज्ञानाची सुरुवात केव्हा झाली? जेव्हा शेतकरी पुरुषांना जंगलामध्ये एक बैल सापडला आणि त्यांच्या लक्षात आले की हा बैल मोठा उपयोगी प्राणी आहे, तो काही दंगाधोपा करणारा प्राणी नाही, त्याला वेसण घातली म्हणजे तो आपले ओढण्याचे काम चांगले करतो. असे दिसल्यावर मग पुरुषांनी बायांकडली शेती लगेच काढली आणि आपल्या हाती घेतली. बाई काठीने नुसती जमीन उकरायची आणि त्यात बियाणे टाकायची. त्याऐवजी आता बैलाला नांगराला जुंपायचे, जमीन चांगली खोल नांगरायची आणि मग त्याच्यामध्ये बियाणे टाकले की भरघोस पीक येऊ लागले. शेतकऱ्यांनी बैलाला नांगराला जुंपून जी बैलाची शेती करायला सुरुवात केली ते शेतीमधील पहिले तंत्रज्ञान.

मी तुम्हाला तेव्हापासून ते आताच्या बीटी कॉटनपर्यंतचा आणि त्याहीनंतरचा इतिहास थोडक्यात सांगणार आहे; म्हणजे तुम्हाला औरंगाबादच्या अधिवेशनाचे महत्त्व समजेल.

आजही बायकांना पुरुषांनी आपल्या हातून शेती काढून घेतली याचा राग आहे. ऋषिपंचमीच्या दिवशी बायका बैलाच्या श्रमाचे काही खात नाहीत. एका तऱ्हेने त्या निषेधच व्यक्त करतात – हा बैल आला आणि आमच्या हातातून शेतीची मालकी गेली म्हणून.

'तंत्रज्ञानविहीन' शेतीच्या जागी भरघोस पीक देणारी 'बैलाची शेती' व्हायला लागली आणि शेतीमध्ये दसपट, वीसपट पीक यायला लागले. ते पीक लुटायला लुटारू, दरोडेखोर यायला लागले. ही गोष्टही मी तुम्हाला अनेकवेळा सांगितली आहे. शेतकऱ्यांनी बैलांनी शेती केली आणि घोड्यावरून लुटारू, दरोडेखोर आले आणि शेतकऱ्यांनी पिकवलेले धान्य घेऊन जाऊ लागले हाही भाग मी पूर्वी अनेकदा सांगितलेला आहे. अशा तऱ्हेने धान्याचे पीक वाढत गेले आणि सगळया लोकांना पुरेसे खाद्यान्न मिळायला लागले; एवढेच नव्हे तर, त्यांच्या खळयावर धान्य शिल्लक राहू लागले. हे मी परभणीला १९८४ मध्ये बोललो आहे आणि २००४च्या परभणी रौप्यमहोत्सवी मेळव्यातही बोललो आहे.

आता मी एकदम उडी मारतो आणि प्राचीन काळापासून ते चारशे वर्षापूर्वीच्या कालखंडात येतो, जेव्हा सगळीकडे अन्नधान्य भरपूर होते. त्या वेळी इंग्लंड देशामध्ये माल्थस नावाच्या एका मोठ्या विचारवंत माणसाने एक प्रश्न उभा केला. माल्थसने म्हटले, 'शेतीमधील बायकांच्या हातची काठी काढून तिथे बैल लावला आणि खूप पिकायला लागले म्हणजे कायमच मनुष्यजातीला पाहिजे तितके अन्नधान्य पिकेल ही चुकीची समजूत आहे. माणसांची संख्या प्रचंड वेगाने वाढत आहे. एक जोडपे असेल तर त्यांना दोन मुले होतात, दोनाची चार मुले होतात, चाराची आठ होतात, आठाची सोळा होतात, सोळाची बत्तीस अशा तऱ्हेने माणसांची संख्या प्रचंड वेगाने वाढते आहे आणि जमिनीवर तुम्ही बैल जरी लावला तरीसुद्धा इतक्या प्रचंड वेगाने वाढणाऱ्या मनुष्यजातीला खायला घालणे अशक्य होईल. कारण, जमीन वाढत नाही.' तेव्हा, माल्थस या विचारवंताने पहिल्यांदा भाकीत केले की, मनुष्य जात सदा भरपेट खाऊन राहील ही अशक्य गोष्ट आहे; जोपर्यंत जमीन कमी आहे तोपर्यंत उपासमार होणार आहे, माणसे दुबळी होणार आहेत, त्यामुळे रोगराई होणार आहे आणि अन्नधान्य नाही म्हणून लोकांच्या लढाया होणार आहेत. थोडक्यात, मनुष्य जातीचा अंत हा काही सुखान्त नाही, शोकान्त आहे असे माल्थसचे म्हणणे होते.

तसे झाले का? तसे झाले असते तर आज तुम्ही आम्ही इथे नसतो. आपण इथे आहोत याचा अर्थ असा की मनुष्यजातीचा, माल्थसच्या सिद्धांताप्रमाणे, दुखान्त झाला नाही. का नाही झाला?

माणसामध्ये एक विशेष गोष्ट आहे. सगळयात महत्त्वाची गोष्ट म्हणजे माणूस आणि इतर कोणतेही जनावर यात महत्त्वाचा फरक आहे. जनावरांना पुष्कळ गोष्टी अशा येतात, की ज्या मनुष्याला येत नाहीत. माणसाला जनावरांच्या गतीने धावता येत नाही, माणूस पक्ष्यासारखे उडू शकत नाही, माशासारखे पोहू शकत

नाही. पण माणसामध्ये एक गोष्ट अशी आहे की जी जगामधल्या कोणत्याही प्राण्यामध्ये नाही आणि पक्ष्यामध्ये नाही; ती म्हणजे बुद्धी आहे. माणसाचे हत्यार बुद्धी आहे.

जमीन वाढत नाही, माणसांची संख्या वाढते. माणसाने जगावे कसे याचे उत्तर माणसाने आपल्या बुद्धीच्या सामर्थ्यावर शोधून काढले आणि ते जे तंत्रज्ञान चारशे वर्षापूर्वी शोधले गेले, दुर्दैवाने ते हिंदुस्थानात यायला चारशे वर्षे लागली. ज्याला आपण आज 'हरितक्रांती' तंत्रज्ञान म्हणतो, म्हणजे सुधारलेले बियाणे घेणे, रासायनिक औषधे वापरणे, रासायनिक खते वापरणे आणि योग्य तितके पाणी देणे हे हरितक्रांतीचे जे तंत्रज्ञान आहे. ते जगामध्ये चारशे वर्षापूर्वी आले. हिंदुस्थानात राज्यकर्त्यांनी हे तंत्रज्ञान येऊ दिले नाही. 'आले तर मग छोट्या शेतकऱ्यांचे वाटोळे होईल, मोठे शेतकरीच त्याचा फायदा खाऊन जातील' अशी नेहमीची सरकारी क्लृप्ती. आजच्या कर्जमाफीच्या योजनेत जसे छोटे मोठे असे भांडण लावले तसे नेहरूंच्या जमान्यापासून छोट्या मोठ्या शेतकऱ्यांमध्ये भांडण लावायचे आणि शेतकऱ्यांना अडकवून ठेवायचे हा कार्यक्रम चालू आहे. हरित क्रांतीने हिंदुस्थानात पीक वाढले, चारशे वर्षांनी का होईना आणि जनतेची अन्नाची गरज देशातल्या देशात भागू लागली; अमेरिकेतून अन्नधान्याची जहाजे येण्याची आवश्यकता राहिली नाही.

आणि त्यावेळी हे लक्षात आले की हे तंत्रज्ञान चांगले आहे; पण रासायनिक औषधे वापरली, वरखते वापरली तर जमिनीचा कस कमी होतो. एवढेच नाही तर, जो काही भाजीपाला आपण पिकवतो त्याचासुद्धा गोडवा कमी होतो. अन्नधान्यात, भाजीपाल्यात, दूधदुभत्यात आणि फळफळावळीत त्यातील काही अंश शिल्लक राहतात. चांगले झाले, एका वेळी हरित क्रांतीमुळे आमची पोटे भरू लागली; पण हे तंत्रज्ञान काही पूर्णपणे निर्दोष तंत्रज्ञान नाही. त्यातील दोषांचे परिणाम कालांतराने दिसू लागताच, या तंत्रज्ञानाने आपल्या हातातील भिकेचा कटोरा घालवला हे विसरून काही महाराज, संत, बाबा, गांधीवादी म्हणू लागले नैसर्गिक शेती करा म्हणजे खताच्या ऐवजी फक्त गाईम्हशींचे शेण वापरा, औषधांच्या ऐवजी कडूनिंब, गोमूत्र वापरा; पण फक्त गाईम्हशींचे शेण आणि पालापाचोळा वापरून जर का आपण शेती पिकवली तर हिंदुस्थानातली निम्मी प्रजा भुकेने मरून जाईल. १९६० सालाच्या आधी आपल्यावर तशीच वेळ आली होती. त्यावर हरित क्रांतीचे तंत्रज्ञान सापडले म्हणून आपण वाचलो. आता पुन्हा त्या जुन्या वाटेला जाऊन लोकांची पोटे कशी भरणार? कोणतेही तंत्रज्ञान पूर्णतः निर्दोष असूच शकत नाही. एखाद्या तंत्रज्ञानाचे तोटे त्याच्यापेक्षा प्रगत तंत्रज्ञानानेच

कमी करता येतात, आधीच्या तंत्रज्ञानाकडे माघारी जाऊन नाही.

हरित क्रांतीच्या तंत्रज्ञानानंतर आणखी एक तंत्रज्ञान पुढे आले. ज्या तंत्रज्ञानाचा फायदा कापूस उत्पादक शेतकरी घेत आहेत. बीटी कॉटन हे नाव आता सर्वांना माहीत आहे. बीटी कॉटनमुळे सबंध कापूस उत्पादक भागाचा उद्धार झाला. हे तंत्रज्ञान काय आहे?

हरित क्रांतीचे तंत्रज्ञान म्हणजे चांगल्या वाणाचे बियाणे घेतले, त्याला योग्य त्या प्रमाणात खते, औषधे दिली, पुरेसे पाणी दिले म्हणजे पीक वाढते; पण पूर्वीच्या काळापासून शेतकऱ्यांची बी निवडायची पद्धत अशी होती की, आपल्या पिकात जे काही बी निघेल त्यांच्यातले चांगले चांगले टपोरे, दाणेदार निरोगी दिसते असे बियाणे निवडून काढायचे आणि ते पुढच्या वर्षी शेतात पेरण्याकरिता ठेवायचे. हरित क्रांतीच्या येण्यामुळे पूर्वीचे साधे बियाणे गेले, त्याच्याऐवजी संकरित बियाणे आले. हरीतक्रांतीच्या तंत्रज्ञानामध्ये माणसाने डोके चालवून नवीन तंत्रज्ञान काढले की एखादे चांगले बियाणे आपल्याला तयार करायचे असेल तर स्थानिक वाणाबरोबर आपल्याला हव्या असलेल्या गुणधर्माच्या वाणाचा काही पिढ्यांत संकर करीत राहाणे. उदाहरणार्थ, समजा आपला गहू सध्या लहान आहे. तो गहू आपल्याला लांब करायचा असेल तर लांब जातीचे गव्हाचे बियाणे निवडून त्याचा संकर जर आपण नेहमीच्या जातीच्या गव्हाबरोबर केला तर पुढच्या पिढीतला गहू लांबट होऊ शकतो. या लांबी वाढलेल्या नवीन गव्हाबरोबर लांब जातीच्या बियाण्याचा संकर केला म्हणजे त्याहून अधिक लांबीचा गहू मिळेल. असे लांबता लांबता तांत्रिकदृष्ट्या गहू शेवयाच्या आकाराचाही होऊ शकतो. आपल्याला तो करायचा नाही, कारण शेवायाच्या आकाराचा गहू घेऊन करायचे काय?

या तऱ्हेने संकरित वाण तयार झाले. त्यानंतरसुद्धा मनुष्यजातीने बुद्धी चालवली आणि त्याने विचार केला की, एका बियाण्याचे वाण घ्यायचे, दुसऱ्या बियाण्याचे वाण घ्यायचे, त्यांच्या फुलामधील स्त्रीकेसर, पुंकेसर एकत्र करायचे आणि पिढ्यान्‌पिढ्या वाट पाहायची ही फार वेळ खाणारी गोष्ट आहे. त्याच्यापेक्षा लवकर होणारी काही गोष्ट नाही का?

तेव्हा नवीन तंत्रज्ञान काढले गेले - बायोटेक्नोलॉजी म्हणजे जैविक तंत्रज्ञान. लांबडा गहू आपल्याला करायचा तर लांबड्या गव्हात असा कोणता 'गुण (Gene)' आहे जो गव्हाला लांबडा करतो? तो जर का गुण काढून आपल्या गव्हात टाकला तर तुम्हाला पाहिजे त्या प्रकारचे नवीन वाण तयार करता येते. असे म्हटले जाते यात थोडी अतिशयोक्ती असली, कारण आपण अजून तेवढी प्रगती

केली नाही, तरी येत्या १००-२०० वर्षामध्ये आईबाप लग्न झाल्यानंतर म्हणू लागले की आम्हाला अमिताभ बच्चनसारखा दिसणारा आणि सचिन तेंडुलकरसारखा क्रिकेट खेळणारा मुलगा पाहिजे तर अशा मुलाचेसुद्धा वाण करायचे तंत्रज्ञान विकसित झालेले असेल! त्या तंत्रज्ञानातून जे बीटी कपाशीचे बियाणे तयार झाले त्या बीटीच्या उत्पादनाने व्यापार वाढला, कापसाचा उद्योग धंदा वाढला.

वीस वर्षापूर्वी मी पहिल्यांदा सांगितले की तंत्रज्ञानाचा राग करून, रासायनिक खताचा राग करून तुम्ही जर नैसर्गिक शेतीकडे गेला तर प्रगती होणार नाही. मागे जाऊन कधी प्रगती होत नाही, प्रगती पुढे गेल्याने होते. रासायनिक औषधे वापरून जर जमीन खराब होत असेल तर रसायने कमी वापरा; जैविक बियाणे वापरा ज्याच्यामध्ये बोंडअळी नष्ट होऊन जाते म्हणजे मग औषध फवारायचे काम राहत नाही. तेव्हा, प्रगती पुढे जाऊन होते हा सिद्धांत महत्त्वाचा. तंत्रज्ञान जसजसे पुढे जाईल तसे तसे आपण पुढे जाऊ. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सगळ्या शेतकऱ्यांची पीछेहाट झाली, शेतकरी सारे कर्जबाजारी झाले. सध्या बऱ्यापैकी पोटभर खातोय हे खरे; पण आपण पोटभर खातो याचे श्रेय नेहरूंना नाही, कोणत्याही सरकारला नाही; हे श्रेय ज्यांनी गव्हाचे संकरित बियाणे शोधून काढले त्या तंत्रज्ञानाला, ज्यांनी हे तंत्रज्ञान शोधून काढले त्यांना आहे. जर तुम्हाला कोणी देव मानायचे असेल तर तंत्रज्ञानाला देव माना आणि तंत्रज्ञानाची पूजा करा.

मी शाळेत होतो तेव्हा १९४७ साली, एखादा माणूस ५०-५५ वर्षाच्या भेटला की लोक म्हणायचे, 'झाले, याचे दिवस संपत आले बरे का?' आता वयाची ७५ वर्षे झाली, ८० वर्षे झाली तरी लोक काही लगेच मरतील असे काही दिसत नाही. सरकारने प्राथमिक आरोग्य केंद्रे काढली म्हणून माणसे अधिक काळ जगतात असे नाही, शास्त्रज्ञांनी अँटिबायोटीकचे तंत्रज्ञान शोधून काढल्यामुळे ते झाले आणि त्या अँटिबायोटीकच्या इंजेक्शननंतर कुठे प्लेग झाला, कॉलरा झाला, देवी आल्या, टायफाईड झाला असे ऐकू येत नाही. पूर्वी चागंली चागंली माणसे ३०-३५ व्या वर्षी टायफाईड होऊन मरून जायची. तंत्रज्ञानाच्या कृपेमुळे आज तुम्ही आम्ही ७५-८० वर्षे जगतो.

मानव जातीची प्रगती त्याचे हात धड आहेत आहे म्हणून नाही,.पाय मजबूत आहेत म्हणून नाही, तर कोणत्याही प्राण्यापेक्षा माणसाची बुद्धी श्रेष्ठ आहे म्हणून झाली. तो शोधतो आणि म्हणून मनुष्य पुढे जातो.

औरंगाबाद अधिवेशनाचा मुख्य विषय हा हरित क्रांतीच्या तंत्रज्ञानाचे आणि जैविक तंत्रज्ञानाचे फायदे दिसू लागल्यानंतर आपल्या समोर जे प्रश्न उभे राहू

लागले ते नवीन प्रश्न. असे केव्हाही म्हणता येत नाही की मी सगळे प्रश्न सोडवले. एक प्रश्न सुटला की दुसरा काहीतरी प्रश्न निर्माण होतो. औरंगाबादला आपण चर्चा करणार आहोत ती थोडक्यात, जुन्या समस्या संपल्या. नवीन समस्या येत आहेत आणि पहिल्यापेक्षाही त्या भयानक आहेत आणि त्यांचा सामना कसा करायचा?

काल मराठवाड्यात पाऊस पडला. सगळे हैराण झाले की कोठून आला हा? पाऊस पडला चांगले झाले. आता पेरणी चालू झाली; पण ही काही पाऊस यायची वेळ नाही. पाऊस लहरीपणा दाखवू लागला आहे. 'नेमेचि येतो मग पावसाळा' ही ओळ आता जुनी झाली आहे. पूर्वी जून महिन्यात मृग नक्षत्राचा पाऊस झाला की चार महिने तो पडायचा आणि शांत व्हायचा.

हा पावसाळा आता फार लहरी झाला आहे. मुंबईला हल्ली पडायला लागला की एकदाच बदाबदा पडतो, रस्तेबिस्ते गच्च करून टाकतो. उन्हाळा सुरू झाला म्हणजे सूर्यबाबाही तसाच तापायला लागला. तुम्हाला मराठवाड्यामध्ये सगळ्यांना ४० अंश, ४२ अंश तापमानाची सवय आहे; पण जर का उष्णतामान ४८ नाहीतर ५० अंशापर्यंत जाऊ लागले, माणसाला चालता चालता भोवळ येऊ लागली तर तुम्ही कसे जगायचे आणि पीक कसे वाचवायचे? अशा एक एक नवीन समस्या तयार होताहेत. त्याला उत्तर काय? एअरकंडीशनर लावावा, पंखा लावावा तर वीज नाही.

वीज नाही म्हणून आपण पिकांना पाणी देण्याकरिता डिझेल वापरून डिझेलवर चालणारा पंप वापरू म्हटले तर डिझेल नाही. कारण, डिझेल दुर्मिळ, अत्यंत महाग झाले आहे.

असा चारही बाजूंनी शेतकरी कोंडला जात आहे. त्याच्यामध्ये आणखी एक विचित्र घटना सर्वदूर घडते आहे – म्हटले तर फायद्याची, म्हटले तर तोट्याची. उदाहरणार्थ, जालन्याजवळ ज्या जमिनीचा भाव एकरी पाच ते दहा हजार रुपये होता ती जमीन आज ७० लाख रुपये भावाने जात आहे. शेतकरी विचार करणार की हे काय होऊन राहिले आहे? एका बाजूला वरुणबाबा रागावला, पाऊस येत नाही; सूर्यबाबा रागावला, तापमान वाढायला लागले. मग, शेती करायची कशी? आधीच जे शेतकरी आत्महत्या करायला लागले आहेत त्याची ही मनःस्थिती. नियोजन मंडळाचा एक अभ्यास असे सांगतो की, 'भारतातील ४० टक्के शेतकरी म्हणताहेत की, शेती करायची आता आमची इच्छा नाही. बापजाद्यांनी ठेवली म्हणून आम्ही हे ओझे चालवले. 'सौ के साठ करना और बाप का नाम चलाना।' असा हा धंदा. बापाचे नाव चालविण्याकरिता दरवर्षी तोट्यात जायचे असली ही शेती आता आमच्याने झेपत नाही. आम्ही करीत

राहिलो तरी आमची पोरेबाळे करणार नाहीत' आणि त्यांचा अनुभव असे सांगतो की, ज्यांनी शेती सोडली आणि दुसरे काही केले त्यांचे वाटोळे झाले असे एकही उदाहरण हिंदुस्थानात सापडणार नाही. ज्यांनी धाडस केले आणि शेती सोडली त्यांचे भलेच झाले.

मी मागे एक उदाहरण दिले होते तेच आता पुन्हा सांगतो. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश चंद्रचूड हे माझ्या खेड तालुक्यातील, मूळचे शेतकरी होते. निवृत्त व्हायच्या वेळी ते तालुक्यात आले, माझ्याकडे आले आणि म्हणाले, चला माझी शेती, गाव दाखवतो आणि मी गेलो. एका टेकडीवरून त्यांनी असाऽ हात करून सांगितले, 'ही जी सगळी जमीन आहे ना ती सगळी जमीन माझ्या बापजाद्यांची होती, कूळकायद्यात गेली' आणि त्यांनी थोडे अभिमानाने सांगितले की, 'कूळकायद्यानुसार या सगळ्यांकडून काही पैसे घ्यायचे होते; कुणाकडून दहा हजार, कुणाकडून वीस हजार. आम्ही ठरवले, जाऊ दे. आम्ही उदार अंत:करणाने हे कूळकर्ज माफ केले आणि आम्ही दिल्लीला गेलो.' मी म्हणालो की, 'चंद्रचूड साहेब, तुम्ही दिल्लीला गेला; जाताना मोठे औदार्य दाखवले आणि त्यांचे कूळकायद्यातील कर्ज माफ केले. तुम्ही दिल्लीला गेला आणि सरन्यायाधीश झालात. ज्यांच्यावर तुम्ही मेहरबानी केली असे तुम्हाला वाटते आहे ते हे सगळे शेतकरी कर्जाखाली दबून आज आत्महत्या करायला निघालेत.' ते म्हणाले, 'शेती सोडून जे जातात ते सगळे काही सर न्यायाधीश होतात अशी परीस्थिती नाही.' मी म्हणालो, 'शेती सोडून दिल्लीला गेल्यानंतर वकील व्हायच्या ऐवजी तुम्ही पानाची गादी लावून पाने जरी विकली असती तरी तुमची परिस्थिती या शेतकऱ्यापेक्षा चांगली असती हे लक्षात ठेवा.'

मुळशी धरणाच्या वेळी सेनापती बापटांनी आंदोलन केले. आम्ही याचा अभ्यास केला. धरणग्रस्त म्हणून जे शेतकरी तेथून उठून मुंबईला गेले ते सांताक्रूझ, विलेपार्ले भागात राहतात. त्यांची सगळ्यांची स्थिती चांगली आहे. मुळशी धरण झाल्यावर आपल्याला पाणी मिळेल, आपण हिरवीगार शेती करू आणि लक्ष्मी आपल्या घरात पाणी भरेल अशी ज्यांची कल्पना होती ते सगळे कर्जबाजारी झाले; त्यांना कर्जमाफीचासुद्धा फायदा मिळाला नाही हे सत्य आहे.

तुम्हीतरी कसली शेती करता? मराठवाड्यातल्या सगळ्या जिल्ह्यांत मी फिरलो, सगळीकडे लोक म्हणू लागले आहेत, 'साहेब, ते शेतीमालाच्या भावाचे राहू द्या; आधी पिकवायला खूप कष्ट करायला लागतात, मग त्याचा भाव मिळायचा. त्याच्यापेक्षा या मोबाईल टेलीफोनच्या कंपन्या आहेत त्यांना आमच्या शेतात टॉवर उभा करायला सांगा. म्हणजे मग आम्हाला त्याचे भाडे मिळेल.

तेवढे मिळाले म्हणजे मग काही करायची गरज पडणार नाही.'

शेतकऱ्याची सर्वदूर अशी स्थिती आहे. अशा परिस्थितीत तुमच्या सगळ्यापुढे हा प्रश्न पडला आहे की, ही शेती करावी का नाही? मनामध्ये एक प्रश्न येतो की, शेती नाही पिकवली तर लोकांना खाऊ काय घालणार? शेतकरी आता शहाणे झालेत. त्यांना पटले आहे की, शरद पवार परदेशातून गहू आणून लोकांना खाऊ घालतात तर आपल्याला त्याची चिंता करण्याचे काही कारण नाही. शरद पवारांना आपली चिंता नाही तर त्यांच्या माणसांना खाऊ घालण्याची चिंता आपण कशाला करायची? तुमच्या समोर जो अत्यंत कठीण निर्णय आहे तो हा की याच्या पुढे शेती करायची किंवा नाही?

विशेष आर्थिक विकास क्षेत्रासाठी (एस् ई झेड) तुमची जमीन जात असेल तर सरकारला ती घेऊ द्यायची का? शेतकरी संघटनेने या विषयावर भूमिका आधीच मांडलेली आहे; तो काही अधिवेशनाचा विषय नाही. ज्यांना शेती करायची आहे त्यांच्या शेतीला सरकारने बोटसुद्धा लावता कामा नये, संपादन करण्याचा प्रश्नच येत नाही. ज्या शेतकऱ्याला आता शेती करण्याची इच्छा नाही त्याला त्याची जमीन सरकार म्हणते म्हणून पाचपन्नास हजारांत दिली पाहिजे हेही जमणार नाही. बाजारात त्याची किंमत ७० लाख असेल तर सत्तर लाखाने विकण्याचे स्वातंत्र्य शेतकऱ्याला असले पाहिजे.

प्रश्न असा आहे की या परिस्थितीत तुम्ही पुढे शेती कशी काय करणार आहात? जे शेती सोडून जाऊ इच्छितात त्यांनी शेती विकली, त्यांचे सोडून द्या; पण जे शेती करू इच्छितात त्यांनी शेती कशी करावी यावर औरंगाबाद अधिवेशनात आपण तपशीलवार चर्चा करणार आहोत. यापुढे सूर्य असा तापणार असेल आणि मेघ बाबा असा वेड्यासारखा बरसणार असेल तर आकाशाखालची शेती ही जवळजवळ अशक्य गोष्ट आहे. तुम्ही गेली काही वर्षे ऐकता की इस्त्रायलमध्ये आता आकाशाखालची उघडीबोडकी शेती होत नाही. याच्या पुढे तुमची शेती आता मांडवाखालची शेती, आच्छादित शेती झाली तरच जगू शकते, नाही तर जगूच शकत नाही. मांडवाखालची, सावलीतली शेती करताना आपल्याला हवामान ठरवता येते, उष्णतामान ठरवता येते, पाणी ठरवता येते. अशा तऱ्हेची जर शेती केली तरच तुम्हाला शेतीमालाला भाव मिळेल. यापुढे आकाशाखालची उघडीबोडकी शेती करीत राहिलात तर तुम्ही बुडून जाल, अधिकाधिक कर्जबाजारी व्हाल आणि अजूनही मोठ्या संख्येने आत्महत्या करायला हे सरकार तुम्हाला भाग पाडेल.

तुम्हाला वाटत होते की आम्ही कशीही शेती केली आणि आपण आंदोलने

केली म्हणजे सरकार शेतीमालाला भाव देईल. ३० वर्षांच्या आंदोलनानंतर आपल्याला काय दिसते? आजही सरकार शेतीमालाला भाव देत नाही, उलट, महागाई झाली म्हणजे स्वातंत्र्यानंतरच्या सर्व सरकारांनी जे केले तेच आजचे सरकार करीत आहे. मनमोहनसिंगांच्या सरकारने तर देशाच्या बाहेरून तेलाची आयात केली आणि देशातील तेलाचे, तेलबियांचे भाव पाडले; तांदळाच्या निर्यातीवर बंदी आणली आणि तांदळाचे भाव पाडले; मक्याचे भाव पाडले, दुधाचे भाव पाडले एवढेच नव्हे तर, शेतकऱ्यांना भावाची हमी देऊ शकणाऱ्या वायदेबाजाराची पद्धतशीरपणे गळचेपी केली. सोयाबीनच्या शेतकऱ्यांना मी सांगतो ते उदाहरण पटेल. ज्या वायदे बाजारामुळे सोयाबीनची किंमत २३०० रुपये होती तो वायदे बाजार बंद केल्यामुळे झटक्यात १२०० ते १३०० रुपये इतकी खाली पडली आहे. मनमोहन सिंगाचे हे तथाकथित खुलीकरणवादी सरकार शेतकऱ्यांच्या बाबतीत नेहरूंच्या समाजवादी सरकारइतकेच दुष्ट आणि क्रूर आहे. 'चला, तुमची कर्जे माफ केली' अशा कितीही लालची त्यांनी दाखवल्या तरी ते शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळू देणे शक्य नाही.

आम्ही कर्जमाफी मागितलेली नव्हती; माफी मागायला आम्ही काही गुन्हेगार नाही. आम्ही कर्जमुक्ती मागितलेली होती. का मागितली कर्जमुक्ती? शेतकऱ्यांची सगळी कर्जे ही बेकायदेशीर आहेत म्हणून, अनैतिक आहेत म्हणून आम्ही कर्जमुक्ती मागितली होती, कोणाची मेहेरबानी म्हणून मागितली नव्हती. भाकरीचे दोनचार तुकडे कुत्र्यांच्या गर्दीमध्ये टाकले म्हणजे त्या चार तुकड्यांसाठी कुत्र्यांची मारामारी लागते आणि मग थोडा वेळ करमणूक होते; कुत्र्यांचे लक्ष नाही या खात्रीने हवा तर डल्लाही मारणे सोपे जाते या भावनेनेच मनमोहन सिंग सरकारने ही कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. 'तू छोटा शेतकरी, तुला देतो, तू मोठा शेतकरी तुला देत नाही; तू सावकाराकडून कर्ज घेतले तुला देत नाही, तू बँकेकडून घेतले तुला देतो; तू बँकेत, सहकारात कोणी पदाधिकारी आहेस, चेअरमन आहेस, तुझे सगळे कर्ज माफ; तुम्ही भाऊभाऊ वेगळे राहता तुम्हाला माफ, तुम्ही भाऊभाऊ एकत्र राहून म्हाताराम्हातारीचा सांभाळ करता तुम्हाला नाही' अशा भांडणे लावण्याच्या यांच्या एक ना अनेक क्लृप्त्या.

सरकारचा हा दुष्टपणा पुढे चालूच राहणार असेल तर शेतकऱ्यांना या लोकांवर अवलंबून राहून चालणार नाही. शेतकऱ्यांना अशा तऱ्हेने, वेगळ्या पद्धतीने शेती करावी लागणार आहे की जिथे सरकार असो किंवा नसो, थोडी हिम्मत दाखवली, थोडे वेगळे वागलात, अगदी निवडणुकीच्या वेळेस आपल्या जातीच्या उमेदवाराला मत देण्याचे जरी बंद केले आणि शेतकरी संघटनेच्या उमेदवारांना आमदार

आणि खासदार म्हणून मते मिळवून दिली तरच तुम्हाला शेती चालवता येईल; दुसऱ्या कोणालाही मते दिली तर तुमची शेती टिकू शकत नाही.

मग, आता काय करायला पाहिजे? हरिक्रांतीचे तंत्रज्ञान मी सांगितले, बायोटेक्नोलॉजीचे तंत्रज्ञान मी सांगितले. आपण ती तंत्रज्ञाने सध्या बाजूला ठेवू. औरंगाबादच्या अधिवेशनात आपण त्याच्या पुढच्या तीनचार तंत्रज्ञानांचा विचार करणार आहोत. ही जी तंत्रज्ञाने आहेत त्यांची माहिती औरंगाबादच्या अधिवेशनात सर्व शेतकऱ्यांना दिली जाईल आणि एवढेच नाही तर, त्या तंत्रज्ञानाचे प्रात्याक्षिक, त्या तंत्रज्ञानाची यंत्रसामग्री तुम्हाला पाहायला मिळेल आणि त्या तंत्रज्ञानाचा ज्यांनी यशस्वी प्रयोग केलेला आहे त्यांची भाषणेसुद्धा ऐकायला मिळणार आहेत.

पहिले तंत्रज्ञान – याचे नाव इंग्रजीत एरोपोनिक्स् – पण आपण याला सध्या 'A' तंत्रज्ञान म्हणू. दिल्लीला माझ्या घरी जेवणाच्या टेबलावर मावेल एवढे एक खोके आहे. त्या एका खोक्यामधून माझ्या संपूर्ण घराला पुरेल एवढी भाजी, त्याशिवाय, माझ्या त्या इमारतीमध्ये राहणाऱ्या सर्वांना पुरेल इतकी ताजी भाजी काढू शकतो. हे नवे तंत्रज्ञान हरितक्रांतीच्याही पुढे गेलेल्या बायोटेक्नॉलॉजीच्या पुढे गेलेले तंत्रज्ञान आहे. बायोटेक्नोलॉजीचा अनुभव बीटी कॉटनच्या रूपाने तुम्ही घेतला आहे. तुम्हाला जर का हवामान बदलत आहे, वरुणराज कोपतो आहे, सूर्यदेव रागावतो आहे याच्यावर उपाय काढायचा आहे तर 'जुनी बियाणी वापरा, तीच चागंली होती; जुन्या बियाण्याच्या गव्हाला जी काय चव होती ना ती चव नव्या जातीच्या बियाण्याला नाही वगैरे' हा वाह्यातपणा सोडून द्या. आज शास्त्रज्ञ असे नवीन बियाणे तयार करायला लागले आहेत की दुष्काळ पडला तरी ते उगवायला लागते, तापमान ५० अंशांच्या वर गेले तरीसुद्धा पिकते, एवढेच नाही तर, ते तापमान कमी होत होत एक अंशावर जरी आले तरी पिकत राहील. साधारणपणे कोणत्याही बियाण्याला पिकण्यासाठी अमुक ते अमुक असे उष्णतामान पाहिजे असते. पण उष्णतामान कितीही वाढो, कितीही कमी होवो तरी ते पीक येईल अशा तऱ्हेची बियाणी तयार होत आहेत. या तंत्रज्ञानाचे नाव आहे 'B' बायोटेक्नोलॉजी. बीटीतून त्याचा तुम्ही अनुभव घेतला आहे.

आणखी एका तंत्रज्ञानाची तुम्हाला माहिती झाली पाहिजे. डिझेल महाग झाले, पेट्रोल महाग झाले. पेट्रोलची किंमत ५६ रुपये लिटर झाली आहे. डिझेलही तसेच महाग झाले आहे. दरवर्षी बलिप्रतिपदेच्या दिवशी शेतकरी मायमाऊल्या 'ईडा पिडा टळू दे, बळिचे राज्य येऊ दे' अशी प्रार्थना करतात. आपणही शेतकरी संघटनेच्या ध्येयवाक्यात धरले आहे की बळिराज्य येणार आहे. ते बळिराज्य खरोखरच येते आहे; बळिराजाने आपला दूत आधीच पाठवला आहे.

त्रेतायुगात वामनाने बळिराजाला पाताळात गाडले त्या गाडलेल्या जमिनीतून आणि पाताळातून बळिराजाने आपल्या लाडक्या लेकरांकरता – तुम्हा सगळ्या शेतकरी भावाबहिणींकरिता लक्ष्मी पाठवून दिली आहे. तंत्रज्ञान असे सांगते की तुमच्या शेतामध्ये पिकणारा ऊस असो ज्वारी असो, बटाटा असो का मका असो, अगदी साधी हिरवळ, कोणतेही तण, साधी हरळीसुद्धा या तंत्रज्ञानामुळे पेट्रोल होऊ शकते. तुम्ही आता साधे कुणबी राहिले नाही, मध्यपूर्वेतील अरबशेखांकडे जशी तेलाची खाण लागते तशी तेलाची खाण तुमच्या शेतात लागली आहे. ही बळिराजाने पाठवलेली कृपा आहे.पेट्रोलला पर्याय देणारे हे 'शेततेल' बनविण्याचे यंत्र औरंगाबाद अधिवेशनात पाहायला मिळणार आहे. एकेका शेतकऱ्याला दररोज १०० ते १५० लिटर 'शेततेल (इथेनॉल)' तयार करता येईल. हे तिसरे तंत्रज्ञान आहे 'E' म्हणजे इथेनॉल निर्मितीचे.

माणसाची आणि शेतीची प्रगती तंत्रज्ञानामुळे आहे झाली आहे हे मी तुम्हाला पटवून सांगितले आहे, शेतीचा इतिहास सांगितला आहे. ही शेतीला स्वातंत्र्य मिळविण्याची मोहीम चालू आहे पण एक नेहमीचीच अडचण आहे. कार्यकर्ते म्हणतात सणासुदीच्या दिवसात प्रचार कसा होणार आणि अधिवेशनाला लोक कसे येणार. तुम्हाला बळिराजाचा वर मिळाला, तुमच्या शेतामध्ये लक्ष्मी प्रगटू पाहाते आहे. आम्ही कार्यकर्त्यांशी चर्चा करून औरंगाबाद अधिवेशनाचे घोषवाक्य ठरवले – 'लक्ष्मी प्रगटते आहे आपल्या शेतात' दिवाळीचे लक्ष्मीपूजन सगळे जग ऑक्टोबरच्या शेवटी करणार आहे. पण शेतकऱ्यांचे खरे लक्ष्मीपूजन ८, ९ आणि १० नोव्हेंबरला औरंगाबाद येथे होत आहे.

या अधिवेशनाच्या विषयपत्रिकेचे आकलन करण्याची कुवत नसलेले लोक – शेतकरीहिताचे विरोधक पुढारी, पक्ष कार्यकर्ते, पत्रकार – तुम्हाला अधिवेशनाला येण्यापासून रोखण्यासाठी कदाचित म्हणतील की, 'शरद जोशी आता म्हातारे झाले आहेत; पहिल्यांदा आंदोलनाची भाषा करायचे, रस्त्यावर उतरायची भाषा करायचे, तुरुंगात जायची भाषा करायचे; आता तंत्रज्ञानाची भाषा करायला लागले, बिचारे दमले बर का!' मी म्हातारा झालो हे खरे आहे पण, मी दमलो नाही, मी तुमच्यात आलो आहे, काळाशी सुसंगत ताजा विचार घेऊन आलो आहे आणि तुम्हाला सावधही करायला आलो आहे.

शेतीतील दारिद्र्यातून सुटण्याची चालून आलेली ही संधीही सरकार शेतकऱ्यांच्या हातून हिसकवून घेऊ पाहत आहे. 'शेततेल' तयार करण्याची परवानगी देणे सरकारच्या हाती, पेट्रोलमध्ये ते किती प्रमाणात मिसळायचे तेही सरकारच ठरवणार, ते वापरणारे गाडीवाले नाहीत आणि वर त्याची किंमत

ठरविण्याचा अधिकारही इतर शेतीमालांप्रमाणेच शेतकऱ्यांच्या हाती नाही, तर शेततेल पेट्रोलमध्ये मिसळून पेट्रोलच्या भावात विकण्याची मुभा असलेल्या पेट्रोलियम कंपन्यांच्या हाती. तेलाचा तुटवडा असतानाही केंद्र सरकारने देशातील तेलाच्या साठ्यांचा शोध लावण्याचे खास प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे या पेट्रोलियम कंपन्यांना आणि केंद्रातील सत्तेच्या वर्तुळातील काही हितसंबंधियांना अरब राष्ट्रांतून खनिज तेलाची आयात होत राहण्यात स्वारस्य असावे अशी शंका येते. अगदीच प्रयत्न होत नाहीत असे कोणी म्हणून नये म्हणून एका सरकारी कंपनीमार्फत कृष्णागोदावरीच्या खोऱ्यांत खनिज तेलाचा शोध घेतला गेला. या खोऱ्यांत अजिबात तेल नाही असे त्या कंपनीने सांगितले; पण एका खासगी कंपनीच्या पाहणीनुसार या खोऱ्यांत संपूर्ण देशाला दहा वर्षे पुरेल इतका साठा आहे. सरकारच्या परवानगीशिवाय तो कोणालाही जमिनीबाहेर काढता येणार नाही. देशात उपलब्ध तेल न शोधणे, अरब राष्ट्रांतून महागड्या तेलाची आयात करणे, मतांवर डोळा ठेवून पेट्रोल कंपन्यांना अनुदाने देऊन लोकांना स्वस्त दरात पेट्रोल व डिझेल पुरविणे आणि प्रदूषण न करणाऱ्या 'शेततेला'चे उत्पादन आणि वापर यांना अटकाव करणे हे सरळ सरळ देशद्रोही कृत्य आहे.

तुमच्या शेतामध्ये शेततेलाच्या रूपाने लक्ष्मी सापडली म्हणून त्याला आपसुक भाव मिळणार आहे असे धरू नका. शेतीमालाला भाव मिळवायचा असेल तर तो कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आडत्याकडून मिळणे काही शक्य नाही. आजच्या युगात ते मिळायची शक्यता तंत्रज्ञानानेच शोधलेली आहे. असे तंत्रज्ञान आज उपलब्ध आहे. तुम्ही पेरणी करण्याच्या वेळी कोणाकडे कॉम्प्युटर असला तर त्याच्याकडे जाऊन बघा. तुम्ही तूर, कापूस जे काही पेरणार असाल त्याला हंगामाच्या वेळी काय भाव मिळणार आहे हे तुम्हाला पाहायला मिळणार आहे. एवढेच नाही तर, तो भाव तुम्हाला मिळायचा करार (कॉन्ट्रॅक्ट) हंगाम यायच्या आधीही करता येईल; पीक निघाल्यानंतर तुम्ही ठरवले की आता विकायचे, ठीक आहे; मला आता नाही विकायचे नाही तर नाही; पण चार महिन्यांनी जेव्हा भाव चढतील तेव्हा विकायचे आहे तर तुम्हाला चार महिन्यांनंतरचा भाव देणारे तंत्रज्ञान तयार आहे. तुम्ही म्हटले माझ्या भाजीला इथे परभणीत भाव नाही, मुंबईला भाव आहे तर या तंत्रज्ञानाने तुम्हाला मुंबईचा भावसुद्धा मिळू शकेल. काळाचे बंधन नाही, स्थळाचे बंधन नाही; शेतकऱ्याला पाहिजे तो भाव देणारे तंत्रज्ञान निघाले आहे. ते म्हणजे I, माहिती तंत्रज्ञान. त्याच्यासाठी तुम्हाला स्वतःचा कॉँप्युटर बाळगण्याची आवश्यकता नाही. आज कित्येक शेतकऱ्यांच्या तरुण पोराकडे मोबाईल आहे, ही माहिती तुम्हाला मोबाईल फोनवर मिळू शकते.

फक्त, तुम्हा शेतकऱ्यांना याचा फायदा घेता येऊ नये, शेतकऱ्याला योग्य तो भाव मिळू नये याकीरता सरकार वायदाबाजारावर बंदी आणत आहे, त्याने ती आणली आहे.

शेतीचे उत्पादन वाढवण्याकरिता माणसाने माल्थसपासून नवीन नवीन तंत्रज्ञान आणले. आज एवढ्याशा जागेत पाहिजे तितके पिकते, जमिनीचीसुद्धा गरज नाही. जैविक तंत्रज्ञानामुळे पाहिजे तसे वाण तयार होऊ शकते. तुमच्या शेतातील अगदी हिरवळीपासून इंधन तयार होऊ शकते. तुमच्या मोबाईलवरसुद्धा शेतीमालाला भाव मिळवण्याची जादूची कांडी आहे.

तर, शेती कशी करावी हे तुम्हाला औरंगाबादला शिकायला मिळेल. चारच शब्द लक्षात ठेवायचे – A, B, E, I - A म्हणजे ऐरोपोनिक्स, A म्हणजे बायोटेक्नोलॉजी, E म्हणजे इथेनॉल टेक्नोलॉजी आणि I म्हणजे इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी. ही चार तंत्रज्ञाने तुम्ही शिकलात तर आपल्या मायबहिणींची बळीच्या राज्याची पिढ्यान्‌पिढ्यांची इच्छा पुरी व्हायला वेळ लागणार नाही आणि तंत्रज्ञानची झेप इतकी मोठी आहे की आपण येथून औरंगाबादला पोचतो, की आणखी एखादे पाचवे तंत्रज्ञान उदयाला आलेले असेल कदाचित. या सगळया तंत्रज्ञानाची माहिती, त्यांचा वापर आणि ज्याला आवश्यक असेल त्याला, विकत घेण्याची संधीसुद्धा औरंगाबादला अधिवेशनात मिळणार आहे.

शेतकरी संघटनेचे अधिवेशन, गावची जत्रा जशी दर वर्षी भरते तसे काही दरवर्षी भरत नाही. जेव्हा काही असे संकट येते, असा कठीण प्रसंग येतो आणि अध्यक्षांना वाटते की हा निर्णय आपल्याला किंवा कार्यकारिणीलाही करणे कठीण आहे; आपण एकट्याने निर्णय घ्यायचा धोका घेऊ नये, सगळया शेतकऱ्यांना बोलवावे, सगळे शेतकरी भाऊबहिणी मिळून विचारविनिमय करून या अंधारातून रस्ता कसा काढायचा ते ठरवू तेव्हा शेतकरी संघटना अधिवेशन भरवते. आतापर्यंत शेतकरी संघटनेची १० अधिवेशने होऊन गेली, हे ११ वे अधिवेशन महत्त्वाचे आहे.

तुम्ही लांबचे असा की जवळचे, तुम्हाला सगळ्यांना मी विनंती करतो की या ऐतिहासिक अधिवेशनाला तुम्ही काहीही झाले तरी येणे चुकवू नका. नाही तर, तुमची नातवंडे तुम्हाला हसतील आणि विचारतील, 'अरे, ते औरंगाबादचे अधिवेशन होते आणि तुम्ही गेले नव्हते?'

*(६ ऑक्टोबर २००८ – मानवत. जि. परभणी)*

*(शेतकरी संघटक २१ ऑक्टोबर २००८)*

■■

# औरंगाबाद ज्ञानयज्ञायी फलनिष्पत्ती

८ नोव्हेंबरपासून चाललेल्या, शेतकरी संघटनेच्या तीन दिवसांच्या अधिवेशनातील या समारोपाच्या खुल्या अधिवेशनाच्या व्यासपीठावरून बोलण्यासाठी उभे राहताना माझ्या मनात फार जुन्या आठवणी जाग्या झाल्या. माझ्या समोर जमलेल्या, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून प्रचंड संख्येने आलेल्या तुम्हा शेतकरी भावाबहिणींपैकी अनेकांचा जन्महीं झाला नव्हता त्या वेळी म्हणजे ५१ वर्षांपूर्वी मी मुंबईला महाविद्यालयात अर्थशास्त्र हा विषय शिकवायला सुरुवात केली. महाविद्यालय मान्यवर होते, तेथील विद्यार्थी उच्चविद्याविभूषित होण्याच्या आकांक्षेने आलेले, मोठ्या संख्येने बड्या, सुसंस्कृत घरातून आलेले. माझीही शिकवण्यामध्ये थोडीफार ख्याती झालेली त्यामुळे इतर महाविद्यालयांतील काही विद्यार्थीसुद्धा मी शिकवीत असलेले अर्थशास्त्र ऐकण्यासाठी नाही तरी माझे इंग्रजी कानी पडावे यासाठी वर्गात येऊन बसत असत; पण आज ५१ वर्षांनंतर ३ दिवसांच्या या अधिवेशनामध्ये मी जो अनुभव घेतला तो ५१ वर्षांपूर्वीच्या अध्यापकीमध्ये मला कधीही आला नव्हता हे मी प्रामाणिकपणे कबूल करतो. माझ्या कॉलेजमधील अध्यापकीच्या वेळी मला नियम करावा लागला होता की, एकदा का माझे शिकवणे सुरू झाले की त्यानंतर वर्गामध्ये कोणी आत येऊ नये. कारण माझ्या बोलण्यामध्ये खंड पडतो, व्यत्यय येतो. तेथे नियम करावा लागला पण येथे गेले तीन दिवस आपल्या अधिवेशनाचा वर्ग २७ तास चालला आणि त्या २७ तासांतील किमान पाच तासतरी मी स्वतः बोललो; पण या पाच तासांमध्ये एकदाही कोणी आता आत प्रवेश करू नये असे सांगावे लागले नाही, कोणी आता गडबड करू नये असे सांगावे लागले नाही. शहरांतील सुसंस्कृत आणि बड्या घरांतून उच्चविद्या संपादनाच्या आकांक्षेने आलेल्या विद्यार्थ्यांना जे जमले नाही ते या सगळया सातवीआठवी पास किंवा नापासही अशा माझ्या या विद्यार्थ्यांनी करून दाखवले आणि म्हणून मी तुम्हा सगळयांचे अभिनंदन करतो

आणि तुम्हाला धन्यवाद देतो.

तीन दिवसांच्या या अधिवेशनातील चर्चेचे विषयही काही साधे नव्हते. उदाहरणार्थ, 'जागतिक हवामान बदला'च्या विषयांत माहिती देण्यासाठी जागतिक कीर्तीचे तज्ज्ञ आले, त्यांनी संगणकाच्या साहाय्याने विषयपरिचय (Presentation) करून दिला, आकडेवारी दाखवली; तसेच 'ऊर्जास्वातंत्र्या'च्या चर्चेत इथेनॉल कसे तयार करायचे यासंबंधी तज्ज्ञांनी भाषणे केली आणि ज्या अतृप्त आतुरतेने माझे सर्व शेतकरी भाऊबहिणी ते ज्ञान पीत होते ते पाहून मला असे वाटले की माझ्या जीवनाचे सार्थक झाले.

अनेक लोकांना आजचे हे अधिवेशन पाहून त्यासंबंधी ऐकून आश्चर्य वाटले असेल. शेतकरी संघटनेचे अधिवेशन तीन दिवस चालले. अधिवेशन किंवा सभा म्हणजे दोनचार लोकांनी मांडीवर शड्डू ठोकून राणा भीमदेवी थाटाची भाषणे करायची, विरोधकांना किंवा शासनाला शिव्या द्यायच्या, आग लावायची भाषा करायची, दंगाधोपे करायची भाषा करायची असे इथे काहीच झाले नाही. जी काही भाषणे झाली, विचारविनिमय झाला ते सगळ्यांनी शांतपणे ऐकून घेतले प्रश्न विचारून, अत्यंत बुद्धिमान प्रश्न विचारले. आपले शंकानिरसन करून घेतले. या गोष्टींमध्ये एका क्रांतीची बीजे लपलेली आहेत ते मी तुम्हाला उलगडून सांगणार आहे.

**अधिवेशनाचे प्रयोजन**

हे अधिवेशन मी कशाकरिता बोलावले? मी मराठवाड्यातील जिल्ह्यांत केलेल्या निमंत्रणाच्या भाषणात आणि शेतकरी संघटकाच्या (२१ ऑक्टोबर २००८) अंकातून दिलेल्या निमंत्रणात म्हटले की, "२००४ साली केंद्रातील सरकार बदलले, संयुक्त पुरोगामी आघाडी (संपुआ)चे सरकार आले आणि शेतकऱ्यांच्या दुर्दशेचे फेरे चालू झाले. २००५ सालापासून ते २००७ सालापर्यंत हिंदुस्थानातील एक लक्ष साठ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यातील सगळ्यात मोठी संख्या महाराष्ट्राच्या विदर्भ भागातील शेतकऱ्यांची आहे. शेतकरी आत्महत्या करतात त्यामागचे कारण सगळ्यांना माहीत आहे. ज्या ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यांच्या घरचा इतिहास पाहिला तर असे आढळून येते, की त्यातील ९९ टक्के शेतकरी कर्जात बुडलेले होते, कर्जाची परतफेड करता येत नाही म्हणून वसुलीसाठी अधिकारी आले तर आपली बेअब्रू होऊ नये, घरदार बदनाम होऊ नये म्हणून कोठेतरी कोपऱ्यात जाऊन गळ्याला फास लावून घेतात किंवा पिकावर फवारायला आणलेली औषधाची बाटलीच पिऊन टाकतात आणि आपले आयुष्य संपवतात. कर्जबाजारीपणा हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमुख कारण

आहे. कापसाच्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या सगळयात जास्त होतात. कारण, शेतीमालाला भाव मिळू नये म्हणून सरकारने शेतीमालाच्या 'उलट्या पट्टी'चे म्हणजे उणे सबसिडीचे जे धोरण राबवले त्यात कापूस शेतकऱ्यांवर सगळयात जास्त अन्याय झाला. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जेव्हा कापसाची प्रति क्विंटल किंमत २१०० रुपये होती, तेव्हा भारतात सरकारचा हमी भाव फक्त ११०० रुपये प्रतिक्विंटल होता आणि महाराष्ट्रातील कापूस एकाधिकार खरेदी योजनेत तर शेतकऱ्यांना फक्त ६०० रुपयेच मिळत होते. म्हणजेच महाराष्ट्रातील कापसाच्या शेतकऱ्यांना क्विंटलमागे १५०० रुपयांचा तोटा होत होता म्हणून कापूस शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा आकडा मोठा झाला. हे मी आकडेवारीने सर्व पुराव्यानिशी दाखवून दिले होते.

आपल्या विपरीत धोरणांमुळे १ लाख ६० हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर तरी सरकारने डोळे उघडावेत! पण, नाही. राजकीय नाटक म्हणून संपुआ सरकारने जी कर्जमाफीची योजना जाहीर केली त्याने शेतकऱ्यांची सरकारने फसवणूक केली आहे एवढेच नव्हे तर घोर अपमान केला आहे. आम्हाला कर्जमाफी नको, कर्जमुक्ती हवी कारण आमच्यावर दाखवली जाणारी सर्व कर्जे खोटी आहेत, आम्ही सरकारचे काही देणे लागतच नाही, सरकारच्या धोरणामुळे सगळेच प्रामाणिक शेतकरी कर्जात आहेत; जे शेतकरी अप्रामाणिक आहेत, कोणी आमदार झाले, खासदार झाले, चेअरमन झाले, संचालक झाले तेच इतर मिळकतीतून कर्जफेड करून कर्जाबाहेर राहू शकतात असे सर्व शेतकरी गेली पंचवीस वर्षे जाहीरपणे सांगत आहेत आणि सरकार ऐकत नाही म्हणून जीव देत आहेत. आता अति झाले म्हणून सरकारने एवढ्यावर थांबावे का नाही?

नाही. दिल्लीमध्ये, मुंबईमध्ये महागाईची आरडाओरड चालू झाली आणि महागाईची कारणे शोधता शोधता डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारातील सगळयांनी बोट दाखवले भारताचे कृषिमंत्री शरद पवार यांच्याकडे. महागाईच्या तपासकामात शरद पवारांना मंत्रिमंडळासमोर आरोपीसारखे उभे राहावे लागले आणि 'तुमच्यामुळे अन्नधान्याचे भाव वाढत आहेत' असा त्यांच्यावर आरोप करण्यात आला. मी जर शरद पवारांच्या जागी असतो तर सांगितले असते की, "जर का शेतीमालाचा भाव वाढल्यामुळे महागाई वाढत असेल तर त्याचा मला अभिमान आहे. त्याकरिता काय शिक्षा करायची ती करा." पण, शेतकऱ्यांच्या या 'जाणत्या नेत्या'ने तसे काही केले नाही. उलट, शेतीमालाचे भाव कसे पाडता येतील त्याकरिता पंजाबमधील गव्हाला भाव मिळू नयेत अशी व्यवस्था केली. पंजाबमधील गव्हाला १००० रुपये क्विंटलचा भाव काचकूच करत देणाऱ्या सरकारने परदेशातून

१८०० रुपये क्विंटलने गहू आयात करण्याचे धोरण राबवले. शेतकऱ्यांना चांगला भाव मिळवून देणाऱ्या वायदेबाजारावर निर्बंध लादले. पंडित नेहरूंच्या काळापासून सुरू झालेला, शेतीमालाचे भाव पाडण्याचा धंदाच शरद पवारांनी पुन्हा एकदा चालू केला. खाद्यतेलाच्या आयातीवरील कर माफ केला. तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली. मक्याच्या निर्यातीला बंदी केली, दुधाच्या भुकटीच्या निर्यातीला बंदी केली. वायदेबाजारामुळे सोयाबीनच्या शेतकऱ्याला २७००-२८०० प्रति क्विंटल भाव मिळायला लागला होता त्या वायदेबाजारावर बंदी घालून सोयाबीनचे भाव २००० रुपयांच्याही खाली पाडले आणि 'शेतकऱ्याचं मरण, हेच सरकारचं धोरण' हे कृषिमंत्र्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले.

अनैतिक आणि बेकायदेशीर कर्जामुळे शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येणे, शेतीमालाचे भाव पाडण्याची सरकारी धोरणे, शेतीमालाच्या वायदेबाजारावर बंदी ही शेतकऱ्यांसमोर उभी ठाकलेली 'सुलतानी' संकटे आहेत.

आता शेतकऱ्यांचे दुर्दैव असे की आता 'आसमानी' संकटांचेही ढग आकाशात जमू लागले आहेत. जागतिक हवामानामध्ये बदल घडू लागला आहे. हिंदुस्थानामध्येसुद्धा तापमान ४८ अंशांपर्यंत जाईल की काय आणि थंड झाले तर ते २-३ अंशांपर्यंत उतरेल की काय अशी भीती वाटू लागली आहे. अशी स्थिती झाली तर शेती करायची कशी, या स्थितीत बियाणे कोणती चालतील, कोणती तग धरतील असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर पडला आहे. त्यापलीकडे शेतीमध्ये घालायला पाणी नाही, पाणी असेल तर ते उचलून शेतात टाकायला वीज नाही, वीज नाही तर डिझेल इंजिन वापरावे तर डिझेलचा तुटवडा अशा कचाट्यात शेतकरी सापडला आहे.

या काळात सर्वदूर आणखी एक मोठा बदल घडून आला आहे. ३२ वर्षांपूर्वी मी जेव्हा शेतकरी झालो तेव्हा ज्या जमिनीची किंमत २ ते ५ हजार रुपये होती त्या जमिनीच्या किमती आता ३० लाख, ४० लाख रुपयांपर्यंत वाढल्या आहेत आणि सर्वसाधारण शेतकऱ्याच्या मनातसुद्धा, केवळ थकल्यामुळे असा विचार येऊ लागला की, आजवर आम्ही पुष्कळ सोसले, बापाचे नाव चालवावे म्हणून आम्ही शेती केली, 'सौ के साठ करना, और बाप का नाम चलाना' असे दिसत असले तरी शेती केली; पण, स्वतः जीव द्यावा अशी आता वेळ आली असेल तर आमच्याच्याने शेती निभणार नाही. आईबापांची क्षमा मागून, आजोबापणजोबांची क्षमा मागून की त्यांच्या खानदानाची जमीन आम्हाला चालवता आली नाही, आत्महत्या करून आमच्या परिवाराला अनाथ करण्यापेक्षा ही जमीन विकून बरे पैसे येण्याची ही संधी साधून आयुष्याचे शेवटचे दिवस परिवारासह सुखाने

घालवू या.

या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपण शेतकरी संघटनेच्या अधिवेशनाची घोषणा केली आणि तुम्हा सर्व शेतकऱ्यांना निमंत्रण दिले.

**अधिवेशनाचे विषयसूत्र**

आणि या अधिवेशनाचे घोषवाक्य ठरले, 'पुन्हा एकदा उत्तम शेती'

शेतकऱ्यांनो आत्महत्या करू नका. आपल्या कुटुंबाला अनाथ करू नका? अशा तऱ्हेची नकारात्मक भाषा मी वापरली नाही. शेतकऱ्यांच्या मनामध्ये उत्साह तयार करणारे हे घोषवाक्य आहे – 'पुन्हा एकदा उत्तम शेती'

स्वातंत्र्यानंतरच्या काळातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा इतिहास थोडक्यात असा सांगता येईल. स्वातंत्र्याच्या आधी हिंदी असो, पंजाबी असो, मराठी असो – हिंदुस्थानातल्या सगळ्या भाषांमध्ये, बोलींमध्ये एक म्हण होती – 'उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी'. नोकरी करणाऱ्या माणसाला एकेकाळी लग्नासाठी मुलगी मिळणे अवघड होते. स्वातंत्र्य मिळाले, पंडित नेहरूंचे राज्य आले आणि परिस्थिती बदलत बदलत अशी झाली की आता चांगले चांगले शेतकरी, त्यांना जर जगायचे असेल तर शेतीवर जगता येत नाही याचा कटू अनुभव घेतल्यामुळे आपला मुलगा चपराशी व्हावा याकरिता एकदोन एकर जमीन विकून साहेबाला मलिदा चारतात. पंडित नेहरूंच्याबद्दल आता कितीही गोडवे गाईले जावोत पण इतिहासात त्यांची नोंद करायची झाली तर ती 'ज्या एका पंतप्रधानाने उत्तम शेतीला कनिष्ठ केली आणि जी नोकरी कनिष्ठ होती तिला उत्तम स्थानी आणली अशी व्यक्ती' अशीच करावी लागेल.

आपण या अधिवेशनात शेतकऱ्यांना बोलवले ते 'आत्महत्या करू नका, आज नाही उद्या कर्जफेड होईल' असा धीर देण्यासाठी नाही तर 'शेती ही इतर कोणत्याही व्यवसायापेक्षा श्रेष्ठ आहे हे आपल्याला पुन्हा एकदा दाखवून द्यायचे आहे' असे आवाहन करून बोलावले. शेतीला सर्वश्रेष्ठ कसे बनवायचे याबद्दल गेल्या तीन दिवसांत तब्बल २७ तास चर्चा झाली. त्यासंबंधी ठराव झाले त्यांना तुम्ही सर्वांना घोषणांच्या गजरात आणि टाळ्यांच्या कडकडाटात मान्यताही दिली.

**ठरावांचे महत्त्व**

सगळ्या ठरावांचे सार एका वाक्यात सांगता येईल, 'शेतकऱ्यांनो, जगायचे असेल तर एकच मंत्र जपा – **एटी, ईटी, बीटी, आय्टी.**

**एटी** म्हणजे एरोपोनिक्स् तंत्रज्ञान अर्थात 'विना माती शेती'
**ईटी** म्हणजे इथेनॉल तंत्रज्ञान अर्थात 'शेततेल उत्पादन'
**बीटी** म्हणजे जैविक तंत्रज्ञान आणि

**आय्टी** म्हणजे माहिती तंत्रज्ञान.

या चारही विषयांवर गेल्या तीन दिवसात विस्ताराने चर्चा झाली; पण अधिवेशन आणि अधिवेशनाची विषयसूची जाहीर झाल्यानंतर जगामध्ये आणखी एक गंभीर घटना घडली त्याची चर्चाही या तीन दिवसांत गांभीर्याने झाली.

आतापर्यंत आंदोलन कापसाचे असो, उसाचे असो का गव्हाचे असो. शेतकरी संघटनेला म्हणता येत असे की, विदर्भातील कापसाला भाव मिळत नाही कारण सरकार विदर्भातील कापूस आंध्रात जाऊ देत नाही, मध्यप्रदेशात जाऊ देत नाही, परदेशात जाऊ देत नाही; बाहेरच्या बाजारातील किमती नेहमी चांगल्या असतात आणि आमच्याकडेच कमी असतात. सरकारने बंधने काढावीत म्हणजे सगळे काही ठीक होईल.

गेल्या महिनाभरात सगळ्या जगामध्ये एक आर्थिक अरिष्ट आले आहे. त्यामुळे बँका बंद पडत आहेत. एवढेच नव्हे तर अमेरिका, युरोप, आइसलँड सारख्या विकसित राष्ट्रसमूहांमध्ये हजारोंच्या संख्येने लोक बेकार होत आहेत. हा मोठा धक्का आहे. कारण शेतकरी संघटनेने मांडणी केली की व्यवस्था खुली करा म्हणजे शेतकऱ्यांना भाव आपोआप मिळेल; पण सध्याच्या आर्थिक अरिष्ट्यामुळे आज हिंदुस्थानात मिळणारा भावही आंतरराष्ट्रीय बाजारात मिळेलच याची शाश्वती न राहिल्यामुळे शेतकरी संघटनेने पुढची वाट कोणती काढायची हा यक्ष प्रश्न तयार झाला आहे.

ज्या शेतकरी नेत्यांचा अभ्यास नाही, व्यासंग नाही ती मंडळी अजूनही शेतकऱ्यांच्या नावाने कोणत्या कोणत्या कोपऱ्यामध्ये, १९८० साली शेतकरी संघटनेने वापरलेली वाक्ये आणि वापरलेल्या घोषणा अजूनही वापरतात; पण जग बदलले आहे याची त्यांना कल्पनाही नाही; पण गेल्या तीन दिवसांत मला मोठा सुखद अनुभव आला. प्रतिनिधी मंडपात हजारो प्रतिनिधी होते, माझ्या महाविद्यालयाच्या वर्गात कधीही शंभरच्यावर विद्यार्थी नव्हते. या हजारो प्रतिनिधीतील एक शेतकरी माझ्याकडे आला. तो जगातल्या आर्थिक मंदीने घाबरलेला नव्हता. या आर्थिक मंदीवर वर्तमानपत्रांत भरभरून लिहिले जात आहे. मीही थोडेफार लिहिले आहे. पण माझ्याकडे आलेल्या त्या अ(र्ध)शिक्षित शेतकऱ्याने मला जगाच्या अर्थशास्त्रातले एक तत्त्वज्ञान सांगितले. तो म्हणाला, "साहेब, आपण शेतकरी आहे. जे झाड आपण लावतो त्या झाडाची पानगळ होतच असते. ज्या झाडाची पानगळ होत नाही ते झाड संपले आहे असे समजायचे."

आजच्या सकाळच्या वर्तमानपत्रात अर्थशास्त्रज्ञ पंतप्रधान मनमोहन सिंगांचे एक विधान आले आहे; ते म्हणतात की, 'आपण इतक्या वेगाने विकासाचा दर

वाढवला आहे की आता काही काळ थोडा विश्राम घेण्याची गरज आहे.'

पंतप्रधानांचे विधान आणि माझ्या शेतकरी विद्यार्थ्याने दिलेले पानगळीचे उदाहरण किती जुळणारी आहेत!

समाजवादाच्या काळात सगळीकडे कायमचीच बेकारी होती, नोकरीतून कोणाला काढून टाकीत होते असे नाही, बेकारीच होती आणि समाजवादाच्या काळात काही केले तरी विकासाचा दर ३ टक्क्यांच्या वर कधी गेला नाही. काही का असेना, खुल्या व्यवस्थेमुळे, एकदा का होईना, आम्हाला आकाशात भरारी मारून, दोन्ही पंख हलवून ८ टक्के, ९ टक्के, १० टक्के विकासदराच्या स्वच्छ वाऱ्याचा अनुभव घ्यायला मिळाला. आता एखादा दिवस थोडे खाली उतरून एखाद्या पक्ष्याप्रमाणे झाडावर बसून विश्रांती घेऊ. हे माझ्या त्या अशिक्षित शेतकरी विद्यार्थ्याच्या बोलण्यातील सार होते. संपूर्ण जगातील मंदीला 'पानगळी'ची उपमा देणे हे प्रतिभेचेच द्योतक आहे.

अधिवेशनाचे निमंत्रण देऊन झाल्यानंतर आणखी एक समस्या उभी राहिली. मी महाराष्ट्रातीलच आहे. जन्मभर एका गोष्टीवर मी विश्वास ठेवला. मी शेतकरी घरातला नाही, शेतकरी जातीचा नाही तरीसुद्धा शेतकऱ्यांच्या कामाकरिता मी माझे सगळे आयुष्य झोकून दिले आणि शेतकऱ्यांनीही मला त्यांच्या पोटच्या पुढारी पोरांपेक्षा भरभरून प्रेम दिले. जो मनुष्य, जन्माच्या अपघाताने जे मिळते त्याचा अभिमान बाळगतो त्याला मी 'क्षुद्र' हा शब्द वापरतो. माणसाचा जन्म म्हणजे एखादा अर्ज करून मिळविण्याची गोष्ट आहे काय? मी ब्राह्मण घरात जन्मलो म्हणून ब्राह्मण्याचा अभिमान बाळगणे क्षुद्रपणाचे ठरले असते. ब्राह्मण जन्मलो तरी ब्राह्मण्याचा अभिमान न बाळगता शेतकरी बनलो तसेच पुरुष म्हणून जन्माला आल्याचा अभिमान न बाळगता शेतकरी महिला आघाडीच्या सेवेकरिता आयुष्य दिले. मग, महाराष्ट्रात जन्मला आहात म्हणून मराठी भाषेचाच अभिमान बाळगा असे जर मला कोणी सांगू लागले तर माझे उत्तर मी आधीच दिले आहे की, "मला माझ्या अनुभवांची अभिव्यक्ती साऱ्या जगासमोर करायची आहे; ज्या भाषेमध्ये मला जगाशी संवाद साधता येईल, जी भाषा वापरल्यानंतर माझा शब्द त्याच्यापर्यंत पोहोचल्याची पावती समोरच्याच्या डोळ्यात मला दिसेल ती भाषा मी वापरीन. वेगवेगळ्या विषयांनुसार आणि समोरच्या श्रोत्यांनुसार कोणती भाषा वापरायची हे ठरवण्यास माझा मी स्वतंत्र आहे. माझ्या आत्म्याच्या आविष्काराच्या आड येण्याचा कोणालाही अधिकार नाही."

तुमची भाषा अवश्य वापरा, तिचा अभिमानही बाळगा. पण त्याच्याकरिता दुसऱ्या भाषेच्या लोकांचा राग करण्याचे कारण काय? महाराष्ट्राच्या लोकांचे

आणि हरयाणातल्या लोकांचे किंवा अन्य कोणत्याही राज्यातील लोकांचे दुःख काही वेगळे नाही. मी हरयाणात गेलो तर ते काही असे म्हणत नाहीत की तुम्ही आमच्या भाषेत बोलले पाहिजे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हरयाणाच्या मुख्यमंत्र्याबरोबर चर्चा करतात की हरयाणातल्या मराठी माणसाचे संरक्षण कसे व्हावे ही गोष्ट आकलनाच्या पलीकडची आहे. ज्या राज्याने सबंध देशात राष्ट्रभक्तीची ज्योत चेतवली, ज्या राज्याने स्वातंत्र्यलढ्यात सगळ्यात जास्त हुतात्मे दिले, ज्या राज्याने सगळ्यात थोर नेते दिले त्या महाराष्ट्र राज्याने जर का मराठी भाषक आणि बिगरमराठी भाषक असे वाद घालायला सुरुवात केली तर असे वाद घालणाऱ्या नेत्यांनी विचार करायला पाहिजे, की आपला महाराष्ट्र भारत देशात ठेवायचा आहे का वेगळा करायचा आहे. असा विचार करून मग मराठी, बिहारी, उत्तर प्रदेशी असे वाद घाला. गेल्या सव्वीस वर्षांत आपली शेतकरी चळवळ देशभर पसरली, प्रत्येक राज्यात आपल्याला सख्ख्या भावांसारखे शेतकरी नेते आणि कार्यकर्ते मिळाले. त्यांचे आणि आपले शत्रुत्व कसे काय होऊ शकते? या वादाचाही सोक्षमोक्ष लावायची आवश्यकता आहे.

आणखी एक वाद सुरू झाला आहे. मालेगावला बाँबहल्ला झाला. त्याचा पोलिस तपास ज्या तऱ्हेने होतो आहे त्यावरून असे वाटू लागते की बाँबहल्ल्यांचा शोध लावताना काही वेळा जाणीवपूर्वक आपल्याला यावेळी सूत्रधार मुसलमानच शोधायचा आहे असे ठरवून शोध केला जात असावा आणि मुसलमान आतंकवाद्यांची यादी खूप मोठी झाली आता आपण हिंदू शोधून काढू या असाही विचार केला जात असावा. हे खरे का खोटे हे इतिहासच ठरवील; पण असा राजकारण्यांचा डाव असावा अशी शंका मनात डोकावतेच.

पण, त्याहूनही धोक्याची गोष्ट जी शेतकरी आंदोलनाच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहे की जर का लष्करातील उच्च अधिकारी आतंकवादाकडे वळत असतील, आणि लष्करातील साधेसुधे जवान काश्मीरच्या आघाडीवर लष्कराची नोकरी करण्यापेक्षा जीव दिलेला बरा म्हणून आत्महत्या करीत असतील तर सरकारने नीट विचार केला पाहिजे की त्यांचे जे अल्पसंख्याकांच्या तुष्टीकरणाचे धोरण आहे; त्याहीपुढे बहुसंख्याक शेतकरी मेले तरी चालेल, बहुसंख्याक हिंदू मेले तरी चालेल पण दलित, आदिवासी आणि मुसलमान हे अल्पसंख्याक घटक असंतुष्ट राहता कामा नये असे जे धोरण आहे त्यामुळे बहुसंख्याकांमध्ये असंतोष पसरून तर असे होत नाही ना? हे असे चालत राहिले तर याचा धोका संपूर्ण देशाला होऊ शकतो त्यावर सरकारने गंभीरपणे विचार करायला पाहिजे.

**पोशिंदा अतिरेकी बनत नाही**

सबंध देशामध्ये – महाराष्ट्रात, काश्मिरात, आसाममध्ये, दिल्लीमध्ये – बॉँब फुटत आहेत. हातामध्ये बॉँब घ्यावा आणि आपल्यावर पिढ्यान्‌पिढ्या अन्याय करणाऱ्या घटकांवर बॉँब टाकावा असा नैतिक अधिकार सबंध देशामध्ये फक्त एकाच समाजाला आहे आणि तो समाज आहे शेतकरी समाज. या शोषणकर्त्यांनी दीड लाख शेतकऱ्यांना आत्महत्या करायला लावली; शेतकरी समाजाने या शोषणकर्त्यांवर टाकण्यासाठी बॉँब हातात घेतला तर समजण्यासारखे आहे; पण इतका अन्याय सोसूनही शेतकऱ्यांनी हाती बॉँब घेतला नाही याबद्दल शेतकरी समाजाचे अभिनंदन करायला हवे. कारण जे बंदुकीच्या जोरावर जगतात ते बंदुकीनेच मरतात; आम्ही शेतकरी बंदुकीने जगणारे नाही. आम्ही आंदोलने केली, पण शांततापूर्ण मार्गांनी केली.

मला पत्रकारांनी विचारले की आता तुमचे वय झाले म्हणून तुमची भाषा जळजळीत आंदोलनाची नाही असे वाटते. माझे वय झाले हे खरे आणि वय लपवण्याची मला गरजही नाही.

**आंदोलने का?**

१९८० साली मी आंदोलने केली. का केली? आंदोलने केली कारण मी चांगला अध्यापक होतो. चांगला शिक्षक केवळ शब्दांनी शिकवत नाही, शब्दांनी शिकवता शिकवता तो प्रात्यक्षिके करून घेतो. हे सर्वांना माहीत आहे. शेतकरी संघटनेचे प्रत्येक आंदोलन हे एक एक प्रात्यक्षिक होते. १९८२ साली एक प्रश्न उपस्थित झाला, की शेतकऱ्याच्या मालाचे भाव पाडण्याकरिता सरकार पाकिस्तानकडूनसुद्धा तांदळाची आयात करते, असे का? त्याचे उत्तर मी दिले, की हिंदुस्थान सरकार पाकिस्तानला शत्रूराष्ट्र मानीत असले तरी शेतकऱ्यांच्या मालाचे भाव पाडण्यासाठी पाकिस्तानातून तांदळाची आयात करते, जास्त भाव देऊन आयात करते हे 'हे सरकार शेतकऱ्याचे नाही; शेतकऱ्याचे मरण, हेच सरकारचे धोरण आहे' याचा प्रात्यक्षिक पुरावा आहे. प्रत्येक आंदोलनात, शेतीमालाच्या भावाचे अर्थशास्त्र प्रात्यक्षिकाच्या साहाय्याने शेतकऱ्यांना समजावले. १९७८ साली दिल्लीमध्ये कांद्याचा भाव वाढून तो फक्त १ रुपया किलो झाला आणि सरकारने लगेच कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली. त्यावेळी दिल्लीच्या सिनेमागृहातील बाल्कनीचे तिकीट अडीच रुपये होते; आज ते अडीचशे रुपये झाले आहे. बाल्कनीचे तिकीट अडीच रुपये असताना दिल्लीकरांना कांद्याचा भाव एक रुपयापर्यंत चालत होता. साधे त्रैराशिक मांडले तर अडीचशे रुपये बाल्कनीच्या तिकिटाच्या काळात कांद्याचे भाव शंभर रुपये क्विंटल होईपर्यंत कांद्यावर निर्यातबंदी घालण्याचे काहीच कारण नाही. हेही एक प्रात्यक्षिकच आहे. हे सरकार शेतकऱ्यांचे

शत्रू कसे आहे हे शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकांद्वारे समजावून देण्यासाठी मी आंदोलने केली. मला आंदोलने करण्याची हौस नाही, अटक करवून घेण्याचीही हौस नाही. केवळ एक चांगला शिक्षक म्हणून मी या शेतकरी आंदोलनात पडलो. माझा हा ज्ञानयज्ञच आहे असे मी मानतो.

**तीन दिवसांचा ज्ञानयज्ञ**

अधिवेशनाच्या या तीन दिवसांत ज्या चर्चा झाल्या त्या या ज्ञानयज्ञाचाच भाग आहे. या चर्चांतून तयार झालेले ठराव सर्व मिळून फक्त सहा पानांवर उतरवून काढलेले आहेत. वरवर वाचताना एखाद्याला वाटेल की काय हे रटाळ लिहिले आहे! पण एक एक ओळ विज्ञानबुद्धीच्या भिंगाखाली धरून वाचा म्हणजे मग तुम्हाला त्या ठरावांचे महत्त्व कळेल. या काही केवळ भीमगर्जनी बाष्कळ घोषणा नाहीत. या ठरावांत काय काय आहे?

शेतकरी संघटना सर्वच शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करणार आहे. तोपर्यंत धीर धरा; एकानेही एका पैशाचीसुद्धा कर्जफेड करू नये. तुमच्या गावामधील जी विविध सहकारी सेवा संस्था आहे त्या संस्थेतून तुमच्या कर्जवसुलीच्या नोटिसा निघत असतात आणि वसुलीची अंमलबजावणी होते. या विविध सहकारी सेवा संस्थेला अशी अन्याय्य कारवाई करता येऊ नये त्यासाठी तुम्हाला जे सुचेल ते करा.

शेतकरी संघटनेच्या ११व्या अधिवेशनाच्या या ठरावांमध्ये एरोपोनिक्स्, जैविक तंत्रज्ञान, इथेनॉल तंत्रज्ञान एवढेच नव्हे तर वायदा बाजारामध्ये भाग घेण्याकरिता गणकयंत्राधारित माहिती तंत्रज्ञान यांची माहिती आहे.

**इथेनॉल 'चरखा'**

ठराव झाल्याप्रमाणे चारपाच शेतकऱ्यांनी मिळून इथेनॉल बनवण्याची यंत्रणा चालू केली तर कदाचित पोलिस येऊन छापा घालतील; पण शेतकरी महिला आघाडीनेही कंबर कसली आहे की ज्या स्वयंपाक घरात आपण आमटीभात शिजवतो त्याच स्वयंपाकघरात इथेनॉलही बनवू शकतो, ते आपण करून दाखविणार आहोत. तिथे काही पोलिस येऊ धजणार नाही. जर का शेतकऱ्याच्या शेतात तयार होणाऱ्या शेततेलाला फक्त २१ रुपये ५० पैसे भाव आणि अरबांच्या देशांतून आयात केलेल्या तेलाला ५६ रुपये भाव असेच जर सरकारचे धोरण चालणार असेल तर स्वयंपाकघरातील चुलीवर घरोघर इथेनॉल बनविण्याचा शेतकरी महिला आघाडीने केलेला निर्धार महाराष्ट्रभर आंदोलन म्हणून चालवला जाईल. इथेनॉल कसे बनवायचे ते या अधिवेशनानिमित्त भरवलेल्या प्रदर्शनात प्रात्यक्षिकासह समजावून दिले आहे. तुम्ही शेतकरी अशिक्षित असलात तरी अडाणी नाही; तुम्ही शहाणे आहात आणि शहाण्यांनी शब्दांनी शिकायचे असते.

आतंकवादी जसे बॉँब कसे बनवायचे याच्या बारीकसारीक सूचना देतात तशा इथेनॉल बनवण्याच्या सूचना तुम्हाला देण्याची गरज नाही. तुम्ही तुमचे तुमचे यंत्र आणि तंत्र बनविण्यास समर्थ आहात. तुम्हाला ज्या ताकदीने शक्य असेल त्या ताकदीने इथेनॉल तयार करा. शेततेलाचे उत्पादन हा शेती उत्तम करण्याचा राजमार्ग आहे. त्यामध्ये सरकारने अडथळा तयार केला आहे. शेतकऱ्याच्या शेतामध्ये जे जे काही तयार होते – हिरवा पाला, केळीची सालेसुद्धा – त्या सर्वांपासून इथेनॉल तयार होऊ शकते.

पण सरकार म्हणते तुम्हाला इथेनॉल तयार करायचे असेल तर आमच्याकडून परमिट घेतले पाहिजे; तुम्ही इथेनॉल तयार केले तरी तुम्हाला ते विकता येणार नाही, तुम्हाला ते वापरता येणार नाही, कोणाच्या गाडीमध्ये पेट्रोलमध्ये इथेनॉल किती प्रमाणात मिसळायचे तेही सरकारच ठरवणार; इथेनॉलची किंमत पेट्रोल कंपन्या ठरवणार. म्हणजे तुम्ही इथेनॉल तयार केले तरी त्यातून निर्माण होणारी लक्ष्मी तुमच्या हाती राहू नये असा सरकारने चंग बांधला आहे.

म्हणजे इथेही समरप्रसंग आहे; पण घाबरण्याचे कारण नाही. अशा प्रकारची लढाई आपण दहा वर्षापूर्वी लढून जिंकली आहे. ज्यावेळी जैविक बियाणे आले त्यावेळी आपण त्याच्या बाजूने उभे राहिलो. तेव्हा जैविक तंत्रज्ञानाचे विरोधक म्हणाले की जैविक बियाणे आले तर हिंदुस्थानातील बियाणे उत्पादक कोठे जातील? पण आज हिंदुस्थानातील डझनांनी बियाणे उत्पादक नवीन नवीन जैविक बियाणी – अधिक उत्पादन देणारी, किडींना प्रतिकार करणारी – तयार करून शेतकऱ्यांना पुरवू लागले आहेत. पूर्वी ज्या जमिनीत दोनचार क्विंटल कापूस पिकण्याची मारामार होती तिथे आज वीसवीस क्विंटल कापूस पिकू लागला आणि हिंदुस्थान दुसऱ्या क्रमांकाचा कापूस उत्पादक देश बनला याचे सारे श्रेय कापसाच्या जैविक बियाण्याला BT ला आहे. सरकार जैविक बियाण्याला परवानगी द्यायला तयार नव्हते, पण आपण त्या तंत्रज्ञानाच्या बाजूने उभे राहून प्रसंगी कायदेभंगाची तयारी ठेवली म्हणून सरकारला माघार घ्यावी लागली. आज पुन्हा एकदा आपली परीक्षा होणार आहे.

स्वातंत्र्य आंदोलनात महात्मा गांधी म्हणायचे की मला स्वदेशीच्या चळवळीकरिता कापडाच्या गिरण्या काढायच्या नाहीत, मला लोकांच्या हाती चरखा द्यायचा आहे; गिरण्यांवर बंदी येऊ शकते, चरख्यांवर बंदी येऊ शकत नाही. आपल्या प्रतिनिधी अधिवेशनात इथेनॉल निर्मितीच्या तंत्रज्ञानाची माहिती द्यायला एक आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ज्ञ आले होते त्यांना मी म्हटले की इथेनॉलची फॅक्टरी कशी काढायची यापेक्षा इथेनॉलसाठी ‘चरखा’ कसा बनवायचा ते मला

सांगा. हा चरखा शेतकऱ्याच्या हाती देण्याचे काम गेल्या २७ तासांच्या ज्ञानयज्ञाने केलेले आहे.

**वसा उत्तमशेतीचा**

शेतकऱ्याच्या शेतामध्ये लक्ष्मी आली आहे. देशातल्या इतर लोकांची दिवाळी पंधरा दिवसांपूर्वी झाली. शेतकऱ्याच्या शेतात आलेल्या लक्ष्मीच्या पूजनाचे काम आपण गेले तीन दिवस येथे केले. या खुल्या अधिवेशनाच्या शेवटी तुम्हा सर्वांच्या बरोबरीने मी एकत्र प्रार्थना करेन की शेतकऱ्याच्या शेतात आलेल्या या नव्या अवतारातील लक्ष्मीचे पूजन भक्तिभावाने करू या, निष्ठेने करू या आणि संपूर्ण शेतीव्यवसायाचा चेहरामोहरा बदलवून, स्वातंत्र्य मिळण्याआधी आणि नेहरूंचे काळेकुट्ट राज्य येण्याआधी शेती जशी उत्तम होती तशी शेती पुन्हा एकदा उत्तम झाल्याचे पाहू या.

*(१० नोव्हेंबर २००८ - शेतकरी संघटना ११वे अधिवेशन, औरंगाबाद.)*

*(शेतकरी संघटक २१ डिसेंबर २००८)*

■■

# रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना

देशातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थिती इतकी गंभीर आणि गुंतागुंतीची झाली आहे की येत्या लोकसभा निवडणुकीत शेतकरी संघटनेने आणि स्वतंत्र भारत पक्षाने घ्यावयाच्या भूमिकेसंबंधी विचारविनिमय करण्यासाठी बोलाविलेल्या या बैठकीला येताना, अगदी आज सकाळपर्यंत, काय भूमिका घ्यावी यासंबंधी माझ्या मनात काही दिशा स्पष्ट नव्हती. बैठकीला किती लोक येतील अशीही मनात शंका होती. कोणत्या रस्त्याने जावे म्हणजे शेतकऱ्यांचा आपल्याला पुरेसा पाठिंबा मिळेल असा प्रश्नही मनात घुमत होता.

या मन:स्थितीने मला अगदी सुरुवातीच्या काळात नेले. ९ नोव्हेंबर १९८० ला म्हणजे नाशिकचे कांदा-ऊस आंदोलन सुरू व्हायचे होते त्याच्या आदल्या रात्री झोप लागेना. मनात फक्त एकच चिंता दाटली होती की नाशिकच्या रेल्वे लाईनवर शेतकरी खरोखरी येतील ना? पण, मध्यरात्रीनंतर उशिरा बागलाणमधील एका शेतकऱ्याचा फोन आला, तो म्हणाला, "आम्ही शंभरेक बैलगाड्या घेऊन आंदोलनाच्या ठरलेल्या ठिकाणी आलो आहोत. आता रेल्वे लाईनवर बसू की सकाळी ८ वाजेपर्यंत थांबू?" या फोनमुळे माझ्या मनात आंदोलनाविषयी ज्या काही शंका होत्या त्या सगळ्या मिटल्या.

९ नोव्हेंबर १९८० च्या त्या रात्रीप्रमाणेच आज सकाळीही या बैठकीला येण्याआधी माझी मन:स्थिती मोठी शंकाकुल झाली होती. या बैठकीला येऊन फारसे काही काम होईल, काही महत्त्वपूर्ण निर्णय घेता येतील असे खरेच त्यावेळी माझ्या मनाला वाटत नव्हे; पण या बैठकीत तुम्ही कार्यकर्त्यांनी भाषणे करून जी काही मांडणी केली त्यावरून मला विश्वास वाटू लागला आहे की आपल्याला जी दिशा शोधायची आहे ती, मला सकाळी वाटत होते तितकी काही अंधकारमय नाही. तुम्ही सगळ्यांनी मिळून जी काही मांडणी केली आहे त्यावरून

निर्णय घेणे आता कठीण राहिलेले नाही.

स्वभापचे महाराष्ट्राचे अध्यक्ष वामनराव चटप यांना येण्यास उशीर झाल्यामुळे आपल्याला सवड मिळाली. त्या वेळात आपण, येत्या निवडणुकीत प्रचारासाठी उपयुक्त ठरतील अशा फिल्म्स बनवल्या आहे त्या आपण पाहू शकलो. त्यात आपल्या शेतकरी आंदोलनाच्या गेल्या ३८ वर्षांच्या अनेक घटना आपण पाहिल्या; आपण या काळात काय काय सहन केले त्याचे त्यातून स्मरण झाले.

स्वित्झर्लंडमधील सुखासीन व समृद्ध जीवन सोडून भारतात येऊन मी शेती करायला सुरुवात केली त्यावेळी माझ्या मुली शाळेमध्ये शिकत होत्या. एके दिवशी शाळेतून परत आल्यावर माझ्या मुलीने त्यांची सहल काश्मीरला जाणार असल्याचे सांगून त्यासाठी चारपाचशे रुपयांची मागणी केली. माझी आर्थिक स्थिती आता स्वित्झर्लंडमधील राहिली नव्हती; आधीच्या आयुष्यात जमा केलेली एक एक चीजवस्तू विकीत घरसंसार चालवत होतो. मी मुलीला सांगितले की आता आपल्याला असा खर्च करणे परवडणार नाही. तिला हे सांगितले, पण रात्रभर मला झोप आली नाही. मनात सारखे विचार येऊ लागले, की ज्यामुळे आपल्या मुलींना हौसमौज करता येऊ नये असे जे आपण करतो आहोत ते योग्य आहे का? आपण आपल्या घरातील लोकांना जे दुःख देतो आहोत ते देऊन अखेरी आपल्या अंगीकृत कार्यात काही हाती लागणार आहे का? शेतीच्या अवस्थेत काही बदल होणार आहेत काय?

आणखी एक आठवण, जी मी फारशी कोणाला सांगत नाही, माझ्या मनाला नेहमी डाचत असणारी आहे. शेतकरी संघटनेने महाराष्ट्रात सुरू केलेली शेतकरी चळवळ देशभरात उभी राहिली तरच शेतकऱ्यांच्या दुःस्थितीत काही फरक पडेल, फक्त महाराष्ट्रातले प्रयत्न पुरे पडणार नाहीत हे लक्षात घेऊन १९८१ च्या ऑक्टोबरमध्ये देशभरातील समविचारी शेतकऱ्यांच्या संघटनांच्या नेत्यांची आम्ही एक बैठक वर्ध्याला बोलावली होती. मी तिकडे जाण्याची तयारी करीत असताना माझ्या पत्नीने–लीलाने माझ्याकडे हट्ट धरला की मी वर्ध्याच्या या कार्यक्रमाला जाऊ नये. पण माझा वर्ध्याला जाण्याचा निश्चय पक्का आहे हे लक्षात आल्यानंतर ती माऊली मला मोठ्या तळतळाटाने म्हणाली, "नको म्हणत असतानासुद्धा तुम्ही मला आणि मुलींना सोडून जात आहात; हे शेतकरीसुद्धा एक वेळ तुम्हाला सोडून जातील हे लक्षात ठेवा." शेतकरी संघटनेच्या कुटुंबात आजवर वेळोवेळी जे काही घडले आहे आणि घडते आहे ते पाहिले की मला असे वाटते की माझ्या पत्नीचा शाप खरा ठरला आहे.

मी या बैठकीला येताना आपल्या आंदोलनाच्या इतिहासाचा विचार करीत होतो. ज्यांच्या आधाराने सुरुवातीची आंदोलने उभी राहिली ती मंडळी इतक्या अल्पबुद्धीची आणि ऱ्हस्वदृष्टीची ठरली की ज्यांची बुद्धी त्यांच्या त्यांच्या गावातालुक्याच्या पलीकडे जात नाही, ज्यांची बुद्धी स्थानिक साखर कारखान्याच्या किंवा सहकारी संस्थेच्या राजकारणाच्या पलीकडे जात नाही. आपला स्वार्थ जरा कोठे साधला जातो आहे असे म्हटल्यानंतर शेतकरी संघटनेला सोडून ते त्या स्वार्थाच्या मागे धावले. अगदी माधवराव खंडेराव मोरेंच्या शब्दांत सांगायचे झाले तर 'मांजरासमोर तुम्ही किती मिठाई ठेवली तरी ती खात असताना उंदीर दिसला तर मांजर उंदराच्या मागे पळत सुटते' हा अनुभव मी जसा सुरुवातीला घेतला तसा तो पुढेही येत राहिला. ज्यांना मी अत्यंत प्रेमाने मुलासारखे वागवले, वाढवले; माझ्या हाती जी काही देण्यासारखी साधने होती ती त्यांच्या हाती दिली अशी मंडळीही शेतकरी संघटनेपासून दूर गेली एवढेच नव्हे तर शेतकरी संघटनेपासून दूर गेल्यानंतर 'शेतकरी संघटना आणि प्रामुख्याने शरद जोशी यांना शिव्या देणे' हाच एक कलमी कार्यक्रम त्यांनी राबवला. आता तर आमचीच संघटना खरी म्हणून काही मंडळींनी वेगळी चूल मांडली आहे आणि ते शेतकरी संघटनेचीच भाषा बोलत असल्याने काही भोळेभाबडे पाईक संभ्रमाने त्यांच्यासमोर जाऊन बसतात.

महिनाभरापूर्वी अंबाजोगाईला श्रीरंगराव मोरे यांचा अमृतमहोत्सव सत्कार समारंभ झाला. मी निवडणुकांच्या तोंडावर शेतकरी संघटकच्या २१ जानेवारी २००९ च्या अंकातील 'आता देश वाचविणे फक्त मतदारांच्या हाती' या लेखातून जो विचार मांडला आहे, तो प्रथम त्यावेळी मांडला. त्यालाही एक औचित्य होते. कारण श्रीरंगनानांच्या याच अंबाजोगाईत त्यांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षण शिबिरात मी जी काही शेतकरी संघटनेच्या अर्थशास्त्राची मांडणी केली त्यावरूनच शेतकरी संघटनेचे बायबल म्हटल्या गेलेल्या 'शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती' या पुस्तकाची निर्मिती झाली. त्यावेळी, म्हणजे १९८० साली शेतीक्षेत्राची आणि शेतकऱ्यांची परिस्थिती वेगळी होती, आज वेगळी आहे. वेगळी आहे म्हणजे त्या वेळचे प्रश्न सुटले आहेत असे नाही. आजही शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळू नये हे सरकारचे धोरण चालूच आहे. 'शेतकरी संघटना विचार आणि कार्यपद्धती' या पुस्तकात, भाव पाडण्याची एक कारवाई म्हणून मी डाळीच्या आयातीचे उदाहरण दिले आहे. आजही सरकारने दहा हजार टन डाळींची आयात करण्याचा निर्णय घेऊन डाळीचे भाव पाडण्याचे कारस्थान सरकारने आखले आहे. डाळीचे भाव पडले तर शहरातील लोकांवर काही आकाश

कोसळणार नाही; अजूनही ते, महागाई वाढली असली तरी, सोन्याचांदीच्या दुकानांत गर्दी करून सोन्याचांदीची खरेदी करतात. या लोकांना डाळी थोड्या महाग किमतीने घ्यायला लागून शेतकऱ्यांना जर दोन पैसे जास्त मिळाले तर सरकारला त्यात दुःख व्हायचे काय कारण आहे? डाळींची आयात, खाद्यतेलाच्या आयातीला मुक्तदार, मक्याच्या, तांदळाच्या निर्यातीवर बंदी, दूध पावडरच्या निर्यातीवर बंदी, शेतीमालाच्या वायदेबाजारावर बंदी अशी शेतीमालाचे भाव पाडणारी सगळीच धोरणे सुरूच आहेत.

त्याशिवाय, एकेका शेतीमालाचा भाव मागत राहण्याऐवजी शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचा जो कार्यक्रम शेतकरी संघटनेने ठरवला त्या कार्यक्रमातून शेतकऱ्यांना फसवून बाजूला काढण्याकरिता हजारो कोटी रुपयांची कर्जमाफीची योजना सरकारने जाहीर केली. कर्जमुक्तीच्या मागणीपासून ढळलेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्षात फायदा काहीच झाला नाही. फायदा झाला तो, शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे ज्या सहकारी बँका बुडायला आल्या होत्या त्यांचा झाला. कर्जबाजारी झाले म्हणून शेतकरी कर्ज घ्यायला येत नाहीत, त्यामुळे या सहकारी बँकांची कर्जाची दुकानदारी सुरू राहावी म्हणून केवळ सरकारने शेतकऱ्यांच्या नावाने ही कर्जमाफी जाहीर केली.

१९८० पेक्षा आजची परिस्थिती वेगळी असली तरी जुने प्रश्न सुटलेले नाही. पण त्यांच्याबरोबर, औरंगाबाद अधिवेशनात ज्यांच्यावर चर्चा झाली असे, नवीन प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहेत. हवामान बदलते आहे, उष्णतामान वाढत आहे, थंडी वाढणार आहे, पावसाळा चार महिन्यांचा एकाच महिन्यात कोसळणार आहे, वगैरे वगैरे. या परिस्थितीत आजपर्यंत आपल्या सवयीची झालेली आकाशाखालील शेती, म्हणजे सूर्याला जी दिसते ती शेती यापुढे अशक्य होणार आहे. आता नवीन प्रकारची शेती करण्याची आवश्यकता आहे, ज्यावर चर्चा करण्याकरिताच शेतकरी संघटनेचे औरंगाबाद येथील अधिवेशन भरवले होते. शेतकऱ्यांना अत्यंत कठीण दिवस येत आहेत.

नानांच्या त्या सत्कारसमारंभात ही मांडणी करीत असताना तेथे, सुदैवाने, आपल्यातून फुटून गेलेले काही मित्रही होते. मी अत्यंत प्रामाणिकपणे म्हटले की तुमच्यापैकी काही जणांना जर असे वाटले असेल की आपल्याला लाडक्या पोराची वागणूक मिळाली नाही, सावत्रपणे वागवले गेले; आपल्याला संघटनेत फारसे महत्त्व मिळाले नाही असे ज्यांना वाटत असेल तर ते माझ्या चुकीमुळे असेल, त्याबद्दल मी सर्वांची माफी मागतो; पण शेतकऱ्यावर इतका कठीण प्रसंग आला असताना शेतकऱ्यांच्या वेगवेगळया राहुट्या टाकू नका; सगळ्या

शेतकऱ्यांना एकत्र ठेवा. सगळे शेतकरी जर एकत्र राहिले नाहीत तर शेतकऱ्यांना बरे दिवस कधीच दिसणार नाहीत. कोणतीही चळवळ असो – दलितांची असो, आदिवासींची असो, मुसलमानांची असो – सगळेजण एक होतात. पण शेतकऱ्यांचा प्रश्न घ्यायचा झाला तर फुटाफूट होते. कोणाला नेता व्हायचे असते, कोणाला आणखी काय व्हायचे असते, कोणाला आणखी काय साधायचे असते. शेतकऱ्यांची एकजूट होऊन, शेतकऱ्यांच्या लुटीवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेला सुरुंग लागू नये अशी कल्पना बाळगणारे लोक अशा फुटीरांना आधार द्यायला टपलेलेच असतात. ज्या लोकांनी कर्जमाफीचे आणि वीजबिल माफीचे खोटे आश्वासन देऊन सत्ता आल्यानंतरसुद्धा कर्जमाफी केली नाही त्यांच्या मदतीने शेतकरी संघटनेला कमकुवत करू पाहणारी माणसे शेतकरी संघटनेची असूच शकत नाहीत. अशा लोकांचे काय करायचे ते शेतकऱ्यांनी आपले आपण ठरवावे. मला मात्र वाटू लागले आहे की माझ्या पत्नीचा शाप मला भोवतो आहे आणि म्हणून ही सगळी फुटाफूट होते आहे. आज जर का आपण सगळे एकत्र असतो तर आज निवडणुकीचा निर्णय घेणे कठीण गेले नसते आणि शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणेही कठीण राहिले नसते.

स्वातंत्र्य मिळाल्याला पन्नास वर्षे झाल्यानंतर, १९९८ साली आपण अमरावतीला जनसंसद भरवली आणि देशाच्या त्या पन्नास वर्षांच्या कारभाराचा लेखाजोगा काढला. आज त्यालाही दहा वर्षे होऊन गेली आणि भारतीय गणराज्याचीही ६० वर्षे पुरी होत आहेत. तरीसुद्धा, आपल्या देशाची परिस्थिती अधिकाधिक बिकट का होत चालली आहे? इंग्रज गेल्यानंतर शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारेल अशी आशा वाटली होती पण शेतकरी परिस्थितीने हतबल होऊन लाखांच्या संख्येने आत्महत्या करतात असे का व्हावे? शेतकरीच नव्हे तर अगदी सर्वसामान्य माणसालासुद्धा आपल्या घरातील मुलगा किंवा मुलगी घराबाहेर गेली तर संध्याकाळी हातीपायी धड, सुखरूप घरी परत येईल का नाही याबद्दल खात्री वाटत नाही ही परिस्थिती स्वतंत्र हिंदुस्थानात का तयार झाली? वर उल्लेख केलेल्या माझ्या 'आता देशाला वाचविणे फक्त मतदारांच्या हाती' या लेखात मी याची कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्यांनी हा लेख वाचला नसेल त्यांनी तो काळजीपूर्वक वाचा, दोनदा वाचा, तीनदा वाचा आणि विचार करा.

एखाद्या उपाशी माणसासमोर भरलेले ताट येताच तो जसं बकाबका खातो तसे स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर गोऱ्या इंग्रजांनी सोडून दिलेल्या सत्तेवर समाजवादाचा घोष करीत जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली आलेल्या काळया इंग्रजांना,

त्या सत्तेचा लाभ सर्व जनतेला करून देण्याऐवजी स्वत:च बकाबका खाण्याची दुर्बुद्धी का झाली या प्रश्नाचे उत्तर शोधायला हवे.

त्यानंतर १९९१ साली खुली व्यवस्था आली आणि आता खुली व्यवस्थाही उपयोगाची नाही की काय अशी भीती तयार होऊ लागली आहे याचा अर्थ काय हे समजावून सांगणारा एकही अर्थशास्त्रज्ञ या देशात नाही ही मोठी दु:खाची गोष्ट आहे. आज जी काही मंदी आलेली आहे त्यासंबंधी मी या लेखामध्ये लिहिले आहे. ही मंदीची स्थिती सुधारण्याआधी अजूनही बिघडणार आहे. हा काही खुल्या व्यवस्थेचा दोष नाही. स्वातंत्र्यानंतर आपल्या देशात सत्तेचे ताट पुढे आल्यानंतर जसे त्यांनी बकाबका खाल्ले तसेच खुली व्यवस्था आल्यानंतर आपल्यामधील 'हर्षद मेहता' किंवा 'राजू आहेर' यांनासुद्धा किती खाऊ आणि किती नको असे झाले आहे आणि त्यामुळे कायदा व सुव्यवस्था ढासळून मंदीची अवस्था आणखी बिकट होणार आहे. आज फक्त कॉम्प्युटरच्या धंद्याला सुरुंग लागला आहे, यापुढे सुरुंग 'मोबाईल'च्या धंद्याला लागणार आहे असा माझा कयास आहे.

१९९१ साली मनमोहनसिंगांनी खुली व्यवस्था आणली, शेतकरी आंदोलनाच्या रेट्यामुळे देशाने जागतिक व्यापार संघटनेच्या करारावर सही केली. आता पुन्हा समाजवादी व्यवस्थेचे नाव कोणी घेणार नाही असे तुम्हाला वाटत असेल; पण आजच्या मंदीमुळे बेकार होऊ लागलेले लोक पुन्हा एकदा समाजवादाचा पुकारा करू लागले आहेत. गेल्या महिन्या दोन महिन्यांत समाजवादावरील पुस्तकांच्या विक्रीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. समाजवादाला पुन्हा हाक घालणारी ही मंडळी पाचव्या, सहाव्या वेतन आयोगाच्या लाभांना चटावलेली मंडळी आहेत, त्यांना शेतकऱ्यांच्या सुखदु:खाशी काही देणेघेणे नाही. त्यामुळे शेतकऱ्यांपुढील समस्या अधिकाधिक बिकट होत जाणार आहेत.

आतंकवादाचा प्रश्न तर सध्याच्या परिस्थितीत कोणालाही सोडवता येण्यासारखा नाही. या देशाला 'भाईभाईवादा'चा रोग झाला आहे. कोणाशी ताठपणे बोलणे म्हणजे आम्ही काहीतरी पाप करतो आहोत, गांधीवादाशी प्रतारणा करतो आहोत अशी सत्ताधारी लोकांनी समजूत करून घेतली आहे. या भाईभाईवादामुळे १९४७ साली पाकिस्तान झाला, १९६२ साली चीन आपल्या दरवाजाशी येऊन ठेपला आणि जर का हे भाईभाईवादी पुन्हा एकदा दिल्लीच्या सत्तेमध्ये आले तर पुढच्या पाच वर्षांत ईशान्य भारत पाकिस्तानमध्ये जाण्याची आणि वायव्य भारत चीनमध्ये जाण्याची शक्यता मला स्पष्ट दिसते आहे.

१९४४ साली अमेरिकेतील एका विद्यापीठात भाषण करताना चर्चिलने म्हटले होते की, "युद्ध संपले आहे. सगळ्या जगामध्ये एक 'लोखंडी पडदा' खाली येत आहे ज्यामुळे जगाचे दोन भाग होत आहेत. एका भागामध्ये समाजवादी हुकूमशाही राहणार आहे आणि दुसऱ्या भागामध्ये व्यक्तिस्वातंत्र्याची बूज राखणारी खुली व्यवस्था राहणार आहे."

आज परिस्थिती बदलली आहे. समाजवादी व्यवस्थेचा ऐतिहासिक पाडाव झाला आणि तो 'लोखंडी पडदा' गळून पडून आता जगामध्ये फक्त खुली व्यवस्थाच राहिली आहे; पण व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने लादून सत्ता भोगण्याची चटक लागलेल्या समाजवाद्यांना हे मान्य होणार नाही.

आता जगामध्ये एक नवा पडदा निर्माण होऊ लागला आहे. त्याला नाव ठऊद द्यायचे का अन्य काही हे इतिहास ठरवेल; पण या स्फोटक पडद्याच्या एका बाजूला लोकशाहीला विरोध करणारे सगळे हुकूमशहा तसेच एकाच प्रेषिताला किंवा एकाच व्यक्तीला थोर मानणारे, एकाच ग्रंथाला एकमेव प्रमाण मानणारे आणि दुसऱ्या बाजूला लोकशाहीवादी अशी जगाची विभागणी होणार आहे. यात कम्युनिस्ट विचारसरणीचे देश आणि आतंकवादाला थारा देणारे देश यांची दोस्ती होणार आहे. जगाचा पुढचा इतिहास या दोन महासत्तांच्या संघर्षाचा असणार आहे.

या परिस्थितीमध्ये हिंदुस्थानात येणारे नवीन सरकार कसे असेल, कसे असावे यावर गंभीरपणे चिंतन होणे गरजेचे आहे. आपण आपल्या खुल्या व्यवस्थावादी विचारसरणीपासून जरा बाजूला झालो तरी आपल्याला पैशाची मदत करून भिडस्त बनवायला अनेकजण उत्सुक असतात. त्यांना वश होऊन चालणार नाही. या मंडळींकडे हे सर्व पैसे कोठून येतात?

सगळ्या आतंकवाद्यांचा मुख्य धंदा मादक पदार्थांची वाहतूक करणं हा असतो. आतंकवादी म्हणजे फक्त मुसलमान आतंकवादी असे मला म्हणायचे नाही. अगदी महंत, बाबा, महाराज अशा ज्यांनी मठ स्थापन केले त्यातील जवळजवळ सर्वांचाच धंदा मादक द्रव्यांची वाहतूक हाच असतो. तेही अतिरेक्यांच्या यादीत मोडतात आणि या सर्वांना सक्षम कायदा व सुव्यवस्था नको असते म्हणून ते आतंकवादाचा वापर करतात.

अशा सर्व बाजूंनी घेरलेल्या अवस्थेत आपण स्वतंत्र भारत पक्षाच्या 'मिशन २००९' मधील अंतिम निर्णय घ्यायला जमलो आहोत.

शेतकऱ्यांपुढील हवामानबदल वगैरे समस्या, आतंकवादाचा हैदोस

याच्याबरोबरच आणखी एक गोष्ट घडण्याची शक्यता आहे. मी गेल्या सत्रात राज्यसभेत भाषण करताना म्हटले की, ‘२० जानेवारी २००९ रोजी बराक ओबामा अमेरिकेचे अध्यक्ष झाले. त्यांनी अमेरिकी फौजा इराकमधून काढून घ्यायला सुरुवात केली की सगळे आतंकवादी उन्मत्त होऊन विजयाच्या आरोळ्या ठोकत सगळीकडे आतंकवादाचा धुडगूस घालणार आहेत. अमेरिकन सिनेटला रँड कॉर्पोरेशनने जो अहवाल दिला आहे त्याप्रमाणे या आतंकवादाचा सगळ्यात मोठा फटका हिंदुस्थानला बसणार आहे. कारण हा देश त्याच्या भाईभाईवादामुळे आपले मूळचे तेज गमावून बसला आहे, पुळचट बनला आहे.’

आपण एप्रिल महिन्यात होणाऱ्या निवडणुकांची तयारी करू लागलो आहोत पण कदाचित चार-पाच महिन्यांच्या आत तालिबानी लोक काश्मीरमध्ये घुसण्याची शक्यता आहे. मग, निवडणुकाच होतील का नाही अशी शंका येते.

रामदेवबाबांनी एक पत्र प्रसृत करून त्यांच्या भक्तांना निवडणुकीत मतदान कसे निर्भीडपणे आणि सजगपणे करावे यासंबंधी मार्गदर्शन केले आहे. आपल्या काही कार्यकर्त्यांनीही त्यांच्याबद्दल ममत्व वाटून मी त्यांची भेट घेऊन त्यांना आपल्याशी जोडून घ्यावे अशी इच्छा व्यक्त केली आहे. रामदेवबाबांनी आपले साहित्य वाचले आहे किंवा नाही मला माहीत नाही, बहुधा वाचले नसावे. शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्ष गेली अनेक वर्षे व्यक्तिस्वातंत्र्याची जोपासना करण्यासाठी ज्या गोष्टी सांगत आहे त्याच कालपरवा सांगायला सुरुवात केलेल्या व्यक्तीकडे मदतीची याचना करायला जाण्याची आम्हाला, आवश्यकता काय? आपल्या ज्या कार्यकर्त्यांना रामदेवबाबांबद्दल ममत्व वाटत असेल त्यांनी त्यांच्याकडे आपले सगळे साहित्य पोहोचवून त्यांना समजावून द्यावे. मग त्यांना ते पटले तर ते आपणहून आपल्याकडे येतील, आपण त्यांच्याकडे जाण्याची आवश्यकता नाही.

आता प्रश्न उरतो तो निवडणुकीत कोणत्या पक्षाबरोबर जावे? छोट्याछोट्या पक्षांची आघाडी बांधावी अशी काही कार्यकर्त्यांची सूचना आहे; पण मी कोणत्याही छोट्या पक्षाशी दोस्ती करू इच्छीत नाही. कारण, एकवेळ सत्ताधीशांचा अहंकार आणि दर्प परवडतो पण ज्यांच्याकडे सत्ता नाही, येण्याचीही शक्यता कमी त्यांच्या मनाचा हलकेपणा सोसवत नाही. ज्यांच्याकडे सत्ता नाही, शहाणपणही नाही आणि आविर्भाव मात्र अवाढव्य असतो त्यांच्याबद्दल तर बोलायलाच नको. आजकाल गाजणारे मायावती आणि मुलायम यांच्यासारखे लोक अल्पावधीतच इतिहासाच्या उकिरड्यात जाऊन पडतील. त्यांना काय नाचायचे

ते नाचू द्या. ज्यांच्याकडे देश वाचवण्याचा काही कार्यक्रम नाही, जे केवळ जातीच्या आधाराने आरक्षणासारखेच मुद्दे घेऊन परिवर्तन घडवून आणण्याच्या बाष्कळ गप्पा मारतात त्यांचा आपण विचारसुद्धा करू नये.

आपल्या बाजूने एकच गोष्ट महत्त्वाची आहे. आपण कधीही असत्याचा आधार घेतला नाही, जे सत्य दिसले तेच निर्भीडपणे मांडले. निवडणुकीच्या मोहाने जर का आपण आपल्या जाहीरनाम्यात काही आमिषे – उदाहरणार्थ, मराठी माणूसवाद किंवा आरक्षणवाद – दाखवली तर आपण गेल्या पस्तीस वर्षांत कमावलेले सगळे पुण्य नष्ट होऊन जाईल. काही अपवादांचा डाग लावून ही पुण्याई नष्ट करण्याचा विचारसुद्धा करू नका.

महाराष्ट्राची जी परंपरा आपण ओळखतो आणि त्या परंपरेसाठी आपण सर्वांनी इतकी वर्षे जीव ओतला आहे ती परंपरा असे सांगत नाही की महाराष्ट्रातील लोक हे अप्पलपोटे आहेत. मराठी लोक फक्त स्वतःचे पोट भरण्याकरता धडपड करणारे आहेत, बाहेरच्या माणसाला खाऊ घालीत नाहीत अशी अपकीर्ती महाराष्ट्राची व्हावी अशी भूमिका स्वतंत्र भारत पक्ष आणि शेतकरी संघटना कदापि घेणार नाही. औरंगाबाद अधिवेशनात आपण स्पष्ट शब्दांत मांडले की जे समाज एकाच प्रदेशात बसून राहिले त्यांचे भले कधीही होत नाही. दैवयोगाने, महाराष्ट्रावर जर का एखादा हल्ला झाला आणि मराठी माणसांना निर्वासित व्हावे लागले तर सिंधी लोकांनी जशी आपली कर्तबगारी दाखवली, त्याहीपेक्षा ज्यू लोकांनी जसे स्वतःला सर्वश्रेष्ठ सिद्ध केले तसे मराठी लोकसुद्धा करतील. जर कोणी त्यांना इथल्या इथे गोंजारत ठेवत असतील तर ते त्यांचे मोठे शत्रू आहेत, ते त्यांना बुडवायचे ठरवीत आहेत. आपण आपला जो शुद्ध विचार आहे तो शेवटपर्यंत धरून ठेवणार आहोत.

पक्षाला मान्यता मिळवून हक्काचे चिन्ह मिळवायचे तर लोकसभेत निदान २ खासदार किंवा सर्व मिळून किमान ६% मतदान मिळवायला हवे. आता विचाराबद्दल इतका सगळा चोखंदळपणा दाखवून हे कसे साधायचे? दोन जागा मिळवणे अवघड असेल तर आपण ज्या सतरा जागा गेल्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला विनाअट मिळवून दिल्या त्यावर आपला अधिकार आहे. त्या सगळ्याच्या सगळ्या लढवून ६ टक्क्यांचे उद्दिष्ट गाठू शकतो. अजून सत्तेचा अतापता नाही आणि लोकांना पंतप्रधानकीची स्वप्ने पडू लागली आहेत! त्यांना अलीकडचा इतिहासही आठवत नाही. गेल्या निवडणुकीत दिल्ली, राजस्थानमध्ये मुख्यमंत्रिपदांचे उमेदवार जाहीर केले नसते तर दोन्ही राज्यांत

रालोआ जिंकली असती हे खरे आहे. रालोआ आजच पंतप्रधानाचे नाव घोषित करते आहे ही घोडचूक आहे.

आपण कोणतेही दरवाजे बंद करीत नाही. पण मागील निवडणुकीत महाराष्ट्रातल्या ज्या १७ जागा भाजप-शिवसेना युतीच्या उमेदवारांना शेतकरी संघटनेच्या आणि स्वतंत्र भारत पक्षाच्या प्रभावी प्रचारामुळे मिळाल्या त्या सगळया जागा आम्ही राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे मागणार आहोत; पण आज आम्ही सर्वप्रथम सात जागांची मागणी करीत आहोत.

**चंद्रपूर** - आ. वामनराव चटप, **परभणी** - डॉ. मानवेंद्र काचोळे, **नांदेड** - श्री. गुणवंत पा., **बुलडाणा** - श्री. वामनराव जाधव, **रामटेक** - श्री. राजकुमार तिरपुडे, **धुळे** - श्री. शरद जोशी किंवा श्री. रामचंद्र बापू पाटील, **हातकणंगले**

असे हे सात मतदारसंघ असून हातकणंगले मतदारसंघातील उमेदवार ठरवण्याचे अधिकार मी वामनराव चटप यांच्याकडे सोपवतो.

१९९८ साली अमरावती येथे भरलेल्या जनसंसदेमध्ये भाषण करताना मी चर्चिलच्या एका वक्तव्याचा उल्लेख केला होता. चर्चिलने असे म्हटले होते की, 'कृपा करा आणि हिंदुस्थानला स्वातंत्र्य देऊ नका. कारण या तथाकथित अहिंसावादी चळवळीच्या मागे जे नेतृत्व तयार झालेले आहे ते कचकड्याचे आणि मेणाचे आहे. त्याला प्रशासनाची काही माहिती नाही. यांच्या हाती जर राज्य गेले तर जातीजातींमध्ये वैमनस्य माजेल, एकमेकांच्या रक्ताचे पाट वाहातील. हिंदुस्थानातील गरिबांवर कृपा करा आणि त्यांना या नेत्यांच्या हाती सोपवू नका.' चर्चिलच्या तोंडी आले म्हणून लोकांना वाईट वाटले; पण महात्मा जोतिबा फुल्यांनी काय सांगितले होते? ते म्हणाले होते की, 'जोपर्यंत जातीजातीतील वैमनस्य संपत नाही आणि समाजसुधारणा घडून येत नाही त्याआधी जर का देशाला स्वातंत्र्य मिळाले तर त्या स्वातंत्र्याचे स्वरूप पेशवाईचे होईल.'

म्हणजे, महात्मा फुले आणि चर्चिल यांच्या म्हणण्यात एकवाक्यता होती. ब्रिटिशांनी चर्चिलचे ऐकले नाही. आपण महात्मा फुल्यांचे ऐकले नाही. आपसूक हातात पडलेल्या स्वातंत्र्याने आम्ही हरखलो. कवि गोविंदांची एक कविता आहे - रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले? आम्ही मात्र रणावीण मिळालेल्या स्वातंत्र्याची फुशारकी मारू लागलो. स्वस्त मिळालेल्या गोष्टीला मोलही नसते. उतावळया नवऱ्याला सल्ला दिला जातो की घाईघाईने लग्न करा आणि शांतपणे पश्चात्ताप करा. तसेच, घाईघाईनी मिळवलेल्या स्वातंत्र्याची आपल्याला किंमत मोजावी लागते आहे. आताची हिंदुस्थानची एकूण परिस्थिती पाहिली की मला कविवर्य

भा. रा. तांबे यांच्या 'रुद्रास आवाहन' या कवितेची आठवण होते. त्यात त्यांनी देशाच्या परिस्थितीचे वर्णन करताना म्हटले आहे –

*जळ तडागीं सडे, बुडबुडे, तडतडे*
*'शान्ति ही !' बापुडे बडबडति जन–किडे !*

सगळ्या हिंदुस्थानभर पाणी तुंबले आहे, त्यात एकमेकांशी भांडत जगणारे किडे वाढले आहेत. दोनचारपाच खुनाचे, दरोड्याचे गुन्हे केलेले लोकच आता इथे निवडून येऊ शकतात. अशा या घाणीला साफ करून, चर्चिलची भविष्यवाणी खोटी ठरवून जोतिबा फुल्यांचे स्वातंत्र्याचे स्वप्न खरे करण्याची जबाबदारी जोतिबा फुल्यांचे शिष्य म्हणून आपल्यावर आहे. दोन जागा मिळोत का ६ टक्के मते मिळोत की काही घडो, हे करताना आतापर्यंत आपण जे विचार आणि मूल्ये जोपासली, ज्या उद्दिष्टांच्या ध्यास घेतला त्याचे विस्मरण होऊ देऊ नका; त्यांच्याशी कोणत्याही तऱ्हेची तडजोड करणार नाही हा निर्धार पक्का ठेवा. आपद्धर्म म्हणून काही काळ आपल्याला राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या गुहेचा आसरा घ्यावा लागला असला तरी आपण काही कायम गुहेत बसणारी वटवाघळे नाहीत. नाही पटले तर आम्ही ताठ मानेने बाहेर पडणार आहोत. त्यांना काही सद्बुद्धी सुचली तर आपल्याला काही भांडण करायचे नाही कारण शत्रूही जबरदस्त आहे. समाजवादाचे पुन्हा एकदा राज्य यावे याकरिता ज्याप्रमाणे डावे प्रयत्न करणार आहेत त्या तऱ्हेने आपले मित्र खुली व्यवस्था टिकविण्याचे प्रयत्न करणार असतील तर त्यांना दुखावण्याचा आपला मानस नाही; पण ते जर आपल्या या मऊपणाचा गैरफायदा घेऊ लागले तर त्यांना जाणीव द्यायला हवी की आम्हाला २ खासदार किंवा ६ टक्के मते मिळतील ना मिळतील पण आम्ही वेगळे झालो तर त्यांनाही दिल्लीमध्ये लागणाऱ्या वजनात घट होऊ शकते.

या बैठकीला येताना मी मोठ्या निराश मनाने आलो पण तुम्ही माझ्यामध्ये ही एक वेगळी दृष्टी दिली त्याबद्दल मी तुमच्या ऋणातच राहीन. पण तुम्हाला एक विनंती करतो की निदान शेतकऱ्याची संपूर्ण कर्जमुक्ती होईपर्यंत शेतकरी संघटनेतून जो कोणी फुटून निघेल तो आपला शत्रू आहे असे समजा आणि त्याप्रमाणे त्याच्याशी व्यवहार करा.

*(जानेवारी २००९– कार्यकारिणी, परभणी)*

*(शेतकरी संघटक ६ फेब्रुवारी २००९)*

■■■

शेतकरी संघटनेने पहिल्यांदा दाखवून दिले की, शेतकरी कोणत्याही प्रांताचा असो, कोणत्याही भाषेचा असो, कोणत्याही पिकाचा असो, - शेतकरी कोणतेही बियाणे लावो - सगळ्याच शेतकऱ्यांची शेती तोट्याची आहे आणि म्हणून शेतकरी कर्जात आहे. चारी दिशांना तोंडे करून आलेल्या सर्व शेतकऱ्यांना एकत्र बांधण्याचे सूत्र म्हणजे 'शेती तोट्यात आहे.' मोठे शेतकरी, लहान शेतकरी, शेतमजूर अशी शेतकऱ्यांची भांडणे लावून हा प्रश्न सुटणारा नाही. तसेच, शेतकऱ्यांना केवळ पाणी देऊन, बियाणे देऊन, सबसिडी देऊनही हा प्रश्न सुटणारा नाही.
सबंध देशभर सरकारी मदतीचे गुणगान सुरू असताना इतका जगावेगळा विचार शेतकरी संघटनेने त्यावेळी मांडला. 'सरकार जाणीवपूर्वक शेतकऱ्यांना लुटतं', 'सरकारचं धोरण, शेतकऱ्याचं मरण' 'तूट असेल तर लूट आणि मुबलकता असेल तर लिलाव' अशी सगळी कोणी कधी न ऐकवलेली सरकारची धोरणे आणि त्याला 'भीक नको, हवे घामाचे दाम' हे उत्तर. हे उत्तर इतके चपखल बसले की त्याने चमत्कार घडला.

- शरद जोशी

१० डिसेंबर २००५, रौप्यमहोत्सवी मेळावा परभणी.

जनशक्ती वाचक चळवळ
किंमत : रु. २५०/-